चक्रवर्ती (विवाह)



५२
मं. ठाणें
बध
REFBK-0007776

मं. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी

सावरकर-दर्शन

व्यक्ति नि विचार

सं. कि. नि. ८८७
स्थळ क्र.उ

लेखक
भा. कृ. केळकर



ग्रंथालय कक्ष
७७७६
स्थळ क्र.उ

प्रकाशन-क्रमांक ७८

REFBK-0007776

ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक
ग. पां. परचुरे,
ग. पां. परचुरे
प्रकाशन मंदिर,
गोरेगांवकर चाळ, क्र. २
गिरगांव, मुंबई ४

मूल्य ६ रुपये

आवृत्ति पहिली
अभिनव भारत
सांगता-समारंभ
दि. १० मे १९५२

मुखपृष्ठ सजावट
बाळ ठाकरे

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस लि.,
४०-४१ वेलस्ले रोड
पुणें १

दर्शनापूर्वी

"सावरकरांचें आयुष्य ही अेक दुःखान्तिका आहे कीं भावी पिढ्यांचा तो आदर्श आहे ? तुम्हांला काय वाटतें ?" अेक वर्षापूर्वी भारतांतल्या अेका थोर विचारवन्तानें मला सहज हा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाचा रोख माझ्या ध्यानांत आला आणि मी अस्वस्थ झालों. मला वाटूं लागलें कीं, गांधीवधानंतरं झालेल्या हिंदुत्ववाद्यांच्या ससेहोलपटीमुळें सावरकरां-सारख्या थोर पुरुषावर वैचारिक अन्याय होत आहे. हिंदुत्ववाद्यांच्या तथाकथित पराभवानें त्यांच्या विचारसरणीविषयीं गैरसमज पसरत आहेत. ही जाणीव मला झाली, आणि त्यामुळेंच मी हें पुस्तक लिहिण्याचें ठरविलें.

माझें हें पुस्तक म्हणजे दुहेरी साहस आहे. अेक तर सावरकरांसारख्या विवाद्य मतें मांडण्यांत प्रसिद्ध असलेल्या नेत्याच्या मतांची मीमांसा मला करावयाची होती, आणि दुसरें म्हणजे–माझ्यासारख्या अननुभवी टीका-लेखकाला हें कार्य करावयाचें होतें. पण तें दुहेरी साहस करून मी हें पुस्तक सादर करीत आहें.

तें लिहितांना मी विभूतिपूजकाची किंवा निर्दय, दोषैकदर्शी विरोध-काची भूमिका घेतलेली नाहीं. सावरकरांना मी विभूति मानत नाहीं; पण ते असामान्य महापुरुष आहेत असें माझें मत आहे. त्यांचें व्यक्तित्व व त्यांचें रोमांचकारी जीवन हीं कादंबरीपेक्षांहि अद्‌भुत असणारीं सत्यें आहेत; याची जाणीव ठेवूनच मी त्यांना 'असामान्य' म्हणतों ! तें असामान्यत्व मान्य न करतां केवळ सावरकरांवर दोषारोप करणें म्हणजे निर्भीड व बुद्धि-निष्ठ टीका करणें आहे असें मला वाटत नाहीं. तसा टीकाकार हा खरा

टीकाकारच नव्हे, म्हणून तीहि भूमिका मी घेतलेली नाहीं. पण व्यक्ति कितीहि मोठी असली तरी तिच्या कर्तृत्वाला, विचारांना मर्यादा असतात; तिच्या हातूनहि चुका होतात. त्या मर्यादा वा चुका मान्य करूनहि व्यक्तीचें श्रेष्ठत्व कमी होत नाहीं असें मला वाटतें. म्हणूनच मी हें पुस्तक लिहितांना प्रथम सावरकरांच्या विचारांची वस्तुनिष्ठ मांडणी करून नंतर त्यांतील गुणदोषांची थोडक्यांत पण साधार चर्चा केली आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचें दर्शन घडविणारीं दोन प्रकरणें लिहून त्यांतील गुणदोषहि मांडले आहेत. सावरकरांनीं जें कार्य केलें त्याचेंहि अशेंच परिशीलन केलें आहे. सावरकरांचें व्यक्तित्व मला जसें दिसलें, तसें मी रंगविलें आहें. म्हणूनच तें प्रकरण वेगळ्या रीतीनें लिहिलें.

सावरकरांनीं अितक्या विविध विषयांवर आपले विचार मांडले आहेत कीं, त्या सर्वांचें समग्र विवेचन करण्यास ७००–८०० पानांचा ग्रंथ लिहावा लागला असता. पण तें शक्य नसल्यामुळें या पुस्तकांत मी शक्य तों सर्व विधेयें साधार मांडून सावरकरांच्या सर्वांगीण विचारसरणीचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. कांहीं ठिकाणीं (विशेषतः सावरकरांचा राष्ट्रवाद, हिंदुत्वाचें राजकारण या दोन प्रकरणांत) केवळ मुद्दयांना स्पर्श करून पुढें जावें लागलें आहे. पण यांतील सर्व विवेचन साधार आहे अेवढेंच मला सांगावयाचें आहे. सावरकरांच्या वाङ्मयांतील अुतारे भरपूर वापरले आहेत. म्हणून प्रत्येक ठिकाणीं त्या संदर्भ-ग्रंथाचें नांव दिलेलें नाहीं.

या पुस्तकाच्या नाविन्यामुळें त्यांत कांहीं दोष शिरले असण्याचा संभव आहे. व्यक्तित्वाचें दर्शन घडवून त्यांतून विचारांचें स्वरूप समजावून देणें– ही पद्धति नवीन असल्यामुळें या पुस्तकांतील विवेचनांत कांहीं ठिकाणीं अपरिहार्यपणें पुनरुक्ति झाली आहे. सावरकरांच्या जीवनकार्याचें व विचार-सरणीचें अैतिहासिक मूल्यमापन कोणीहि आतांपर्यंत केलेलें नसल्यामुळें मला प्रत्येक प्रकरणांत अितिहासाचा मागोवा घ्यावा लागला आहे. त्यामुळें कदाचित् तो भाग अनवश्यक वाटण्याचा संभव आहे.

हें पुस्तक लिहितांना मला अनेकांचें वैचारिक व प्रत्यक्ष साहाय्य झालें आहे. त्या सर्वांना धन्यवाद देणें माझें कर्तव्य आहे. स्वतः वीर सावरकरांचा मी अत्यंत ऋणी आहे. या पुस्तकाची कल्पना सांगितल्यापासून तों त्याचें हस्तलिखित वाचून दाखवीपर्यंत अत्यंत आत्मीयतेनें व कंटाळा न करतां अनेक वेळां चर्चा करण्याची संधि त्यांनीं मला दिली. अत्यंत बुद्धिनिष्ठ वृत्तीनें त्यांनीं केलेल्या त्या चर्चा हा माझा अमोल ठेवा आहे. त्याचा उपयोग मी या पुस्तकांत भरपूर केला आहे. बऱ्याचशा प्रश्नांवरील त्यांचीं मतें त्यांच्याशीं प्रत्यक्ष चर्चा करूनच या पुस्तकांत मांडलीं आहेत. सावरकरांप्रमाणेंच मी डॉ. आंबेडकर, डॉ. मुकर्जी यांच्यासारख्यांशीं व प्रा. माटे, प्रा. क्षीरसागर, ग. वि. केतकर, प्रा. के. ना. वाटवे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आदि महाराष्ट्रांतील विचारवन्तांशीं मी चर्चा केली. सावरकरांचे अनुयायी आणि विरोधक–दोघांनाहि भेटून त्यांचा दृष्टिकोन समजावून घेतला. या सर्वांनीं दिलेल्या सहकार्यासाठीं त्यांना धन्यवाद.

माझे मित्र प्रा. स. गं. मालशे, विद्याधर पुंडलीक, स. ह. देशपांडे यांनीं सावरकरांच्या वाङ्मयीन गुणांसंबंधीं लिहिलेल्या सातव्या प्रकारणास बराच हातभार लावला आहे. तसेंच त्यांनीं हस्तलिखित वाचून कांहीं सूचना केल्या. या दोन्ही प्रकारच्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाचें काम श्री. ग. पां. परचुरे यांनीं उत्साहानें अंगावर घेतलें; सजावट बाळ टाकरे यांनीं केली, आणि माझे मित्र अ. अं. कुलकर्णी व 'संगम' मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. मधुकर पटवर्धन यांनीं अल्पावधींत छापून दिलें, त्यासाठीं या सर्वांना धन्यवाद. शेवटीं आभार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे ! त्यांनीं अगदीं अक्षरशः आठ दिवसांच्या पूर्वसूचनेनें स्वतःचीं महत्त्वाचीं कामें बाजूला सारून या पुस्तकाला उत्कृष्ट प्रस्तावना लिहून देऊन मला उपकृतच केलें आहे.

या पुस्तकांत कोणत्याहि पक्षांवर वा व्यक्तींवर आलेली टीका पूर्णपणें वैचारिक स्वरूपाची आहे, त्यांत अनादराचा भाग नाहीं अेवढें सांगणें अवश्य आहे. अशा विवेचनात्मक पुस्तकांत अशी टीका अपरिहार्य ठरते.

सावरकर हे केवळ समुद्रांत अुडी टाकणारे किंवा बाँब तयार करणारे क्रांति-कारक नाहींत,—ते अनेक सर्वंकष, प्रगतिशील दृष्टींचे थोर विचारवन्त आहेत हें मांडणें हा या पुस्तकाचा मुख्य हेतु आहे ! तो सफल झाला म्हणजे पुष्कळ झालें ! मग वाङ्मयीन दृष्ट्या त्याची किंमत शून्य झाली तरीहि चिंता नाहीं ! किंबहुना सावरकरांसंबंधींचे या स्वरूपाचे अधिक चांगले ग्रंथ निघावेत अशीच माझी अिच्छा आहे !

१० सदानंद वाडी,
मुंबअी ४.
दि. २५-४-१९५२

भा. कृ. केळकर

* *

वीर सावरकर अंदमानच्या अंधेरींतून
बाहेर पडत असतांना अेका कैद्यानें
पहारेकऱ्यांना न जुमानतां धांवत
येअून सावरकरांच्या गळ्यांत साध्या
रानचांफ्याची माळ घातली होती. त्या
कैद्याच्या त्या निरपेक्ष, नि:सीम
प्रे मा स सा द र स म र्प ण

* *

अनुक्रम

		पृष्ठ
१. व्यक्तित्वाचें रसायन	....	१
२. सावरकरांची शस्त्रसाधना	...	२८
३. रूढीभंजक सावरकर	...	९६
४. सावरकरांचा राष्ट्रवाद	...	१५८
५. हिंदुत्वाचें राजकारण	....	२०४
६. भाषिक आंदोलन	....	२२८
७. सावरकरांची साहित्यसृष्टि	....	२३७
८. व्यक्तिदर्शन	....	२६८
९. मूल्यमापन	...	२८५

प्रस्तावना

सावरकरांचें व्यक्तित्व असामान्य आहे. हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासावर या व्यक्तित्वाचा ठसा उत्कटपणें उमटलेला आहे. हें व्यक्तित्व स्वातंत्र्य-संग्रामांतील एका महत्त्वाच्या प्रवृत्तीचें स्फूर्तिस्थान होतें, असें हा इतिहास नोंदून ठेवील. मृत्यूचें मूल्यच जीवनाचें श्रेष्ठत्व सिद्ध करतें. हुतात्मतेशिवाय, मानवी स्वातंत्र्य हें अंतिम मूल्य आहे हें प्रस्थापित होत नाहीं. या हुतात्मतेला प्रेरणा देणारें आणि उदात्त व उत्कट भावनांना आवाहन देणारें कवित्वहि त्यांच्यात आहे. त्यांची गद्य व पद्य कविता दिव्याग्नींत प्रत्यक्ष संचार करीत असतां आलेल्या अनुभवांतून निघालेलीं आत्मयज्ञाचीं महासूक्तेंच बनलीं आहेत. हुतात्मतेशिवाय सशस्त्र लढा देणें जेव्हां अशक्य होतें, त्या काळांतील हें कवित्व आहे. या कवित्वाचा स्थायीभाव देशभक्ति व रस वीररस आहे; हे पृथक्करण प्राचीन साहित्य-शास्त्राशीं तंतोतंत जमणारें नाहीं, हें मला मान्य आहे. देशभक्ति ही सावरकरांची अंतिम निष्ठा आहे.

भारतीय राजकारणांतील ब्रिटिश अमदानींतील एक विशिष्ट राजकीय विचारप्रवृत्तीचे ते प्रवर्तक म्हणून प्रसिद्ध आहेत. या विचारप्रवृत्तीचे महत्त्वाचे दोन मुद्दे आहेत. एक, ब्रिटिशांची सत्ता घालविण्याच्या उपाय-योजनेसंबंधीं, व दुसरा, हिंदु व मुसलमान यांच्या परस्पर राजकीय व सामाजिक नात्यांतून निर्माण होणाऱ्या राजकारणीं वर्तनासंबंधीं. त्यांपैकीं पहिल्या मुद्यांतील सावरकरांची विचारसरणी ऐकांतिक होती. त्याचा विचार जगाच्या गत इतिहासांतील अनुभवावर आधारलेला होता. सशस्त्र बंडाशिवाय परकीय राज्यें नष्ट होत नाहींत, असा त्यांचा सिद्धांत होता.

याच सिद्धांतानें त्यांचे विचार भारलेले आहेत. ही विचारसरणी सर्व-सामान्य व्यावहारिक बुद्धीला विशेष विचार न करतां ग्राह्य वाटणारी व सळसळणाऱ्या रक्ताच्या अपरिपक्व तरुणांस मोहित करणारी होती. सर्व सामान्य हिंदी मनुष्य पराभूत व क्लीब मनोवृत्तीचा बनलेला होता, म्हणून तो अत्यंत भीतिग्रस्तपणें आपली सहानुभूति लपवून ठेवीत असे. हा सिद्धांत मान्य न करणारे नवविद्याविभूषित विचारवंत सावरकरांच्या विचारसरणीचें वैयर्थ्य पटवीत होते. त्यांनीं ब्रिटिशांच्या उदारमतवादी आधुनिक संस्कृतीचा, राज्यशास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास ,केला होता. त्यांचें विचारपूर्वक सर्व प्रमाणांची छाननी करून बनविलेलें मत असें होतें कीं, या परकीय राज्याची समाप्ति लोकमत बदललें म्हणजे आपोआप होईल. ह्या नवविद्याविभूषितांचे अग्रगण्य विचारवंत कै. न्या. मू. महादेव गोविंद रानडे होत. याच परंपरेंतून म. गांधी पुढें आले. त्यांनीं याच विचारसरणीला सत्याग्रहाच्या तत्त्वाची व तंत्राची उत्तम जोड दिली. ब्रिटिश राजवट सशस्त्र* बंडाशिवाय समाप्त झाली. कार्यकारणभावाचे नियम कसे बदलतात, याचें हें राजकीय इतिहासांतील एक चांगलें उदाहरण आहे.

परंतु हिंदी राजकारणांतील हिंदु-मुसलमानासंबंधीं सावरकरांचें दिग्दर्शन हें तंतोतंत खरें ठरलें. इतिहासानें कठोरपणें अत्यंत भयानक असा निर्णय दिला. सावरकरांची हिंदुमुसलमानांच्या परस्परसंबंधाची मीमांसा खरी ठरली. हा इतिहासाचा निर्णय म्हणजे पाकिस्तानची निर्मिती होय. इतिहासाच्या शक्ती अनिवार्यपणें ठराविक दिशेनें मार्गक्रमण करीत असतात; त्यांचा मार्ग मानवांस बदलतां येत नाहीं; असा एक इतिहासवादी सिद्धांत आहे; त्या प्रमाणें पाकिस्तानच्या निर्मिती-बद्दल कोणासच जबाबदार धरतां येणार नाहीं. विशेषतः सावरकरांची मुसलमान मनोवृत्तीची मीमांसा संपूर्णपणें खरी आहे, असें गृहीत धरल्यास पाकिस्तानची निर्मिति ही अपरिहार्यच ठरते.

---

* निदान असें म्हणतां येईल कीं, सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांना स्वातंत्र्याच्या चळवळींत मुख्य स्थान नव्हतें.

कारण हिंदुमुसलमानांच्या प्रामाणिक व शुद्ध ऐक्यजुटीची अशक्यताच त्यामुळें सिद्ध होते. अथवा, आसिंधु सिंधुपर्यंत असलेल्या भारतांतून सर्व मुसलमानांचें निर्दालन वा निर्वासन वा दासीकरण हा तरी मार्ग उरतो. ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वाच्या पार्श्वभूमींत व निःशस्त्रप्रजेच्या राजकारणांत त्या मार्गाला काल्पनिकच स्थान राहतें.

इतिहासाच्या शक्तींना कलटणी देतां येते, त्यांचा मार्ग बदलतां येतो, कारण त्या शक्तींचें मुख्य केंद्र मानवच आहे, म्हणून मानवांची बदललेली इच्छाशक्ति मार्गांत बदल घडवून आणूं शकते, असा एक इतिहासवादी सिध्दान्त आहे. या सिध्दान्ताप्रमाणें हिंदुमुसलमानांच्या परस्पर संबंधाची मीमांसा निराळ्या प्रकारानें करावी लागते. हिंदुमुसलमानांच्या परस्परसंबंधाच्या दोन प्रकाराच्या मीमांसा प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक प्रकार असा आहे कीं मुसलमानी राज्यांच्या शांतता-प्रधान काळांत हिंदूंच्या व मुसलमानांच्या संस्कृतींत देवाणघेवाण, सौजन्य व सहकार्य निर्माण होत असें. त्यामुळें हिंदु व मुसलमान हे एकमेकांचे शेजारी बनून त्यांच्यांत सलोखा व बंधुत्व वाढीस लागलें होतें. याच ऐतिहासिक मीमांसेच्या आधारानें हिंदुमुसलमानांच्या एकीवर व एक राष्ट्रीयतेवर भर देणारें राजकारण भारतांतील नेत्यांनीं दीर्घकाल चालविलें. परंतु तें राजकारण पूर्ण अपयशी ठरलें. याचें मुख्य कारण असें होतें कीं, हिंदु व मुसलमान यांच्यांत एकता किंवा सामाजिक बंधुत्व दृढ करणाऱ्या प्रवृत्ति दुर्बल व शिथिल होत्या. त्या अतएव निष्प्रभ ठरल्या. एकता किंवा सामाजिक बंधुत्व दुर्बल राहिलें याची मुख्य जबाबदारी सावरकरी मीमांसेप्रमाणें, मुसलमानांच्या प्रवृत्तींवर अधिक पडते. सकृद्दर्शनीं सावरकरांचें म्हणणें प्रमाणशुद्धहि वाटतें. इतिहासांतील अनेक घटना सावरकरांच्या सिध्दान्तास पुष्टि देतात. इस्लामची असहिष्णुता व परधर्मीयांबद्दलची निर्घृणवृत्ति प्रसिद्ध आहे. उलट हिंदुत्वाची व हिंदुधर्माची सहिष्णुता व विश्वबंधुत्वप्रवणता इतिहासानें वारंवार सत्य करून दाखविली आहे. आतां दुर्दैवानें पाकिस्तान निर्मिति होऊन एका दृष्टीनें हिंदुमुसलमानांचा प्रश्न निकालांत निघाला आहे. परंतु हिंदुत्वाची मीमांसा मानवी व भारतीय इतिहासाच्या व समाजशास्त्राच्या पार्श्वभूमीवर अधिक सखोल रीतीनें करण्याची आवश्यकता मात्र अधिकच उत्पन्न झाली आहे.

सावरकरांनीं आपला ध्येयवाद कल्पनारंम्य भावुकतेनें निर्मिलेला व भूतकालाच्या पूजेंत रमविलेला आहे, असा एक आक्षेप त्यांच्यावर घेण्यांत येतो. परंतु सावरकरांच्या व्यक्तित्वांत दोन परस्पर विरोधी मूलगामी व समन्वय न घडलेल्या प्रवृत्ति आहेत. एका टोकाला, उत्कट वासनांना वश असलेली व भारतीय भूतकालांतील शौर्याच्या कथेंत तन्मय झालेली भारतभक्ति आहे, आणि दुसऱ्या टोकाला श्रध्देय व विचार्य सिध्दान्तांच्या व निष्ठांच्या सर्व अनुकूल वा प्रतिकूल कक्षांचा परामर्श घेण्यास समर्थ असलेली बुद्धिवादी दृष्टि आहे, हें त्यांच्या बौद्धिक सामर्थ्याचें द्योतक लक्षण आहे, त्यांत असामान्यता आहे. सावरकरांनीं लिहिलेलें 'हिंदुत्व' हें पुस्तक या विरुद्ध प्रवृत्तींची साक्ष पटवितें. सावरकरांच्या लिखाणांतील उत्कृष्ट शास्त्रीय दर्जा प्राप्त झालेलें हें पुस्तक आहे. सावरकर हे मूलगामी विचार करणारे विचारवंत आहेत, याचीही साक्ष या पुस्तकांत मिळते.

हिंदुत्वाची मीमांसा करण्याचा प्रयत्न अनेक भारतीय व पाश्चात्य तत्त्व-विवेचकांनीं केली आहे. हिंदुमीमांसा वा हिंदविद्या (Indology) नांवाची मानवजातिशास्त्राची एक शाखाच पाश्चात्य तत्त्वविवेचकांनीं व संशोधकांनीं निर्मिली आहे. मॅक्समुल्लरपासून कार्लमार्क्स् पर्यंतच्या विविधमतांच्या, दृष्टीच्या पंडितांनीं हिंदविद्येंत आपआपल्या विचारसरणीची भर टाकली आहे. हिंदुधर्म, हिंदी संस्कृति, हिंदुसमाज इत्यादि विविध बाजूंनीं हिंदविद्या मांडलेली आढळते. मानवी बंधुत्वाची स्थापना व संस्कृतिविस्ताराचा प्रयत्न या दोन्ही दृष्टींनीं हिंदविद्या अत्यंत गंभीर व मार्गदर्शक ठरलेली आहे.

भारतीय तत्त्वचिंतकांत रामकृष्ण परमहंस, विवेकानन्द, रमेशचंद्र दत्त, रविन्द्रनाथ ठाकूर, लो. टिळक, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर व वीर सावरकर यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. आध्यात्मिक किंवा धार्मिक भारतीयतेचें उच्चतम मूल्य निदर्शनास आणण्याचें कार्य रामकृष्ण परमहंस, लो. टिळक इत्यादिकांनीं केलें आहे. 'हिंदुधर्म' या कल्पनेला मध्यवर्ती स्थान देऊन केलेली ही मीमांसा आहे. धार्मिक स्वातंत्र्य व परधर्मसहिष्णुता वाढीस लावणें व माणसाचें धार्मिक श्रेष्ठत्व धर्मभेदातीत विश्वबंधुत्वांत

वाहणें—असा एक महत्त्वाचा दृष्टिकोण हिंदुधर्मकल्पनेच्या द्वारें मांडून व्यावर्तक लक्षण म्हणून 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें वाक्यखण्ड टिळकांनीं घातलें. त्यामुळें शाख, जैन, बौद्ध इत्यादि त्यांतून निसटूं लागले. महाराष्ट्रज्ञानकोशकारांनीं तर त्या व्याख्येंत शूद्रहि बसत नाहींत, असें दाखविलें. हिंदुत्वाचें धार्मिक स्वरूप दाखविण्यांत एका बाजूनें एक मोठें यश प्राप्त झालें; व दुसऱ्या बाजूनें एक अपयश उघडकीस आलें. सर्व धर्मांचा समन्वय करण्याचें सामर्थ्य दाखविण्यांत यश आलें, परंतु सर्व धर्मांचा समन्वय करण्याच्यांत प्रवृत्तीच्या पोटीं हीन अपधर्मांचें, हीन आचारांचें, व क्षुद्र भेदांचें स्तोम हिंदु धर्मांत माजलें; त्यामुळें एकजिनसी समाजसंस्था निर्माण करण्यांत अपयश आलें. लहान—मोठे, धार्मिक—सामाजिक गट एकमेकांपासून फुटीरपणें राहण्यांत कृतार्थता मानतात, व क्षुद्र अहंकारांच्या जंजालांत गुरफटलेलीं मनें निर्माण करतात. सामाजिक व धार्मिक विविध परंपरेच्या संग्रहालयाचें स्वरूप हिंदु समाजाला त्यामुळें आलें! समाजशास्त्राच्या अभ्यासूंना त्यामुळें एक संपन्न अभ्यासक्षेत्र लाभलें खरें; परंतु समाजाचें राजकीय अनुशासन निर्वेधपणें घडण्यास व राजकीय बलानें संपन्न समाजसंस्था निर्माण होण्यास प्रतिबंध करणाऱ्या अनन्त अडचणींचें बरच हिंदुसमाज बनला.

हिंदुत्वाचा अभ्यास करण्याचें हिंदु धर्म हेंच एक प्रमुख साधन नव्हे असें मानणारी तत्त्वचिंतकांची परंपरा मोठी आहे. त्यांत सावरकर हे अग्रभागीं आहेत. सावरकरांनीं धार्मिक विचारसरणीची कोंडी फोडली. असें घडण्याचें मुख्य कारण सावरकरांच्या व्यक्तित्वांत आहे. ते परलोकवादी वा अध्यात्मवादी या अर्थी धार्मिक नाहींत. देशभक्ति हाच त्यांचा धर्म आहे. बुद्धिवाद हा त्यांच्यांत प्रकर्ष पावला असल्यामुळें ते परलोकवादी राहिले नाहींत. जुन्या रूढींची समीक्षा करीत असतां त्यांचा हा उत्कर्षास गेलेला बुद्धिवाद प्रकट होतो. सावरकरांच्या हिंदुत्व-मीमांसेंत धार्मिक बाजूला महत्त्वाचें स्थान आहे;—परंतु सामाजिक व विशेषतः राष्ट्रीय किंवा राजकीय बाजूला अग्रस्थान आहे. त्यांच्या दृष्टीनें परलोकवाद किंवा अध्यात्मवाद कोणत्याहि प्रकारें न स्वीकारतांहि हिंदुत्वाचें लक्षण सांगतां येतें. एका अर्थी हिंदुत्वाचीं

निधर्मी (secular) मीमांसा त्यांनीं दाखविली आहे. ' एका अर्थी ' असें म्हणण्याचें कारण त्यांनीं केलेल्या व्याख्येंतील ' पुण्यभूः ' हा शब्द निधर्मी हिंदूला लागू पडेल कीं नाहीं याची शंका राहते. मातृभूमीवरील किंवा राष्ट्रावरील गंभीर श्रद्धा म्हणजे पवित्र भावना असा—भावार्थ त्या शब्दाचा असल्यास निधर्मी हिंदूला वा ख्रिश्चन किंवा मुसलमान देश-भक्तालाहि ती व्याख्या लागू पडते. परंतु. असा अर्थ करण्याला त्यांच्या विवेचनांतच एक अडचण सांपडते. मुसलमानांचीं पवित्र स्थानें मक्का-मदिना होत; हिंदुस्थानचे ते नागरिक असले तरी हिंदुस्थान धार्मिक बुद्धीनें त्यांना पवित्र वाटत नाहीं, म्हणून मुसलमान हिंदुत्वांतून वगळले आहेत. अशाच प्रकारच्या कारणांनीं ख्रिश्चनही त्यांनीं वगळले आहेत.

सावरकरांच्या व्याख्येंत पुष्कळच ऐतिहासिक अर्थ भरला आहे. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं लिहिलेल्या ' भारतीय समाजशास्त्रां'त व ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखण्डांत आलेल्या भारतीय संस्कृतीच्या व भारतीय समाजशास्त्राच्या विद्वत्तासंपन्न व खोल विवेचनाच्या साहाय्यानें सावरकरांच्या हिंदुत्वाचें मर्म अधिक चांगल्या रीतीनें विशद करतां येतें. सावरकरांनीं हिंदुत्वाचें एकरक्ततत्व ज्या मार्मिक अर्थानें सिद्ध केलें आहे, त्याचें समर्थन केतकरांच्या विवेचनांतहि उपलब्ध होतें. इतिहासाचें तत्त्वज्ञान या सदरांत ' हिंदुत्व ' हें पुस्तक विराजमान होण्यासारखें आहे. वेदास न मानणाऱ्या जैन, शीख इत्यादिकांना चांगल्या रीतीनें समाविष्ट करणारें सावरकरांचें हिंदुत्व आहे. तर्कशुद्ध व्याख्या करण्यांत त्यांना फारच मोठें यश लाभलें आहे. परंतु त्यापेक्षांहि जातिभेद, आचारभेद, संस्कारभेद, उच्चनीचता व संप्रदायभेद यांनीं विदीर्ण व विखुरलेला अतएव एकत्वाची खूण गमावलेला हिंदु समाज एकाच स्थायीभावाच्या पृष्ठवंशावर उभा असलेला सावरकरांनीं दाखविलेला आहे; यांतच या पुस्तकाला सार्थक्य आहे. सावरकरांनीं दाखविलेलें हिंदुत्व हें विशेषेंकरून राष्ट्रीय किंवा राजकीय आहे; उलट ज्ञानकोशकार केतकर यांनीं दाखविलेल्या हिंदुत्वांत सामाजिक किंवा सांस्कृतिक प्रक्रियेस प्राधान्य आलें आहे. केतकरांच्या विवेचनांत धर्मसंस्थेस

अत्यंत महत्त्वाचें सामाजिक व सांस्कृतिक प्रक्रियेचें अंग म्हणून स्थान आहे. कारण केतकर हे समाजाच्या घडामोडीचें विज्ञान तयार करणारे शास्त्रज्ञ होते. सावरकर हे राष्ट्रीय म्हणजे राजकीय जीवनाला प्रामुख्य देत असल्यामुळें, राष्ट्रीयत्वास किंवा राजकीय सामर्थ्यास पूरक तत्त्व याच दृष्टीनें धर्माकडे पाहतात. दोघांच्याहि दृष्टीनें धर्माचें महत्त्व दुय्यम आहे.

हिंदुत्वाच्या अहंतेचे सूत्रकार असलेल्या सावरकरांना, हिंदुत्वभावना ही सापेक्षपणेंच महत्त्वाची आहे हेंहि सांगणें भाग पडलें आहे. हें त्यांच्या सावध व सर्वंकष बुद्धिमत्तेचें लक्षण आहे; आपल्या श्रद्धेची व निर्णयाची विरुद्ध बाजू समजणें हेंच असामान्य बुद्धीचें महत्त्वाचें लक्षण आहे. त्यांची हिंदु-अहंता अत्यंत सावध असल्यामुळेंच भगवान् बुद्ध हिंदुत्वाच्या सर्वश्रेष्ठ महिम्याचा मेरु कसा आहे हें ते विसरूं शकले नाहींत. बुद्ध धर्मावर टीका करतांना, परत वळून, त्यांनीं एक भावुक व क्षमेची प्रार्थना करणारें गद्यमय स्तोत्र रचलें आहे. 'हिंदुत्व' या पुस्तकांतील तें एक उच्च गद्यकाव्य आहे.

सावरकर हे एक उत्कृष्ट बुद्धिवादी सुधारक आहेत. त्यांच्या हिंदु-अहंतेपेक्षां त्यांची बुद्धिवादी समीक्षाच हिंदु संस्कृतीच्या शुद्धिकरणास व बलवर्धनास अधिक उपयुक्त होईल. हिंदु संस्कृतीला दोन प्रकारच्या संकुचित भावनांचा धोका आहे. त्यापासून बुद्धीवादी सुधारकच तिला वाचवूं शकतील. त्यांतील पहिला मोठा धोका म्हणजे नव्या विश्वव्यापी मानव संस्कृतीची उपेक्षा हा आहे. ही नवी मानवव्यापी संस्कृति जन्माला आली आहे. जगांतील सर्व देशी संस्कृति त्या संस्कृतीच्या परिसरांत समाविष्ट झाल्या आहेत. परंतु ही संस्कृति अजून बाल्यावस्थेंत आहे. देशी संस्कृतींनींच तिला जन्म दिला आहे. विज्ञान, आर्थिक व्यवहार, मानवी स्वातंत्र्याच्या हक्कांच्या आधारावर राजकीय संघटना आणि मानवी बंधुत्वाच्या पायावर आधारलेलें सहकार्य—हीं तिचीं मुख्य लक्षणें आहेत. देशी संस्कृतींची रचना या व्यापक संस्कृतीशीं संवादी बनेली पाहिजे. दुसरा धोका हिंदु संस्कृतीच्या अंतरंगांतला आहे. हिंदु कुटुंबांच्या गृहसंस्कृतींत, भिन्न जातीयांशीं समरसता उत्पन्न होत नाहीं. शेजारीं राहणारीं ब्राह्मण, मराठा वा साळी कुटुंबें

निधर्मी (secular) मीमांसा त्यांनीं दाखविली आहे. ' एका अर्थी ' असें म्हणण्याचें कारण त्यांनीं केलेल्या व्याख्येंतील ' पुण्यभूः ' हा शब्द निधर्मी हिंदूला लागू पडेल कीं नाहीं याची शंका राहते. मातृभूमीवरील किंवा राष्ट्रावरील गंभीर श्रद्धा म्हणजे पवित्र भावना असा—भावार्थ त्या शब्दाचा असल्यास निधर्मी हिंदूला वा ख्रिश्चन किंवा मुसलमान देशभक्तालाहि ती व्याख्या लागू पडते. परंतु. असा अर्थ करण्याला त्यांच्या विवेचनांतच एक अडचण सांपडते. मुसलमानांचीं पवित्र स्थानें मक्का-मदिना होत; हिंदुस्थानचे ते नागरिक असले तरी हिंदुस्थान धार्मिक बुद्धीनें त्यांना पवित्र वाटत नाहीं, म्हणून मुसलमान हिंदुत्वांतून वगळले आहेत. अशाच प्रकारच्या कारणांनीं ख्रिश्चनही त्यांनीं वगळले आहेत.

सावरकरांच्या व्याख्येंत पुष्कळच ऐतिहासिक अर्थ भरला आहे. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं लिहिलेल्या ' भारतीय समाजशास्त्रां'त व ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखण्डांत आलेल्या भारतीय संस्कृतीच्या व भारतीय समाजशास्त्राच्या विद्वत्तासंपन्न व खोल विवेचनाच्या साहाय्यानें सावरकरांच्या हिंदुत्वाचें मर्म अधिक चांगल्या रीतीनें विशद करतां येतें. सावरकरांनीं हिंदुत्वाचें एकरक्ततत्व ज्या मार्मिक अर्थानें सिद्ध केलें आहे, त्याचें समर्थन केतकरांच्या विवेचनांतहि उपलब्ध होतें. इतिहासाचें तत्त्वज्ञान या सदरांत ' हिंदुत्व ' हें पुस्तक विराजमान होण्यासारखें आहे. वेदास न मानणाऱ्या जैन, शीख इत्यादिकांना चांगल्या रीतीनें समाविष्ट करणारें सावरकरांचें हिंदुत्व आहे. तर्कशुद्ध व्याख्या करण्यांत त्यांना फारच मोठें यश लाभलें आहे. परंतु त्यापेक्षांहि जातिभेद, आचारभेद, संस्कारभेद, उच्चनीचता व संप्रदायभेद यांनीं विदीर्ण व विखुरलेला अतएव एकत्वाची खूण गमावलेला हिंदु समाज एकाच स्थायीभावाच्या पृष्ठवंशावर उभा असलेला सावरकरांनीं दाखविलेला आहे; यांतच या पुस्तकाला सार्थक्य आहे. सावरकरांनीं दाखविलेलें हिंदुत्व हें विशेषतेनें राष्ट्रीय किंवा राजकीय आहे; उलट ज्ञानकोशकार केतकर यांनीं दाखविलेल्या हिंदुत्वांत सामाजिक किंवा सांस्कृतिक प्रक्रियेस प्राधान्य आलें आहे. केतकरांच्या विवेचनांत धर्मसंस्थेस

अत्यंत महत्त्वाचें सामाजिक व सांस्कृतिक प्रक्रियेचें अंग म्हणून स्थान आहे. कारण केतकर हे समाजाच्या घडामोडीचें विज्ञान तयार करणारे शास्त्रज्ञ होते. सावरकर हे राष्ट्रीय म्हणजे राजकीय जीवनाला प्रामुख्य देत असल्यामुळें, राष्ट्रीयत्वास किंवा राजकीय सामर्थ्यास पूरक तत्त्व याच दृष्टीनें धर्माकडे पाहतात. दोघांच्याहि दृष्टीनें धर्माचें महत्त्व दुय्यम आहे.

हिंदुत्वाच्या अहंतेचे सूत्रकार असलेल्या सावरकरांना, हिंदुत्वभावना ही सापेक्षपणेंच महत्त्वाची आहे हेंहि सांगणें भाग पडलें आहे. हें त्यांच्या सावध व सर्वकष बुद्धिमत्तेचें लक्षण आहे; आपल्या श्रद्धेची व निर्णयाची विरुद्ध बाजू समजणें हेंच असामान्य बुद्धीचें महत्त्वाचें लक्षण आहे. त्यांची हिंदु-अहंता अत्यंत सावध असल्यामुळेंच भगवान् बुद्ध हिंदुत्वाच्या सर्वश्रेष्ठ महिम्याचा मेरु कसा आहे हें ते विसरूं शकले नाहींत. बुद्ध धर्मावर टीका करतांना, परत वळून, त्यांनीं एक भावुक व क्षमेची प्रार्थना करणारें गद्यमय स्तोत्र रचलें आहे. 'हिंदुत्व' या पुस्तकांतील तें एक उच्च गद्यकाव्य आहे.

सावरकर हे एक उत्कृष्ट बुद्धिवादी सुधारक आहेत. त्यांच्या हिंदु-अहंतेपेक्षां त्यांची बुद्धिवादी समीक्षाच हिंदु संस्कृतीच्या शुद्धिकरणास व बलवर्धनास अधिक उपयुक्त होईल. हिंदु संस्कृतीला दोन प्रकारच्या संकुचित भावनांचा धोका आहे. त्यापासून बुद्धीवादी सुधारकच तिला वाचवूं शकतील. त्यांतील पहिला मोठा धोका म्हणजे नव्या विश्वव्यापी मानव संस्कृतीची उपेक्षा हा आहे. ही नवी मानवव्यापी संस्कृति जन्माला आली आहे. जगांतील सर्व देशी संस्कृति त्या संस्कृतीच्या परिसरांत समाविष्ट झाल्या आहेत. परंतु ही संस्कृति अजून बाल्यावस्थेंत आहे. देशी संस्कृतींनींच तिला जन्म दिला आहे. विज्ञान, आर्थिक व्यवहार, मानवी स्वातंत्र्याच्या हक्कांच्या आधारावर राजकीय संघटना आणि मानवी बंधुत्वाच्या पायावर आधारलेलें सहकार्य—हीं तिचीं मुख्य लक्षणें आहेत. देशी संस्कृतींची रचना या व्यापक संस्कृतीशीं संवादी बनेली पाहिजे. दुसरा धोका हिंदु संस्कृतीच्या अंतरंगांतला आहे. हिंदु कुटुंबांच्या गृहसंस्कृतींत, भिन्न जातीयांशीं समरसता उत्पन्न होत नाहीं. शेजारीं राहणारीं ब्राह्मण, मराठा वा साळी कुटुंबें

एकमेकांपासून जणुं काय अनन्त अंतरावर वसति करून राहिल्यासारखीं राहतात. त्यामुळें सामाजिक बंधुत्वाची जाणीव नसल्यासारखीच असते. त्यामुळेंच राजकीय सामर्थ्यें विकास पावत नाहींत.

सावरकरांनीं हिंदुत्व हें राजकीय दृष्ट्या एक सामर्थ्यशाली तत्त्व म्हणून दाखविलें आहे. हिंदु समाज हा राजकीय दृष्ट्या असंघटित समाज आहे, असेंहि चित्र इतिहासाच्या आधारें चित्रित करतां येतें. सावरकरांची अथांग देशभक्ति हिंदु समाजांत नसलेलें राजकीय सामर्थ्य भावित आहे कीं काय, अशी शंका येते. सावरकरांनाहि ही असामर्थ्याची जाणीव भंडावून सोडते, ही गोष्ट त्यांच्या 'मला काय त्याचें' यावरून सिद्ध होते. हिंदु धर्म हा अध्यात्मदृष्ट्या अत्यंत वैभवशाली आहे, हिंदु संस्कृति अनेक प्रकारें आत्म-चैतन्याला प्रकट करणारी आहे,—परंतु हिंदु समाज राजकीय दृष्ट्या दुर्बल असलेला समाज आहे, हें भयजनक सत्य लक्षांत घेणें आवश्यक आहे. जातिभेदानें समान भूमिकेवरचें नागरिकत्व प्रभावी होऊं दिलें नाहीं. नागरिकत्व हें राजकारणाचें अधिष्ठान आहे.

सावरकरांच्या विचारांचा आढावा देणारें श्री. भालचंद्र केळकर यांचें हें पुस्तक मराठी भाषेंत महत्त्वाची भर टाकील, अशी आशा वाटते. श्री. केळकर यांच्या ठिकाणीं सावरकरांबद्दल मोठी श्रद्धा आहे; परंतु ती श्रद्धा विवेकशीलहि आहे, हें त्यांच्या विवेचनावरून सहज लक्षांत येईल. सावरकरांच्या लेखनाला व विचारांना विविध पैलू आहेत. त्यांनीं प्रत्येक क्षेत्रांत नवीन प्रकारचें मार्गदर्शन केलें आहे. आचारशुद्धि, भाषाशुद्धि, लिपिशुद्धि, विचारशुद्धि—अशी सर्वव्यापी शुद्धीची चळवळ त्यांनीं निर्मिली आहे. आज सावरकर एकाकी दिसतात. गुहेंतले योगी व सिंहहि एकाकीच असतात. त्यांचा महिमा स्वयंसिद्ध असतो. श्री. केळकर यांनीं सावरकरांच्या पवित्र विचारांचें मनन करण्याची संधि दिल्याबद्दल आभार मानून हें चार शब्द समाप्त करतों.


वाई,
२८ एप्रिल, १९५२.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	चुकीचे शब्द	योग्य शब्दप्रयोग
२५	१	गुण फारच वेळां...	गुण फारच कमी वेळां
८९	२	५४ टक्के हिंदु व ५५ टक्के मुसलमान	४४ टक्के हिंदु व ५५ टक्के मुसलमान
९४	१३	लोकसत्ताक राजवट आत्म्याची	लोकसत्ताक राजवटीची
९८	१४	समन्वययादी	समन्वयवादी
९९	७	पाहिलें. महाराष्ट्रांतील	पाहिलें कीं महाराष्ट्रांतील
१०७	२	अनुपायांस	अनुयायांस
१०७	२१	Utilitasianism	Utilitarianism
१०८	२७	निकर्ष	निकष
१११	२	विघातशील	विकासशील
१२५	१५	पक्षणोऽपि	पक्ष्मणोऽपि
१४४	६	परिवर्तनीच	परिवर्तनीयच
१५०	१	जनसिद्ध	जन्मसिद्ध

पृष्ठ	ओळ	चुकीचे शब्द	योग्य शब्दप्रयोग
१५४	३	म्हणजे राजकीय विचार...	म्हणजे त्याकाळीं राजकीय विचार
१५६	२५	आगरकरांच्या	सावरकरांच्या
१८९	१६	अस्तित्त	अस्तित्व
२०२	९	मुसलमानी समाजवाद	मुसलमानी जमातवाद
२०२	१९	घटनेवर	कल्पनेवर
२०७	११	तत्त्वग्राही	तत्त्वाग्रही
२२१	३	विकेंद्रीकरण	विकेंद्रीकरण
२२८	शीर्षक	भाषिक आंदालन	भाषिक आंदोलन
२२९	७	आक्रमणकाडे	आक्रमणाकडे
२३२	१७	क्षेत्रांतहि ज्ञात आहे	क्षेत्रांतहि जात आहे
२४५	११	सावरकरांच्या	सावरकरांची
२५३	८	अभिव्यक्ततेसाठीं	अभिव्यक्तीसाठीं
२५४	१८	तत्त्वचिंतेक	तत्त्वचिंतक
२५६	१२	'मूर्ति अुभी ती'	'मूर्ति दुजी ती'
२५८	२७	शिरकाव	शिडकाव
२६५	२	नवी नर्यीं	नवीं वर्यीं
२६६	१४	हे शैलीच्या दृष्टीनें...	हे अेक मानकरी होत. ते...
२६९	२	मनाला भासत आहेत	मनाला ग्रासत आहेत
२६९	९	धुकाटल्या आहेत.	धुकाळल्या आहेत.
२७१	२१	टाकून बोलणें तरी...	टाकून बोलणें मी तरी...
२७२	१०	पुढाऱ्यांना चहाला जाणें...	पुढाऱ्यांकडे चहाला जाणें...



९ :

व्यक्तित्वाचें रसायन

स्वातंत्र्यवीर सावरकर हें नांव अुच्चारलें कीं, संमिश्र भावना हृदयांत निर्माण होतात. सावरकरांचें जीवन, त्यांचें व्यक्तित्व, त्यांचें नेतृत्व आणि त्यांचे विचार यांसंबंधींचा विचार आला कीं, कांचेच्या झुंबरांत प्रकाशाचीं विविध रूपें दिसावींत तसें होतें. सावरकरांना अनेक भूमिका आयुष्यांत कराव्या लागल्या. त्यामुळें त्यांचें जीवन हें विविधतेनें नटलें. विविधता हें त्या जीवनाचें सौंदर्य.

पण सावरकरांचें जीवन हा अद्भुततेचाहि आश्चर्यकारक विलास आहे. अगदीं लहानपणापासूनच स्वातंत्र्याच्या देवतेला भावपुष्पें वाहून तिच्यासाठीं आत्मसमर्पणाची सिद्धता त्यांनीं सुरू केली. ज्या वेळीं भोळे लोक दास्याच्या पाशांनाच पुष्पहार समजत होते, परराज्यालाच ईश्वराचा आशीर्वाद समजत होते, त्या वेळीं संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार सावरकरांनीं केला. ज्या वेळीं सारे लोक अुपहंसत होते, वेडे म्हणून हिणवीत होते, त्या वेळीं सावरकरांनीं स्वातंत्र्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा बेलभंडारा अुचलला. लौकिक संसारांतील साऱ्या आशा-आकांक्षांना चूड लावून, 'बुध्याचि' सतीचें वाण पत्करून, अंगाला हौतात्म्याची राख फांसून देशस्वातंत्र्याच्या अुग्र आंदोलनासाठीं सावरकर पुढें आले. यश नि अपयश यांची चिंता बाळगली नाहीं. आपलें जीवन आगगाडीला गति देणाऱ्या अिंजिनमधील कोळशासारखें आहे अशी त्यांची धारणा होती.

पुढें या क्रांतिप्रयत्नांतच अंदमानच्या अंधेरींत शत्रूनें ढकललें. तेथें नरकाच्या यातना जिवंतपणीं भोगाव्या लागल्या. अुध्वस्त स्वप्नें अुराशीं बाळगून, पिचलेल्या तारुण्यांतहि आशेचा जोम भरीत, जीवनशक्ति मरगळलेली असतांनाहि अुज्ज्वल भविष्याच्या स्वप्नांनीं भारावून जाऊन पुढें अेकदां-दोनदां-तीनदां अुभ्या राहिलेल्या मृत्यूला त्यांनीं थोपविलें. त्या नृशंसक गुहेंतहि काव्याचे फुलबाग फुलविली, तत्त्वचिंतन केलें, शुद्धि-संघटनेचें कार्यहि केलें.

सुदैवानें मायभूसाठीं लेल्या अेका अुग्र तपश्चर्येचा तो भाग संपला. सावरकर रत्नागिरीस आले. राजकारणांत भाग घेतां येअीना. पण तुरुंगांत सडून मरण्यापेक्षां थोडीफार अितर समाजसेवा करावी ही वृत्ति. म्हणून नवी आघाडी उघडली. अंधश्रद्धा, भोळसटपणा, रूढी यांनीं सडत चाललेल्या समाजाला नवविचारांचे धडे दिले. जुनाट धर्ममतांच्या ढोलींत बसून नव्या जगाकडे दुर्लक्ष करणाऱ्या पुराणमतवाद्यांना विज्ञानाची, बुद्धिनिष्ठेची जाणीव करून दिली. राजकीय परिवर्तनाबरोबर सामाजिक परिवर्तनहि हवें हें आवर्जून सांगितलें.

१९३७ मध्यें बंदी उठली. राजकारण करावयाचें असें ठरलें. पण १९१० ते १९३७ ! २७ वर्षांचें अंतर होतें. स्वातंत्र्याचा लढा वेगळ्या दिशेनें चालला होता. त्याचें अधिष्ठान सुटत चाललें होतें. अुदार राष्ट्रवादानें संकुचित जातीयतेचें अपमानास्पद व घातकी लांगूलचालन चालविलें होतें. लोकप्रियतेकडे लक्ष न देतां, अप्रियता, द्वेष, राजकीय शत्रुत्व यांचा स्वीकार करूनहि त्यांनीं काँग्रेसच्या राजकारणांतील मुस्लीम-धार्जिण्या वृत्तीकडे जनतेचें लक्ष वेधलें. भारत अखंड राहावयाचा असेल तर अेका कठोर राजनैतिक वृत्तीनें वागणें अवश्य आहे, असा स्पष्ट अिषारा त्यांनीं दिला.

अितक्यांत दुसरें महायुद्ध पेटलें. भारतीय स्वातंत्र्ययुद्धाला नवी कलाटणी देतां येअील, असें सावरकरांना वाटूं लागलें. त्यांचा मार्ग सैनिकी क्रांतीचा होता. अेकीकडे मुस्लीम लीग देशाच्या अखंडत्वाला सुरुंग लावीत होती

आणि दुसरीकडे तिची यादवीची सिद्धता चालू होती. या काळांत सावरकरांनीं अक्षरशः रक्ताचें पाणी करून हिंदु-संघटनेच्या आधारानें फाळणी परतवून लावण्याचा प्रयत्न केला. पण देश कमकुवत ठरला. नेते आत्म-विश्वासशून्य ठरले. देशाची फाळणी पत्करली गेली आणि भारत स्वतंत्र झाला.

तरीहि एकाद्या सेनानीप्रमाणें, मुत्सद्याप्रमाणें तीन चतुर्थांश भारत आपण मुक्त केला आहे, अशी घोषणा करून सावरकरांनीं स्वातंत्र्याचें स्वागत केलें. दैवाचा दुर्विलास असा कीं गांधीजींचा अमानुष वध झाला आणि वयाच्या ६५ व्या वर्षीं स्वराज्यांतहि तुरुंगाच्या अंधारांत सावरकर लोटले गेले. पण कीर्ति, पूर्वींचें चारित्र्य यांच्यावर झालेल्या या आघातांतूनहि सावरकर निष्कलंक सुटले ! त्यानंतर सावरकरांनीं जवळ जवळ राजकारणांतून अंग काढून घेतलें आणि आपल्या सामाजिक कार्यास प्रारंभ केला आहे.

सावरकरांचें जीवन हें असें आहे. परिस्थितीनें अनेक वेळां कर्तृत्वाचे पंख कापण्याचा प्रयत्न करूनहि हा गरुड ध्येयाच्या आकाशांत भुडत राहिला. स्वार्थ जाळून कृतार्थ ठरलेला हा वीर अखंडपणें आपल्या ध्येया-साठीं झगडत आहे. सागराच्या लाटा तटावर आपटल्या तरी तो तट अचल राहतो, त्याप्रमाणें किंवा झंझावात झाला तरी पर्वत अचलच राह-तात, त्याप्रमाणें सावरकर कर्मयोगांत अद्यापिहि अचल राहिले आहेत. साऱ्या विरोधकांनीं—परकीय आणि स्वकीयहि—त्यांना राजकीय, सामाजिक जीवनांतून उठवून लावण्याचे प्रयत्न करूनहि सावरकर आपल्या अजोड कर्मवादाच्या नि बुद्धिवैभवाच्या बळावर आजहि तळपत राहिले आहेत. कीर्ति-अपकीर्ति, स्तुति आणि निंदा, अुपहास आणि अुत्तेजन यांना पाण्या-वरील बुडबुड्याप्रमाणें समजून सावरकरांनीं या साऱ्या विरोधकांचा पराभव केला आहे. सावरकरांच्या या प्रखर ध्येयवादामुळें सावरकर हें तरुणांचें स्फूर्तिस्थान बनलें, समाजांतील ती अेक शक्ति ठरली आहे.

सावरकरांचीं श्रद्धाकेंद्रें

सावरकरांच्या या युद्धमय जीवनाचें अधिष्ठान कोणतें ? त्यांच्या या ध्येयवादाचा ध्रुवतारा कोणता ? सावरकरांचीं श्रद्धास्थानें कोणतीं ? सावर-

करांच्या ध्येयवादी अंतःकरणांत भारताची प्रतिमा आहे. सावरकरांचें जीवन भारतासाठीं होतें नि आहे. असीम देशभक्ति आणि त्यांतून निर्माण झालेल्या तळमळींतून आलेलें क्रांतितेज हीं सावरकरांच्या जीवनाचीं सूत्रें ठरलीं आहेत.

सावरकरांच्या देशभक्तीचा जन्म त्यांच्या लहानपणींच भारताच्या अुज्ज्वल अितिहासांतून झाला आणि तिचा परिपोष मॅझिनीच्या तत्त्वज्ञानानें केला आहे. सावरकरांपुढें मातृभूचें दीन नि भग्न चित्र उभें होतें, म्हणून आपलें सर्वस्व तिला अर्पण करून तिचें वैभव वाढविण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केले. 'ने मजसि ने परत मातृभूमीला' ही त्यांची कविता म्हणजे त्यांच्या अंतः-करणांतील देशभक्तीच्या सुगंधानें दरवळणारें भावपुष्प आहे! सावरकरांची राष्ट्रनिष्ठा ही संकुचित नाहीं. मॅझिनीप्रमाणेंच ते व्यक्ति हें राष्ट्राचें जसें मुख्यांग, तसें राष्ट्र हें मानवी समाजाचें मुख्यांग मानतात. व्यक्तीचा राष्ट्राशीं जो संबंध आहे, तोच राष्ट्राचा मानवजातीशीं पाहिजे, असें त्यांना वाटतें. प्रत्येक राष्ट्र स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्यावर आधारलेलें असलें पाहिजे, प्रत्येकाला त्याच्या विकासाचें स्वातंत्र्य पाहिजे, असें त्यांचें मत आहे. त्यांच्या कल्पनाविश्वांत मानवतेची मूर्ति ज्या मंदिरांत बसविली आहे, त्याला राष्ट्रवादाचे दरवाजे आहेत. मात्र ज्या क्षणीं सारीं राष्ट्रें आपला राष्ट्रवाद झुगारून मानवतेच्या अधिष्ठानावर अेकत्र येतील, त्या क्षणीं आपलें राष्ट्रीयत्व आपण मानवतेंत विलीन करून टाकलें पाहिजे असें सावरकर नेहमीं सांगतात!

अितकी विचारसरणी तर्कतः मान्य केल्यानंतर सावरकर व्यवहारांत कट्टर राष्ट्रवादी आहेत. त्यांचा राष्ट्रवाद आक्रमक मुळींच नाहीं; पण भोळा विश्वबंधुत्ववाद असावा असें त्यांना वाटत नाहीं. मारलेलें जनावर तोंडांत घेऊन धांवणाऱ्या वाघिणीप्रमाणें जोंपर्यंत या जगाचें स्वरूप आहे, तोंपर्यंत आपण आपल्यावर झडप पडूं नये म्हणून संरक्षक धोरण स्वीकारलेंच पाहिजे असें त्यांना वाटतें. म्हणून सावरकरांनीं शब्दसुंदर ध्येयवादाचा कधींच पुरस्कार केला नाहीं. नवा मानव, नवें जग, नवीं मूल्यें या आज-

काल स्वस्त झालेल्या शब्दांना सावरकरांच्या विचारसरणींत स्थान मिळालेलें नाहीं. ते मानवतेचे उद्‌गाते नाहींत; चहाते आहेत. राष्ट्रभक्ति आणि राष्ट्र-वाद यांच्यावर त्यांची असीम निष्ठा आहे. पण त्या निष्ठेचे ते गुलाम नाहींत. त्यांच्या वाङ्मयांत, भाषणांत मानवतेचें आक्रंदन, अुध्वस्त विश्वाची पडझड नाहीं यार्चे कारणहि हेंच आहे. केवळ स्वप्नाळू आणि शाब्दिक ध्येयवाद तेथें नाहीं. सावरकरांनीं दुसऱ्या युद्धाच्या वेळीं चर्चिलला 'अँडो-ब्रिटिश' कॉमनवेल्थची कल्पना सुचविली होती. त्या वेळीं लोकांनीं त्यांना प्रतिगामी म्हटलें होतें आणि आज त्याच राष्ट्रकुलांत आपण राहिलों आहोंत ! सावरकरांच्या राष्ट्रवादी, पण मानवतेशीं सुसंगत असलेल्या ध्येय-वादाचा हा विजय आहे.

तेव्हां सावरकरांवर संकुचितपणाचा, मध्ययुगीनपणाचा आरोप करणें हें फोल आहे. राष्ट्रवाद हें अटळ सत्य आहे, ती वस्तुस्थिति आहे; मग ती कोणाला आवडो वा न आवडो. मार्क्सवादानें राष्ट्रवादाच्या सीमा मानल्या नाहींत; पण आज काय दिसतें आहे ? टिटो आणि माओ यांनीं केलेल्या क्रांतीला राष्ट्रवादाचें अधिष्ठान नव्हतें काय ? राष्ट्रवाद हा आक्रमक व संकुचित असला पाहिजे असें नाहीं असें सावरकरांना वाटतें. म्हणूनच ते त्याच्यांत प्रगति होईल अशी श्रद्धा बाळगतात. अेकसूत्री मानवी राज्य निर्माण होईपर्यंत प्रत्येक राष्ट्रानें न्यायानें व शांततेनें वागलें पाहिजे. असें झालें तर राष्ट्रवादाच्या भिंती कोसळून पडतील आणि मानवी संस्कृतीचे धागे साऱ्या जगाला अेका सूत्रांत बांधतील ! सावरकरांच्या राष्ट्रभक्तीचें व राष्ट्रवादाचें स्वरूप हें असें आहे.

असीम स्वातंत्र्यप्रीति नि हौतात्म्याचें आकर्षण

सावरकरांच्या राष्ट्रभक्त मनाला राष्ट्र-स्वातंत्र्याचा ध्यास नसेल तरच आश्चर्य. अगदीं लहानपणापासून मायभूच्या परदास्याविषयीं तीव्र चीड त्यांच्या अंतःकरणांत होती. ते लहान होते तेव्हांच त्यांचें मन स्वातंत्र्यप्रीतीच्या उदात्त भावनेनें भारावून गेलें होतें.

सावरकरांचा जन्म ज्या काळांत झाला होता, तो काळ लक्षांत घेतला म्हणजे सावरकरांच्या मनःस्थितीची योग्य कल्पना येऊं शकेल. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर अेक निराशेची, कर्मशून्यतेची छाया या देशावर पसरली होती. गुलामींत पिचत पडलेला समाज आकांक्षाशून्य होत चालला होता. लोकमान्यांनीं महाराष्ट्र हा थंड गोळा झाला होता असें त्या वेळचें वर्णन करतांना म्हटलें होतें, तें खरें होतें. वासुदेव बळवंतासारख्या वीर पुरुषानें क्रांतीचे प्रयत्न केले, त्यांचें मूल्यमापन यशाच्या दृष्टीनें करतां येणार नाहीं. प्रतिकारशक्तीची जाणीव त्यांनीं राष्ट्राला दिली. सावरकरांनीं वासुदेव बळवंताबद्दल एकदां असें म्हटलें होतें, "आमच्या हृदयांतील स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत ही वासुदेव बळवंतांच्या हृदयांतील ज्योतीनें उत्स्फूर्त होऊन पेटविलेली आहे." सावरकरांचा जन्म झाला त्या वेळीं हें वातावरण धुमसत होतें. सावरकर लहान असतांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखे लेखक जागृतीचे प्रयत्न करीत होते. टिळकांच्या प्रचारानें आणि विचारानें ब्रिटिशविरोधी भावना चेतत होत्या. शिवरामपंतांची उपहासगर्भ लेखणी परसत्तेचे पापी हेतु जनतेपुढें मांडीत होती.

अशा वेळीं अेक धक्का देणारी भयंकर घटना घडली. चाफेकरांनीं रँडचा वध केला. त्यामुळें महाराष्ट्र खडबडून जागा झाला. चाफेकर फांशीं गेले. त्यांच्या बलिदानाचा परिणाम सावरकरांवर झाला. सुप्त असलेली हौतात्म्याची आकांक्षा जागृत झाली. चाफेकरांच्या तेजानें चेतूं पाहणारी शत्रुंजय वृत्ति खडबडून जागी झाली. त्यामुळें ते अस्वस्थ झाले. आपल्या त्या मनःस्थितीचें वर्णन सावरकरांनीं आपल्या आत्मचरित्रांत केलें आहे.* त्यांनीं म्हटलें आहे,—

"चाफेकर, रानडे आपल्या स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन फांसावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीनें जातां जातां चेतविलेली ही शत्रुंजय वृत्ति यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच

---

* माझ्या आठवणी (आत्मचरित्र) पृष्ठ ८१-८२.

भडकवीत नेणें असेल आणि ती शेवटीं कोण्या प्रचंड स्वातंत्र्ययुद्धाच्या महायज्ञांत परिणमविणें असेल, तर त्याचें दायित्व मजपुरतें माझ्यावरच पडत नाहीं काय? चाफेकरांचें कार्य कुणी तरी चालविलें पाहिजे ना? तर तें मीच कां चालवूं नये? तो होम मीहि कां करूं नये? वासुदेव आणि रानडे फांशीं गेले, तो त्या नाटकाचा शेवटचा प्रवेश मी ज्या दिवशीं वर्तमानपत्रांत वाचला, —ते फांशीच्या आदल्या दिवशीं रात्रीं स्वस्थ निजले, पहांटे उठले, गीतापाठ केला नि 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' असें गर्जत गर्जत हंसून अेकमेकांचा निरोप घेत फांसावर चढले.—तें वर्णन ज्या दिवशीं मी वाचलें तेव्हांपासून तर कांहीं दिवस हे प्रश्न रात्रीं झोंपेंतदेखील माझ्या मनास माझें मत विचारित राहात.

शेवटीं दोन चार दिवसांच्या मनाच्या या अवस्थेंत मला बाळपणांतील माझा शेवटचा आधार, माझें संकटीं समाधान करणारी, जिला माझीं सुखदुःखें मी सांगतांच आणि ती तीं हंसतमुखें अैकतांच माझ्या मनास नेहमीं हलकेंसें वाटे, ती माझी आई—तिच्याकडे, त्या देवीकडे मी धांव घेतली. देवघरांत गेलों, तिची पूजा भक्तिभावें बांधून स्वदेशाच्या दुःस्थितीनें तळमळणाऱ्या सद्गदित अंतःकरणानें तिचें ध्यान आरंभिलें. आणि शेवटीं तिच्या पवित्र चरणांवर हात ठेवून आणि तेव्हां मला भासे तशी तिची अनुमति घेऊन मी प्रतिज्ञा केली कीं, माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मी सशस्त्र युद्धांत शत्रूस मारीन. चाफेकरासारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकीं स्वराज्याचा अभिषेक करीन! यापुढें मी माझ्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतू अुभारून 'मारितां मारितां मरे तों' झुंजेन...आतां भूतकाळाच्या दुर्बिणींतून माझ्या जीवनाच्या घटनाक्रमांकडे पाहतां हें स्पष्ट दिसत आहे. पुढें हिंदुस्थानभर गाजलेल्या अभिनव भारताच्या क्रांतिकारक संस्थेचा खरा अुगम या शपथेंतच झाला. ही माझी प्रतिज्ञाच अभिनव भारताचें मूळ वीजं होती!"

या अुताऱ्यावरून सावरकरांच्या अंतःकरणांत किती खळबळ माजली होती, मातृभूच्या स्वातंत्र्यासाठीं शौर्यशाली कृत्य करून विजेसारखें तळपून जाण्याची आकांक्षा त्यांच्या हृदयांत कशी निर्माण झाली होती, याची कल्पना येण्यासारखी आहे. या क्रांतिकारक घटनेमुळें त्यांचें जीवन पालटलें. यौवन अुमलत होतें; पण अंतःकरणांत फुलें अुमलत नव्हतीं, तर अंगार पेटत होते. सावरकरांनीं त्या कालांत जें काव्य केलें, लेख लिहिले, त्या सर्व ठिकाणीं या असीम स्वातंत्र्येच्छेची तीव्रता दिसून येते. हौतात्म्य ही त्यांच्या क्रांतिकारक जीवनाची आद्य प्रेरणा दिसून येते आणि अुदात्त भावनांनीं प्रेरित होअून सावरकर स्वतंत्रतेचीं स्तोत्रें गाअूं लागले. 'तुजसाठीं मरण तें जनन, तुजविना जनन तें मरण' असें त्यांना वाटूं लागलें. सावरकरांची त्या वेळची वृत्ति आणि त्यांतून निर्माण झालेलें त्यांचें वाङ्मय म्हणजे अेक धगधगीत ज्वाला होती ! सावरकरांच्या क्रांतिकारक जीवनाचें व त्यांच्या क्रांतिवादाचें विश्लेषण करण्यापूर्वी त्यांची ही अतूट श्रद्धा लक्षांत घेतलीच पाहिजे. कारण सावरकर हे आरामखुर्चीवरील देशभक्त कधींच नव्हते !

हिंदुत्वाचें अधिष्ठान

भारत आणि भारताचें स्वातंत्र्य हीं सावरकरांच्या जीवनांतील प्रबल श्रद्धाकेंद्रें आहेत हें आपण पाहिलें. पण भारत म्हणजे नद्यांनीं नि पर्वतांनीं भरलेला भौगोलिक प्रदेश नव्हे; त्यामागें एक परंपरा आहे. भारत हा शब्द प्रकाशमय बनवणारी ही परंपरा म्हणजे राष्ट्रभावनेचा मूलाधार आहे. परंपरेच्या कल्पनेला अगदीं समाजशास्त्रीय अधिष्ठान आहे. राष्ट्र म्हणजे राज्यघटनेच्या सांगाड्यांत बसविलेला मानवांचा समुदाय नव्हे; तर समान अितिहास, समान आकांक्षा यांनीं बांधलेला मानवांचा संघटित समाज होय. म्हणूनच भारत हें या सांस्कृतिक अेकत्वाचा साक्षात्कार झालेलें राष्ट्र आहे; तें केवळ अेकाद्या युद्धाच्या करारांतून निर्माण झालेलें राज्य नव्हे. सावरकरांच्या राष्ट्राभिमानाला, भारताविषयींच्या प्रीतीला हें परंपरेचें अधिष्ठान आहे आणि त्या परंपरेचें सावरकरांनीं ठेवलेलें सुप्रसिद्ध नांव म्हणजे 'हिंदुत्व' ! हें हिंदुत्व सावरकरांच्या जीवनांतील चैतन्य झालें आहे. अगस्तीच्या

अंजलींत जसा महासागर, तसें ' हिंदुत्व ' या शब्दांत या राष्ट्राचें सारें प्राणभूत वैशिष्ट्य सांठविलें आहे.

पण सावरकरांचें हिंदुत्वप्रेम हें परंपराप्रेम आहे का ? तो सनातनीपणा आहे का ? हे प्रश्न उपस्थित होतात. त्याची चर्चा पुढें येणारच आहे. पण या ठिकाणीं स्पष्टपणें म्हणावयास हरकत नाहीं कीं, सावरकर हे ' तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं का पुरुषाः पिबन्ति ' या न्यायानें वागणारे सनातनी हिंदुत्वनिष्ठ नव्हेत. सावरकरांना हिंदु परंपरेचा अभिमान आहे, तो त्यांच्या भव्योदात्त अितिहासाविषयीं–पराक्रमाविषयीं–वैभवाविषयीं ! पण सावरकर त्या परंपरेची पूजा अंधपणें करणार नाहींत. जें जें टाकाऊ आहे, सडलेलें आहे, तें बिनदिक्कत फेंकून द्या असें ते स्पष्टपणें सांगतील.

सावरकरांना परंपरेचा अभिमान आहे म्हणून ते प्रत्येक जुन्या गोष्टीचा मुळींच गौरव करणार नाहींत. चिकित्सक वृत्तीनेंच सर्व कांहीं तपासतील. जुनें आहे म्हणूनच तें त्याज्य, असें मानणारे ते दुराग्रही सुधारकहि नाहींत. समन्वय हा त्यांच्या वैचारिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. सावरकरांचें अितिहासाचें आकर्षण हाहि त्यांच्या राष्ट्राभिमानाचाच भाग आहे. त्यांचें ऐतिहासिक विषयावरचें वाङ्मय संशोधनासाठीं लिहिलेलें नाहीं. अितिहास हें त्यांचें स्फूर्तिस्थान आहे. त्यांनीं अितिहासाकडे मार्गदर्शक प्रदीप म्हणूनच पाहिलें.

रणांगणावरील रणधुमाळींत प्राणपणानें लढणाऱ्या सैनिकांना स्फूर्ति देण्याचें कार्य तेथें फडफडणारें त्यांचें निशाण करतें ना ? सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा अशीच आहे.

व्यक्तित्वाचें मूलद्रव्य

सावरकरांचें जीवन कसें अद्भुततेनें नटलेलें आहे तें आपण पाहिलें. परिस्थितीच्या कांटेरी कुंपणावर रक्तबंबाळ स्थितींत विव्हळत ठेवून, आयुष्यांत अुराशीं बाळगलेलीं स्वप्नें, लहान मुलांनीं पाण्याचे बुडबुडे फोडावेत अितक्या सहजतेनें अुध्वस्त करून, दैवानें अनेक वेळां सावरकरांच्या व्यक्तित्वावरहि कशी मात केली आहे हें सर्वश्रुत आहे. पण हा विरोध, तीं संकटें

सावरकरांना हतबल, हतबुद्ध करूं शकलीं नाहींत. अुलट सावरकरांच्या जीवनांत त्यामुळें विविधता व प्रवाहित्व आलें. आणि तेंसुद्धां अितक्या नाट्यमय रीतीनें कीं सावरकरांचें जीवन दैवानें स्वहस्तानें लिहिलेलें नाट्य ठरलें आहे ! या जीवनांतील विविधतेमागें सावरकरांचीं स्वातंत्र्य, हिंदुत्व आणि राष्ट्रप्रीति हीं तीन श्रद्धाकेंद्रें आहेत हें आपण पाहिलें. सावरकरांचें वैचारिक विश्व या तीन श्रद्धांतून निर्माण झालें आहे !

पण अेवढींच सावरकरांच्या ज़ीवनाचीं वैशिष्ट्यें नाहींत. सावरकरांचें हें अद्भुत जीवन, त्यांचीं श्रद्धाकेंद्रें यांच्याभोंवतीं त्यांच्या व्यक्तिमत्वाचें वलय आहे. या व्यक्तिमत्वांतून त्यांचें जीवन विकसित होत गेलें. सावरकरांचें हें व्यक्तिमत्व कोणतें ? कॅलिडोस्कोपमधून जशीं रंगीबेरंगीं दृश्यें दिसतात, तशींच दृश्यें निर्माण करणारें सावरकरांचें हें व्यक्तित्व कोणतें ? भूतदयेंतून निर्माण झालेलें साधुत्व हें गांधीजींच्या व्यक्तित्वाचें मूलद्रव्य म्हणतां येअील. महत्त्वाकांक्षेच्या रोखानें धांवणारी अुग्र देशप्रीति हें नेपोलिअन वा हिटलर यांच्या व्यक्तित्वाचें मूलद्रव्य ठरेल. गांधीजींच्या त्या साधुत्वाची आकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तित्वांतून त्यांचें जीवन विकसित झालें; नेपोलिअन वा हिटलर यांच्या अुग्र व तेजोमय आकांक्षांनीं त्यांचें जीवनच जळून गेलें ! याच पद्धतीनें सावरकरांच्या जीवनाचा अर्थ लावतां येअील का ? सावरकरांचें जीवन घडविणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्वाचें मूलद्रव्य—निदान त्या रसायनाचे घटक शोधून काढतां येतील का ?

सावरकरांचे विचार समजून घ्यावयाचे असतील, तर याचा शोध घेतलाच पाहिजे. कारण त्यांतच त्यांची शक्ति आहे. त्यांच्या अितकेच किंबहुना त्यांच्यापेक्षां अधिक कष्ट भोगलेले देशभक्त विस्मृतीच्या अंधारांत लोटले कां गेले आणि सावरकर मात्र तळपत कां राहिले, हें त्याविना कळणार नाहीं.

तिहेरी धागे

सावरकरांच्या व्यक्तित्वाचे पृथक्करण केलें म्हणजे काय दिसतें ? प्रथमच हें मान्य करावें लागतें कीं त्यांचें व्यक्तित्व बहुरंगी आहे आणि असा-

मान्यत्व हेंच त्याचें वैशिष्ट्य आहे. समृद्धता हें त्याचें आकर्षण आहे. पण त्या विविधतेंत, समृद्धतेंतहि तीन धागे आपल्याला प्रामुख्यानें दिसतात. सावरकरांजवळ सदैव जग बदलून टाकण्यासाठीं निघणाऱ्या क्रांतिकारकाची अदम्य क्रांतिप्रवृत्ति आहे; जीवनांतील सौंदर्य शोधून त्याचा रसिकतेनें आस्वाद घेणारें भावपूर्ण अंतःकरण आहे आणि केवळ स्वप्नाळू ध्येयसृष्टींत रममाण न होणारी, जीवनाचें व्यवहारी स्वरूप समजावून घेणारी आणि तरीहि भविष्यभेदी अशी व्यवहारवादी (pragmatic) दृष्टि आहे ! सावरकरांचीं हीं व्यक्तिवैशिष्ट्यें लक्षांत घेतल्याविना त्यांचे विचार समजणार नाहींत, त्यांचें राजकारण कळूं शकणार नाहीं. त्यांच्या जीवनांतील साऱ्या चळवळी, हालचाली, कृति, विचारांचीं आंदोलनें यांचा अुगम त्यांच्या या त्रिविध प्रकृतींत सांपडेल. हें व्यक्तिवैशिष्ट्यांचें मिश्रण अितकें विलक्षण आहे कीं कित्येक वेळां असें वाटतें कीं हा विधात्यानें एक चमत्कार घडवून आणला आहे.

प्रक्षोभक क्रांतिकारकता

क्रांतिकारकता याचा अर्थ केवळ राज्यक्रांतीची आकांक्षा नव्हे; जीवनांतील ती अेक महत्त्वाची प्रवृत्ति आहे. जेथें स्थिरता दिसेल तेथें गति आणण्याची, ग्लानी दिसेल तेथें चैतन्य ओतण्याची, क्लैब्य दिसेल तेथें शौर्याची जाणीव करून देण्याची घडपड (म्हणजेच परागतीकडून प्रगतीकडे जाण्यासाठीं केलेली धडपड) हीच क्रांतिकारकता आहे. सावरकरांनीं आयुष्यभर या क्रांतिकारक प्रवृत्तीनेंच राष्ट्रजीवनाचा विचार केला आहे. ती प्रवृत्ति केवळ विनाशक नाहीं; तेथें नवें विश्व निर्माण करण्याची आकांक्षा आहे. सडलेलें, कुजलेलें, जीर्ण, विदीर्ण राष्ट्रजीवन फेंकून देऊन सुंदर, अुन्मेषशाली, आधुनिक राष्ट्रजीवन निर्माण करण्याचा अट्टाहास आहे !

राज्यक्रांतीचे विचार ज्या वेळीं सावरकर मांडीत होते, त्या वेळीं त्यांनीं राष्ट्रैक्य, समता आणि लोकसत्ता यांचा उद्घोष केला. राज्यक्रांति करण्यासाठीं अवश्य असणारा प्रक्षोभ उत्पन्न करतांना राज्यक्रांतीनंतर संपूर्ण नीतियुक्त असें लोकशाही राजकारण केलें पाहिजे, हें त्यांनीं १९०५ सालींहि

सांगितलें आणि प्रत्यक्ष १९४७ मध्यें स्वातंत्र्य मिळालें तेव्हांहि हाच अिषारा दिला.

हिंदुत्वाचा जयघोष करतानांहि हें स्पष्ट बजावलें कीं, 'प्रत्येक धर्ममताचीं, संघाचीं वा संस्थेची प्रगति जेव्हां काळाच्या प्रगतीच्या पावलाशीं पाअूल ठेवून चालूं शकत नाहींशी होते, तेव्हां शेवटीं तिची दुर्दशा झाल्यावांचून राहात नाहीं. म्हणून विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद यांचा निर्भय पुरस्कार करून रूढीभंजनाचें कार्य सावरकरांनीं केलें.

याचप्रमाणें ज्या ज्या क्षेत्रांत सावरकरांनीं पदार्पण केलें—मग तें लिपी, भाषा किंवा पंचांग कसलेंहि असो—तेथें त्यांनीं मूलगामी बदल घडवून आणण्याचीच भूमिका घेतली आणि स्वतःचे मूलभूत विचार मांडून त्यांचा हिरीरीनें प्रचार नि आचार केला. सावरकरांच्या जीवनांतील विविधता याच त्यांच्या क्रांतिप्रवृत्तीमुळें आली. त्यांना मिळालेली अप्रियता हीसुद्धां त्यामुळेंच पदरीं पडली. बीज एकच; पण तिचा नयनमनोहर आविष्कार वेगवेगळ्या प्रकारें व्हावा, तसें सावरकरांच्या आयुष्यांत घडलें. कांहीं तरी नवीन प्रमेय मांडण्याची आणि त्यामुळें समाजांतील विचारवंतांत अस्वस्थता अुत्पन्न करण्याची त्यांना हौसच आहे असें म्हटलें तरी चालेल. सदैव युद्ध हेंच त्यांच्या जीवनाचें वैशिष्ट्य ठरलें तें यामुळेंच ! जलाशयांत सळसळत जाणाऱ्या माशाचें चापल्य तेथें आपणाला दिसतें. त्यांच्या जीवनावर गंज चढूं शकला नाहीं, विरोधी परिस्थितीनें जीवन गोठून अगतिक झालें नाहीं. पण या क्रांतिकारक प्रवृत्तींत केवळ भावनिकता नाहीं. क्षणकालचा प्रक्षोभ हा तिचा जन्मदाता नव्हे; तर बुद्धिनिष्ठा हें त्याचें मूल्य आहे. त्यामुळें सावरकरांचे क्रांतिकारक विचार कधींहि तर्काचे बांधीव किनारे फोडून बाहेरून वहात गेले नाहींत. या त्यांच्या बुद्धिनिष्ठेमुळेंच त्यांच्या अंतःकरणांत एक प्रकारचा अदम्य आत्मविश्वास वावरतो आणि ते नेहमीं म्हणतात, " मी जें आज सांगतों तें लोकांना दहा वर्षांनीं कळतें. तोंपर्यंत मी थांबण्यास सिद्ध आहें. " हा त्यांचा आत्मविश्वास अनेक विषयांत खरा ठरला आहे. त्यांच्या या आत्मविश्वासामुळेंच ते लोकांना अहंकारी

वाटतात, तत्त्ववेडे (fanatic) वाटतात. कदाचित् त्यांना याची जाणीवहि नसेल.

नेपोलियनची एक गोष्ट सांगतात. त्याला एकदां एकानें सांगितलें कीं, "तुम्हीं फार महत्त्वाकांक्षी आहांत." तेव्हां तो तत्काळ त्या गृहस्थाला म्हणाला, " I have no ambition whatever, or if I have, then it is so inborn, so intimately knit up with my life that it is as the blood in my veins." (मला कोणतीहि महत्त्वाकांक्षा नाहीं आणि असलीच तर ती अितकी जन्मजात आहे, माझ्या जीवनाशीं ती अितकी अेकरूप झालेली आहे कीं जणूं माझ्या वाहिनींतील तें रक्तच वाटावें !) सावरकरांच्या विजिगीषु आकांक्षेचें स्वरूप असेंच आहे. ज्या वृत्तीनें त्यांनीं " अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला ! मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ! " अुद्गार काढले, त्याच वृत्तीनें ते म्हणाले होते कीं, " माझा कानं घरण्याचा अधिकार शिवाजी महाराजांसारख्या पुरुषांनाच आहे ! " पण या त्यांच्या आत्मविश्वासामागें त्यांची बुद्धिनिष्ठ विचारसरणी आहे हें विसरतां कामा नयेः

सावरकरांच्यावर असा अेक आक्षेप घेतला जातो कीं सावरकरांची क्रांतिकारकता ही क्षोभांतून निर्माण झालेली असल्यामुळें त्यांचे विचार हे चिरकालीन ठरणार नाहींत. ते मूलगामी असले तरी ते प्राथमिक स्वरूपाचे आहेत आणि म्हणून त्यांना यशाचा कळस दिसणार नाहीं ! त्यांचे विचार किंवा त्यांच्या विचारांमागें असणारें त्यांचें व्यक्तित्व मानवजातीला वा भारताला चिरंतन मार्गदर्शन करणारें ठरणार नाहीं. या आक्षेपाचा साकल्यानें विचार पुढें करावयाचा आहे; पण सावरकरांच्या क्रांतिप्रवृत्तींत प्रक्षोभाचा आविष्कार फार मोठ्या प्रमाणांत झाला आहे यांत शंकाच नाहीं. पण प्रक्षोभ हीहि क्रांतीची अेक अैतिहासिक दृष्ट्या अपरिहार्य ठरणारी गरज असते. जगांतील कोणत्याहि राष्ट्राची कोणत्याहि क्षेत्रांतील क्रांति तुम्हीं विचारांत घ्या, तेथें तुम्हांला असें दिसेल कीं क्रांतीच्या–बदलाच्या कल्पनेसाठीं आणि जडतेविषयीं चीड अुत्पन्न करण्यासाठींच अनेक

महापुरुषांचें जीवन खर्चीं पडलें आहे. सॉक्रेटिस, मार्टिन ल्यूथर यांचें काय झालें ? अगदीं आपल्या ताज्या अितिहासांत टिळकांसारख्या श्रेष्ठ बुद्धिमंताला 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हेंच जन्मभर सांगत बसावें लागलें नाहीं का ? टिळकांच्या लेखणीला असंतोषाच्या ठिणग्याच्च टाकीत राहावें लागलें नाहीं काय ? आगरकरांनाहि समाजाच्या रूढीप्रिय तेला धक्के देत बसावें लागलें नाहीं काय ? सावरकरांचें असेंच झालें. राज्यक्रांतीच्या प्राथमिक कल्पनांचा पुरस्कार करण्यांत तारुण्य गेलें. समाजसुधारणेच्या विधायक कल्पना न मांडतां रूढीभंजन आणि जात्युच्छेदन हेंच कार्य करणें त्वर्य ठरलें. राष्ट्ररचनेचें स्पष्ट स्वरूप मांडण्याअैवजीं राष्ट्र म्हणजे काय नि भारतांत कोणता राष्ट्रवाद प्रभावी होअूं शकेल, यांचेंच चर्वित-चर्वण करणें भाग पडलें. प्रत्येक ठिकाणीं फारशी विधायक नसलेली आणि अधिक प्रक्षोभ निर्माण करणारी भूमिकाच सावरकरांना करावी लागली. सावरकरांची मूळ प्रवृत्तीच क्षोभाला रुचणारी आहे हें त्याचें कारण नव्हे. पायांतील दगड होण्वाचें किंवा बीज म्हणून नष्ट होऊन जाण्याचें भाग्यच त्यांना लाभलें आणि त्यांतच त्यांना सदैव आनंद वाटत आला आहे.

साहसी आत्मार्पण

सावरकरांची क्रांतिकारकता केवळ बौद्धिक नाहीं. ते केवळ विचारांनीं क्रांतिवादी नाहींत; तर आपल्या क्रांतिकारक विचारांसाठीं सावरकरांनीं आत्मार्पण केलें आहे. किंबहुना समाजाला नवे क्रांतिकारक स्वरूपाचे विचार देअून त्याची सेवा करणें हेंच सावरकरांच्या जीवनाचें वैशिष्ट्य झालें आहे. त्यासाठीं त्यांना लोकप्रियतेला चूड लावावी लागली. पूर्वी सशस्त्र क्रांतिवादाचा पुरस्कार सावरकर करीत, त्या वेळीं त्यांना माथेफिरू, आततायी इत्यादि विशेषणें लोकांनीं लावलीं. ते समाजसुधारकाची भूमिका करूं लागले, त्या वेळींहि जीर्णमतवाद्यांचा रोष त्यांनीं ओढवून घेतला. काँग्रेसच्या मुस्लिमधार्जिण्या राजकारणाला प्राणपणानें विरोध करूं लागल्यावर तर सावरकरांना सर्वस्वच पणास लावावें लागलें ! स्वमताचा आग्रह त्यांनीं केवळ लेखनांतूनच धरला नाहीं; तर त्यासाठीं त्यांनीं

सर्वस्वाचें बलिदान केलें. 'माझ्या पिढीच्या अपयशाच्या, दुःखाच्या व पराजयाच्या खोल पायावर भावी पिढ्यांचा यशःप्रासाद उभारला जाईल' असें ते आपल्या क्रांतिकारक सहकाऱ्यांना सांगत. "पुढाऱ्यानें योग्य दिसेल तें सांगावें, तें त्याचें कर्तव्य; लोकप्रियतेच्या मागें लागणें नव्हे!" असें सावरकरांचें समाजसुधारकांना सांगणें असे. सावरकरांनी लोकप्रियता कीं लोकहित हा वाद आपल्यापुरता मिटवून टाकला आणि त्यांनीं ठरवून टाकलें— 'वरं जनहितं ध्येयम्। केवला न जनस्तुतिः।" आणि या त्यांच्या निर्धाराप्रमाणें स्वमतासाठीं त्यांनीं आयुष्यभर झुंज दिली आहे. महाराष्ट्रांत स्वमतासाठीं लोकप्रियतेची तमा न बाळगणाऱ्या महापुरुषांची परंपरा फार मोठी आहे. महाराष्ट्रानें भोंगळ व जनहितघातक विचारसरणीला कणखर विरोध करणारे पुरुष निर्माण केले आहेत. त्यांत सावरकरांची गणना प्रामुख्यानें केलीच पाहिजे. लोकप्रियतेचा त्याग हा सर्वांत मोठा त्याग आहे. विशेषतः ज्या लोकशाही राजवटींत लोकांच्या मतावरच एकाद्याचें राजकीय भवितव्य अवलंबून असतें, तेथें लोकप्रियतेची पर्वा न करतां स्वमताचा पुरस्कार करीत राहाणें ही तर सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट ठरते. या दृष्टीनें सावरकरांच्या राजकीय, सामाजिक कार्याकडे पाहिलें पाहिजे.

गांधीजींच्या वधानंतर सगळीकडे प्रक्षोभ झाला होता. सगळीकडे जाळपोळ सुरू होती. अशा वेळीं सावरकरांच्या घराभोंवतीं संतप्त जमाव जमला. पोलिस अधिकाऱ्यांनीं सावरकरांना घरांतून सुरक्षित घेऊन जाण्याची सिद्धता दर्शविली. तेव्हां सावरकर उत्तरले—"मी एक इंचहि हालणार नाहीं. दोन पोलिस जमाव हटविण्यास पुरे आहेत. नि तेंहि पोलिसांना करावयाचें नसेल तर माझ्या तत्त्वासाठीं प्राण देण्यास मी सिद्ध आहें!" त्या वेळची परिस्थिति ज्यांनीं अनुभवली आहे, त्यांना या धैर्याची व तत्त्वनिष्ठेची किंमत कळण्यासारखी आहे. आतां क्रांतीचा काळ आला असें म्हणून टाळ्या पिटणाऱ्यांना मात्र ती किंमत कळणें शक्य नाहीं! सावरकरांनीं वृद्धपणीं दाखविलेलें हें धैर्य आहे; मग तरुणपणीं त्यांनीं मस्तवाल बारी साहेबाची अंदमानांत रग जिरवली असेल यांत काय नवल?

सारांश, सावरकरांची क्रांतिकारकता केवळ भावनोद्रेकानें जन्मलेली नाहीं. तेथें तत्त्वनिष्ठेचा पीळ आहे, तेथें साहसी आत्मार्पणाची सदैव सिद्धता आहे. म्हणूनच सावरकरांची बुद्धिनिष्ठा निष्क्रिय ठरली नाहीं. ते केवळ वाक्-पंडित झाले नाहींत; कृतिवीर ठरले. समाज बदलून टाकण्यासाठीं लागणारी तळमळ नुसती असून चालत नाहीं, दुःखी समाजासाठीं अश्रू ढाळून समाज सुखी होत नाहीं; त्यासाठीं कर्तव्याच्या रणांगणाकडे, स्वार्थाकडे पाठ फिरवून धांवत जावें लागतें हें सावरकरांनीं सिद्ध केलें आहे !

भावनाशील काव्यात्मकता

सावरकर अेकदां म्हणाले होते कीं, मी वृत्तीनें कवि व कलावंत आहें; पण परिस्थितीनें मला राजकारणी पुरुष केलें आहे. सावरकरांची मूळ प्रवृत्ति कवीची होती, हें त्यांच्या आत्मचरित्रावरून स्पष्ट दिसून येतें. मानवी जीवनांतील विविध भावदर्शन घडविणारी कवीची भावतरलता, कल्पनेच्या पंखांनीं सामान्य माणसाला अदृश्य असणाऱ्या विश्वांत विहरणारी प्रतिभा आणि उदात्ततेच्या, सौंदर्याच्या भोंवतीं भुंग्याप्रमाणें घोंटाळणारें रसिक अंतःकरण या तीनहि गोष्टी सावरकरांच्याजवळ असल्यामुळें सावरकर हे अभिजात कवि ठरले आहेत.

सावरकरांची भावतरलता त्यांच्या बालपणापासून ते वृद्धपणापर्यंत अनेक वेळां आयुष्यांत दिसली आहे. लहानपणीं आपल्या आवडत्या देवीसमोर स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेतांना किंवा तिच्या दुःस्थितीनें कळवळून जाऊन अश्रुपात करतांना दिसली ती कवीची भावनोत्कटता होती. सागराला अगस्तीचा शपथ घालून आपल्या मातृभूच्या दर्शनासाठीं आसुसलेल्या नेत्रांनीं ' सागरा, प्राण तळमळला ' ही कविता करणारें तें अंतःकरण भावोत्कट कवीचेंच अंतःकरण होतें. आणि ती कविता म्हणजे मातृभूमीवर अुधळलेलें भावपुष्प होतें. १८५७ चें पुस्तक लिहितांना सावरकरांनीं तात्या टोपेवरील प्रकरण संपविलें आणि ' तात्या, तात्या, तूं या अभागी देशांत कशाला जन्मलास ! या नीच, विश्वासघातकी आणखी महामूर्ख लोकांसाठीं प्राणांचा सौदा कशाला केलास ? ' ही वाक्यें लिहितांना त्यांच्या डोळ्यांतून घळघळां अश्रू

वहात होते. पुण्याला लाला हरदयाळांवरचें प्रसिद्ध भाषण ज्यांनीं ऐकलें होतें किंवा 'माझें गाणें मला गाऊं द्या' हें त्यांचें भाषण ज्यांनीं ऐकलें असेल, त्यांनाहि हेच अश्रु सावरकरांच्या डोळ्यांत चमकलेले दिसले असतील. आणि त्याच सावरकरांनीं गांधीखून खटल्याचे वेळीं न्यायालयांत जेव्हां भाषण केलें, त्या वेळींहि त्यांच्या डोळ्यांत अश्रु तरळले ! कलकत्त्याच्या हिंदुसभा-अधिवेशनांत सावरकरांनीं आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या आनंदाला अश्रूंचीच वाट करून दिली ! त्यांना जेव्हां आपल्या जुन्या सहकाऱ्यांची आठवण होते, त्या वेळींहि अशाच दुःखानें ते भारावून जातात.

प्रतिपक्षावर कठोर आघात करणाऱ्या सावरकरांची ही भावतरलता आश्चर्यकारक नाहीं का ? सावरकरांच्या वाङ्मयांत या भावतरलतेचें दर्शन अनेक वेळां झालेलें आहे. त्यांचा 'माझी जन्मठेप' या पुस्तकांतील प्रथमार्ध हें तर भावकाव्यच आहे ! त्यांनीं आपल्या वहिनीला पाठविलेलें पत्र, स्वतःचें लिहिलेलें मृत्युपत्र किंवा 'कमला' काव्यांतील करुण, शृंगार रसांनीं ओथंबळलेल्या ओळी या त्यांतील भावोत्कटतेमुळेंच अमर झाल्या आहेत ! खडकाखालीं दबलेला झरा वर येण्यासाठीं धडपडत असावा, तसें सावरकरांचें कवि-अंतःकरण तळमळतांना आपल्याला दिसतें ! त्यांच्या वक्तृत्वांतहि कठोर माणसाला विरघळविणारें भावसामर्थ्य असतें ! भावनाशील काव्यात्मकता आणि बुद्धिनिष्ठ युक्तिवाद हे हातांत हात घालतांना तुम्हांला कोठें पहावयाचे असतील, तर ते सावरकरांच्या वक्तृत्वांत तुम्हांला दिसतील !

स्वप्नमयतेचें आकर्षण

कल्पकता हें सावरकरांच्या कवि-प्रकृतीचें नेत्रदीपक वैशिष्ट्य आणि त्यांतूनच निर्माण झालेली स्वप्नरंजक वृत्ति हें त्यांचें आकर्षण ठरलें आहे. सावरकरांच्या कल्पकतेचा प्रवास कवित्वापासून तों राजकीय मुत्सद्देगिरीपर्यंत चालू आहे. प्रत्येक क्षेत्रांत त्यांनीं नव्या कल्पना, नवे विचार, नवीं ध्येयें मांडलीं. सावरकरांची कल्पकता ही महाकवीच्या तोडीची ठरली आहे याचें कारण हेंच. अगदीं साध्या शब्दांतून भव्य अर्थ प्रकट करण्याचें त्यांचें सामर्थ्य

किंवा अुत्कृष्ट अुपमांतून वस्तुस्थितीचें दर्शन घडविण्याची त्यांची कला हीसुद्धां त्यांच्या कल्पनावैभवाचींच लक्षणें आहेत.

पारिजातकाच्या झाडाला धक्का लागला म्हणजे फुलांचा सडा पडतो ना? सावरकरांची कल्पकता अशीच आहे.

सावरकरांचें अंतःकरण कवीचें आहे. त्यामुळेंच भविष्याचे पडदे फाडून तेथील स्वप्नांची सृष्टि पाहणें किंवा भूतकाळाच्या शिलेवरील चित्तथरारक किंवा पराक्रमपूर्ण घटनांचीं चित्रें स्वतःच्या अुत्कटतेनें सजीव करून अुभीं करणें हें त्यांच्या स्वप्नरंजनाचें स्वरूप आहे. भव्य-दिव्य पाहण्याची अिच्छा करणारें, परंतु सध्यां अधःपतित समाजांत वावरणारें सावरकरांचें मन अितिहासाकडे पाहूं लागतें. हिंदु जातीच्या वैभवाचें वर्णन करतांना किंवा हिंदु वीरपुरुषांच्या कथा सांगतांना सावरकरांचें हृदय त्या काळाशीं किती तन्मय होतें, हें त्यांचें १८५७ हें पुस्तक वाचल्यावर कळेल. या पुस्तकांत ऐतिहासिक घटनांचा अुपयोग चेतावणी देण्यासाठीं, मुर्दाड मनांना सजीव करण्यासाठीं केलेला आहे. 'मारो फिरंगी को' हें अुघड सांगतां येईना, म्हणून हें पुस्तक त्यांनीं लिहिलें. त्यामुळें या पुस्तकांत भावपूर्ण कथनाचा व क्रोध पेटविणाऱ्या कथांचा भागच जास्त आहे. सावरकरांचें 'हिंदु-पदपादशाही' हें पुस्तकहि अशाच अभिनिवेशानें भरलेलें आहे. 'गोमांतक' काव्यांत जें विजयगीत आलेलें आहे, तोहि सावरकरांच्या विजिगीषु मनाचा हिंदूच्या भव्योदात्त अितिहासाला केलेला मानाचा मुजराच आहे.

स्वातंत्र्यसंग्रामांत लढतांना सावरकरांनीं देशभक्तीची ज्योत पेटविण्या-साठीं, पराक्रमाची, हौतात्म्याची स्फूर्ति घेण्यासाठीं भारतीय अितिहासाचा कसा अुपयोग केला, हें त्यांच्या पोवाड्यांवरून व १८५७ सारख्या पुस्तकां-वरून दिसून येईल. सावरकरांनीं 'माझी जन्मठेप' या पुस्तकांत प्रारंभींच म्हटलें आहे—

"म्हणून 'चमकोर' दुर्गांतून निसटतांना ज्याचा संपूर्ण पराभव झालेला आहे, ज्याचे माता, पत्नी, पुत्र यांची वाताहत होअून संसाराची राखरांगोळी उडाली आहे, ज्याच्या शिष्यांनाहि त्याच्यावर

शपथपूर्वक ठेवलेल्या निष्ठेचें त्यागपत्र देऊन, आयत्या वेळेस त्यास सोडून त्या पराभवाचे अपयशाचें खापर त्याच्याच डोक्यांवर फोडलेलें आहे आणि तरीहि तो सिंह तें अपयशाचें व दुःखाचें हालाहल अेकाद्या रुद्रासारखा पचविता झाला, त्या गोविंदसिंहाचें अपयशच आज मला गेय आहे. या माझ्या भयंकर दुःखास व अपयशास-तें मेरुदंडाप्रमाणें आधारभूत होईल ! ''

पुढें ज्या वेळीं हिंदु-मुस्लिमांचा प्रश्न तीव्र झाला आणि मुस्लिमांनीं या देशांत यादवी युद्धाचा घाट घातला, त्या वेळीं सावरकर मराठ्यांच्या इतिहासाकडे चेतावणीसाठीं वळले. ' इराणपासुनी फिरंगाणपर्यंत ' ज्या वेळीं शत्रू या देशावर हल्ला करीत होते, त्या वेळीं मराठ्यांनीं हा सह्याद्रि पेटविला होता आणि त्या धगींत सगळे शत्रू आणि देशबुडवे जाळून खाक केले होते, याची आठवण या देशाला सावरकरांनीं करून दिली. निजामाला ते बाजीरावाची आठवण करून देत; तर मुस्लिम लीगनेत्यांना सदाशिवराव भाऊंच्या घणांची किंवा अटकेवर झेंडे फडकविणाऱ्या राघोभरारीची जाणीव करून देत. अितकेंच काय, ज्या वेळीं पाकिस्तान निर्माण झालें, त्या वेळींहि याच अितिहासाचा आधार घेऊन सावरकरांनीं सांगितलें कीं, ''आतांपर्यंत हिंदूंच्या अितिहासांत वायव्य सीमा शत्रूच्या हातांत गेल्याचे अनेक प्रसंग घडले आहेत. आपल्यांत हिंमत असेल तर आपण हाच दुभंगलेला देश पुन्हां येत्या १० वर्षांत अखंड करूं ! ''

सावरकरांचें हें अितिहासप्रेम त्यांच्या कविमनांतून निर्माण होणाऱ्या कल्पकतेचें व विजिगीषुतेचें प्रतीक आहे. त्यामुळें सावरकरांच्या राजकीय चिकित्सेंत व अुपाययोजनेंत कांहीं दोष शिरले. सावरकरांचा हा पूर्वजगौरव, अैतिहासिक परंपरेचा सदैव उद्घोष लोकांच्या नजरेंत भरला. त्याच्या गडद व भडक छाया त्यांच्या राजकारणावर पडल्या आणि म्हणून सावरकरांसारख्या पुरोगामी नेत्यालाहि टीकाकारांनीं ' स्वप्नाळू, पूर्वगौरववादी, मध्ययुगीन, प्रतिगामी ' अशीं विशेषणें दिलीं. अर्थात् याचें विश्लेषण पुढें येणारच आहे; पण एक गोष्ट मात्र निश्चित खरी आहे, सावरकरांच्या सत्यशोधक प्रज्ञेवर त्यांच्या या काव्यात्मक गौरववादानें मात केली !

राजकीय व्यवहारवाद

नेपोलियनचें लुडविग या त्याच्या चरित्रकारानें पुढील वर्णन केलें आहे : " The mind was imaginative and mathematical; he had ardent vision, yet his calculations were cool. " (नेपोलियनचें मन हें कल्पक असलें तरी गणिती होतें, त्याला दूरदृष्टि असली तरी त्याचे अंदाज मात्र अगदीं कांटेकोर असत.) सावरकरांचें राजकारणी पुरुष या नात्यानें असेंच वर्णन करतां येईल. सावरकर हे मूलतः कवि असले, जग बदलून टाकण्याची अीर्षा बाळगणारे क्रांतिकारक असले, तरी त्यांची राजकारणाकडे पहाण्याची दृष्टि पूर्णपणें व्यवहारवादी (pragmatic) व वस्तुनिष्ठ (objective) आहे. या त्यांच्या दृष्टिकोणांत जसे कांहीं गुण आहेत, तसे कांहीं दोष आहेत. पण ते दोष सावरकर या व्यक्तीचे नसून सावरकरांना जी व्यवहारकठोर राजकीय विचारवंताची भूमिका करावी लागली, त्या भूमिकेचे आहेत. राजकारण हा समाजाचा व्यवहार आहे, हें एकदां मान्य केल्यानंतर त्या समाजाची प्रकृति व त्याच्या शत्रूंचे डावपेंच यांचा मेळ घालून राजकारण करावें लागतें. या दृष्टीनें आपण ब्रिटिशांची गेल्या दीडशें वर्षांतील साम्राज्यवादी राजनीति पहा म्हणजे तुम्हांला काय दिसेल ? ब्रिटननें स्वतःच्या जनतेसाठीं लोकशाही राज्यपद्धति स्वीकारली होती आणि वसाहतींसाठीं नोकरशाहीची पोलादी चौकट अुभारली होती. लोकशाहीच्या नीतीमध्यें ही विसंगति बसूं शकते काय ? पण या तात्त्विक विसंगतीकडे लक्ष न देतां ब्रिटननें आपलें राजनैतिक धोरण सदैव आंखलें. हें चांगलें का वाअीट ? राजकारणाकडे स्वप्नाळू दृष्टीनें पाहून चालत नाहीं; त्यांत तात्त्विक सुसंगति ठेवण्याचा प्रयत्न कित्येक वेळां अयशस्वी ठरतो. कारण जीवनांतच सुसंगति नसते. विल्यम जेम्स या अिंग्रजी तत्त्वचिंतकानें असें म्हटलें आहे : " True ideas are those that we can assimilate, validate, corroborate and verify. It is not true that whatever is rational is real; whatever is experienced is real. " तत्त्वज्ञानाच्या अगदीं कांटेकोर अर्थानें ही विधानें कदाचित् विवाद्य असतील; पण राजकीय चळवळींत तरी निदान तीं खरीं ठरतात.

जीं ध्येयें अतिहासानें पराभूत झाल्याचें सांगितलें, जे मार्ग काल मृत झाल्याचें वर्तमानकाळ सांगतो आणि जें तत्त्वज्ञान केवळ स्वप्नाळू भविष्यकाळांतच विजयी होण्याची शक्यता असते, अशीं ध्येयें, असें तत्त्वज्ञान राजकारणांत विजयी होत नाहीं.

सावरकरांच्या राजकीय व्यवहारवादी दृष्टीनें ही कल्पना आत्मसात् केली होती, म्हणून सावरकर वस्तुनिष्ठ राजकारणी पुरुष झाले. सावरकर ज्या वेळीं क्रांतिकारकाची भूमिका करीत होते, त्या वेळींहि त्यांनीं घटनात्मक चळवळीची वा सामुदायिक अुठावणीची कल्पना तिरस्करणीय मानली नाहीं त्याचें कारण त्यांची व्यवहारवादी दृष्टि ! सावरकरांनीं हिंदु-मुस्लिम प्रश्नाचा जितक्या ऐतिहासिक व राष्ट्रवादी दृष्टीनें विचार केला होता, तितका अितर कोणताहि पुढारी करूं शकला नाहीं यांचें कारणहि हेंच. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आतां तें स्वातंत्र्य आपलेंच आहे असें मानून तिरंगी राष्ट्रध्वज प्रथम आपल्या घरावर फडकाविला त्याचें कारणहि सावरकर वस्तुनिष्ठ विचारवंत आहेत, हेंच होतें. आणि आतां जेव्हां कम्युनिस्टांचें संकट देशावर कोसळूं पहात आहे, त्या वेळीं 'समाजवादी मतांचाच मी पुरस्कार करीन, हिंदु धर्म हें कम्युनिझमला अुत्तर असूं शकत नाहीं' असें म्हणणारे सावरकर हे वस्तुनिष्ठ राजकारणी नाहींत काय !

सावरकर हे राजकीय तत्त्वज्ञानाचे दास नाहींत. जीवन बदलत असेल, तर जीवनाची रचनाहि बदलली पाहिजे असें मानणारे ते पूर्णपणें बुद्धिनिष्ठ विचारवंत आहेत. भूतकाळावर दृष्टि ठेवून आणि भविष्यकाळाचा वेध घेअून वर्तमानकाळांत जागरूकतेनें वावरणारे ते विचारवंत आहेत. या ठिकाणीं अेकच अुदाहरण देण्यासारखें आहे. १९४२ सालीं सगळीकडे ऑगस्ट-आंदोलन चालू होणार असें गाजत होतें. त्या वेळीं सावरकरांनीं सहकार्याचा हात पुढें करतांना काँग्रेसजनांना सांगितलें कीं जर भारत अखंड ठेवण्याची शपथ घेत असाल, तर सहकार्य करतों. तेव्हां काँग्रेसजनांनीं विचारलें कीं "ही काय सौदा करण्याची वेळ आहे ?" पण ते हें विसरले कीं हा सौदा भारतासाठीं होता; हिंदुसभेसाठीं नव्हता. आणि शेवटीं सावरकरांचें

भविष्य खरें ठरलेंच. लढा फसला आणि त्यानंतर फाळणीच्या वाटाघाटी सुरू झाल्या. सावरकरांच्या राजकीय दूरदृष्टीचा तो विजय होता !

सावरकरांच्या या दृष्टीबद्दल कै. न. चिं. केळकरांनीं म्हटलें होतें— "सावरकर-चरित्र वाचील त्याच्या अेक गोष्ट लक्षांत येअील कीं सावरकरांचीं राजकीय मतें आज चाळीस वर्षांच्या दीर्घकाळांत स्थिर आहेत. पण तीं पदरांत पाडून घेतांना, बाजारी व्यवहाराप्रमाणें आणाभर अरतापरता करून मध्यमक्रम स्वीकारण्याचीहि तयारी त्यांना पसंत होती." सावरकरांचें हें धोरण कित्येक वेळां दूषणास्पद व कातडीबचाअू ठरविण्यांत आलें आहे. सावरकरांची ही समजुतदार दृष्टि विख्यात मवाळनेते श्रीनिवास शास्त्री यांनीं पाहिली तेव्हां तेहि म्हणाले,

"I had expected to see a gentleman perverse, obstinate and loud; but I found a thin looking, quiet Maharashtrian chap, speaking slowly and deliberately, seldom raising his voice and always apparently in full possession of his mind and knowing exactly what he wanted."

(सारांश, मला असें वाटलें होतें कीं सावरकर म्हणजे अेक विकृत, हट्टी मनोवृत्तीचे गृहस्थ असतील; पण ते मला शांत वृत्तीचे, आपल्याला काय पाहिजे आहे तें नेमकें जाणणारे मनस्वी असे महाराष्ट्रीय गृहस्थ दिसले.)

सावरकर साहसवादी नसले, तरी साहसाचा अुपयोग होअील असें वाटल्यावर साहसहि करण्यास ते मागेंपुढें पहाणार नाहींत. त्यांनीं मार्सेलिसला समुद्रांत अुडी टाकली त्याहिमागें जशी अुपयुक्ततावादी दृष्टि होती, तशीच सुभाषबाबूंना परदेशांत जाअून ब्रिटिशविरोधी आघाडी अुघडण्यास सांगण्यामागेंहि होती. पण सेनापति बापटांनीं लंडनमध्यें असतानां जेव्हां त्यांना विचारलें कीं "मी पार्लमेंटमध्यें बाँब टाकूं का ?" तेव्हां त्यांना सावरकरांनीं

नकार दिला. सर्व तयारी होईपर्यंत कांहीं नको असें त्यांनीं बजावलें. कारण तें अवेळीं ठरणारें साहस होतें. सावरकरांच्या या वृत्तीमुळें त्यांचा क्रांतिवादी हा व्यवहारवादी बनला (A revolutionist became a legitimist) असें म्हणतां येईल. पण सावरकर हे व्यवहारवादी आहेत याचा अर्थ ते तत्त्वभ्रष्ट तडजोडवादी आहेत असें मात्र नव्हे. त्या ठिकाणीं क्रांतिकारकाची अशरणवृत्ति ते दाखवितात. त्यांचीं जीं श्रद्धा-केंद्रें आहेत, त्यांविषयीं सावरकरांनीं अशरणवृत्ति दाखविली आहे. ते स्वतःच्या चळवळीचा पराभव आनंदानें स्वीकारतील; पण त्या पराभवानें खचून जाऊन तत्त्वभ्रष्ट तडजोड मात्र कधींहि करणार नाहींत. म्हणूनच ज्या वेळीं या देशांत मुस्लिम लीग यादवीची सिद्धता करीत होती, त्या वेळीं त्यांनीं तिला तोंड देण्याची काँग्रेसजनांना विनंति केली ! कोणाला आवडो वा न आवडो, सावरकर आपलीं मतें अत्यंत स्पष्ट भाषेंत मांडीत आले आहेत. जें बुद्धीला पटणार नाहीं, त्याचा चुकूनहि पुरस्कार ते करणार नाहींत. तेथें गूढगुंजन नाहीं, शब्दांचें अवडंबर नाहीं; सगळा रोखठोक व्यवहार आहे. सावरकरांनीं काँग्रेसच्या राजकारणावर अत्यंत कठोर टीका केल्यामुळें ते अप्रिय झालें. ज्या वेळीं काँग्रेसजन अखंड भारताच्या व मुस्लिम लीगशीं लढण्याच्या वरवर घोषणा करीत होते, त्या वेळीं सावरकर उघडपणें लोकांना सांगत कीं हेच काँग्रेसनेते फाळणी करणार आहेत हें तुम्हीं लक्षांत ठेवा.

सावरकरांच्या या व्यवहारवादी दृष्टीमुळें त्यांच्या राजकारणांत कांहीं दोष शिरले. गांधीजींचें राजकारण जसें अत्यंत आत्मनिष्ठ होतें, तसें सावरकरांचें राजकारण अत्यंत व्यवहारनिष्ठ झालें. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या देशांत समाजाच्या पुनर्रचनेचा प्रश्न महत्त्वाचा असतो. त्यासाठीं अेक विधायक रूपरेषा समाजापुढें मांडावी लागते आणि त्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर राजकीय क्रांति घडवितां आली तर तिचें रूपांतर कोणत्याहि हुकूमशाहींत न होतां ती खरी लोकक्रांति होते. ब्रिटिश साम्राज्यशाही ही अेक क्रांतींच्या मार्गांतील धोंड आहे असें न पहातां तीच आपल्या दुःखाचें मूळ आहे अशी कल्पना या देशांत काँग्रेसपासून सर्वांनीं रूढ केल्यामुळें भारतांत स्वातंत्र्यानंतर जनताक्रांति होऊं शकली नाहीं. भारताच्या स्वातंत्र्यवादी

चळवळींत राहिलेला हा दोष सावरकरांच्याहि दृष्टिकोणांत राहिला. आणि त्यांतहि ते सैनिकी क्रांतीचे पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांना अेकाद्या तत्त्वज्ञानावर भर देऊन समाजक्रांतीचा आुठाव करण्याची कल्पना प्रभावानें मांडतां आली नाहीं.

पण हें असलें तरी राजकीय विचारवंताची प्रज्ञा, तीक्ष्णता, परिस्थितीचें सम्यक् मूल्यमापन करण्याची बुद्धि व युक्तिवादाचें, डावपेंचांचें राजकारण करावयास लागणारी मुत्सद्देगिरी हे गुण सावरकरांच्या अंगीं प्रकर्षानें आहेत. सावरकरांची तुलनाच करावयाची असेल, तर ती चर्चिलसारख्या राष्ट्र-वाद्याशीं करतां येअील. किंवा आजच्या परिस्थितींत विचार करावयाचा झाला तर असें म्हणतां येअील, सावरकरांचें स्थान राष्ट्रसंघाच्या सभेंत भारताचें प्रतिनिधित्व करणाऱ्या व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे डावपेंच ओळखणाऱ्या परदेशी दूताचें आहे. बॅ. असफअल्ली हे सावरकरांचे निकटचे सहकारी होते. त्यांनीं सावरकरांच्या या राजकीय नेतृत्वाविषयीं म्हटलें आहे:—

"He struck me as an incomparable strategist, whose manoeuvres were sure and certain, and so cleverly marked that the practiced eye failed to detect the process and yet the results were there and you admitted his aimble skill"

(सावरकर मला निश्चित व फलदायक योजना आंखणारे मुत्सद्दी वाटले. ते या योजना कशा आंखत हें अगदीं पटाअीत माणसालाहि कळणें कठीण जाअील; पण त्याचे परिणाम मात्र ताबडतोब दिसून येत. त्यामुळें त्यांचें कौशल्य तुम्हांला मान्य करावें लागे.)

सावरकरांच्या क्रांतिवादी राजकारणांत ही जी त्यांची मुत्सद्देगिरी दिसून आली, ती त्यांच्या या व्यवहारनिष्ठ व वास्तववादी वृत्तीमुळें! कवित्वाचे श्रेष्ठ गुण असलेल्या सावरकरांनीं हा व्यावहारिक समतोलपणा आपल्या राजकीय जीवनांत प्रकट केल्यामुळें सावरकरांचें व्यक्तित्व हा अेक चमत्कार ठरला आहे

यांत शंका नाहीं. अितके परस्परविरोधी गुण फारच वेळां अेकत्र आलेले आपणाला दिसतात.

सावरकरांचें व्यक्तित्व आणि त्यांचे विचार

तेव्हां आपण हें पाहिलें कीं सावरकरांचें व्यक्तित्व त्रिविध आहे. व्यक्तित्वाच्या या बीजांतूनच सावरकरांचा जीवनवृक्ष निर्माण झाला आहे. त्याचे सर्व गुण थोड्या अधिक प्रमाणावर त्या वृक्षावर आलेल्या फळांत अुतरले आहेत. सावरकरांचें वाङ्मय हा त्याचा अुत्कृष्ट नमुना आहे. सावरकरांच्या वाङ्मयांत त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव अितका पडला आहे कीं प्रत्येक वेळीं सावरकरांचें विविध दर्शन आपल्याला घडतें आहे असें वाटतें. त्यांची भाषाशैलीहि या व्यक्तित्वाच्या रसायनांतूनच बुडवून काढल्यासारखी वाटते. सावरकरांचीं मतें ठाम असतात, त्यांत अेक प्रकारची सुसंगति असते याचें कारणहि हेंच आहे. त्याला सामान्य मनुष्य हट्ट म्हणेल; पण हा हट्ट हेंच विचारवंताचें सामर्थ्य असतें. सावरकर असें मानतात कीं ज्यांना सामाजिक, आर्थिक वा राजकीय कोणत्याहि प्रकारची क्रांति करावयाची आहे, ते दृढनिश्चयी पाहिजेत. क्रांतिकारक वा सुधारक अल्पसंख्यच असावयाचे ! ज्याला दृढनिश्चयी अल्पसंख्य (determined minorities) म्हणतात, अशांना अनेक वेळां अपयश मिळतें, क्वचित् फार मोठ्या कालावधीनंतर त्यांचा सिद्धांत यशस्वी होतो. अगदीं विज्ञानशास्त्रांतील अुदाहरण घेतलें तरी आपणाला काय दिसतें ? गॅलिलिओसारख्याचे सिद्धांत त्याच्या आयुष्यांत कुठें मानले गेले ? अर्थशास्त्राच्या अितिहासांत माल्थससारख्या विद्वान् तज्ज्ञाच्या लोकसंख्येविषयींच्या सिद्धांताची टर रिकार्डोसारख्या अर्थशास्त्रज्ञांनीं अुडवली होतीच कीं नाहीं ? इतकेंच कशाला सुभाषचंद्रांनीं आशियांत स्वतंत्र सेना स्थापिली, त्या वेळीं त्यांच्याशीं लढण्याची प्रतिज्ञा 'क्रांतिकारक' समजल्या जाणाऱ्या नेहरूंनीं केली होतीच कीं नाहीं ? पुढें जेव्हां त्यांना आढळलें कीं, सुभाषबाबूंनीं केलेल्या त्या भव्य प्रयोगामुळेंच सैन्याची राजनिष्ठा हादरली, त्या वेळीं सुभाषचंद्रांचा गौरव सुरू झाला !

सावरकरांच्या जीवनांत हेंच घडलें आहे. त्यांनीं मांडलेले विचार त्या त्या काळीं लोकांना पचले नाहींत. त्यांचें व्यक्तित्व ज्यांना कळलेलें नाहीं,

सावरकरांच्या विचारांचें अधिष्ठान कोणतें आहे याविषयीं ज्यांना कोणतीहि स्पष्ट कल्पना नसे, त्यांनीं सावरकरांवर अन्याय करणारा प्रचार भरपूर प्रमाणांत केला आहे. बुद्धिवादी महाराष्ट्रांतच सावरकरांनीं तर्कशुद्ध टीका केल्यामुळें त्यांच्यावर कठोर टीकेची झोड अुठविण्यांत आली आहे. त्याचा सर्वांत मोठा कळस पुण्याच्या अेका काँग्रेसी पत्रानें १९४६ च्या निवडणुकीच्या वेळीं चढविला. त्यानें अेकदां सावरकरांचें छायाचित्र प्रसिद्ध करून त्याच्याखालीं "ब्रिटिशांविरुद्ध काडीहि न अुचलणारे स्वातंत्र्यवीर (?)" असें वर्णन केलें होतें. त्यांना कोणी कांचेच्या कपाटांतील सिंह म्हटलें, कोणी 'रिक्रूटवीर' म्हणण्याचें साहस केलें !

पण सावरकरांना सार्वजनिक जीवनांतून अुठविण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यानंतरहि चालू राहिले होते. या कोणत्याहि प्रयत्नांना शरण न जातां सावरकर हे अेकाद्या बुद्धिनिष्ठ कर्मयोग्याप्रमाणें आपल्या तत्त्वासाठीं झगडत राहिले आहेत. काळ्याकुट्ट ढगांत रसरसणाऱ्या विजेचें सौंदर्य हीच सावरकरांच्या जीवनाची शोभा आहे. गांधीवधाच्या खटल्यांतून निर्दोष सुटून आल्यानंतर ते अेकदां म्हणाले होते, "१४ महिन्यांचा काळ हा माझ्या जीवनांतील अत्यंत वैभवाचा काळ आहे ! कारण माझी ती सत्त्वपरीक्षा होती आणि कीर्ति कलंकित होण्याची भीति होती. मृत्यूच्या छायेखालीं मी वावरत होतों." ही मनाची अवस्था हें त्यांच्या स्थितप्रज्ञतेचें लक्षण आहे. इतकें होअूनहि त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचा आनंद तुम्हांला दिसेल ! स्वातंत्र्य मिळालें याचा खरा आनंद सावरकरांना झाला !

•

सारांश वैचारिक नेता म्हणून श्रेष्ठत्व पावलेल्या या महापुरुषाचें व्यक्तित्व आणि त्याचे विचार हे अभेद्य आहेत. सावरकर म्हणजे विचार. सावरकर म्हणजे आचार. सावरकर म्हणजेच प्रचार. यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. सावरकरांचें वाङ्मय त्यांच्या या विचारांनींच भरलेलें आहे; मग ती ओळ काव्याची असो किंवा नाटकाची, निबंधाची असो. सावरकरांनीं अुच्चारलेला प्रत्येक शब्द हासुद्धां आपल्या विचारांच्या प्रचारासाठीं आहे ! सावरकर हे पहिल्या प्रतीचे प्रचारक आहेत आणि

आपल्या प्रचारकौशल्यानेंच सावरकरांनीं आपले विचार या देशांत दृढमूल केले आहेत, नव्या कल्पना, नवीं ध्येयें समाजाच्या गळीं उतरविलीं आहेत ! आणि या विचारांचा स्वतः अगदीं निर्भयपणें व सर्वस्वाचा त्याग करून आचार केला आहे ! आणि म्हणूनच झंझावातांत अेकादी मशाल पेटत राहावी तसें त्यांचें जीवन अक्षय्य प्रकाशमय झालें आहे !

× × ×

२ :

सावरकरांची शस्त्रसाधना

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचा अितिहास भारत अिंग्रजांच्या ताब्यांत गेल्या-पासूनच सुरू होतो. गुलाम राष्ट्र हें सदैव युद्धमान् असतें आणि म्हणूनच भारत हा १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत युद्धमान् होता. हें युद्ध अनेक लोकांनीं वेगवेगळ्या पद्धतींनें लढविलें. त्या सर्वांचा सामूहिक परिणाम म्हणून भारत स्वतंत्र झाला. स्वदेशाच्या दास्यमुक्तीसाठीं जे लढले, त्यांच्या मार्गांत भिन्नता असली तरी सारे अेकाच देवतेचे भक्त होते. श्रीरामचंद्रांना पूल बांधून देण्यासाठीं दोन वाळूचे कण टाकणारी खार जशी पावन ठरली, त्याचप्रमाणें या प्रचंड व प्रदीर्घ युद्धांत जे जे लढले ते सारेच धन्य होत ! त्यांत निष्ठेच्या दृष्टीनें तरतम भाव पाळणें व स्वातंत्र्ययुद्धाचा अितिहास पक्षांघतेनें जनतेपुढें मांडणें हा राष्ट्रद्रोह आहे. ती कृतघ्नता आहे. १९२० सालानंतर भारताचा स्वातंत्र्यसंग्राम सुरू झाला असें म्हणणारे लोक याच कोटींतील आहेत असें मानावें लागेल. पण जो सुबुद्ध व सत्प्रवृत्त आहे, त्याला मात्र सर्वांचें ऋण मान्य केल्याविना राहावणार नाहीं.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचें अैतिहासिक दृष्टीनें समीक्षण केलें, तर आपणाला असें आढळून येअील कीं, अखेरपर्यंत तीन प्रवाह त्यांत आढळून येत होते. ते आलटूनपालटून अुफाळून येत; तर कधीं त्यांतील अेकादा लुप्त झाल्यासारखाहि वाटे. पण त्यांतला कोणताहि पूर्णपणें नष्ट झाला नाहीं. त्या तीन प्रवाहांतील पहिला प्रवाह अैतिहासिक कालक्रमानुसार

सशस्त्र क्रांतिवाद्यांचा, दुसरा घटनात्मक व शांततामय मार्गांनीं राज्यसुधारणा घडवून आणणाऱ्यांचा व तिसरा सामुदायिक अहिंसक क्रांतीचा. या सर्व मार्गांचा अवलंब ज्या ज्या वेळीं करण्यांत आला, त्या त्या वेळीं राजकीय परिस्थिति वेगळी होती. अरण्यांत शिकार मारतांना जशा युक्त्या-प्रयुक्त्या योजाव्या लागतात, तसेंच भारतांत करावें लागे. ब्रिटिशांची नीतिहि मोटी विलक्षण होती. त्यांनीं ज्या सुधारणा भारताला दिल्या, त्या देण्यापूर्वी किंवा क्वचित् दिल्यानंतरहि ते दडपशाहीचा वरवंटा देशांत फिरवून दहशत निर्माण करीत. कधीं लोकमताला आपण भीत आहोंत असें दाखवून न्यायबुद्धीचें प्रदर्शन करावयाचें; तर कधीं निर्लज्ज दडपशाही करीत राहावयाचें, असें त्यांचें धोरण होतें. नोकरशाहीच्या मगरामिठींत त्यांनीं हें राष्ट्र कचकचून बांधून ठेवलें होतें. त्यामुळें वेगवेगळे लढे भारतांत द्यावे लागले. अर्थात् स्वातंत्र्याच्या युद्धाचें समग्र विवेचन येथें करावयाचें नसल्यामुळें येथें फक्त अवढेंच म्हणावयाचें आहे कीं, भारतांत झालेल्या स्वातंत्र्य-प्रयत्नांतील विविधतेमागें त्या वेळीं असलेली राजकीय परिस्थिति कारणीभूत होती. त्या सर्वांचें मूल्यमापन अेकाच दंडकानें करून चालणार नाहीं. कारण देश राजकीय दृष्ट्या जागृत झाल्यानंतर पूर्वीच्या बऱ्याच गोष्टी अनावश्यक किंवा माथेफिरूपणाच्या वाटूं लागतात. भारतांतील सशस्त्र क्रांतिवादी व दहशतवादी यांच्यावर हाच अन्याय झालेला आहे. त्यांना आपल्या मार्गाच्या यशाच्या मर्यादा माहीत होत्या, तरीहि १९४५ पर्यंत वेगवेगळे सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न होत राहिले. ती कल्पना येथें गांधीजींचें तत्त्वज्ञान प्रस्तुत होअूनहि नाहींशी होअूं शकली नाहीं, याचें कारणहि हेंच आहे. वैयक्तिक दहशतवादापासून तों १९४२ च्या सशस्त्र अुठावणीपर्यंत किंवा सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सैन्याच्या भव्य प्रयत्नापर्यंत तिचा विकासच होत गेला आणि भारत जर लवकर स्वतंत्र झाला नसता, तर कदाचित् ही कल्पना बद्धमूल होअूनहि अधिक जोराचे भव्य प्रयत्न येथें झाले असते.

तो मोहनिद्रेचा काळ

१८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध व महाराणीचा जाहीरनामा या दोन घटनांनंतर भारतांत अेक वेगळ्या प्रकारचें राजकीय वातावरण होतें. देशांतील

जो बुद्धिमान् वर्ग होता, त्याच्यांत राजकीय जागृति होती; पण तिचें स्वरूप वेगळें होतें. अिंग्लंडच्या साहचर्यानें आम्हांला नवे विचार मिळत होते. राज्यपद्धतीचें आधुनिक स्वरूप आमच्या दृष्टीस पडत होतें. पार्लमेंटरी लोकशाही हें आमच्या बुद्धिमान् नेत्यांचें फार मोठें आकर्षण होतें. अिंग्रजी राजवटींत जें निर्बंधराज्य (Rule of Law) आमच्या देशांत निर्माण झालें, त्यामुळें सर्व लोक खूष झाले होते. बेबंदशाही जाअून सुसूत्र नोकरशाही आल्यामुळें लोकांना हायसें वाटत होतें. अिंग्रज सरकारनें नव्या सुधारणा आणल्या, त्यामुळें भारताच्या राष्ट्रीय जीवनांत अधिक जवळीक निर्माण झाली. अिंग्रजी शिक्षणामुळें त्यांचे राजकीय, सामाजिक विचार आमच्या बुद्धिमंतांनीं आत्मसात् केले. १९३० नंतर भारतांत जसे कम्युनिस्ट विचार आल्यावर रशियांत स्वर्ग आहे असें येथील बुद्धिमंतांना वाटूं लागलें, तसेंच त्या वेळीं झालें होतें. त्यांत अप्रामाणिकपणा नव्हता; पण अिंग्रजी नीतीचें अंतरंग त्यांनीं ओळखलें नव्हतें. अिंग्रजी राज्यांत ज्या ज्या सुधारणा झाल्या, त्यांमागें भारतीय जनतेचें हित हा प्रधान हेतु कधींच नव्हता. अिंग्लंडनें वसाहती-अर्थशास्त्र स्वीकारून भारताची आर्थिक लूट करावयाची व त्याबरोबरच्च नोकरशाहीच्या पकडींत त्याला आवळून ठेवावयाचें असें हें धोरण होतें.

पण ब्रिटिशांनीं बाह्यात्कारी देखावा मात्र खूप केला होता. सारे बुद्धिमान् लोक अिंग्लंडच्या न्यायप्रेमावर व लोकशाही राजवटींवर विश्वास ठेवून भारतांतहि तें तसेंच राज्य आपण होअून आणतील असा अनेक सुधारक विश्वास बाळगीत. कुशल शस्त्रवैद्यानें मूर्च्छक द्रव्याच्या मोहकुपीचा (क्लोरोफॉर्म) अुपयोग करून शांतपणें आपली शस्त्रक्रिया अुरकावी, तसें अिंग्लंडनें चालविलें होतें. अेका मोहनिद्रेंत सारें राष्ट्र सांपडलें होतें. पेशवाअीच्या अखेरच्या कारकीर्दीपेक्षां ही राजवट न्यायाची, सुखाची असें वाटून सामान्य जनता प्रतिकारशून्य झाली होती. अितकेंच नव्हे तर अव्वल अिंग्रजी राजवटींतील या भपक्यामुळें आपलें राष्ट्र वाईट, मागासलेलें, रानटी अशी आत्मनिंदा करण्याची प्रवृत्ति वाढीस लागली.

नि. ३१. ८८

अर्थात् ही मोहनिद्रा फार काळ टिकणें म्हणजे आत्मघात आहे असें वाटून देशजागृतीसाठीं आत्मार्पण करणारे अनेक लोक याच वेळीं पुढें आले. ही प्रतिक्रिया दोन स्वरूपांत महाराष्ट्रांत प्रकटली. पहिलें स्वरूप म्हणजे आपली परंपरा फार मोठी आहे हें सांगून जनतेला जागृत करणारे व दुसरे आपली परंपरा कशीहि असली तरी सद्यःस्थिति वाईट आहे म्हणून साहेबाच्या साहाय्यानें आपली सुधारणा करा असें म्हणणारे हें दुसऱ्या प्रतिक्रियेचें स्वरूप होतें. चिपळूणकर हे पहिल्या पंथाचे प्रभावी पुरस्कर्ते म्हणतां येतील. त्यांनीं स्वसंस्कृतीच्या पराकाष्ठेच्या अभिमानानें अिंग्रजी सत्तेवर व तिची स्तुति करणाऱ्यांवर सडकून टीका केली. ते स्पष्टपणें म्हणत—

> " सारें सत्य काय तें अेका बुकांत सांटविलें आहे व सारे मनुष्यजातीचे गुण जगन्नियंत्यानें अेका राष्ट्रांत कोंडून धरले आहेत हें मत आम्हांस बिलकूल पसंत नसून त्यासारखें मूर्खपणाचें व अधमपणाचें मत कोणतेंहि नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे. " (निबंधमाला, पृष्ठ ६५९).

अर्थात् ही प्रतिक्रिया अगदीं स्वाभाविक होती. कारण आत्मविस्मृत राष्ट्राला खडबडून जागें करण्याचा हाच अेक सोपा व सामान्य माणसाला समजेल असा मार्ग होता. या अुलट पाश्चात्त्य संस्कृतीनें मोहून गेलेल्या व भारताची सर्वांगीण सुधारणा व्हावी म्हणून तळमळणाऱ्या लोकहितवादींनीं असें सांगावयास प्रारंभ केला कीं हिंदु लोकांत मूर्खपणा वाढला आणि तो दूर करण्यासाठीं अीश्वरानें त्यांना साता समुद्रावरून अिकडे पाठविलें आहे. त्यांनीं लिहिलें आहे, " अशा अघटित योजना ज्या होणें त्या माणसांच्या कृतीनें होत नाहींत. अीश्वर-सत्तेनें होतात. जेव्हां हिंदु लोकांचा मूर्खपणा जाअील, तेव्हां अीश्वर अिंग्रजांस या देशांतून जाण्याची आज्ञा करील." हिंदु लोक मूर्ख होते, भाअूबंदकीत वीरश्री दाखविणारे होते, म्हणून अिंग्रजी राज्य आलें, या लोकहितवादींच्या म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति नव्हती. परंतु

त्यांतील ओशप्रेषिततेची जी कल्पना होती ती विवाद्य होती. अर्थात् अिंग्रजांच्या राजनीतीचें स्वरूप त्या वेळीं स्पष्ट झालेलें नसल्यामुळें लोकहितवादींना असें वाटणें स्वाभाविक होतें.

या दोन अेकांगी पंथांप्रमाणेंच त्यांचा समन्वय करूं पाहणाऱ्या न्या. रानड्यांचाहि विचार केला पाहिजे. कारण त्यांच्या राजकीय, सामाजिक मतांतूनच पुढें भारतांतील घटनात्मक चळवळीचा प्रवाह सुरू झाला. रानडे हे सुधारक होते, देशस्थितीचें अभ्यासपूर्ण विश्लेषण त्यांनीं केलें होतें, यांत शंकाच नाहीं. पण अिंग्रजी लोकांच्या घटनाविषयक नीतीवर (constitutional morality) त्यांचा विलक्षण विश्वास होता. त्यांच्या राजकीय पुरोगामित्वाबद्दल त्यांना विशेष खात्री वाटे आणि हें राजकीय पुरोगामित्व भारतालाहि आज ना अुद्यां ते देतील, असेंहि त्यांना वाटे. त्यामुळें ब्रिटिशांविरुद्ध असंतोष भडकविणें, आदि कल्पना त्यांना अमान्य होत्या. त्याबरोबरच रानड्यांना भारताच्या परंपरेचा अभिमान विलक्षण होता. तो न सोडतां ते सुधारणा करूं अिच्छीत. सुधारणा हवी असें अेकीकडे बुद्धि सांगे आणि मन तर परंपरेंत गुंतून पडलेलें. अशा स्थितींत रानड्यांचें राजकारण व समाजकारण चाले. पण रानड्यांचें अत्यंत महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांनीं भारताच्या आर्थिक दुरवस्थेचें अर्थशास्त्रीय पृथक्करण करून तें समाजापुढें मांडलें. किंबहुना भारताच्या राजकीय समस्यांकडे अत्यंत शास्त्रीय दृष्टीनें व मूलभूत दृष्टीनें पाहण्याची व त्यानुसार मतप्रदर्शन करण्याची परंपरा रानड्यांनींच सुरू केली, असें म्हणावयास हरकत नाहीं. नेमस्त संप्रदायाचें पुढें हें वैशिष्ट्यच ठरलें.

अर्थात् रानड्यांनीं जी राजकीय मतप्रणालि मांडली ती समन्वय घालणारी होती असें म्हणण्यापेक्षां ती तडजोडवादी होती असें म्हटलें तर अधिक बरोबर होअील. कारण नेमस्तांचें राजकारण त्याच्यावरच आधारलेलें होतें. "राजकर्त्यांचा केवळ परकीय म्हणून द्वेष न करणें, प्रतिपक्षीयांच्या हेतूविषयीं कुत्सित शंका न घेणें आणि स्वमताचा आग्रह विकोपाला न नेतां जरूर तेव्हां तडजोड करणें" हीं नेमस्त वृत्तीचीं लक्षणें समजलीं जात. त्यामुळें

रानड्यांनीं समन्वय घालून राष्ट्रवादी चळवळीला नवें अधिष्ठान प्राप्त करून दिलें किंवा ती 'चळवळ' म्हणून चालविली असें वाटत नाहीं. रानड्यांचा असा विश्वास होता कीं अेवढा प्रचंड समाज कायमचा पाशवी सामर्थ्यांच्या बळावर गुलामींत डांबला जाअूं शकणार नाहीं. पण स्वायत्तता वा सत्तासंक्रमण मात्र अिंग्रजांच्याच संमतीनें झालें पाहिजे असेंहि त्यांना वाटे. त्यांनीं आपल्या अितिहासाच्या ग्रंथांत अिंग्रजी राज्याची आवश्यकता आपल्याला कां वाटते, याचें विवरण केलें आहे. ते म्हणतात—

"The aegis of British protection is an acknowledged necessity; and none feels its need with greater emphasis than the leaders of the native thought. But it is not as the representative of the brute force, but of the order and genius of equal law, that we bow down to the supreme necessity."

(ब्रिटिशांचें संरक्षक अस्तित्व ही अेक सर्वमान्य आवश्यकता आहे आणि त्याची निकड अेतद्देशीय विचारवंतांअितकी कोणालाच वाटणारी नाहीं. पण तें अस्तित्व आम्हांला पाशवी सामर्थ्याच्या बळावर नको आहे; तर नैर्बंधिक समानतेच्या आश्वासनावरच आम्ही ती नितांत गरज मान्य करीत आहोंत.)

असंतोषाचा प्रसार

अिंग्रजी राजवटीच्या या त्रिविध सामाजिक प्रक्रियेपेक्षां वेगळी अशी कट्टर राष्ट्रवादी प्रतिक्रिया त्याच वेळीं भारतांत होअूं लागली होती. ब्रिटिशांच्या राजनीतीचें स्वरूप ओळखून त्यासंबंधीं अुपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. लढाअू सामाजिक आंदोलनाचें अधिष्ठान निर्माण करण्याचा तो भव्य प्रयत्न होता. या प्रयत्नाचे पुरस्कर्ते लोकमान्य टिळक होते. सुधारणा ही राज्यकर्त्यांच्या कृपेमुळें झाली नाहीं, तर समाजाला लढावें लागेल असा अिषारा देण्यास टिळकांनीं प्रारंभ केला. ब्रिटिशांनीं

या देशांत जी नोकरशाही निर्माण केली, तीच पारतंत्र्याचे पाश करकचून आवळत आहे हें टिळकांनीं ओळखलें व त्या नोकरशाहीवर आघात करण्याचे प्रयत्न टिळकांनीं सुरू केले. ही खिळखिळी करण्यासाठीं त्यांनीं अनेक मार्गांचा अवलंब करून तिचें स्वरूप अुघडेंनागडें केलें. टिळकांनीं 'कॉन्स्टिटयूशनल' (घटनात्मक) असंतोष निर्माण करण्याचा जनतेचा लोकशाहींतील अधिकार बिनदिक्कत बजावण्यास सुरुवास केली. नेमस्तांना ते विचारीत कीं "सनदशीर चळवळ करावयाचें म्हटलें तर हिंदुस्थानांत अिंग्लंडप्रमाणें अेकादी 'सनद' आहे काय?"

टिळकांच्या लिखाणांत व भाषणांत याच सर्व गोष्टींचें बिनतोड व निर्भीड प्रतिपादन असे. १८ सप्टेंबर १९०६ च्या 'केसरी'त टिळकांनीं आपल्या चळवळीचें तत्त्वज्ञान सांगतांना लिहिलें होतें—

"भिकेची हंडी कधींहि शिक्क्यावर चढत नाहीं हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. हें राजकारस्थान आहे; तत्त्वज्ञान नव्हे. राज्यकारभाराचें गाडें अडून पडलें असें आपण राज्यकर्त्यांच्या अनुभवास आणून दिलें पाहिजे; तरच आपणांस कांहींतरी हक्क मिळतील."

मोर्लेसाहेबांच्या आशेवर जगणाऱ्या नेमस्तांना अुद्देशून टिळकांनीं अेकदां लिहिलें—

"बाव्या काय बोलणार याबद्दल लोकांना अुत्कंठा होती, ती अेकदां लवकर बोलून मोर्लेसाहेबांनीं पुरी केली! बरें झालें! मोर्लेसाहेबांस मूर्ख म्हणण्यापेक्षां त्याच्यावर विसंबून बसणाऱ्या असल्या मंडळीसच पहिल्यानें मूर्खांच्या कोटींत काढलें पाहिजे...मोर्लेसाहेब म्हणजे कांहीं तुकाराम नव्हत किंवा ग्लॅडस्टन नव्हत. आमची अुन्नति विलायतवाल्यास फटकारा बसणाऱ्या अुद्योगांनींच आम्हांला केली पाहिजे. कमळांत सांपडलेला भुंगा आतां रात्र संपेल, आतां सुप्रभात होअील व नंतर कमळाचीं पानें अुघडतील आणि माझी

सुटका होअील असें मनोराज्य करीत असतो; पण अशा भ्रमराप्रमाणें आपण आशेस गुंतून अुपयोगी नाहीं. अंगांत शक्ति असेल तर आपणांस बद्ध करणाऱ्या पाकळ्यांना पोंखरून बाहेर पडलें पाहिजे.''

ही नोकरशाही पोंखरण्यासाठीं टिळकांनीं जनतेपुढें बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतुःसूत्री ठेवून जनतेला सांगितलें—

''सध्यांच्या स्थितीसंबंधानें खेड्यापाड्यांतून चर्चा झाली पाहिजे. 'तोंड धरून बुक्क्याचा मार आम्हीं सहन करणार नाहीं' असें ज्या दिवशीं स्पष्ट सांगाल त्या दिवशीं तरणोपाय आहे. कोणी विचारतील कीं मग आम्हीं बंड करावयाचें कीं काय? बंडहि करावयाला नको व स्वस्थहि बसावयाला नको. हें माझें यास अुत्तर आहे. मुनसफ कोण असतात? मामलेदार कोण असतात! सगळे तुमचेच लोक! सगळें राज्य तुमच्याच हातांत आहे. पण तुम्ही ओळखीत नाहीं... तुमच्या कर्तबगारीवर जें राज्य चाललें आहे तें कोठें तरी अडलेंच पाहिजे. सरकारावर रुसून बसा. रुसणें हें बेकायदेशीर नाहीं असें मी तुम्हांला स्पष्ट सांगतों.''

अशा रीतीनें लोकमान्य जनतेची प्रतिकारशक्ति जागृत करीत होते. नोकरशाहीला वठणीवर आणणारीं शस्त्रें परजीत होते. जनतेनें त्याग केला पाहिजे असें सांगत होते. असंतोषाच्या ठिणग्या अुडविणारे टिळक हळू-हळू अेक लढाअू सामाजिक आंदोलन अुभारूं पहात होते असें यावरून दिसून येअील. याच कारणामुळें टिळकांचा गोखले आदि नेमस्तांशीं वाद चाले. टिळक मायावी सुधारणांची टोणग्यांचे आचळ म्हणून संभावना करीत. गोड बोलून ब्रिटिशांना आपलेसे करूं पहाणाऱ्या गोखल्यांना ते सांगत कीं ''राघू जितका अधिक बोलतो तितका तो अधिक पिंजऱ्यांत पडतो हें लक्षांत ठेवा.''

क्रांतिवादी विचारसरणीचा प्रसार

टिळकांनीं निर्माण केलेल्या सामाजिक असंतोषाच्या पार्श्वभूमीवरून त्यांच्याच काळीं १८९८ नंतर महाराष्ट्रांत जी अग्र क्रांतिवादी विचार-सरणी पसरत चालली त्याचें रहस्य कळून येईल. टिळकांना सर्व समाजाला बरोबर घेऊन जावयाचें असल्यानें त्यांनीं असंतोषाचा प्रसार व स्फोट संयमानें केला. पण देशप्रेमानें वेडीं झालेलीं आणि गुलामीच्या अुद्वेगानें संतप्त झालेलीं मनें म्हणजे अविश्वसनीय बाँब असतात. टिळकांना 'टाइम बाँब' हवा होता. तरुण त्यांच्यापुढें धांवूं अिच्छीत होते. तरुणांच्या या स्वातंत्र्याकांक्षा प्रामुख्यानें शिवरामपंत परांजपे यांनीं चेतविल्या. टिळकां-पेक्षां शिवरामपंतांच्या लेखनानें, वक्तृत्वानें तरुणांना स्फूर्ति येअी. परांजप्यांचे त्या वेळचे लेख हे सशस्त्र क्रांतिवादास प्रच्छन्न पाठिंबा देणारे होते, हें आतां त्यांचे लेख वाचल्यावर कळतेंच. सावरकरांनीं आपली स्फूर्ति शिवरामपंत आणि त्यांचे लेख यांपासून घेतली यावरूनच त्यांची तरुणां-तील लोकप्रियता कळून येण्यासारखी आहे. पुण्याला विलायती कपड्यांची जी होळी झाली होती, त्या वेळीं टिळकांपेक्षां तरुणांची परांजप्यांवरच अधिक भिस्त होती असें टिळक-चरित्रांत न. चिं. केळकरांनीं म्हटलें आहे.

शिवरामपंत हें स्वातंत्र्याचे महाकवि होते. त्यांनीं आपल्या वाङ्मयांतून तरुणांच्या मनांत गुलामीची चीड निर्माण करून तेथें स्वातंत्र्याची तळमळ निर्माण केली. परदेशांतील सशस्त्र क्रांतीचीं किंवा मराठ्यांच्या लढायांचीं वर्णनें करून सशस्त्र क्रांतीविना स्वातंत्र्यप्राप्ति अशक्य आहे असें ते प्रचारीत होते.

हा सशस्त्र क्रांतिवाद ही अेक गुलामी जीवनांतील अगदीं स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. भारतांतील १८५७ च्या युद्धापासून स्फूर्ति घेअून हेंच तंत्र अवलंबांत आणावें असें तरुणांना वाटणें स्वाभाविक होतें. अुग्रबलाची अुपासना ही त्यांतून निर्माण होते. ज्या वेळीं अन्याय हाच धर्म झालेला असतो, प्रतिकाराचे सारे मार्ग खुंटलेले असतात, सत्याची विटंबना होत असते, त्या वेळीं अंतरंगांतील अुर्मीनें स्वतःचें जीवन पेटवून देणारे पुरुष

वेळोवेळीं या जगांत निर्माण झालेले आहेत. भारतहि त्याला अपवाद नव्हता. क्रांतिवीर वासुदेव बळवंतांची जीवनकथा हेंच सिद्ध करीत होती. त्यांनीं आपल्या आठवणींत अंतःकरणांतील जी तळमळ प्रकट केली आहे, ती वाचली म्हणजे सशस्त्र क्रांतिवादाचा आविष्कार कशांतून झाला आहे हें कळेल. तो वीरपुरुष न्यायालयांत आपलें हृदय अुघडें करून सांगतांना म्हणाला—

> " ज्या भूमीचे पोटीं आपण जन्मलों तिच्याच पोटीं हीं सारीं लेंकरें झालीं. त्यांनीं अन्नान्न करीत अुपाशीं मरावें, हा देश अमेरिकेप्रमाणें ब्रिटिशांची वसाहत व्हावा आणि आपण कुत्र्याप्रमाणें स्वतःचें पोट भरीत राहावें हें माझ्याच्यानें पाहवलें नाहीं ! आणि म्हणून मी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारलें."

लहानसें बंड अुभारून लढाअू टोळया अुभारतां येतील व मग आपलें राज्य हिसकावून घेतां येअील या आशेनें वासुदेव बळवंतांनीं आयुष्यभर प्रयत्न केले. हा त्यांचा प्रयत्न व त्यानंतर रँडचा खून करणाऱ्या रानडे-चाफेकरांचें बलिदान यांतून सावरकरांनीं व त्या वेळच्या तरुणांनीं आपली वीर्यशाली जीवनाची स्फूर्ति घेतली होती. त्यांनीं ठेवलेलें सूत्र या तडफेच्या तरुणांनीं अुचलावयाचें ठरविलें आणि त्यांतूनच 'अभिनव भारत' या संस्थेचा जन्म झाला.

तौलनिक अभ्यास

सावरकरांनीं आपल्या क्रांतिमार्गाचें समर्थन आत्मचरित्रांत फार चांगल्या रीतीनें केलें आहे. कोणत्या वैचारिक आंदोलनानंतर हा कठोर निश्चय आपण केला* यासंबंधीं विवरण करतांना ते म्हणतात—

> " जगांतील ज्ञात अितिहास चाळून चाळून आम्हीं थकलों ! देवासुरांच्या, रावणाच्या, इंद्रवृत्रासुरांच्या वैदिकादि कथानकांपासून तों प्राचीन अिराण, ग्रीस, रोम, अरब, अमेरिका, अिंग्लंड, चीन,

---

* आत्मचरित्र पृष्ठ २२५.

जपान, स्पेनमूर, तुर्क, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली अशा अगदीं ताज्यांतील ताज्या अर्वाचीन इतिहासापर्यंत सर्व राज्य-क्रांतीच्या व राष्ट्रस्वातंत्र्याच्या इतिहासापर्यंत मानवी राजकारणाच्या बहुतेक सर्व इतिहासग्रंथांचीं मीं पारायणें केलीं. हिंदुस्थानच्या कांहीं प्राचीन आणि रजपूत, बुंदेल, शीख, महाराष्ट्रप्रभृती अर्वाचीन इतिहासाचें पान नि पान चाळून पाहिलें; पण हाच अेक निष्कर्ष निघे कीं "धर्मासाठीं मरावें" अेवढेंच म्हणून भागत नाहीं. "मरोनी आततायी मारावे। मारितां मारितां घ्यावें। राज्य आपुलें." यास्तव स्वातंत्र्यप्राप्तीचें भयंकर पण अपरिहार्य साधन —यशस्वी राजकारणापर्यंतचें अनन्य साधन—म्हणजे गोविंदकवि म्हणाले तसें सशस्त्र "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना" हा आमचा ठाम सिद्धान्त झाला. तामसी आंधळेपणानें वा अेककल्ली अुतावळेपणानें नव्हे; तर किंचित् पुढेंच रचलेल्या माझ्या या तत्कालीन श्लोकांतच स्पष्ट होत आहे तसें—

कीं घेतलें व्रत न हें अम्हीं अंधतेनें।
लब्ध-प्रकाश-इतिहास—निसर्गमानें।

इतिहास व निसर्ग म्हणजे मनुष्यस्वभाव आणि सृष्टिक्रमानें म्हणजे तर्कशास्त्रानें, अर्थात्च ऐतिहासिक, स्वाभाविक आणि युक्तायुक्त दृष्टीनें विचार करून पूर्ण निश्चिति पटल्यामुळेंच या दाहक पण अपरिहार्य दिव्यांत आम्हीं आपले प्राण अर्पिण्यास सिद्ध झालों!"

अटळ शस्त्रक्रिया

या विवेचनावरून सशस्त्र क्रांतिवादाचा अुगम कळणें शक्य आहे. या क्रांतिवादाला विरोध दोन प्रकारचा त्या वेळीं होता. अेक तत्त्वतः आणि दुसरा व्यवहाराच्या दृष्टीनें. त्या वेळचे जे नेमस्त होते, त्यांचा टिळकांच्या जहाल धोरणालाच विरोध होता; मग सावरकरांच्या अुग्र प्रतिकाराला असेल यांत आश्चर्य नाहीं! १९२० नंतर गांधींनीं जी अहिंसावादी चळवळ सुरू

केली, त्यानंतर त्यांनीं जो विरोध केला तो अगदीं मूलभूत स्वरूपाचा होता. साधारणपणें सशस्त्र क्रांतिवादाला विरोध करणाऱ्यांचे हे तीन प्रकार होते. सावरकरांनीं आपल्या क्रांतिवादी भूमिकेचें स्पष्टीकरण करतानां या तीनहि आक्षेपांना थोड्याबहुत प्रमाणांत उत्तर दिलें आहे. ते म्हणतात—

"क्रांतिवादाचें तत्त्व हा केवळ भावनेचा उन्माद नव्हता. हौसेनें नव्हे, तर निरुपाय म्हणून सशस्त्र युद्धाचा अंगिकार करणें आवश्यक होतें. तीस कोटि लोकांच्या या महान् राष्ट्रास मृत्यूच्या तावडींतून वांचविण्यासाठीं, हा राष्ट्रीय पारतंत्र्याचा महारोग नाहींसा करण्यासाठीं, अगदीं अपरिहार्य म्हणून स्वतःवर नि राष्ट्रावर ही अशी शस्त्रक्रिया करणें आणि त्या परकीय रोगजंतूंस आणि रोगग्रंथीस कापून टाकणें हें नुसतें क्षम्य, आपद्धर्मीय नव्हे; तर नीतिदृष्ट्याहि अत्यंत पवित्र होय. अपरिमित हिंसा टाळण्यासाठीं, दुष्टांची वीण थांबविणारी किंचित् हिंसाच खरी अहिंसा होय, अशी आमची निश्चिती झाली होती. म्हणून सशस्त्र क्रांतीचा बेलभंडार आम्हीं उचलला. पण तरीहि हें विसरतां कामा नये कीं जर कोण्या जादुगारानें 'छूमंतर फू'चा मंत्र म्हणून हिंदुस्थान स्वतंत्र करून आपण होऊन निघून जाण्यास अिंग्रजांचीं मनें वळविलीं असतीं, तर आम्हांस कोणाहूनहि अधिक आनंदच झाला असता. सोप्या देशभक्तीचा डौल आणि स्वतःच्या जीवास धोक्यांत न घालतां मिळणारें मोठेपण आम्हांसहि संपादतां आलें असतें. ती नेमस्तांची, ती राष्ट्रीयांची पिढीच होती.....शांततेच्या वा निःशस्त्र प्रतिकाराच्या अितर कोणत्याहि उपायांनीं जर स्वातंत्र्य मिळूं शकेल, तर तें आम्हांस पाहिजेच होतें. पण तो 'जर' अगदीं अशक्य होय, अशी आमची भयभीत धारणा होती. तरीदेखील या सर्व निःशस्त्र मार्गांची त्या शेवटच्या सशस्त्र क्रांतीच्या दिव्यास्तव अवश्य असणारी सिद्धता व क्षमता राष्ट्रांत उत्पादिण्याच्या कार्यीं अत्यंत आवश्यकता आहेच आहे!"

क्रांतिवाद्यांची मनःस्थिति

सशस्त्र क्रांति ही राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं अवश्य असलेली अटळ शस्त्रक्रिया आहे हें क्रांतिकारकांचें म्हणणें होतें. त्यासाठीं त्यांनीं 'रणावीण स्वातंत्र्य

कोणा मिळालें ?' हा प्रबल प्रश्न, हा साहसी सिद्धान्त त्यांनीं प्रकटपणें राष्ट्रापुढें टाकला. कारण त्यांची क्रांतीची पहिली पायरी मनःपरिवर्तनाची होती. त्यासाठीं सावरकर व त्यांचे सहकारी यांनीं राष्ट्राच्या मानसिक क्रांतीचे अलोट प्रयत्न केले. ते कसे केले आणि त्यांना यश किती आलें हें पुढें येणारच आहे. पण अेक गोष्ट या ठिकाणीं मान्य केली पाहिजे कीं, त्या काळांत अत्यंत निर्भयपणें संपूर्ण स्वातंत्र्याचा जयजयकार जर कोणी केला असेल तर तो या क्रांतिकारकांनींच. अेक प्रबल भावना त्यांनीं राष्ट्रांत चेतविली. ब्रिटिशांनीं केलेल्या दडपशाहीमुळें व त्यांच्यावरील आमच्या निष्ठेमुळें आम्हीं सशस्त्र काय, पण निःशस्त्र क्रांतीचेहि पुरस्कर्ते नव्हतों. स्वतः टिळकांनाहि अुघडपणें क्रांतीची घोषणा करतां आली नाहीं. ती पुढें गांधींच्या काळांतच झाली. नेमस्तांनीं अेकीकडे आपली ब्रिटिशांवरची निष्ठा प्रकट करून देशांत क्रांतीच्या दृष्टीनें अुदासीन वातावरण निर्माण केलें खरें; पण त्यांचा विरोध हा वेगळ्या स्वरूपाचा होता. सावरकर ना. गोपाळराव गोखले यांना लंडनमध्यें भेटले होते, त्या वेळीं अखेरच्या त्या परिसंवादांत गोखल्यांनीं सावरकरांना प्रश्न केला—" सावरकर, तुमचा गॅरिबाल्डी कुठें आहे ? " सावरकरांनीं त्या वेळीं गोखल्यांना स्पष्टपणें अुत्तर दिलें—" मॅझिनी प्रथम येतो आणि नंतर गॅरिबाल्डी येतो. " सावरकरांच्या या अुत्तरांतच त्या वेळच्या शस्त्रवाद्यांची भूमिका सांगितलेली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. सावरकर आणि त्यांचे सहकारी किंवा खुदिराम बोस आणि तत्कालीन बंगाली क्रांतिकारक यांच्या चळवळींतून भारतांत असंतोष कसा धगधगत आहे हें सिद्ध होत होतें. कर्झनची कारकीर्द ही जगांतील अत्यंत दुष्ट राजवटींतील पहिल्या प्रतीची दुष्ट कारकीर्द होती. कर्झननें बंगालची फाळणी लादली याचें कारण त्याला भारतीयांत फूट पाडण्याचा प्रयोग येथें करून पहावयाचा होता हेंच होतें; पण त्याच्या या कृत्याला अुत्तर मिळालें तें बाँबनें ! त्या वेळच्या परिस्थितीचें वर्णन ' गंगा पेटली होती ' अशा शब्दांत केलें जात होतें. टिळकांनीं महाराष्ट्रांतहि वंगभंगाच्या चळवळीची लाट अुसळवून दिली. त्या वेळच्या स्फोटक परिस्थितीचें निरीक्षण केल्यानंतर त्या काळांत सरकारनें केलेली दडपशाही पाहिल्यानंतर त्या काळीं तरुणांनीं पिस्तुलें कां

रोखलीं हें कळेल. दडपशाही ही अशा अत्याचारांची जननी असते. मॅझिनीच्या चरित्रांत सावरकरांनीं 'खंजीराची अुपपत्ति' हें प्रकरण घातलें आहे. त्या प्रकरणांतच भारतीय क्रांतिकारकांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचें चित्रण आपल्याला दिसेल. किंबहुना मॅझिनीचें हें सगळें पुस्तक वाचतांना सावरकर आपल्या क्रांतिवादाचें समर्थन करीत आहेत असें सारखें वाटतें, अशाच पद्धतीनें तें लिहिलें गेलें.

सशस्त्र क्रांतिवादाकडे, गुप्त कटांकडे माणसें केव्हां वळतात हें सांगतांना मॅझिनी म्हणतो—

*"ज्या स्थितीमध्यें देशभक्ति हा अपराध होतो, त्या देशभक्तीच्या अपराधासाठीं किंवा अपराधाच्या नुसत्या संशयासाठींहि देशभक्तांच्या आयुष्याची वा मालमत्तेची राखरांगोळी केली जाते; बेफाम, अखंड व अत्यंत राक्षसी जुल्मूम विचारस्वातंत्र्याला नष्ट करतो; परकी अंमलाच्या अुद्दामपणास जेथें अंत नाहींसा होतो, अत्यंत त्रासदायक अशा पोलिसच्या कायद्यानें व निर्लज्ज हेरांच्या सुळसुळाटानें संतापांत प्रत्यहीं भर पडते व परोपरीं होणाऱ्या अपमानानें द्वेषाची परमावधि होते, त्या स्थितीमध्यें गुप्त कटांवाचून संरक्षणाचा दुसरा मार्ग नसतो. जेव्हां अेकादी व्यक्ति स्वतःच्याच स्फूर्तीनें असलीं कृत्यें करते तेव्हां, त्या स्फूर्तीचें मूळ वर दिलेल्या परिस्थितींतच शोधलें पाहिजे. राष्ट्राच्या आयुष्यांत व अितिहासांत कांहीं प्रसंग अितके अपवादात्मक असतात कीं, त्या वेळेला समाजाचे सामान्य नीतिसिद्धांत अपुरे असतात व म्हणून तशा समयीं परमेश्वराकडून व स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीकडून जी स्फूर्ति होअील, तीप्रमाणें प्रत्येकानें वागलें पाहिजे...जेव्हां जेव्हां अशिक्षित, अनाथ व दास्यत्रस्त लोकांची तक्रार अशा खंजिराचें भयंकर रूप धारण करते, तेव्हां तेव्हां ज्यांनीं मानवजातीला गुलामगिरींत ठेवलें, त्या नराधमांनीं त्या दोषाचें खापर आपल्याच माथ्यावर फोडलें पाहिजे."

सशस्त्र क्रांतिवाद्यांची मनःस्थिति अशाच प्रकारची होती. वासुदेव बळवंतांचें जें अुपलब्ध आत्मचरित्र आहे त्यांतहि हेंच तळमळणारें अंतःकरण

---

* जोसेफ मॅझिनी—**पृष्ठ २३१–४०.**

आपणाला दिसतें. हीच ऊर्मी, हाच आवेश सर्व क्रांतिकारकांच्या अंतःकरणांत होता. त्यांच्यामागें जगांतील अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे अितिहास हेंच सांगत अुभे होते कीं ज्याच्या योगानें शत्रूचा निःपात होअून स्वतंत्रता मिळते, तीं सर्व शस्त्रें वा साधनें योग्य आहेत. साधनांना स्वयंभू पावित्र्य वा शुचिता असूंच शकत नाहीं, कारण साध्य आणि साधनें हीं निगडित झालेलीं असतात. अेकाद्या पवित्र तत्त्वाच्या अभ्युदयासाठीं मात्र तें वापरलें पाहिजे. साध्य, साधन यांच्याबरोबरच साधकांचा विचार केला पाहिजे. साधकांच्या अंतिम हिताला बाध न आणणारें कोणतेंहि साधन हें योग्य आहे, हीच नीतीची क्रांतिकारकांची कल्पना होती आणि याच दृष्टीनें त्यांनीं साऱ्या राष्ट्रांत गुलामीचा नाश करण्यासाठीं सशस्त्र क्रांतिच करावी लागेल हा संदेश घुमविला !

भावनेची अुर्मी नव्हे !

मग हा क्रांतिवाद केवळ दडपशाहीच्या अतिरेकामुळें झालेला भावनेचा अुद्रेक होता काय, असा प्रश्न स्वाभाविकपणें अुपस्थित होतो. राजकीय व्यवहारवादाच्या दृष्टीनें हा प्रश्न बरोबर आहे आणि त्यांतूनच टिळकांसारख्यांचा विरोध निर्माण झाला होता. राजकारणांत बऱ्याच वेळेस अुतावीळ कृतीनें अनेक चळवळींना अपमृत्यु येतो. तसेंच या स्वातंत्र्यवादी चळवळीचें होअील अशी टिळकांना भीति वाटे, म्हणून टिळक या क्रांतिवादाचा तिरस्कार न करतां, त्यांना नेस्तनाबूद करण्याची भाषा न बोलतां, आपला व्यावहारिक विरोध फक्त दर्शवीत. पण टिळक स्वतः सावकाशीनें जनतेला बरोबर घेत, असंतोषाचे सुरुंग पेरीत, नोकरशाही खिळखिळी करण्यासाठीं झटत होते.

मग क्रांतिवाद्यांची भूमिका काय होती ? प्रथम अेक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं हा 'मारो काटो का पंथ' नव्हता. त्यामागें अेक विशाल देशव्यापी क्रांतीची कल्पना होती. वैयक्तिक दहशतवादानें स्वराज्य मिळेल, अशी खुळी कल्पना करून घेण्याइतके ते क्रांतिकारक निर्बुद्ध नव्हते. त्यांनीं घेतलेलें सतीचें वाण 'बुद्धयाची' होतें; तो केवळ भावनेचा उमाळा नव्हता.

तत्कालीन क्रांतीची कल्पना

सशस्त्र क्रांतीविना स्वातंत्र्य मिळणार नाहीं हें अेकदां निश्चित झालेलें असल्यामुळें क्रांतिकारकांपुढें तीन प्रश्न सामान्यतः अुभे होते. पहिला म्हणजे क्रांतीला अवश्य असणारें मनःपरिवर्तन, दुसरा तशा क्रांतीच्या शक्याशक्यतेचा विचार व तिसरा क्रांतीसाठीं अवश्य असणारी संघटना, शस्त्रनिर्मिति आणि अुठावणीची निश्चित योजना. या प्रत्येक कार्यामध्यें हिमालयाअेवढ्या अडचणी अुभ्या होत्या. देश प्रतिकूल होता, राजसत्ता डोळ्यांत तेल घालून दडपशाहीचें शस्त्र अुगारून बसलीच होती, आणि क्रांतिसाधनांचा तर पत्ताच नव्हता. अशा परिस्थितींत क्रांतीचा पुरस्कार करणें म्हणजे प्राणांची होळी करण्यासारखें होतें. सावरकरांनीं क्रांतीचें तत्त्वज्ञान किंवा क्रांतीचे मार्ग त्या काळच्या तरुणांपुढें ठेवण्यापूर्वी त्यांना जाणीव दिली कीं—

" जर आम्हीं अुभ्या राष्ट्रास सशस्त्र क्रांतियुद्धांत पाडूं तर त्या छळाच्या लक्षपटीनें अुग्रतर, बहुलतर, भयंकर छळांस आणि प्राणघातास, कत्तलीस, नादिरशाहीस, औरंगजेबीस आम्हांस नि आमच्या राष्ट्रास तोंड द्यावें लागेल, लाखों आया निपुत्रिक होतील, लाखों लेकरें पोरकीं होतील, घराघरांत बांगडी फुटेल, नगरेंचीं नगरें जाळून पोळून भस्म होतील, आणि त्या सर्वांआधीं आमच्या कुटुंबाची राखरांगोळी अुडेल हें आम्हीं, निदान मी तरी स्पष्टपणें जाणून होतों. आम्हीं ज्या सशस्त्र क्रांतियुद्धाच्या मार्गावर पाय टाकीत आहों त्याचे परिणाम दुर्धर, रक्ताळ आणि हिंस्र आहेत याची यच्चयावत् कल्पना माझ्या सहकाऱ्यांस येण्यास्तव मीं नेदरलँड, आयर्लंड, अिटली वगैरे देशांत झालेल्या भयंकर दडपशाहीचीं आणि क्रांतिकारकांच्या राक्षसी छळाचीं वर्णनें हेतुतः स्वतंत्र व्याख्यानांतून व लेखांतून स्पष्ट करीत असें. "

ही कष्टभोगी देशभक्ताची मनःस्थिति तयार करणें हें प्राथमिक स्वरूपाचें पण अत्यंत अवश्यक कार्य होतें. कारण शेवटीं बंदूक लढत नाहीं; त्या मागचें पोळ असणारें अंतःकरण लढतें. छळकांच्या छळामुळें हतबल होअून क्रांतीचे बेत फसल्याचीं अुदाहरणें राज्यक्रांत्यांच्या

अतिहासांत पानापानांवर लिहिलेलीं आहेत. मॅझिनीसारख्या धीरोदात्त क्रांतिकारकाला किंवा सुभाषचंद्रासारख्या वीर पुरुषाला असल्या संतप्त करणाऱ्या घटनांचा अनुभव घ्यावा लागलाच होता. क्रांतीच्या दारूगोळ्यावर देशद्रोहाचें पाणी पडून तो निरुपयोगी ठरण्यासारखें दुःख नाहीं. म्हणून सावरकर आणि त्यांचे 'अभिनव भारतांतील' सहकारी या हालअपेष्टांसाठीं सज्ज राहण्याचा अिषारा तरुण पिढीला देत होते. तसें शिक्षण देणें, वीर अंतःकरणें निर्माण करून तीं क्रांतिविचारांनीं भारून टाकणें हें कार्य त्यांनीं आरंभलें. पहिली क्रांति मनांत होते आणि नंतर त्या क्रांतीसाठीं शरीर तयार राहतें. म्हणूनच हें कार्य महत्त्वाचें होतें. ती बलोपासना तर होतीच; पण हौतात्म्याचेंहि वलय त्याभोंवतीं होतें. राष्ट्राची कष्ट भोगण्याची तयारी वाढविण्याची कल्पना त्यामागें होती. फांशी, तुरुंगवास, जन्मठेप या गोष्टी त्यांना रुढवावयाच्या होत्या. म्हणून मदनलाल धिंग्रानें फांसावर जाण्यापूर्वी जें न्यायालयांत निवेदन केलें होतें त्यांत स्पष्टपणें त्यानें सांगितलें कीं—"The only lesson required in India at present is to learn how to die and the only way to teach it is by dying ourselves. Therefore, I die and take glory in my martyrdom." ही आत्मबलिदानाची कल्पना या हुतात्म्यांच्या रक्तानें राष्ट्रांत रुजविली व अेका पिढींत त्यागाचा दर्शकांक वेगानें वाढत गेला. या क्रांतिकारकांचें जीवन मात्र सदैव मृत्यूच्या छायेखालीं वावरत होतें. हौतात्म्य हा त्यांचा अलंकार झाला होता.

या अशा हौतात्म्याचें गुणगान करतांना सावरकर म्हणतात—

"सागरावरील भरतीच्या लाटा सामान्यतः सौम्य दिसतात. पण तुफानी वाऱ्याच्या तांडवाचा स्पर्श होतांच त्यांना असें सामर्थ्य येतें कीं त्यापुढें टेंकड्या व भूभाग धुअून निघतात. मानवी समाजांत खेळणारें नैतिक बळ हें या लाटांसारखेंच असतें. देशभक्तांच्या कृतीचा स्पर्श लाभतांच या सौम्य नैतिक बळांत अेका नव्या शक्तीचा संचार होतो. या नव्या शक्तीमुळें साऱ्या अडथळ्यांचा चक्काचूर होतो आणि मग त्या देशभक्तांचा पक्ष यशाप्रत पोहोंचतो."

हौतात्म्य हा राखेआड दबलेल्या अग्नीला चेतविणारा वारा आहे म्हणूनच सुभाषबाबूंनीं म्हटलें कीं, 'तुम्हीं मला रक्त द्या; मी तुम्हांला स्वातंत्र्य देतों.' हुतात्म्यांच्या रक्तमांसाच्या पायावरच स्वातंत्र्याचें मंदिर अुभारलें जातें हा तर जणूं अितिहासाचा नियमच आहे.

क्रांतिप्रयत्नांची दिशा

पण हौतात्म्य हेंच क्रांतिकारकांचें ध्येय नव्हतें. त्यांच्यापुढें क्रांतीच्या अुठावणीचें सुस्पष्ट असें अेक चित्र होतें. सावरकरांनीं आपल्या आत्मचरित्रांत क्रांतिकारकांच्या या कार्यक्रमाचें स्वरूप पुढील शब्दांत वर्णन केलें आहे,

'···पण गृहणीय व स्पृहणीय वीरगति संपादिणें ह्या हिंदुराष्ट्रास जिच्या-योगें अजूनहि शक्य आहे, त्या सशस्त्र क्रांतीची ही योजना कोणती ? अभिनव भारत त्या कालींहि अुपदेशी कीं, जी योजना मॅझिनीनें अिटलीच्या क्रांतियुद्धास्तव आंखली,—जी आयर्लंड आणि रशियांतील क्रांतिकारक त्याच परिस्थितींत त्यांच्या क्रांतींत आचरीत होते, आणि सत्तावनच्या क्रांतियुद्धांत भारतानें आचरून दाखविली, त्या योजनांच्या आधारें तेंच गनिमी काव्याचें धोरण, त्या सशस्त्र अुठावणीस भारतांतहि शक्य आणि बहुधा विजयीहि करून दाखवील. सैन्यांत आणि पोलिसांत क्रांतीचा प्रसार आणि गुप्त क्रांतिकारकांची भरती करणें, रशियादिक परराष्ट्रांशीं संधान बांधणें, गनिमी काव्याची युद्धपद्धति स्वीकारणें, अिंग्रजी सत्तेच्या केंद्रांवर आणि प्रतिनिधींवर वैयक्तिक छापे येतां जातां घालणें, संस्थानांतून नि सरसीमे-पलीकडे शस्त्रास्त्रांचे सांठे करून आंत घुसण्याची संधि पहात टपून बसणें, मधूनमधून शक्य होतांच लहान मोठ्या अुठावण्या आणि बंडें करीत राहणें, त्यायोगें देशांत क्रांतीचें शिक्षण, मरणाचें बाळकडू, मरणाची क्षम्यता प्रदीतवीत शत्रूस राज्यशकट हांकणें अधिकाधिक धोक्याचें आणि दुर्घट करीत जाणें आणि शेवटीं अेकाद्या महायुद्धांत अिंग्रजी साम्राज्याचा कोण्या प्रचंड शक्तीशीं टक्कर जुंपून त्यांत अिंग्लंडचें बळ परस्परविरुद्ध आणि क्षीण होत असतानां भारतांतहि निकाराचें क्रांतियुद्ध पुकारून मुक्त होणें, पुन्हां फसल्यास पुन्हां तशी अुठावणी करणें, मरेतों असेंच मारीत मारीत झुंजणें ही त्या वेळच्या आमच्या सशस्त्र अुठावणीची रूपरेखा होती.

अिंग्रजांचें दहापांच लोक मारले कीं ते पळतील, अशी दुधखुळी समजूत आम्हीं केव्हांहि करून घेतली नव्हती. पण आमची निष्ठा असे कीं, तीस कोटी लोकांचें हें राष्ट्र, यांतील सर्वजण जरी कधीं अुठले नाहींत, अुठणार नाहींत, तरी दोन लक्ष वीर जरी अशा छाप्यांच्या पद्धतीनें, गुप्त संघटनेनें, गनिमी काव्यानें, अखंड अदम्य, अविश्रांत वृकयुद्ध लढूं निघतील, तरी आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादूं शकतीलच शकतील. निदान तसा संभव असलाच तर ह्याच योजनेंत कांहीं तरी होता; पण त्या सशस्त्र क्रांतियुद्धास 'पोरकट' वेडेपणांत ढकलून जे थोरकट शहाणे केवळ अर्जविनंत्यांच्या, निषेधांच्या, केवळ स्वदेशीच्या, समाजसुधारणेच्या वा निःशस्त्रप्रतिकाराच्या मार्गानें स्वातंत्र्य मिळेल, अिंग्लंड दया येअून वा हिंदुस्थान वयांत आलें म्हणून वा आपलीं वचनें स्मरून वा जनलज्जेनें त्याच्या बंदुकींतील बारहि झाडल्या-वांचून निघून जाईल म्हणून शपथेवर सांगत, त्यांच्या त्या योजनांत तर तो संभव मुळींच नव्हता—मुळींच—मुळींच नव्हता!!!"

सावरकरांच्या क्रांतिवादाची कल्पना या अुताऱ्यावरून येण्यासारखी आहे. सावरकरांच्या क्रांतिकल्पनेवर मॅझिनीच्या विचारसरणीचा व क्रांति-प्रयत्नांचा ठसा अुमटला आहे. सावरकरांनीं आपल्या क्रांतिप्रवृत्तीचा परिपोष त्याच्या वाङ्मयानेंच केला व जनतेपुढें मॅझिनीचें तें तेजस्वी चरित्र ठेवलें. मॅझिनीच्या या चरित्राचा गौरव करतांना शिवरामपंत परांजपे यांनीं लिहिलें होतें—

"अद्भुत सामर्थ्याचे मॅझिनीचे जे महामंत्र ते देशभक्त सावरकर यांनीं आपल्या महाराष्ट्र देशभाषेंत आणून त्यांचा सर्व लोकांस परिचय करून दिल्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे, तितके थोडेच आहेत. या भगवद्गीतेचें श्रवण, मनन, आणि निदिध्यासन करून आपल्या प्रत्येक भक्ताला जीवन्मुक्तच करून सोडील असें अद्भुत सामर्थ्य यांत आहे."

सावरकरांनीं मॅझिनीपासून कोणत्या गोष्टी घेतल्या व त्यांचा त्यांच्या क्रांतिवादी तत्त्वज्ञानावर काय परिणाम झाला याची चर्चा पुढें येअीलच. पण सावरकरांनीं पुरस्कारलेला क्रांतिवाद किंबहुना त्या वेळच्या सर्व

क्रांतिकारकांचा सशस्त्र क्रांतिवाद हा परराष्ट्रांच्या अनुभवावर व स्वराष्ट्राच्या अितिहासावर आधारलेला होता यांत शंकाच नाहीं.

याला आणखी अेक अुदाहरण लाला हरदयाळांचें देतां येअील. लाला हरदयाळांनीं भारतीय क्रांतियुद्धांत महात्त्वाची कामगिरी केली आहे हें येथें विसरतां कामा नये. ते सावरकरांचे निष्ठावन्त सहकारी होते आणि सावरकर अंदमानांत गेल्यावरहि अमेरिकेंत 'गदर' पक्ष स्थापून पहिल्या महायुद्धाच्या वेळीं लालाजींनीं भारतीय क्रांतीसाठीं प्रयत्न केले. हरदयाळ हे अेक श्रेष्ठ विचारवन्त होते. त्यांनीं आपल्या क्रांतिवादाची कल्पना 'वंदेमातरम्' या त्या वेळीं पॅरिसमध्यें निघणाऱ्या मासिकाच्या सप्टेंबर, १९०९ च्या पहिल्या अंकांत पुढील प्रमाणें मांडली आहे—

"(अ) **बौद्धिक आणि नैतिक सिद्धता**—या काळांत कार्यकर्त्यांनीं जनतेचें चारित्र्य वाढविण्याचा प्रयत्न करावा व त्यांना गतिमान् समाज-जीवनाचीं तत्त्वें शिकवावींत. लोकांचीं अंतःकरणें शुद्ध झालीं पाहिजेत. स्वार्थबुद्धि व लोभ यांचा नाश केला पाहिजे. गुलामीचा नाश करण्यापूर्वी गुलामी वृत्ति नाहींशी केली पाहिजे.

(ब) दुसरी पायरी प्रत्यक्ष युद्धाची असते. जनतंत्रवादी, स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या स्थापनेचा मार्ग मोकळा केला पाहिजे. जुन्या राजवटीचें मढें अुचललें पाहिजे. आणि हें काम फक्त तलवारच करूं शकेल. कोणतेंहि गुलाम राष्ट्र युद्धाविना स्वतंत्र होऊं शकणार नाहीं, हें तत्त्व चुकीचें आहे असें म्हणणारा मनुष्य मूर्ख तरी असेल किंवा लबाड तरी असला पाहिजे.

(क) युद्धानंतर, पुनर्रचनेचें व स्थैर्याचें काम सुरू होतें. मॅझिनीनंतर गॅरिबाल्डी, गॅरिबाल्डीनंनर काव्हूर. तसेंच आपल्याकडेहि झालें पाहिजे. गुण व शहाणपणा अगोदर; नंतर प्रत्यक्ष युद्ध व अखेरीस स्वातंत्र्य असा हा क्रम आहे."

सावरकरांच्या सहकाऱ्यांतहि क्रांतीची ही मूलभूत कल्पना कशी दृढ-मूल झाली होती हें या अुताऱ्यावरून कळण्यासारखें आहे. हरदयाळनीं तर स्वातंत्र्यानंतर पुनर्रचनेचें व राज्य स्थिर करण्याचें कार्य असतें याचाहि स्पष्ट निर्देश केला आहे. असेंच अुदाहरण पं. श्यामजी कृष्णवर्मा यांच्या विचारसरणीचेंहि देतां येअील. पं. कृष्णवर्मा हे स्वतः या क्रांतिवादाचे झुंझार पुरस्कर्ते म्हणून त्या वेळीं गाजले होते. त्यांच्या "इंडियन सोशी-ऑलॉजिस्ट" या पत्रांत त्यांनीं धिंग्राचें गुणगान करण्याचें सोडलें नाहीं. श्यामजींनीं अर्थात् अुघडपणें सशस्त्र क्रांतिवादाचा पुरस्कार केला नाहीं. पत्रकार या नात्यानें त्यांनीं बहिष्कार, शांततामय क्रांति, अित्यादि कल्पनांचा पुरस्कार केला. त्यांनीं देशाच्या स्वातंत्र्य-लढ्याचा अेक आठ कलमी कार्यक्रम आपल्या वृत्तपत्रांत मांडला होता. त्यांत सार्वत्रिक संप, सरकारी नोकऱ्या, शाळा इत्यादींवर बहिष्कार, ब्रिटिश सरकारचे कर्जरोखे न घेण्याचा अुपदेश अित्यादि अुपाय त्यांनीं मांडले होते. ते शांततामय क्रांतीचे पुरस्कर्ते असले तरी भारतांतील जुलमी ब्रिटिश राजवटीमुळें तेथें कशी स्फोटक परिस्थिति झाली आहे आणि त्यांतून शस्त्रवाद कसा येत आहे हें स्पष्ट करून सांगत. असेंच अेकदां त्यांनीं लिहिलें कीं "जर अुद्यां भारती-यांना रशियन लोकांचे क्रांतीचे मार्ग अवलंबावे लागले, तर त्यांना आम्ही दोष देणार नाहीं. अेकादी मेंढी सुद्धां संतापून प्रतिकारार्थ अुठते. अशा स्थितींत भारत म्हणजे आयर्लंड होअून जाअील." बाँबचे स्फोट होअूं लागल्यावर त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, बाँब हें केवळ खुनाचें साधन नव्हे. त्याच्या स्फोटानें अंधार नाहींसा होण्याची शक्यता आहे. अेकदां रशियन क्रांतिकारकाची मुलाखत छापून श्यामजींनीं दहशतवादाची पार्श्वभूमि काय असते तें जनतेपुढें मांडलें होतें. आपल्या गुलामीची कहाणी सांगून तो क्रांतिकारक म्हणतो,

"रणांगणावर आपल्या सैनिकांना सशस्त्र आक्रमणाच्या आज्ञा सोडणाऱ्या सेनापतीला ठार मारलें तर तें नैतिक ठरतें, मग जो स्वतःच्या कचेरींत बसून पोलिसांना असहाय्य स्त्रीपुरुषांची कत्तल करण्याची आज्ञा सोडतो, त्याला ठार मारणें हें अनैतिक आहे काय?"

अशा रीतीनें भारतीय क्रांतिकारकांची भूमिका या ना त्या प्रकारें श्यामजी युरोपीय वाचकांसमोर मांडीत होते. यावरूनहि ही कल्पना येऊील कीं त्या वेळीं रशियामध्यें क्रांतीला पोषक असें वातावरण असल्यामुळें तेथील क्रांतिप्रयत्नांचा परिणाम त्या वेळच्या भारतीय क्रांतिवाद्यांवर झाला होता. किंबहुना बाँबची विद्या सेनापति बापट रशियनाकडूनच शिकले. अेकीकडे झारची राजवट अुलथून पाडण्यासाठीं सशस्त्र अुठावणी करणारे रशियन क्रांतिकारक, दुसरीकडे आयर्लंडची स्वातंत्र्यवादी चळवळ आणि मॅझिनीच्या क्रांतिवादाचा निदिध्यास या तिन्ही गोष्टीमुळें सावरकर आदि भारतीय क्रांतिकारकांचे प्रयत्न 'मारो काटो का पंथा'च्या स्वरूपाचे राहूं शकले नाहींत. हाइंडमनसारख्या समाजवाद्यांशीं परिचय असल्यामुळें व त्या वेळीं समाजवादी विचारसरणी युरोपमध्यें नुकतीच येअूं लागली असल्यामुळें या क्रांतिकारकांचा सशस्त्र क्रांतिवाद केवळ नकारात्मक राहूं शकला नाहीं. समाजक्रांतीची स्पष्ट अशी कल्पना त्या वेळीं या क्रांतिकारकांनीं प्रसृत केली नाहीं, तरी लोकसत्ता, राष्ट्रवाद, समता या तिन्ही कल्पनांचें अधिष्ठान त्या चळवळीला होतें यांत शंकाच नाहीं. मॅडम कामा या क्रांतिकारकांच्या वतीनें १९०९ मध्यें भरलेल्या सोशॅलिस्ट परिषदेस अुपस्थित राहिल्या होत्या आणि अितर अनेक रशियन क्रांतिकारकांशीं या क्रांतिकारकांचे निकटचे संबंध होते.

शक्यतेची शंका

सावरकर व त्यांचे सहकारी यांच्या क्रांतिकल्पनांचें स्वरूप केवळ दहशतवादी नव्हतें, हें आपण पाहिलें. पण मागें सांगितल्याप्रमाणें या क्रांतिवादाचे तत्त्वतः विरोधक त्या वेळीं कोणीच नव्हते. विचारी लोक फक्त अेवढेंच विचारीत कीं क्रांतीची कल्पना ठीक आहे; पण या देशाची कुवत आहे का ? लोकमान्यांचीसुद्धां भूमिका हीच असे. ते नेहमीं म्हणत कीं "५० टक्के जरी शक्यता असती, तरी मी ५० टक्क्यांसाठीं अीश्वरावर भरवंसा टाकून बंड पुकारलें असतें." तेव्हां या शक्याशक्यतेचा विचार हाच त्या वेळीं प्रमुख होता. ब्रिटिशांविरुद्ध नुसतें बोलणें कठीण होतें, तर मग शस्त्र अुचलणें

म्हणजे दडपशाहीला निमंत्रण ठरणार होतें यांत नवल काय ? या दडपशाहीच्या वरवंट्याला लोक भीत. म्हणूनच या क्रांतिकारकांची 'माथेफिरू' म्हणून गणना होअी ! मग अितका तीव्र विरोध असूनहि कोणत्या भावनेनें किंवा संभाव्य अंदाजामुळें हे क्रांतिकारक या दाहक क्रांतिप्रयत्नांस अुद्युक्त झाले होते ? याचें स्पष्टीकरण सावरकरांनींच स्वतः केलें आहे. ते म्हणतात—


*" स्वातंत्र्य हें सशस्त्र क्रांतियुद्धावांचून मिळणें नाहीं ही निश्चिती होतांच अर्थात्च पहिला प्रश्न येअी कीं तें खरें, अगदीं खरें; पण ती सशस्त्र क्रांति ह्या निःशस्त्र, निर्वीर्य, निःसंघटित राष्ट्रास शक्य आहे काय ? अभिनव भारत सांगे, होय ! अीश्वराच्या कृपेनें अजूनहि आणि या हतबलतेंतहि अिंग्रजासारख्या परम बलाढ्य सशस्त्र शत्रूशीं लढावयाचें असतांहि भारतास सशस्त्र क्रांतियुद्धाची अुठावणी करणें शक्य आहे ! अति दुर्घट खरें; पण शक्य आहे.

आम्हीं या सशस्त्र क्रांतियुद्धास खंबर कसली. कोणत्या शक्तीवर ? नुसत्या आमच्या नव्हे; तर राष्ट्राच्या ! ज्या पहिल्या दोन वर्षांच्या वृत्तांताचें हें समालोचन आहे, त्या काळीं आम्हीं पुरेसे चाकूहि जवळ नसलेलीं शेंपन्नास मुलें. आणि महासमर लढावयाचें होतें महाबलाढ्य इंग्रजी सत्तेशीं ! वृत्रासुराचा वध करावयाचा—आणि तो हातांत आमच्या अत्यंत तुच्छ शक्तीची काडी घेऊन ! किती हास्यास्पद ! निःसंशय हास्यास्पद—तें आमचे आम्हीच अितर कोणाहूनहि जाणून होतों. पण आम्ही हेंहि जाणून होतों कीं आमची संस्था ही अेक यत्किंचित् काडी असली, तरी ती आगकाडी होती. अितिहासांत अशा अेका अत्यंत क्षुल्लक आगकाडीनें केव्हां केव्हां अचूक अेकाद्या दारूच्या कोठारावर आपली ठिणगी टाकून त्या स्फोटासरशीं साम्राज्याचें साम्राज्य अुडवून त्याची राखरांगोळी केली होती. तशीच ही तुच्छ आगकाडी ही अेका क्षणांत स्वतः जरी जळून गेली, तरी अचूकपणें आपली सरती ठिणगी त्या दारूच्या कोठारावर टाकूं शकली तर ? त्या तुच्छ आग-

* आत्मचरित्र पृष्ठ २२९–३१

काडीच्या सूक्ष्म ठिणगीच्या बळें नव्हे; तर त्या प्रचंड दारूच्या कोठाराच्या प्रबळ स्फोटाच्या बळें आततायी विपक्षाचें हेंही साम्राज्य धुळीस मिळणार नाहीं कशावरून ? आणि त्यांतहि त्या दारूच्या कोठारांत अेकतीस कोटि राष्ट्राच्या भयंकर असंतोषाचीं स्फोटक द्रव्यें खचाखच भरलेलीं असतांना निदान प्रयोग करण्यास तरी काय हरकत आहे ? अशा विचारें आमची अतिशय क्षुद्र शक्तीची जाणीव असतांहि आमच्या प्राणांच्या शक्तीची ठिणगी त्या दारूच्या कोठारास आग लावण्यासाठीं त्यावर फेंकण्याचा आम्हीं निश्चय केला ! ''

सावरकरांच्या क्रांतिवादाचें सामर्थ्य त्यांतील अुत्कटतेंत होतें हें यावरून दिसून येअील. जगांत होणाऱ्या वा झालेल्या अनेक क्रांत्यांची सुरुवात ही निश्चयी अल्पसंख्यांकाकडून (determined minority) होते आणि ती संख्या निर्माण करण्याचें कार्य अनेक पद्धतींनीं त्या वेळच्या क्रांतिकारकांनीं केलें आहे हें विसरतां येणार नाहीं. त्यांनीं यशाची अपेक्षाच कधीं बाळगली नव्हती; त्यांना फक्त मशाल पेटवावयाची होती. त्यांना मंदिराचा कळस पहावयाचा नव्हता; तर पायाचे दगड होऊन राहणें हेंच त्यांचें ईप्सित कार्य होतें. गुलामीच्या बेडीवर पहिला घण मारण्याचे प्रयत्न त्यांना करावयाचे होते. म्हणून संपूर्ण यशाची जेथें अपेक्षाच नव्हती, तेथें पराभवानें खचून जाण्याचा प्रश्नच अुद्भवत नव्हता. सारें राष्ट्र अुदासीन झालेलें नसलें तरी धाडसाचें पाअुल टाकण्यास भिणारें होतें. लोकनिंदा ही होत राहाणार हें अुघड होतें ! अुपहास हाच त्यांचा सहकारी ठरणार अशीच त्यांची खात्री होती. मूठभर देशभक्तांच्या प्रयत्नांनीं काय होणार, असे विचार निराशेच्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्रीं त्यांनाहि भिववत होते. पण तेथें शक्यतेची शंका, यशाची चिंता किंवा पराभवानें खचून जाण्याची कल्पना त्यांना शिवली नाहीं. गुलामीला जखडलेलें जीवन त्यांना असह्य झालें आणि मुक्तीचें वेड त्यांना लागलें. त्यांची ही खात्री होती कीं समाज हा बौद्धिक चळवळीनें बदलत नाहीं; धक्क्यानें बदलतो. सामाजिक परिवर्तन हें भूमितीच्या प्रमेयाप्रमाणें अगदीं पद्धतशीर कधींच होत नसतें ! परिवर्तनाची दिशा अेक वेळ जोखतां येते; पण त्याची पद्धति कशी निश्चित सांगतां येअील ? हें परिव-



र्तन घडविण्यासाठीं ते सगळे क्रांतिवादी तरुण आतुर झाले होते. तें त्यांचा हातून यशस्वी रीतीनें पार पडेल असें चुकूनहि त्यांना वाटलें नाहीं. त्यांची भूमिका ललकारीं देणाऱ्या तुतारीची होती. तुतारीचा रणनाद हेंहि रणकृत्यच आहे. आवेश संचरविण्यासाठीं, पौरुष जागृत करण्यासाठीं, आत्मसमर्पणाची सिद्धता राष्ट्रांत निर्माण करण्यासाठीं हा रणनाद घुमविणें, हेंच त्या वेळचें महान् क्रांतिकार्य होतें. आणि शक्यतेचा अतिसूक्ष्म विचार हि न करतां या सर्व क्रांतिवाद्यांनीं आपले मार्ग निश्चित केले. पण सुदैवानें जें अशक्य समजलें जाअी, तें शक्य करून दाखविण्याचा निर्धार त्यांनीं केला, अितिहासाला साक्षी ठेवून, हुतात्म्यांच्या समाधीपुढें जणूं गंभीर प्रतिज्ञा करून या क्रांतिकारकांनीं तो भयानक संकटांनीं भरलेला मार्ग आक्रमाव-यास सुरुवात केली.

मॅझिनी आणि सावरकर

सावरकर अिंग्लंडमध्यें गेले आणि त्यांच्या हातांत मॅझिनीच्या लेखांचे अिंग्रजी अनुवाद आले. त्यांचें अत्यंत अुत्सुकतेनें त्यांनीं जेव्हां पारायण केलें, तेव्हां आपण अभिनव भारत संस्थेपुढें क्रांतीचा जो कार्यक्रम आजवर गुप्तपणें आंखीत आलों, त्याचाच अधिकारयुक्त वाणीनें मॅझिनीच्या आत्म-वृत्तांत नि लेखांत प्रबळ पुरस्कार केलेला त्यांस आढळून आला. आणि आपणांस हिंदुस्थानच्या सद्यःस्थितींत जें अुघडपणें सांगतां येतील तें या लेखांचें भाषांतर करून अप्रत्यक्ष रीतीनें जनतेपुढें अुघडपणें मांडतां येअील असें त्यांना वाटलें. क्रांतिकारकांनाहि या लेखांमुळें अुत्साह येअील आणि त्यांचा आत्मविश्वासहि वाढेल या कल्पनेनें सावरकर आनंदित झाले. चातक पक्ष्याच्या तोंडांत मेघांचें पाणी पडावें तसें हें झालें. सावरकरांचें अंतःकरण ज्या विचारांनीं त्या वेळीं भरलें होतें, त्या विचारांना पोषक असे हे मॅझिनीचे विचार त्यांना वाटले यांत नवल नाहीं. जणूं त्यांच्या अंतः-करणाचें प्रतिबिंबच त्या लेखांत त्यांना दिसलें. लोहचुंबकत्वाची प्रतीति त्यामुळें त्यांना आली आणि सावरकर हे 'मॅझिनीमय' झाले.

सावरकरांनीं मॅझिनीचे जें आत्मवृत्त व लेख भाषांतरित केले आहेत त्यांची प्रस्तावनाच मुळीं सावरकरांवर मॅझिनीच्या विचारांचा व मार्गांचा परिणाम झालेला आहे, किती निःसंकोचपणें आणि आत्मीयतेनें त्यांचा स्वीकार सावरकरांनीं केला आहे हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. शास्त्रांचीं प्रमेयें कालदेशांनीं मर्यादित नसतात हें त्यांचें मत स्पष्टपणें त्या प्रस्तावनेंत मांडून सावरकरांनीं राजकारणशास्त्रांत मनुष्य जातीच्या अनुभवानें प्रस्थापित झालेलीं तत्त्वें हीं सर्व राष्ट्रांनीं अुचललीं पाहिजेत असें आग्रहानें प्रतिपादितांना भारतीय जनतेनेंहि या सर्व लेखांपासून स्फूर्ति घ्यावी, मॅझिनीनें राज्यक्रांती-साठीं अनुसरलेल्या तंत्रापासून बोध घ्यावा, राज्यक्रांतीचें तत्त्वज्ञान व राष्ट्रवादाचें अुदात्त स्वरूप समजावून घ्यावें म्हणून सावरकरांनीं त्या पुस्तकाची रचना, मांडणी मोठ्या कौशल्यानें केली. मॅझिनीचे राष्ट्रविचार हे अुत्साहदायी राष्ट्रमंत्र ठरावेत या हेतूनें सावरकरांनीं अत्यंत तीक्ष्णतेनें व प्रगल्भतेनें ते तरुणांपुढें मांडले. तो ग्रंथ इतका लोकप्रिय झाला कीं ती क्रांतिवाद्यांची गीताच झाली.

अुदात्ततेचा स्पर्श

मॅझिनीचें सर्व आयुष्यच अुत्कट करुण रसानें भरलेलें आणि अुदात्ततेनें अमर ठरणारें नाटक झालें आहे. अेकोणिसाव्या शतकांत युरोपमध्यें जो राष्ट्रवाद जन्माला येत होता, लहानलहान राज्यांच्या अेकत्रीकरणांतून जीं नवीं 'एक राज्य, एक राष्ट्र' ही घोषणा अवतरत होती, त्याचा प्रवर्तक म्हणून मॅझिनीचा आजहि राज्यशास्त्राच्या अितिहासांत अुल्लेख होतो. मॅझिनीचा राष्ट्रवाद हा साम्राज्यवादाचा अवशेष नव्हता; तर त्याला अीश्वरी प्रेरणेची शक्ति होती. मॅझिनीनें केलेली राज्यक्रांति ही लोभानें, कारस्थानानें केलेली नव्हती; तर त्यामागें नवरचनेची शुद्ध आकांक्षा व राष्ट्र-प्रेमाचें अुज्ज्वल अधिष्ठान होतें. तेथें स्वार्थाचा ध्वज फडफडत नव्हता; तर त्यांच्या ध्वजावर 'त्याग' ही अक्षरें लिहिलेलीं होतीं. मानवी जगांत कोणीहि परतंत्र राहूं नये, स्वतःच्या अुन्नतीचें, विकासाचें स्वातंत्र्य प्रत्येक राष्ट्राला असावें असें मॅझिनीचें मत असल्यामुळें त्याची राज्यक्रांति ही खरी जनक्रांति

ठरली. राजकारणाला स्वार्थपरायणतेचें हिडीस स्वरूप देणाऱ्या मुत्सद्यांना मॅझिनी हा जरी निंद्य व तिरस्करणीय वाटला तरी दास्यमुक्तीसाठीं लढणाऱ्या, स्वदेशासाठीं आत्मदान करावयास निघालेल्या तरुणांना मॅझिनी हें स्फूर्तिस्थान वाटलें. सर्व जगाकडे अेकात्म दृष्टीनें पाहण्याची आंतरराष्ट्रीय बंधुत्वाची दृष्टी मॅझिनीजवळ होती म्हणून त्याच्याबद्दल अुदात्त विचार करणाऱ्या तरुणांना आदर वाटला. सावरकर हेहि असेच अेक तरुण होते. ते आणि त्यांचे सहकारी क्रांतीसाठीं प्रवृत्त झाले होते. सावरकरांच्या राष्ट्रवादाला जें हेकट वा हुकुमशाही स्वरूप आलें नाहीं, याचें मुख्य कारण मॅझिनीचे त्यांच्या तरुण अंतःकरणावर झालेले संस्कार हेंच असावें. मॅझिनी या व्यक्तीचें जीवनहि अुदात्त होतें. या उदात्ततेचा, ध्येयवादित्वाचा साक्षात्कार सावरकरांना झाला आणि त्यांचें जीवन बहरून निघालें. सावरकरांच्या तत्कालीन मॅझिनी प्रेमाचें मार्मिक वर्णन बॅ. असफअल्लींनीं (हे त्या वेळीं सावरकरांचे निकटचे सहकारी होते) आपल्या आठवणींत केलें आहे— "मॅझिनीच्या शिकवणीनें त्यांचें मन अगदीं भारावून गेलें होतें. मॅझिनीच्या चरित्रानें आणि शिकवणुकीनेंच त्यांच्या अंतःकरणांतील ज्योत तेवत ठेवली होती व त्याच्या आयुष्यांतील अगदीं लहान घटनाहि त्यांना स्फूर्तिदायक वाटत होती. ते रविवारच्या सभांमध्यें इंडिया हाऊसमध्यें जीं भाषणें करीत, त्यांत त्या इटालियन देशभक्ताची क्रांतिनीति समग्रपणें मांडलेली असे" सावरकरांनीं मॅझिनीचा अुल्लेख 'भगवान्' म्हणून केला आहे, त्यावरून त्यांना वाटणाऱ्या आदराची कल्पना येण्यासारखी आहे. ज्या वेळीं अेखादें राष्ट्र स्वातंत्र्यासाठीं लढत असतें, त्या वेळीं अितर अशाच स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या राष्ट्रांविषयीं वा त्यांतील व्यक्तींविषयीं अतोनात आदर असतो. हें आपल्याला आयर्लंड, अिंडोनेशिया आदि राष्ट्रांविषयीं जें प्रेम वाटत असें त्यावरून सहज दिसण्यासारखें आहे. सावरकरांच्या हृदयांतील भावना याहून वेगळी नव्हती.

तात्त्विकतेचें अधिष्ठान

मॅझिनीविषयीं सावरकरांना वाटणारें प्रेम केवळ भावनिक नव्हतें. त्यांना मॅझिनीनें जो राजकीय ध्येयवाद पुरस्कारला, त्यानें राज्यक्रांतीचें जें तंत्र

अवलंबिलें त्याविषयीं आदर होता. मॅझिनीच्या प्रस्तावनेंत सावरकरांनींच सांगितल्याप्रमाणें मॅझिनीपुढें तीन समस्या होत्या. अिटलीचें राजकीय स्वातंत्र्य, अिटलीचें अैक्य आणि तेथें लोकसत्ताकाची स्थापना. या तिन्ही समस्या मॅझिनीनें यशस्वी रीतीनें सोडविल्या. मॅझिनीच्या या राजकीय तत्त्वांचा पुरस्कार सावरकरांनींहि केलेला आपल्याला आढळतो. मॅझिनीनें जे क्रांतीचे मार्ग अवलंबिले, त्यांत गुप्त मंडळयांची संघटना व जनतेला जागृत करून सशक्त अुठावणीचे प्रयत्न हे महत्वाचे होते. पहिली क्रांति मनांत होते, असें मॅझिनी म्हणत असे. म्हणून त्यानें 'तरुण अिटली' या त्याच्या वृत्तपत्राच्या द्वारां जनतेंत स्वातंत्र्यवादी विचार दृढ व प्रबळ केले. लोकसत्तेविना दुसऱ्या सर्व राज्यपद्धति अन्यायमूलक व अनीतिमान आहेत असें तो प्रतिपादीत असे. भिन्न भिन्न प्रांत अेकमेकांवर स्वाऱ्या करीत व त्यामुळें राष्ट्रजीवन कलहमय झालें होतें. मॅझिनीनें म्हणूनच राष्ट्रैक्याचा मंत्र इटलीला दिला. निरनिराळ्या संस्थांना अेकत्र आणण्याचे प्रयत्न त्यानें केले. मानवतेची सेवा करण्यासाठींच इटली स्वतंत्र झाला पाहिजे, इटली अेकदां स्वतंत्र झाला म्हणजे इतर परतंत्र राष्ट्रांना तो मदत करील ही त्याची अुदात्त भूमिका होती. मानवी प्रगमनाचा रथ राष्ट्रवादाच्या अश्वानेंहि ओढतां येअील अशी त्याची श्रद्धा होती. मॅझिनीच्या राजकीय तत्त्वज्ञानाचें स्वरूप थोडक्यांत असेंच होतें. सावरकरांच्या राजकीय तत्त्व-ज्ञानाशीं याचें विलक्षण साम्य आहे. सावरकरांच्या क्रांतिवादाचें प्रखर राष्ट्रवाद हें जरी अधिष्ठान होतें, तरी त्या वेळीं आणि आजहि तो राष्ट्रवाद अनिर्बंध स्वरूपाचा झालेला नाहीं हें आपण पाहिलें आहे. सावरकरांची मानवतेवर श्रद्धा आहे. 'हिंदुत्वा'चा पुरस्कार करतांनाहि शेवटीं आमचें खरें ध्येय 'वसुधैव कुटुंबकम्' आहे हें सांगण्यास ते विसरलेले नाहींत. राष्ट्रवाद ही वस्तुस्थिति आहे; पण ती आंतरराष्ट्रीय बंधुत्वाशीं विसंगत आहे असें त्यांना वाटत नाहीं याचें कारणहि हेंच आहे. 'हिंदु हें हिंदुस्थानचें हृदय आहे' असें प्रतिपादतांना अिंद्रधनुष्याचें खरें सौंदर्य जसें त्याच्या बहुरंगीपणांत असतें, तसें भारताचें सौंदर्यहि तेथील अनेक जमातींच्या अस्तित्वामुळें जगाच्या आकाशांत खुलून दिसेल हें त्यांनीं सांगून टाकलें.

हिंदु हेच राष्ट्रदृष्टीनें अधिक अेकजीव आहेत, हा सिद्धांत मांडतांनाहि सावरकर हिंदी राष्ट्र निर्माण करण्यासाठीं हिंदु बहुसंख्य म्हणून अडथळा आणणार नाहींत असें सांगूं शकले. याचें कारणहि त्यांचा राष्ट्रवाद हा मॅझिनीसारखा विकासशील आहे, अुदात्त आहे हेंच आहे. सावरकरांची लोकसत्तेवर जी निष्ठा आहे तीहि मॅझिनीच्या निष्ठेशीं विलक्षण साम्य असणारी आहे. लोकसत्ताक राज्यपद्धति ही अगदीं निर्दोष नाहीं असें त्यांना वाटत असलें, तरी अंतर्गत व्यवस्थेसाठीं व अनुशासनासाठीं कमी दोषयुक्त पद्धति अशी तीच आहे असें त्यांना निःसंशय वाटतें. सावरकरांनीं संस्थानिकांना अुद्देशून १९०७ सालीं अेक पत्रक काढलें होतें, त्यांत त्यांनीं संस्थानिकांनीं क्रांतीला विरोध करणें हें त्यांच्या दृष्टीनेंच घातक कसें ठरेल याचें वर्णन केलें आहे. ते भावी हिंदुस्थानच्या घटनेचें स्वरूप सांगतांना त्या पत्रकांत म्हणतात—

" भारतमाता अेकदां स्वत्वसंपन्न झाली व स्वतंत्रपणें नांदू लागली कीं क्रांत्युत्तर काळांत आपलें जीवन कसें चालावें हें ठरविण्यासाठीं अवश्य असणारी घटना तिच्याच शब्दानुसार ठरेल,...हिंदी राष्ट्राच्या सार्वभौम सरकारचा प्रमुख म्हणून अध्यक्ष काम करील कीं तें काम राजा पाहील हें क्रांतीचा विकास कसा होअील यावर अवलंबून राहील....तुमच्यासारख्या दुबळ्यांनीं त्या क्रांतीचा पुरोगामी प्रवाह थांबविण्यासाठीं पुढें सरसावणें अगर त्या क्रांतीच्या जन्मकाळींच तिच्या नरडीला नख लावण्याचा प्रयत्न करणें हें गुरुत्वाकर्षणाचा नियम अगर पृथ्वीचा वर्तुळाकार बदलण्याला धजण्यासारखें नाहीं काय? "

सावरकरांनीं लोकसत्तेचा जयजयकार करीत संस्थानिकांना बजावलें कीं स्वातंत्र्याच्या महायज्ञांत तुमचें सारे मुकुट वितळवून टाकले जातील. ज्या वेळीं सावरकरांनीं क्रांतिकारकांचा ध्वज ठरविला, त्या वेळीं त्यांनीं कामा बाईंना असें स्पष्टपणें लिहिलें होतें कीं, स्वतंत्र हिंदुस्थानचा खरा ध्वज त्याची घटनासभा ठरवील. आपला ध्वज हा तात्पुरता आहे. अशा रीतीनें लोकसत्तेच्या बाह्य स्वरूपापासून ते लोकशाहीच्या अुदात्त नीतीपर्यंत सर्वांचा सावरकरांनीं अुत्कटतेनें पुरस्कार केला. मॅझिनी आणि सावरकर यांच्यांतील अत्यंत सुस्पष्ट असें हें साम्य आहे.

हें झालें राजकीय तत्त्वज्ञानाच्याविषयीं. सावरकरांनीं मॅझिनीचें क्रांति-तंत्रहि अनुकरणीय मानलें. लढाऊशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं हा त्याचाहे ठाम सिद्धांत असल्यामुळें त्यानें 'तरुण अिटली'च्या मार्फत तरुण देशभक्तांची संघटना अुभारली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांत विलक्षण साम्य असलेलें आपणास आढळतें, तसेंच येथेंहि आहे. बाहेरच्या मित्रराष्ट्रांत शस्त्रें वगैरे जमवून स्वदेशांत गडबड करावयाची; स्वदेशांत गुप्त रीतीनें हत्यारें बनवावयाचीं; सैन्यांतील लोकांचीं मनें जिंकावयाचीं, गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रत्यक्ष अुपयोग करावयाचा अित्यादी मार्ग अिटलीमध्यें मॅझिनीनें अवलंबिले होते. मॅझिनीनें देशाच्या राजकारणाकडे युद्धमय दृष्टीनें पाहिलें होतें. त्याला समाजाला लढाअू करून स्वातंत्र्ययुद्धासाठीं सिद्ध करावयाचें होतें. राज्यक्रांतीच्या या युद्धमय कल्पनेंत अेक मोठा दोष राहून गेला आहे. पण तो दोष मॅझिनीचा किंवा सावरकरांसारख्या क्रांतिकारकांचा मूळ दोष नाहीं. कारण १९ व्या शतकांत अेखाद्या सामाजिक व आर्थिक तत्त्वाच्या आधारावर संघटना अुभारण्याची कल्पनाच नव्हती. राजकीय स्वातंत्र्य, राजेशाहीचा अभाव हीच लोकशाहीची तात्त्विक भूमिका त्या वेळीं होती. लोकशाही राजवटींतील सरकारचीं कर्तव्यें आज ज्या स्वरूपाचीं आहेत, तशीं त्या वेळीं नव्हती. राज्यसंस्थेचें अधिष्ठान, तिचे सार्वभौमत्व हें जनतेमध्यें आहे, या तत्त्वाचा स्वीकार त्या वेळीं नुकताच होत होता. मॅझिनीची लोकशाहीची कल्पना याच स्वरूपाची होती. तेव्हां सावरकरांच्या क्रांतिकल्पनेंत लोकशाहीचें बाह्यस्वरूप (formal aspect) निश्चितपणें मान्य केलेलें होतें. ही कल्पना त्या काळांत पुरोगामी होती आणि तिचेंच अधिष्ठान सावरकरांनीं आपल्या क्रांतिवादाला दिलें हें वैशिष्ट्य होय. वर संस्थानिकांना दिलेल्या इषाऱ्यावरूनहि हें ध्यानांत येअील कीं, या सशस्त्र क्रांतिवादांतून किंवा सैनिकी क्रांतींतून हुकुमशाही आणण्याचें सावरकर व त्यांचे सहकारी यांचें ध्येय नव्हतें. सावरकरांच्या सैनिकी वृत्तीवर आधारलेल्या या क्रांतिवादावर हुकुमशाही प्रवृत्तीचा नेहेमीं आरोप करण्यांत येतो, म्हणून हें स्पष्टीकरण येथें केलें आहे. लोकशाहीची ही कल्पना स्वीकारण्याचें मुख्य कारण मॅझिनीचा लोकसत्ताक राष्ट्रवाद त्यांनीं आत्मसात् केला होता हें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मॅझिनीचें क्रांतितंत्र नि सावरकर

अर्थात् लढाईविना स्वातंत्र्य अशक्य हा मूलभूत सिद्धांतच मानल्यामुळें त्यासाठीं सर्व डावपेंच आंखणें हें मॅझिनीप्रमाणेंच सावरकरांच्या क्रांतिवादाचें तंत्र होतें. युद्धोपयोगी हत्यारें मिळविण्यासाठीं मॅझिनीनें परराष्ट्रांशीं संधान बांधलें, शेजारच्या प्रदेशांत युद्धाची तयारी करणें हा मॅझिनीचा मार्ग होता, तोहि सावरकरांना अनुकरणीय वाटला; हें युद्ध सैन्याच्या अभावीं गनिमी काव्यानेंच देशभक्त परिणामकारक रीतीनें लढवूं शकतात हें मॅझिनीचें म्हणणें सावरकरांना पुरस्करणीय वाटलें; आपल्याला अुपयोगी पडणाऱ्या संस्थानिकांशीं स्नेह ठेवावा हें मॅझिनीचें धोरण सावरकरांनाहि अवश्य वाटलें म्हणून ते स्वतंत्र नेपाळला मानाचा मुजरा करण्यास विसरले नाहींत. गुप्त मंडळ्यांनीं मानसिक शिक्षण व क्रांतीची सिद्धता करतां येते हें जणूं इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धांतील सूत्र सावरकरांना महत्त्वाचें वाटलें. मूठभर देशभक्त प्रचंड जुलमी सत्तेला आपल्या सतत अुठावणीनें व मार्मिक आघातानें हैराण करूं शकतात हा आत्मविश्वासहि सावरकरांनीं मॅझिनीचें चरित्र वाचून दृढ केला. क्रांतीचा अेक प्रयत्न फसला तरी निराश न होतां दुसऱ्याची तयारी करीत राहाणें, हा क्रम सावरकरांनीं लक्षांत ठेवला. राष्ट्रीय चळवळींत सैनिकांना आपल्या अंगचे करून घेणें म्हणजेच त्यांच्या राजनिष्ठेला हादरा देणें हेंच क्रांतीच्या अंतिम यशाचें निश्चित गमक आहे असा मॅझिनीचा विश्वास होता. सावरकर, हरदयाळ आणि सुभाष या तिघांनींहि या सैनिकी क्रांतीचे प्रयत्न पहिल्या नि दुसऱ्या महायुद्धांत केले. पण सावरकरांनीं सैनिकीकरणाची चळवळच सुरू करून ब्रिटिशांपुढें अत्यंत मोठा पेंच टाकला होता. सैनिकी क्रांतीवरील ही श्रद्धा १८५७ च्या युद्धामुळें व अिटलीसारख्या राष्ट्रांच्या अितिहासामुळें अधिकच दृढ झाली होती. म्हणूनच सावरकरांनीं त्या क्रांतीचा निर्भीडपणें पुरस्कार सतत चालविला होता.

सावरकरांनीं मॅझिनीचें क्रांतितंत्र कसें आत्मसात् केलें होतें हें या विवेचनावरून दिसून येईल. या ठिकाणीं या क्रांतितंत्राचे दोषहि सांगणें

अवश्य आहे. कारण त्यांचा परिणाम सावरकरांच्या विचारांवर व राष्ट्र-जीवनाकडे पाहण्याचा त्यांच्या दृष्टीवर झालेला आहे. पण या विधेयाची चर्चा सावरकरांच्या क्रांतिकार्याचें स्वरूप समजावून घेतल्यानंतर त्याचें समीक्षण करतांना करणें अधिक योग्य होअील. पण या सर्व विवेचनावरून मॅझिनीचें चरित्र, त्याचें तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम यांचा सावरकरांवर कसा खोल परिणाम झाला आहे हें यावरून कळण्यासारखें आहे. सावरकरांचें हें स्फूर्तिस्थान 'अभारतीय' असें म्हणणारे कांहीं लोक आहेत. त्याविषयीं अेवढेंच म्हणतां येअील कीं गुलामगिरींतून मुक्त होअूं पाहणाऱ्या राष्ट्राला जे नवे मार्ग दिसतील त्याचा विचार करावा लागतो. त्यांत अशी संकुचित दृष्टि ठेवून चालत नाहीं. पण स्वातंत्र्यासाठीं लढावयास लागणारी स्फूर्ति मात्र भारताला परदेशांपासून घेण्याचें कधींच कारण नव्हतें. कारण भारताला अनेक वीर पुरुषांचा तेजस्वी पराक्रम माहीत आहे. १८५७ मध्यें येथेंच ब्रिटिशांविरुद्धचें पहिलें स्वातंत्र्ययुद्ध लढविलें गेलें होतें आणि सावरकरांचें लहानपणचें वाङ्मय वाचल्यानंतर त्यांची स्फूर्ति कशी 'भारतीय' होती हें सहज कळण्यासारखें आहे. सावरकर हे अर्थात् केवळ परंपरावादी नसल्यानें त्यांनीं मॅझिनीच्या किंवा रशियन क्रांतिकारकांच्या तंत्राचा जवळून परिचय करून घेतला. त्यांनीं स्फूर्ति घेतली ती रामचंद्र—कृष्ण—शिवाजी यांच्यासारख्या भारतीय महापुरुषांपासूनच. पण हातांत धनुष्य-बाण किंवा तलवार न घेतां बाँब व पिस्तुलें घेतलीं अेवढाच त्याचा अर्थ !

सावरकरांचें क्रांतिकार्य

सावरकरांच्या क्रांतिवादाचें तात्त्विक व तांत्रिक स्वरूप पाहिल्यानंतर सशस्त्र क्रांतिकारक म्हणून सावरकरांनीं केलेलें कार्य लक्षांत घेणें अवश्य आहे. सावरकर हे अगदीं लहानपणापासून देशभक्तीच्या विचारानें अस्वस्थ झालेले देशभक्त आहेत. १८९८ मध्यें म्हणजे १५ वर्षांचे असतांना त्यांनीं देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु अुभारून 'मारितां मारितां मरेतों झुंजेन' अशी त्यांनीं प्रतिज्ञा घेतली. तेव्हांपासूनचें त्यांचें आयुष्य हें शांतिपर्व नसलेलें महाभारत झालें आहे. काळाच्या

प्रचंड प्रवाहांत अनेक घटना घडतांना त्यांनीं पाहिल्या. आणि अखेरीस १५ ऑगस्ट १९४७ या पवित्र दिवशीं भारतीय राष्ट्र खंडित होऊन का होईना, पण स्वतंत्र झाल्याचें त्यांनीं पाहिलें. या पन्नास वर्षांच्या काळांत सावरकरांनीं खऱ्या योद्धयाप्रमाणें देशस्वातंत्र्यासाठीं अनेक पद्धतींनीं सामना दिला. गवताच्या गंजींत शस्त्रें लपवून मुसलमानी सत्तेविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या शिवाजीराजांच्याच वंशजांनीं पुढें अुघड अुघड मोंगल बादशाहीविरुद्ध युद्ध लढवून तिच्या शिबिराचे कळस कापून जणूं कांहीं तिचें सार्वभौमत्वच हिरावून घेतलें. सावरकरांनीं आपल्या आयुष्यांतहि प्रारंभीं चोरून मारून शस्त्रें पाठवून ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या सिंहासनाखालीं बाँब पेरून ठेवले आणि पुढें त्यांची ती कल्पना विशाल प्रमाणावर मान्य झाली तेव्हां तर अुघड क्रांतीची भाषा ते प्रकट सभांतून बोलूं लागले. वीरेंद्र चट्टोपाध्याय किंवा लाला हरदयाळ यांच्याशीं त्यांचा पूर्वायुष्यांत संबंध आला; तर आयुष्याच्या अुत्तरार्धांत रासबिहारी घोस किंवा नेताजी सुभाष यांच्याशीं सहकार्य करून सावरकरांनीं हा सशस्त्र क्रांतीचा केतु अुभारण्याचे प्रयत्न केले. हें करीत असतांना राजकारणांतील अनेक आघाड्यावर लढावें लागलें. भारतापुढील समस्यांचें स्वरूप बदलत चाललें; संसदीय राजकारण (पार्लमेंटरी) या देशांत स्थिर होऊं लागलें. मुसलमानांचा प्रश्न हा या देशाच्या स्वातंत्र्य-लढ्याशीं निगडित झाला. गांधीजींच्या सत्याग्रहाचें आंदोलन मूळ धरून राहिलें. या व अशा अनेक घटनांनीं सावरकरांच्या या क्रांतिवादाला अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. स्वतःचें त्यांचें २७ वर्षांचें अैन अुत्साहाचें आयुष्य अंदमानांत आणि नंतर स्थलबद्धतेंत गेलें. त्यामुळें त्यांच्या नेतृत्वावर व राजकीय दृष्टिकोणावर त्याचा परिणाम झाला.

सावरकरांच्या या क्रांतिकार्याचें स्वरूप कोणतें होतें याचाच फक्त येथें विचार करतां येअील. त्यांच्या आयुष्यांतील असंख्य घटनांचा व त्यांच्या क्रांतिप्रयत्नांचा अितिहास त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या चरित्रांतून व त्यांच्या आत्मचरित्रांतून कळून येण्यासारखा आहे. म्हणुन येथें भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांत सावरकरांचें स्थान कोणतें आहे अेवढें ठरविण्याअितकेंच त्यांचें कार्य आपणांस पहावयाचें आहे.

क्रांतिवादाचें अध्वर्यु

चिरोलनें सावरकरांच्याविषयीं लिहितांना म्हटलें आहे— "सावरकरांचें लेखन सौंदर्य, अगाध विद्वत्ता व शोधकता हीं आकर्षक आहेत. ते बंडाचे अेक तेजस्वी नेते होत." सावरकरांविषयीं चिरोलनें काढलेल्या या गौरवोद्गारांत त्यांच्या क्रांतिकार्याचें स्वरूप सांठविलेलें आहे. सावरकरांनीं आपल्याला मिळालेल्या प्रत्येक नैसर्गिक शक्तीचा वा कलेचा देशासाठीं अुपयोग केला. त्यांचा प्रत्येक श्वास हा स्वातंत्र्यासाठीं केलेला होता असें वाटावें अितकी अुत्कटता त्यांच्या अंतःकरणांत प्रथमपासून होती. या अुत्कटतेमुळें सावरकरांचें जीवन भव्योदात्त झालें, त्यांच्या अंतःकरणांत देशाविना दुसरा कोणताहि प्रीतीचा विषय अुरला नाहीं. त्यांच्या आर्ततेचें वर्णन करतांना त्यांचे अिंग्लंडमधील सहकारी श्री. ग्यानचंद वर्मा अेकदां म्हणाले होते—" If Savarkar had any sweet heart, his country was the only sweet heart he had " सावरकरांची 'सागरा प्राण तळमळला' ही कविता त्यांच्या अंतःकरणांतील दिव्य देशप्रेमाची ज्योत आहे ! ब्रायटनला सावरकर समुद्रतीरावर बसले असतांना त्यांना ही कविता कशी स्फुरली त्याचें वर्णन श्री. निरंजन पाल या तत्कालीन स्नेह्यानें केलें आहे—

—" अितक्यांत सावरकरांनीं अेक गाणें गुणगुणावयास सुरुवात केली—ते अेकीकडे गाणें रचीत होतें व अेकीकडे ते म्हणत होते. गाणें मराठी असून, त्यांत भारताच्या दीनवाण्या दास्याचें वर्णन होतें. आत्मविस्मृतीच्या पूर्णावस्थेंत जाअून सावरकरांचें गीतगान चालू होतें. गाणें अपुरेंच राहिलें आणि अेखाद्या निष्पाप लेंकरासारखे सावरकर कंठ मोकळा करून रडूं लागले ! "

या मनःस्थितींतूनच सावरकरांचें तत्कालीन वाङ्मय जन्मलें आहे. ही अुच्च अनुभूति त्यांचें जीवन व्यापून राहिली होती. सावरकरांचें तें आयुष्य

म्हणजे स्वतंत्रतेसाठीं आत्मदान करावयास निघालेल्या जिवंत हुतात्म्याचें होतें. तेथें भौतिक जीवनांतील विलास त्यांना सुखवीत नव्हता; तर त्यांच्या डोळ्यांपुढें परतंत्र भारतमातेची कर्तव्यासाठीं हांक मारणारी व आसुसल्या नेत्रांनीं पाहणारी मूर्ति होती. त्या भारताच्या स्वातंत्र्याचें चिंतन करतांना— 'तुजसाठीं मरण तें जनन, तुजवीण जनन तें मरण' असें त्यांना वाटूं लागलें होतें. तें भव्योदात्त जीवन सावरकर होते म्हणूनच स्वातंत्र्याचे ते नुसते अुद्गाते ठरले नाहींत; तर स्वातंत्र्यवीर ठरले !

वैचारिक आंदोलन

सावरकरांच्या क्रांतिकार्यास वैचारिक आंदोलनापासून प्रारंभ झाला आहे. त्यांच्या काळांत कोणते राजकीय मतप्रवाह वाहात होते; त्यांमुळें भारतीय राजकारण कोणत्या दिशेनें वाहात होतें याची चर्चा आपण प्रारंभींच केली आहे. आज ज्याची कल्पनाहि येणार नाहीं अशा अेका मानसिक दडपणाखालीं त्या वेळचे तरुण वावरत होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं जगांत बऱ्याच ठिकाणीं क्रांतीचे प्रयत्न होत होते. ब्रिटनची साम्राज्यनीति ही कशी दुहेरी आहे, तिच्यांत राष्ट्रजीवन पोंखरून काढण्याचे डाव कसे आहेत याची जाणीव लोकांना होत होती. सावरकरांना या सर्व प्रवाहांचें विश्लेषण करून सशस्त्र क्रांतिवादाचा पुरस्कार करावयाचा होता. टिळक व नेमस्त हे दोन पक्ष त्या वेळीं प्रभावी होते. त्या दोघांशीं प्रत्यक्षतः सावरकरांचा विरोधच होता. श्यामजी कृष्णवर्मासारखे लोक शांततामय क्रांतीची भाषा बोलत. म्हणजे देशाला क्रांति तर हवी होती; सत्तासंक्रमण व्हावें, राज्यकारभार सुधारावा असें तर सारखें वाटत होतें; पण सुलभ मार्ग तर आढळत नव्हता. अशा गुदमरलेल्या मनःस्थितींत त्या वेळीं राष्ट्र होतें.

म्हणून सावरकरांनीं त्या काळीं स्पष्ट घोषणा केली कीं, सशस्त्र क्रांतीविना स्वातंत्र्य अशक्य आहे. * लोकमान्य टिळकांनीं पुरस्कारलेल्या सुराज्य—होमरूल—स्वराज्य या ध्येयांचा पाठपुरावा अपुरा आहे असें मानून लोकमान्य

---

* सावरकर आत्मचरित्र भाग १ पृष्ठ ८९, ९०

जेथें थांबले तेथून सावरकर आणि त्यांचे सहकारी पुढें सरले. ते जे मनांत बोलत, त्याची गर्जना यांनीं केली. त्यांना पुढचीं पावलें निर्वेधपणें टाकतां यावींत म्हणून त्यांच्याहि पुढें जाऊन सशस्त्र सैन्याचा मार्ग निष्कंटक करण्याचें पुरस्सर पथकाचें कार्य या क्रांतिकारकांनीं करण्यास सुरुवात केली. लोकमान्य म्हणजे त्या तळपत्या खड्गाची मूठ होते—सावरकर आदि क्रांतिकारक त्या खड्गाचें पातें होतें. मूठ हें जरी पातें होऊं शकत नाहीं, तरी पातें हें मुठीच्याच आधारावर रणकंदनांत लवलवतें. पातें मुठीचेंच मनोगत ओळखून आणलें काम करीत असतें. सावरकर व लोकमान्य टिळक यांच्या ध्येयवादांतील फरक हा अशा स्वरूपाचा होता असें त्यांनींच म्हटलें आहे. सावरकर लोकमान्याविषयीं अेकदां म्हणाले होते कीं, आम्हां क्रांतिकारकांना लोकमान्य रात्रीं १२ नंतर भेटत. याचाहि अर्थ हाच होता.

पण सावरकरांनीं आपल्या क्रांतिवादाचा प्रचार प्रभावानें करण्याचें कारण म्हणजे त्या वेळीं बद्धमूल होऊन राहिलेलें दैवी संकेताचें (divine dispensation) तत्त्व !—ब्रिटिश हे अीश्वरी योगायोग म्हणून या देशांत आले ही भावना अितकी बळावली होती कीं, त्या काळीं सावरकरांना हें कसें खोटें आहे हें सिद्ध करण्यासाठीं ' Are we obliged to the British Rule ? ' या विषयावर शेंकडों व्याख्यानें द्यावीं लागलीं. युरोपांत आणि भारतांत हें वैचारिक आंदोलन त्यांनीं घडविलें. गोखल्यांनासुद्धां त्यांच्याशीं झालेल्या चर्चेंत सावरकरांनीं क्रांतिवाद पटवून देण्याचा प्रयत्न केला. पं. श्यामजी कृष्णवर्मांना त्यांनीं आपल्या बाजूला वळविलें. सावरकरांनीं अेकदां त्यांना सांगितलें कीं —

" शांततामय क्रांतीचा पुरस्कार करून तुम्हीं देशाचें दुहेरी नुकसान करीत आहांत. तुम्हांला स्वतःला सशस्त्र क्रांतिवादी होणें अशक्य आहे, म्हणून जर तुम्हीं सशस्त्र क्रांतिवादच चूक आहे असें मानूं लागलांत तर तुम्हीं स्वतः भाग न घेण्याचा व जनतेची

दिशाभूल करण्याचा असे दोन गुन्हे करीत आहांत. तुम्हांला स्वतःला क्रांतिवादी न होता सशस्त्र क्रांतिवादाचा अवश्य प्रचार करतां येईल."

सावरकरांच्या या प्रकारच्या युक्तिवादानें श्यामजी कृष्णवर्मांचें मत पुढें बदललें. तें बदललें याचा अुत्कृष्ट पुरावा म्हणजे गांधीजींनीं श्यामजींच्या मार्गाविषयीं त्यांचें अेक मित्र डॉ. पी. जे. मेथा यांना दि. ३–१२–१९०६ ला पाठविलेल्या अेका पत्रांत व्यक्त केलेली नापसंती हा आहे! त्यांत गांधींनीं 'श्यामजींचे मार्ग अधर्मावर आधारलेले आहेत' असा शेरा मारला आहे. सावरकरांच्या क्रांतिवादाचा हा प्रचार प्रभावी होत चालला हें पाहून गांधींनीं 'मारो काटो का पंथ' हें पुस्तक लिहिलें. तें पुस्तक कां लिहिलें याचें स्पष्टीकरण १९२१ सालीं अेका लेखांत करतांना गांधीजी म्हणतात—

"भारतीय हिंसापंथाला व दक्षिण आफ्रिकेंतील तत्सम पंथाला अुत्तर म्हणून हें पुस्तक मी लिहिलें. लंडनमधील मुक्कामांत प्रख्यात अशा प्रत्येक क्रांतिकारकांशीं माझा संबंध आला. त्यांच्या शौर्याची छाप माझ्या मनावर पडली; पण त्यांचा अुत्साह चुकीच्या मार्गाकडे वळलेला आहे असें मला वाटलें. भारताच्या आपत्तीवर हिंसा हा तोडगा नव्हे असें मला वाटलें. भारतीय संस्कृतीचें संगोपन होण्यासाठीं हिंसेहून भिन्न व हिंसेहून श्रेष्ठ अशा शस्त्राची आवश्यकता आहे असेंहि मला वाटलें." (हिंदस्वराज्य—१९३८ ची आवृत्ति)

सावरकरांनीं लंडनहून भारतांत पाठविलेलीं बातमीपत्रें वाचलीं म्हणजे सशस्त्र क्रांतिवादाचा पद्धतशीर प्रचार त्यांनीं कसा चालविला होता हें कळून येण्यासारखें आहे. त्या वेळचे अिंग्लंडमधील अेक समाजवादी नेते मि. हिंडमन यांनीं केलेल्या अेका भाषणांत रशियामध्यें चाललेल्या क्रांति-प्रयत्नांचा अुल्लेख केला होता. आशियांत जपान, चीन यांमध्यें जे क्रांतीचे

प्रवाह वाहात होते त्यांचा सावरकरांनीं मुद्दाम अुल्लेख आपल्या बातमी-पत्रांतहि केलेला आहे. त्या वेळच्या आंतरराष्ट्रीय वातावरणांत जणूं क्रांतीचे वेगवेगळे प्रवाह निरनिराळ्या देशांत वाहातांना दिसत होते. राज्यशास्त्र, सामाजिक अर्थशास्त्र या दोन्ही दृष्टींनीं १९०५ पासून जगांतील वेग-वेगळ्या देशांत नवीन हालचाली होत होत्या. सावरकरांनीं या सर्व घट-नांचा फायदा आपल्या क्रांतिवादाच्या प्रचारासाठीं करून घेतला आहे.

क्रांतिवाङ्मय

क्रांतिवादाच्या प्रचारासाठीं सावरकरांनीं आपली लेखणी अक्षरशः राबविली आहे. सावरकरांचें क्रांतिवाङ्मय म्हणजे यज्ञाची धगधगीत ज्वाला आहे. जुलुमाच्या टांचेखालीं चिरडल्या जाणाऱ्या राष्ट्राचें केवळ आक्रंदन त्यांत नाहीं; तर हृदयें क्रोधानें, संतापानें पेटावींत, आणि मन कृतीसाठीं तळमळूं लागावें असें तें 'प्रक्षोभक' वाङ्मय आहे. सावरकरांनीं १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध व मॅझिनीचे लेख यांचा केवळ प्रचारासाठीं अुपयोग केला, स्वतःच्या अितिहासांतील अेक तेजस्वी घटना लोकांसमोर मांडून अप्रत्यक्ष-पणें त्यांना 'मारो फिरंगीको' म्हणून सांगण्यासाठीं '१८५७' हें पुस्तक त्यांनीं लिहिलें. १८५७ च्या हुतात्म्यांना उद्देशून त्यांनीं जें पत्रक प्रसिद्ध केलें होतें त्यांत तर स्पष्टपणें सावरकर म्हणतात—

> "हुतात्म्यांनो...तुम्ही केलेल्या घोषणेचा आम्ही स्वीकार करतों; तुम्ही अुभारलेल्या ध्वजाचा आम्ही सन्मान करतों; क्रांतियुद्धाच्या धुमश्चक्रींत तुम्ही 'मारो फिरंगीको' हे प्रेषिताला शोभणारे शब्द अुच्चारून जें दाहक कार्य निश्चित केलेंत तें पुढें चालविण्याचा आमचा निर्धार आहे."

१८५७ वरचें त्यांनीं लिहिलेलें पुस्तक ही तर स्फूर्तींची गीता झाली होती. हरदयाळ, भगतसिंग, सुभाष यांच्यासारख्या क्रांतिकारकांनीं त्या पुस्त-काचा प्रचार केला आणि हजारों अंतःकरणें पेटविलीं. त्यांच्याखेरीजहि

अितर लक्षावधि तरुणांनीं त्या पुस्तकाचा अुपयोग केला आहे. त्यांतील माहिती, त्याची भाषा, आणि त्या सर्व ग्रंथामागें असलेलें ' देशवेडें ' अंतःकरण यामुळें तें पुस्तक अद्वितीय ठरलें आहे. १८५७ चें बंड हें बंड नसून तें क्रांतियुद्ध होतें, हा सिद्धान्तहि सावरकरांनींच मांडला. त्याच्यावर त्यांनीं शेंकडों भाषणें केलीं, त्या अमर वीर पुरुषांचें गुणगान केलें, आणि त्या पद्धतीनें क्रांतिवादाला पोषक अशी वृत्ति निर्माण केली.

मॅझिनीचें चरित्र याच अुद्देशानें लिहिलें. त्याची प्रस्तावनाच इतकी स्पष्ट आहे कीं त्यांत ' बंड करा ' असेंच म्हणण्याचें बाकी अुरलें होतें. मॅझिनीचें तत्त्वज्ञान, क्रांतितंत्र यांचा पानापानांवर तुम्हांला ठसा अुमटलेला आढळेल. त्यांतून तत्कालीन पिढीला क्रांतिवादाचा अप्रत्यक्ष संदेश देणें अेवढाच प्रमुख उद्देश होता. आणि त्या पुस्तकालाहि जप्त करून सरकारनें राजाश्रय दिला, व लोकांनीं तें अनुसरून लोकाश्रय दिला. सावरकरांच्या अितर काव्य-वाङ्मयापेक्षां त्यांचे पोवाडे मात्र अधिक प्रेरक ठरले. हृदयांतलीं फुलें फुलविणाऱ्या कविता त्यांनीं केल्या नाहींत, तर राष्ट्रभक्तीनें रसरसलेलीं कवनें केलीं. त्यांचे पोवाडे मुखोद्गत करणें हाच क्रांतिवादाचा गुप्तपणें प्रचार करण्याचा अुत्कृष्ट मार्ग झाला होता. सावरकरांच्या या पोवाड्यांचें सामर्थ्य त्या काळच्या तरुणांनीं अनुभवलें आहे.

सावरकरांनीं स्वत:च्या वाङ्मयासंबंधीं असें अेकदां सांगितलें होतें कीं, माझी लेखणी मी लाठीसारखी फिरविली होती. तुम्हांला चुकून त्यांत कला आढळली, अेवढेंच ! हे त्यांचे अुद्गार त्यांच्या वाङ्मयामागील हेतु दर्शवितात. गुरुदेव रवींद्रनाथांना त्यांनीं ' नोबेल पारितोषिक ' मिळाल्यानंतर जी अभिनंदनपर कविता पाठविली होती त्यांत सावरकरांनीं स्वतःच्या काव्याचा व जीवनाचा हेतु मांडला होता. सावरकर त्यांत म्हणतात—

कविकक्ष पूर्ण हा माझा
परि अुणीव तेथें जा जा
क्रांतिच्या वाष्पयंत्राचा । कक्ष तो
देवीची आज्ञा अैशी
मलधूम कोळशामाजी
त्या अग्निप्रेरक कक्षीं । मी खपें

"भारतमाता आपली राजधानी परत घेण्यासाठीं सैनिकवाष्परथांतून निघाली. या कार्यीं कवींची अुणीव नाहीं. अुणीव आहे ती त्या समर-रथाच्या यंत्रांत राबणाऱ्या नि स्वतः कोळसे होऊन जळून गति देणाऱ्यांची; म्हणून तेथें जा अशी देवीची आज्ञा झाली" या भावनेमुळें सावरकरांनीं काव्याची फुलबाग फुलविली नाहीं, तर काव्यांतून अग्निकण अुधळले ! म्हणून सावरकरांचें वाङ्मय हें अेका दृष्टीनें चिरंतन स्वरूपाचें आहे. ज्यांना आपली देशभक्तीची भावना प्रज्वलित करून घ्यावयाची असेल, जुलुमी सिंहासनें अुलथून टाकणाऱ्या क्रांतिशक्तीची अुपासना करावयाची असेल त्यांनीं या वाङ्मयाचा परिचय करून घ्यावा ! या दृष्टीनेंच सावरकरांच्या क्रांतिकार्यांत त्यांनीं लिहिलेलें हें वाङ्मय हा अेक महत्त्वाचा भाग ठरतो.

लंडनमधील संघटना व प्रचार

भारतीय तरुण अिंग्लंडमध्यें गेला कीं तो चैनी, विलासी, सुखलंपट होअी. सावरकरांनीं तेथें गेल्यावर निर्माण केलेलें वातावरण देशभक्तीचें, हौतात्म्याचें होतें. विलासप्रिय तरुणांना देशभक्त करून क्रांतीचा मंत्र देणें हें तर त्यांचें कार्य होतें. अिंग्लंडमध्यें अुच्च शिक्षणासाठीं येणारे लोक बुद्धिमान् असत; भारताच्या सर्व प्रांतांतील तरुण तेथें येत. त्यामुळें सावरकरांना अधिक फायदा झाला. त्यांना सर्व भारतांत क्रांतीचें जाळें विणण्याचें प्रयत्न करणें सुलभ झालें. सावरकरांनीं तेथें गेल्यावर ताबडतोब संघटनेस सुरुवात केली. त्या वेळच्या त्यांच्या सहकाऱ्यांत हरदयाळ, वीरेंद्र चट्टोपाध्याय, मदनलाल धिंग्रा, व्ही. व्ही.

अेस्. अय्यर, निरंजन पाल, बॅ. असफअली, सेनापति बापट, पं. श्यामजी कृष्ण वर्मा, मॅडम कामा अित्यादि सर्व प्रांतीय शेंकडों देशभक्त होते.

सावरकरांच्या तेथील वैचारिक आणि संघटनात्मक आंदोलनामुळें तरुणांची सुखलंपटता कमी झाली. देशसेवेला वाहून घेणारे, थंडीपुरतें वस्त्र आणि भुकेपुरतें अन्न ग्रहण करणारे तरुण निर्माण होऊं लागले. देशभक्तीच्या वेडानें त्यांना पछाडल्यामुळें त्या तरुणांच्या नेत्रांत रंगेलपणाअैवजीं पवित्र स्वार्थत्यागाचें तेज दिसूं लागलें. 'लंडन टाइम्स'नें सप्टेंबर १९०८ मध्यें त्या वेळच्या लंडनमधील भारतीय तरुणांवर अेक लेख लिहिला होता. त्यांचें वर्णन करतांना टाइम्सकार म्हणतात—

"निरनिराळ्या खेळांत हौसेनें मिसळण्याचे स्थळीं अिंग्रजी लोकांत मजा मारणें, चहा पिणें, त्यांच्याशीं गोडीगुलाबीनें राहाणें वगैरे स्नेहवर्धक गोष्टी शिकविण्यासाठीं भारतीय विद्यार्थ्यांना अेकत्र करणाऱ्या ज्या संस्था अिंग्रजांनीं काढल्या आहेत, त्यांत कोणताहि भाग न घेतां हे तरुण अलिकडे राजकारणाच्या वाळवंटांत गुरफटलेले दिसतात. आम्हीं त्यांना त्यांच्या तारुण्याला साजेल अशा आनंदी वृत्तींत ठेवण्यासाठीं केलेले सर्व प्रयत्न विफल होतात. कारण अुलट दिशेनें प्रयत्न करणारे जहाल तरुण आपल्या वजनानें अधिक लोकांना राजकारणाच्या क्षुब्धतेंत सहज ओढूं शकतात. सर्व अिंग्लंडभर पसरलेल्या व अेडिंबरोमध्येंच असलेल्या या पांचशेंएक तरुण हिंदी लोकांकडून गेल्या ता. १७ मेच्या सभेला अिंडिया हाअुसमध्यें देशवीर स्मृतीप्रीत्यर्थ शंभरवर अिंडियन जमावे ही एकच गोष्ट आमच्या म्हणण्याची सिद्धता करीत आहे!"

याच लेखांत शेवटीं सर्व भारतीयांना अेका कोंडवाड्यांत कोंडून त्यावर अिंग्लिशांची सक्त देखरेख अुर्फ पहारा ठेवावा अशी सूचना केली आहे. हिंदुस्थानांत वाढत चाललेली टिळकांची चळवळ, आणि अिंग्लंडमधील तरुणांची चळवळ यांमुळें अस्वस्थ होअून अिंग्लिश वृत्तपत्रें ब्रि. सरकारला

जागें करूं लागलीं. मवाळ राजकारण संपून आंदोलनाचें राजकारण सुरू झाल्याची सूचना दिली. परदेशी वार्ताहर भारतीयांच्या भेटी घेऊं लागले. ब्रिटिश लोकसभेंत प्रश्नोत्तरांच्या फैरी झडूं लागल्या. इंग्लंडमध्यें भारतीय विद्यार्थ्यांना अकस्मात् समान दर्जा मिळूं लागला.

सावरकरांनीं या काळांत १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा स्मृतिदिन, शिवोत्सव, रामजन्म इत्यादि कार्यक्रम ठेवून हा प्रचार व्यापक प्रमाणावर चालू ठेवला. अधिकाधिक माणसें या निमित्तानें गोळा करावींत, व त्यांतलीं योग्य तीं माणसें हेरून आपल्या आंतल्या गोटांत ओढावींत, म्हणून प्रचाराचें भलें मोठें जाळें सावरकरांनीं पसरून ठेवलें. १९०८ च्या सुमारास भारतांतहि राजकीय आंदोलन, असंतोष मोठ्या प्रमाणावर होता. भारतासंबंधींची बातमी छापणें, किंवा त्याविषयीं कांहीं लिहिणें हें ब्रिटिश पत्रें मोठ्या नाखुषीनें करीत. पण आजपर्यंत जे दुर्लक्ष करीत होते, हिंदुस्थान हा जणुं अुकिरड्यावर पडलेल्या मृत श्वानासारखा देश आहे अशा कुत्सितपणें जे भारताकडे पहात होते, त्यांनीं भारताविषयीं स्तंभच्या स्तंभ लिहिण्यास सुरुवात केली. त्यांची धांदल अुडाली; ब्रिटनमध्येंच भारताच्या सशस्त्र राज्यक्रांतीचीं बीजें पेरलीं जात आहेत या भीतीनें ते अस्वस्थ झाले. हिंदी तरुणांच्या मनांतील या दैवी नि तेजस्वी भावनेचा संचार पाहून भूकंपानें पृथ्वी हालावी तसें ब्रिटिश सरकारचें होअूं लागलें. जे गुलामींत आनंद मानणारे विद्यार्थी आतां आपले शत्रु झाले हें पाहून दडपशाहीचें शस्त्र अुगारण्याचे विचार ब्रिटिशांच्या मनांत येअूं लागले. क्रांतीच्या शस्त्राचें आणि शास्त्राचें हें ज्ञान म्हणजे आपल्या सर्वनाशाची सिद्धता असें त्यांना वाटूं लागलें.

अिकडे महाराष्ट्र, बंगाल पेटलाच होता. जणु क्रांतीचे सुरुंग सर्वत्र पेरले आहेत असें ब्रिटिश सरकारला वाटलें. या सर्व जाणिवेची प्रतिबिंबें ब्रिटिश पत्रांत दिसत. 'स्टँडर्ड' या वृत्तपत्रानें तत्कालीन भारतीयांविषयीं लिहितांना पुढील इशारा इंग्रज सरकारला दिला होता—

(लंडनचीं बातमीपत्रें, पृष्ठ १४)

" आपण ज्वालामुखीच्या तोंडावर बसलों आहोंत असें दिसतें. अर्ध्या शतकापूर्वी जें वादळ अुठलें होतें, त्यापेक्षां या नव्या स्फोटाचें स्वरूप वेगळें असलें तरी तें तितकेंच खेदजनक आहे. सरकाराविरुद्ध क्रियाशील व भयंकर असें हें असंतोषाचें आंदोलन आहे. सरकारला अव्हेरून अुघडअुघड शस्त्राचार प्रचारिला जात आहे. "

दुसरें अेक वृत्तपत्रहि या घटनांचा तळमळीनें अुल्लेख करून म्हणतें—

" अिंग्लंडमधील कांहीं भारतीय रहिवाश्यांनीं त्यांच्या येथील देशबांधवांत असंतोष निर्माण करण्याचा अुत्पाती प्रयत्न चालविला आहे. आणि ते हजारोंनीं वाटत असलेल्या ' दोन अैतिहासिक कागदपत्र ' या पत्रकांवरून हें स्पष्ट कळून येत आहे कीं त्यांना त्या तरुणांत क्रांतीचीं बीजें पेरावयाचीं आहेत. आपल्या विद्यापीठांतील बरेच बुद्धिमान् भारतीय तरुण व बॅरिस्टरीसाठीं आलेले विद्यार्थी सर्व प्रकारचीं साधनें वापरून तरुण पिढींत सशस्त्र अुठावणीच्या कल्पनेचा परिचय करून देत आहेत. "

पुढें मदनलाल धिंग्रानें कर्झन वायलीचा खून केला तेव्हां तर सर्वत्र भडका अुडाला. सगळीं पत्रें पिसाळलीं, आणि अधिकारी संशयी झाले, बावरले. सावरकरांनीं कॅक्स्टन हॉलमध्यें केलेल्या निषेधामुळें त्यांच्याकडे जनतेचें लक्ष वळलें. या व अशा अनेक घटनांनीं सावरकर व त्यांचे सहकारी यांनीं लंडन हें भारतीय क्रांतीचें रहस्यागार व प्रचारकेंद्र करून सोडलें. सावरकरांनीं येथें अनेक परदेशी क्रांतिकारकांशीं संबंध जोडले; अेक लहानशी परंतु पिळदार संघटना अुभारली. सावरकरांचें लंडनमधील अस्तित्व म्हणजे भारतीय विद्यार्थ्यांना क्रांतिवादी करून सोडणारी महान् संधी ठरली !

बाँब व पिस्तुलांची विद्या

सावरकर हा प्रचार व संघटना करूनच थांबले नाहींत. भारतांतील व अिंग्लंडमधील चळवळीचें सूत्रचालन सावरकरच करीत असल्यामुळें

त्यांच्यापुढें क्रांतीची अेक निश्चित योजना होती. त्या सर्व योजनांचें व चळवळीचें स्वरूप सावरकरांच्या आत्मचरित्रांत येअीलच. पण सर्वसाधारणपणें सावरकरांनीं काय योजना आंखली होती हें पाहतां येईल. भारतांतील वेगवेगळ्या प्रांतांतून अुच्च शिक्षणासाठीं अिंग्लंडमध्यें बरेच विद्यार्थी जात. ते जर क्रांतीला अनुकूल झाले तर सर्वत्र त्यांची संघटना करून भारतांत अुठावणी करतां येईल अशी सावरकरांची अपेक्षा व योजना होती. सावरकरांनीं अिंग्लंडमध्यें त्यासाठीं कर्में संघटन चालविलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. पण सावरकरांनीं क्रांतिप्रयत्नांतील पुढचें पाअूल म्हणून भारतीय विद्यार्थ्यांना शस्त्रविद्या शिकण्यास सांगितलें, व भारतांत पिस्तुलें पाठविण्यास सुरुवात केली. विलायतेंत शस्त्रांवर निर्बंध नव्हते, त्याचा फायदा क्रांतिकारकांना घेतां आला.

सेनापति बापट, हेमचंद्र दास व होतिलाल वर्मा यांनीं अेका रशियन क्रांतिकारकाच्या साहाय्यानें बाँब तयार करण्याची माहिती घेतली व ते दोघे भारतांत आले. होतिलाल वर्मांनीं लोकमान्य टिळकांना तें बाँबचें रहस्य दिल्याची माहिती आहे. सेनापति बापटांनीं आणलेल्या बाँबरहस्याचा अुपयोग करून महाराष्ट्रांतील 'अभिनव भारतानें' बाँबचा कारखाना काढण्याचे प्रयत्न केले. त्या बाँब रहस्याच्या शेकडों प्रति अभिनव भारताच्या शाखांकडे गेल्या. महाराष्ट्रांत वसअीजवळ बाँबचा गुप्त कारखाना सुरू झाला. बंगालमध्येंहि हीच सिद्धता चालू होती. सावरकरांनीं अिंग्लंडमधून पाठविलेली पिस्तुलेंहि वांटली गेलीं. त्यांतील अेकाचाच अुपयोग जॅक्सनवर करण्यांत आला. तसेंच मुझफरपूरलाहि खुदिराम बोसनें बाँब फेंकला होता. अशा रीतीनें बाँब तयार करून विध्वंसाच्या सर्व योजना आंखल्या गेल्या होत्या. या सगळ्यांचें प्रमाण फार मोठें होतें. इतर अनेक गुप्त संस्थाहि असेच बेत आंखीत होत्या. अर्थात् हे सर्व क्रांतीचे स्फोट होण्याआधींच ते प्रयत्न अुघडकीला आले हा भाग वेगळा. पण अगदीं सामान्य मध्यम वर्गीयांनीं आपल्या भवितव्यावर निखारे ठेवून केवढी त्यागाची, पराक्रमाची सिद्धता केली होती हें या विफल प्रयत्नांवरूनहि कळून येण्यासारखें आहे. ह्याचें बरेंचसें श्रेय सावरकरांनीं

लंडनमध्यें राहून आंखलेल्या दूरदर्शी योजनेला आहे. त्यांच्या योजनेप्रमाणें सर्व घडलें असतें तर समुद्रांत टाकलेलीं हीं बाँबचीं रसायनें आणि जमिनींत पुरलीं गेलेलीं पिस्तुलें यांनीं शत्रूच्या सिंहासनाला प्रचंड हादरा दिला असता. सावरकरांनीं केलेलें हें शस्त्रपूजन किंवा शस्त्रसाधना फुकट गेली नसती.

आंतरराष्ट्रीय प्रचार

सावरकरांनीं आपल्या लंडनच्या वास्तव्यांत अनेक परदेशी देशभक्तांशीं ओळखी करून घेतल्या होत्या. ब्रिटिश, फ्रेंच, रशियन इत्यादि देशभक्तांशीं त्यांनीं परिचय करून घेतला होता. मॅडम कामा व श्यामजी कृष्ण वर्मा यांचें वास्तव्य पॅरिसलाच असल्यामुळें तेंहि अेक क्रांतीचें केंद्र झालें होतें. सावरकरांच्या बरोबरीचे देशभक्त लाला हरदयाळ, वीरेंद्र चट्टोपाध्याय यांनीं युरोपांतच बरेंचसें आयुष्य काढलें. सरदार अजितसिंग, बॅ. राणा यांच्या सारख्यांनीं अगदीं परवा परवांपर्यंत युरोपमध्यें वास्तव्य टेवलें होतें. सुभाष-बाबूंना या दोघांनींहि चांगलीच मदत केली होती. पहिल्या महायुद्धाच्या वेळेसहि जर्मनीच्या मदतीनें 'आझाद हिंद सरकार' स्थापण्याचे प्रयत्न राजा महेंद्रप्रताप आदींनीं केले होते. अगदीं बरोबरीच्या नात्यानें त्यांचें करार झाले होते. या सर्व क्रांतिप्रयत्नांचा अितिहास अज्ञात आहे. पण हे सर्व जाळें सावरकरांनीं युरोपमध्यें गेल्यानंतर विणलें, आणि त्याचा अगदीं सुभाषचंद्रांपर्यंत अुपयोग झाला. हें आंतरराष्ट्रीय राजकारण ५० वर्षांपूर्वी सावरकरांनीं केलें. त्याचें खरें स्वरूप त्यांच्याविना दुसरें कोण सांगणार ?

सावरकर पुढें पकडले गेले. त्यांना भारतांत आणलें जात असतांना त्यांनीं त्रिखंडांत गाजलेली जी अुडी टाकली त्यामागेंहि सांपडलों तर भारताचा प्रश्न जगासमोर मांडतां येअील, किंवा कदाचित् स्वतंत्रहि होअीन हीच भावना होती. त्या वेळीं रशियन क्रांतिकारकांच्या अनेक वीरकथा कानांवर येत. भारतीयांनाहि अशीं कृत्यें कां करतां येऊं नयेत असें सावरकरांच्या साहसी तरुण मनाला वाटे. त्या अस्वस्थेंतूनच त्यांचा समुद्रांत अुडी मारण्याचा विचार कायम झाला. त्यांनीं प्रिन्स क्रोपोट्किन या

रशियन क्रांतिकारकाच्या पलायनाचें अेक पुस्तक वाचलें होतें. त्यानें तुरुंगांतून कसें पलायन केलें होतें याची त्यांत इत्यंभूत माहिती होती. सावरकरांनीं त्याचेंच अनुकरण करण्याचें ब्रिस्टलच्या तुरुंगांतच ठरविलें. त्यासाठीं तुरुंगांतच 'तालीम' सुरू केली. 'मार्सेलिसला भेटा' असें पत्रहि पुढील व्यवस्थेच्या दृष्टीनें पॅरिसच्या मित्रांना पाठवून ठेवलें. (हें पत्र ब्रिटिशांच्या तीक्ष्ण नजरेंतून निसटलें नसावें, आणि म्हणूनच 'मोरिया' बोट धक्क्याला न लावण्याची व तेथें फ्रेंच अधिकारी तयार ठेवण्याची व्यवस्था फ्रेंच सरकारनें करावी असें ब्रिटननें कळविलें असावें असा अेक तर्क आहे.) कारण सावरकरांना घेऊन येणाऱ्या बोटीवर सशस्त्र हल्ला चढवून त्या गोंधळांत त्यांची सुटका करावयाची असा क्रांतिकारकांचा बेत होता. पण हें घडलेंच नाहीं, आणि दुर्दैवानें सावरकर पकडले गेले.

मार्सेलिसच्या किनाऱ्यावर पाअूल ठेवल्यावर आपण फ्रान्सचे अश्रित आहोंत असें सावरकरांनीं तेथील अधिकाऱ्यांना सांगितलें, व आपल्या आंतरराष्ट्रीय निर्बंधाच्या ज्ञानाचा अुपयोग करून सुटकेची मागणी केली. पण ब्रिटननें अगोदरच सगळी व्यवस्था केली असल्यामुळें त्याचा कांहीं अुपयोग झाला नाहीं. पण भारताचा प्रश्न जगापुढें मांडतां येअील या अिच्छेनें हेगच्या न्यायालयापर्यंत सावरकरांनीं जावयाचें ठरविलें. त्या वेळचीं वृत्तपत्रें वाचलीं म्हणजे या प्रकरणानें फ्रान्स, इंग्लंड अित्यादि राष्ट्रांत किती खळबळ अुडाली होती हें कळण्यासारखें आहे. आंतरराष्ट्रीय निर्बंधांच्या दृष्टीनें हें प्रकरण तर अद्वितीय होतेंच, पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यामुळें राजकीय आश्रितांचा प्रश्न चर्चिला गेला. इंग्लिश पार्लमेंटच्या सभासदांत व फ्रेंच मुत्सद्द्यांत या मुद्द्यावर मतभेद झाले. 'मँचेस्टर गार्डियन'नेंहि आश्चर्य व्यक्त केलें. या निर्णयामुळें हेगच्या लवादाप्रमाणें अेक कायम स्वरूपाचें न्यायालय प्रस्थापित केलें जावें अशा प्रकारच्या सूचना ढें आल्या. अशा तऱ्हेची अुलटसुलट टीका झाली तरी सावरकरांनीं स्वतःचें नांव तर क्रांतीच्या अितिहासांत लिहून ठेवलेंच, पण या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूपाची चालना दिली.

अंदमान आणि रत्नागिरी

सावरकरांना अंदमानची ५० वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा झाली. ५० वर्षे ! कल्पनेची कक्षा कितीहि वाढविली तरी तिच्यांत हें विजनवासाचें चित्र सामावूं शकणार नाहीं अितकें तें भयंकर जीवन होतें. क्रांतीच्या यज्ञात सावरकरांनीं आपलें सर्वस्वच वाहिलेलें असल्यामुळें हा देशभक्तीचा पहिला हप्ता मानून सावरकर अंदमानच्या बोटींत बसले. आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या गरुडाचे पंखच कापावे, तसें हें झालें. अंदमानांत गेल्यावर मृत्यूनें वारंवार घिरट्या घातल्या. काथ्या कुटतांना, तेलाचा घाणा फिरवीत असतांना आत्महत्येचे विचार मनांत थैमान घालीत. मन कच खाअूं लागे; तेव्हां विवेकानें त्याला धीर द्यावा, आशेची वात पुन्हां पुढें सारावी. अशा रीतीनें तत्त्वचिंतन करीत—अितकेंच नव्हे तेथेंहि शुद्धिसंघटनांचें कार्य करीत सावरकर १४ वर्षें राहिले. विजनवासांत त्यांची प्रतिभा फुलली—आणि 'कमले'ची फुलबाग त्यांनीं तेथेंहि फुलविली !

सावरकर तुरुंगांत कोंडले गेल्यानंतर त्यांचें स्वतःचें असें क्रांतिकार्य संपलें. पण त्यांचे सहकारी स्वस्थ बसले नाहींत. बॅ. राणा, लाला हरदयाळ, वीरेंद्र चट्टोपाध्याय यांनीं युरोप–अमेरिकेंत चळवळी केल्या. होतिलाल वर्मांनीं हाँगकाँग, सिंगापूर या भागांत सैन्यांत बंड घडविण्याचे प्रयत्न केले. मुसलमानी प्रदेशांतून कारस्थानांची पेरणी करून पंजाब, वायव्य सीमाप्रांत या भागांत योग्य वेळीं अुठावणी करावयाची, व अमेरिकेच्या प्रशान्त महासागरानजिक मलाया, अिंडोचायना, ब्रह्मदेश, सयाम वगैरे भागांत सिद्धता ठेवून भारताच्या पूर्व सीमेवर गडबड अुडवावयाची, असा व्यूह या मंडळींनीं रचला होता. अंदमानच्या कैद्यांना मुक्त करण्याचेंहि टरलें होतें. 'अेम्डन' जहाजांतून किंवा 'कोमागारामारु' जहाजांतून आलेल्या शस्त्रास्त्रांचीं प्रकरणें हीं याच क्रांतिकारकांनीं घडविलीं होतीं. अमेरिकेंत 'गदर' पंथ प्रभावी झाला. अशा असंख्य चळवळी या थोर निर्वासित, परागंदा झालेल्या देशभक्तांनीं केल्या. वीरेंद्रासारखे अनेक

देशभक्त मातृभूचें स्मरण करीत अश्रुतपर्णें मरण पावले. आज त्यांचे पोवाडे कोणी गात नसला तरी अेके काळीं भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार आणि क्रांतीची सिद्धता परराष्ट्रांत राहूनहि त्यांनीं केली होती हें अितिहास विसरणार नाहीं !

सावरकर अंदमानांतून सुटले आणि रत्नागिरींत त्यांना स्थलबद्ध करण्यांत आलें. त्यांना राजकारणांत भाग घेण्याची बंदी होती, मग क्रांतिकारक प्रयत्नांचें काय विचारतां ? पण येथेंहि सावरकरांनीं १९२४ नंतर झालेल्या क्रांतीच्या प्रयत्नांत आपल्या सर्व कक्षा न जुमानतां गुप्तपणें संबंध ठेवले होते. पण त्याची माहिती त्यांच्याविना कोण देणार ? त्यांनींच कधीं तरी अितिहास म्हणून देशापुढें मांडली पाहिजे.

बदललेली आघाडी व नवे पवित्र

रत्नागिरीच्या स्थलबद्धतेंतून सावरकर सुटले, आणि त्यांच्यापुढें कोणता राजकीय पक्ष स्वीकारावा असा प्रश्न अुभा राहिला. १९१० ते १९३७ पर्यंतच्या काळांत भारतीय राजकारणांत अनेक अुलथापालथी झाल्या होत्या. गांधीजींचें नेतृत्व या काळांत देशानें मान्य केलें होतें. गांधींनीं लोकमान्य टिळकांनीं निर्माण केलेला असंतोष अधिक व्यापक प्रमाणावर पसरविला. स्वदेशी, बहिष्कार हीं टिळकांनीं पुरस्कारलेलीं दोन सूत्रें त्यांनीं अुचललीं. टिळकांनीं नोकरशाही खिळखिळी करण्यासाठीं जनतेंत आघाडी अुघडलीं, असंतोषाचें बीज पेरून ठेवलें. गांधीजींनीं १९२० मध्यें कॉंग्रेसचें नेतृत्व स्वीकारल्यावर या गुप्त असंतोषाला वाचा फोडली. दडपशाहीच्या बरवंट्याखालीं भरडून निघालेलें राष्ट्र अेका नव्या नेतृत्वाची वाट पहात होतें. शस्त्राचाराच्या अयशस्वी प्रयत्नांमुळें ब्रिटिश सरकारनें जी दडपशाही केली त्याची प्रतिक्रिया समाजाच्या मनावर झाली. सशस्त्र अुठावणी करणें अशक्य आहे, आणि अर्ज-विनंत्यांनीं तर काम होत नाहीं, अशा दिङ्मूढा-वस्थेंत राष्ट्र होतें.

अशा वेळीं गांधीजी पुढें आले. राष्ट्रांतील सुप्त शक्तीला त्यांनीं स्पर्श केला आणि त्यांतून अेक प्रचंड आंदोलन निर्माण केलें. गांधीजी गोखल्यांना

गुरु मानीत, पण ते नेमस्त झाले नाहींत. टिळकांनीं आंखलेल्या चतुःसूत्री-मार्गील असंतोषाची व असहकाराची कल्पनाहि गांधींना पसंत होती. गांधी तर साम्राज्यनिष्ठ, राजनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होते. पण ते भारतांत आले आणि कायदेभंगाची चळवळ त्यांनीं सुरू केली. गांधींच्या या आंदोलनानें नवीन संस्कार राष्ट्राच्या जीवनावर झाले. परसत्तेच्या जुलुमाची भीति नाहींशी झाली. प्रतिकारशक्ति खडबडून जुटली. गांधीजींची अहिंसा ही बलवानांची अहिंसा आहे असें जनतेला वाटलें; त्यांच्या सत्याग्रहाचें शस्त्र देशांतील असंतोषाला वाट करून देण्याचें परिणामकारक साधन आहे असें त्या वेळच्या अनेक विचारवन्तांना वाटलें. अर्थात् कोणत्याहि नव्या विचाराला विरोध होतोच, त्याप्रमाणें गांधीजींच्या असहकार-वादाला अनेक नेमस्त व टिळकपंथीयांनीं विरोध केला.

पण गांधीजींनीं आंदोलन सुरू केल्यावर शिवरामपंत परांजपे यांच्या-सारख्या अेके काळच्या सशस्त्र क्रांतिवाद्यालाहि असें वाटूं लागलें कीं, राज्यक्रांतीच्या बाबतींत अत्याचाराची जितकी जरूरी आहे तितकीच अनत्याचाराचीहि आहे. विसाव्या शतकांत जगाचें पाऊल सुधारणेच्या बाबतींत पुढें पुढें पडत असतां तेच तेच तोडगे करून गुण आणण्याचा प्रयत्न सफळ करून घेणें योग्य नाहीं असें त्यांचें मत होतें. श्री. शिवराम-पंतांनीं गांधीवादाचें समर्थन करतांना आणखी अेके ठिकाणीं म्हटलें आहे.*

> " साधनांच्या दृष्टीनें अत्याचार आणि अनत्याचार हीं दोन्हीहि तत्त्वें परस्परविरोधी आहेत असें नाहीं. अनत्याचाराचें रूपांतर अत्याचारांत पुढें मागें केव्हां होणारच नाहीं असें नाहीं. अनत्याचार फक्त कांहीं ठराविक मुदतीपर्यंत पाळावयाचा होता....या अनत्या-चारित्वाच्या चळवळीनें म. गांधी हे आपणां हिंदुस्थानांतील लोकांच्या हातांत अेक सामर्थ्य आणून देत होते. त्या सामर्थ्याचा अुपयोग आपणांस वाटेल तसा करतां आला असता. "

* शि. म. परांजपे चरित्र (ले. वा. कृ. परांजपे) –पृष्ठ २७५, २७६.

शिवरामपंतांची ही विचारसरणी म्हणजे त्या वेळच्या अनत्याचारी सत्याग्रह तत्त्व म्हणून पसंत नसलेल्या, पण साधन म्हणूनहि स्वीकार्ह समजणाऱ्या विचारवन्तांच्या दृष्टिकोणाचें अुत्कृष्ट प्रत्यंतर आहे. सुभाषबाबू किंवा मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारख्या क्रांतिवाद्यांनींहि गांधीजींच्या नेतृत्वाचा व सत्याग्रहाचा कांहीं काळ स्वीकार केला, याचें कारण हा व्यावहारिक दृष्टिकोणच होता. पण गांधीजी मात्र सत्य, अहिंसा, सत्याग्रह या सर्वांकडे अगदीं प्राणभूत तत्त्वदृष्टीनें पहात होते. ११-८-१९२० च्या 'यंग इंडिया' मध्यें त्यांनीं अहिंसेविषयीं पुढील विचार प्रकट केले होते. पहिल्या सत्याग्रही आंदोलनाच्या आरंभालाच ते सांगितले होते. गांधीजी म्हणतात—

"Non-violence in its dynamic condition means conscious suffering. It does not meen submission to the will of the evil-doer, but it means the pitting of one's whole soul against the will of the tyrant. Working under this law of our being, it is possible for a single individual to defy the whole might of an unjust empire to save his honour, his religion, his soul, and lay the foundation for that empire's fall or its regeneration.

And so I am not pleading for India to practise non-violence because it is weak. I want her to practise non-violence being conscious of her strength and power...If India takes up the doctrine of the sword she may gain momentary victory. Then India will, cease to be the pride of my heart. India's acceptance of the doctrine of sword will be the hour of my trial,...My life is dedicated the to service of India through the religion of non-violence which I believe to be the root of Hinduism."

गांधीजींच्या म्हणण्याचा सारांश असा कीं, "अहिंसा म्हणजे जाणून-बुजून स्वीकारलेल्या आत्मक्लेशाचा मार्ग. दुष्ट कृत्य करणाऱ्यापुढें मान

तुकविणें नव्हे तर त्या छळाविरुद्ध दंड थोपटून उभें राहाणें. यामुळें अेका सामान्य व्यक्तीलाहि अेका अन्यायी साम्राज्याविरुद्ध स्वधर्म व स्वाभिमान यांच्या रक्षणासाठीं उभें राहातां येतें. म्हणून भारत दुर्बल आहे म्हणून त्यानें अहिंसेचा स्वीकार करावा असें मी सांगत नाहीं. आपल्या सामर्थ्याची जाणीव असल्यामुळें त्यानें अहिंसा स्वीकारावी असें माझें मत आहे. भारतानें हातांत खड्ग घेतलें तर त्याला क्षणभंगुर विजय मिळेलहि, पण त्या वेळीं मला भारताचा अभिमान वाटणार नाहीं. तो काळ माझ्या कसोटीचा ठरेल. हिंदुधर्माचें मूलतत्त्व असलेल्या अहिंसेच्या धर्माच्या आधारें भारताची सेवा करण्यासाठीं माझें जीवन वाहिलेलें आहे."

या सुरुवातीच्या गांधींच्या घोषणेवरून ते कोणत्या वृत्तीनें भारताच्या प्रश्नांकडे व अहिंसेकडे पहात होते हें दिसून येअील. गांधीजींच्या या मार्गांचा स्वीकार राष्ट्रानें केला खरा, पण त्यांत मतैक्य नव्हतें. गांधीजींच्या अनुयायांचे तीन प्रकार होते.—पहिला, गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशीं पूर्णपणें सहमत होअून त्यांचें नेतृत्व पत्करणारा; दुसरा, गांधींच्या तत्त्वज्ञानाशीं सहमत न होतां त्यांचें नेतृत्व क्रांतिकारक स्वरूपाचें आहे म्हणून तें स्वीकारणारा; व तिसरा म्हणजे गांधींच्या व्यक्तिमत्वानें मोहित होअून त्यांच्या जीवनाचा स्वतःच्या मतीप्रमाणें अर्थ लावणारा. गांधीजींच्या अहिंसाभक्तीचें मूळ त्यांच्या भूतदयावादी हिंदुधर्मावरील श्रद्धेंत होतें. आणि वैयक्तिक जीवनांत जें साधुत्व धर्म आणूं पहातो तें सामाजिक जीवनाच्या अंगोपांगांत यावें असें त्यांना वाटत होतें. म्हणून चित्तशुद्धि, हृदयपालट, प्रार्थना, पाप-पुण्याच्या कल्पना, अीश्वराचा संदेश, आत्मबल अित्यादि अध्यात्मवादी धर्मापासून निर्माण झालेल्या कल्पनांना व आचारांना गांधीजींच्या जीवनांत व पर्यायानें त्यांच्या राजकारणांत स्थान मिळालें. बुद्धिवाद्याला गांधीजींचें तत्त्वज्ञान, त्यांत अनेक वेळां दिसणारी विसंगति ही असह्य होणारी असे. ते स्वतःला सनातनी हिंदु म्हणवून घेत असत; आणि तसेच ते होते. विकसित विज्ञानाची किंवा राज्यव्यवहाराची दृष्टि असलेल्या नेत्याला किंवा विचारवन्ताला गांधीजींची विचारसरणी मूलतः कधींच पटूं शकली नाहीं. गांधीजींच्या तत्त्वप्रणालीचा घोरण म्हणून काँग्रेसनें स्वीकार केला होता.

आणि गांधीजींनींहि आपल्या अतुलनीय संघटन-शक्तीनें व व्यक्तिमत्वानें या देशावर आपला प्रभाव पाडला आणि राजकीय नेतृत्व संभाळलें. त्यांच्या अनुयायांत वर सांगितल्याप्रमाणें प्रकार असले, तरी गांधीजींचें राजकीय नेतृत्व १९३७ पर्यंत जवळजवळ बिनविरोधपणें या देशांत मानलें गेलें. या काळांत सशस्त्र क्रांतिकारकांनीं बंगाल, पंजाब या भागांत अुठावण्या केल्या. गांधीजींच्या सत्याग्रहांत अपयश आलें कीं अशा प्रकारचे तुरळक प्रयत्न होत. सरदार भगतसिंग, विष्णु गणेश पिंगळे, बारींद्रकुमार घोष, चंद्रशेखर आझाद इत्यादि क्रांतिकारक या काळांत झाले. त्यांनीं हौतात्म्याची व प्रखर देशभक्तीची ज्वाला तेवत ठेवली तरी त्यांना यश मिळालें नाहीं. तेव्हां सशस्त्र क्रांतिवाद ही अेक जवळपास मृत असलेली कल्पना ठरूं लागली. गांधीजींनीं तर या सर्व क्रांतिप्रयत्नांना मूलभूत विरोध दर्शविला होता, तो इतका अप्रिय ठरला कीं भगतसिंगाच्या संकल्पित फांशीमुळें दुःखी छायेखालीं भरलेल्या कराची कॉंग्रेस अधिवेशनांत गांधींना कांहीं तरुणांनीं काळीं निशाणें दाखविलीं.

सावरकर १९३७ च्या सुमारास सुटले त्या वेळीं रॉय, सुभाष, जवाहरलाल हीं तीन तरुणांचीं आकर्षणें होतीं. समाजवादी विचारसरणी कॉंग्रेसमध्यें नेहरूंच्या पुरस्कारामुळें प्रभावी होत होती. गांधीजींच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याला व्यापक स्वरूप दिलें असलें तरी त्याला लोकक्रांतीच्या निश्चित तत्त्वज्ञानाची, नव्या समाजरचनेच्या ध्येयवादाची जोड देणें अवश्य आहे असें तरुणांना वाटूं लागलें. त्यामुळें गांधीवादाच्या विरोधकांत या शास्त्रीय क्रांतिवाद्यांची नवी भर पडली.

सावरकरांचें टीकास्त्र

सावरकर १९२४ ते १९३७ पर्यंत प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेत नव्हते, तरी त्यांनीं त्या काळांतील भारतीय राजकारणाचें निरीक्षण चालविलेंच होतें. त्यानीं गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या मार्गाला अुघडपणें आणि प्रखर शब्दांत विरोध चालविलाच होता. पण १९३७ सालीं वर वर्णन केलेल्या परिस्थितींत सावरकर राजकारणांत जेव्हां आले त्या वेळीं त्यांनीं

अेक निराळीच कलाटणी दिली. त्यांच्या सुटकेनंतर नेहरु, सुभाष, रॉय, यांनीं जे संदेश पाठविले होते त्यांत सावरकरांनीं स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग व्यावा अशी अिच्छा प्रकट केली होती. सावरकरांचा भव्योज्ज्वल भूतकाळ पाहून तरुण नेते 'आम्हांला १९०८ चे सावरकर हवेत' असें आग्रहानें प्रतिपादन करीत होतें. सशस्त्र क्रांतिवादाचे पुरस्कर्ते म्हणून सावरकरांची कीर्ति असल्यामुळें ते स्वातंत्र्यवादी चळवळीला कोणतें नवें स्वरूप देतात याकडे तरुणांचे व गांधीवादी नेतृत्वास नाखूष असलेल्यांचे डोळे लागले होते.

सावरकरांनीं राजकारणांत प्रवेश केला त्या वेळीं त्यांच्यापुढें स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबरच दुसरा अेक महत्त्वाचा प्रश्न होता. तो म्हणजे कॉंग्रेसनें आपल्या राजकारणांत हिंदु-मुस्लीम अैक्याचे जे शास्त्रदुष्ट प्रयोग केले त्यामुळें निर्माण झालेल्या मुसलमानांच्या राजकीय आकांक्षांचा. पाकिस्तानची मागणी त्या काळीं प्रभावी रीत्या मांडली जात नव्हती, तरी त्या चळवळीचीं बीजें पेरलीं गेलीं होती. या जातीय प्रश्नाला जर मुळासकट अुपटलें नाहीं, तर ज्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपण लढणार त्या देशांचीं शकलें होअून तो अंतर्गत शत्रूंनीं पोखरला जाअील अशी भीति सावरकरांना वाटत होती. सिंध मुंबअी प्रांतापासून वेगळा करून कॉंग्रेसनें या फुटीर वृत्तीस संमति दिली, आणि मनधरणीच्या अव्यवहार्य धोरणामुळें मुसलमानांचा जातीयवाद राष्ट्रवादाच्या नांवाखालीं पोसला. याच काळांत प्रांतिक स्वायत्तता मिळाली, आणि संसदीय राजकारण (पार्लमेंटरी) ही स्वातंत्र्य लढ्यांतील महत्वाची आघाडी होअून राहिली. त्या आघाडीवरहि जातीय मुसलमानांचे डावपेंच सुरू झाले, आणि हिंदु-मुस्लीम अैक्याच्या या प्रयत्नांची विद्रूपता स्पष्ट होऊं लागली. याची अधिक चर्चा पुढें येणारच आहे. पण तूर्त अेवढेंच पहावयाचें आहे कीं, सावरकरांनीं १९३७ सालीं हिंदुसभेचें नेतृत्व स्वीकारण्याला मुस्लीम जातीयवादाचा भयानकपणा हें अेक महत्त्वाचें कारण होतें. कॉंग्रेस त्याच्या आहारीं चालल्यामुळें कॉंग्रेस हीच अेकमेव राष्ट्रीय संस्था, आणि तिच्याविरुद्ध व्रहि काढणें हें पातक

आंहे, ही कल्पना समूळ चूक आहे असें जनतेला सांगून सावरकरांनीं प्रथम लोकशाही स्वराज्यपक्ष व नंतर हिंदुमहासभा यांत प्रवेश केला.

या प्रकरणांत सावरकरांच्या स्वातंत्र्यवादी चळवळीचें समालोचन करावयाचें असल्यामुळें १९३७ ते १९४७ या काळांत त्यांनीं त्या दृष्टीनें कांय केलें अेवढेंच येथें विचारांत घ्यावयाचें आहे. सावरकर हे सशस्त्र क्रांतिवादी असले तरी १९३७ नंतर त्यांनीं—संसदीय राजकारण हें आतां अपरिहार्य होऊन राहिलें आहे हें लक्षांत ठेवून—हिंदुसभेच्या द्वारें अशा प्रकारची घटनात्मक चळवळ करून हिंदूंचें राजकारण सुरू केलें. त्यांच्या या राजकारणाची चर्चा पुढें करावयाची आहे. पण सावरकरांनीं, आपल्या क्रांतिवादाला पोषक अशी अेक चळवळ या देशांत केली. तिला सावरकरांच्या क्रांतिकार्याच्या दृष्टीनें अत्यंत मोठें महत्त्व आहे. ती चळवळ म्हणजे सैनिकीकरणाची. या चळवळीच्या हेतूंचा विपर्यास सावरकरांच्या खोडसाळ टीकाकारांनीं केलेला आहे. म्हणून तिचें निश्चित स्वरूप कोणतें होतें हें पहाणें अवश्य आहे.

सैनिकीकरण कां ?

१९३७ सालींच युद्धाचीं लक्षणें साधारणपणें दिसूं लागलीं होतीं. १९३८ सालीं सुभाष काँग्रेसच्ये अध्यक्ष झाले, त्या वेळीं त्यांनींहि आपल्या अध्यक्षीय भाषणांत आगामी युद्धाचा अुल्लेख करून त्या वेळीं स्वातंत्र्यासाठीं नवा लढा सुरू करण्याची संधि येणार आहें असें स्पष्ट सुचविलें होतें. सावरकर हेहि याच मताचे होते. गुलाम राष्ट्राच्या आयुष्यांत असें युद्ध ही अेक मोठी संधि असते. कारण त्या वेळीं त्याच्यावर स्वामित्व गाजविणारें राष्ट्र संकटांत असतें, व संधीचा फायदा घेऊन अुठावणी करतां येते. अिंग्लंडचें जें संकट ती आपली संधि हें सावरकरांचें व सुभाषचंद्रांचें तत्त्व असल्यानें, दोघांनीं याच सुमारास राष्ट्रांत अशा तऱ्हेची चळवळ व्हावी असें प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरीत्या सुचविलें होतें.

१९३८ सालीं सावरकरांनीं सुभाषबाबूंची मुंबअीत अेकान्तांत भेट घेअून, आगामी महायुद्धांत सशस्त्र अुठावणी करण्याची कशी संधि येणार

आहे याची त्यांच्याशीं चर्चा केली होती. त्यांना सावरकरांनीं असेंही आश्वासन दिलें कीं, "मी आज हिंदुसभेच्या वैध स्वरूपाच्या राजकारणांत असलों तरी मला शेवटीं तिला असें क्रांतिवादी वळणच द्यावयाचें आहे, याविषयीं निश्चित असा. तुम्ही कॉंग्रेसला क्रांतिवादी बनवा, आणि मी हिंदुसभेला त्या स्वरूपाकडे नेतों." अशा स्वरूपाचें सावरकर व सुभाष यांचें बोलणें झालें होतें. यावरून सावरकर कोणत्या हेतूनें सैनिकीकरणाच्या मोहिमेस लागले होते हें दिसून येण्यासारखें आहे.

राजकीय मुत्सद्दीपणा हा वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार करणारा असावा लागतो. काव्हूर या इटालियन नेत्यानें असें म्हटलें आहे कीं, मुत्सद्देगिरीचें महत्त्वाचें लक्षण म्हणजे आपल्या काळांत नेमकें काय घडणें शक्य आहे हें ओळखणें (recognition of the exact possibilities of his time) सावरकरांच्या राजकारणांत त्यांचा हा गुण प्रकर्षानें दिसून आला आहे. त्यांच्या या वस्तुनिष्ठ दृष्टीमुळेंच त्यांनीं लोकांच्या दृष्टीनें राजनिष्ठ ठरणाऱ्या या सैनिकीकरणाच्या चळवळीकडे लक्ष दिलें. स्वातंत्र्याचा लढा केवळ सामुदायिक आंदोलनानें यशस्वी होणार नाहीं; त्यांतील अंतिम यश परकीय सत्ता ज्यांच्या आधाराबर राज्य करीत असते त्या सैन्याला धक्का दिल्यासच मिळणार आहे, अशी त्यांची खात्री असल्यामुळें सावरकरांनीं या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचें ठरविलें. सावरकरांनीं आपल्या या सैनिकीकरणाच्या धोरणाचें स्पष्टीकरण मदुरेच्या अध्यक्षीय भाषणांत पुढील शब्दांत केलें होतें —

> "राजकारणाचें शास्त्र आणि जगांतील अितिहास या दोन्हींवरून अेक ठाम सिद्धान्त प्रस्थापित झालेला आहे. तो असा कीं, जगतांत सर्व लोकांना व सर्व काळीं अुपयोगी पडेल अशी कोणतीहि घटना किंवा समाजरचनापद्धति शाश्वत स्वरूपाची सांगतां येत नाहीं. .....म्हणून आपलें खरें राजकीय व्यावहारिक धोरण असें असावें कीं, जो कोणी देश, — मग कोणत्याहि वादाचा पुरस्कर्ता असो, जो आमच्या देशाचें हित साधण्यास आम्हांस अुपयोगी पडेल, व

जेवढा काळपर्यंत अुपयोगी पडेल तोंपर्यंत व तेवढ्या काळपर्यंत तो आपला मित्र होय. युद्धकाळांतील आपल्या राजकीय धोरणाचें सूत्र अधिक विशद करून सावरकरांनीं पुढें सांगितलें आहे—

बरें, समजा, वादाकरितां आपण असें गृहीत धरलें कीं, या युद्धाला कलाटणी मिळाली, तरी जर्मन लोक हिंदुस्थानवर स्वारी करून येतीलच हा कदाचित् होणारा संभव खरा ठरेलच असें तरी आपण कां गृहीत धरावें ? व अिंग्रजांना घालवून जर्मनी पादाक्रांत करील असें तरी कां मानावें ? या जगांत जेव्हां जेव्हां राजकीय भूकंप होतात तेव्हां साम्राज्याचीं साम्राज्यें तुकडे तुकडे होअून कोलमडून पडतात. आणि अितिहास असें सांगतो कीं, पुष्कळदां दास्यांत खिचपत पडलेल्या राष्ट्रांना आपलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं दोघां राष्ट्रांची प्रबळ लढत लढवीत ठेवणें आणि त्यायोगें दोघांचींहि आक्रमक सामर्थ्यें नाहींशीं करून स्वतःचें स्वातंत्र्य प्रस्थापित करणें पुष्कळदां शक्य असतें. आणखी, जर या युद्धांत ब्रिटिशांना काढता पाय घ्यावा लागला, आणि जर्मनी किंवा दुसरा कोणी सामर्थ्यवान ह्या देशावर लगोलग चालून आला नाहीं तर या देशांत अंतर्गत अराजकता माजेल, आणि त्यांतून हिंदुमुसलमानांच्या यादवीचें युद्ध निर्माण होईल. कित्येक लोक या परिस्थितींत आम्हांस भीति घालतात. पण अशी परिस्थिति निर्माण झालीच तर त्यांतून आपणां हिंदु लोकांना यशस्वी रीतीनें बाहेर पडणें फार शक्य आहे, आणि तसें झालें तर आपण आपल्या घराचे निर्विवादपणें धनि होऊन जाऊं.

तात्पर्य काय कीं, हे नैतिक किंवा तात्त्विक वाद, किंवा 'असें झालें तर तसें होअील' असल्या प्रकारच्या संभवात्मक गोष्टी या आपणांस केवळ विचकवण्याकरितां असून आपण ब्रिटिशांच्या युद्ध-कार्यास बिनशर्त आणि स्वेच्छेनें मदत करावी यासाठीं ही सारी कारवाअी आहे. या गोष्टींचा आपण विचार करूं नये असें नाहीं;

पण आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें, व्यावहारिक दृष्टीनें त्यांकडे पाहूनच आपण आपलीं धोरणें बांधावीं.

या युद्धकालांत आपला कार्यक्रम ठरवितांना, आपल्याकडून होऊंल त्या आणि शक्य असेल त्या रीतीनें या युद्धाचा फायदा आपल्या देशाचें हित साधण्याचे कामीं कसा कसा घेतां येईल, आपण आपल्या उपयोगी कसे व किती पडूं, आपल्या हितसंबंधांचें रक्षण कसें करूं, आणि शक्य झालें तर हिंदुत्वाचें अभ्युत्थान आपणांस कसें करतां येईल याच दृष्टींनीं आपण विचार केला पाहिजे.

असें करतांना, आपण वायफळ, निरुपयोगी, किंबहुना घातक असल्या शाब्दिक मायाजाळाला भुलतां कामा नये. सध्यांच्या परिस्थितींतील आपल्या दौर्बल्याची जाणीव ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणें आपलें जें कांहीं थोडेंफार आज सामर्थ्य आहे, किंवा युद्धाच्या वाढत्या प्रसारामुळें जें आपणांस उपलब्ध होणार आहे, त्याची किंमत कमी मानून आहे तेंही नाहींच असें मानण्याचें वेडेपणहि करतां कामा नये. या दोन्ही मर्यादा आपण लक्षांत घेऊन आज आपणांसमोर जे मार्ग दिसतात, किंवा जे आधींच आचरले जात आहेत, त्या सर्वांचा आपण योग्य विचार केला पाहिजे.

सशस्त्र क्रांतियुद्ध

सबंध राष्ट्रभर सशस्त्र बंड पुकारणें हा अेक मार्ग आहे. दास्यांत पिचत पडलेल्या कोणत्याहि राष्ट्राला स्वतःचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यास — आपला शत्रु दुसऱ्या अेखाद्या प्रबळ शत्रूशीं युद्ध करण्यांत चांगलाच गुंतला आहे अशी संधि पाहून त्याच्याविरुद्ध सशस्त्र बंड करणें हा सहज सुचणारा व विशेष परिणामकारक असा अेक मार्ग आहे. हा मार्ग नैतिक दृष्ट्या वाअीट आहे म्हणून नव्हे, तर केवळ व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीनें हिंदुमहासभेच्या अशा अधिवेशनांत व सध्यांच्या प्रकट प्रसंगीं आपणांस त्याचा विचार करण्याचें येथें सोडून देणें भाग आहे. ”

सावरकरांच्या या विवेचनावरून सैनिकीकरणाचा पुरस्कार त्यांनीं प्रामुख्यानें दोन हेतूंनीं चालविला होता हें दिसून येअील. पहिला हेतु म्हणजे, क्रांतीला अुपयुक्त ठरणाऱ्या देशप्रेमी तरुणांना सैन्यांत धाडून तेथील मोक्याच्या जागा घेअून अेकूण संख्या वाढविणें. सावरकरांनीं त्या वेळीं जीं सैनिकीकरणावरील भाषणें केलीं त्यांत स्पष्टपणें हा राज्यक्रांतीचा हेतु स्पष्ट केला होता. 'आज जी बंदूक तुम्हीं जर्मनांवर रोखीत आहांत तीच अुद्यां तुम्हांला ब्रिटिशांविरुद्ध रोंखावयाची आहे' असें ते स्पष्टपणें सांगत. हें कांहीं ब्रिटिश सरकारला माहीत नव्हतें असें नाहीं, पण त्यांना सैनिकांची गरज असल्यामुळें त्यांनीं हा सर्व प्रचार चालूं दिला. शस्त्रांची ओळख झाल्याविना किंवा शस्त्रें हातात आल्याविना सशस्त्र क्रांति अशक्य आहे; वीरत्वाची जोपासना करावयाची असेल तर रणांगणावरहि गेलें पाहिजे;— मृत्यूशीं सामना दिल्याविना मृत्युंजयवृत्ति येणार नाहीं; या कल्पनेनेंहि सावरकरांनीं तरुणांना सैन्यांत जाण्याचा आदेश सतत दिला. हिंदु जातीला पराक्रमाचा संदेश देणें, तिच्यांतील शौर्याची परंपरा जागृत करणें हें सावरकरांच्या आयुष्यांतील प्रारंभापासूनचें ध्येय आहे. 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते' हें त्यांच्या विचारसरणीचें सूत्र असल्यामुळें या महायुद्धाच्या पर्वणीचा अुपयोग सावरकरांनीं करून घेतला.

पण ही वीरवृत्तीची अुपासना योजनाशून्य किंवा निर्हेतुक नव्हती. सावरकरांना असें निश्चितपणें या दुसऱ्या युद्धाच्या सुरुवातीपासून वाटत होतें कीं, इंग्लंड युद्धांत गुंतलें असतां अेक सशस्त्र अुठावणी करण्याची शक्यता आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळांत लाला हरदयाळ आदि क्रांतिकारकांनीं असे प्रयत्न केले होते. दुसऱ्या महायुद्धांत काय करावें हा विचार येथील क्रांतिवाद्यांना अस्वस्थ करीत होता. सुभाषबाबूंनीं १९३९ मध्यें काँग्रेस सोडली ती या कारणामुळेंच. त्यांना काँग्रेसनें ब्रिटिश सत्तेशीं अखेरचा सामना द्यावा असें वाटत होतें. १९४० साल अुजाडलें. हिटलरला युरोपांत नेत्रदीपक विजय मिळत होते. जपान आज ना अुद्यां युद्धांत पडणार हेंहि स्पष्ट होतें. सुभाषबाबू आणि सावरकर यांची जून १९४० मध्यें या सर्व परिस्थितीविषयीं चर्चा झाली. सुभाषबाबूंच्या मनांत सावरकरांच्या सैनिकी-

करणाविषयीं स्पष्ट कल्पना नव्हती. त्यांनाहि सावरकर शत्रूलाच सहाय्य करीत आहेत असें वाटे. सुभाषबाबूंच्या मनावर कॉंग्रेसी विचारसरणीचे संस्कार हेंच त्याचें कारण होतें. सावरकरांनीं सुभाषबाबूंना समजावून सांगितलें कीं, " सामुदायिक प्रमाणांत आज सशस्त्र क्रांति अशक्य आहे. ती कल्पना चांगली आहे, पण शक्याशक्यतेचा विचार केला पाहिजे. सावरकरांनीं वेगवेगळ्या राष्ट्रांनीं स्वातंत्र्यसंपादनार्थ अशा सैनिकी उठावण्यांचे प्रयत्न केले यांचीं उदाहरणें सुभाषबाबूंपुढें ठेवलीं, आणि गेल्या महायुद्धांतहि लाला हरदयाळांनीं केलेल्या प्रयत्नांची आठवण करून दिली. सावरकरांना अंदमान-मधून मुक्त करून सैनिकांना आपल्या बाजूला वळवून ब्रह्मदेशांतून भारतावर स्वारी करतां येईल अशी त्या वेळची योजना होती. ब्रह्मदेश, मलाया या भागांत हिंदी लोक असल्यामुळें तेथें सुरू केलेल्या क्रांतिवादी चळवळीला पाठिंबा मिळेल अशी त्या वेळची अटकळ होती.

सावरकरांच्या या सर्व विवेचनाचें मर्म सुभाषबाबूंना पटलें. सुभाषबाबूंनीं स्वतः परदेशांत जाऊन हे सर्व प्रयत्न करावेत अशी सावरकरांची अिच्छा होती. सावरकरांचे जुने सहकारी बॅ. राणा, अजितसिंग, हे इटाली व फ्रान्समध्यें याविषयीं प्रयत्न करीत होतेच. अजितसिंगांनीं लहानशी आझाद चळवळहि सुरू केली होती. पूर्व आशियांत व जपानमध्यें अशी चळवळ सुरू करण्याचे प्रयत्न रासबिहारी बोसनीं पुढें चालू केले. सावरकर व रासबिहारी यांचा पत्रव्यवहार १९४२–४३ पर्यंत चालूच होता. सावरकरांचे हे सर्व संबंध असल्यामुळें सुभाषबाबूंना त्यांचें साहाय्यच झालें. सुभाष १९४१ च्या जानेवारींत हा देश सोडून गेले. त्यानंतर त्यांनीं जो अितिहास घडवला त्याची कल्पना आतां सर्वांनाच आहे. सावरकरांच्या '१८५७' च्या प्रति काढून सुभाषबाबूंनीं आपल्या सैन्यांत वांटल्या होत्या. २५ जून १९४४ ला सिंगापूरच्या नभोवाणीवरून सुभाषचंद्रांनीं सावरकरांच्या सैनिकाकरणाविषयींच्या अुपक्रमाचें कौतुक पुढील शब्दांत केलें—

When due to misguided political whims and lack of vision almost all the leaders of the Congress party are decrying all the soldiers in the Indian army as merceneries, it is heartening

to know that Veer Savarkar is fearlessly exhorting the youths of India to enlist in the Armed forces. These enlisted youths themselves provide us with trained men from which we draw the soldiers of our Indian National Army.

(म्हणजे, चुकीच्या राजकीय प्रवृत्तीमुळें व दूर दृष्टीच्या अभावीं कॉंग्रेसचे नेते भारतीय सैन्याच्या सैनिकांना 'पोटभरू' म्हणतात. पण सावरकर निर्भयपणें भारतीय तरुणांना सैन्यांत जाण्याचा आदेश देत आहेत ही गोष्ट अुत्साहदायी आहे. याच तरुणांतून आम्हांला आझाद हिंद सेनेसाठीं शिक्षित युवक मिळत आहेत.) सुभाषबाबूंची ही आझाद सेना म्हणजे सावरकरांच्या सैनिकी क्रांतीच्या घोरणाचा प्रचंड विजय होय. पुढें जवाहर-लालजींनीं ज्या वेळीं ही कथा अैकली त्या वेळीं त्यांनींहि असे अुद्गार काढले कीं, कोणी सांगावें, मी त्या परिस्थितींत असतों तर हेंच केलें असतें ! जवाहरलालनीं हेंहि मान्य केलें कीं, सुभाषचंद्रांच्या या प्रयत्नांमुळें सैनिक व जनता यांच्यांत अुभी असलेली भिंत कोसळली ! सैनिकी क्रांतीच्या कल्पनेचा हा विजय नव्हे काय ? १९४५ मध्यें मुंबअींत नौदलाच्या बंडांत जेव्हां सैनिक व नाविक बिथरलेले दिसले तेव्हां ब्रिटिशांचें धाबें दणाणलें ! सुभाषबाबूंनीं ब्रिटिश सत्तेच्या मुळावरच आघात घातल्यामुळें ब्रिटिश हादरले होते. आझाद सैनिकांच्या अभियोगामुळें जें वातावरण या देशांत निर्माण झालें होतें त्याचीहि माहिती ब्रिटिशांना होतीच. या सर्व लागोपाठ घडणाऱ्या घटनांचा संकलित परिणाम असा झाला कीं, या देशावर आपली जुलुमी राजवट आतां टिकूं शकणार नाहीं असें ब्रिटिशांनाहि वाटूं लागलें. कारण क्रांतिकारकांनीं सैनिकांना शिकवून ठेवलें होतें कीं, जर्मनांचा जर्मनी, रशिय-नांचा रशिया, तसा हा भारतवर्ष तुझा मानबिंदु आहे ! ही शिकवण व क्रांतीची अुत्कट अिच्छा-यांमुळें ब्रिटिशांनीं आपलें भवितव्य ओळखलें. स्वतः ॲटलींनीं ब्रिटिश लोकसभेंत भारतीय स्वातंत्र्याच्या मसुद्यावर बोलतांना भारतीय सैन्याच्या निष्ठेंत चलबिचल झाल्याचें सांगितलें. सावरकरांचा सैनिकीकरणाचा प्रचार या हेतूनें केलेला होता; आणि सुभाष बाबूंनीं या प्रयत्नावर तात्पुरता कां होअीना यशाचा कळस चढविला यांत शंका नाहीं. सुभाषबाबूंच्या सैनिकी राज्यक्रांतीच्या या प्रयत्नानें सावरकरांची

सैनिकीकरणाची मोहीम ही राज्यक्रांतीसाठीं होती हें आतां व्यवहारतः सिद्ध झालें आहे.

अंतस्थ यादवीचा धोका

सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या मोहिमेमागें दुसरा आणि अत्यंत महत्त्वाचा हेतु होता. त्याचें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. १९३७ सालानंतर मुस्लीम लीगचें प्रस्थ या देशाच्या राजकारणांत बरेंच माजूं लागलें होतें. जीं मुसलमानी संस्थानें होतीं त्यांना आपल्या जातीयवादी चळवळींत लीगनें ओढलें, आणि तीं आपल्या सामर्थ्याचीं केंद्रें केलीं. जे मुस्लीम बहुसंख्य वस्तीचे प्रांत होते तेथें दहशतवाद, धर्मांतराची सक्ति, लढाऊ युवक संघटना-हे सर्व अुपक्रम करण्यास सुरुवात केली. १९३९ सालीं युद्ध सुरू झाल्यावर ब्रिटिशांशीं सूत जमवून मुस्लीमांची सैन्यांत मोठ्या प्रमाणावर भरती सुरू केली. मुसलमानांनीं आपल्या राजकीय आकांक्षा पाकिस्तानच्या मागणीनें मूर्त केल्या होत्या, आणि साधनांच्या शुचितेची तमा न बाळगतां तें साध्य साधण्याचा त्यांनीं निर्धार केला होता. ज्या ज्या बाजूनें एकराष्ट्रीयत्वावर आघात करतां येअील, पाकिस्तानविषयीं दहशत निर्माण करतां येअील, त्या सर्व बाजूंनीं मुस्लीम लीगनें प्रयत्न चालविले होते. 'मागण्या मान्य करा, नाहीं तर दंगे करूं !' ही त्यांची भूमिका काँग्रेसजवळ असे; ब्रिटिश सरकारचें आणि त्यांचें तर सूतच जमलें होतें. या सर्व दृष्टींनीं मुस्लीम सैनिकीकरणाच्या मोहिमेवर दिलेला भर व त्यांत त्यांना येत चाललेलें यश हें पाहिलें पाहिजे.

यादवी युद्ध हें मुस्लीम लीगचें अंतिम साधन होतें; आणि त्या दृष्टीनें नागरिकांत घबराट निर्माण करण्याचें तंत्र त्यांनीं अवलंबिलें होतेंच. पण ब्रिटिश सत्ता ज्या वेळीं गलितगात्र होअील त्या वेळीं सैन्यांत जर मुस्लीम लोक बहुसंख्य असतील तर पाकिस्तानची लढाअी जिंकणें सोपें जाअील ही त्यांची कल्पना होती. १६ ऑगस्ट १९४६ ला कलकत्त्यांत मुस्लीम राजवटींत जी दंगल झाली, किंवा फाळणीपूर्व बंगालमध्यें इतरत्र जे दंगे झाले त्यावरून सरकार, सैन्य व पोलिस हें त्यांत कसें सामील होतें हें आतां सिद्धच झालें आहे. सावरकरांनीं सैनिकीकरणाचा आदेश देतांना हा धोका

डोळ्यांसमोर ठेवला होता. त्यांच्या चळवळीला पुढें यश आलें. हजारों हिंदु सैन्यांत घुसले, आणि मुसलमानांचें प्रमाण कमी होऊं लागलें. ५४ टक्के हिंदु व ५५ टक्के मुसलमान हें जें प्रमाण होतें, तें बरोबर अुलटें झालें. व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं सावरकरांचें अभिनंदन केलें. पण याहि-पेक्षां 'ईस्टर्न टाइम्स' या मुस्लीम लीगच्या वृत्तपत्रानें स्पष्टच मान्य केलें कीं—

" हिंदुमहासभेनें हिंदूंच्या सैनिकीकरणाचे जोरदार प्रयत्न केले व सरकारचें या बाबतींत सक्रिय सहकार्य मिळवून प्रचंड व आश्चर्य-कारक यश मिळविलें. (The Hindu Mahasabha also agitated strongly for militarization of the Hindus as a great opportunity and with the active co-operation of the Government, has met with astonishing success.)

या सैन्यभरतीच्या धोरणासंबंधीं 'स्टेटस्मन'चे माजी संपादक सर आल्फ्रेड वॉटसन् यांनीं 'ग्रेट ब्रिटन अँड दि ईस्ट' यांत जानेवारी १९४३ च्या अंकांत म्हटलें होतें—

"For that domination (over the country) he (Savarkar) is prepared to fight and loudly demands that in recruiting for armies in India, the present rulers shall elect a majority of Hindus so that he may have an instrument to enforce his will when the British rule is finally abandoned. "

सारांश, या देशावर प्रभुत्व गाजविण्यासाठीं सावरकर युद्धास तयार असून, सध्यांच्या सरकारनें जर हिंदूंना बहुसंख्य प्रमाणांत सैन्यांत घेतलें तर-आपली मनीषा साधण्यासाठीं आपल्या हातीं अेक साधन येअील असें सावरकर अुघडपणें सांगत आहेत.

यादवीचा ज्या काळांत संभव असतो त्या काळांत प्रथम जर 'लक्ष्य' कोणतें ठेवावयाचें असेल तर तें सैन्य होय, या अितिहासाच्या अनुभवावरूनच सावरकरांनीं हें धोरण स्वीकारलें होतें हें या सर्व विवेचनावरून दिसून येअील. हिंदुस्थानांत यादवी झाली असती तर काय झालें असतें हा प्रश्न येथें अुपस्थित करण्यांत आतां अर्थ नाहीं. अेक गोष्ट निश्चित आहे कीं, मुस्लीम लीगनें अनेक महत्त्वाचीं शक्ति-केंद्रें आपल्या ताब्यांत ठेवलीं होतीं. आणि त्यांच्या जोरावर त्यांनीं या देशांत भयानक दृश्यें निर्माण केलीं असतीं. त्याचें प्रत्यंतर कलकत्ता, नौखाली येथील अत्याचारांवरून कळण्यासारखें आहे.

कांहीं आक्षेप

सावरकरांच्या या सैनिकीकरणावर अनेक पोरकट व थोरकट आक्षेप घेतले गेले आहेत. सावरकरांना 'रिक्रूटवीर' म्हणणारे तर अनेक लोक होते. त्यांचा विचार या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. कारण राजकारणांतील कोणतीहि घटना जे वरवर न्याहाळतात त्यांना याचें महत्त्व कळणार नाहीं. पण सावरकरांवर सैनिकीकरणामुळें ते फॅसिस्ट वृत्तीचे आहेत असा आरोप ठेवणारें जे लोक आहेत त्यांचा विचार केला पाहिजे. सावरकरांचा (हिंदुसभेचा) राष्ट्रवाद हा अधिक सैन्यवादी होता असें अशोक मेहता आणि अच्युत पटवर्धन यांच्या सुप्रसिद्ध 'कम्युनल ट्रॅंगल इन इंडिया' या पुस्तकांत त्यांनीं म्हटलें आहे (पृष्ठ १६३). याचा पुरावा म्हणून त्यांनीं 'हिंदु सैनिकीकरण मंडळ' काढलें होतें हें अुदाहरण दिलें आहे. सावरकरांचा राष्ट्रवाद विजयी झाला तर त्यांत लोकशाही, शांतता, समाजहित यांचा बळी पडेल असें त्यांत म्हटलें आहे. हे आरोप दूषित दृष्टीनें केले गेले आहेत, त्यांत शिक्के मारण्याची (branding) वृत्ति अधिक आहे. सावरकरांनीं हें अनेक वेळां प्रकट केलें आहे कीं, भारतांत आम्हांला संपूर्ण लोकसत्ताक (अल्पसंख्यांनाहि मूलभूत अधिकार देणारें) राज्य निर्माण करावयाचें आहे. काँग्रेसनें जर अखंड हिंदुस्थानचें आश्वासन दिलें तर १९४२ च्या लढ्यांत सहकार्य करण्याचें सावरकरांनीं मान्यहि केलें

होतें. तेव्हां स्वतःची किंवा हिंदुमहासभेची हुकुमशाही या देशावर लादावयाची ही भूमिका त्यांनीं केव्हांच घेतली नव्हती. अर्थात् अखंड भारतासाठीं सशस्त्र क्रांति व यादवीयुद्ध पत्करण्याची त्यांची सिद्धता होती अेवढ्यावरून त्यांना हुकुमशहा म्हणणें म्हणजे लोकशाहीचा अर्थ अहिंसा असें करण्यासारखें शास्त्रदुष्ट आहे. ज्यांचा अहिंसेवर विश्वास नाहीं ते सर्व हुकुमशाहीवादी आहेत असें म्हणावयाचें असेल तर स्वतः मेहता व पटवर्धन हेहि हुकुमशहा ठरतील. जगांत ब्रिटन, अमेरिका हीं राष्ट्रेंसुद्धां हुकुमशाहीवादी ठरतील. युद्धकाळांत चर्चिलच्या हातीं ब्रिटननें सूत्रें दिल्यावर जर ब्रिटन हुकुमशाही ठरणार असेल तर त्यांना लोकशाहीचा अर्थ समजला नाहीं असें म्हणावें लागेल. सैन्याच्या आधारें राज्यक्रांति लवकर होअील, संभाव्य यादवी युद्धांत राष्ट्रवादी शक्ति प्रभावी ठरतील हे दोन प्रधान हेतु इतक्या स्पष्ट रीतीनें सावरकरांनीं मांडले होते कीं, त्याविरुद्ध झालेला प्रचार आपमतलबी किंवा अज्ञानजन्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सावरकरांच्या या घोषणेंत खरा दोष कोणता असेल तर तो हा कीं, ती चळवळ ज्याला 'सामुदायिक' (Mass movement) म्हणतात तशी होअूं शकली नाहीं. गांधीजींच्या सत्याग्रहांत सामान्य माणसाला कर्तव्य असे; त्यांतील गवताची काडी हीहि प्रचंड शक्तीचें प्रतीक ठरे. सैनिकीकरण मात्र ३५ कोटी लोकांचा तो कार्यक्रम होअूं शकला नाहीं. म्हणून हिंदुसभेच्या कार्याला सामाजिक अधिष्ठान लाभूं शकलें नाहीं. समाजाचे अनेकविध व्यवहार असतात, ते रणांगणाखेरीजच चालतात. १९३५ नंतर राजकारणाकडे केवळ सैनिकाच्या दृष्टीनें पाहणें किंवा असंतोषाच्या प्रसाराच्या हेतूनें पाहणें हें अपुरें पडत होतें. सावरकरांनीं सामुदायिक सशस्त्र क्रांति ही या परिस्थितींत अशक्य आहे हें स्वतःच मदुरेच्या अध्यक्षीय भाषणांत मान्य केलें होतें. अेकदां सशस्त्र क्रांति अशक्य—आणि गांधीजींचा अहिंसात्मक सत्याग्रह अमान्य—अशीं दोन्ही टोकें स्वीकारणें नाहीं असें निश्चित ठरविल्यावर हिंदुसभेनें जनतेला स्वातंत्र्यलढ्यासाठीं कोणता तरी मार्ग देणें अवश्य होतें. हिंदुसभेचा सैनिकीकरण हाच अेकमेव कार्यक्रम झाला. तिनें १९४२ च्या अुठावणींत अहिंसेचे बंध तोडून ज्यांनीं भाग घेतला त्यांच्या-

शींहि सहकार्य केलें नाहीं. सैनिकीकरण हा दूरचा व कांहीं लढाऊ तरुणांपुरता मर्यादित कार्यक्रम होता, आणि म्हणूनच हिंदुसभा ही स्वातंत्र्य लढयाच्या दृष्टीनें जनतेपासून दूर राहिली. अेखादें तत्त्वज्ञान किती तर्कशुद्ध आहे याच्यावर त्या तत्त्वज्ञानाचा विजय अवलंबून नसतो; तर जें तत्त्वज्ञान जनतेच्या कल्पना शक्तीला पटवून तिच्यांत नवें सामर्थ्य निर्माण करतें तेंच शेवटीं विजयी होतें. कम्युनिस्ट हुकुमशाहीच्या अलिकडच्या काळांतील विजयाचा अर्थ आपण असाच लावीत नाहीं कां? सावरकरांची भूमिका तर्कशुद्ध होती, पण जनतेच्या दृष्टीनें ती अपुरी ठरली. हिंदुसभेचा कार्यक्रम हा जनतेचा कार्यक्रम होअूं शकला नाहीं, ती जनतेची चळवळ होअूं शकली नाहीं हें यामुळेंच. १९४५ च्या निवडणुकांत हिंदुसभेला जो पराभव स्वीकारावा लागला त्याचें कारण यांतच आहे. मुस्लीम जातीयतेच्या संकटाप्रमाणेंच ब्रिटिश साम्राज्यशाहीचें संकट महत्त्वाचें होतें. गांधीजींनीं दुसऱ्या संकटाच्या निवारणासाठीं वारंवार आंदोलनें केलीं व स्वातंत्र्याचा लढा पुढें रेटला. हिंदुसभेनें सैनिकीकरणाकडेच केवळ लक्ष न देतां स्वतःच्या कल्पनेनुसार स्वातंत्र्यलढयाचा कार्यक्रम आंखला असता तर तिची स्वातंत्र्यनिष्ठा व कार्यक्षमता लोकांनीं जोखली असती! सावरकर आणि त्यांचे सहकारी यांनीं 'अभिनव भारता'ची केलेली चळवळ यशाच्याच दृष्टीनें पाहतां अयशस्वीच ठरली ना? सुभाषबाबूंना तरी प्रत्यक्षतः स्वातंत्र्य कुठें पाहतां आलें? पण लोकांनीं तरीहि त्यांचा गौरव केला. याचें कारण सुभाषचंद्र हे जनतेला हव्या असलेल्या क्रांतीचे दूत ठरले! 'हिंदूचें सैनिकीकरण करा' ही घोषणा वस्तुतः व्यवहारनिष्ठ व क्रांतीला अुपयोगी ठरणारी असतांना ती लोकप्रियता मिळवूं शकली नाहीं. पण अर्थात् हा मर्यादितपणाचा दोष सोडला, तर ती चळवळ योग्य होती हें मान्य करावेंच लागेल. राजकारणांत मतभेद नेहमीं 'कशावर भर (emphasis) द्यावयाचा' याच्यावर होतो. सावरकरांनीं स्वतंत्र मंडळ काढून सैनिकीकरणाचा जोरदार पुरकार केला असता, आणि हिंदुसभेला वेगळा स्वातंत्र्यवादी कार्यक्रम दिला असता तर दोन्ही हेतु साध्य झाले असते. पण हें झालें नाहीं. आणि भुईनळ्याला लावल्या जाणाऱ्या चकचकीत पन्याइतकीच या सैनिकीकरणां-

तील राजनिष्ठा तकलुबी व दिखाऊ असतांना जनतेला ती कळली नाहीं. पण सैन्याचा क्रांतींत मोठा भाग आहे हें सुभाषबाबूंनीं सिद्धच करून दाखविल्यामुळें तो सावरकरांच्या दूरदृष्टीचा विजय ठरला आहे यांत तिळमात्र शंका नाहीं !

स्वातंत्र्याचें स्वागत

सावरकरांच्या शस्त्रवादांतील तात्त्विक भूमिका, त्याच्या तंत्राची माहिती, व त्यांनीं केलेलें क्रांतिकार्य याचें समीक्षण आपण केलें आहे. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्याचें दान दिलेलें आहे अशी चुकीची समजूत पसरली आहे. त्यांच्या दृष्टीनें साम्राज्य ठेवणें अशक्य झालें म्हणून ते गेले,- व ही परिस्थिति निर्माण करण्यासाठीं १८५७ पासून १९४७ पर्यंत सर्व वीरपुरुष व या देशांतील कोट्यवधि जनता प्रयत्न करीत होती. आज जें भारतीय स्वातंत्र्य अवतरलें तें या सर्वांच्या प्रयत्नांचें संकलित फळ ! तें अेकाच पक्षानें वा गटानें मिळविलें असें म्हणणें तर अितिहासाशीं द्रोह करणें आहेच,- पण तो त्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांशीं केलेला कृतघ्नपणा आहे !

या सर्व लढ्यांत सशस्त्र क्रांतिवाद्यांना अेक निश्चित स्थान होतें. काळें पाणी, फांशी यांचें पारितोषिक पत्करून क्रांतिकारकांनीं ब्रिटिश सत्तेचें सिंहासन दोन्ही हातांनीं धरून गदगदां हालविलें. राष्ट्र दिङ्मूढ, हतवीर्य, असंघटित, चैतन्यशून्य अवस्थेंत घोरत पडलें असतां हे क्रांतिकारक अुठले आणि देहाच्या मशाली करून त्यांनीं सर्वत्र प्रकाश फांकला. त्यांनीं प्रकाश तर दिलाच, पण दाहकताहि दिली. वीर सावरकरांनीं कलकत्त्याच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनांत क्रांतिकारकांचें कार्य स्पष्ट करून सांगितलें होतें. त्या वेळीं सारा अितिहास सांगतांना त्यांच्या डोळ्यांत अश्रु तरळले— त्यांनीं साऱ्या दिवंगत वीर पुरुषांना आवाहन केलें—

> " अंदमानांत आम्ही म्हणत होतों कीं, आमच्या अस्थि गंगेंत पडोत. या कारागृहांत, भारतमाता बंधमुक्त होअील त्या क्षणीं त्या अस्थीसुद्धां निर्भर होतील. भाग्य माझें कीं,- देश स्वतंत्र झालेला

मी माझ्या डोळ्यांनीं पाहिला. अनेक सहकारी खांद्याला खांदा लावून लढत-राहिले होते ते आज नाहींत;- लढतां लढतां पडलेल्या त्या वीरांच्या स्मृति आज शेष आहेत. त्या सर्व हुतात्म्यांना, अितर अगणित देशभक्तांना,- नि टिळक, नौरोजींसारख्या राष्ट्रपित्यांना मी हांक देतों कीं,- हे पुण्यात्म्यांनों, ज्या समरांत तुम्ही झुंजलेत तें जिंकलें गेलें !- आपण धन्य आहांत ! ''

सावरकरांच्या या अुद्गारांतील आर्तता ही स्वातंत्र्यासाठीं आत्मार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या हृदयाची आर्तता आहे. ज्या परमोच्च दिवसासाठीं आत्मक्लेश सोसले तो दिवस त्यांना पहावयास मिळाला, म्हणून १५ ऑगस्ट १९४७ ला हर्षनिर्भर होअून, पक्षाचे सर्व बंध तोडून, प्रतिज्ञापूर्तीच्या अतुलनीय आनंदानें धर्मचक्र असलेला तिरंगी राष्ट्रध्वज सावरकरांनीं आपल्या घरावर फडफडाविला ! ' मिळालें तें जतन करा ' असा अुपदेश सावरकरांनीं आपल्या अनुयायांना केला. लोकसत्ताक राजवट आत्म्याची जाणीव त्यांना दिली. प्रांतीय, पक्षीय वा वैयक्तिक स्वरूपाचीं भांडणें विसरून मातृभूच्या अेकाच व्यासपीठावर येअून पूर्वीपेक्षां अधिक प्रखर देशभक्तीनें राष्ट्रकार्यासाठीं पुढें या,· अशी हांक त्यांनीं नवभारताच्या कारागिरांना दिली ! क्रांतिकारकांचें कार्य यशस्वी झालें आहे असा त्यांचा विश्वास आहे. क्रांतिकारकांनीं डोळे दिपविणाऱ्या अक्षरांत जगाला दाखविलें कीं, भारतांतून अिंग्रजांना हांकलून देण्याचा भारतीयांचा निर्धार आहे ! गाडी येत असल्याची वार्ता तिची शिटी कळविते, त्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यशाहीची मृत्युघंटा यांनीं प्रथम वाजविली ! प्रत्यक्ष यश मिळाविणें हें त्यांना शक्यहि नव्हतें, आणि त्यांचें तें अीप्सितहि नव्हतें. त्यांची भूमिका नष्ट होअून जाण्याचीच होती. तर्कशुद्ध युक्तिवादानें राष्ट्र पेटत नाहीं, त्याला कांहीं तरी अुग्रदर्शन घडवावें लागतें; पांडित्याच्या आविर्भावानें राष्ट्र जागृत होत नाहीं, जळणारीं जीवनें त्याच्यापुढें ठेवावीं लागतात. हें क्रांतितेजाचें अुग्रदर्शन, आणि त्यांनीं निर्माण केलेले त्याग, हौतात्म्य, देशभक्ति यांचे आदर्श-हीच राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यांत त्यांनीं

केलेली कामगिरी ! कोणत्याहि अेका चळवळीनें भारत स्वतंत्र झालेला नाहीं, तसें क्रांतिकारकांनींच केवळ देश स्वतंत्र केला असाहि दावा कोणी करूं नये ! त्यांचे दोष, त्यांचें अपयश-हें हेतूंचें नव्हतें. या समाजांतील अुणीवाच त्यामुळें दिसत होत्या ! सावरकरांनीं म्हटल्याप्रमाणें गजेंद्र-मोक्षासाठीं श्रीहरिच्या पायावर अुधळलेलीं तीं अमर कमलपुष्पें आहेत ! सावरकरांच्याच शब्दांत त्यांच्या कार्याचें मूल्यमापन करावयाचें झाल्यास आपणहि असें म्हणूं या कीं—

" धुळीस मिळून नामशेष होअून गेलेल्या वास्तूच, दास्याचें दुर्भाग्य भिरविणाऱ्या दुसऱ्या शेंकडों अुत्तम स्थितींत अुभ्या असणाऱ्या वास्तूंपेक्षां सहस्रपटीनें अधिक स्फूर्तिदायक नि चैतन्यदायक असतात. कारण स्वातंत्र्याला जन्म देण्यास कारणीभूत होअून त्याच कार्यांत त्यांनीं आपलें मरण ओढवून घेतलेलें असतें. पारतंत्र्यांत चिरंजीव होण्यापेक्षां स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांत ओढवलेला मृत्यूहि अनंतपटीनें अधिक श्रेयस्कर असतो. स्मशानांतील चितेला घड-घडणाऱ्या लांकडाच्या अवजड ओंडक्यापेक्षां यज्ञीय अग्नींत समर्पिली जाणारी पवित्र काष्ठ-समिधाच सहस्रपटीनें अधिक संस्फूर्त करणारी असते ! "

× × ×

रूढीभंजक सावरकर

...खरी राष्ट्रसेवा ज्यास करावयाची आहे त्यानें लोकांस प्रिय असो वा अप्रिय असो, परंतु जें हितकारक असेल तेंच सांगितलें पाहिजे. लोक मिरवणूक काढतील कीं धिंड काढतील-त्याकडे डोळा ठेवून जो राष्ट्रहितास आवश्यक व अपरिहार्य असलेलें तत्त्व आणि धोरण धरतो किंवा सोडून देतो तो लोकांचा अेकनिष्ठ सेवकच नव्हे ! यासाठीं क्षणभर अप्रियतेस सहन करूनहि आपल्या हिंदु राष्ट्राच्या जीवनास अेखाद्या जळूसारख्या शोषून घेणाऱ्या कांहीं रूढी आपण कां सोडल्या पाहिजेत हें सांगणें मी माझें कर्तव्य समजतों.

—सावरकर

महाराष्ट्रानें गेल्या पाअुणशें—शंभर वर्षांत राजकीय व सामाजिक क्षेत्रांत स्वतःची अशी अेक परंपरा निर्माण केली आहे. पाश्चात्य शिक्षणाचा लाभ भारतांतील सर्वच प्रांतांना झाला, पण त्या शिक्षणांतून आलेले नवे विचार नवी दृष्टि घेअून स्वतःच्या समाजाच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचें परिशीलन अत्यंत प्रभावानें कोणी केलें असेल तर तें महाराष्ट्रानेंच. राजकीय क्षेत्रांत रानडे, टिळक व गोखले यांचें प्रभुत्व होतें. त्यांनीं राजकीय आंदोलन चालविलें. त्यांत लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यांसारख्या नव्या कल्पना रूढ केल्या. पण राजकारणाप्रमाणेंच सामाजिक जीवनाची 'क्ष'-

किरणांनीं तपासणी करून तें सुधारण्याचे मार्ग महाराष्ट्रांतील अनेक विचारवन्तांनीं मांडले. त्यांत लोकहितवादी, ज्योतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, आणि सावरकर हे अग्रगण्य होत. परकीय आक्रमणाविरुद्ध तलवार अुचलणारे वासुदेव बळवंतांसारखे शूर क्रांतिकारक जसे महाराष्ट्रानें निर्माण केले, तसेच जुन्या शास्त्रांची आज्ञा मानणाऱ्या रूढीप्रिय, अंधश्रद्ध समाजाविरुद्धहि नव्या विचारांची, नव्या श्रद्धांची आघाडी अुघडणारे थोर कर्तृत्ववान् पुरुष महाराष्ट्रानें निर्माण केले. सुधारणेचा ध्वज हातांत घेअून बुद्धिवादाचें आचरण करणारे हे महापुरुष म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक अितिहासाचीं प्रकरणेंच आहेत! कारण त्यांनीं आयुष्यभर सुधारणेची तुतारी फुंकून समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठीं सर्वस्वाचा त्याग केला. बौद्धिक क्षेत्रांतच नव्हे, तर आचारक्षेत्रांतहि अेक नवें आंदोलन यांनीं निर्माण केल्यामुळें रूढीप्रिय समाजाला सारखे धक्के बसत गेले; जुन्या कल्पना, जुन्या श्रद्धा नष्ट होत चालल्या आणि तेथें पुरोगामित्वाची, प्रगतिशीलतेची ध्वजा फडफडूं लागली. नवविचारांच्या खिडकींतून जेव्हां लोक पाश्चात्य जगाकडे पाहूं लागले तेव्हां त्यांना विज्ञानाच्या प्रगतीमुळें पालटून गेलेलें नवें जग दिसलें. जणुं अेक नवीन साक्षात्कार झाल्यासारखें त्यांना वाटलें. सुधारणावादाचे अेक अग्रणी न्या. रानडे यांनीं १८८७ मध्यें केलेल्या भाषणांत पुढील अुद्गार काढले होते.—

"आम्हां हिंदूंवर विशेष जबाबदारी आहे. जगांतील अितर राष्ट्रें प्रगतीच्या मार्गानें जलद जलद चाललीं असतांना हिंदूंनींदेखील हातपाय हालविले पाहिजेत; आणि अर्वाचीन काळांतील घडामोडीमध्यें भाग घेतला पाहिजे. आपले पूर्वज स्वधर्माच्या शिकवणीचा जोंवर व्यवहारांत अंमल करीत होते तोंवर त्यांचा अुत्कर्ष होत गेला. आपल्याला या शिकवणुकीची अुपेक्षा करतां येत नाहीं व म्हणूनच सामाजिक प्रश्नांकडे या वेळीं दुर्लक्ष करणें कठीण आहे."

स्थितिप्रिय समाजाला गतिप्रिय करण्याचे रानड्यांचे हे विचार म्हणजे त्या काळांत निर्माण झालेल्या सामाजिक अस्वस्थतेचें अेक लक्षण आहे. सुधारणेचें बीज प्रथम वैचारिक क्षेत्रांत टाकावें लागतें; तेथें तें रुजलें, सामाजिक विचार सुधारणावादी होत चालला कीं नव्या कल्पना स्थिर होत जातात. समाज त्या कल्पना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं प्रयत्न करूं लागतो. भारतांतील अिंग्रजी राजवटींत जे विचारवन्त झाले त्यांनीं हाच प्रयोग केला. राजा राममोहन रॉय, किंवा महाराष्ट्रांत लोकहितवादी, रानडे, आगरकर यांच्या-सारख्या सुधारकांनीं जो सुधारणावाद पुरस्कारला तो केवळ अनुकरणात्मक नव्हता;—पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांचा युगप्रवर्तक समन्वय घालण्याचा तो अेक भव्य प्रयत्न होता. अर्थात् आपले विचार मांडतांना स्वदेशांतील अंधश्रद्धा आदि दोषांविषयीं अुत्कट भाषा वापरली त्याचा अर्थ असा नव्हता—कीं यांना भारतीय जीवनमूल्यांसंबंधीं अनादर होता. सुधारणावादाचा जन्म विकासाच्या, प्रगतीच्या अतीव तळमळींतून झाला, आणि त्यांत सदैव समन्वयादी दृष्टि ठेवण्याचे प्रयत्न झाले.

सुधारणावादाचा विकास

अेक गोष्ट खरी कीं, या सुधारणावादाचा जन्म पाश्चात्य शिक्षणानें झाला आहे. पाश्चात्य विचार हे अधिकाधिक बुद्धिनिष्ठ स्वरूपाचे असल्यामुळें येथील विद्वांनांना पटूं लागले. पाश्चात्यांच्या सामाजिक जीवनांत धर्मनिष्ठ नीति असली तरी त्यांच्या जीवनांतील रूढींना धक्का बसत होता. आपलीं सुखदुःखें हीं जगांतल्याच कांहीं घटनांमुळें निर्माण होतात; त्याचा अीश्वरी शक्तीशीं कोणताहि संबंध नाहीं, अशा प्रकारची निरीश्वरवादी व भौतिक विचारप्रणालि पुढें येत होती. पोपचें वर्चस्व कमी होत होतें. ज्याला आपण आज निधर्मी (सेक्युलर) म्हणतों ती वृत्ति समाजाच्या जीवनांत येत होती. समता, स्वातंत्र्य यांसारख्या कल्पना रूढ होत होत्या. हे सर्व विचार मिल्, स्पेन्सर यांच्यासारख्या तत्त्वज्ञान्यांचीं पुस्तकें वाचून येथील विद्वान् आत्मसात् करीत होते. भारतांतील धर्मभावना, अंधश्रद्धा, भयंकर व वेडगळ रूढी-यांच्याकडे या सर्व सुधारकांनीं वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून

पाहिलें. त्या वेळीं समाजसुधारणा करावी असें त्यांना वाटूं लागलें. अर्थात् त्या सुधारणेच्या कल्पना वेगवेगळ्या स्वरूपाच्या होत्या. पण मूळ कल्पना मात्र अेकच होती, ती म्हणजे समाजक्रांति घडवून आणण्याची.

या सुधारणावादी विचारांचें पृथक्करण केल्यानंतर आपल्याला त्यांत कोणकोणते प्रवाह वहात होते हें दिसून येण्यासारखें आहे. आपण हें प्रथमच पाहिलें. महाराष्ट्रांतील सुधारणावादावर पाश्चात्यांच्या सुधारणांची व विचारांची छाप पडली आहे. त्यांत प्रत्यक्षतः कोणताहि राजकीय विचार आग्रहानें या सुधारणावाद्यांनीं मांडला नसला तरी भाअू महाजन, लोकहितवादी, विष्णुशुवा, फुले, रानडे, आगरकर आदि सर्व समाज-क्रांतिकारकांना लोकांच्या मनांतील पूर्वजांच्या गौरवाच्या चुकीच्या व अवास्तव कल्पना, रूढीप्रियता, दैववाद अित्यादि गोष्टींवर आघात करावयाचा होता, आणि राजकीय सुधारणांकडे त्यांचें लक्ष वेधावयाचें होतें हें निश्चित. यापैकीं प्रत्येक सुधारकानें अिंग्रजी राजवटीचे दोष कमीअधिक तीव्रतेनें मांडलेले त्यांच्या लेखांत आढळतील. अुदाहरणार्थ, लोकहितवादींसारखा सुधारक आपण ज्ञानशून्यतेमुळें आपलें स्वातंत्र्य घालविलें आणि अितरांचें राज्य आपल्याच सैन्याच्या बळावर चालूं दिलें असें सांगेल, * तर आगरकर अिंग्लंडप्रमाणेंच आपल्याला हाअुस ऑफ कॉमन्स मिळालें पाहिजे ऽ असें प्रतिपादतील. सारांश, या सुधारकांचा राजकीय सुधारणांवर कमी भर असला तरी राजकीय पारतंत्र्यांची जाणीव त्यांना तीव्रतेनें होती हें विसरतां कामा नये. तेव्हां या सर्व महाराष्ट्रीय सुधारकांत हें महत्त्वाचें साम्य आहे.

आतां यांच्यांत जो फरक आहे तो कोणत्या प्रकारचा आहे याचा विचार करतां असें दिसेल कीं, समाजांत सुधारणा व्हावी ती कशी व्हावी, त्या सुधारणेच्या मर्यादा कोणत्या, याच्यावर मतभेद होअी. समाजाकडे ज्या वृत्तीनें पहावयाचें त्यांत फरक पडे. पाश्चात्य संस्कृतीचें अनुकरण करावें आणि आपली संस्कृति तगवावी असें कांहींना वाटे. लोकहितवादी, रानडे हीं याचीं अुदाहरणें सांगतां येतील. पण आगरकरांसारखा बुद्धिवादी नेता

---

* शतपत्रें—पृष्ठ २५७. ऽ आगरकर : निबंधसंग्रह-भाग ३, पृ. १२९.

अत्यंत कठोर बुद्धिनिष्ठ वृत्तीनें या समाजांतील दोषांकडे पाहून कडाडून टीका करी. अशा विचारसरणीची प्रतिक्रिया म्हणूनच कीं, विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखे विचारवंत हे जुनी संस्कृति नष्ट होत आहे असें सांगत. चिपळूणकर व आगरकर हीं दोन टोकें मानलीं तर त्यांच्यामध्यें येणारे रानड्यांच्यासारखे सुधारक होते. रानड्यांची समाजसुधारणेविषयींची भूमिका त्यांच्या राजकारणाप्रमाणेंच नेमस्तपणाची होती. 'स्वमताचा आग्रह विकोपाला जाऊं न देतां जरूर तेव्हां तडजोड करणें' हेंच नेमस्तपणाचें लक्षण असल्यामुळें रानडे हे भारतीय परंपरेशीं तुसड्या वृत्तीनें वागूं शकले नाहींत. ते स्वतः धार्मिक वृत्तीचे होते. त्यामुळें ते म्हणत कीं आपण भूतकाळापासून स्वतःला तोडून टाकूं शकणार नाहीं.

रानड्यांनीं अेकदां म्हटलें होतें कीं, माझी दोन गोष्टींवर अविचल श्रद्धा आहे. ती म्हणजे, अुज्ज्वल भविष्यकाल असलेला हा देश आहे, आणि आपली जाति ही अेक वैशिष्ट्यपूर्ण जाति आहे. (I profess implicit faith in two articles of my creed. This country is the true land of promise. This race of ours is the chosen race.) १८८९ च्या जानेवारीच्या सुमारास हिंदु-विवाहावर रानड्यांनीं अेक लेख लिहिला होता, त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, "जुन्या परंपरेस अनुसरून बदल करा असें सांगण्यांत सुधारकांचा मनसोक्त क्रांति घडवून आणण्याचा अुद्देश नसून, धर्माच्या जुनाट वृक्षावर जीं बांडगुळें अुत्पन्न झालीं आहेत तीं कापून काढण्याचा त्यांचा अुद्देश आहे असें लोकांस दिसून येअील." सारांश, रानड्यांचा सुधारणावाद हा धर्मनिष्ठ, परंपरेला न सोडूं पाहणारा, आणि तरीहि सुधारणेचा आग्रह धरणारा होता. सुधारणांना शास्त्राधार शोधण्याचा मोह रानड्यांना नेहेमीं पडे यांचें कारणहि हेंच आहे. *

याच्या अगदीं अुलट तऱ्हा आगरकरांची होती. कर्मांत कर्मी प्रतिकाराचें तंत्र आगरकरांना मानवलें नाहीं. त्यांचा बुद्धिवाद अगदीं रखरखीत व निर्दय होता. 'हिंदुधर्माला नोटीस' या त्यांच्या प्रसिद्ध निबंधांत आगर-

---

* आजकालचा महाराष्ट्र—(पाध्ये—टिकेकर) पृष्ठ १२७.

करांनीं जे विचार मांडले आहेत तो अेक त्यांच्या प्रखर विचारसरणीचा नमुना आहे. ते हिंदुधर्माला अुद्देशून म्हणतात—

" हिंदु संस्कृतीचा पाश्चात्य संस्कृतीबरोबर संघर्ष सुरू झाला तर तुझ्या निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल समीप आला आहे. तेव्हां जर तुला आपल्या अस्तित्वाची आकांक्षा असेल तर शुद्धीवर ये, आणि आमच्या शरीरभर कांचत असलेले तुझे पाश काढून घे; नाहीं तर भरतखंडभर तुझें नांव देखील अुरणार नाहीं ! "

आगरकरांची ही भूमिका मूळ तत्त्वांनाच हात घालण्याची होती. मिल्ल, स्पेन्सर यांच्यासारख्यांचें तत्त्वज्ञान वाचून अैहिकवादी, व्यक्तिवादी बनलेलें त्यांचें मन या रूढीप्रिय हिंदुसमाजावर जेव्हां तुटून पडे तेव्हां तो अेक घणाघातच वाटे !

लोकहितवादींचा ज्ञाननिष्ठेवरील भर, आगरकरांचा बुद्धिवादाचा आग्रह, रानड्यांची धर्मनिष्ठ, परंपरानिगडित सुधारणेची कल्पना-या तिन्हींपेक्षां वेगळा सुधारणावादी विचार महात्मा ज्योतिबा फुले यांनीं मांडला. हिंदु समाजांतील दलित वर्ग हें अेक सामाजिक विषमतेचें मोठें प्रतीक आहे. या समाजाला वरिष्ठ वर्गानें ज्ञान व शास्त्र यांपासून दूर ठेवून आपल्या दास्यत्वाखालीं ठेवण्याचा प्रयत्न हजारों वर्षें केला आहे. त्या समाजाच्या पुनरुज्जीवनासाठीं ज्योतिबा फुल्यांनीं चळवळ अुभारली. ' सत्यशोधक समाजा 'चें अुद्दिष्ट सांगतांना ज्योतिबांनीं जें लिहिलें आहे त्यावरून त्यांची समाजसुधारणेविषयींची मुख्य दृष्टि कोणती होती, कोणती गोष्ट त्यांना खेद देत होती तें कळेल. ज्योतिबा आपल्या त्या प्रतिवृत्तांत म्हणतात*—

" ब्राह्मण, भट, जोशी, अुपाध्ये अित्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांना मुक्त करण्याकरितां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारें हजारों वर्षें जे शूद्र लोकांस नीच मानून गफलतीनें लुटीत आले आहेत

* निबंधमाला, (चित्रशाळा प्रत) पृष्ठ ४६६-६७.

ठाणे

यास्तव सदुपदेश व विद्याद्वारें त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरितां, म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधीं ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रथांपासून त्यांस मुक्त करण्याकरितां कांहीं सूज्ञ शूद्र मंडळींनीं हा समाज ता. २४ सप्टेंबर सन १८७३ इसवी रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयांवर बोलणें अजी वर्ज आहे.'' ज्योतिबांनीं या संस्थेच्या जोरावर महाराष्ट्रांतील दलित जनतेंत नवें चैतन्य ओतलें, तिला प्रतिकार करण्यास शिकवलें. महाराष्ट्राच्या सुधारकांत फुल्यांचें स्थान या दृष्टीनें अनन्यसाधारण आहे. हिंदु समाजाचीं दोन प्रमुख अधू अंगें आहेत; पहिलें म्हणजे–स्त्री आणि तिच्यावर लादलेलें दास्य, व दुसरें म्हणजे–जातिभेद आणि त्यांतून निर्माण झालेला दलित वर्ग. यांपैकीं पहिल्या दोषस्थळाकडे रानडे व आगरकर यांनीं लक्ष वेधलें, व दुसऱ्याकडे ज्योतिबा फुल्यांनीं लक्ष दिलें. विधवा विवाहासारख्या चळवळीला संख्येच्या दृष्टीनें महत्त्व नव्हतें; तर त्या चळवळीनें हिंदूंच्या स्त्रीविषयक जुनाट कल्पनांना धक्का दिला! त्यांच्या गुलामीवर आघात केला, आणि अेक नवें स्थान त्यांना समाजांत दिलें पाहिजे याची स्पष्ट जाणीव करून दिली. महात्मा फुल्यांनीं केलेल्या चळवळीला असेंच महत्त्व आहे. सामाजिक समतेची कल्पना त्यांनीं मांडली व शूद्रांवर होणाऱ्या अन्यायाची कल्पना समाजाला दिली.

या सर्व विवेचनावरून दिसून येअील कीं, समाजाच्या वेगवेगळ्या दोष-स्थळांवर या सुधारकांनीं हल्ले चढविले. आगरकरांसारख्यांनीं समाजाला पूर्णपणें नवें अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. आगरकरांचीं सुधारक मतें हीं जरी आज बरींचशीं स्वीकारलीं गेलीं असलीं तरी ज्या बुद्धिनिष्ठ, अैहिक स्वरूपाच्या विचारसरणीसाठीं ते आयुष्यभर झगडले तिचा मात्र विजय झालेला नाहीं! अर्थात् आगरकर सोडले तर अितरांच्या सुधारणावादाची झेप फार मोठी नव्हती. महाराष्ट्रांतील सुधारणावादाचा विकास या अनेक दिशांनीं होत गेला आहे.

सावरकरांच्या सुधारणावादाचें स्वरूप

या सर्व सुधारकांचीं मतें पाहिल्यानंतर असे प्रश्न अुपस्थित होतात कीं, सावरकरांच्या सुधारणावादाचें स्वरूप काय आहे? त्यांच्या सामाजिक

सुधारणेचीं सूत्रें कोणतीं ? त्यांच्या समाजसुधारक मतांच्या मर्यादा कोणत्या ? सावरकरांच्या सुधारणावादी मतांची व त्यांनीं केलेल्या प्रत्यक्ष कार्याची माहिती करून घेण्यापूर्वीं या प्रश्नांचीं अुत्तरें शोधलीं पाहिजेत. तरच त्यांचा सुधारणावाद समग्र समजूं शकेल.

सावरकरांनीं अगदीं तरुणपणापासून समाजसुधारणेसंबंधीं आपलीं मतें बनविलीं होतीं. सावरकरांच्या तारुण्यांत रानडे, आगरकर व टिळक असे दोनतीन विचारप्रवाह प्रमुख होते. टिळकांचे विचार राजकीयदृष्ट्या जहाल असले तरी सामाजिक सुधारणांसंबंधीं टिळकांची भूमिका तितकीशीं स्पष्ट व पुरोगामी नव्हती. सावरकरांच्या राजकीय गुरुपदाचा मान टिळकांकडे जात असला तरी सामाजिक सुधारणावादाविषयीं आगरकर व रानडे यांचीं मतेंच त्यांना अधिक ग्राह्य वाटत. 'अभिनव भारत' ही केवळ राज्यक्रांतीचा प्रयत्न करणारी संस्था होती, तरी त्यांचे सामाजिक विचारहि बऱ्याच प्रमाणांत क्रांतिकारक स्वरूपाचे होते. सावरकरांनीं आपल्या आत्मचरित्रांत (पृष्ठ २३५) याचें स्पष्टीकरण करतांना म्हटलें आहे—

> "स्वातंत्र्य मिळाल्यावांचून राष्ट्राची अितर कोणत्याहि दिशेनें खरी अुन्नति होणें हें—हातपाय बांधून टाकलेल्या व्यक्तीची प्रगति तीं बंधनें तोडल्यावांचुन जसें दुर्घट तसें—दुर्घट होय. हें लोकमान्य टिळकांचें म्हणणें आम्ही सर्वथैव सत्य मानीत असूनहि त्यांतल्या त्यांत शक्य ती औद्योगिक नि सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीलाहि अुपकारकच आहे हें आगरकर प्रभृतींचें म्हणणेंहि आम्ही अनुवादूं. राजकारणांत टिळक—चिपळूणकर आमचे गुरु. समाज-कारणांत रानडे—आगरकर आमचे गुरु. त्या अुभयतांच्या मतांत यथाशक्य समन्वय हें आमचें धोरण. म्हणून त्या काळीं राष्ट्रीय प्रगतीस अडविणाऱ्या रूढींचा अुच्छेद, विधवाविवाह, वेदोक्त स्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, विटाळवेडाचा नायनाट, परदेश गमन-स्वातंत्र्य, धार्मिक अवडंबरांचें अुच्चाटन प्रभृति सुधारणांचें आम्ही सक्रिय पक्षपाती होतों. ह्या आणि अशाच अितर अंध रूढीभंगाच्या

विषयांवर संस्थेंत कडाक्याचे वाद होत; आणि त्यांचा बुद्धिपूर्वक निर्णय सुधारणांस अनुकूल असाच होअी.''

सावरकरांचीं सुधारणावादी मतें हीं पूर्वीपासूनच होतीं, याचें आणखी अेक अुदाहरण १९०२ मध्यें त्यांनीं बालविधवेच्या दुःस्थितीचें कथन करणारी कविता केली होती त्यामध्यें सांपडेल. त्या कवितेंतील पुढील ओळी पहा—

धर्माभिमान म्हणजे कांहीं सुविवेकशून्यता नाहीं,
कालस्थितिवश धर्महि आहे हें तत्त्व मान्य मान्यांहि ।
सुज्ञानें सुविचारें स्थित्यनुसारें स्वधर्म सुधरावा,
आपद्गतिचा घोपट मार्गाचि हा हट्ट व्यर्थ न धरावा ॥

या कवितेच्या शेवटीं रूढींवर हल्ला करण्याचा आदेश देतांना सावरकर म्हणतात—

सत्वर कडाड मोडा हानिद ह्या रूढिचा महाखोडा
तोडा दुःस्थिति-बेडी अबला तारोनि धवलयश जोडा !
धर्मा तारायाला अज्ञाना रूढिच्या हरायाला
कालीं कालीं येवो भक्तावन अीश तो करायाला ॥

या दोन्ही अुताऱ्यांवरून सावरकरांचीं सुधारक मतें प्रथमपासूनच होतीं, हें कळून येण्यासारखें आहे. पुढें सावरकर जेव्हां हिंदु संघटनेचें कार्य करूं लागले, तेव्हां त्यांनीं अनेक अनिष्ट रूढि किंवा दोष समाजांत शिरल्यामुळें आपल्या हिंदुराष्ट्राची प्रगति अडून राहिली आहे, असें सांगावयास प्रारंभ केला. त्या रूढीभंजनासाठीं आत्यंतिक तळमळीनें लेखणीचें शस्त्र परजलें. बुद्धिनिष्ठ युक्तिवादाची धार त्या लेखणीला दिली. मग त्यांचीं सुधारणावादी मतें त्यांनीं समाजापुढें मांडलीं. अर्थात् सावरकरांचा सुधारणावाद हा केवळ सुधारणेसाठीं नाहीं. त्यांचें स्वप्न विजिगीषु हिंदुत्वाचें असल्यामुळें त्यांतून तो सुधारणावाद जन्मला आहे. जणुं कांहीं विजिगीषु राष्ट्रवादाच्या कल्पनेचा घोडा या दुष्ट रूढींनीं अडविल्यामुळें सावरकर त्यांच्याशीं युद्ध

खेळावयास निघाल्यासारखे वाटतात. सावरकरांच्या सुधारणावादाला हें राष्ट्रीय अधिष्ठान आहे; अेखाद्या व्हॉल्टेअर, रूसो किंवा मार्टिन ल्यूथर-सारखी शुद्ध तत्त्वज्ञ सुधारकाची भूमिका ते घेत नाहींत. म्हणून अेका दृष्टीनें सुधारणावाद हा आत्मनिष्ठ (Subjective) आहे, ध्येयनिष्ठ (Idealist) नाहीं. पण हा दोष नव्हे, ही त्यांच्या सुधारणावादी मतांची मर्यादा आहे, हें मान्य करावयास हरकत नाहीं.

तात्त्विक अधिष्ठान

पण सावरकरांच्या सुधारणावादाला ही मर्यादा असली तरी त्यांचीं सुधारणाविषयक मतें हीं प्रतिक्रियात्मक किंवा भावनिक स्वरूपाचीं नाहींत. सावरकरांच्या सुधारणावादाला अेक निश्चित स्वरूपाचें तात्त्विक अधिष्ठान आहे. सामाजिक क्रांति कोणत्या सूत्रानुसार व्हावी याविषयीं त्यांच्या कांहीं कल्पना आहेत. समाजाच्या धारणेला कोणते नियम अुपयोगी पडतील हें तपासण्याचा त्यांचा तात्त्विक निकष आहे. आणि या तात्त्विक निकषावर कोणताहि नवा विचार ते तपासून घेतात. अितकेंच नव्हे तर जुनी संस्कृतिसुद्धां त्या निकषावर अुतरत असेल तरच ते स्वीकाराई मानतात.

सावरकर हे मूलगामी व क्रांतिकारक वैचारिक पुढारी आहेत, असा निष्कर्ष प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं त्यांच्या अेका लेखांत-('सुवर्णतुला' पृष्ठ १२९–१३७) काढलेला आहे. हा निष्कर्ष साधार मांडतां येण्यासारखा आहे. सावरकर हे हिंदुत्ववादी असल्यामुळें त्यांना प्रतिगामी समजण्याची पद्धत आपल्या देशांत पडून गेली आहे. सावरकर खरोखर प्रतिगामी आहेत कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं त्यांच्या सुधारणावादाचें तात्त्विक अधिष्ठान शोधलें पाहिजे. त्या तत्त्वाचें स्वरूप कळल्यावरच सावरकर हे मूलगामी विचारसरणीचे सुधारक आहेत कीं नाहीं हें कळेल.

बुद्धिनिष्ठ दृष्टिकोण

सावरकर हे जीवनाकडे बुद्धिनिष्ठेनें पाहतात. त्यांचीं जीं श्रद्धाकेंद्रें आहेत त्यांचा स्वीकारहि त्यांनीं बुद्धिनिष्ठेनें केलेला आहे. त्यांच्या या बुद्धिनिष्ठेचें

प्रत्यंतर त्यांच्या राजकीय, सामाजिक विचारसरणींत येतें. सावरकरांच्या सुधारणावादाचें हें पहिलें आणि मूलभूत स्वरूपाचें वैशिष्ट्य आहे. आगरकर आणि सावरकर यांच्यांत या दृष्टीनें विलक्षण साम्य आहे. आगरकरांनीं ज्या आवेशानें, ज्या तर्कशुद्ध तत्त्वनिष्ठेनें हिंदुधर्मांतील व्यंगांवर आघात केले अहित त्याच पद्धतीनें सावरकरांनीं आपले सुधारणावादी विचार मांडले आहेत. आंबेडकरांनीं पूर्वी १९३५ च्या सुमारास जेव्हां धर्मान्तर करण्याचें ठरविलें होतें, त्या वेळीं सावरकरांनीं त्यांना उद्देशून जो लेख लिहिला आहे तो लेख म्हणजे सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ दृष्टिकोणाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. किंबहुना सावरकरांच्या सामाजिक सुधारणावादाचें अधिष्ठान कोणतें आहे तें त्यावरून कळून येण्यासारखें आहे. सावरकर त्या पत्रकांत म्हणतात*—

"बुद्धीला जें पटत नाहीं, अशी श्रद्धा ठेवणें ज्यांना आवडत नाहीं, अितकेंच नव्हे तर तर्काला विरुद्ध जाणारीं धर्ममतें हीं अशा अंध-श्रद्धेच्या आशेनें उराशीं धरून ठेवणें ज्यांना निव्वळ अप्रामाणिक-पणाचें वाटतें, धर्म म्हटला कीं त्यांत कांहीं जुनाट आणि आजच्या परिस्थितींत निरर्थक नव्हे तर अनर्थकहि झालेले असे आचार आणि संकेतहि जे असतातच त्यांना लोकहितासाठीं सुधारणें हें ज्यांना आपलें कर्तव्य वाटतें, आणि पारलौकिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टींवरहि ते प्रत्यक्षनिष्ठ तर्काच्या पलीकडे जाऊन विश्वासूं अिच्छित नाहींत अशा Positivists किंवा Rationalists प्रभृति बुद्धिवाद्यांनीं अेखादा धर्म सोडला तर त्याचें धोरण सहज ध्यानांत येतें. त्या अर्थानें डॉ. आंबेडकर हे हिंदुधर्म सोडीत असतील तर त्यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं."

असें सांगून नवा बुद्धिवादी संघ स्थापावा असा आग्रह करतांना त्याचें स्वरूप कसें असावें हें थोडक्यांत त्यांनीं सांगितलें आहे.—

"आजच्या स्थितींत लोकहितास प्रत्यक्षपणें साधणारे हाच ज्यांचा आचार, तर्कनिष्ठ आणि प्रत्यक्षागत तत्त्वज्ञान हींच ज्यांचीं अुपनिषदें,

---

* जातिभेदोच्छेदक निबंध— पृष्ठ २२०, २२१.

आणि विज्ञान हीच ज्याची-स्मृति असा बुद्धिवादी संघ स्थापावा; आणि त्याच्या अनुपायांस अंधश्रद्धेच्या भाकडकथांच्या पिंजऱ्यांतून सोडवून अेका झटक्यासरशीं अद्ययावत अशा वैज्ञानिक बुद्धि-स्वातंत्र्याच्या अुच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणांत नेअून सोडावें हेंच इष्ट आहे. ''

बुद्धिवादी मनुष्य कोणत्याहि शास्त्राला गतिशून्य अवस्थेंत जखडून ठेवूं अिच्छीत नाहीं. मग तें धर्मशास्त्र असो वा राज्यशास्त्र असो. समाजाच्या प्रत्यक्ष अनुभवाला जें पटेल तें स्वीकारण्याची त्याची तयारी असते. कोणताहि बदल, मग तो कितीहि क्रांतिकारक असला तरी तो स्वीकारण्याची त्या बुद्धिवाद्याची सिद्धता असते. तेव्हां वेगवेगळ्या संघर्षांत सांपडलेल्या माणसानें आपली प्रगति करून घेण्याचा अेकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे—प्रत्यक्षनिष्ठ बुद्धिवादी दृष्टिकोणाचा स्वीकार करून सर्व प्रश्नांकडे त्यानें पहावें. सावरकर बुद्धिवादी आहेत ते या अर्थानें. त्यांनीं आपल्या सामाजिक विचारांना हेंच अधिष्ठान दिलेलें आहे, अितकेंच नव्हे तर त्या-प्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला आहे. जुन्याचा विनाश करून नव्या गोष्टींचें हास्यमुखानें स्वागत करण्याची वृत्ति सावरकरांनीं वैचारिक क्षेत्रांत ठेवली आहे आणि म्हणून वर दिलेल्या अुताऱ्यांत त्यांनीं तर्कशुद्धता, बुद्धि-स्वातंत्र्य यांचा पुरस्कार केलेला आपल्याला आढळतो.

अुपयुक्ततावाद आणि प्रत्यक्षानिष्ठा

सावरकरांच्या या बुद्धिनिष्ठ व तर्कनिष्ठ वृत्तीप्रमाणेंच त्यांच्या सामाजिक विचारसरणीचें दुसरें अेक तात्त्विक मूल्य आहे तें म्हणजे-त्यांचा अुपयुक्ततावाद व प्रत्यक्षानिष्ठा (Utilitasianism and pragmatism).

सावरकरांच्या सामाजिक मतांची घडण मिल्ल, स्पेन्सर, बेंथॅम या पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या विचारसरणींतून झाली आहे. किंबहुना टिळकांच्या वेळच्या सर्व पिढीवरच या तत्त्वज्ञांच्या दृष्टिकोणाचा ठसा अुमटला आहे. स्वतः टिळकांनीं १९०३ मध्यें हर्बर्ट स्पेन्सर मरण पावल्यावर ' केसरी 'त पांच

स्तंभी अग्रलेख लिहून त्याच्या तत्त्वज्ञानाची तुलनात्मक स्तुति केली होती. त्या लेखांत टिळक शेवटीं म्हणतात,—"अिकडील नव्या विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या अेका सबंध पिढीच्या मनावर हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचाराचा जितका परिणाम झाला आहे तितका अितर कोणाचाहि झालेला नाहीं." (टिळक चरित्र, खंड २ (भाग २, पृष्ठ ३). या स्पेन्सरच्या विचारांचा पगडा असलेल्या महाराष्ट्रीय सुधारकांतील नवमतवाद आगरकरांच्या लेखणींतून प्रकर्षानें मांडला गेला. त्याचा परिणाम सामाजिक प्रश्नांकडे पहावयाच्या दृष्टीवर झाला. सावरकरांनींहि आपल्या मनावर स्पेन्सरच्या ग्रंथांचा कसा परिणाम झाला आहे हें आत्मचरित्रांत वर्णिलें आहे (पृष्ठ १६९—७०) त्यांत सावरकर म्हणतात—

> "स्पेन्सरच्या ग्रंथांशीं माझा जो परिचय झाला तो मराठींतून. पुढें कॉलेजमध्यें बेनथॅम व मिल थोडा वाचला. तेव्हां मीं याच नीतितत्त्वांस माझ्या सर्व व्यवहारांची कसोटी, माझें नीतिसूत्र, माझा व्यावहारिक धर्म असें मानूं लागलों. या अुपयुक्ततावादाचा मी माझ्या मंडळींत सारखा प्रचार करावा. ज्या नीतिशास्त्राच्या पायावर आणि सूत्राधारें आपल्या क्रांतिकारक आंदोलनास आपण सुधारलें पाहिजे आणि समर्थिलें पाहिजे तें हें Utility हेंच नीतिशास्त्र, हीच क्रांतीची मनुस्मृति असें मी म्हणे, असें मी मानी."

हा अुपयुक्ततावाद म्हणजे काय? समाजाचे जे हितसंबंध असतात त्यांचा विचार करण्याच्या कांहीं पद्धति आहेत. अुपयुक्ततावाद ही अेक अशी विशिष्ट दृष्टि आहे. व्यक्ति आणि समाज यांचें नातें काय हा सामाजिक तत्त्वज्ञानांतील यक्षप्रश्न झाला आहे. व्यक्तिवादाचें पर्यवसान जेव्हां अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्यांत होतें त्या वेळीं पुन्हां समाजविषयक दृष्टि जागृत होतें. अुपयुक्ततावादी तत्त्वज्ञानांत व्यक्तीपेक्षां समाजाचें हित महत्त्वाचें मानलें जातें. तेथें व्यक्तीला जें चांगलें तें समाजाला वाअीट ठरत असेल तर तें कृत्य अनीतिमान समजलें जातें. म्हणजे चांगल्या कृत्याचा निकर्ष व्यक्तिगत स्वार्थ नसून समाजाचें हित हा आहे, असें अुपयुक्ततावादी

मानतो. जॉन स्टुअर्ट मिल हा 'अधिकांचें अधिक हित' साधणारें कृत्य नीतिमान् होय असें मानीत असे. मिलच्या विचारामागें समाजहिताची प्रेरणा होती. समाजसुधारणा व आदर्श समाजरचना हीं त्याचीं स्वप्नें होतीं. मिलच्या आणि बेन्थॅमच्या विचारसरणींत खूपच साम्य आहे. या अुपयुक्ततावादी तत्त्वज्ञानामुळें अेक महत्त्वाचा फायदा झाला. व्यक्तिनिष्ठेकडून समाजनिष्ठेकडे माणसें वळूं लागलीं. त्यांत असलेल्या सुखवादांकडे फारसें लोकांचें लक्ष गेलें नाहीं. पण अुपयुक्ततावाद हा समाजाचें हित करणारा असल्यामुळेंच तो विकासशील ठरला. अुपयुक्ततावादाचीं वैशिष्ट्यें सांगतांना विल्यम डेव्हिडसन यांनीं आपल्या 'दि युटिलिटेरिअन्स' या ग्रंथांत म्हटलें आहे—

"अुपयुक्ततावाद हा अत्यंत मानवनिष्ठ व व्यवहार्य आहे. तें केवळ नैतिक स्वरूपाचें तत्त्व नव्हे, तर राजकारण व राज्याचे कायदे यांनाहि तो लागू पडतो. माणसाच्या सर्व कृतींशीं, हितार्थीं त्याचा प्रत्यक्ष संबंध आहे.

("It is intensely human and intensely practical. It is not merely an ethical theory with claims to scientific recognition, but also a theory that enters the realm of politics and aims at finding itself embodied in State legislation. It is directly in touch with the living movements and interests of men, as these are found in society pushing on to a higher level".)

अुपयुक्ततावादाचा विकास कसा होत आहे हें यावरून कळून येअील. सावरकरांनीं या उपयुक्ततावादाचें समर्थन टिळकांच्या 'गीतारहस्या'वर लिहिलेल्या अेका लेखांत (केसरी, ४ ऑगस्ट १९२५) केलें आहे. त्यांत त्यांनीं सुखवाद वा हितवाद म्हणजे वैषयिक सुख नव्हे असें सांगून चिरकालीन, अपरतंत्र, अुत्कट असें आध्यात्मिक सुखहि अुपयुक्ततावादाप्रमाणें अुपार्जनीय आणि नैतिक ठरतें असें म्हटलें आहे. अुपयुक्ततावादी मताप्रमाणें नीति म्हणजे काय याचें स्पष्टीकरण करतांना सावरकर पुढें म्हणतात—

" नीतीची पराकाष्ठा ' सर्वभूताहितरतत्व ' आहे, हेंच गीतेचें रहस्य-कारांनीं नीतिसर्वस्व ठरविलें आहे. अुपयुक्ततावादाचा हाच सिद्धांत आहे कीं, ज्यायोगें फार अधिकांचें अधिकाधिक सुख वा हित साधलें जाअील तें कर्म विहित होय.

त्यांतहि सर्वभूतहितरतत्व या शब्दांतील ' सर्वभूत ' या पदाचा अर्थ आपण करूं लागलों तर आपणांस अंतीं अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचाच आश्रय करावा लागतो. आत्मैक्यबुद्धीनें कां होअीना पण अेकदां साम्याच्या आकाशांतून आपण वैषम्याच्या स्थिर व जड भूमीवर अुतरलों म्हणजे तेथें सर्वभूतहितरतत्व याचा अर्थ अक्षरशः सर्व भूतांचें हित असा घेणें अशक्य होतें. व्याघ्र अेखाद्या आश्रमांतील सवत्स गाअीवर तुटून पडतांच स्थितप्रज्ञ ऋषीदेखील व्याघ्रापासून गाअीला सोडविण्यासाठीं व्याघ्राला ठार मारविणें नीति समजत. आतां आत्मौपम्यदृष्टीनें गाय न मरूं देणें हें नीतियुक्त अहेच आहे. पण व्याघ्राचें भक्ष्य हिसडून त्याची क्षुधा वाढविणें किंवा त्याचा प्राणहि घेणें हें केवळ आत्मौपम्यदृष्टीनें अनीतीचेंच ठरणार. दरोडेखोर मारला पाहिजे. कारण त्या अेकाच्या शासनानें समाजाचें म्हणजे अधिकतम जनाचें हित साधतें. व्याघ्र मारून गाय सोडविली पाहिजे, कारण मनुष्यास व्याघ्राहून गाय उपयोगी असते. तेव्हां सर्व भूतांचें हित साधणें सर्वस्वीं अशक्य असून, मनुष्यास व्यावहारिक शक्यतेचा मार्ग मोकळा आहे, आणि तो म्हणजे-मनुष्यजातीस अधिकांचें अधिक कल्याण, शक्य तितक्या पुष्कळांचें सुख साधणें हाच होय. सर्वभूतहितेरतः हीं पदें अर्थवादात्मक असून त्यांचा मुख्यार्थ ' बहुमनुष्यहितेरतः ' असाच होतो. "

या सर्व विवेचनावरून अुपयुक्ततावाद हें संकुचित तत्त्वज्ञान नव्हे, ती व्यक्तिवादी सुखलालसा नव्हे, हें कळून येण्यासारखें आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं युरोपांत ही विचारसरणी प्रभावी झाली. लोकशाहीच्या कल्पनेंतहि ' बहुतांचें बहुहित ' हेंच सूत्र आहे, आणि मार्क्सवादाच्या

सामाजिक दृष्टिकोणाचें मूळहि या अुपयुक्ततावादी तत्त्वज्ञानांतच सांपडेल. या सर्व विघातशील व व्यापक अुपयुक्ततावादाचा स्वीकार बुद्धिनिष्ठेनें सावरकरांनीं केला आहे, आणि त्यामुळेंच त्यांचे सुधारक विचार वर म्हटल्याप्रमाणें केवळ भावनात्मक झालेले नाहींत. सावरकर श्रीकृष्णाला आदर्श अुपयुक्ततावादी मानतात. त्यांच्याकडे आध्यात्मिक गुरु म्हणून पहात नाहींत याचें कारण त्यांची राष्ट्रजीवनाकडे पाहण्याची दृष्टीच अशी अुपयुक्ततावादी आहे.

पण सावरकर केवळ अुपयुक्ततावादी नाहींत. राजकारणाप्रमाणें समाजकारणांतहि ते प्रत्यक्षनिष्ठ वा व्यवहारवादी (Pragmatist) आहेत. सावरकरांच्या व्यवहारवादाचें अुत्कृष्ट अुदाहरण म्हणजे त्यांनीं हिंदुत्वाच्या राजकारणांत स्वीकारलेला दृष्टिकोण. सावरकर हे हिंदुत्ववादी राहूनहि 'सुधारक' होऊं शकले किंवा निधर्मीवृत्तीचे राहूं शकतात याचा पुष्कळांना अचंबा वाटतो. सावरकर हे प्रत्यक्षनिष्ठ वा व्यवहारवादी असल्यामुळें त्यांच्या समाजसुधारणेंतहि अेकांगीपणा आढळणार नाहीं. आगरकर व सावरकर यांच्यांत हाच फरक आहे. आगरकर हे प्रखर बुद्धिवादी असल्यामुळें त्यांनीं अितर कोणत्याहि गोष्टीचा विचार केला नाहीं. आगरकर व टिळक यांच्यांतील अेक संवाद केळकरांनीं टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडांत दिला आहे (पृष्ठ ४४). त्यांतील अेकाच वाक्यावरून आगरकरांचें व्यक्तिमत्त्व कळून येण्यासारखें आहे. त्यांत ते म्हणतात— " अनंत काळापासून चाललेले रिवाज म्हटले कीं माझ्या कपाळांत तिडीकच अुठते. " आगरकरांप्रमाणेंच सावरकरांनाहि जुने आचारविचार सर्वच पसंत आहेत असें नाहीं. पण जुन्यांतील आचारांचाहि कांहीं अुपयोग होण्यासारखा असेल तर ते तो आचार पाळा म्हणतील. अुदाहरणार्थ, त्यांची स्वतःची मूर्तिपूजेवर श्रद्धा नसली तरी पतितपावन मंदीर ते स्थापतील, सोमनाथाच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला कीं त्यांना आनंद होअील. कट्टर निरीश्वरवादी मनुष्य हें कधींच करणार नाहीं. सावरकरांच्या या व्यवहारवादी दृष्टीचीं पुष्कळ अुदाहरणें देतां येतील. अस्पृश्यतेसंबंधीं त्यांचें जें धोरण आहे तें अशाच स्वरूपाचें आहे. अस्पृश्यांतहि अुच्चनीच भाव आहेत, हें

सांगण्यास ते विसरणार नाहींत. अितर धर्मीयांतहि अस्पृश्यता असते हेंहि ते स्पष्ट करून सांगतील. सावरकरांच्या या सामाजिक दृष्टीचें वर्णन थोडक्यांत करावयाचें झाल्यास असें म्हणतां येअील कीं, प्रत्यक्ष अुपयोग तात्त्विक सुसंगति, व अनुभवाचा निकष (Practical utility, logical consistency and empirical test) या तीन गोष्टींनीं सावरकर सामाजिक सुधारणांकडे पाहतात.

सावरकर हे पूर्णपणें अैहिकवादी, विज्ञाननिष्ठ आहेत. ते अध्यात्मशास्त्र मानतात, पण तें वैयक्तिक स्वरूपाचें आहे. त्याच्या आधारावर समाजाचे व्यवहार चालूं नयेत अेंसें त्यांचें स्पष्ट मत आहे. सावरकरांच्या सुधारणावादाची ही तात्त्विक पार्श्वभूमि आहे. त्यामुळें त्याच दृष्टीनें त्यांचे वेगवेगळ्या विषयावरचे विचार समजावून घेतले पाहिजेत. विशेषतः त्यांच्या सामाजिक विचारांत त्यांनीं धर्म, अंधश्रद्धा, रूढि, भ्रामक समजुति, वेडगळ आचार-यांच्यावर जे हल्ले चढविले ते या त्यांच्या ठाम भूमिकेवरून. त्यांच्या डोळ्यासमोर विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी, भौतिकवादी अशा समाजाचें अेक चित्र आहे, आणि तें असल्यामुळेंच अत्यंत तळमळीनें त्यांनीं हिंदूंच्या रुढींवर आघात केले आहेत. हिंदु समाजाची प्रगति अडविणाऱ्या कल्पनांवरहि सावरकर तुटून पडले आहेत.

सनातन धर्म, प्राचीन धर्मग्रंथ, प्राचीन संस्कृति, प्राचीन आचार वा रूढी, आणि जुनी समाजरचना या सर्वांविषयीं सावरकरांनीं आपले विचार स्पष्टपणें मांडले आहेत. पण हे सर्व विचार आघात करणारे असले तरी सावरकरांनीं कोणत्या नव्या गोष्टींचा स्वीकार करावा हेंहि सांगितलें. यंत्रयुगाचा स्वीकार, बुद्धिस्वातंत्र्याचा जयघोष—व विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार या तीन सुधारणा वा हीं तीन समाजक्रांतीचीं सूत्रें म्हणून त्यांनीं सांगितलीं आहेत. सावरकरांच्या सामाजिक विचारांत या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

खरा सनातन धर्म कोणता ?

सुधारक म्हटला कीं तो सनातन धर्माचा अुच्छेद करणारा, अशी व्याख्या रूढ झाली आहे. पण सनातन धर्म म्हणजे काय याचा मात्र अूहापोह

कोणी करीत नाहीं. अुपनिषदांतील परब्रह्मस्वरूपाचे अत्युदार विचार हेहि सनातन धर्माचेच, आणि विस्तवापुढें पाय धरून शेकूं नये, कोंवळ्या अुन्हांत बसूं नये, अित्यादि नियम हाहि सनातन धर्मच ! अनेक प्रसंगीं परस्पर-विरुद्ध असणाऱ्या या विधिनिषेधांसच 'अेष धर्मस्सनातनः !' अशी राज-मुद्रा टसठशीतपणें ठोकली जाते. मग सनातन धर्म कोणता ? सनातन म्हणजे अपरिवर्तनीय, शाश्वत. तेव्हां, शाश्वत नियम–म्हणजे जे बदलूं नयेत, अितकेंच नव्हे तर जे बदलणें मनुष्याच्या शक्तीबाहेरचीं गोष्ट आहे असे अबा-धित जे धर्म असतील, नियम असतील, त्यासच सनातन धर्म म्हणतां येअील अशी व्याख्या सावरकरांनीं केली आहे.

प्रत्यक्ष अनुमान आणि त्यांना सर्वस्वी विरुद्ध न जाणारें आप्तवाक्य या प्रमाणांच्या आधारें सिद्ध होअूं शकणारें, आणि ज्याविषयीं कोणीहि यथाशास्त्र प्रयोग केला असतां त्या त्या कार्यकारणभावाच्या कसोटीस जे पूर्णपणें केव्हांहि अुतरूं शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यांत जे जे सृष्टिनियम आणि जीं जीं वैज्ञानिक सत्यें आज आलेलीं आहेत–त्यास आम्ही आमचा सनातन धर्म मानतों. सूर्य, चंद्र आदि शक्ति या कोणी देवता नमून ह्या सनातन धर्माच्या नियमांनीं पूर्णपणें बद्ध असणाऱ्या वस्तु आहेत. हा झाला धर्माचा अेक भाग. दुसरा विभाग म्हणजे पारलौकिक वा पारमार्थिक नियमांचा. अीश्वर, जीवजगत् यांच्या स्वरूपाचे नि परस्पर संबं-धांचें अस्तिरूप किंवा नास्तिरूप, कांहीं त्रिकालाबाधित नियम असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणें पारलौकिक प्रकरणींचे सिद्धांतहि अपरिवर्तनीय होत यांत शंका नाहीं. पण पारलौकिक वस्तुस्थितीचें ज्ञान प्रयोगानें आपल्याला झालेलें नाहीं. अशा अवस्थेत त्यासंबंधीं निश्चित कोणतेंहि मत बांधणें चूक आहे. म्हणून याविषयीं वेगवेगळ्या धर्मग्रंथांत सांगितलेले विचार अीश्वरदत्त वा अपौरुषेय नसून मनुष्यकृत वा मनुष्यस्फूर्त आहेत. त्यांच्या कल्पना प्रमाणहीन असल्यानें त्यांना सनातन धर्म म्हणणें चुकीचें आहे. तसेंच मनुष्याचे सारे अैहिक व्यवहार, नीति, रीति, निर्बंध हे त्यास या जगांत हितप्रद आहेत कीं नाहींत या प्रत्यक्षनिष्ठ कसोटीनेंच ठरविले पाहिजेत, पाळले पाहिजेत, परिवर्तिले पाहिजेत. बदलणाऱ्या जगांत ते मानवी व्यवहार

अपरिवर्तनीय वा सनातन असणें शक्य नाहीं आणि अिष्ट नाहीं. म्हणून महाभारतांत म्हटलें आहे तेंच ठीक आहे कीं ' अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहार-विधिं नयेत् ! '

धर्मग्रंथांचें स्थान

सावरकरांनीं आपल्या सनातन धर्माचें स्पष्टीकरण अशा रीतीनें केल्या-नंतर, प्राचीन धर्मग्रंथांकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें आहे, त्याचाहि विचार करण्यासारखा आहे. ' दोन शब्दांत दोन संस्कृति ' या त्यांच्या अुत्कृष्ट निबंधांत सावरकरांनीं ही विचारसरणी अत्यंत तीक्ष्ण व मार्मिक युक्तिवादानें व सोदाहरण मांडली आहे. भारतांत काय किंवा इतर कोणत्याहि देशांत—आपल्या पूर्वापार परंपरेनुसार वागण्याचा आग्रह धरणारा वर्ग असतोच. त्यांचा आधार, त्यांचें सारसर्वस्व म्हणजे त्यांचे प्राचीन ग्रंथ. सावरकर या पोथीनिष्ठेला कडाडून विरोध करतात. आपल्याकडे धर्म ही संस्था केवळ आध्यात्मिक शिकवण देणारी नव्हती, तर त्या धर्मानें आमच्या सामाजिक व वैयक्तिक स्वरूपाच्या व्यवहारांचें नियमन केलें आहे. धर्माला निर्बंधाचें (कायद्याचें) स्थान या देशांत प्राप्त झालेलें होतें. पण अैहिक आचार हे बदलतात, समाजांतील पोथीनिष्ठ मतें मात्र तो बदल मान्य न करतां जुन्याच मार्गांचा पुरस्कार करतात. म्हणून सावरकरांनीं आपल्या प्राचीन धर्मग्रंथांकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हें स्पष्ट केलें आहे. सावरकर त्यासंबंधीं म्हणतात—

" आमच्या संस्कृतीचें अत्यंत लाजिरवाणें, भूषण म्हणून आम्हीं जें ब्रीद मिरवितों तें हें कीं, जें वेदांत सांगितलें आहे त्याच्यापुढें आम्हीं गेल्या दहा—पांच हजार वर्षांत राजकीय, सामाजिक व धार्मिक विधिनिषेधांत वा कौशल्यांत रतिभरहि पुढें सरकलों नाहीं. आमचे पूर्वज त्रिकालज्ञ होते ही आमची प्रतिज्ञा ! आणि त्यांना जें ठाअूक नव्हतें तें मी शिकलों असें मानणें किंवा तसें कांहीं शिकणें म्हणजे त्यांच्या त्या त्रिकालज्ञ ज्ञानमत्तेचा अुपमर्दच असल्यानें, तसें

पाप आपल्या हातून घडत नाहीं ना, त्यांना कळत नव्हतें असें तर मला कांहीं कळूं लागलें नाहीं ना, ही आमची चिंता ! शास्त्रार्थांचीं अेरंडाचीं गुऱ्हाळांमागून गुऱ्हाळें विद्वत्परिषदांतून चाललेलीं आहेत. खरोखर आमच्या हिंदु संस्कृतीची पूर्वापार विशिष्ट प्रवृत्ति कोणती, लक्षण कोणतें, महासूत्र कोणतें,- तें अेका शब्दांत अपवादादिं वजा जातां व्यक्तविणें असेल तर, तो शब्द म्हणजे 'श्रुतिस्मृति पुराणोक्त' हाच होय ! ! जे जे ग्रंथ अपौरुषेय समजले गेले त्यांच्या त्यांच्यांत सामावलेली संस्कृतीहि सहजंच अपरिवर्तनीय समजली जाते, आणि जे लोक आपल्यावर त्या ग्रंथाची सत्ता चालूं देतात ते श्रुतिस्मृति पुराणोक्ताचे, या पुरातनपणाचे बंदे गुलाम होअून वसतात. त्यांच्या दोन पुष्ट्यांच्या आंत सारें विश्व नि सारा काल डांबून ठेवण्याचा वेडगळ अट्टहास ते जरी करतात तरी सदा चंचल, सदा नवीन, अदम्य आणि अमोघ निसर्गशक्ति नित्याची थोडीच डांबून राहते ! प्रकृति आणि काळ हीं अशीं त्या स्वतःस अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधित समजणाऱ्या धर्मग्रंथांच्या ताडपत्रांचा चुराडा अुडवीत सारखा स्वच्छंद धिंगाणा घालीत असतां, त्या ग्रंथांच्या शेवटच्या अक्षराच्या पुढें पाअूल टाकायचेंच नाहीं असा मूर्ख हट्ट धरणाऱ्या लोकांची संस्कृति त्या त्या धर्मग्रंथांच्या प्राचीन संस्कृतीपेक्षां कधींहि अधिक विकसूं शकणार नाहीं हें काय सांगावयास हवें ?

ही बेडी तोडलीच पाहिजे !

" आपल्या हिंदु राष्ट्राच्या अधोगतीस कारणीभूत होणाऱ्या दुष्ट राष्ट्रीय रूढींसहि हें श्रुतिस्मृति पुराणोक्तच आज अमर करून ठेवीत आलें आहे. राष्ट्र मरणाच्या दाराशीं अुभें आहे. हिंदुराष्ट्रास या काळाच्या तडाक्यांतून वांचवावयाचें असेल, तर ज्या ह्या श्रुति-स्मृतिपुराणोक्ताच्या बेडीनें कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत ती तोडली पाहिजे. आणि ती 'सुदैवानें अगदीं आणि सर्वस्वी

आपल्या अिच्छेवर अवलंबून आहे. कारण ती वेडी मानसिक आहे. युरोप चार शतकांपूर्वीपर्यंत धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झालेला होता. आणि त्यापायीं आपल्यासारख्याच दुर्गतीस पोहोंचला होता. पण त्यानें बायबलास बाजूस सारून विज्ञानाची कांस धरतांच, श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची वेडी तोडून अद्यावत् बनतांच, अप-टु-डेट बनतांच, युरोप गेल्या चारशें वर्षांत आमच्यापुढें चार हजार वर्षें निघून गेला ! त्रिखंडविजयी झाला ! तसें आमच्या भारतीय राष्ट्रासहि होणें असेल, तर 'पुरातनी' युगाचा ग्रंथ मिटून, ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शासनें गुंडाळून आणि केवळ अैतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयांत सन्मानपूर्वक ठेवून, विज्ञान-युगाचें पान अुलटलें पाहिजे. त्या ग्रंथांचा 'काल काय झालें' अितकेंच सांगण्यापुरता अधिकार ! आज काय योग्य तें सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगक्षम विज्ञानाचा ! अेकंदरींत आज अुपयोगी आहे ना ? मग तें केलेंच पाहिजे ! या अेका वाक्याच्या अेका घावासरशीं जे प्रश्न आम्हीं चार हजार वर्षें सोडवूं शकत नाहीं ते चार दिवसांत सुटतील, चार दिवसांत त्या बेड्याच तुटतील !

अितका निश्चय होतांच, आपल्या प्रगतीला पांच हजार वर्षांपूर्वीच्या मागासलेल्या संस्कृतीस जखडून टाकणारी या श्रुतिस्मृति-पुराणोक्ताची मानसिक बेडी तुटून आमच्या कर्तृत्वाचे हात मोकळे झालेच म्हणून समजा. मग त्या मुक्त हस्तांनीं ज्या बाह्योपाधि आमच्या अुन्नतीच्या मार्गांत आडव्या येत आहेत—वा येतील, त्यांचेंहि डोकें ठेंचून वाट मोकळी करणें आम्हांसहि आजच्याहून शतपटीनें सुलभ झाल्यावांचून राहणार नाहीं !"

सावरकरांचे धर्मग्रंथांवरील हे विचार वाचल्यानंतर मार्टिन ल्यूथर किंवा रस्किन यांच्या लिखाणाची आठवण होते. युरोपमध्यें बायबलचें प्रस्थ माजलेलें असतांना, किंवा त्या बायबलच्या आधारें पोप आपली धार्मिक

हुकुमशाही परजवीत असतांना मार्टिन ल्यूथर अुठला, आणि त्यानें त्या हुकुमशाहीला आव्हान दिलें. रस्किन ह्या प्रसिद्ध इंग्रजी लेखकानेंहि 'Of king's treasurer, या निबंधांत त्या वेळच्या श्रीमंतीची मिरासदारी झालेल्या ख्रिस्ती धर्मावर असेच कोरडे ओढले आहेत. The dramatic Christianity. the gas-lighted and gas-inspired Christianity अशीं विशेषणें बहाल केलीं आहेत. ही पोथीनिष्ठ वृत्ति आपल्याहि देशांतील मोठमोठ्या लोकांत कशी मुरलेली आहे हें हिंदु कोड बिलाला जो विरोध या देशांत झाला त्यावरून कळून येण्यासारखें आहे. सावरकरांनीं या पोथी-निष्ठ वृत्तीविरुद्ध २० वर्षांपूर्वी आघाडी अुघडली. जोंपर्यंत भारतीय मन विज्ञाननिष्ठ बनत नाहीं, बुद्धिनिष्ठ बनत नाहीं, तोंपर्यंत अुद्योगीकरणाच्या किंवा समाजवादाच्या कितीहि घोषणा केल्या तरी त्यांचा अुपयोग होणार नाहीं. पहिली क्रांति मनांत व्हावयास पाहिजे. तें मन जर ग्रंथनिष्ठ व जुन्या काळांत वावरणारें राहिलें तर बदल होणार नाहीं. बाह्यतः समाजाची परि-स्थिति पालटेल, पण खरी प्रगति होणार नाहीं. आज भारतांत जे निधर्मी राज्य स्थापूं अिच्छितात त्यांच्या मार्गांत ही पोथीनिष्ठ मनोवृत्ति हीच अडचण आहे. आणि जातीय, प्रतिगामी समजल्या गेलेल्या सावरकरांनीं तर केव्हांच त्या पोथीनिष्ठेला तिलांजलि दिली आहे हें या विवेचनावरून कळेल. सावरकरांच्या सामाजिक सुधारणावादांतील हा मूलभूत विचार आहे.

प्राचीन संस्कृति आणि तिचें रक्षण

भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्याच्या प्राचीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा अुल्लेख करण्यांत येतो. सुधारणावादाचे जे विरोधक असतात ते सनातन धर्माप्रमाणेंच या प्राचीन संस्कृतीचा वारंवार अुल्लेख करून सांगतात कीं, तुम्हीं अमुक अमुक केलेंत तर तें आपल्या भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध आहे. अेखादी राज्यपद्धति, अर्थशास्त्रीय तत्त्व तुम्हीं स्वीकारलें तर हे संस्कृतिरक्षक म्हणतील—'हें अभारतीय आहे!' अर्थात् 'भारतीय' म्हणजे काय, भारतीयत्वाचीं सामाजिक तत्त्वें कोणतीं अित्यादि कल्पनांचें शास्त्रीय स्पष्टी-करण त्यांनीं कधींच केलेलें नसतें. हे दुर्धारक ज्या प्राचीन संस्कृतीच्या

बुरख्याआड आपली प्रतिगामी वृत्ति लपवितात त्यासंबंधीं सावरकरांचीं मतें काय आहेत हें पाहण्यासारखें आहे. सावरकरांना भारतीय संस्कृती-विषयीं आदर नाहीं असें नाहीं. त्यांना हा जो आदर वाटतो त्याचा आविष्कार त्यांच्या 'हिंदुत्व' या पुस्तकांत झालेला आहे. अितकेंच नव्हे तर सांस्कृतिक अेकात्मतेंतून निर्माण होणारी आत्मीयता नसेल तर भारताला मिळणारें स्वराज्य हें स्वराज्यच नव्हे; कारण निव्वळ भूगोलावरील 'हिंदुस्थान' नांवाच्या अेका मातीच्या तुकड्याचें स्वातंत्र्य हा कांहीं स्वराज्याचा खरा अर्थ नव्हे, असें सावरकरांनीं हिंदुसभेच्या व्यासपीठावरून अनेक वेळां सांगितलें आहे. किंबहुना असल्या स्वत्वहीन स्वराज्यासाठीं भारतीय क्रांतिकारक झगडले नाहींत असेंहि ते सांगत. सावरकरांना हिंदु धर्माच्या तत्त्वज्ञानाविषयीं अभिमान वाटतो; धर्माच्या तात्त्विक कसोट्याच लावावयाच्या असतील तर हिंदु धर्म हाच अेकमेव बराचसा निर्दोष असा धर्म आहे असें ते म्हणतात ! बुद्धिवादाच्या दृष्टीनें अितर धर्मांपेक्षां हिंदुधर्मच ग्राह्यतम आहे असें सावरकरांना वाटतें. तेव्हां हिंदु संस्कृति, हिंदु परंपरा, हिंदु धर्म यांचा योग्य तो अभिमान सावरकरांना आहे. पण तरीहि यांच्या नांवावर देशाची भौतिक प्रगति रोखण्याचा जे प्रयत्न करतात त्यांच्यावर सावरकरांनीं खडसून टीका केली आहे. सावरकर म्हणतात—

> "संस्कृति-संरक्षण (किंवा धर्मरक्षण) याचा अर्थ प्राचीन संस्कृतींतील सर्वच गोष्टींचें रक्षण करणें हा नव्हे. प्राचीन संस्कृतींतील सर्वच गोष्टी आज 'संस्कृति' समजतां येत नाहींत. प्राचीन संस्कृतींतील यज्ञसंस्था जरी घेतली तरी नृ-यज्ञ हाहि त्यांतील अेक प्रकार होता. मग त्याची ओळख बुजूं नये म्हणून आज मधून मधून नरमेधहि सांगोपांगहि करीत बसावयाचें काय? संस्कृति-रक्षणाचा अर्थ हा खासच नव्हे. जी वेदकाळची रूढि किंवा आचारात्मक धर्म आज विज्ञानाच्या दिव्यतर प्रकाशांत समाजघातक रोगाणूंनीं लडबडलेला दिसतो ती रूढी वा आचार आजच्या संस्कृतींत न मोडतां दुष्कृतींतच मोडला पाहिजे. मग प्राचीन

काळीं तो लोकांना परवडला असो वा नसो, संस्कृत वाटला असो वा नसो. आज जें संस्कृत म्हणून अभिमानानें रक्षावयाचें तें प्राचीनांतलें आजहि संस्कृत ठरणारें, मनुष्यास हितकारक ठरणारें तेवढें-तेवढेंच काय तें होय. प्राचीनांतील जें आजहि उत्तम, अनुकरणीय, उदात्त, अपेक्षणीय, प्रगत नि प्रबुद्ध ठरतें तें तें आजचें संस्कृत. तसें प्राचीन संस्कृति संरक्षण हें आजचें कर्तव्य होय, प्राचीन दुष्कृतिरक्षण नव्हे.

पुढचें पाऊल

त्या संस्कृतिरक्षणाच्या कर्तव्याहूनहि पुढचें कर्तव्य म्हणजे संस्कृति विकसन ! प्राचीनांतलें जें आजच्या विज्ञानांतहि संस्कृत वाटलें तें रक्षूनच चालणार नाहीं तर त्यांत नवीन सत्याची नि तथ्याची भर टाकून संस्कृतिवर्धन केलें पाहिजे. त्यास जें अडथळा करील, त्या कसोटींत जें हिणकस ठरेल तें टाकणें म्हणजे संस्कृतिसंरक्षण, संस्कृति-विकसन. यज्ञसंस्था त्या कसोटींत आज हिणकस ठरते. अरबीं मनुष्यें नाचणीच्या अंबिलीचा भुरकाहि मिळेना म्हणून ज्या राष्ट्रांत पटापट भुकेनें मरताहेत त्या राष्ट्रांत प्रत्यक्ष लाभांत अगदीं कुचकामी ठरलेल्या ह्या यज्ञसंस्थेस 'संस्कृति' म्हणून आगीचे डोंबाळे भडकवून त्यांत खंडोगणती अन्नाचे ढीग नि मणोगणति तुपाचे हौद समंत्रक समारंभपूर्वक जाळीत बसणें म्हणजे न कळत आगलावेपणा होत आहे, — संस्कृतिसंरक्षण नव्हे ! ''

भारतांतील संस्कृतीच्या या रूढींवर सावरकर हल्ले करीत असले तरी त्या संस्कृतीनें जी जीवनदृष्टि दिली आहे त्याचा सावरकर पुरस्कार करतात. भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांविषयीं चर्चा करतांन सावरकर अेकदां असें सहज म्हणाले—

'' आपल्या देशांत शांति, पुष्टि आणि तुष्टि असे तीन वाद होते. शांतिवादावर म्हणजे आध्यात्मिक जीवनावर भर देणारा तो शांतिवाद

म्हणतां येअील. पुष्टिवाद म्हणजे अुपभोगवाद. वल्लभाचार्यां-सारख्यांचा पंथ याचाच पुरस्कर्ता होता असें म्हटलें तर चुकणार नाहीं. तिसरा म्हणजे तुष्टिवाद.—म्हणजं समाधानाचें तत्त्वज्ञान. इंद्रियांचा अुपयोग आपण अमर्याद घेअूं शकत नाहीं. त्यांतसुद्धां संयम लागतो. त्या संयमानेंच सुखप्राप्ति होते. आपण आपल्या गरजा अमर्याद वाढविल्या म्हणजे आपल्याला सुख लाभेल ही कल्पना जशी चुकीची आहे, तशी आपण अगदीं गरजा नाहींशा करण्याचा प्रयत्न केल्यावर सुख लाभेल हीहि कल्पना चुकीची ! म्हणून शेवटीं समाजाला समाधानाचें तत्त्वज्ञान वा समाधानी दृष्टिकोणच सुखी करील असें मला वाटतें ! ''

भारतीय संस्कृतीनें संक्रांति-समारंभासारखे सामाजिक अेकता निर्माण करण्यास अुपयोगी पडणारे आचार ठेवले आहेत, त्याचा सावरकर पुरस्कार करतात. वर सांगितलेलें समाधानाचें तत्त्वज्ञान किंवा दुःखांतहि सुख पाहण्याची दृष्टि हें सावरकरांच्या जीवनाचें वैशिष्ट्य होअून राहिलें आहे. यावरून असें दिसून येअील कीं, संस्कृतीचा बडेजाव माजविणें हें सावरकरांचें ध्येय नाहीं. ते भूतकाळाचे पूजक नाहींत. परंपरेची स्फूर्ति फक्त ते भूतकाळा-पासून घेतात; पण वर्तमानकाळाचा विचार करतांना नवीं मूल्यें, नवे प्रयोग यांचा विचार व स्वीकार करण्यास ते आनंदानें तयार असतात. डॉ. राधाकृष्णन् यांच्या शब्दांतच सावरकरांच्या संस्कृतिविषयक दृष्टीचें वर्णन समर्पक रीतीनें करतां येअील*—

"A living society must have both the power of continuity and the power of change. The Hindu view makes room for essential changes. Life is not life unless it is thrusting continually into new forms. Culture is tradition and tradition is memory. The duration of this memory depends on continuous appearance of creative personalities. A culture dies

---

* Religion and Society — Pages 113—120.

a natural death when it becomes crystallised or congealed an accidental or artificial death when its tradition is interupted.

(म्हणजे, जिवंत समाजाजवळ चिरंतनत्वाचें व स्वतःमध्यें बदल घडवून आणण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. योग्य तो बदल घडवून आणणें हें हिंदु दृष्टिकोणाचें वैशिष्ट्य आहे. जीवन हें नित्य नूतन स्वरूपांत दिसत नसेल तर तें जीवनच नव्हे ! संस्कृति म्हणजे परंपरा आणि परंपरा म्हणजे स्मृति. ही स्मृति जिवंत राहावयाची असेल तर सृजनशील कर्तृत्वाच्या व्यक्ति वारंवार जन्मास याव्या लागतात. अेखादी संस्कृति ' जड ' झाली कीं ती निसर्गतः मरण पावते किंवा तिची परंपरा जर अडविली गेली तर तिला अपमृत्यु येतो.) राधाकृष्णन् यांच्या या विचारसरणीप्रमाणेंच सावरकरांचें मत असल्यानें त्यांनीं आद्यतनी वृत्तीचा निर्भीड पुरस्कार केला. ' पुरातन कीं अद्यतन ' ऽ या निबंधांत ते म्हणतात—

" कालपर्यंत जुन्यांतील जें प्रयोगांनीं आजहि अुत्तम ठरतें, विज्ञानाच्या कसोटीस टिकतें,तें ज्ञान तर आम्ही टाकाअू म्हणत नाहींच, पण जुन्यांतील जें जें आजच्या विज्ञानाच्या कसोटींत अज्ञान ठरतें तेंहि समाजशास्त्र नि मानसिक शास्त्रदृष्ट्या आम्हांस टाकाअू वाटत नाहीं ! त्या पुरातन सर्व बऱ्यावाईट अनुभवास जमा धरून आजच्या विज्ञानाच्या कसोटीनें जें राष्ट्रधारणास आज अुपयुक्त ठरतें, तेंच बेधडक आचरावें. अुद्यां बदलत्या परिस्थितींत वा वाढत्या वैज्ञानिक ज्ञानांत जर तेंहि चुकीचें नि अहितकारक ठरेल तर तो आमचा आजचा आचार बदलण्यास ' अुद्यांहि ' तसाच स्वतंत्र आहे. केवळ कालच्या पोथीच्या शब्दानें ' आज ' बांधलेला नसावा, ' अुद्यां ' तर नसावाच नसावा ! या विज्ञाननिष्ठ मतासच आम्ही अद्यावत्पणा म्हणतों. अद्यतनी प्रवृत्ति ती हीच ! "

आपले जुने आचार, जुनी रचना, जुने विचार यांच्याकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टि ही मूलभूत स्वरूपाची आणि क्रांतिकारक नाहीं काय ?

ऽ सावरकर साहित्य, भाग २ — पृष्ठ २७, २८

आगरकर आणि सावरकर या दोघांनींच प्रामुख्यानें अगदीं बारीकसारीक आचारावर टीकास्त्र सोडलें. सावरकरांच्या सुधारणावादी विचारसरणीचें हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. हें रूढीभंजन सावरकरांनीं लेखणीचें शस्त्र करून केलें आणि प्रत्यक्ष कार्यहि त्यासाठीं केलें.

रूढी-भंजनाचीं शस्त्रें !

उपयुक्ततावाद, प्रत्यक्ष व्यवहार, विज्ञाननिष्ठ पुरोगामी वृत्ति, यांच्या पार्श्वभूमीवर सावरकरांनीं हें रूढिभंजनाचें कार्य केलें. त्यांच्याजवळ धार्मिक भावडेपणा जसा नाहीं, तसा बौद्धिक भावडेपणाहि नाहीं. सावरकरांनीं सर्व जुन्या शास्त्रांचा स्वतः अभ्यास करून यज्ञ, गोपूजन, स्पर्शबंदी, समुद्रगमन-बंदी, मांसाशन, अित्यादि गोष्टींवर अत्यंत विवेचक, पण घणाघात करणारें लिखाण केलें आहे. सावरकर-साहित्याच्या पांचहि भागांत किंवा-'क्ष'-किरणें सारख्या निबंधसंग्रहांत त्यांचे हे भेदक विचार समग्र आहेत. ते मुळांतून वाचल्याविना 'सुधारक सावरकर' किती क्रांतिकारक रीतीनें विचार करतात हें कळणार नाहीं. सावरकरांचे हे सर्व निबंध जर त्यांनीं अेकाद्या ग्रंथासारखे लिहिले असते तर त्यांच्या मूलभूत विचारांची ओळख महाराष्ट्राला झाली असती. पण ते निबंध बरेचसे वृत्तपत्रीय असल्यामुळें त्यांत फक्त तत्त्व-प्रतिपादन आलें आहे; असावी तितकी तत्त्वचिकित्सा नाहीं. त्यांतील आवेश, अुपहास, विचारांची सूक्ष्मता, शास्त्रशुद्ध विवेचन यामुळेंच ते अधिक वाचनीय झाले आहेत. सावरकर अेकदां रूढींवर आघात करूं लागले म्हणजे मग ते आपल्या बुद्धीची तीक्ष्णता, सृजनशीलता त्यांत ओततात. अत्यंत निर्भयपणें मांडलेल्या त्या रूढीभंजक विचारांनीं महाराष्ट्रांत किंवा भारतांत किती खळबळ अुडाली होती हें आतां सर्वश्रुतच आहे. 'गाय हा अुपयुक्त पशु आहे !' हें त्यांचें वाक्य तर त्यांच्या सुधारणावादी मतांचें प्रतीकच होअून राहिलें आहे. या सुधारणावादी मतांत सावरकरांनीं सदैव प्रखर युक्तिवादाचा आश्रय केला आहे. त्यांचे रूढीभंजनाविषयींचे सर्व निबंध म्हणजे तर्कशुद्ध युक्तिवादाचीं आदर्श अुदाहरणें आहेत. प्रतिपक्षीयांचा अेक अेक आक्षेप घेअून त्याचा फडशा पाडणें ही त्यांची तऱ्हा. साधी गोष्टहि

अतिशयोक्ति करून सांगावयाची व ती अितकी हास्यास्पद ठरवावयाची कीं प्रतिपक्षीयाचें नैतिक बळच खचीं व्हावें. आगरकरांनीं रूढींवर केलेले हल्ले हे उद्वेगानें, सात्त्विक संतापानें जनतेचें लक्ष वेधून घेत; त्यांत तत्त्वज्ञ व अुपदेशक आगरकर जनतेला दिसत. सावरकरांची भूमिका सुधारकांच्या वकिलाची आहे—दुसऱ्या पक्षाच्या भूमिकेंतील विसंगतीवर, शास्त्रदुष्टतेवर व तर्कशून्यतेवर बोट ठेवून सावरकर आपलें म्हणणें दुसऱ्याला पटवून देतात ! अेकदां अेखादें विवेचन साधार मांडलें कीं, मग सावरकर मुसंडी मारीत निर्दय युक्तिवादानें प्रतिपक्षीयांची दैना अुडवीत पुढें जात आहेत असें वाटतें. म्हणूनच आगरकरांना सुधारणावादाचे तत्त्वज्ञ म्हणतां येअील, तर सावरकर सुधारणावादाचे प्रबळ समर्थक वा वकील आहेत असें म्हणतां येअील. सावरकरांच्या रूढीभंजनाविषयक मतांकडे या दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

गोपालन,-गोपूजन नव्हे !

भारतासारख्या कृषिप्रधान देशांत गाअीला मोठें महत्त्व मिळावें हें अगदीं स्वाभाविक आहे. तिच्या दुधापासून तों शेणापर्यंतच्या सर्व पदार्थांचे मनुष्यास भिन्न भिन्न प्रकारचे अुपयोग होतात, त्यामुळें कृतज्ञतेनें गाअीची पूजा होते. हिंदूंच्या भूतदयाशील स्वभावास साजेसें हें आहे यांत शंका नाहीं. सावरकरांनीं हिंदूंच्या या भाबड्या गोपूजेवर टीकास्त्र सोडलें होतें. त्यांचें म्हणणें येथें सविस्तर देणें शक्य नाहीं, पण थोडक्यांत त्यांनीं पुढील-प्रमाणें टीका केली होती—

" मनुष्याला गाअीचा अधिकाधिक प्रत्यक्ष अुपयोग जर करून घ्यावयाचा असेल तर देवता समजून गोपूजनाची भावना सर्वस्वीं त्याज्य आहे हें आपणांस मानावें लागेल. कारण मनुष्यांतील अगदीं निर्बुद्ध माणसाअितकीं बुद्धिदेखील ज्यांत नाहीं अशा कोणत्याहि पशूला देवता मानणें म्हणजे माणुसकीचाच अपमान करणें आहे. अितकेंच काय, कोणत्याहि पशूस माणसानें देवता म्हणून मानणें म्हणजे देवत्वासहि पशूहून कमी लेखणें होय. गाय ही देवता म्हटली,

गोपूजन हें कर्तव्य म्हटलें, कीं मनुष्य हा गाअीसाठीं आहे अशी श्रद्धा अुत्पन्न होणारच होणार. अुलट गाय ही मनुष्यासाठीं असून मनुष्य हा गाअीसाठीं नाहीं, हें सूत्र ठेवल्यास मनुष्याचें, राष्ट्राचें अेकंदर हित साधत असेल तर गोहत्याहि करण्यास कोणी कचरणार नाहीं.

मनुष्याला अधिकाधिक अुपयोग ज्यायोगें होअील अशा प्रकारेंच गाअीची जोपासना करावयाची असेल तर तो हेतु साधण्यास गोपालन हें राष्ट्राचें कर्तव्य होय असें सूक्त राष्ट्रापुढें ठेवलें पाहिजे. गोरक्षण हा धर्म आहे, तें अैहिक नि पारलौकिक पुण्य आहे, गाय ही देवता आहे, अितकेंच नव्हे तर तिच्यांत अेक सोड्रून तीस कोटी देवता राहतात,- प्रभृति बाष्कळ कल्पनांवर अनुष्टुपें रचून गोपूजन हाच हिंदु धर्म आहे हें सूत्र राष्ट्रापुढें ठेवल्यानें गाअीचें रक्षण तर हवें तसें होत नाहींच, पण भावडेपणाची प्रवृत्ति राष्ट्रांत वाढून गोभक्ती-पायीं राष्ट्रभक्तीचेंच खोबरें होतें. मनुष्याच्या हिताचाच बळी गाअीपुढें देण्यांत येअून गोरक्षणांतील मूळ हेतूलाच धक्का पोहोंचतो. अितकेंच नव्हे तर गोपूजन हाच धर्म,- ही कल्पना समाजाच्या बुद्धि ह्रत्येस कारणीभूत होते.

गाअीस अेक वेळ गोमाता म्हणा, लाक्षणिक अर्थानें तें क्षणभर चालेल; पण तें अक्षरशः खरें मानणें नव्हे ! त्याहिपुढें जाअून आअीचेदेखील जे पदार्थ असेव्य मानावयाचे ते देखील गाअीचे सेव्य मानून, तिचें शेण नि गोमूत्र समारंभपूर्वक प्यायचें—हा आचार कीं अत्याचार ? काय म्हणे, हे अमके तमके रोग बरे होतात. आणि शेण हें अुत्तम खत आहे. घोड्याचें मूत्र, गाढवीचें दूध, कोंबडीची विष्टा हीहि अुपयुक्त औषधें आहेत. पण कोंबडीची विष्टा सर्पदंशावर अुतार मानतात म्हणून श्राद्धाच्या दिवशींहि चटणी-सारखी थोडी थोडी सेवावी काय ? शेण खत आहे तर शेतांत घाला ! पोटांत कशाला ? शेण खाणें ही शिवी आहे, संस्कार नव्हे !

आपल्या थोर हिंदु संस्कृतीचें विडंबन जर कोणी करीत असेल तर ह्या आपल्या असल्या पुण्य म्हणून शेण खाणाऱ्या नि गोमूत्र पिणाऱ्या भावड्या चाली होत ! ''

भूतदया कीं भूतबाधा ?

हिंदु धर्माचें भूतदया हें मोठें वैशिष्ट्य आहे, अशी अेक समजूत रूढ आहे. हिंसेनें ज्याला दुःख होतें तो हिंदु अशीहि हिंदूची व्याख्या करणारे लोक आहेत. या भूतदयेचे विलक्षण प्रकार आपल्याला आढळून येतात. टोळ धान्य फस्त करूं लागले तर त्यांना मारण्यास विरोध होतो. वानरें सुमारें अेक कोटी लोकांचें अन्न खातात, पण तीं मारुतिरायाचीं वंशज समजलीं गेल्यामुळें त्यांना कोणी मारीत नाहींत. हे असले धर्मभोळेपणाचे प्रकार या देशांत चालू असतात. सावरकरांनीं यांसाऱ्या प्रकारांवर सडकून टाका केली आहे. त्यांना टीकेसाठीं खूप विरोध सहेन करावा लागला आहे. साधुत्वाच्या नांवाखालीं हे प्रकार होतात, त्यामुळें सावरकर हे साधुत्वाच्या दृष्टीनें हीन ठरविले जातात. सावरकर भूतदयेविषयीं म्हणतात—

'' सर्वांगंपूर्ण, यथावत् भूतदया, ' दया सर्वेषु भूतेषु ' आचरणें मनुष्याला अशक्य आहे. हात हालवला तरी शतावधि जीवजंतूंचे मुडदे पडंणार. नुसती डोळ्याची पापणी हालविली तरी ' पक्षणोऽपि निपातेन येषाम् स्यात्स्कंधपर्ययः ' असे अतिसूक्ष्म जीव मारले जातात, घायाळ होतात. कांहींच न खावें, न प्यावें, तर मनुष्यजातची जात ठार ! मशकासाठीं मनुष्याचा वध, वागुरड्यासाठीं ब्रह्महत्या, सापासाठीं साधूचा घात ! तेव्हां भूतदयेच्या त्या वाटेच्या प्रत्येक पावलावर नि वर्तुळावर दुर्लंघ्य अडसर सृष्टीनेंच लावला आहे कीं ' जीवो जीवस्य जीवनम्. ' मनूनें सृष्टिनियमांचें सार ज्या अेका सुरेख श्लोकांत ग्रथिलें आहे तोच या महनीय प्रयोगानें सिद्धिलेला सिद्धांत कीं—

चला नामचला भक्ष्या दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिणः ।
अहस्तानां सहस्ताश्च शूराणांचैवभीरवाः ॥

माणसावर दया करून जर भूतमात्रांवरहि दया करतां आली असती तर ती अवश्य केली असती. तें अशक्य असलें तरीहि माणसाच्या हितास घातक असणाऱ्या प्राण्याचा नांश करतांनासुद्धां मनाला कांहीं तरी दुःख होतेंच होतें; दयेची तळमळ बाधतेच बाधते. पण स्वतःच्या लेंकराला रोगापासून वांचविण्यासाठीं जेव्हां शस्त्रक्रिया करावी लागते, तेव्हां कासावीस होणाऱ्या आईच्या हृदयाची ती दया अप्रयोजक म्हणून दाबून टाकून लेंकरावर शस्त्रक्रिया करावीच लागते,—तशीच भूतदयेची ही दुर्बलता, ही तळमळ मनुष्यहितार्थ दडपून टाकलीच पाहिजे. आज आपल्याकडे अशा प्रकारची मनुष्य-हितघातक भूतदया दाखविणाऱ्यांविषयीं अेक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. तो जसा कांहीं अेक अलौकिक सद्गुण समजला जातो, साधुत्वाचें लक्षण समजलें जातें. पण वास्तविकपणें पाहतां ती अेक नृशंसव्याधि आहे. ती भूतदया नसून भूतबाधा आहे ! मनुष्यघातक अपराध आहे ! मानसिक दुर्बलता आहे. जी मनुष्यासच घातक, ती दया ' दया सर्वेषु भूतेषु ' होअील कशी ? कारण सर्व भूतांत मनुष्य आलाच ! सृष्टीच्या, आम्हांस सर्वस्वी असुधारणीय असलेल्या व्यवस्थेशीं नसती घासाघीस करण्यापायीं ' अिद च नास्ति परं च न लभ्यते' अशी फजीति करून घेण्यापेक्षां, मनुष्यानें जें साध्य तितकें तरी साधावें हें अुत्तमच. जी मनुष्याच्या हितास पोषक वा निदान अविरोधी तितकीच भूतदया पाळणें अेवढेंच काय तें त्याचें कर्तव्य, तोच याविषयींचा खरा सृष्टिविहित मानवधर्म ! ! ''

सावरकरांची ही भूमिका असल्यामुळेंच आत्यंतिक अहिंसा हें पाप आहे, असा सिद्धांत त्यांनीं राजकारणांतहि मांडला. पूरक अन्नाचा प्रश्न निघाला तेव्हां वानरें, टोळ यांना ठार मारून धान्य वांचवा, व सुमारें पांच कोटी लोकांचें धान्य वांचवावयाचें असेल तर मांसाहार करा, असें त्यांनीं

सांगितलें. नागपंचमीला नागाला दूध घालणें, कबुतरांना धान्य घालणें, गाभीला पक्कान्नांचा नैवेद्य दाखविणें, वारुळांतील मुंग्यांना साखर द्यावयाची—या नि अशा खुळचट चालीरीतींवर सावरकरांनीं याच भूमिकेवरून कोरडे ओढले. त्यामुळें हिंसेनें दुःखी होणारीं अनेक सनातनी हिंदु मनें दुखावलीं गेलीं, आणि सावरकरांवर हे लोक रुष्ट झाले.

तीं भोंगळ व्रत—वैकल्यें !

पापपुण्याच्या कल्पना प्रत्येक धर्मांत आहेत, त्याप्रमाणें त्या हिंदु धर्मांतहि आहेत. ख्रिस्ती धर्मगुरूंनीं युरोपमध्यें 'पापमुक्ततेचे पास' काढण्यापर्यंत मजल जशी गांठली तशीं भारतांतहि व्रत-वैकल्यें करून पापमुक्त होण्याची प्रथा आहे. हीं व्रतें आजच्या वैज्ञानिक युगांत कशीं खुळचट व टाकाऊ आहेत हें सावरकरांनीं अनेक वेळां हिरीरीनें मांडलें. भारतांतील हिंदु व मुसलमान दोघांनींहि धर्मवेडाच्या या रानटी समजुती टाकून द्याव्यात असा त्यांनीं आग्रह धरला. अेका जुनाट मागासलेल्या संस्कृतीला बांधून घेऊन कालाच्या मार्गांत आडवे पडाल तर विज्ञानाच्या टांचेखालीं तुम्हींहि चिरडून जाल असा, अिशारा त्यांनीं युरोपमधील अुदाहरणें देअून मुसलमानांना दिला, तर हिंदूंनाहि आपलीं व्रतें टाकून देशकाल, पात्रापात्रता यांचा विचार करा असें सांगितलें आहे.× व्रतच धरावयाचें असेल तर राष्ट्राची किंवा मानव्याची कांहीं तरी सेवा घडेल, हीन—दीनांचीं दुःखें कमी करतां येतील अशीं व्रतें आचरावींत. पोटावर सरपटत यात्रा करणें, किंवा गंगेंत लाख रामनामाच्या चिठ्या पिठाच्या गोळ्यांतून सोडणें—यांसारख्या अगदीं खुळचट नि देशकालपात्राचा विवेक नसलेल्या तामसी व्रतांहून हिंदु धर्म नि हिंदु राष्ट्र यांचा अभिमानी जो भगवान्, ज्यास हिंदु साधुसंत भजूं नी पुजूं अिच्छितात तोहि अधिक निःसंशयपणें प्रसादला जाअीलच जाअील !

× 'क्ष' किरणें—पृष्ठ १ ते १२.

या व्रतवैकल्याप्रमाणें हिंदु धर्माच्या आचारांत अत्यंत महत्त्वपूर्ण समजल्या गेलेल्या यज्ञसंस्थेवरहि टीका केली आहे. सावरकरांची दृष्टि अुपयुक्ततावादी असल्यामुळें हीहि संस्था आज त्यांनीं निरुपयोगी टरवून टाकली आहे. × ते म्हणतात—

"सर्व धर्म हे 'धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः। तस्मात् धारणसंयुक्तं तं धर्मं वेद तत्त्वतः' याच कसोटीनें परीक्षिले पाहिजेत. हेंच शास्त्र प्रतिपादीत असल्यामुळें या नाना प्रकारच्या (जपयज्ञ, तपयज्ञ, ज्ञानयज्ञ अित्यादि) यज्ञांत निवड करण्याचीहि तीच कसोटी शब्दनिष्ठ श्रद्धेच्या दृष्टीनेंहि त्यांतल्या त्यांत अधिक निरपवाद मानली पाहिजे. त्या कसोटीस लावतां ज्या अग्निपूजेपासून प्रत्यक्ष अैहिक हित काडीचेंहि आतां या वैज्ञानिक युगांत साधणें शक्य नाहीं, अुलट समाजाची भाबडी प्रवृत्ति जोपाशीत राहिल्यानें बुद्धिहत्या केल्याचा दोष पदरीं पडून द्रव्याचा, कालाचा नि कष्टांचा अपव्यय होअूनहि प्राचीन अडाणीपणास चिरंतनविण्याची हानीच हानि घडते; आणि पारलौकिक दृष्टयाहि ज्याचीं फळें मिळविणें, सांग प्रक्रियेच्या प्रश्नीं वेदमंत्राचा कोणचाहि निश्चितार्थ ठरवितां येणें मानवी बुद्धीस अशक्य झाल्यामुळें, सर्वदा नी सर्वथा संदेहास्पदच असतें; ती यज्ञाग्निपूजा आतां 'कलिवर्ज्य'त ढकलून तें सारें यज्ञसाहित्य, त्या अग्नीसह यज्ञसंस्थेनें प्राचीन काळीं आपल्या राष्ट्रावर केलेले अुपकार ममत्वपूर्ण कृतज्ञतेनें वारंवार संस्मरत भगवान् बुद्धाप्रमाणें गंगेंत विसर्जिणें हेंच राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आतां श्रेयस्कर आहे.

स्वर्गादि पारलौकिक फलप्राप्तीचें साधन साग्नियज्ञ हेंच नसून त्याहून भक्ति, त्याग, सेवा, दया, ज्ञान, जनहितरतता प्रभृति अनेक साधनें वेदांत नि शास्त्रांत भरपूर आहेत. यज्ञामुळें जे स्वर्गांत गेले म्हणून कीर्तिले आहेत, त्यांच्या शतपटीनें अधिक साधक नि सिद्ध

× सावरकर साहित्य—भाग १, पृष्ठ ५७-५९.

ह्या यज्ञाव्यतिरिक्त साधनांनींहि क्षमशील स्वर्गपद पावले, अितकेंच नव्हे तर अक्षय्य, मोक्षपदहि पावले, असें नामावलीसह त्याच वेदशास्त्र–पुराणांतून नि अर्वाचीन संतकथांतून संकीर्तिलेलें आपणांस आढळेल. नरांची सेवा तीच नारायणाची सेवा समजून, त्या सेवायज्ञावांचून अितर साग्नियज्ञांचें नित्याचें विसर्जन करणें हाच खरा धर्म आहे, खरें कर्तव्य आहे !''

धर्मभोळेपणास तिलांजली

वर चर्चिल्याप्रमाणें हिंदु समाजांतील अनेक प्रकारच्या रूढीवर सावरकरांनीं जे हल्ले चढविले आहेत त्यावरून त्यांच्या सुधारणावादाचे अुपयुक्ततावादी व व्यवहारनिष्ठ स्वरूप समजून येअील. कांहीं रूढींना अैतिहासिक आधार होता, तर कांहीं मूलतःच खुळचट आहेत हें सावरकरांनीं चर्चिलें असलें तरी धर्मभोळ्या प्रवृत्तीनें समाजाची बुद्धिहत्या होते नि त्यामुळें विकास थांबतो, म्हणून ही वृत्ति वाढविणाऱ्या खुळचट रूढि टाकल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. आजच्या भौतिक व प्रयोगसिद्ध ज्ञानाची कास धरून स्वतःचे आचार याप्रमाणें बदलले पाहिजेत असें ते म्हणतात. आमचा धर्म सनातन आहे, आपले धर्मग्रंथ दुर्लंघ्य आहेत, आमची प्राचीन संस्कृति या रूढींतच आहे, अित्यादि अर्धवट कल्पनांचा सावरकरांनीं कसा समाचार घेतला आहे याची चर्चा आपण केली. सावरकर धर्मग्रंथांचें, प्राचीन सत्पुरुषांचें वा अन्य कोणाचेंहि त्रिकालदर्शित्व मान्य करीत नाहींत. हें त्रिकालदर्शित्व मानणाऱ्या या राष्ट्रांतील भाबड्या धर्मभोळ्या वृत्तीस अुच्छेदिण्यासाठीं गाय, वड, तुळस, यज्ञ, व्रतवैकल्यें यांसारखीं कांहीं अुपलक्षणें म्हणून निवडून सावरकरांनीं त्यांच्यावर कडक टीका केली. कोणताहि समाज सुधारावयाचा अलेल तर त्याच्या बुद्धींत, अंतःकरणांत सांचलेलीं हीं जळमटें प्रथम काढून टाकावीं लागतात. शेत नांगरावयाच्या आधीं तेथील दगडधोंडे, कांटेकुटे काढून टाकावे लागतात. रूढीभंजनाचें हें कार्य अशाच स्वरूपाचें असतें. त्यांत विनाशक प्रवृत्तीच प्रमुख असली तरी ती अटळ आहे. आगरकरांनाहि आपल्या

आयुष्यांत या रूढीवर टीका करावी लागली. समाजाच्या बुद्धीला या रूढींच्या दास्यांतून सोडविल्याविना तो विज्ञानाची, बुद्धिनिष्ठेची किंवा प्रगतिशीलतेची अुपासना करूंच शकणार नाहीं. त्या दृष्टीनें सावरकरांचे हे रूढीभंजक विचार महत्त्वाचे आहेत.

समाजरचनेचे दोष

रूढि हा समाजाच्या बाह्याचारांतील अेक दोष असतो. त्याला मानसिक दृष्ट्याहि महत्त्व आहेच. पण हिंदु समाजाला दुसराहि एक रोग जडलेला आहे, आणि कोणत्याहि समाजसुधारकाला त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाहीं. भारतांत जे जे सुधारक होअून गेले त्यांनीं त्यांनीं या सामाजिक दोषावर आघात केले आहेत, प्रकाशहि टाकला आहे. तो दोष म्हणजे हिंदु समाजांतील जातिभेद. हिंदु समाजांतील जातिभेदांना फार मोठा अितिहास आहे. चातुर्वर्ण्याच्या कल्पनेचें तें विकृत स्वरूप असल्यानें जातिभेदांचा विचार करतांना चातुर्वर्ण्याच्या कल्पनेचाहि विचार करावा लागतो. जातिभेद काय किंवा चातुर्वर्ण्य काय, तो एक समाजरचनेचा प्रश्न आहे. आज त्यांच्याकडे रचनाविषयक दोष (structural defect) म्हणूनच पाहिलें पाहिजे. त्यांचा अभ्यास समाजशास्त्राच्या दृष्टीनें करून त्यावर उपाय शोधला पाहिजे. समाजशास्त्राप्रमाणेंच आजच्या लोकशाहीच्या काळांत जातिभेदांकडे राजकीय दृष्टीनेंहि पाहणें अवश्य आहे. कारण जातिभेद हें आपल्या सामाजिक विषमतेचें मूळ आहे, आणि ती विषमता कायम ठेवून लोकशाही कधींहि यशस्वी होणार नाहीं. समाजवाद जरी यशस्वी करावयाचा असेल तर या अंगभूत दोषाचा विचार करावाच लागतो. जातिभेदानें मानवा मानवांत कृत्रिम भेदांची भिंत अुभी राहाते, आणि मग समता—स्वातंत्र्य—बंधुत्व या तीन तत्त्वांचा आविष्कार समाजाच्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक जीवनांत होणें अशक्य होअून बसते.

सावरकरांनीं जातिभेदांसंबंधीं मांडलेले विचार हे वर सांगितलेल्या राजकीय वा सामाजिक समानतेच्या कल्पनेंतून निघालेले नाहींत. त्यांचे

विचार प्रामुख्यानें जातिभेदांमुळें या राष्ट्राची जी भौतिक प्रगति अडली आहे त्यावर अधिक भर देणारे आहेत. जातिभेदामुळें विदेशगमनासारख्या कल्पना आल्या, आणि त्यामुळें हिंदूंच्या साहसास, पराक्रमास वाव मिळाला नाहीं. हिंदु पराक्रमाचें कोंबडें आपल्याच 'जातीच्या' अंगणास जग मानून त्यांतच डौलाडौलानें आरवत बसलें. अस्पृश्यतेसारख्या दुष्ट कल्पनांमुळें हिंदूंचें संख्याबल कमी झालें. हें सारें जातवेड सर्व समाजाच्या अंगीं मुरल्यामुळें हा समाजदेह जीर्ण शीर्ण झाला आहे. त्याची जीवनशक्ति नष्ट झाली आहे. जातिभेदांमुळें हिंदु समाजाचें हें जें नुकसान झालें, त्यामुळें सावरकर तळमळतात, व त्याचें विजिगीषु मन जातिभेदावर आघात करण्यासाठीं धांव घेतें. सावरकरांच्या सुधारणावादी मतांची ही पार्श्वभूमि या जातिभेदविषयक विचारांतहि आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

जातिभेदांचें अनिष्टत्व

*सावरकरांच्या या जातिभेदविषयक लेखांचें संकलन त्यांच्या 'जातिभेदोच्छेदक निबंध' या पुस्तकांत झालें आहे. त्यांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला असें आढळतें कीं, त्यांनीं जातिभेदांचा समाजशास्त्रीय दृष्टीनें विचार केला आहे. जातिभेदांना पूर्वीच्या समाजव्यवस्थेंत कोणतें स्थान होतें, त्यांची अुत्पत्ति कशी झाली याचेंहि साधार विवेचन केलें आहे. त्याप्रमाणें हे जातिभेद नष्ट करण्यासाठीं काय केलें पाहिजे याचाहि विचार या पुस्तकांत आहे. अर्थात् हे सर्व विचार जर त्यांनीं ग्रंथरूपानें अधिक शास्त्रीय पद्धतीनें मांडले असते तर त्याचा फार अुपयोग झाला असता. तरीहि डॉ. केतकरांप्रमाणें सावरकरांनीं जातिभेदांचा आनुवंशिकतेसारख्या समाजशास्त्रीय कल्पनांचा विचार करून अुहापोह केला आहे. ते विचार मूलग्राही स्वरूपाचे आहेत हें नाकारतां येणार नाहीं. अर्थात् ते अपुरे आहेत यांत शंकाच नाहीं. तेवढ्यावरून सावरकरांचा दृष्टिकोण समजण्यास निश्चित मदत होते.

---

* जातिभेदोच्छेदक निबंध—पृष्ठ ५१.

जातिभेदांचें ऐतिहासिक परिशीलन सावरकरांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.—

" जन्मजात जातिभेदांच्या त्या हानीचा दोष हा कोणाहि अेका वर्णाचे वा व्यक्तीचे माथीं मारण्यापेक्षां त्या दोषाचे वांटेकरी आपण आब्राह्मणचांडाल सर्व जाति, सर्व वर्ण, सर्व व्यक्ति आहोंत. प्रत्यक्ष बुद्धकालांतहि जातिभेद चुकीचा आहे असें न मानतां जातिश्रेष्ठत्वाचा, अग्रवर्णाचा मान हा ब्राह्मणांचा नसून क्षत्रियांचा आहे अेवढाच वाद कित्येक लिखाणांत घातलेला आढळतो. जातिभेदाच्या प्रथेनें प्रत्येक जातीस आपल्या खालच्या जातीवर वर्चस्व गाजविण्याची संधी अनायासेंच मिळत असल्यानें ती प्रथा सर्वांसच थोड्याबहुत प्रमाणांत हवीशी वाटली; आणि म्हणून जातिभेदाचेंच निर्मूलन करण्यास कोणीहि धडपडत नव्हतें. चातुर्वर्ण्याचा किंवा जातिभेदाचाहि प्रादुर्भाव आणि प्राबल्य हें मूलतः समाजधारणेच्या सदबुद्धीनेंच प्रेरित झालेलें असून, त्या पूर्वपुण्याअीचे जोरावरच त्या संस्थेंत आजपर्यंत अितका चिवट जिवंतपणा शिल्लक राहिलेला आहे. विकृति म्हटली कीं तो प्रकृतीचाच अंशतः वा पूर्णतः असणारा कु-परिपाक होय. आणि म्हणून त्या विकृतीचा नायनाट करण्यासाठीं शस्त्रक्रिया करूं अिच्छिणाऱ्या शस्त्रवैद्यानें त्या विच्छेदनाचेंसमयीं मूळ प्रकृतीस कमींत कमी धक्का कसा पोहोंचेल याविषयीं पराकाष्ठेची चिंता बाळगली पाहिजे. त्या योजनांच्या मुळांशीं जीं लोकहितकारक मूलतत्त्वें आहेत किंवा होतीं, त्यापासून होणारे लाभ नव्या योजनेंत राहतील अशी काळजी घेतली पाहिजे. नाहीं तर तत्त्वाच्या अतिरेकानें, किंवा विपर्यासानें, किंवा घातक तत्त्वाभासानें ते लाभहि आपण नाहींसे करूं.

म्हणून, जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद व गुणजात जातिभेदाचा अुद्धार हें त्या नव्या समाजरचनेचें सूत्र असावें.

आनुवंशिक गुणविकास

चातुर्वर्ण्याच्या तत्त्वप्रणालींत आनुवंशिक (हेरिडिटी) गुणविकासाचें तत्त्व होतें. चातुर्वर्ण्यांतून जातिभेदाची ही भयंकर संस्था कशी निर्माण झाली हाहि मनोरंजक व बोधप्रद विषय आहे. आजचे जातिभेद हे खरोखरच गुणविकासाचें तें तत्त्व समर्थनीय करूं शकतात काय हा खरा प्रश्न आहे. आनुवंशिक गुणविकास म्हणजे अेखाद्या मनुष्यांत जर अेखादा गुण व प्रवृत्ति असेल तर त्याच गुणाचा, प्रवृत्तीचा, व कर्माचा व्यासंग त्यानें सतत चालविला असतां, त्याच्या संतानांतहि अितर घटक समान असतां तो गुण व ती कार्यक्षमता अधिक अुत्कटपणें अुतरणें संभवनीय ठरतें. त्या संतानानें तो गुण तशाच गुणाच्या स्त्रीशीं संबंध करून वाढविण्यास मदत करणें—याचा अर्थ आनुवंशिक गुणविकसन असा होतो. जातिभेदाचा हा पाया आहे. बुद्धिमंतानें बुद्धिमंताशींच शरीरसंबंध ठेवणें हें मनुष्यजातीच्या बुद्धिविकासास हितावह आहे हें खरें. हाच प्रयोग हिंदु जातीनें केला आहे. कारण चातुर्वर्ण्य म्हणजे गुणानुरूप व कर्मानुरूप केलेलें समाजाचें वर्गीकरण होय. आनुवंशिक गुणविकासाच्या नैसर्गिक निश्चयाचा लाभ हिंदु समाजानें स्वतः समाजरचनेसाठीं करून घेतला,—हा अेक समाजशास्त्रांतील महान् प्रयोग आहे. या प्रयोगाच्या मुळाशीं असलेली शास्त्रीय दृष्टि, सद्-बुद्धि, साहस व सातत्य आश्चर्यकारक होतें असें सावरकरांचें मत आहे, आणि म्हणून आनुवंशाच्या मूळ तत्त्वाची शास्त्रीय दृष्टीनें छाननी करून त्यांतील विधायक शक्तींचा शोध घेतला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

पण हें अन्य कारण नाहीं

पण आनुवंशिक गुणविकासाचें तत्त्व हेंच गुणविकासाचें कारण नाहीं; इतरहि अनेक नियमांचे आडवे-अुभे धागे त्या रचनेंत गोंवलेले आहेत. आनुवंशानें गुणविकास होतो, पण तो अितर सर्व

घटक समान असले तर! आनुवंश शुद्ध ठेवला तरीहि प्रकाश, अन्न, पाणी, पितरांची मनःस्थिति अित्यादि प्रकारची परिस्थिति जशी बदलते तसे संतानाचे बीजभूत गुण भिन्नभिन्न प्रमाणांत विकास किंवा संकोच पावतात किंवा पालटतात. सद्गुणांप्रमाणेंच दुर्गुणहि वाढीस लागतात. म्हणून आनुवंश हा अत्यंत हानिकारक ठरून, संकरच्च ते दोष वा दुर्गुण संतानांतून काढून टाकण्याचे कामीं समर्थ नि हितकारक ठरतो. पितरांचे सद्गुण कांहीं वेळ विकास पावतात, पण पुढें क्षीण होत जातात. मानवांतील जाती या मानीव, पोथीजात आहेत; त्यामुळें शुद्ध आनुवंश टिकत नाहीं. लैंगिक आकर्षणानें गुप्त संकर होत जातो व बेटीबंदीची रूढि ही हास्यास्पद ठरते.

आनुवंशिक गुणविकासाचें तत्त्व समर्थनीय कां ठरत नाहीं याचे दाखले व्यवहारांत अनेक वेळां आलेच आहेत. तुकारामांना जाऊन आज १०-१२ पिढ्या गेल्या, पण त्यांच्या वंशांत अेकहि तुकाराम झाला नाहीं! इतर देशांतून या पिढीहून पुढील पिढी अधिक सशक्त, सद्गुणी, सुबुद्ध निपजते, तर आमच्या देशांत खुरटी, किडकी, सडकी पिढी दर दहा वर्षांनीं जन्मास येत आहे.

मूळ आधार—भावना

तेव्हां जातिभेदाचा मुख्य आधार भावना आहे. आज तरी त्यामागें दुसरी कोणतीहि शक्ति अुभी नाहीं. म्हणून जातिभेदाचा अुच्छेद म्हणजे जातीच्या अहंकाराचा अुच्छेद! यासाठीं प्रत्येक हिंदुमात्रानें जातीय अुच्च-नीचता मानूं नये. सर्वांची जन्मजात एक—ती म्हणजे हिंदु! आमच्या पायांत सात स्वदेशी शृंखला आहेत. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या त्या सात बेड्या आहेत. त्या आपणच हौसेनें, पोथीनिष्ठेमुळें आपल्या पायांत ठोकून घेतल्या आहेत. जातिभेदांनीं आपली प्रतिकारशक्ति विफल झाली आहे.

बंदुकी नव्हेत,—लाडू !

जन्मजात जातिभेदाचे चार पाय आहेत. ते म्हणजे व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी, नि बेटाबंदी. व्यवसायबंदी तोडणें अवश्यच आहे. सारें जग गुणानिष्ठ व्यवसाय-स्वातंत्र्याचें अनुयायी असतांनाहि जातिपातीवांचून त्याचें अडलें नाहीं. या स्वतंत्रतेमुळेंच युरोप-अमेरिका व्यवसायकुशलतेंत आमच्याहून अेका शंभर वर्षांत पांच हजार वर्षें पुढें निघून गेले आहेत. तेव्हां जातिबद्ध व्ययसायबंदी तोडल्यानें शक्तींत नि व्यवसायांत राष्ट्र अपकर्ष पावत नसून तें उलट भरभराटूं शकतें हें आंतां प्रयोगासिद्ध झालें आहे. स्पर्शबंदी मोडण्यासाटीं प्रत्येक हिंदुसंघटकानें अशी प्रतिज्ञा करावी. जें बोट मी कुत्र्यामांजरास लावतों, तें बोट मी माझ्या अस्पृश्य धर्मबंधूस, माणसास प्रत्यहीं लावल्यावांचून प्रत्यहीं अन्नग्रहण करणार नाहीं. संघटक सुधारकांपैकीं जर प्रत्येकानें बोलघेवडेपणा सोडून असा कर-घेवडेपणा प्रत्यहीं आचरला, आपल्यापुरतें तरी अस्पृश्यांस पूर्वा-स्पृश्य करून सोडलें, तरीदेखील दहा वर्षांच्या आंत अस्पृश्यतेचा मागमूसदेखील साऱ्या समाजांत आढळून येणार नाहीं. आज सार्व-जनिक स्थानीं अस्पृश्यतेचें अुच्चाटन झालें आहे. त्या सवलतींचा प्रत्यक्ष अुपयोग प्रत्येक सुधारकानें हटातटानें करून त्या आत्मसात् केल्या पाहिजेत.

अशा रीतीनें व्यवसायबंदी तोडली, स्पर्शबंदी तोडली, तर रोटी-बंदी तुटणें फारच सोपें आहे. रोटीबंदी तोडावयाचें साधनहि विश्वास वाटूं नये अितकें सोपें आहे. नुसतें जेवायचें ! भिन्न जातीयांबरोबर जेवायचें !— कीं अेवढा दुस्साध्य वाटणारा जाति-भेदाचा गड कोसळलाच पाहिजे. पोथीजात जातिभेदाचें मरण सहभोजनांत आहे. बहिष्कार — पडतीलच ! पण पांचशें चिकाटीच्या सहभोजक सुधारकांवर बहिष्कार घालणारा पांच हजारांचा बहुजन समाजहि अंतीं मेटाकुटीस येतो. कारण बहिष्कार हें दुधारी शस्त्र, घालणारासहि तें कापतें ! खरा सुधारक निश्चितार्थ असतो. बहुजन-

घटक समान असले तर! आनुवंश शुद्ध ठेवला तरीहि प्रकाश, अन्न, पाणी, पितरांची मनःस्थिति इत्यादि प्रकारची परिस्थिति जशी बदलते तसे संतानाचे बीजभूत गुण भिन्नभिन्न प्रमाणांत विकास किंवा संकोच पावतात किंवा पालटतात. सद्गुणांप्रमाणेंच दुर्गुणहि वाढीस लागतात. म्हणून आनुवंश हा अत्यंत हानिकारक ठरून, संकरच्च ते दोष वा दुर्गुण संतानांतून काढून टाकण्याचे कामीं समर्थ नि हितकारक ठरतो. पितरांचे सद्गुण कांहीं वेळ विकास पावतात, पण पुढें क्षीण होत जातात. मानवांतील जाती या मानीव, पोथीजात आहेत; त्यामुळें शुद्ध आनुवंश टिकत नाहीं. लैंगिक आकर्षणानें गुप्त संकर होत जातो व बेटीबंदीची रूढि ही हास्यास्पद ठरते.

आनुवंशिक गुणविकासाचें तत्त्व समर्थनीय कां ठरत नाहीं याचे दाखले व्यवहारांत अनेक वेळां आलेच आहेत. तुकारामांना जाऊन आज १०-१२ पिढ्या गेल्या, पण त्यांच्या वंशांत अेकहि तुकाराम झाला नाहीं! इतर देशांतून या पिढीहून पुढील पिढी अधिक सशक्त, सद्गुणी, सुबुद्ध निपजते, तर आमच्या देशांत खुरटी, किडकी, सडकी पिढी दर दहा वर्षांनीं जन्मास येत आहे.

मूळ आधार—भावना

तेव्हां जातिभेदाचा मुख्य आधार भावना आहे. आज तरी त्यामागें दुसरी कोणतीहि शक्ति अुभी नाहीं. म्हणून जातिभेदाचा अुच्छेद म्हणजे जातीच्या अहंकाराचा अुच्छेद! यासाठीं प्रत्येक हिंदुमात्रानें जातीय अुच्च-नीचता मानूं नये. सर्वांची जन्मजात एक—ती म्हणजे हिंदु! आमच्या पायांत सात स्वदेशी शृंखला आहेत. बेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या त्या सात बेड्या आहेत. त्या आपणच हौसेनें, पोथीनिष्ठेमुळें आपल्या पायांत ठोकून घेतल्या आहेत. जातिभेदांनीं आपली प्रतिकारशक्ति विफल झाली आहे.

बंदुकी नव्हेत,—लाडू !

जन्मजात जातिभेदाचे चार पाय आहेत. ते म्हणजे व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटिबंदी, नि बेटाबंदी. व्यवसायबंदी तोडणें अवश्यच आहे. सारें जग गुणानिष्ठ व्यवसाय-स्वातंत्र्याचें अनुयायी असतांनाहि जातिपातीवांचून त्याचें अडलें नाहीं. या स्वतंत्रतेमुळेंच युरोप-अमेरिका व्यवसायकुशलतेंत आमच्याहून अेका शंभर वर्षांत पांच हजार वर्षें पुढें निघून गेले आहेत. तेव्हां जातिबद्ध व्ययसायबंदी तोडल्यानें शक्तींत नि व्यवसायांत राष्ट्र अपकर्ष पावत नसून तें उलट भरभराटूं शकतें हें आंतां प्रयोगासिद्ध झालें आहे. स्पर्शबंदी मोडण्यासाठीं प्रत्येक हिंदुसंघटकानें अशी प्रतिज्ञा करावी. जें बोट मी कुत्र्यामांजरास लावतों, तें बोट मी माझ्या अस्पृश्य धर्मबंधूस, माणसास प्रत्यहीं लावल्यावांचून प्रत्यहीं अन्नग्रहण करणार नाहीं. संघटक सुधारकांपैकीं जर प्रत्येकानें बोलघेवडेपणा सोडून असा कर-घेवडेपणा प्रत्यहीं आचरला,. आपल्यापुरतें तरी अस्पृश्यांस पूर्वा-स्पृश्य करून सोडलें, तरीदेखील दहा वर्षांच्या आंत अस्पृश्यतेचा मागमूसदेखील साऱ्या समाजांत आढळून येणार नाहीं. आज सार्व-जनिक स्थानीं अस्पृश्यतेचें अुच्चाटन झालें आहे. त्या सवलतींचा प्रत्यक्ष अुपयोग प्रत्येक सुधारकानें हटातटानें करून त्या आत्मसात् केल्या पाहिजेत.

अशा रीतीनें व्यवसायबंदी तोडली, स्पर्शबंदी तोडली, तर रोटी-बंदी तुटणें फारच सोपें आहे. रोटीबंदी तोडावयाचें साधनहि विश्वास वाटूं नये अितकें सोपें आहे. नुसतें जेवायचें ! भिन्न जातीयांबरोबर जेवायचें !— कीं अेवढा दुस्साध्य वाटणारा जाति-भेदाचा गड कोसळलाच पाहिजे. पोथीजात जातिभेदाचें मरण सहभोजनांत आहे. बहिष्कार — पडतीलच ! पण पांचशें चिकाटीच्या सहभोजक सुधारकांवर बहिष्कार घालणारा पांच हजारांचा बहुजन समाजहि अंतीं मेटाकुटीस येतो. कारण बहिष्कार हें दुधारी शस्त्र, घालणारासहि तें कापतें ! खरा सुधारक निश्चितार्थ असतो. बहुजन-

समाज तसा नसतो. म्हणून नुसत्या शास्त्राधाराच्या अेरंडाच्या गुऱ्हाळानें तर तो जातिभेद मरणार नाहींच, पण प्रत्यक्ष शस्त्राधारांच्या नैर्बंधिक सक्तीनेंहि तो मारणें उर्फाट,—अनिष्टहि. जातिभेदाच्या या अजिंक्य किल्ल्यास असाच शाप मिळालेला आहे कीं, तूं शतकोंशतकें बाँबच्या माऱ्यानेंहि ढांसळणार नाहींस; पण शेवटीं बुंदीच्या लाडवांचा मारा मात्र तुझा चक्काचूर अुडवील !

बेटीबंदीचा प्रश्न

बेटीबंदी तोडणें म्हणजे अमक्या जातींच्या मुली तमक्या जातींत दिल्याच पाहिजेत अशी आज्ञा नसून, जर कोणी हिंदूनें प्रेमशील, सुप्रजननक्षमता प्रभृति वैवाहिक गुणानुकूल असा अन्य जातीचा हिंदु वधूवर निवडला, तर केवळ जात भिन्न अेवढ्यासाठींच तो विवाह निषेधिला जाअूं नये, वा त्यायोगें त्या वधूवरांस पूर्णपणें सव्यवहारी समजण्यास हरकत असूं नये, अशी अेक अनुज्ञा जाहे. अशा मिश्रविवाहाची अनुज्ञा जन्मजात जातिभेद मोडण्याच्या दृष्टीनें नव्हे तर शुद्धि-चळवळ पचविण्यासहि अत्यंत अवश्य आहे. पण अहिंदूशीं विवाह करणें तर मात्र, प्रस्तुतच्या परिस्थितींत त्या व्यक्तीस हिंदु करून घेतल्यास नंतरच काय तो विवाह करावा. जोंवर मुसलमान मुसलमानच राहूं अिच्छितात तोंवर हिंदूनेंहि हिंदूच राहणें भाग आहे. ज्या दिवशीं ते विधर्मीय गट आपली आकुंचित कुंपणें तोडून अेकाच मानवधर्मांत वा मानवराष्ट्रांत समरस होण्यास समानतेनें सिद्ध होतील, त्या दिवशीं हिंदुराष्ट्रहि त्याच मानवधर्माच्या ध्वजाखालीं मनुष्यमात्राशीं समरस होईल, किंबहुना असा मानवधर्म हीच हिंदु धर्माची परिसीमा नि परिपूर्णता मानली आहे !

अस्पृश्यतेचा प्रश्न

सावरकरांची अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे पाहण्याची अेक विशिष्ट दृष्टि आहे. त्यांचा अभ्यास तौलनिक आहे. अस्पृश्यता हें पाप

आहे; हिंदुधर्माचा तो कलंक आहे असें गांधीजींचें मत होतें. सावरकरांना तें मान्य असलें तरी केवळ हिंदु धर्मांतच अस्पृश्यता आहे असें त्यांना वाटत नाहीं. इतर धर्मीयांत, इतर राष्ट्रांत ती या ना त्या प्रकारांत आहे हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. तसेंच अस्पृश्यांतहि अस्पृश्यता आहे, अुच्चनीच भाव आहे हें दाखवून दिलें आहे. अस्पृश्यांनीं धर्मांतराची चळवळ काढली त्या वेळीं सावरकरांनीं त्यांच्याशीं मोकळा विचारविनिमय केला, नि धर्मांतरामुळें आर्थिक दुर्दशाहि फारशी बदलणार नाहीं, कुलद्रोह, जातिद्रोह केल्याचें पाप मात्र होअील हें पटवून दिलें. हिंदु समाजाचें मनःपरिवर्तन करणें हाच त्याचा खरा अुपाय आहे. हें झालें तर महार राहून, हिंदु राहूनहि अस्पृश्यता काढून टाकतां येअील; नि स्पृश्य अस्पृश्य सर्व मिळून जर ही सुधारणा करतील तर हा विषवृक्ष दहावीस वर्षांचे आंत अुन्मळून पडेल.

धर्माची आज्ञा म्हणूनच

अस्पृश्यता निवारणानें आज आपल्या हिंदु समाजाचें हित आहे. म्हणूनहि ती निघाली पाहिजेच. पण वेळप्रसंगीं त्या रूढीपासून हिंदु समाजाचा अधिक लाभ जरी होत असता, तरीहि आम्ही तिच्याविरुद्ध अितक्याच प्रबळपणें खटपट केली असती. कारण माझ्या अस्पृश्य समजलेल्या बंधूस जेव्हां मी— तो केवळ आमच्या जातींत अुत्पन्न झाला म्हणूनच — स्पर्श करीत नाहीं, आणि अेखाद्या कुत्र्यामांजरास स्पर्श करतों, तेव्हां मी मनुष्यत्वाविरुद्ध अेक अत्यंत गर्ह्य असा अपराध करीत असतों. केवळ आपद्धर्म म्हणून अस्पृश्यता काढणें अवश्य आहे, अितकेंच नाहीं तर धर्माचा कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरीहि त्या प्रस्तुतच्या अमानुष रूढीचें समर्थन करणें अशक्य आहे, अेतदर्थ धर्माची आज्ञा म्हणूनच ती रूढि नष्ट केली पाहिजे. न्यायाचे दृष्टीनें, धर्माचे दृष्टीनें, माणुसकीचे दृष्टीनें तें कर्तव्य आहे. म्हणूनच अस्पृश्यतेचें बंड आम्ही

हिंदूंनीं साफ मोडून काढलें पाहिजे. त्यापासून आजच्या परिस्थितींत काय लाभालाभ आहेत हा प्रश्न दुय्यम आहे. हा लाभालाभाचा प्रश्नच आपद्धर्म होय, आणि अस्पृश्यता निवारण हाच मुख्य आणि निरपेक्ष धर्म होय.

मानवतेच्या नैतिक दृष्टीनें अस्पृश्यतानिवारण झालेंच पाहिजे ही सावरकरांची मूलभूत भूमिका आहे. त्यासाठीं त्यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांत जें प्रत्यक्ष कार्य केलें त्याचें वृत्त पुढें येणारच आहे. पण भारतीय प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेंत अस्पृश्यतेला मूठमाती दिल्याबद्दल सावरकरांना आनंद झाला. १० वर्षें अस्पृश्य जमातींना राखीव अधिकार दिले हें पाहूनहि त्यांना बरें वाटलें. पण अस्पृश्यता निर्बंधदृष्ट्या नष्ट झाली असली तरी ती मानसिकदृष्ट्या कायम आहे असा अिषारा सावरकरांनीं दिला आहे. हीं १० वर्षें म्हणजे अस्पृश्यतेच्या मृत्यूनंतर तिला सद्गति लाभावयासाठीं पाळावयाचे दहा दिवस समजून आपण या काळांत मनांत राहिलेली अस्पृश्यता काढून टाकण्याचें कार्य केलें पाहिजे, असें सावरकरांनीं सांगितलें. राज्यघटनेंत राखून ठेवलेले अधिकार कायम ठेवण्याचा मोह होऊं नये म्हणून हें कार्य केलेंच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

या सर्व विवेचनावरून आपणांस असें दिसून येअील कीं, सावरकरांनीं आपल्या आक्रमक युक्तिवादानें आपले सनातन धर्म, प्राचीन संस्कृति, धर्मग्रंथ, रूढि, जातिभेद, धर्मभोळेपणा, भूतदया आदि विषयासंबंधींचे विचार समाजापुढें निर्भयपणें मांडून आगरकरांनंतर अेक फार मोठें काम केलें. सावरकरांचे हे विचार दैविक वा आध्यात्मिक स्वरूपाचे नाहींत हें त्यांचें वैशिष्ट्य. अेका मूलभूत व आधुनिक तत्त्वज्ञानांतून आगरकरांप्रमाणेंच सावरकरांनीं या सुधारणांकडे पाहिलें. अेका दृष्टीनें हें कार्य आक्रमक स्वरूपाचें असलें, सावरकर अेका टोकाला जाअून विचार करीत आहेत असें वाटलें, तरी समाजाच्या मानसशास्त्राच्या दृष्टीनें असेंच करावें लागतें हें सहज कळून येण्यासारखें आहे. पण केवळ विनाशक स्वरूपाचे विचार सावरकरांनीं मांडलेले नाहींत, तर त्या द्वारां समाजाला दोन बुद्धि-प्रधान कल्पना दिल्या.

पहिली म्हणजे, धर्मवेड टाकून विज्ञाननिष्ठा स्वीकारा, असें त्यांनीं सांगितलें. त्यांतूनच अनुषंगानें येणारा विचार म्हणजे यंत्रयुगाचा त्यांनीं केलेला पुरस्कार. या दोन गोष्टी सावरकरांच्या अुपयुक्ततावादी दृष्टिकोणाप्रमाणेंच क्रियाशील (Positive) स्वरूपाच्या आहेत. हे विचार समजून घेतल्याविना सावरकरांचा सुधारणावाद पुरा होअूंच शकणार नाहीं.

विज्ञानवादी व्हा !

हिंदुसमाज हा धर्मवेडा नाहीं, धर्मभोळा आहे. पण मुसलमान मात्र धर्मवेडे आहेत. त्यांच्या या अतीव धर्मवेडेपणांत त्यांच्या अेकात्म व सामर्थ्यशाली जीवनाचें रहस्य आहे असें मानून हिंदूंनींहि तसें धर्मवेडें व्हावें असें म्हणणारे बरेच लोक असतात. दुर्दैवानें कांहीं हिंदुत्वनिष्ठांनीं 'हिंदुत्व' ही अशीच धर्मवेडी कल्पना समजून त्याचा प्रचार केला. याविषयीं सावरकरांनीं अत्यंत स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली आहे. सावरकर यासंबंधीं म्हणतात—

" पोथीनिष्ठपणामुळेंच मुसलमानी समाज अेकवटलेला, प्रबळ नि प्रगत होत आहे; आणि यास्तव आपण त्याच्याहिपेक्षां अधिक पोथीनिष्ठ झालें म्हणजे अधिक प्रबळ नि प्रगत होअूं अशी समज आजच्या अनेक कळकळीच्या हिंदुसंघटकांमध्यें जी वावरत आहे ती मुळांतच दुहेरी चुकलेली आहे. पोथीनिष्ठपणामुळेंच मुसलमानांची कोणती प्रगति झाली आहे ? आज हिंदुस्थानांतहि ते विद्येंत मागासलेले आहेत; अज्ञान, दारिद्र्य नि कूपमंडूकता यांनीं हिंदूंपेक्षांहि ते अधिक ग्रासलेले आहेत. जी गोष्ट वर्तमानकाळीं, तीच भूतकाळाची. पोथीनिष्ठतेमुळें, देवभोळेपणामुळें, धर्मवेडेपणामुळेंच मुसलमान शूर नि विजयी झाले असें कित्येक मुसलमान बोलून दाखवितात. जे समाज त्यांच्याहून देवभोळे नि धर्मभोळे आहेत त्यांच्यावर मुसलमानांच्या धर्मवेडानें विजय मिळविले. पण जेव्हां त्यांच्याहून अैहिक दृष्ट्या अधिक संघटित समाजाशीं त्यांची गांठ पडली, तेव्हां मुसलमानांची

पारलौकिक पोथीनिष्ठा त्यांना मुळींच अुपयोगी पडली नाहीं ! अिराकच्या, अिजिप्तच्या, आणि दिल्लीच्या खलिफांचीं, खेदिवांचीं नि बादशहांचीं पोथीनिष्ठ तक्तें आज विज्ञाननिष्ठ अिंग्लंडच्या प्रदर्शनांतून मांडलेलीं आहेत. मुसलमानांच्या या जगभर झालेल्या दुर्दशेस सांगण्यासारखा अेक अपवाद तुर्कस्थान ! पण तो अपवादच आम्ही सांगतों त्या नियमाचा निरुत्तर पुरावा देणारा !

आमची मनापासून अशी अिच्छा आहे कीं, हिंदी मुसलमानांनींहि पोथीनिष्ठ प्रवृत्ति सोडून विज्ञाननिष्ठ बनावें: देवभोळेपणा नि धर्मवेड यांच्या खोड्यांतून त्यांची बुद्धि मोकळी व्हावी, आणि त्यांचा समाजहि शिक्षित, प्रगत नि अनुभवी व्हावा. मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यांत हिंदूंचेंहि कल्याणच आहे, हिंदी मुसलमानांचें तर कोटकल्याणच आहे.

आम्हांस आज जें तोंड द्यावयाचें आहे, तें विज्ञानयुगास नि युरोपीय विज्ञानबळासच द्यावयाचें आहे. अनुकरण करावयाचें असेल तर आज मुसलमानांनाहि पुरून अुरलेल्या युरोपच्या विज्ञाननिष्ठतेचें करावें, जें संपादावयाचें तें धर्मभेदाची नांगी ज्यापुढें ढिली पडते तें विज्ञानबल होय. तेव्हां मुसलमानासारखे पोथीनिष्ठ होणें ही तोडीस तोड देण्याची रीत नसून युरोपियनांप्रमाणें विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, भौतिक, अुपयुक्ततानिष्ठ होणें हीच त्यावरची तोड आहे. धर्मग्रंथावर समाजसंस्था अुभारण्याचे दिवस गेले ! सुदैवानें आपल्या हिंदुदर्शनांत कोणत्याहि अेका धर्मग्रंथाच्या पिंजऱ्यांत न अडकणारी तत्त्वज्ञानबुद्धीची जी स्वतंत्र भरारी आढळून येते तेंच आपलें भूषण आहे ! वेदगीतोपनिषदादि ग्रंथ पूज्य आहेत, आदरणीय आहेत, तेवढेंच पुरे. ते परमप्रमाण नसावेतच. या विज्ञानयुगांत समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष अैहिक नि विज्ञाननिष्ठ अशाच तत्त्वावर केली पाहिजे. ती वाट चोखाळतां अिंग्लंड, रशिया, जपान हीं राष्ट्रें बलवान् झालीं तसेंच हें आपलें हिंदु राष्ट्रहि झाल्यावांचून राहणार नाहीं ! ”

यंत्रयुगाचें स्वागत

याच विज्ञाननिष्ठेचें अपत्य म्हणजे यंत्र. सावरकर त्या यंत्रयुगाचें स्वागत करतात, आणि हिंदुसमाजालाहि आपली स्थिति पालटण्यासाठीं यंत्राचा स्वीकार करावयास सांगतात. यंत्र हा शाप नसून तें वरदान आहे असें सांगतात; बेकारी हा यंत्राचा दोष नसून विषम समाजरचनेचा आहे हेंहि ते स्पष्ट करतात. सावरकरांचे ते विचार असे—

" समाजशास्त्रांत विज्ञानाचें वर्चस्व स्थापिलें पाहिजे, तसेंच आपल्या राष्ट्राच्या अर्थकारणांतहि त्याच विज्ञानाची मूर्ति जें यंत्र त्या यंत्राचें वर्चस्व स्थापिलें पाहिजे. धर्मशास्त्रांतील भाबडेपणाप्रमाणेंच अर्थशास्त्रांतील भाबडेपणासहि, आजच्या जगांत ह्या यंत्रयुगांत जगावयाचें असेल तर, आपल्या राष्ट्रानें ठोकरून दिलेंच पाहिजे. राष्ट्रीय प्रचाराचीं सूत्रें या देवभोळेपणाच्या, धार्मिक वा आर्थिक श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या, या पुरातनाच्या हातून छिनावून घेऊन तीं विज्ञानाच्या, अद्यतनाच्या हातीं दिलीं पाहिजेत. यंत्रयुगाविरुद्ध त्यांच्या चाललेल्या भाबड्या हाकाटीची छाप ज्यायोगें राष्ट्रावर पडणार नाहीं, आणि यंत्रबळाची प्रगति ज्यायोगें राष्ट्रास पटून तें विज्ञाननिष्ठ होईल, यंत्रशील होईल असा प्रचार शक्य तितक्या नेटानें, निःस्पृहतेनें आणि निकडीनें आतां आरंभिलाच पाहिजे.

यंत्र हा मनुष्यजातीला झालेला शाप होय, अशी यंत्राविरुद्ध जे ओरड करतात त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं,— यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीनें अधिक कार्यक्षम झालेलें मनुष्याचें अेक अिंद्रियच आहे. शरीरानें पाहिलें तर मनुष्य हा अत्यंत दुबळा, कळीनेंच काय तो प्रबळतम ठरला ! यंत्र हें मनुष्याला अतिमानुष करणारें वरदान होय.

यंत्रावरील सारे आक्षेप हे मनुष्य करीत असलेल्या यंत्राच्या दुरुपयोगावरील असतात. यंत्रानें बेकारी वाढते असें म्हणणें म्हणजे

पाऊस हवा तसा पडल्यानें दुष्काळ घडतो अतें म्हणण्यासारखा वदतोव्याघात आहे ! बेकारी यंत्रानें वाढत नाहीं, तर विषम वांटणीमुळें, आणि विषम वांटणीचा दोष यंत्राचा नसून समाज-रचनेचा आहे. यंत्राच्यायोगें उत्पादन अत्यल्प श्रमांत, न्यूनतम व्ययांत, अत्यधिक प्रमाणांत वाढलें कीं, येथें त्याचें दायित्व संपलें. यंत्राच्या दुरुपयोगास टाळून सामुदायिक सदुपयोग कसा करावा याचा आर्थिक वस्तुपाठ रशिया आज स्वतःला नी जगाला देतच आहे. जर यंत्रानें बेकारी वाढत असती नि मनुष्य दुबळावत असता, तर आज सामुदायिक यंत्रप्रयोगांत प्रचंड प्रमाणावर ज्याचें सारें राष्ट्रीय बळ अेकवटलेलें आहे, भांडवल गुंतविलेलें आहे, तो रशिया, साऱ्या जगांतला भिकार, साऱ्या जगांतला बेकार, साऱ्या जगांतील दुःखी नि दुबळा झाला असता. पण आज वीस वर्षांच्या प्रयोगा-नंतरहि वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. यंत्रशक्तीमुळेंच रशिया हें आज जगांतील प्रबळांतलें प्रबळ, संपन्नांतील संपन्न, प्रत्येकजणास काम, अन्नवस्त्र, नि आनंद समतेनें उपभोगूं देणारें राष्ट्र झालेलें आहे ! ''

युरोपमध्यें औद्योगिक क्रांति झाल्यानंतर उत्पादन वाढलें, त्यामुळें बेकारी वाढली. जुने अर्थशास्त्री गडबडले आणि, हें सगळें कसें थोपवावयाचें तें कळेना. पण त्याला उत्तर देण्याअैवजीं युरोपीय राष्ट्रांनीं आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया या खंडांत आपले हातपाय पसरण्यास प्रारंभ केला. वसाहती अर्थशास्त्र त्यामुळें निर्माण झालें. तेव्हां सावरकरांनीं आपल्या या यंत्रयुगाच्या पुरस्कारार्थ अिंग्लंड आणि वसाहतवाल्या राष्ट्रांचें उदाहरण न घेतां समाजवादी राष्ट्राचें उदाहरण घेतलें आहे हें येथें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. यापुढें जर आर्थिक दृष्ट्या अनिर्बंध स्वातंत्र्य दिलें तर समाज दुःखी होईल. म्हणून समाजवाद ही यंत्रयुगाची अत्यंत स्वाभाविक अशी परिणति आहे यांत शंकाच नाहीं. सावरकराचा हा विज्ञाननिष्ठ सुधारणावाद तर्कतः समाजवादी अर्थरचनेपर्यंत कसा येऊन पोहोंचतों, तो कोणत्याहि तऱ्हेची पिळवणूक कशी सहन करीत नाहीं, हें यावरून दिसून येअील.

सावरकरांनीं स्वतः समाजवादाचा पुरस्कार वारंवार केलेला नसला, तरी तुमचा अर्थशास्त्रीय कार्यक्रम आम्हांस मान्य आहे, हें भाऊ रॉय यांना सावरकरांनीं मागेंच सांगितलें होतें. त्यानुळें समाजरचनेचा अत्यंत आधुनिक व पूर्णपणें ऐहिक, विज्ञाननिष्ठ स्वरूपाचा प्रयोग म्हणून सावरकरांनीं समाजवादाकडे पाहिलें तर त्यांत नवल नाहीं. मात्र गेल्या ३० वर्षांत कम्युनिस्ट रशियानें जें धोरण आंगिकारलें आहे त्याला राष्ट्रवादाचा किंवहुना आक्रमक साम्राज्यवादाचा अुग्र दर्प येत आहे हें सावरकर विसरत नाहींत. सावरकरांनीं आपले या सर्व प्रश्नासंबंधीचे विचार अेकदां चर्चेंत स्पष्ट केले होते. * ते या ठिकाणीं दिले तर त्यांच्या सुधारकी मतांचें सूत्र आजपर्यंत आणून सोडलें असें होअील. हिंदुत्वाचा आणि मार्क्सवादाचा समन्वय घालतां येअील काय, या प्रश्नाला अुत्तर देतांना सावरकर म्हणाले—

"हा प्रश्न अेका दृष्टीनें अगदीं हास्यास्पद आहे. समजा, अुद्यां अेखादा नवा ग्रहगोल शास्त्रज्ञांनीं शोधून काढला, तर त्याचा नि हिंदुत्वाचा परस्पर संबंध काय राहील असें विचारण्यासारखेंच हें आहे. जीं नवीन प्रमेयें, जे नवीन आर्थिक वा राजकीय सिद्धांत जगांत निर्माण होतात त्याचा स्वीकार वस्तुनिष्ठ वृत्तीनेंच केला पाहिजे. मार्क्सचे आर्थिक सिद्धांत हे समाजाच्या प्रगतींत भर घालणारे असतील, समाजाचें हित साधणारे असतील तर त्यांचा स्वीकार केलाच पाहिजे !

मला तर मार्क्सची भौतिक दृष्टीहि मान्य आहे. पण जग अगदीं खऱ्या अर्थानें मात्र बुद्धिनिष्ठ व ऐहिकतावादी (Secular) झालें पाहिजे.

पण.....

पण मुसलमानांच्या धर्मवेडाची जोपासना करावयाची आणि हिंदूंना मात्र 'सेक्युलर' होण्यास सांगावयाचें, हें मी कधींहि मान्य करणार नाहीं. याला मी पुरोगामित्वहि म्हणणार नाहीं. त्याचप्रमाणें

---

* सावरकरांशीं स्वतः लेखकानें केलेल्या चर्चेचा सारांश.

रशिया काय किंवा अमेरिका—यांसारख्या कोणत्याहि परराष्ट्राशीं आमची निष्ठा जखडलेली असेल तर तो स्वतंत्र बुद्धिवाद होणार नाहीं, तें बौद्धिक दास्य ठरेल ! म्हणून राष्ट्रवादाचें युग अद्यापि संपलेलें नाहीं, हें मार्क्सवादी लोकांनीं लक्षांत ठेवावें. टिटोचा कम्युनिझम आणि माओचा कम्युनिझम वेगळा होऊं शकतो तो कां ? लेनिनचा कम्युनिझम हासुद्धां परिवर्तनीच होता. तो खरा मार्क्सवाद नव्हता. स्टॅलिननें तर कम्युनिझमला लष्करी स्वरूपच दिलें आहे. म्हणजे कम्युनिझमची मूळ रचना कशीहि असली तरी ती प्रत्येक राष्ट्राच्या परिस्थितीप्रमाणें बदलत चालली आहे. आणि ती बदलत जाणें हेंच खरें पुरोगामित्वाचें लक्षण आहे ! नाहीं तर अेखाद्या सनातनी हिंदूला आम्ही जसें पोथीनिष्ठ म्हणतों तसें या मार्क्सवाद्यांनाहि पोथीनिष्ठ म्हणूं !

ही भीति नको !

असें असतांना हिंदुस्थानांत कम्युनिझमची भीति कां वाटत आहे ? आतांपर्यंत अितकीं आक्रमणें पचवून आपण टिकलों आहोंत, अिंग्रजांच्या आर्थिक निष्पीडनांतूनहि (exploitation) आपण वर येण्याचा प्रयत्न करीत आहोंत,—तर मग कम्युनिझमला भिण्याचें काय कारण आहे ? कम्युनिझममध्यें दोष आहेत, त्यांत व्यक्तिस्वातंत्र्याची प्रतिष्ठा नाहीं, व्यक्तिगत भांडवलशाहींतून राज्यसंस्थेची भांडवलशाही येत आहे.

पूर्वी रशियांतील मजूर अेखाद्या खासगी धनिकाचा दास असेल तर आज तो स्टॅलिनचा दास झाला आहे. म्हणजे काय ?—अधिक वाअीट गुलामी त्याच्या नशिबीं आली आहे ! रशियांत सक्तीची गुलामी (slave labour) आहे. तेव्हां तेथेंच हें चक्र थांबेल काय ? ही गुलामी स्टॅलिन दंडुकेशाहीच्या जोरावर कायम टिकवूं शकेल काय ? हें कालचक्र फिरेल—नि तें स्टॅलिनचाहि बळी घेअील. स्टॅलिनच्या हुकूमशाहीविरुद्धहि तेथें बंड होअील ?

पण आज कम्युनिझमपेक्षां कम्युनिस्टांचें भय अधिक आहे. कम्युनिस्टाच्या पोलादी मनगटाची भीति आहे; आणि तिला उत्तर द्यावयाचें असेल तर राष्ट्रवादाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्याबरोबर मार्क्सवादाला उत्तर हिंदुधर्म असूं शकत नाहीं. त्याला समाजवादी रचनाच हवी. मात्र आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाला अंतर्गत ऐक्याची व शांततेची अत्यंत आवश्यकता आहे. आर्थिक क्रांतीसाठीं फुटीर वृत्ति माजवून कम्युनिस्ट हिंसात्मक धोरण पत्करतात. म्हणून त्यांचें आमचें पटणार नाहीं. आपण लोकशाही मार्गानेंच सरकार बदललें पाहिजे!"

या विवेचनावरून सावरकर हे मार्क्सवादी नसले तरी मार्क्सची शास्त्रीय दृष्टि त्यांना अमान्य नाहीं हें दिसून येअील. अर्थात् मार्क्स हाहि अपुरा आहे. त्यानें बसविलेले सिद्धांत हे मर्यादित निरीक्षणावर आधारलेले होते हें त्यांचें मत आहे पण तरीहि जें जें नवें आणि उपयुक्त असेल त्याचा, पूर्वीचें कोणतेंहि बंधन न मानतां स्वीकार करावयाचा, ही त्यांची पद्धति असल्यामुळें सावरकर हे समाजवादी रचनेचा पुरस्कार करतात. मात्र व्यक्ति-स्वातंत्र्यावर रशियांत झालेलें आक्रमण ते विसरत नाहींत. 'भाकरी विरुद्ध स्वातंत्र्य' या लढ्यांत 'स्वातंत्र्यासह भाकरी' ही त्यांची भूमिका त्यांना संभवनीय वाटते, म्हणून त्याचाहि ते पुरस्कार करतात हें या ठिकाणीं लक्षांत ठेवलें पाहिजे. रशिया वा चीन यांच्या साम्राज्यवादी दृष्टीवर ते कठोर टीका करतात, आणि पुन्हां अेकदां बजावतात कीं, राष्ट्रवादाचें युग संपलेलें नाहीं हें लक्षांत ठेवा.

सावरकरांच्या सुधारणावादाचें आपण तात्त्विक अधिष्ठान पाहिलें, त्यांनीं कोणते सुधारणाविषयक विचार मांडले आहेत यांचेंहि आपण समीक्षण केलें, आतां सावरकरांनीं आपल्या आयुष्यांत प्रत्यक्ष जें सामाजिक कार्य केलें त्याचा आढावा घेतल्यानंतरच सावरकरांचें महाराष्ट्रांत सुधारक म्हणून कोणतें स्थान आहे याचा परामर्ष घेतां येअील.

रत्नागिरींतील आंदोलन

सावरकर अंदमानांतून सुटल्यानंतर राजकारणांत भाग घेण्यास त्यांना बंदी होती. पण राजकारणाप्रमाणेंच समाजकारणहि महत्त्वाचें आहे हें ओळखून, आणि 'अकरणाद् मंदकरणं श्रेयः' हें त्यांचें धोरण असल्यामुळें सावरकरांनीं सामाजिक कार्य करण्याचें ठरविलें. सामाजिक सुधारणा म्हणजे कांहीं सोपी गोष्ट होणार नाहीं. तेथें अप्रिय होण्याचीच अधिक शक्यता. म्हणून सावरकरांना त्यांचे हितचिंतक विचारीत कीं, लोकांना कशाला बिचकावतां? तुमच्या पूर्वपुण्याईनें मिळविलेली लोकप्रियतासुद्धां फुकटाफुकटी या नसत्या अुपद्व्यापानें कां गमावतां? सामान्य माणसाच्या दृष्टीनें हा युक्तिवाद बरोबर होता. पण सावरकरांना तें पसंत पडेना. त्यांनीं या लोकांना सांगावें—

"सुधारणा म्हणजे कोणत्या तरी दुष्ट रूढीचा अुच्छेद. रूढी म्हणजे बहुसंख्यांकांनीं चिवट निष्ठेनें अवलंबिलेली चाल. अर्थातच तिचा अुच्छेद करूं पाहणाऱ्या सुधारकाला ती बहुसंख्या प्रतिकारीत राहणारच; त्याला लोकप्रियतेला मुकावें लागणारच. पण तें भय त्याला पडेल कीं, जो हांजी हांजी करूनच काय तें जें थोडें लोकहित साधेल तें साधूं अिच्छितो. त्या भयानें तो चळचळ कांपत, धार्मिक वा सामाजिक क्रांतीची वाटच सोडून, बहुसंख्य लोकाराधन करीत राहतो कीं, ज्याचा लोकप्रियता हा धंदाच होअून बसला आहे. पण खरा सामाजिक वा धार्मिक सुधारक जो जो होअून गेला-वा ज्यास ज्यास व्हावयाचें असेल त्याचें लोकहित हेंच ध्येय होतें; असलें पाहिजे! आमच्यापुरतें तरी लोकप्रियता कीं लोकहित असा व्यामोह मनास पुनः पुनः पडूं नये, यास्तव आमच्याच अेका अनुष्टुपांत ग्रथिलेलें हें सूत्र आम्हीं आमच्या मनास वारंवार अुपदेशीत राहतों कीं, 'वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुतिः' जनहिताचा बळी देअूनच जी संपादितां येते ती जनस्तुति सर्वस्वी त्याज्य होय! त्या मोहापासून सामाजिक वा धार्मिक सुधारकांनींच विशेषतः दूर राहिलें पाहिजे."

सुधारक सावरकरांची ही धारणा आहे. हे विचार वाचल्यानंतर ' विचार कलहास कां भितां ' असें पुकारणाऱ्या तेजस्वी आगरकरांची आठवण होते. सावरकरांच्या सर्वच जीवनांत हा पीळ आहे. स्वतःच्या मतासाठीं सावरकरांनीं सारें भौतिक सुख पेटवून दिलें आहे. स्वतःच्या बुद्धीला जें पटणार नाहीं त्याचा पुरस्कार त्यांनीं केला नाहीं. रत्नागिरीच्या कार्यांत हाच पीळ आणि निर्धार ठेवून ते वागले. सावरकरांनीं केलेल्या सामाजिक कार्याचें स्वरूप अनेकविध होतें. प्रामुख्यानें श्रद्धानंदांच्या शुद्धि व संघटनकार्याचा पुरस्कार सावरकरांनीं केला. अस्पृश्यतानिवारण हें त्यांचें दुसरें कार्यक्षेत्र. रत्नागिरी जिल्ह्यांत हें काम करणें किती अवघड होतें हें सांगणें कठीण आहे. महाराची सावलीसुद्धां पडूं देणें जेथें धर्मबाह्य मानलें जाई तेथें महाराच्या पंक्तीला जेवणें किंवा त्याच्याकडून सत्यनारायणाची पूजा करून घेणें हें किती पापी कृत्य ठरलें जात असेल याची कल्पनाच केलेली बरी ! सावरकरांनीं या विरोधी परिस्थितींत कार्य केलें. अेक तर राज्यक्रांतिकारक म्हणून सावरकरांशीं संबंध ठेवावयास लोक भीत. रत्नागिरींत कित्येक दिवस त्यांना जागा मिळत नव्हती, म्हणून ते शिरगांवला रहात. अशा स्थितींत समाजाचा रोष ओढवून घेणारी समाजसुधारणा त्यांना करावयाची होती.

अस्पृश्यतेवर चढाअी

सावरकरांनीं रत्नागिरीमधील सुधारणेच्या कार्यास उत्सवांतून सुरुवात केली. अशा उत्सवांतून स्पर्शबंदी तोडतां येते. सावरकरांनीं आपल्या अमोघ वक्तृत्वानें आणि विनतोड युक्तिवादानें अस्पृश्यतेचें समर्थन करणाऱ्या सनातन्यांवर हल्ले चढविले. अस्पृश्यतेची पौराणिक आणि अैतिहासिक उपपत्ति समजावून देअून आज तो कसा महत्त्वाचा प्रश्न आहे हें पटवून दिलें. देवळांच्या आवारांत अस्पृश्यांचे मेळावे जमूं लागले. पूर्वास्पृश्यांच्या गणपतीपुढें पानसुपारीचे समारभ होअून त्यांत अनेक लोक भाग घेअूं लागले. स्त्रियांसाठीं हळदीकुंकवाचे समारंभ ठेवून तेथें पूर्वास्पृश्य येअूं लागले. सावरकरांनीं जिल्ह्यांत सर्वत्र दौरे काढण्यास सुरुवात केली.

सावरकरांच्या या दौऱ्यांत जें यश येत असे तें भगीरथ पुढें चालला असतां मागें मागें जाणाऱ्या गंगेप्रमाणें असे. हिंदु धर्माचें भवितव्य अस्पृश्यता-वादावर अवलंबून आहे हें सूत्र ते पटवून देत. सर्वत्र संघटनेविषयीं चर्चा, व्याख्यानें, वादविवाद यांचा धूमधडाका सावरकरांनीं लावला होता. या सर्वांचा परिणाम वर्णन करतांना 'सत्यशोधक' या पत्रांत लिहिलें होतें—

तात्पर्य, सर्व चालचलाऊ कामाकरतां रत्नागिरींतील अस्पृश्यता सध्यां जवळ जवळ नाहींशी झाली आहे असें म्हणतां येअील. व याचें बरेंचसें श्रेय श्रीयुत तात्यासाहेब सावरकर यांस दिलें पाहिजे. आजच या चळवळीचें रत्नागिरीस प्रयोजन काय? व सावरकरांनीं हा अुपटशूळ काय म्हणून खांद्यावर ध्यावा? असे प्रश्न आम्हांस कांहीं लोकांकडून विचारण्यांत येतात. अशा लोकांना आम्हांस अेवढेंच सांगावेंसें वाटतें कीं, अस्पृश्यतेमुळें आजमितीला रत्नागिरींत अनर्थ ओढवला नसला तथापि अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हा हिंदुस्थान देशाचा अेक जिव्हाळ्याचा व सर्वव्यापी असून, बॅ. तात्यासाहेबांसारख्या रत्नागिरीला अनायासें लाभलेल्या विभूतीनें तो आपल्या रत्नागिरीपुरता सोडवून अितरांना अेक अनुकरणीय धडा घालून दिला तर सावरकरांना त्यांच्या निष्कारण लुडबुडीबद्दल धन्यवाद द्यावयाचे याचा रत्नागिरीकरांनीं शांतपणें विचार करावा अशी आमची त्यांना विनंति आहे.

सावरकरांनीं आपल्या कार्यास प्रारंभ केल्यापासूनच त्यांना अितकें यश मिळूं लागलें हें विशेष. सावरकरांनीं या काळांत ठिकठिकाणीं जाअून अस्पृश्यांच्या वसतिस्थानांची पहाणी करावी, तेथील आक्षेपकांचें समाधान करावें, व सर्व हिंदूंना अेकत्र आणण्याचा प्रयत्न करावा, असे अुपक्रम चालू केले होते. सावरकर दौऱ्यावर निघाले, महार-चांभारांच्या घरीं जाअून चौकशी करूं लागले कीं बायकामुलांनीं त्यांच्या अक्षरशः पाया पडावें असें सर्वत्र दिसून येअी. त्यांना महारादि अस्पृश्यांच्या मुलांना शाळेंत अेकत्र बसूं देण्यासाठीं साध्या गोष्टींत झगडा करावा लागला. सरकारनें नियम केलेला,

परंतु लोक पाळीनात. म्हणून शेवटीं त्यांना पटवून देतांना सावरकर सांगत कीं—" निदान दयेच्या दृष्टीनें तरी दीन, पतित महारांदिकांस पशूंच्याहूनहि दूर लोटूं नका. दया करा, अुपकार करा, आणि त्यांच्या मुलांना आपल्या शेजारीं बसूं द्या. ते कांहीं मागत नाहींत. शाळेंत कुत्रें सरामिसळ बसतें तसें आमच्या मुलांस बसूं द्या, हेंच काय तें ते मागतात ना ? मग तेवढी भिक्षा घाला ना त्यांना !" सावरकरांच्या या आर्त विनंतीला यश आलें. लोकल बोर्डाच्या परिपत्रकानुसार खेडोंपाडीं शाळांत मुलें अेकत्र बसूं लागलीं ! पण यासाठीं सर्व जिल्ह्यांत तीन महिने चळवळ करावी लागली.

पतितपावन मंदिर

सावरकरांनीं रत्नागिरीस श्रीमान् भागोजीशेठ कीर यांच्या साहाय्यानें बांधलेलें पतितपावनाचें देवालय ही त्यांची सामाजिक कार्याची स्मृति आहे. या मंदिरानें अेक पायंडा पाडला गेला. सावरकरांनीं या प्रकरणाचा प्रचारहि धूमधडाक्यानें केला. श्री. कीर यांनीं जवळ जवळ अेक लक्ष रुपये यासाठीं खर्चले. पुराणोक्त पूजेचा अधिकार अेका विशिष्ट जातीचा आहे ही समजूत खोडून टाकून, हिंदुधर्म हा जातिनिरपेक्ष आहे हें समजावून देणें हें याचें अुद्दिष्ट होतें. प्रत्यक्ष समारंभाच्या वेळीं सावरकरांना तेथील पुरोहितवर्गानें अडकविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना दाद न देतां त्यांनीं मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचें ठरविलें, आणि त्याप्रमाणें २२ फेब्रुवारी १९३१ रोजीं या मंदिरांत यथाविधि मूर्तिस्थापना करण्यांत आली. हिंदु धर्माच्या रूढ कल्पना नष्ट करून क्रांतियुगाची सुरुवात झाल्याचें जाहीर झालें. अेका अन्यायाचें परिमार्जन त्या दिवशीं झालें, आणि सामाजिक समतेची घोषणा झाली. या समारंभाचें व मंदिराचें महत्त्व वर्णितांना 'बलवंत' या रत्नागिरीच्या पत्रांत २५-२-३१ चें अंकांत म्हटलें आहे—

" या सर्व कार्यक्रमामध्यें अेकच मूलभूत तत्त्व होतें. आणि तें समाजक्रांतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें तत्त्व म्हणजे हिंदु समाजांतील

जाति या जनसिद्ध नसून कर्मसिद्ध असल्या पाहिजेत. या महान् तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी श्रीमंत कीर शेठजींच्या या नूतन मंदिरानें करून हिंदुसमाजक्रांतीचें जणूं रणशिंगच फुंकलें आहे.''

महारांना दिलासा

याच सुमारास मुंबई अिलाखा महार परिषद सावरकरांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सावरकरांचें या वेळचें भाषण खळबळ अुडविणारें झालें. सर्व वृत्तपत्रांतून त्यांतील अुतारे छापले गेले. त्या परिषदेच्या परिणामाविषयीं 'सत्यशोधक' आपल्या ३ मे १९३१ च्या अंकांतील अग्रलेखांत म्हणतो—

''ते शेंकडों महार जेव्हां स्वातंत्र्यवीर सावरकरांभोंवतीं दाटी करून आपलीं अडाणी सुखदुःखें सांगत बसत तेव्हां किती कौतुक वाटे! हा सावरकर ब्राह्मणांतील ब्राह्मण, विद्वानांतील विद्वान,- ज्याची राष्ट्रीय सेवा, त्याग नि तपस्या या पिढींत अतुलनीय—तो आपला वर्णाहंकार व ज्ञानाहंकार विसरून, समाज आज ज्यांची सावली अमंगळ मानतो त्यांच्या दाटींत, त्या महारांतील जे घामट त्यांना स्वतः स्नान घालीत, त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत अुभा!''

या अुताऱ्यावरून सावरकर अस्पृश्योद्धाराच्या चळवळीशीं किती समरस झाले होते याची कल्पना येअील. समाज सुधारणा करणाऱ्यांना नुसती पोपटपंची करून चालत नाहीं. प्रत्यक्ष समाजांत मिसळावें लागतें. बुद्धीनें सुधारणावाद सहज पटतो, पण तो आचरणें कठीण असतें. सावरकरांनीं कर्मवादी भूमिका घेतल्यामुळें समाजांत ते लोकप्रिय झाले. मराठी शाळा, देवालयें,- जेथें जेथें अस्पृश्यतेचा वास येअी तेथें तेथें सावरकर धांवून गेले. ब्राह्मणांच्या सहस्रभोजनांत त्यांनीं भाग घेतला, नि तेथें हिंदु संघटनाचें महत्त्व पटवून दिलें. सार्वजनिक अुत्सवांत भंगी गृहस्थाचीं कीर्तनें आणि महार मुलांचे गीतापाठ घडवून आणून अस्पृश्यता निवारणाच्या अितिहासांत क्रांतिकारक भर टाकली. रोटीबंदी नि स्पर्शबंदी यांच्याविरुद्ध रान अुठविलें.

या सर्व प्रकारांमुळें अेक तप्त वातावरण निर्माण होअी. टाअिम्स ऑफ अिंडियानें या प्रकाराचें वर्णन करतांना (३०-९-३१) म्हटलें होतें—

(One more electrocutive shock to the cause in ideal comes from Ratnagiri and the Patit Pawan Mandir there has been the scene of this latest outrage on orthodoxy. The temple has been especially built for worship of all Hindus irrespective of caste and during the recent Ganapati festival a Bhangi (scavenger) acted as a priest to the God. He was treated exactly like a Brahmin Kathekari and garlanded by Brahmins who prostrated themselves before him.")

सामाजिक रूढीवर अशा तऱ्हेचे आघात करीत करीत सावरकर नव्या सामाजिक विचारांची मुहूर्तमेढ रोंवत होते.

सहभोजनांची मोहीम

या आघातामध्यें सहभोजनाच्या मोहिमेचा अंतर्भाव करावयास हरकत नाहीं. यांत अनेक अनुभव येत. समाजाच्या मनांतलें बारीक बारीक धागे अुलगडत. महार नि चांभार अेकत्र जेवण्यास नकार देत. ब्राह्मणांबरोबर बसणें हें महारांस आश्चर्य वाटे. या सहभोजकांविरुद्ध बावटळ अुठली. 'रत्नागिरी बाटली' असा प्रचार सुरू झाला. चांगले चांगले सुशिक्षित लोक या सहभोजनाला विरोध करीत. 'परंतु जन्मजात जात्युच्छेदनार्थं सहभोजनं करिष्ये।' हा मंत्र असंख्य वेळां अुच्चारला गेला. शेंकडों लोकांवर सुधारणेचा संस्कार होअी. या कार्यक्रमांतून स्त्रियाहि सुटल्या नाहींत. अवघ्या महाराष्ट्रांत प्रथम रत्नागिरीला पतितपावन मंदिरांत हें स्त्रियांचें सहभोजन झालें. कारण त्या वेळीं सहभोजन करणें म्हणजे बहिष्काराचें शस्त्र अंगावर घेणें होतें. रूढि मोडली कीं विरोध हा व्हावयाचाच. पण सावरकर म्हणत कीं, " सुधारकांना जसा सुधारणेचा अधिकार तसाच समाजाला बहिष्काराचा अधिकार ! ज्याला त्याला आपल्या मताप्रमाणें प्रामाणिकपणें चालण्याचें स्वातंत्र्य आहेच ! " या बुद्धिवादी भूमिकेवरून हा विरोध व बहिष्कार सहन केला गेला. कोणी सहभोजन केल्यामुळें

त्यांच्याशीं लग्नसंबंध ठेवण्याचें नाकारीत ! इतके सारे प्रकार होऊनहि सुधारणेचें कार्य अडलें नाहीं. नदीचा प्रवाह लव्हाळ्यांना बिचकून अडत नाहीं, त्यांना वांकवून तो पुढें जातो !

शुद्धि नि स्वदेशी

अस्पृश्यता निवारणाबरोबरच शुद्धीची मोहीम सावरकरांनीं हातीं घेतली होती. गोमंतकांत धार्मिक छळ चालू असतां त्याच्या निषेधार्थ सावरकरांनीं रत्नागिरींत सभा घेतल्या. सावरकरांच्या वक्तृत्वानें अशा सभांतून अेक नवीन उत्साह, आवेश निर्माण होअी. अशा अेका व्याख्यानाच्या परिणामाचें वर्णन पुढील शब्दांत अेका वार्ताहरानें केलें होतें—

> " पोर्तुगीज छळाचा विचार करण्यासाठीं झालेल्या सभेंत हजारों श्रोत्यांपुढें बॅ. सावरकरांचें भाषण झालें. व्याख्यानाच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत श्रोत्यांचे डोळे पाण्यानें डबडबून येत होते. कित्येक वेळां तें पाणी दुःखित अंतःकरणानें मान खालीं घालून जमिनीवर ढाळावें लागलें, तर कित्येक वेळां हर्षभरानें अुत्स्फूर्त होअून वर मान करून कपोलप्रदेशावरून निर्झरित करावें लागलें."

अशा रीतीनें शेंकडों सभांतून खेडोपाडीं जाअून, सावरकरांनीं शुद्धीचा प्रचार केला. तेथील हिंदुसभेला या विधायक कार्याची जाणीव करून दिली. मिशनरी लोकांच्या चळवळीला पायबंद बसला. अस्पृश्यांमध्यें खिस्ती धर्मप्रसार करण्याची त्यांची मोहीम थंडावली. रत्नागिरी येथील श्री. धाक्रस यांच्या शुद्धीकृत मुलीचा विवाह सावरकरांच्या घरींच झाला. स्वतः सावरकरांनीं कन्यादान केलें. या लग्नाला गांवांतील सर्व जमातींचे लोक अेकत्र जेवले. हें लग्न म्हणजे रत्नागिरीनें शुद्धि पचाविल्याचें लक्षण होतें !

सावरकरांच्या या शुद्धिकार्यामुळें व मशिदीवरून वाद्यें वाजाविण्याच्या त्यांच्या आग्रहामुळें मुसलमान चिडले, आणि त्यांनीं सावरकरांविरुद्ध सरकारकडे अर्ज केला. त्यांत सावरकरांनीं " हिंदु लोकांचीं मनें मुसलमान लोकांविरुद्ध

धर्माचे बाबतींत दूषित करून दोघां समाजांमध्यें द्वेषभाव अुत्पन्न केल्याचा, व मुसलमानाविरुद्ध हिंदूंना चिथावणी देणारीं अपमानकारक भाषणें केल्याचा आरोप त्यांच्यावर केला होता. त्याला १४०० सह्यांनिशीं हिंदूंनीं अेक अुत्तर सरकारकडे पाठविलें. सावरकरांनीं स्वतः स्पष्टीकरण केलें. शेवटीं डि. मॅ. नें अनेकांच्या साक्षी घेतल्यानंतर मुसलमानांच्याच मागण्या नि वर्तन खोडसाळ होतें असें दिसलें.

शुद्धीबरोबर स्वदेशीचा प्रचार शाळाशाळांतून सावरकरांनीं केला. स्वदेशी-व्रताचा पुरस्कार करतांना विद्यार्थ्यांना, स्त्रियांना व सद्गृहस्थांना या बाबतींत काय करतां येईल याचें मार्गदर्शन केलें.

सुधारणावादाचें नवें युग

सावरकरांच्या सुधारणावादी मतांचें नि कार्याचें परिशीलन केल्यावर आणि समाजसुधारक म्हणून त्यांना जी अुपेक्षा पत्करावी लागली तें पाहिल्यावर कांहीं शंका निर्माण होतात. कित्येक वेळां त्याची प्रतिक्रिया निराशावादांत होते. आगरकरांना समाजसुधारकांचे आचार्य म्हणून आपण श्रेष्ठ मानतों, पण त्यांना कितीही लोकप्रियता किंवा अनुयायित्व लाभलें आहे असा विचार केला कीं, समाजाच्या पचनशक्तीविषयीं शंका येते. डॉ. श्री. व्यं. केतकरांचे विचारहि असेच मूलभूत स्वरूपाचे आणि क्रांतिकारक. पण त्यांचें सामाजिक कार्य नि विचार कोणाला आठवतात? सावरकरांची स्थिति या दोघांपेक्षां वाअीट झाली. हे दोघे विचारवन्त राजकारणाच्या भानगडींत न पडल्यामुळें ते लोकप्रिय झाले नाहींत, तरी त्यांच्याविरुद्ध लोकद्वेषहि निर्माण झाला नाहीं. त्यांचे विचार पचले नाहींत, पटले नाहींत; तरी ते समजावून न घेण्याची वृत्ति दिसत नाहीं. पण या-अुलट सावरकरांचे विचार केवळ समाजकारणापुरते मर्यादित नाहींत. ते राजकारणांतील प्रभावी विचारवन्त असल्यामुळें आणि, त्यांनीं पुरस्कारलेली हिंदुत्वाची विचारसरणी कांहींनीं प्रतिगामी ठरवून टाकल्यामुळें, सावरकरांची ओळख व्हावी त्या पद्धतीनें या देशाला होअूं शकली नाहीं. सावरकरांचे हिंदुत्ववादी सहकारीहि त्यांचा समाजविषयक दृष्टिकोण आत्मसात् करूं

शकले नाहींत. त्यामुळें अेखाद्या विचारवन्ताच्या वैचारिक नेतृत्वाच्या यशासाठीं जो पहिल्या श्रेणीचा सहकारी वर्ग लागतो, तो सावरकरांना मिळाला नाहीं. म्हणजे राजकीय विचार प्रभावी असल्यामुळें आगरकर आणि केतकर मागें पडले, आणि सावरकरांचे राजकीय विचार 'प्रतिगामी' आहेत असें पक्षनिष्ठांनीं ठरवून टाकल्यामुळें सावरकर हे सर्वस्वीं प्रतिगामी, मध्ययुगीन आहेत असाच गैरसमज पसरला. वस्तुतः लोकांच्या दृष्टीनें पुरोगामी ठरलेल्या त्या काळच्या काँग्रेस पुढाऱ्यापेक्षां सावरकर किती तरी पुढें गेलेले आहेत. हिंदु कोड बिलाच्या प्रसंगीं काँग्रेसचे राजकीय दृष्ट्या पुरोगामी ठरलेले ज्येष्ठ नेते सामाजिक दृष्ट्या किती प्रतिगामी आहेत हें आतां सिद्ध झालें आहेच. पण दुर्दैव हें कीं, सामाजिक नि आर्थिक दृष्ट्या प्रतिगामी ठरलेले हे नेते पुरोगामी ठरले, आणि सावरकरांच्या नेतृत्वावर मध्ययुगीन प्रतिगामित्वाची मुद्रा ठोकली गेली. सावरकरांचें योग्य मूल्य-मापन न होण्यास दुसरें अेक कारण आहे. गांधीवादी विचारसरणीप्रमाणेंच समाजवादाचें दुसरें प्रभावी तत्त्वज्ञान १९३१ नंतर महाराष्ट्रांत आलें. त्यामुळें बरेचसे तरुण तिकडे गेले. आणि सावरकरांचा हा 'तृतीय पंथ' कालदृष्ट्या मागासलेला आहे, अशी कल्पना दृढ झाली. ती नाहींशी करण्याची कुवत सावरकरांच्या अनुयायांत नव्हती. सावरकरांचे सुधारणावादी विचार व त्यांचीं राजकीय मतें यांची फाळणी झाली. सावरकरांच्या कठोर बुद्धिवादी विचारांना भावनांची झिलई देण्यांतच वेळ गेला, शक्ति खर्च केली गेली. त्या विचारांच्या आधारानें त्यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा समन्वय घालून, भारतीय तरुणांपुढें समाजाच्या राजकीय, आर्थिक नि सामाजिक क्रांतीचें तत्त्वज्ञान नि कार्यक्रम ठेवण्याचा प्रयत्नच झाला नाहीं. सावरकरांच्या अनुयायांनीं वा सहकाऱ्यांनीं दाखविलेल्या या अनौचित्यामुळें सावरकरांसारखा पहिल्या श्रेणीचा बुद्धिवादी विचारवन्त प्रभावी होऊं शकला नाहीं. त्यांना बरेचसे अनुयायी लाभूनहि त्यांचे नेतृत्व निष्प्रभ ठरलें. अितकेंच नव्हे, तर सावरकरांना ब्राह्मणांचें राज्य स्थापावयाचें आहे, त्यांचे अनुयायी म्हणजे 'भगवे भिक्षुक' आहेत, अशा वावड्या उडविल्या गेल्या,—नि त्यांच्याशीं खेळण्यांतच सावरकरांच्या

विरोधकांनीं धन्यता मानली. सावरकरांच्या सामाजिक विचारांचें मूलगामी नि क्रांतिकारक स्वरूप समजून घेण्याचा त्यांच्या विरोधकांनींहि प्रयत्न केला नाहीं.

या सर्व कारणांमुळें सावरकरांचे समाजसुधारणाविषयक विचार सर्व भारतीय समाजापुढें आले नाहींत ! अर्थात् सावरकरांनीं महाराष्ट्रांत लेख, भाषणें आणि प्रत्यक्ष कार्य यांनीं जें सुधारणावादी आंदोलन केलें, त्यामुळें सावरकरांचे विचार महाराष्ट्रानें पचविले नसले, तरी येथील निःपक्ष विचारवन्तांनीं सावरकर हे सर्व दृष्टींनीं प्रतिगामी आहेत असा गैरसमज करून घेतला नाहीं. पण हें अेकट्या सावरकरांचें कर्तृत्व आहे !

जुनें जाअूं द्या .....

पण सावरकरांना लौकिकदृष्ट्या कोणतें यश लाभलें हा त्यांच्या विचारांच्या मूलगामित्वाचा निकष असूंच शकत नाहीं. किंबहुना कोणत्याहि क्रांतिकारकांचे विचार हे अशाच अल्पसंख्य लोकांत वावरत असतात. सावरकरांच्या सुधारणावादी विचारांचें असेंच झालें असल्यास नवल नाहीं. पण महाराष्ट्राच्या सामाजिक अितिहासांत सावरकरांचें स्थान अढळ आहे. लोकहितवादी, रानडे यांच्यासारख्यांनीं सावरकरांनीं समाजांत असलेली आत्म-संतुष्टता घालविण्याचे प्रयत्न करून पाश्चात्य राष्ट्रांनीं स्वतःचा कसा विकास केला हें सांगितलें. राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणा हव्यात हें आग्रहानें प्रतिपांदिलें. आगरकरांनीं प्राश्चात्य तत्त्वज्ञानांतील बुद्धिस्वातंत्र्य आणि अैहिक अभ्युदयाची कल्पना प्रखरपणें मांडून समाजाच्या रूढींवर हल्ले केले. दलित समाजांतील विकासाची, प्रगतीची तळमळ ज्योतिबांच्या विचारांनीं महाराष्ट्रांत प्रकट झाली. डॉ. केतकर किंवा डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या समाजसुधारकांनीं हिंदुसमाजाच्या व्याधींचें समाजशास्त्रीय पृथक्करण केलें. सावरकरांनीं आगरकरांच्याच बुद्धिनिष्ठेनें व अैहिक दृष्टिकोणानें महाराष्ट्रांत नवें वैचारिक आंदोलन सुरू केलें. मिल-स्पेन्सरचें अुपयुक्ततावादी व समाजनिष्ठ तत्त्वज्ञान आपल्या प्रभावी शब्दांत समाजापुढें मांडलें,— विज्ञानवाद व यंत्रयुग यांची साद दिली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आतां परिस्थिति पालटली आहे. पूर्वी राजकारण कीं समाजसुधारणा असा वाद असे. आतां आपल्या हातांत राजकीय सत्ता आली आहे. त्यामुळें हा वाद अेका अर्थानें मिटला आहे. राज्यघटनेनें सामाजिक समता निर्माण करणारे मूलभूत अधिकार नागरिकांना दिले आहेत. स्त्रियांचें समाजांतील स्थान निश्चित होत आहे. अस्पृश्यतेला घटनात्मक रीत्या मूठमाती दिली आहे. पण अेवढ्यानें कार्य झालेलें नाहीं. राज्यघटना ही अेक कागदी कल्पना आहे. त्यांत दिलेले मूलभूत अधिकार व्यवहारांत आणणें हें समाजाच्या विवेकबुद्धीवर अवलंबून आहे. घटनेंत असलेले अधिकार समाजानें धुडकाविले तर त्यांचें काय होणार? म्हणून केवळ सुधारणेचे कायदे करून भागत नाहीं. समाजाची सुधारणानुकूल प्रवृत्ति तयार करीत राहिलें पाहिजे. अेक अगोदर नि अेक नंतर असें या बाबतींत होअूंच शकत नाहीं. दोन्ही गोष्टी चालूच पाहिजेत. लोकशिक्षण हें लोकसुधारणेच्या निर्बंधाअितकेंच महत्त्वाचें आहे. म्हणून समाजसुधारणा ही आतां राजकारणापासून विभक्त होअूं शकणार नाहीं. आपल्या देशांत अजून ही प्रवृत्ति नाहीं. आपलें राजकारण बरेंचसें व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचें झालें आहे. तेथें खासगी भांडवलवाल्यांच्या साहसवादी अर्थशास्त्राप्रमाणेंच व्यक्तिनिष्ठेवर आधारलेला राजकीय साहसवाद चालू आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक विचार मूलग्राही स्वरूपांत समाजापुढें मांडून त्याला सुधारण्याचे प्रयत्न कमी आहेत; सत्तास्पर्धा व त्यासाठीं 'करार' चालूं आहेत. ही प्रवृत्ति घातुक आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, समाजपरिवर्तनासाठीं राजकारण नसून समाजावर येनकेन प्रकारेण नियंत्रण मिळविण्यासाठीं व सत्ता हस्तगत करण्यासाठीं स्पर्धाळू राजकारण चालू आहे. ही पद्धति टाकून देअून समाजाचें प्रियाराधन करण्याची नव्हे, तर समाजसुधारकाची भूमिका घेतली पाहिजे. निवडणुकींत पराभव होअील या भीतीनें सुधारणावादी विचार टाकून देण्याची प्रवृत्ति वाढली तर समाजाच्या प्रगतीची आशाच नको! आगरकरांच्या सुधारणावादापासून नव्या सुधारकांनीं हें शिकलें पाहिजे. बुद्धिवादी आचरण व निर्भय मतपुरस्कार या गोष्टी कठीण असल्या तरी त्या आत्मसात् केलेले सुधारक म्हणून सावरकरांचें अुदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे! गेल्या

शतकांतील मिल–स्पेन्सर आदींच्या पुरोगामी तत्त्वज्ञानांतूनच सावरकरांचा सुधारणावाद आलेला असल्यानें सावरकर हे तात्त्विक क्षेत्रांत अुपयुक्ततावादी सामाजिक मूल्यें आणि मार्क्सवादी समाजक्रांतीचीं तत्त्वें यांच्या मध्यसीमेवर अुभे असल्यासारखे वाटतात.

हिंदु समाज हीं समाजक्रांतीचीं नवीं तत्त्वें स्वीकारून त्यांच्याशीं समन्वय घालण्याचा प्रयत्न करणार, कीं पुरातनत्वाला मिठी मारून बसणार हा खरा प्रश्न आहे. हिंदु समाजानें जुने धर्मग्रंथ मिटवून विज्ञानाचा नवा ग्रंथ अुघडावा ही सावरकरांची धारणा आहे. आधुनिक व पुरोगामी समाज हें त्यांचें स्वप्न आहे ! हे आपले विचार त्यांनीं समाजाच्या वैचारिक क्षेत्रांत फेंकले आहेत. तीं बीजें फळाफुलांनीं बहरलेल्या वृक्षाच्या रूपानें भविष्य-काळांत दिसणार कीं मातींतच नष्ट होअून जाणार, याचें अुत्तर नव्या पिढ्यांनीं द्यावयाचें आहे ! पण कांहींहि झालें तरी नष्ट होण्यांतच बीजाचा अुन्माद असतो, त्याचें जीवितसर्वस्व असतें ! तो आनंद तर त्यापासून कुणीं हिरावून घेणार नाहीं ?

× × ×

४ :

सावरकरांचा राष्ट्रवाद

भारत हें एकराष्ट्र आहे काय ? ' राष्ट्र ' ही आधुनिक अर्थानें वापरली जाणारी संज्ञा पूर्वीच्या भारताला लावतां येअील काय ? खरोखर हे दोन प्रश्न अतिशय विवाद्य ठरले आहेत. कारण भारताला पांच हजार वर्षांचा अतिहास आहे, प्राचीन संस्कृति आहे, विशिष्ट समाजरचना आहे. शक-हूणापासूनचीं आक्रमणें या देशानें परतवून लावून स्वतःची अशी संस्कृति जिवंत ठेवली आहे. या सर्व कारणांमुळें भारत हें प्राचीन काळापासून एकराष्ट्र आहे असें म्हणणाऱ्यांचा अेक पक्ष आहे. याअुलट राष्ट्रवाद ही कल्पनाच मुळीं गेल्या चार-पांच शतकांत आलेली आहे. त्यामुळें त्या अर्थानें भारत हें राष्ट्र प्राचीन काळापासून नांदत आहे असें म्हणणें म्हणजे आजची कल्पना भूतकाळावर लादणें (anachronism) आहे. भारतांत अनेक जातींचे लोक होते. त्या सर्वांना अेकत्रित करण्याचा समाजशास्त्रीय प्रयोग प्राचीन आर्यांनीं केला. त्यामुळें दुसऱ्या जातींना आत्मसात् करून त्यांना आपल्या ' आचारप्रभव ' संस्कृतीनें बांधून टाकण्याचा प्रयोग हेंच हिंदूंचें वैशिष्ट्य ठरलें. त्यामुळें भारतांत सामाजिक अनुशासन हें धर्मानें केलें, अितकेंच नव्हे तर परदेशांतहि हिंदु संस्कृतीचा ध्वज फडफडविला. पण त्याचें स्वरूप सांस्कृतिक होतें; राजकीय साम्राज्यवाद त्यांतून निर्माण झाला नाहीं. या सर्व घटना लक्षांत घेऊन दुसरा पक्ष असें म्हणतो, हिंदूंनीं प्राचीन

काळांत जातीची कल्पना निर्माण केली, मानवतेची कल्पनाहि त्यांना मान्य होती. पण राष्ट्रीयत्वाची कल्पना मात्र निर्माण केली नाहीं. अलीकडचा एक हजार वर्षांचा अितिहास सोडला तर भारतांत एकराज्य किंवा एकराष्ट्र या दोन्ही कल्पना प्रभावी नव्हत्या. संस्कृतीच्या, धर्माच्या बंधनानें अेकत्रित बांधलेला समाज येथें नांदत होता, असें या पक्षाचें थोडक्यांत म्हणणें आहे. ज्ञानकोशकार केतकर यांनीं अशाच प्रकारचे विचार मांडले आहेत.* कॉन हा पाश्चात्य ग्रंथकारहि हिंदुधर्म हाच भारतीय अैक्याचा मूलाधार होता असें म्हणतो. § भारताच्या अितिहासकालीन स्थितीसंबंधीं हे दोन मतप्रवाह आहेत. या दोहोंत संपूर्णतया बरोबर कोणता हें ठरविणें हा येथें विषय नाहीं. परंतु पाश्चात्य राष्ट्रवादाची कल्पना ही अलीकडची असल्यानें त्या अर्थानें भारत हें राष्ट्र प्राचीन काळापासून वावरत आहे असें म्हणणें धाडसाचें ठरेल. पाश्चात्य राष्ट्रवादाचा जन्म तेथील राजनैतिक परिस्थितींतून झाला आहे. पाश्चात्यांची राष्ट्रवादाची व्याख्या अगदीं थोडक्यांत डोव्हर विल्सननें केली आहे. तो म्हणतो, राष्ट्रीयत्व + राज्य = राष्ट्र. राज्याविना राष्ट्र असूं शकत नाहीं, त्या राष्ट्रीयत्वाचे लोक (Nationality) असूं शकतात. अुदाहरणार्थ, भारतांतून अेक कोटी लोक अुद्यां सीलोन वा आफ्रिका येथें स्थायी झाले, तर त्यांचें राष्ट्रीयत्व हिंदी असेल. त्यांना राष्ट्र म्हणून तेथें कोणी संबोधणार नाहीं. राज्याप्रमाणेंच प्रदेश हें पाश्चात्य राष्ट्रवादाचें महत्त्वाचें कारण आहे. युरोपची विशिष्ट राजकीय परिस्थिति त्याला कारण आहे. अीन्जनें आपल्या देशभक्तीवरील निबंधांत पाश्चात्य राष्ट्रवादाची अैतिहासिक पार्श्वभूमि देअून असें म्हटलें

---

*Hinduism did not produce any idea of nationality. They had only one conception of unity above the conception of jati and it was the conception of humanity.

—Dr. S. V. Ketkar.

§Hinduism forms the undestructible basis of Indian Unity.

—"The History of Nationalism in the East".

—Kolin.

आहे कीं, रोमन साम्राज्याच्या अधःपातानंतरच राष्ट्रत्वाची कल्पना युरोपमध्यें बळावली. त्याचा विकास अेकच अनुशासन, अेकच मर्यादित प्रदेश, व त्यामुळें समानहित—अशा क्रमानें झाला. सरदार आणि राजे यांनीं स्वतःच्या स्थैर्यासाठीं ही कल्पना काढली. तरीहि १८ व्या शतकांतसुद्धां फ्रान्स, जर्मनी, अिटली येथें बारीक बारीक अशीं शेंकडों राज्यें होतीं. पण त्या त्या देशांत बिस्मार्क—मॅझिनीसारखे महापुरुष निर्माण झाले, आणि त्यांनीं त्या देशांना एकराष्ट्रत्व दिलें. मुख्यतः फ्रेंच राज्यक्रांतीनंतर आणि नेपोलियनच्या आक्रमक धोरणामुळें हीं राष्ट्रें अेकजीव झालीं. युरोपच्या राष्ट्रवादांत प्रदेश आणि राज्य यांना प्राधान्य मिळालें; धर्म, संस्कृति वा वंश हे राष्ट्रत्वाचे घटक कमी महत्त्वाचे ठरले.

भारतांतील राष्ट्रीय भावनेचा विकास मात्र या प्रादेशिक वा राजनैतिक घटकांतून झालेला नाहीं. मुख्यतः तो धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांतून येथील राष्ट्रत्वाची निर्मिति झालेली आहे. पण गेल्या अेक हजार वर्षांच्या अितिहासांत मुसलमान व ब्रिटिश यांच्या आक्रमणामुळें आमच्या देशांत राजकीय लढा सुरू झाला. असंघटित रीत्या कां होअीना, पण हिंदु म्हणून राज्य स्थापण्याचे प्रयत्न रजपूत, शीख व मराठे यांनीं केले. सांस्कृतिक अैक्याला समान राज्याचा आधार हवा, ही कल्पना गेल्या सहाशें वर्षांत प्रभावी झाली. शिवाजीमहाराज हे या हिंदु राज्य व हिंदु राष्ट्र या कल्पनांचे तेजस्वी पुरस्कर्ते. हिंदूहि राज्य निर्माण करूं शकतात, हिंदूहि राष्ट्रत्व प्रस्थापूं शकतात हें त्यांना सिद्ध करावयाचें होतें. मुसलमान व हिंदु यांच्या या राजकीय संघर्षाच्या काळांत ही हिंदु राष्ट्रीयत्वाची भावना विकसित झाली. या काळांत मराठे जर अेकसूत्री हिंदु राज्य स्थापन करूं शकले असते तर भारत समानराज्य असलेलें अेकराष्ट्र झालें असतें; सांस्कृतिक अेकत्वाला राज्यसंस्थेच्या अेकत्वाचा आधार मिळाला असता. पण हिंदु व मुसलमान यांचें हें द्वंद्व अनिर्णित असतांनाच ब्रिटिश आले.

ब्रिटिश आल्यानंतर परिस्थिति पालटली. पाश्चात्य राष्ट्रवादाचे विचार या देशांत आले. अेकसूत्री राज्य निर्माण झालें. पारतंत्र्याबरोबर येणारी

प्रतिकारभावनाहि जागृत झाली. समान संकटापासून सर्वांची मुक्तता करण्याचें ध्येय डोळ्यांपुढें असें राहिलें. त्यामुळें सर्व भारतीय हे अेक आहेत ही कल्पना आली. त्यानंतर १९४७ पर्यंत राष्ट्रवादाच्या दृष्टीनें अनेक घटना घडल्या. नवे विचारप्रवाह आले. भारतांत अनेक राष्ट्रें आहेत,—यापासून तों भारताचें राष्ट्रीयत्व ब्रिटिश सत्तेच्या आगमनापासूनच सुरू होत आहे—यापर्यंत विविध विचारप्रवाह निर्माण झाले. या सर्वांत सावरकरांचा स्वतःचा असा अेक विचारप्रवाह आहे. त्याची चर्चा या प्रकरणांत करावयाची आहे. ह्या सर्व वादांचा विचार करतांना फाळणीपूर्व अखंड भारताची परिस्थिति ध्यानांत घेतली आहे. फाळणीनंतरचे जे प्रश्न आहेत त्यांचा विचार अलेरीस करूं; पण सावरकरांच्या किंवा अितरांच्या राष्ट्रवादाचें विवेचन हें या ठिकाणीं अैतिहासिक, समाजशास्त्रीय दृष्टीनें केलेलें आहे.

सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारसरणीचा परिचय करून घेण्यापूर्वी हिंदी राष्ट्रवादाचा जन्म कां झाला, नि त्यावर सावरकरांचे आक्षेप कोणते आहेत याची चर्चा प्रथम केली पाहिजे.

ब्रिटिशांचें राष्ट्रविषयक धोरण

ब्रिटिशांनीं आपल्या साम्राज्यांत भारताला नोकरशाहीच्या बेड्यांनीं जखडून सामील करून ठेवलें. पण ही आपत्तिसुद्धां भारताच्या दृष्टीनें संधी ठरत होती. समान राज्याचा अनुभव भारताला आला. नवे विचार आले, दळणवळणाचीं साधनें वाढलीं. भारतीयांचे सामाजिक, आर्थिक व्यवहार अधिक निकटचे होत चालले; या सर्वांबरोबर देशभक्तीची भावनाहि प्रखर होत चालली. यामुळें हिंदु, मुसलमान आणि अितर जाति यांचें अेकराष्ट्र होअील कीं काय अशी ब्रिटिशांना भीति वाटूं लागली. त्यामुळें आपलें आसन हादरेल या कल्पनेनें ते बेचैन झाले. म्हणून अनेक भेदकारी कल्पना त्यांनीं या देशांत सोडल्या. हिंदूंच्यांत फूट पाडण्यासाठीं जातिभेद फुलविले. पाश्चात्य विद्येची मोहिनी टाकून आत्मनिंदक करण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांना राजाश्रय देअून दलित समाजाला आपल्या

पंखाखालीं ओढण्याचे प्रयत्न झाले. गांधींनींसुद्धां ख्रिस्ती मिशनरी हे साम्राज्यवादाचे हस्तक होते हें मान्य केलें होतें. ही झाली हिंदूंच्यांतील फूटपाडी खटपट. त्याबरोबर मुसलमानांना हिंदूंपासून अलग करण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले. मुसलमानांची धर्मकल्पना, पृथक् वृत्ति फुलविण्यासाठीं अलिगड विद्यापीठासारख्या संस्था काढण्यांत आल्या. त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. बेक यांच्या लिखाणावरून ब्रिटिशांच्या फूटपाड्या वृत्तीची कल्पना येण्यासारखी आहे. काँग्रेसची चळवळ ही ब्रिटिशांच्या हातून राज्य हिसकवून आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं हिंदूंनीं चालविली आहे, म्हणून मुस्लीमानीं ब्रिटिश सरकारच्या साहाय्यानें तो प्रयत्न हाणून पाडला पाहिजे असा प्रचार या बेकसाहेबानें सुरू केला.

या पृथक् वृत्तींतून मुसलमानांच्या राजकीय आकांक्षा निर्माण झाल्या. १८९२ सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें ऑडियन कौन्सिल्स् ॲक्ट संमत करून त्यांत विधिमंडळांत मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यांत आलें. मुसलमानांनीं या तत्त्वाचें स्वागत केलें, आणि त्यानंतर विद्यापीठें, स्थानिक स्वराज्यसंस्था अित्यादि ठिकाणीं प्रतिनिधित्व मागण्यासाठीं हात पुढें केला. १९०९ मध्यें तेंहि मिळालें. अशा रीतिनें १९४७ पर्यंत मुसलमानांच्या राजकीय आकांक्षांची वाढ करून, मुसलमानांना राजकीय अल्पसंख्य बनविलें. ही झाली मुस्लीम जमातवादाची भेदकारी शक्ति.

तिसरी शक्ति संस्थानिकांची होती. त्यांना संयुक्त राष्ट्राच्या चळवळींत कसें घ्यावयाचें हा प्रश्न भारतीय राजकारणांत नेहेमीं अुपस्थित होअी. फेडरेशनची कल्पना जर स्वीकारली असती तर हीं बांडगुळें कदाचित् कायम राहिलीं असतीं. ब्रिटिशांनीं ती कल्पनाहि येथें प्रस्थापित करण्याची खटपट केली. पण ह्या कल्पनेस पुढें विरोध झाला.

यावरून हें दिसून येअील कीं, ब्रिटिशांनीं राष्ट्र अेकजीव होअूं नये म्हणून सर्व प्रकारचे प्रयत्न केले. दडपशाहीचा वरवंटा अधून मधून फिरत असेच. या सर्व धोरणांमुळें हिंदुस्थानांत अेकराष्ट्रत्वाच्या भावनेला फाटे फुटले.

हिंदी राष्ट्रवादाचा जन्म

ब्रिटिश राजवटींतील शिक्षणानें नवे संस्कार झालेले देशभक्त भारत हा सर्वांचा आहे, आणि त्याच्यावर भारतीयांचेंच राज्य असलें पाहिजे असें म्हणूं लागले. यां त्यांच्या आकांक्षा काँग्रेसमध्यें समूर्त झाल्या. सर्व भारतीयांची अेकजूट करून त्यांचें अेक संयुक्त राष्ट्र बनविणें हें त्यांचें स्वप्न होतें. न्या. रानडे यांनीं या हिंदी राष्ट्रवादाचें वर्णन पुढील शब्दांत केलेलें आपल्याला आढळेल*—

> " अुद्यांच्या हिंदी राष्ट्रांत कुठल्याहि प्रकारच्या वंश, धर्म वा वर्णभेदाला स्थान नाहीं. अितर कोणत्याहि गोष्टीस महत्त्व न देतां आम्ही सर्व स्वतःला प्रथम हिंदी समजतों, आणि चिरकाल असेंच समजणार. अितके दिवस हें ज्ञान आम्हांस न झाल्यामुळें आम्ही अेक संघटित हिंदी राष्ट्र निर्माण करूं शकलों नाहीं. "

या हिंदी राष्ट्रवादाची वैचारिक पार्श्वभूमि कोणती होती हें पाहणें जरूर आहे. प्रथमच आपण पाहिल्याप्रमाणें १९ व्या शतकांतील युरोपचा प्रादेशिक राष्ट्रनिर्मितीचा अितिहास या सर्व विद्वान् देशभक्तांपुढें होता. भारतांत अशीच परिस्थिति असल्याचें त्यांना आढळलें. अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अिटली यांनीं राष्ट्रैक्य साधलें, तें आपणांला कां साधूं नये असे विचार त्यांच्या मनांत आले. त्यांनीं राष्ट्र ही अेक भौगोलिक कल्पना न ठेवतां त्यांत चैतन्य ओतलें. या सर्व घटनांमुळें युरोपचा प्रादेशिक राष्ट्रवाद हें आमच्या विचारवन्तांचें स्फूर्तिस्थान झालें. पण आणखी दोन राजकीय तत्त्वें आमच्या देशभक्तांना अनुकरणीय वाटलीं. तीं म्हणजे प्रातिनिधिक लोकशाही व प्रातिनिधिक सरकार. अिंग्लंडचा अितिहास जर राज्यघटना आणि राज्यशास्त्र या दृष्टींनीं अभ्यासला तर आपणांला असें आढळेल कीं, राजा नि पार्लमेंट यांच्या झगड्यांतून लोकशाहीची मुहूर्तमेढ जशी रोंवली गेली, तशी संयुक्त राष्ट्रवादाचाहि विकास त्यांतून झाला. प्रांतिक व

---

* प्रा. न. र. फाटककृत न्या. रानडे चरित्र.

स्थानिक स्वरूपाचे भेद नाहींसे होऊन अिंग्लंडमध्यें अेकराष्ट्रत्वाची भावना प्रबळ झाली. पार्लमेंटचा प्रभाव देशावर पडण्यापूर्वी अिंग्लंड हें अेक भौगोलिक परिमाण होतें असें ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञहि मानतात. फ्रान्स, अिटली या देशांत समान राज्य, प्रातिनिधिक सरकार यांतूनच अेकराष्ट्रत्वाचा विकास झाल्याचें आपणांस आढळेल. हिंदी राष्ट्रवाद्यांना असेंच वाटत असे कीं, या देशांत होमरूल आलें कीं आपलें राष्ट्र अेकजीव होअील. पार्लमेंटरी लोकशाहीची कल्पना व प्रातिनिधिक सरकार या दोन कल्पनांचा पुरस्कार त्यामुळेंच शेवटपर्यंत करण्यांत आला. लोकहितवादींनीं १८४९ सालीं लिहिलेल्या अेका पत्रांत याचा अुल्लेख आहेच. तेव्हांपासून स्वातंत्र्यलढ्याच्या अखेरीपर्यंत या कल्पनांना येथील राष्ट्रवादी चळवळ चिटकून बसली आहे. त्याचा थोडक्यांत अितिहास पाहणें अुपयोगी पडेल.

भारतीय राजकारणांत अुग्र क्रांतिकारक, सामुदायिक आंदोलन करणारे टिळक–गांधीसारखे पुढारी, व घटनात्मक चळवळ करणारे मवाळ. असे तीन राजकीय प्रवाह सामान्यपणें होते. त्या तीनपैकीं मवाळ हे तर बोलून चालून सनदशीर चळवळ करणारे. त्यामुळें त्यांच्या राष्ट्रवादाची कल्पना पार्लमेंटरी लोकशाहींतून राष्ट्र निर्माण करण्याची होती, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. पण पुढें ब्रिटिशांनीं जेव्हां १९१९, १९३५ या वर्षीं घटनात्मक सुधारणा भारताला देण्यासाठीं पावलें टाकावयास सुरुवात केली, तेव्हां गांधींच्यासारख्या असहकारवाद्यालाहि 'पार्लमेंटरी मनोवृत्ति आतां दृढ होअून बसली आहे.' (Parliamentary mentality has come to stay) असें मान्य करावें लागलें. अर्थात् प्रातिनिधिक लोकशाही म्हटली कीं, प्रतिनिधित्व कसें द्यावयाचें हा प्रश्न आलाच. आणि हिंदुस्थानांत तर शेंकडों जातिभेद आणि प्रांतभेद. तेव्हां राजकीय सुधारणा देतांना हा प्रश्न सदैव पुढें अुभा राही. अशाच प्रयत्नांत ब्रिटिशांनीं जातीय मतदारसंघ, जादा प्रतिनिधित्व, प्रांतिक स्वयंनिर्णय अित्यादि संयुक्तराष्ट्रवादाला घातुक अशीं तत्त्वें पुढें आणलीं, आणि आपल्या सुधारणा अधिकाधिक प्रातिनिधिक करण्यासाठीं तीं भारताच्या राजकारणांत घुसडलीं. त्यामुळें कॉंग्रेस आपल्या राष्ट्रवादाचें स्वरूप संयुक्त राखण्यासाठीं अशा प्रत्येक वेळीं मुसलमानांशीं,

अस्पृश्यांशीं वाटाघाटी करीत असे. प्रातिनिधिक सरकार स्थापून संयुक्त राष्ट्र निर्माण करण्याच्या या मोहामुळें राष्ट्रवादाचें स्वरूप विकृत होत चाललें, व क्रांतिवादी काँग्रेस तडजोडवादी होत चालली. ब्रिटिश व मुसलमान या दोघांनींहि टाकलेल्या पेंचाला उत्तर देणें तिला कठीण जाऊं. १९३५ पासून १९४७ पर्यंत अितके घटनात्मक पेंचप्रसंग आले कीं, त्या प्रत्येक वेळीं काँग्रेसचें निधर्मी स्वरूप कमी होत जाऊन मुस्लीम जातिवाद मात्र वाढत चालला. १९४६ सालीं संयुक्त घटनासमिति व हंगामी मंत्रिमंडळ यांचा जेव्हां बुडबुडा फुटला, त्या वेळीं संयुक्त सरकार व संयुक्त घटनासमिति यांनीं हिंदी राष्ट्र घडविण्याचें स्वप्न धुळीस मिळालें. मग काँग्रेसनेते फाळणीला आपण मान्यता देऊं हें अुघड अुघड बोलूं लागले ! ब्रिटिशांनीं अशा रीतीनें राष्ट्रवाद्यांना घटनात्मक सुधारणांच्या खोड्यांत अडकवून त्यांच्या गळीं निधर्मी राष्ट्रवाद व लोकशाही यांना घातुक अशीं तत्त्वें अडकविलीं !

या विवेचनावरून पार्लमेंटरी लोकशाही, प्रातिनिधिक सरकार, या दोन कल्पनांचा पगडा आमच्या राजकारणावर अखेरपर्यंत कसा होता, आणि आमच्या नेत्यांचें क्रांतिवादी व निधर्मी धोरण कसें मागें पडत गेलें हें कळण्यासारखें आहे.

अस्पष्ट विचार

हिंदी राष्ट्रवाद्यांनीं कोणत्या वैचारिक पार्श्वभूमीवर आपलें संयुक्त भारतीय राष्ट्राचें स्वप्न अुभारलें होतें, हें आपण पाहिलें. पण हें केवळ राष्ट्रवादाचें राजकीय स्वरूप आहे, याकडे बहुतेकांचें दुर्लक्ष झालें. राष्ट्रीयत्व ही अेक सर्वंकष कल्पना आहे. अेकजीव राष्ट्रनिर्मितीसाठीं आमच्या देशांत केवळ राजकीय लांचबाजीचे प्रयोग झाले. भारतांत सर्वांची संस्कृति अेक आहे, अित्यादि कल्पना रूढ करून महत्त्वाच्या भेदावर लिंपण घालण्याचे प्रयत्न झाले. 'राष्ट्र' नि 'राज्य' या कल्पना अगदीं भिन्न आहेत, ही गोष्ट सोईस्करपणें विसरण्याचे प्रयत्न झाले. स्वातंत्र्यवादी चळवळीला किंवा स्वराज्याच्या स्वरूपालाच हिंदी

राष्ट्रवाद म्हटलेलें अनेक टिकाणीं आपणांला आढळेल. ज्यांनीं ज्यांनीं हिंदी राष्ट्रवादासंबंधीं लिहिलें आहे, त्यांनीं भारतांतील गेल्या पांच हजार वर्षांच्या सांस्कृतिक वा सामाजिक अितिहासाकडे दुर्लक्ष केलें आहे असें आपणांला आढळेल. आणि या सर्वांकडे दुर्लक्ष करून राष्ट्रवादाची चर्चा चाललेली आपणाला आढळेल. आजच्या कल्पना ऐतिहासिक घटनांवर लादून त्यांचें तसें पृथक्करण करण्याचे अशास्त्रीय प्रयोग झाले. देशभक्ति व राष्ट्रीयत्व या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हेंहि विसरलें गेलें.

पुढें जिनांनीं ज्या वेळीं द्विराष्ट्रवादाची कल्पना मांडली, तेव्हां तर गांधींपासून सर्वांचा गोंधळ अुडाल्याचें आपणांला दिसतें. गांधी व जिना यांच्यांत १९४४ सालीं जो पत्रव्यवहार झाला आहे, त्यांत जिनांना गांधींनीं हाच प्रश्न विचारला होता कीं, धर्म बदलल्यावर राष्ट्रीयत्व कसें बदलतें हेंच मला समजूं शकत नाहीं. जिनांनीं त्यांना स्पष्टपणें सांगितलें कीं, हिंदु वा मुसलमान हे केवळ धर्म नाहींत, त्यांत सामाजिक तत्त्वज्ञान आहे; ते अगदीं भिन्न सांस्कृतिक मूल्यें बाळगणारे लोक आहेत, असा जिनांचा दावा होता. गांधींची जीवनाकडे पाहण्याची अेक विशिष्ट भूतदयावादी, धर्मनिष्ठ वृत्ति होती. त्यामुळें त्या धार्मिक आध्यात्मिकतेनेंच त्यांनीं हिंदु-मुस्लीमांच्या प्रश्नाकडे पाहिलें. भारताच्या राष्ट्रीयत्वाचा किंवा अेकूण राष्ट्रवादाच्या कल्पनेचा बुद्धिगम्य पुरस्कार गांधीजींनीं केल्याचें आढळत नाहीं. हिंदुस्थान हें अेकराष्ट्र असावें अशी त्यांची श्रद्धा होती, अेवढेंच. त्यांत अितिहास, समाजशास्त्र, परंपरा, राजकीय परिस्थिति यांचा विचार नाहीं असेंच वाटतें. ते राष्ट्रवाद हें अेक आजचें मूलभूत परिमाण मानीत नसल्यामुळें कदाचित् हा निष्काळजीपणा त्यांनीं दाखविला असेल.

याखेरीज अितर नेत्यांनींहि हिंदी राष्ट्रवादाला मिळालेल्या तात्त्विक आव्हानांचा विचार केलेला आढळत नाहीं. डॉ. राजेंद्रप्रसाद, अशोक मेहता, आचार्य जावडेकर आदींनीं आपल्या या विषयावरील पुस्तकांत संयुक्त राष्ट्रवादाचा (Federal Nationalism and Multi-national States) पुरस्कार केलेला आढळतो. पण संयुक्त राष्ट्रवाद म्हणजे अेकराष्ट्रत्व नव्हे याचा विसर पडल्यामुळें त्यांनीं अेकराष्ट्रत्वाच्या

आक्षेपकांचे प्रश्नच विचारांत घेतलेले नाहींत. हे आक्षेपक 'जातीयवादी वा संकुचित' आहेत असें म्हणून 'शेषं कोपेने पूरयेत्' या न्यायानें त्यांचे प्रश्न बाजूला सारले गेले. खरा प्रश्न असा होता कीं, 'जाति' आणि 'राष्ट्र' हीं तत्त्वतःता संकुचितच मूल्यें आहेत. अखिल मानवतेचा विचार हेंच खरें विशाल तत्त्वज्ञान असूं शकतें. तेव्हां शास्त्रीय दृष्टीनें हिंदी राष्ट्रवादाची भूमिका न मांडल्यामुळें ती ध्येयवादी कल्पनाच वाटूं लागली. १९३० नंतर समाजवादी विचारसरणीचे जे नेते होते त्यांनीं राष्ट्रवादाला संकुचित ठरवून ती अेक मागासलेली प्रवृत्ति आहे, भारतीय स्वातंत्र्य ही केवळ राष्ट्रवादी कल्पना नाहीं अित्यादि शेरे मारण्यास प्रारंभ केला. पण त्यामुळें भारतीय राष्ट्रवादाचें सामाजिक वा सांस्कृतिक स्वरूप कळलें नाहीं. तो एक वस्तुस्थितीपासून पळून जाण्याचा मार्ग होता असेंच वाटत राहिलें.

सारांश, जुन्या वा नव्या हिंदी राष्ट्रवाद्यांनीं आपल्या राष्ट्रवादाची तात्त्विक पार्श्वभूमि विवेचक पद्धतीनें मांडलेली आढळत नाहीं. अेखादी जमात जर स्वतःला राष्ट्र म्हणवून घेअून स्वतःचें राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असेल तर कशाच्या जोरावर तिची ती चळवळ अयशस्वी करतां येअील हा प्रश्न हिंदी नेत्यांपुढें सदैव होता. त्याचें अुत्तर त्यांना देतां आलें नाहीं. हिंदुस्थान हें अेक विसंवादरहित राष्ट्र अस्तित्वांत आहे हा केवळ त्यांच्या श्रद्धेचा विषय बनला, आणि त्यांचें राजकारण मात्र वर चर्चिलेल्या पार्लमेंटरी लोकशाहीच्या रोंखानें गेल्यामुळें शेवटीं फाळणींत त्याचें पर्यवसान झालें! हिंदी राष्ट्रवाद अशा भुसभुशीत व अस्पष्ट विचारांवर आधारलेला असल्यामुळें दोरी तुटलेला पतंग आकाशांत जसा फडफडत राहून शेवटीं खालीं येतो तशी त्याची स्थिति झाली!

सावरकरांचे आक्षेप

सारांश, हिंदी राष्ट्रवाद ही कल्पना काय आहे हें कोणी स्पष्ट केलेलें नाहीं; अितकेंच नव्हे, तर त्यांत कांहीं राष्ट्र, राज्य, यांसारख्या मूलभूत कल्पनांची गल्लत झालेली आपणांला आढळते. हा हिंदी राष्ट्रवाद व त्याचें राजकारण अयशस्वी कां झालें? या प्रश्नांची चर्चा पुढील प्रकरणांत सवि-

स्तर येणार आहे. पण तात्त्विक दृष्ट्या त्याच्यावर सावरकरांनीं कोणते आक्षेप घेतले आहेत हें आतां पहावयाचें आहे. सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांची ओळख हिंदी राष्ट्रवादावरील त्यांचें आक्षेप समजावून घेतल्याविना होणार नाहीं.

सावरकरांनीं खऱ्या निधर्मी, समान तत्त्वावर आधारलेल्या संयुक्त हिंदी राष्ट्राच्या कल्पनेचा ध्येय म्हणून कधींच धिक्कार केलेला नाहीं. त्यांचा विरोध होता तो आज तें हिंदी राष्ट्र अस्तित्वांत आहे असें मानून तसें भोळसट राजकारण करणाऱ्यांना. हिंदी राष्ट्रवादाचे खरे शत्रु कोण आहेत हें सावरकरांनीं स्पष्ट केलें. सावरकरांचे हिंदी राष्ट्रवादावरील तात्त्विक आक्षेप प्रामुख्यानें तीन होते. पहिला म्हणजे,- धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि असेच अितर बंध असणाऱ्या लोकांना, केवळ प्रादेशिक अेकत्व, किंवा वसति-स्थानाचें अेकत्व अेवढी अेकच गोष्ट बहुधा कोठेंच अेकराष्ट्र निर्माण करूं शकत नाहीं. कारण मनुष्यसमाज हा केवळ अेका ठिकाणीं राहतो म्हणून अेकात्म होत नाहीं. त्याला अितरहि धर्म, संस्कृति, भाषा यासारखीं कारणें असतात. भारतांत हिंदु, मुसलमान आदि लोक अेकत्र राहणारे असले तरी सांस्कृतिक वा सामाजिक दृष्ट्या सर्व भारतीय समाज अेकजीव झालेला नाहीं. त्यामुळें भारतीय राष्ट्रवाद हें ध्येय म्हणून ठीक असलें तरी ती वस्तुस्थिति नाहीं. दुसरा आक्षेप असा कीं, लोकांना स्वभावसिद्ध राष्ट्र बनावयास लावणारा सर्वांत महत्त्वाचा घटक जो अेकात्म अेकराष्ट्र बनण्याची अिच्छा–तो घटकच येथें नाहीं. मुसलमानांना ब्रिटिशांनीं या बाबतींत चिथविलें हें खरें असलें, तरी मुसलमानांना हिंदूंच्याबद्दल कधींहि विश्वास वाटला नाहीं आणि त्यामुळें ते सर्वस्वीं राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले. कारण त्यांच्या दृष्टीनें स्वराज्य हें हिंदु राज्यच होणार होतें. त्यामुळें हिंदी राष्ट्रवाद हा त्यांना कधींच मान्य झाला नाहीं. ब्रिटिशांनींहि त्यांची अलगपणाची भावना चिथविली. सावरकरांचा तिसरा आक्षेप म्हणजे, मुसलमान हे धर्म-दृष्ट्या वेगळे असतात, याचा अर्थ ते राष्ट्रदृष्ट्याहि वेगळे असतात. म्हणून हिंदी राष्ट्रवाद ही वस्तुस्थिति नसून तें ध्येय आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, भारतांत राजकीय आकांक्षा जिवंत असलेला, संस्कृतीनें समरस न

झालेला, स्वतःचा अलगपणा टाकून न देतां स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची घाषेणा करणारा मुसलमान समाज नि हिंदु राष्ट्र यांचा संघर्ष या देशांत चालू आहे. दोन राष्ट्रवादी भावनांचा (nationalities) हा संघर्ष आहे असा सावरकरांचा सिद्धांत होता. या तीनहि आक्षेपांमागें जी तर्कशुद्ध व अितिहाससिद्ध भूमिका होती ती समजून घेतल्यावर सावरकरांनीं भारताच्या राष्ट्रवादी विचारसरणीचा किती शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे हें कळेल.

प्रादेशिकता नव्हे

राष्ट्रांच्या घडणींत प्रादेशिक अेकता अर्थात् अेकच समान निवासभूमि असणें ह्या गोष्टीपेक्षांहि धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि अैतिहासिक आप्तसंबंधाचेंच केवढें तरी महत्त्व असतें. ह्या मूलभूत सामाजिक नि राजकीय तत्त्वाकडे दुर्लक्ष करण्याची काँग्रेसनें प्रारंभींच फार भयंकर अशी चूक केली. प्रादेशिक अेकता हासुद्धां त्या घटकांतलाच अेक घटक असतो, पण बहुधा सर्वच ठिकाणीं तो एकच अेक घटक मात्र होअूं शकत नाहीं. अिंग्लंड व अितर कांहीं युरोपियन राष्ट्रें यांचीं अुदाहरणें घ्या. या अुदाहरणांनचि 'हिंदी राष्ट्रीय' सभेच्या हिंदु संस्थापकांना चुकीच्या मार्गावर नेलें. अिंग्लंड आज जें अेक अेकाजिनंसी राष्ट्र बनलेलें दिसत आहे—तें कांहीं तें अेक अगदीं तंतोतंत असें प्रादेशिक परिमाण आहे ह्या अेकाच कारणामुळें नव्हे. तेथील लोकांचा प्रादेशिक राष्ट्राभिमान हें कांहीं कारण नाहीं, तर तो त्यांच्या अितर सामाजिक व राजकीय आप्तसंबंधाचें कार्य अर्थात् परिणाम आहे. अुदाहरणार्थ, अिंग्लंड हें पूर्वीच्या काळींहि असेंच तंतोतंत प्रादेशिक परिमाण होतें. परंतु जेव्हां जिव्हाळ्यांच्या धर्मभावनाअतिशय खवळल्या तेव्हां आंग्ल कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट यांना आपण आपल्या आंतील देशबांधवांपेक्षां अनुक्रमें आपापल्या बाह्यदेशीय धर्मीयांकडेच अधिक ओढले जात असल्याचा अनुभव आला. आंग्ल कॅथॉलिकांनीं अिंग्लंडमधील आपल्या आंग्लच पण प्रॉटेस्टंटांनीं रोमन कॅथॉलिक मताच्या आंग्ल

राजाच्या स्थलीं हॉलंडमधून वुअिल्यमलाच आपल्यावर राज्य करण्याकरितां पाचारण केलें. तशीच हॉलंडचीहि गोष्ट पहा. हॉलडचे लोक हे प्रादेशिक अेकता असूनसुद्धां आपल्या अितिहासांतील धार्मिक भागाच्या अभिमानानें प्रेरित झाल्यामुळें अेकजिनसी राष्ट्र ह्या नात्यानें ते अेक होअूं शकले नाहींत. तेथील कॅथॉलिक हॉलंडर हे आपल्या स्वतःच्याच प्रॉटेस्टंट असलेल्या वुअिल्यम ऑफ ऑरेंज ह्या राजाविरुद्ध स्पेनला मिळाले. ऑस्ट्रिया-हंगेरीचेंहि अुदाहरण घ्या. तेथील लोकांना प्रादेशिकरीत्या विभागणारी कोणतीच ठळक गोष्ट नव्हती. ते सर्वजण एकत्रित होअून त्यांचें अेक साम्राज्यच बनलेलें होतें, आणि अेकाच शासनाखालीं ते अेक स्वतंत्र राजकीय गट म्हणून कित्येक शतकें नांदलेहि; परंतु त्यांच्या अंतःकरणांतून त्यांना परस्परांकडे ओढणारे असे वांशिक, सांस्कृतिक, भाषिक वा औतिहासिक स्वरूपाचे कोणतेच आतबंध नव्हते. त्यायोगें अनुकूल संधि प्राप्त होतांच त्यांचें राष्ट्रीय नि राजकीय अैक्य तात्काळ फुटलेंच.

प्रादेशिक आकृतीप्रमाणें मारून मुटकून ज्या राष्ट्रांची मोट बांधण्यांत आली ती अुध्वस्त झाली असून पत्त्यांच्या घराप्रमाणें ढांसळली आहे. संस्कृति, वंश, परंपरा नि यांसारख्या अेकीकरणाच्या सामान्य बंधनांनीं बद्ध नसतां, आणि अर्थातच अेकराष्ट्ररूपानें संकलित राहण्याची सामान्य प्रेरणा अस्तित्वांत नसतां, केवळ प्रादेशिक राष्ट्रकल्पनेच्या भुसभुशीत नि लटपटीत वाळूच्या आधारावरा विभिन्न समाजांची खिचडीप्रमाणें राष्ट्रें बनविण्याचा अुद्योग करणाऱ्यांना, पोलंड नि झेकोस्लोव्हाकिया यांच्या अुदाहरणानें खडबडून सावध केलें आहे. हीं केवळ युद्धोत्तर संधीचे वेळीं निर्मिलेलीं राष्ट्रें त्यांना मिळालेल्या पहिल्याच संधीला फुटलीं. जर्मन अंश जर्मनीकडे गेला, तसेंच रशियन रशियाकडे, झेक झेकांकडे, नि पोल पोलांकडे गेले. सांस्कृतिक, भाषिक, वांशिक नि तत्सदृश बंधनें हीं प्रादेशिक बंधनांपेक्षां अधिक प्रभावी ठरलीं. युरोपमध्यें गेल्या--तीन चार शतकें तें ज्या राष्ट्रांमध्यें प्रादेशिक

अेकसंधीपणाचे जोडीला, किंवा तो नसतांहि वंश, भाषा, संस्कृति नि तत्सदृश अितर बंधनांची परिगति होअून अेकजीव होण्याची अिच्छाशक्ति निर्माण झाली, तींच राष्ट्रे गेल्या तीन-चार शतकांत आपलें स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्व नि एकजीवपणा सतत राखूं शकलीं. अुदाहरणार्थ—अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अिटली, पोर्तुगाल अित्यादि.

प्रादेशिक अेकतेमुळें राष्ट्र निर्माण होऊं शकत नाहीं. त्याला अेकराष्ट्र बनविण्याची अिच्छा तरी प्रबळ असावी लागते; किंवा धर्म, भाषा, देश, वंश, अितिहास अित्यादि गोष्टी असल्यास अेकराष्ट्रत्व निर्माण करूं शकतात. काँग्रेसनें जो राष्ट्रवाद पुरस्कारला त्यांत ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतली नाहीं. वस्तुस्थिति काय आहे हा खरा प्रश्न होता. मुसलमानांनीं आपला अलगपणा राजकीय दृष्ट्याहि कायम ठेवण्याचा प्रयत्न चालविला होता, आणि त्यामुळें अेकराष्ट्र ही कल्पना त्यांना मानवली नाहीं. हिंदु-मुस्लीम प्रश्नाच्या तीन बाजू होत्या. सांस्कृतिक, सामाजिक, आणि राजकीय. सांस्कृतिक दृष्ट्या मुसलमान हे अगदीं वेगळे पडत. त्यांनीं धर्म व संस्कृति या गोष्टी वेगळ्या असतात, संस्कृति ही कल्पना अधिक समावेशक असते हें आत्मसात् केलेलें नव्हतें. त्यामुळें मुसलमान सांस्कृतिक दृष्ट्या भारतीय होअूं शकले नाहींत. सामाजिक दृष्ट्या रोटीव्यवहार होत असला तरी बेटीव्यवहार संतोषानें झाला नाहीं. अुलट सामाजिक दृष्ट्या अेकत्रित होण्याची—अेकजीव होण्याची शक्यता असतांनाहि मुसलमानांच्या धर्मवेडामुळें ते अेकजीव होअूं शकले नाहींत. अर्थात् सगळे सामाजिक व्यवहार द्वेषाचे संघर्षाचे नव्हते हें खरें; पण त्यांत अेकजीवत्व नव्हतें हेंहि तितकेंच खरें! ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं या देशांत ख्रिस्तीकरणाचे प्रयत्न केले, त्यामुळें जे हिंदु विचारवन्त होते त्यांनीं हिंदूंच्या धार्मिक पुनरुज्जीवनाचे प्रयत्न चालविले. अितकेंच नव्हे तर राष्ट्रीय जागृतीसाठींहि गणपति अुत्सव, शिवाजी अुत्सव अित्यादि सामाजिक अुत्सव सुरू झाले. हिंदु हे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अितिहासाकडे—स्वतःच्या अुज्ज्वल अितिहासाकडे पाहात. मुसलमानांना ही दृष्टि आत्मसात् करणें अवघड

होतें. म्हणजे पाश्चात्यांच्या सामाजिक व राजकीय प्रभुत्वाविरुद्ध जो वैचारिक सामना दिला गेला, त्या वेळीं त्याचा मूलाधार बऱ्याच अंशीं हिंदुत्व हाच होता. त्यामुळें मुसलमान हे गेल्या शतकांतील सांस्कृतिक व सामाजिक चळवळींत हिंदूंशीं समरस होऊं शकले नाहींत. हिंदु पाश्चात्य विचारांची पकड बसल्यामुळें सुधारक बनत होते; स्वामी दयानंद, रानडे, आगरकर यांच्यासारख्यांनीं ही सुधारणेची प्रक्रिया घडवून आणली होती. मुसलमान मात्र पाश्चात्य विचारामुळें प्रगत होऊं शकले नाहींत.

हिंदूंच्या या पुरोगामी 'सामाजिक विचारावरोबरच वर चर्चिलेले प्रादेशिक राष्ट्रवाद, निधर्मी व प्रातिनिधिक लोकशाही, इत्यादि कल्पनांचें प्रभुत्व त्यांच्या राजकारणावर पडलें. पण मुसलमान राजकीय दृष्ट्याहि पुरोगामी होऊं शकले नाहींत. यासाठीं सावरकरांनीं असा सिद्धांत मांडला कीं, मुसलमान हे धर्मनिष्ठ असल्यामुळें, आणि निधर्मी लोकशाहीसारख्या आधुनिक कल्पना त्यांनीं आत्मसात् केलेल्या नसल्यामुळें, त्यांनीं हिंदी राष्ट्रवादाचा स्वीकार केला नाहीं. याचें विवेचन करतांना सावरकर म्हणतात—

"कांहीं प्रामाणिक परंतु भोळसर हिंदु अशा सुखाशेंत निमग्न आहेत कीं, हिंदुस्थानांतील मुसलमानांपैकीं बहुसंख्य वंश नि भाषा या दृष्टींनीं आपल्याशीं एकरूपच आहेत. कांहीं तर या पिढीचे स्मृतींतच मुस्लीम धर्म स्वीकारलेले असे आहेत. त्यांना हिंदूंशीं रक्तसंबंध नि एकजीवता मान्य करण्यास नि एका राष्ट्रीय जीवनांत संमीलित होण्यास प्रवृत्त करतां येईल. आम्हीं केवळ त्यांना या बंधनांची आठवण करून त्यांच्या आधारें त्यांना विनविलें कीं झालें. या दुधखुळ्या जीवांची वस्तुतः कींवच केली पाहिजे! जणुं काय, मुसलमानांना ही सर्व वस्तुस्थिति विदितच नाहीं!! पण सत्य गोष्ट अशी आहे कीं, मुसलमानांना हीं बंधनें पुरेपूर विदित आहेत पण लक्षांत घेण्यासारखा भेद इतकाच कीं, इकडे हिंदूहिंदूंना एकत्रित करणाऱ्या या बंधनांचा जिव्हाळा हिंदु मानतात नि अभिमान

बाळगतात, तर उलट मुसलमान लोक मात्र या बंधनांचा निर्देश करतांच त्यांचा तिरस्कार व्यक्त करतात ! आणि त्यांची स्मृतिदेखील आमूलाग्र नष्ट व्हावी असा यत्न त्यांनीं चालविला आहे. त्यांचे-पैकीं कांहीं काल्पनिक अितिहास नि वंशवृक्ष पुढें करून आपला अरब वा तुर्क यांच्याशीं संबंध दाखवितात.

मुसलमानांचा इतिहास, त्यांचें तत्त्वज्ञान, व त्यांची राजकीय मनःप्रवृत्ति यांविषयीं सामान्यतः पूर्णपणें अज्ञानी असलेल्या काँग्रेस-वाल्यांनीं जे प्रादेशिक राष्ट्रत्व कल्पिलें आहे त्याच्याविषयीं मुसलमान स्वभावतःच उदासीन असणें येथें मागें–मागें निर्देशिलेल्या कारणां-करितां माझ्या मतें अगदीं मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. तुम्ही निदान पुढील गोष्टी लक्षांत ठेवाल तर हिंदी मुसलमानांची ही विरोधी वृत्ति तुम्हाला दुर्भिणींतून पाहिल्याप्रमाणें खऱ्या खऱ्या स्वरूपांत स्पष्ट दिसूं शकेल. —

(अ) अतिरेकी धर्मनिष्ठा नि राज्याविषयींची देवभोळी कल्पना यांना सोडण्याअितकी सामान्यतः सर्वच–आणि विशेषेंकरून हिंदी मुसलमानांची अद्यापि वाढ झालेली नाहीं. (आ) त्यांचें धार्मिक तत्त्वज्ञान आणि कुराणनिष्ठ राजकारण यांच्या योगानें मानवी जगाचे दोनच भाग पडतात. अेक मुसलमानांची भूमि, आणि दुसरी शत्रूंची भूमि. मुसलमानांनीं पूर्णपणें वसलेले किंवा मुसलमानांकडून शासिले जाणारे असे सर्व प्रदेश ही मुसलमानी भूमि होय. ज्यांत मुसलमानेतरांनीं वसलेले, अथवा मुसलमानेतर सत्तेकडून शासिले जाणारे असे सर्व प्रदेश ही शत्रूंची भूमि असून, कोणत्याहि निष्ठावन्त मुसलमानानें ह्या भूमीविषयीं कोणत्याहि प्रकारची निष्ठा ठेवितां कामा नये. अितकेंच नव्हे तर आपल्या शक्तीप्रमाणें त्यानें युक्तीनें, बलात्कारानें, वा लबाडीनें-वाटेल तें करून तेथील मुसलमानेतरांना मुसलमान धर्मांत आणण्याविषयीं, आणि अेखाद्या मुसलमानी राष्ट्रा-कडून त्या प्रदेशावर राजकीय स्वारी आणवून तो जिंकण्याविषयीं

आव्हानच केलेलें आहे. सर्व मुसलमानी अितिहास आणि त्यांचीं नित्याचीं कृत्यें हीं यानुसारच घडलेलीं आहेत. (अि) सर्व मुसलमानेतरांत हिंदु हेच मुसलमानी तत्त्वज्ञान्यांनीं सर्वांत धिक्काराई मानले अहेत. हिंदुस्थानावर जोंपर्यंत मुसलमानांचें राज्य चालू झालेलें नाहीं, आणि सर्व हिंदूंनीं अिस्लामला कवटाळलेलें नाहीं, तोंवर प्रामुख्यानेंही शत्रुभूमीच होय. अद्यापहि या वेडया धर्मनिष्ठेंतच वावरत असणाऱ्या हिंदी मुसलमानांची हीच धार्मिक मनोवृत्ति आहे. (अी) हिंदूंच्या अुदयाची नि राजकीय आकांक्षांची ब्रिटिशांना भीति वाटत असल्यामुळें, हिंदूंच्या विरुद्ध आपली फळी बळकट करण्याला त्यांच्याकडून फार काळपर्यंत प्रत्येक सवलत नि प्रत्येक प्रकारचें साहाय्य निश्चितपणें मिळत राहणार हें मुसलमानांना चांगलें माहीत आहे. (अे) हिंदुमुस्लीम अैक्य घडवून आणण्याच्या खुळचट नादाच्या मागें लागलेले काँग्रेसनिष्ठ हिंदु हे मुसलमानांचें विशिष्ट नि प्रमाणबाह्य प्रतिनीधित्व अित्यादि संबंधांतल्या आणि मुख्यतः आपल्याला सध्यां टोंचत असलेल्या हिंदुसंघटनेच्या चळवळीला दडपून टाकण्याविषयींच्या आपल्या धमकावण्याचें पाठबळ असलेल्या आपल्या मागण्यांना निश्चित वश होतील हेंसुद्धा त्यांना पुरतें ठाअूक आहे !"

मुसलमानांच्यासंबंधीं सावरकरांनीं मांडलेलीं हीं मतें द्वेषी वृत्तींतून निघालेलीं नाहींत. त्याला अितिहास आणि समाजशास्त्र यांचा आधार आहे. त्या सर्वांचें विवेचन येथें शक्य नाहीं. पण जगांतील मुसलमान जमातींचा किंवा राष्ट्रांचा अितिहास पाहिला, तर सावरकरांनीं वर सांगितलेली मागासलेली मनोवृत्तीच सर्वत्र आढळेल. मुसलमानांच्यासंबंधीं लिहिताना फ्रेडरिक हर्टझनें आपल्या राष्ट्रवादावरील पुस्तकांत पुढील विधानें केलीं आहेत.* मुस्लीम धर्म व राष्ट्रवाद यांचा अन्योन्यसंबंध वर्णन करतांना तो ग्रंथलेखक म्हणतो.—

* Nationality in History and Politics – by Hertz. Pages 140—143.

"ज्या कारणांमुळें ख्रिस्ती युरोपमध्यें राष्ट्रीयतेची पार्श्वभूमि निर्माण झाली, तींच कारणें अिस्लामी धर्म, संस्कृति व राजकारण यांच्यांतहि होतीं. पण ते मध्ययुगापेक्षां अधिक प्रगति करूं शकले नाहींत. आपल्या धर्मावर विश्वास ठेवणारे हे बंधु आहेत, या भूमिकेवरून मुस्लीम समाजांत बंधुत्वाची भावना निर्माण झाली आहे. पण ते लिंगभेदहि नाहींसे करूं शकले नाहींत. मुसलमानी गुलामहि निर्माण झाले. महंमदानें सर्व मानवांवर प्रेम करा हें सांगितलें नाहीं. त्यामुळें त्याची शिकवण हा अुत्साही योद्धयांचा ध्येयवाद झाला. मुसलमानांनीं कुराणालाच सामाजिक निर्बंध मानल्यामुळें ते समान राष्ट्रवादाची कल्पना आत्मसात् करूं शकले नाहींत. अरबांनीं थोडीफार ही कल्पना अुचलून धरली, पण अितर सर्व मुसलमान राष्ट्रांनीं धर्मावरच अधिष्ठित असलेलीं राष्ट्रें निर्माण केलीं. तुर्कीनीं इस्लामी राज्याची कल्पना धुडकावून लावलेली आढळते."

याखेरीज आणखी विवेचन पहावयाचें असेल तर प्रा. शूस्तरी यांनीं आपल्या मुस्लीम संस्कृतीवरील ग्रंथांत हें स्पष्ट केलें आहे कीं, मुसलमानांत परकीय जमातींशीं अेकात्म पावण्याची कला नसल्यानें ते राष्ट्रवादाच्या आधुनिक कल्पना आत्मसात् करूं शकले नाहींत. स्पेनचें अुदाहरण या ठिकाणीं देतां येअील.* त्यांनीं जेव्हां स्पेन जिंकला त्या वेळीं राष्ट्रीय सरकार स्थापणें त्यांना जमलें नाहीं. ते स्वतःला तेथील बादशहा समजूं लागले, आणि स्पॅनिश लोक हे परकीय झाले. मुस्लीमांनीं स्पेनमध्यें ७०० वर्षें राज्य करूनहि तें केवळ सैनिकी राज्यच झालें. कारण राजा व प्रजा यांच्यांतील अंतर कायम राहिलें. अेकच्च राजकीय जमात निर्माण करणें त्यांना जमलें नाहीं, म्हणूनच त्यांचा अधःपात झाला. केवळ राजकीय-दृष्टया पुरोगामी असलेलीं तत्त्वें मुसलमान आत्मसात् करूं शकलें नाहींत अेवढेंच नाहीं, तर त्यांच्या धर्मग्रंथांच्या दोन पुठ्ठयांत जें नाहीं तें सगळें

* See Pakistan Examined Razaul Karim.

त्याज्य,—ही त्यांची भूमिका असल्यामुळें ब्रिटिशांच्या राजवटींत हिंदु जितकी सुधारणा करूं शकले तितकी मुसलमानांना करतां आली नाहीं. तुर्कस्थाननें ज्या वेळीं 'शरीयत'ला तिलांजलि दिली त्या वेळीं त्याची प्रगति झाली, अरब्हीं नाहीं. अगदीं अलीकडचें उदाहरण पाकिस्तानचें देतां येअील. तेथेंहि हिंदूंना आत्मसात् करण्याची किंवा नागरिक म्हणून राहूं देण्याची बुद्धि होअूं शकली नाहीं. पाकिस्तान हें अिस्लामी राज्य असावें, अिस्लामी राष्ट्रांचा अेक गट असावा अित्यादि कल्पना—आमच्या देशांत निधर्मी राज्याचा अुद्घोष चालू असतांना—पाकिस्तानचे पुढारी मनांत बाळगतात हें त्यांच्या मागासलेल्या व जुनाट विचारांचें लक्षण आहे. एवंच, मुसलमानी धर्माची पकड मुसलमान समाजावर अितकी आहे कीं, तीच त्यांच्या पुरोगामित्वाआड येणारी धोंड आहे असें म्हटलें तर चुकणार नाहीं. हिंदी राष्ट्रवादी लोकांनीं मुसलमानांना या दृष्टीनें शिक्षण देण्याचा वा हिंदी राष्ट्रवाद पटवून देण्याचा प्रयत्न कधींच केला नाहीं. सर्व धर्म अेक आहेत, अल्ला आणि राम अेक आहेत या कल्पना गांधीजी मांडत, त्याचा परिणाम मुसलमानांच्यावर होणें शक्यच नव्हतें. कारण मुसलमान-धर्माच्या विरुद्ध तें आहे, अशी सामान्य मुस्लीमांची समजूत होण्याची शक्यता अधिक. धार्मिक विचारसरणी हेंच गांधीवादाचें अधिष्ठान होतें. मुसलमानांना निधर्मी व सहिष्णु वृत्तीचें बनविणें हें लोकशिक्षणानें शक्य होतें. पण हिंदी राष्ट्रवाद्यांनीं या मार्गाचा अवलंब न करतां, राजकीय लांचखाजीच्या घातुक व निसरड्या रस्त्यावर पाअूल ठेवलें.

राजकीय वैफल्य आणि अलगपणा

भारतांतील राजकीय परिस्थितीचें लक्षपूर्वक समीक्षण करण्याच्याला हिंदी राष्ट्रवादाला कोणतें आव्हान दिलेलें होतें हें या विवेचनावरून लक्षांत येअील. पहिली गोष्ट या ठिकाणीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं, केवळ आर्थिक नि राजकीय स्वरूपाच्या बंधनामुळें विभिन्न समाज अेकत्र राहूं शकत नाहींत. असें अैक्य गृहीत धरणें म्हणजे मनुष्याचा आर्थिक व राजकीय दृष्ट्याच विचार करणें आहे. भारतांत मुसलमानांच्या सहकार्यानें भारतीय राष्ट्रवाद

कां यशस्वी झाला नाहीं याला वर दिलेलीं तीन कारणें आहेत. पहिलें कारण, मुसलमान व हिंदु हे सामाजिक–सांस्कृतिक दृष्ट्या अेकंजीव झालेले नव्हते. दुसरें, त्यांचा धर्म हा कम्युनिस्टांप्रमाणेंच जगाचे दोन भाग कल्पिणारा असल्यामुळें, आणि मुसलमान हे अत्यंत धर्मश्रद्ध असल्यामुळें ते हिंदी राष्ट्रवादासारखी आधुनिक कल्पना आत्मसात करूं शकले नाहींत. तिसरें, काँग्रेसच्या नेत्यांनीं हें सामाजिक अैक्य घडवून आणण्यासाठीं प्रयत्न करण्याअेवजीं राजकीय पातळीवरूनच हिंदु-मुस्लीम प्रश्नांचा विचार केला.या सर्वांमुळें मुसलमान समाजांत अेक प्रकारचा अलगपणा निर्माण झाला. आपलें हित व भारताचें हित हीं वेगळीं आहेत, त्यांचा समन्वय कधीं होअूंच शकणार नाहीं अशी त्यांची दृढ समजूत होत गेली. आणि आपण मागें चर्चिल्याप्रमाणें समानहितत्व हाच अेकराष्ट्रीयत्वाचा पाया आहे. ज्या वेळेस भिन्न भिन्न समाज नांदत असलेल्या अेखाद्या राष्ट्रांत त्या हिताची विभिन्नता निर्माण होते, त्या वेळीं अेकमेकांविषयीं अविश्वास निर्माण होतो. हा अविश्वास निर्माण झाला कीं मग अेकराष्ट्रत्व अशक्य होअून बसतें. मेगा पडलेली जमीन जशी सांधतां येत नाहीं–तसें होतें.

हा राजकीय अविश्वास दोन-तीन कारणांमुळें मुसलमानांत निर्माण झाला. पहिलें म्हणजे, ब्रिटिशांनीं आपली राजवट पक्की करण्यासाठीं प्रातिनिधिक लोकशाहीच्या नांवावर मुस्लीम जातीयतेला फूस लावली. त्याला मुसलमान पुढारी राज्यलालसेनें बळी पडले. हिंदु व मुसलमान यांच्यांत सामाजिक व सांस्कृतिक अैक्य निर्माण होण्याची शक्यता त्यामुळें दुरावली; व आपली राज्यलालसा भागविण्यासाठीं सुशिक्षित मुसलमानांनींहि अशिक्षित समाजाला धर्माच्या नांवावर फसविण्याचा प्रयत्न केला. दुसरें कारण, मुसलमान व हिंदु यांचें नातें राजकीय दृष्ट्या ५००-६०० वर्षें संघर्षाचेंच होतें. त्यामुळें संयुक्त स्वरूपाच्या हिंदी राज्यांतहि हिंदूंना लोकसंख्येच्या प्रमाणामुळेंच राक्षसी बहुमत लाभेल, आणि मुसलमानांना जरी विकासाचे मूलभूत अधिकार मिळाले तरी प्रभुत्व मिळणार नाहीं. आणि राजकीय प्रभुत्व मिळणार नसेल तर तो हिंदी राष्ट्रवाद काय करावयाचा-असे विचार निर्माण होअूं लागले. मुसलमानांनीं ज्या पद्धतीनें आपल्या

मागण्यांचा विकास केला तें पाहिलें म्हणजे या विधानाची सत्यता पटेल. लखनौ करार हा हिंदु-मुस्लीमांच्या राजकीय ऐक्याचा पहिला प्रयत्न समजला जातो. त्या करारानंतर * मौलाना अबुलकलम आझादांसारख्यांनीं काय विचार प्रकट केले होते तें पाहण्यासारखें आहे. लखनौ करारानें मुसलमानांनीं आपले हितसंबंध विकले आहेत असें ते म्हणाले.

लखनौ करारांत मुसलमानांचे अधिकार मान्य करण्यांत आले असले तरी संमिश्र राजकीय घटक निर्माण करण्यांत आले होते. पण मुस्लीम नेत्यांनीं मुसलमान प्रांत व हिंदु प्रांत अशी दृष्टि डोळ्यापुढें ठेवली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावरून राजकीय ऐक्य करण्याअेवजीं स्वतःचा वेगळेपणा कसा सिद्ध करतां येअील, किंवा स्पष्ट करतां येअील याचाच विचार मुस्लीम नेते करीत. कारण अेकराष्ट्रत्वाला सुरुंग लावण्याचा अुत्कृष्ट अुपाय म्हणजे—आम्ही अेकत्र राहूं शकत नाहीं अशी भावना निर्माण करीत राहणें, व त्यांतूनहि कदाचित् ब्रिटिशांनीं अेकच घटना लादण्याचें ठरविलेंच तर ती आपल्या फुटीर वृत्तीला अधिकाधिक जवळची कशी होअील याचे प्रयत्न करणें.† या दृष्टीनें मुस्लीमांच्या मागण्यांकडे पाहिलें म्हणजे आपणांला

---

*"Maulana Abul Kalam Azad declared that by the Lucknow Pact they have sold their interests. The Delhi proposals of last March opened the door for the first time to the recognition of the real rights of the Mussulmans in India..... Their existing small majority in Bengal and the Punjab was only a census figure, but the Delhi proposals gave them for the first time five provinces which no less than three (Sind, The Frontier Province and Baluchistan) continued a real overwhelming Muslim majority".

—Indian Annual Register, 1927,
II—P. 449.

† प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं 'फेडरेटिंग इंडिया' या पुस्तकांत या विधेयाचें ६ व्या प्रकरणांत अुत्कृष्ट विवेचन केलें आहे.

कळून येअील कीं, विभक्त मतदान, विभक्त मतदारसंघ, जादा प्रतिनिधित्व (वेटेज), प्रांतीय दृष्ट्या मुस्लीम बहुसंख्या घडाविण्याचे प्रयत्न, मुस्लीम बहुसंख्य प्रांतांना स्वयंनिर्णय, केंद्रीय सरकार दुर्बल करण्याचे नाना उपाय, सैन्यांतील मुस्लीमांचें प्रमाण,—ह्या सर्व गोष्टी अगदीं योजनाबद्ध रीतीनें घडवून आणण्यांत आल्या. म्हणजे हिंदूंपेक्षां सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या आम्ही वेगळे आहोंत,—ही मुसलमानांची तात्त्विक पार्श्वभूमि, आणि राजकीय व्यवहार हा ब्रिटिश व कॉंग्रेस यांच्या साहाय्यानें घटनात्मक दृष्ट्या विघटना करण्याचा,—आणि या दोन्ही गोष्टींच्या जोडीला दहशत निर्माण करण्यासाठीं दंग्यांचें तंत्र. डॉ. आंबेडकरांनीं मुसलमानांच्या या राजकीय साधनांना दरोडेखोरांची पद्धति (gangster's methods) असें संबोधलें आहे, तें किती यथार्थ आहे हें यावरून कळून येण्यासारखें आहे.

सावरकरांनीं—भारतीय मुसलमानांनीं जें 'राजकारण' चालविलें होतें त्याचें निर्भीड समीक्षण करून, हिंदुसभेच्या अध्यक्षपदावरून १९३७ पासून धोक्याचे अिषारे दिले, व मुसलमानांसंबंधीं आपलें धोरण काय असावें हें स्पष्ट केलें. हें स्पष्टीकरण 'जातीय' दृष्टीनें केलेलें नव्हतें. हिंदुत्वाचा लाभ अधिक व्हावा म्हणूनहि केलेलें नव्हतें. पण भारताचें अखंडत्व व स्वत्व टिकून स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न व्हावे ही त्यामागची अिच्छा होती. सावरकरांनीं १९३७ च्या अहमदाबादच्या भाषणांत मुस्लीमविषयक धोरण स्पष्ट करतांना सांगितलें कीं—

"But with the Mohammedans the case is quite different. I warn the Hindus that the Mohammedans are likely to prove dangerous to our Hindu Nation and the existence of a common Indian State even if and when England goes out. Let us not be stone blind to the fact that they as a community still continue to cherish fanatical designs to establish a Moslem rule in India. Let us work for harmony, let us hope for the best, but let us be on our guard!

Two Antagonistic Nations living in India side by side

As it is, there are two antagonistic nations living side by side in India several infantile politicians commit the serious mistake in supposing that India is already welded into a harmonious nation, or that it could be welded thus for the mere wish to do so. These our well-meaning but unthinking friends take their dreams for realities. That is why they are impatient of communal tangles and attribute them to communal organizations. But the solid fact is that the so-called communal questions are but a legacy handed down to us by centuries of a cultural, religious and national antagonism between the Hindus and the Moslems. When time is ripe you can solve them; but you cannot suppress them by merely refusing recognition of them. It is safer to diagnose and treat deep-seated disease than to ignore it. Let us bravely face unpleasant facts as they are. India cannot be assumed today to be a unitarian and homogeneous nation, but on the contrary there are two nations in the main: the Hindus and the Moslems, in India. And as it has happened in many a country under similar situation in the world the utmost that we can do under the circumstances is to form an Indian State in which none is allowed any special weightage or representation and none is paid an extra-price to buy his loyalty to the State. Mercenaries are paid and bought off, not sons of the Motherland to fight in her defence. The Hindus as a nation are willing to discharge their duty to a common Indian State on equal footing. But if our Moslem countrymen thrust on a communal strife on the Hindus and cherish anti-Indian and extra territorial designs of establishing a Mohammedan Rule or supremacy in India then let the Hindus look to themselves and stand on their own legs, and fight single-handed as best as they can for the liberation of India from any non-Hindu yoke, be it English or Moslem or otherwise."

" हिंदुस्थान हें विसंवादरहित राष्ट्र आहे असें आज तरी मानतां येत नाहीं. तर अुलट, हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान अशीं दोन राष्ट्रें विद्यमान आहेत; आणि अशाच परिस्थितींत जगांतील अनेक देशांत जें घडून आलें आहे त्यास अनुसरून प्रस्तुत काळीं आपण अधिकांत अधिक जें काय करूं शकूं,—म्हणजे कांहीं विशेष मताधिक्य किंवा विशेष प्रतिनिधित्व मिळणार नाहीं, आणि कोणालाहि वाजवीहून अधिक मोल देअून आपली राज्यनिष्ठा विकत घ्यावी लागणार नाहीं असें हिंदी राष्ट्र बनविणें हींच होय. मातृभूच्या रक्षणार्थ लढण्याकरितां भाडोत्री बाजारबुणगीं मोलानें विकत घेतलीं जातात—तिचे पुत्र नव्हत ! हिंदु हे—अेक 'राष्ट्र' या नात्यानें समान भूमिकेवरून हिंदी राष्ट्राविषयींचें आपलें कर्तव्य बजाविण्यास सिद्ध आहेत. "

सावरकरांच्या या भाषणामुळें खूप वादळ अुठलें होतें. सावरकरांनीं द्विराष्ट्रवाद मांडला असें सर्वजण म्हणूं लागले. पण असें म्हणण्याखेरीज त्यांचें म्हणणें खोटें व चुकीचें कां आहे याचें स्पष्टीकरण करण्याचें कोणीहि धाडस केलें नाहीं. सावरकरांनीं आपल्या राष्ट्रवादी विचारांचें यापेक्षां अधिक स्पष्ट व विवेचक रीतीनें डॉ. आंबेडकरांप्रमाणें जर प्रतिपादन केलें असतें तर त्यांचीं विधानें खोडून काढणें अशक्य झालें असतें.

सावरकरांच्या राष्ट्रवादावरील विचारांत तीन भाग पडतात. त्यांचें हिंदी राष्ट्रवादावरील आक्षेपांचें स्वरूप कोणतें आहे हें आपण पाहिलें. आतां त्यांची हिंदुत्वाची व्याख्या व त्यावर आधारलेली हिंदु राष्ट्राची त्यांची कल्पना—यांचा विचार करून, त्यांच्या या कल्पनेशीं त्यांच्या दृष्टीनेंच 'हिंदी राष्ट्रवाद' हा अेक अुज्जल ध्येयवाद म्हणून कसा विसंगत नाहीं हें पहावयाचें आहे. हें त्यांच्या राष्ट्रवादाचें मूलभूत स्वरूप पाहिल्यावरच आपणांला सावरकरांच्या राष्ट्रवादावर जे वेगवेगळे आक्षेप घेतले गेले त्यांचा विचार करतां येअील. सावरकरांच्या राजकारणाचें समीक्षण पुढील प्रकरणांत येणार असल्यानें येथें फक्त त्यांच्यावर केल्या गेलेल्या तात्त्विक आक्षेपांचा विचार करावयाचा आहे.

सावरकरांचें 'हिंदुत्व'

'हिंदु म्हणजे काय' हा प्रश्न अनेक वेळां अुपस्थित झाला आहे. त्याची व्याख्या करण्याचेहि अनेक प्रयत्न झाले. प्रत्येक व्याख्या ही तर्कशास्त्राच्या तंत्रांत बसत नसे. वैदिक धर्म मानणारा तो हिंदु असें म्हटलें तर अवैदिक अहिंदु ठरतात; हिंसेनें दुःख होतें तो हिंदु असें म्हटलें तर हिंसेवर विश्वास ठेवणारे हिंदु ठरत नाहींत; अध्यात्म मानणारा तो हिंदु असें म्हटलें कीं अध्यात्मवाद न मानणारे त्यांतून गळतात;—तेव्हां हिंदुत्वाची व्याख्या हा अेक कूट प्रश्न होअून राहिला होता. हिंदु धर्मांत अनेक पंथ असल्यामुळें त्या धर्माची व्याख्या जशी कठीण झाली तशीच हिंदु समाजाची विकसनाची पद्धति अनेक जातींचें सांस्कृतिक अैक्य घडवून आणण्याची असल्यामुळें त्याची व्याख्या करणें कठीण होअून बसलें आहे. पण तरीहि हिंदु शब्दाला अर्थ आहे. अेखाद्या शब्दाचा,-नि तो शब्द ज्या वस्तूला लावला जातो त्याचा—सहवास वाढत जातो तसतसा तो शब्द ही अेक जीवमान् कल्पना होअूं लागते; आणि तो शब्द अुच्चारतांच ती कल्पना पुढें येते. जसें अेखादी महान् व्यक्ति गेली तरी तिचे गुण लक्षांत येतात,—बुद्ध गेला तरी बुद्ध म्हटला कीं अेक गुणसमुच्चय डोळ्यापुढें येतो,—तसेंच हिंदु या शब्दाचें आहे. हें या शब्दाचें महत्त्व पटवून देण्यासाठीं सावरकरांनीं 'हिंदुत्व' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या अनेक वर्षांच्या विचारमंथनांतून निघालेलें तें रत्न आहे.

हिंदुत्व व हिंदु धर्म

हिंदुत्व या शब्दांत भारतीय अितिहासाच्या ४० शतकांतील सामाजिक, राजकीय, धार्मिक आंदोलनांचा अितिहास सामावलेला आहे! हिंदुत्व हा शब्द नसून तो अितिहासच आहे. आपल्या समाजाच्या अनेक क्षेत्रांतील क्रिया आणि प्रक्रियांचा समावेश त्या शब्दांत झालेला आहे. हिंदुत्व म्हणजे केवळ धर्ममत नव्हे, अध्यात्मशास्त्र नव्हे. हिंदु धर्म हा अेक हिंदुत्वाचा भाग आहे. धर्म (हिंदुइझम) या शब्दांत तत्त्वज्ञानाचें व विशिष्ट आचारधर्माचें स्वरूप अनुस्यूत

आहे. पण हिंदु धर्म व हिंदुत्व यांत मूलभूत फरक आहे. हिंदु शब्दाचा संबंध आरंभापासून हिंदु धर्माशींच जोडला जाऊन हिंदुत्वाची व्याख्या न करतां हिंदु धर्माची व्याख्या आम्ही करूं लागलों. हिंदुत्वाची सर्वांगीण व्याख्या राष्ट्रीय नि सांस्कृतिक न करतां, त्याच्या त्या मुख्य अंगाकडे दुर्लक्ष होऊन, त्याची धार्मिक व्याख्याच जो तो करूं लागला. आणि हिंदु समाजांतील बहुसंख्य लोक अद्यापदेखील वेदानुयायी असल्यामुळें, ती व्याख्या साहजिकपणें वेदानुयायी तो हिंदु अशी करण्यांत आली. अितकेंच नव्हे तर बहुजनसमाजांत मूर्तिपूजा, शेंडी राखणें, गोपूजन अित्यादि हिंदूंचे जे अनेक आचार आहेत त्यांतून ज्याला जें पटेल तेंच हिंदु धर्माचें वैशिष्ट्य असें समजून,– तें मानील तो हिंदु, अशा अनेकांच्या व्याख्या पुढें आल्या. पण तो धर्मग्रंथ, धर्मपंथ, धर्ममत न मानणारे,– पण हिंदु राष्ट्राचे पूर्वापार अंगभूत असणारे अनेक भाग त्या व्याख्येमुळेंच हिंदुत्वाबाहेर पडूं लागले! हिंदुत्व हें मुळांत हिंदूंमध्यें प्रचलित असलेल्या कोणत्याहि धर्ममतांहून व्यापकतर असल्यामुळें. त्याला बहुसंख्यांकांच्या धर्ममताशीं समानार्थक समजतांच अल्पसंख्यांकांना तो हिंदु शब्द अप्रिय व अनिष्ट वाटूं लागला! शीख, जैन, बौद्ध, आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, देवसमाज प्रभृति अनेकानेक धर्म वा पंथ मधूनमधून हिंदु शब्दास जे नाकारून अुठले त्याचें मुख्य कारण हेंच होतें कीं, हिंदुत्वाची व्याख्या धार्मिक दृष्टिकोणांतूनच काय ती घडविण्याची दिशाभूल झाली. दिशाभूल न कळत झाली, अिच्छेविरुद्ध दुष्परिणाम झाला.

हिंदु शब्दाचें पुरातनत्व

सावरकरांनीं हिंदुत्वाची व्याख्या पहाण्यापूर्वी त्यांनीं हिंदु हा शब्द पुरातन आहे, तो परकीयांनीं दिलेला नाहीं – हें जुने आधार देअून सिद्ध केलें आहे. सावरकरांची अुपपत्ति अशी –

"हिंदु, हिंदुस्थान, हिंद—या प्राकृत शब्दांचा मूळ अुगम ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या आपल्या स्वतःच्या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेंतच आहे. ऋग्वेदांत 'सप्तसिंधवः' हा शब्द दैशिक नि राष्ट्रीय अर्थी आपल्या वैदिक कालच्या पूर्वजांनीं स्वतःची राष्ट्रीय अभिधा म्हणून स्वतःस लावला आहे. त्या काळचीं आपल्या शेजारचीं इराण, बाबिलोन, प्राचीन अरबप्रभृति राष्ट्रें आपणांस त्या आपल्या 'सप्तसिंधु' या राष्ट्रीय अभिधेनेंच ओळखीत. पारसिकांनीं अडीच हजार वर्षांपूर्वीच्या त्यांच्या धर्मग्रंथांत आपल्या राष्ट्रास 'हप्त हिंदु' असेंच म्हटलेलें आहे. त्या काळच्या प्राचीन बाबिलोनिअन ग्रंथांतून आपल्या अिकडून गेलेल्या झिरझिरीत नि सुरेख वस्त्रांना 'सिंधु' किंवा 'सिन्ध'च म्हटलेलें आहे. बौद्धकाळीं हिंदुस्थानांत येअून गेलेला चिनी प्रवासी ह्युअेन्त्संग हाहि आपल्या राष्ट्रास सिंध या शब्दाचा अपभ्रंश जो 'शिंदु' त्याच अभिधेनें संबोधता झाला. दोन हजार वर्षांपूर्वीच्या अेका अरब ग्रंथांत आपल्या राष्ट्राविषयीं बोलतांना हिंद व हिंदु हीं नांवें गौरवानें अुच्चारिलीं आहेत.

येणेंप्रमाणें सिंधुकांठीं निवसणाऱ्या आपल्या वैदिक काळच्या राष्ट्राची आपली स्वतःची जी अभिधा 'सप्तसिंधु'— तीपासूनच आपली हप्तहिंदु, हिंदु, शिंदु, सिंधु, Indus—हीं प्राचीन विशेष नांवें पडलीं आहेत.

पुराणाचे आधार

सप्तहिंदूपासूनच वरील प्राकृत रूपें आलेलीं आहेत, ही गोष्ट आपल्या पुरातन पंडितवर्गालाहि ठाअूक होती. ह्याविषयीं भविष्य-पुराणांतील खालील अुल्लेख जितके कौतुकावह तितकेच अुद्बोधक आहेत—

जानुस्थाने जैनुशब्दः सप्तसिंधुस्तथैव च ॥
हप्तहिंदुर्यावनीति पुनर्ज्ञेया गुरुण्डिका ॥

'हिंदु' हें नवें रूप

सप्तसिंध, सिंधुदेश, सिंधुस्थान प्रभृति शब्दांचें 'हिंदु' हें प्राकृत रूपहि आपल्याच प्राकृतीकरणाच्या नियमानुसार आपल्या प्राकृतांत रूढावलें.—संस्कृत राष्ट्रांतील 'स'चा आपल्या प्राकृतांत विकल्प 'ह' होतो. मारवाडी प्रभृति बोलींत यांचीं भरपूर उदाहरणें आहेत. उदा. केसरी = केहरी, सप्ताह = हप्ता, दश = दहा, सत्तर = हत्तर. आपल्या प्राकृताप्रमाणें पुरातन पारसी हीहि संस्कृताचीच अेक प्राकृत भाषा असल्यामुळें अनेक रूपें आपल्याप्रमाणें तींतहि साधलेलीं सांपडतात. अेवढ्यानें तीं रूपें तिकडून आलीं असें होत नाहीं किंवा तेवढ्याचमुळें परकीय ठरत नाहींत. हिंदीमधील आज जी अगदीं चांदभाटापूर्वीची जुन्यांतील जुनी कविता समजली जाते, तींतसुद्धां हिंदुस्थान हा शब्द गौरवानें वापरलेला आहे. त्यानंतरच्या काळांत प्रासादापासून पर्णकुटीपर्यंत 'मी हिंदु' ही जाणीव रसरसूं लागली. हिंदु शब्दाच्या या अितिहासावरून हें स्पष्ट होतें कीं, हिंदु शब्द हा मूलतः नि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीय आहे. कोणत्याहि धर्ममताचाच काय तो निदर्शक नव्हे. हिंदु हें नांव कोणत्याहि धर्मग्रंथावरून, धर्मसंस्थापकावरून, वा धर्ममतावरून मुख्यतः वा मूलतः निघालें नसून आसिंधुसिंधु विस्तारलेल्या देशास नि त्यास निवसणाऱ्या राष्ट्रासच मुख्यतः निर्देशिणारें आहे; आणि अनुषंगानें त्याच्या धर्मसंस्कृतींनाहि. हिंदु शब्दाच्या व्याख्येचा मूल अैतिहासिक पाया आसिंधुसिंधु भारत भूमिका हीच असली पाहिजे. तो देश, नि त्यांत निपजलेल्या धर्मांच्या नि संस्कृतींच्या बंधनांनीं अनुप्राणित झालेलें राष्ट्र हेच हिंदुत्वाचे दोन प्रमुख घटक होत. म्हणूनच हिंदुत्वाची अितिहासाला शक्य तों धरून असलेली व्याख्या अशीच केली पाहिजे कीं—

आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव सवै 'हिंदुरिति' स्मृतः ॥

(आसिंधुसिंधु भारत देश ही ज्याची पितृभूमि, नि पुण्यभू आहे तो हिंदु.)

यांतील पितृभू नि पुण्यभू या शब्दांचा कोणत्याहि व्याख्येंत योज़लेल्या शब्दांना असतो तसा, थोडासा पारिभाषिक अर्थ आहे. पितृभू म्हणजे जींत आपले आर्आबाप तेवढेच निपजले ती, असा अर्थ नव्हे; तर प्राचीन कालापासून ज्या भूमींत परंपरेनें आपले जातीय नि राष्ट्रीय पूर्वज निवसत आले ती, असा अर्थ आहे. आमच्या हिंदूंनीं साऱ्या पृथ्वीवर जरी अद्यां वसाहती स्थापल्या तरी त्यांच्या प्राचीन व परंपरागत, जातीय नि राष्ट्रीय पूर्वजांची पितृभू अशी ही भारतभूमीच असणार! पुण्यभूचा अर्थ अंग्लिश Holy Land ह्या शब्दांतील अर्थ होय. ज्या भूमींत अेखाद्या धर्माचा संस्थापक ऋषि, अवतार वा प्रेषित (पैगंबर) प्रकटला, त्या धर्मास अुपदेशिता झाला, त्याच्या निवासानें त्या भूमीस धर्मक्षेत्राचें पुण्यत्व आलें, ती त्या धर्माची पुण्यभू अशा अर्थींच हा पुण्यभू शब्द वापरलेला आहे, नुसत्या पवित्र भूमि या अर्थीं नव्हे."

हिंदुत्वाची ही व्याख्या जितकी ऐतिहासिक तितकीच आजच्या वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे. ती जितकी सत्य तितकीच अिष्ट आहे, जितकी व्यापक तितकीच व्यावर्तकहि आहे. या व्याख्यांप्रमाणें वैदिक, जैन, शीख, आर्यसमाजी, भारतीय बौद्ध हे सर्व पंथ हिंदूच ठरतात. पण मुसलमान—खिस्ती—ज्यू यांच्यापैकीं कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमि ही भारतभूमिच असली, तथापि त्यांचे धर्म अरबस्थान, पालेस्टाइन प्रभृति भारत बाह्य देशांत अुपजल्यामुळें, ते त्या भारतबाह्य देशांनाच आपली Holy Land (पुण्यभू) मानणार. ही भूमि त्यांची पुण्यभू नाहीं म्हणून ते हिंदु नाहींत. तसेंच चिनी, जपानी; सयामी प्रभृतीहि धर्मानें जरी हिंदु (बौद्ध) असले, म्हणजे भारतभूमि ही जरी त्यांची पुण्यभू असली तरी भारत-भूमि ही त्यांची पितृभू नाहीं. त्यांचें—आमचें धर्माचें नातें, ते

हिंदु राष्ट्राचे अंगभूत राहणार नाहींत. शुद्धीकृतांचा प्रश्नहि ह्या व्याख्येनें तसाच सोडविला जातो. जे पूर्वी हिंदु होते ते शुद्ध होतांच पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी बनतात. परंतु जे अमेरिकन, अिंग्लिश प्रभृति परराष्ट्रीय हिंदु धर्म स्वीकारतांच धर्मानें ते हिंदु होतील, पण राष्ट्रीय दृष्ट्या निराळे राहणारे असल्यामुळें ते संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होणार नाहींत. कारण त्यांची पुण्यभू भारत झाली, तर पितृभू दुसरीच असणार. त्यांच्यापैकीं जे कोणी शरीरसंबंधानें आमच्याशीं विवाहबद्ध होतील,—म्हणजेच वंश, जाति, राष्ट्र या दृष्टीनें आमच्यांत रक्तबीजांनीं अेकवटून जातील, किंवा हिंदुस्थानचें नागरिकत्व संपादून त्याला पितृभू मानतील ते मात्र पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतील ! साऱ्या जगभर हिंदु धर्माचा प्रसार करण्यास ही व्याख्या कोणतीहि आडकाठी आणीत नाहीं. ''

हिंदुत्वाच्या या सावरकरांनीं केलेल्या व्याख्येंत अैतिहासिक, तार्किक दृष्ट्या दोष नाहींत हें तिचें वैशिष्ट्य आहे. त्यामुळें अतिव्याप्ति व अव्याप्ति हे व्याख्येंत आढळणारे दोष यांत नाहींत; अुलट आजच्या हिंदु समाजाच्या बहुरंगी स्वरूपाला सामावून घेणारी अशी ती यथायोग्य व्याख्या आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनीं त्या व्याख्येला अत्यंत सावधगिरीनें व काळजी-पूर्वक केलेली व्याख्या—असें आपल्या पाकिस्तानवरील ग्रंथांत म्हटलें आहे (पृष्ठ १३०). यांत हिंदुत्वाला (Hinduness) सावरकरांनीं हिंदु धर्मापासून मुक्त केलें असल्यामुळें ती व्याख्या धर्मनिष्ठ झालेली नाहीं. त्यामुळें संदिग्धता व वस्तुस्थितीशीं विसंगति या दोन्ही दोषांपासून ती मुक्त झाली आहे. पण या व्याख्येंत हिंदु धर्मापासून हिंदुत्वाला वेगळें करण्याचा केलेला प्रयत्न विवाद्य आहे. कारण 'पुण्यभू' हा या व्याख्येंतील शब्द धर्माशीं निगडित आहे, त्यामुळें ती व्याख्या धर्माशीं संबंध असलेलीच होते. आणि याच व्याख्येवर जर हिंदु राष्ट्रवाद आधारला तर त्यालाहि धार्मिक स्वरूप येतें. हा आक्षेप सोडला तर सावरकरांची ही व्याख्या बरीचशी वस्तुस्थितीशीं मिळणारी व हिंदुत्वाच्या विकासाला अडथळा न आणणारी आहे.

हिंदु हे राष्ट्र आहेत !

सावरकरांनीं या हिंदुत्वाच्या व्याख्येच्या अनुषंगानेंच राष्ट्रवादाच्या सर्व आवश्यक घटकांचा विचार करून हिंदु हे राष्ट्र आहेत हा आपला सिद्धान्त मांडला आहे. 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या करण्याचे प्रयत्न पाश्चात्य राज्यशास्त्रज्ञांनीं केले आहेत, पण त्यांत त्यांना यश आलेलें नाहीं. किंबहुना राष्ट्र ही भावना मानवी भावनांशीं निगडित असल्यामुळें तिची व्याख्या करणें म्हणजे मानवाच्या संस्कारक्षम अंतःकरणाच्या मर्यादा ठरवून टाकणें आहे. राष्ट्रत्वाच्या भावनेचा विकास हा अेखाद्या सरळ रेषेप्रमाणें होत नाहीं, किंवा त्याची निर्मितीहि अेखाद्या संस्थेप्रमाणें करतां येत नाहीं. अैतिहासिक काळांत निर्माण झालेल्या समान परंपरा या क्षणांत निर्माण होत नाहींत. म्हणून मनुष्य नागरिकत्व बदलूं शकतो, राष्ट्रीयत्व बदलूं शकत नाहीं. अंगावरील कपड्याप्रमाणें ही परंपरा झटकतांहि येत नाहीं, आणि मनाला वाटेल तेव्हां ती निर्माणहि करतां येत नाहीं. तेव्हां राष्ट्रत्वाची अेखादी मुद्देसूद व्याख्या करून त्याप्रमाणें जगांतील समाजांचें राष्ट्रत्व ठरविणें कटीण आहे. कारण राष्ट्रत्वाची निर्मिती व विकास अनेक कारणांमुळें झालेला आढळतो. कोठें भाषा, कोठें प्रदेश, कोठें समान संकट, कोठें धर्म, आणि कोठें समान शत्रूविरुद्ध द्वेषहि. या विविध प्रकारांनीं राष्ट्रत्व निर्माण झालें आहे. आणि त्याची निर्मिती कोणत्याहि कारणामुळें झालेली असली तरी त्याचा विकासहि तितकाच अनियमित दिशांनीं झाला आहे. त्यामुळेंच राष्ट्रत्वाची व्याख्या ठरवून त्याप्रमाणें राष्ट्रीयत्वाचा विचार करणें म्हणजे वाहत्या प्रवाहाला फळीनें अडविण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे.

अेकराष्ट्रत्व निर्माण व्हावयाचें असेल तर परंपरा, हित व ध्येयवाद (traditions, interest and ideals) या तीन गोष्टी अवश्य असतात. परंपरा ही राष्ट्राला भूतकाळाशीं जोडते; समानहितत्व हें वर्तमानकाळाचा विसर पडूं देत नाहीं; आणि ध्येयवाद हा भविष्यकाळांत घेअून जातो. सावरकरांचा राष्ट्रवाद या तीन्ही गोष्टी विचारांत घेतो; म्हणूनच तो केवळ स्वप्नाळू झाला नाहीं. हिंदु राष्ट्रवादाचा विचार याच दृष्टीनें केला पाहिजे.

राष्ट्रीयत्वाचे मूलाधार

जॉन स्टुअर्ट मिल, रेनान, यांच्यासारख्यांनीं राष्ट्राची व्याख्या ठरविण्याचे प्रयत्न केले आहेत. त्या प्रयत्नांवरून राष्ट्रत्वाचे कांहीं मूलाधार किंवा अुपस्तंभ ठरवितां येतात. ते सर्वच सर्व ठिकाणीं सांपडत नाहींत. पण हिंदु समाजांत मात्र ते सर्व आश्चर्यकारक रीत्या अेकत्र झालेले आप-ल्याला आढळतात. ते घटक म्हणजे अेक भाषा, अेक संस्कृति, अेक देश, अेक अैतिहासिक परंपरा. भारताच्या राष्ट्रीयत्वाचा विचार करतांना प्रथम अेक गोष्ट लक्षांत येते कीं, येथें बहुसंख्य लोक हिंदु आहेत. या हिंदूंनीं या देशाच्या भूतकाळावर आपलें स्वामित्व गाजविलें आहे. आपल्या सर्वांत पवित्र आणि सर्वांत प्राचीन वाङ्मयांत सप्त हिंदु किंवा हप्त हिंदु हें नांव—ज्या भूमींत आपलें वैदिक राष्ट्र भरभराटलें आहे त्या भूमीलाच लावण्यांत आलें आहे. मूळांतील ही भौगोलिक कल्पना कधीं आकुंचन पावत तर कधीं विस्तार घेत, पण अगदीं सतत, हिंदु आणि हिंदुस्थान या शब्दांशींच निगडित झाली आहे. कोणत्याहि अेखाद्या लोकसमाजांत परस्पर जिव्हाळा, सामर्थ्य आणि अैक्य निर्माण करण्यास जर कोणत्या दोन महत्त्वाच्या गोष्टी कारणीभूत होत असतील—तर अेक म्हणजे, त्या लोकांना आंतून सलग आणि बाहेरून स्पष्ट सीमारेखांनीं आपलें वेगळें अस्तित्त प्रस्थापित करणारी अशी स्वतंत्र निवसनभूमि, आणि दुसरी म्हणजे, ज्याच्या नुसत्या अुच्चारासरशीं आपल्या प्रियतम मातृभूमीची मूर्ति नि आपल्या अैतिहासिक काळांतील प्रिय स्मृति जागृत होतात असें नांव. या दोन्ही गोष्टी आपल्याला लाभलेल्या आहेत. निसर्गाच्या दिव्य अंगुलींनीं पृथ्वीच्या पाठीवरील दुसरा कोणताहि देश अितक्या रेखीवपणें वेगळा आंखून दिलेला नाहीं. त्या नांवाच्या अुच्चाराबरोबर आपली मातृभूमीची मूर्ति डोळ्यांसमोर अुभी राहते. जेव्हां तिच्या भौगोलिक स्वरूपाचा विचार मनांत येतो तेव्हां तिचें स्वतंत्र सजीव अस्तित्वच आपणांला प्रतीत होतें. म्हणून हिंदु आपल्या पितृपरंपरेनें प्रथम हिंदुस्थानचा नागरिक असतो. अेकदेश हें हिंदूंच्या राष्ट्रीयत्वाचें पहिलें लक्षण.

दुसरें म्हणजे आमची संस्कृति. संस्कृति म्हणजे मानवानें जड सृष्टीवर केलेलें संस्कार आणि त्याचा संकलित अितिहास. संस्कृति ही माणसानें निर्माण केलेली सृष्टि आहे. वाङ्मय, कला, सामाजिक चालीरीति, हीं संस्कृतीचीं बाह्य रूपें,— आणि तिनें निर्माण केलेला मानवी जीवनाकडे पहाण्याचा दृष्टि-कोण — तिचें तत्त्वज्ञान हें संस्कृतीचें अंतरंग! या संस्कृतीचें अुन्मेषशाली रूप महापुरुषांच्या रूपानें राष्ट्रांत प्रकट होतें. संस्कृतीच्या या प्रत्येक क्षेत्रांत हिंदूंनीं स्वतःचा असा आदर्श निर्माण केला आहे; म्हणून हिंदु संस्कृति म्हणतांच वैदिक ऋषींपासून रामकृष्ण परमहंसांपर्यंत, कालिदास भवभूतीपासून तुकाराम ज्ञानेश्वरापर्यंत, रामकृष्णांपासून तों शिवाजी प्रतापापर्यंत, बुद्ध — महावीर, शंकराचार्यांपासून विवेकानंदांपर्यंत असंख्य अवतारी पुरुषांच्या तेजःपुंज मूर्ति ताऱ्यांसारख्या चमचमत अुभ्या राहतात. भारत या भौगोलिक तुकड्याला आमच्या संस्कृतीनें प्रकाशमय करून टाकलें.

तिसरा समान बंध म्हणजे भाषा. जिच्यापासून आजच्या सर्व प्रचलित भाषा अुगम पावल्या व पुष्ट होत आहेत, आणि जी आजहि आमच्या धर्मग्रंथांची व वाङ्मयाची सर्वसाधारण भाषा म्हणून गणली जाते, ती संस्कृत भाषा हा हिंदूंचा अनादिकालापासून बहुमोल ठेवा आहे. ती नुसती भाषाच नव्हे तर आमच्या अेकत्वाची भावना,— अेकत्वाचें स्पंदन हृदयाहृदयांत चालू आहे असें सांगणारी ज्ञानवाहिनी आहे.

चौथा राष्ट्रीयत्वाचा घटक म्हणजे आमचा अितिहास, आमची परंपरा! परंपरा म्हणजे राष्ट्राची स्मृति. आपला अितिहास कमींत कमी पांच हजार वर्षांचा आहे. आपले राष्ट्रीय पूर्वज सप्तसिंधूच्या तटाकीं वसत त्या वेळीं वांशिक व सांस्कृतिक दृष्ट्या आर्य म्हणून संबोधलें जाअी. राजकीय, वांशिक नि सांस्कृतिक दृष्टीचा संग्रहणाच्या, व्यवच्छेदनाच्या नि दृढीकरणाच्या प्रशंसनीय पद्धतीनें त्यांनीं सिंधूपासून पूर्व समुद्रापर्यंतच्या नि हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंतच्या आपल्या ह्या भूमीतील प्रसरणाच्या क्रमांत संबंध आलेल्या वा झगडा झालेल्या यच्चयावत् अितर अनार्य लोकांना आत्मसात् करून' सर्वांचें मिळून अेक स्वतंत्र राष्ट्र बनविलें. तेव्हांपासून अगदीं अिंग्रज जाअीपर्यंत अनेक शत्रूंशीं सामना देअून, आणि

त्यांपैकीं कांहींना आत्मसात करून हिंदूंनीं आपलें ऐकत्व कायम ठेवलें. पारतंत्र्य आलें–गेलें, आक्रमणें आलीं आणि परतलीं, पण हिंदु समाज मात्र अंतर्गत भेदभाव असतांहि जिवंत राहिला.

हिंदु समाज ही अेका वंशाची परिणति नाहीं. त्यांत असंख्य जाति अत्यंत कौशल्यानें अेकत्रित आल्या आहेत. पण त्या सर्वांची पुण्यभू भारत हीच आहे. त्यामुळें पितृभू, पुण्यभू ही अेकच असण्याचा मान हिंदूंना मिळाला आहे. असंख्य जाति असल्या, अनेक अुपभाषा असल्या, अनेक धर्मपंथ असले, तरीहि समान संस्कृति आणि समान मातृभूमि, समान अितिहास यांच्या अतूट बंधनांनीं आमचें जीवन जोडलेलें आहे. अगस्तीच्या अंजलींत जसा महासागर–तसें तीस कोटी लोकांचें राष्ट्रचें राष्ट्र 'हिंदु' या शब्दांत सामावलेलें आहे. तें कांहीं पावसाळ्यांतल्या छत्रीप्रमाणें उगवलेलें राष्ट्र नव्हे. तें अेखाद्या समेटांतूनहि अुत्पन्न झालेलें वा अुत्पन्न केलेलें राष्ट्र नाहीं. तें ह्याच भूमींतून वर आलेलें नि या भूमींतच खोलवर-ज्याचीं मुळें खोलवर नि दूरवर पसरलेलीं आहेत असें राष्ट्र आहे. मुसलमानांचा किंवा जगांतील अन्य कोणाचा द्वेष करण्याकरितां म्हणून हुडकून काढलेलें किंवा रचलेलें तें कांहीं थोतांड नाहीं;–तर आपली अुत्तर सीमा संभाळणाऱ्या हिमालयाप्रमाणें भव्य नि भक्कम सत्य आहे.

सावरकरांच्या या सर्व विवेचनावरून त्यांची हिंदु राष्ट्रवादाची भूमिका कोणत्या शास्त्रशुद्ध तत्त्वावर आधारलेली आहे हें दिसून येअील. भारतांत जे अितर समाज आहेत, त्या सर्वांपेक्षां अधिक प्रमाणांत या देशाशीं परंपरा, संस्कृति यांनीं निगडित झालेला, व या देशावर ज्यानें आपल्या प्रेमाची, त्यागाची, शौर्याची वृष्टि केली आहे असा जर कोणता समाज असेल तर तो हिंदु समाज आहे. म्हणूनच हिंदुराष्ट्र हें अेक सांस्कृतिक, सामाजिक सत्य आहे, हें राष्ट्रवादाच्या सर्व अभ्यासकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदी राष्ट्रवादाचें स्वागत

मग या देशांत अितर समाज आहेत त्यांचें काय करावयाचें हा प्रश्न सतत विचारण्यांत येतो. त्याला सावरकरांनीं स्पष्ट अुत्तर दिलें आहे.

सावरकर हिंदी राष्ट्र ही हिंदु राष्ट्राची प्रादेशिक संज्ञा मानतात. हिंदूंना हिंदी देशभक्ति हा हिंदु देशभक्तीचा पर्याय शब्द वाटतो. कारण हिंदूंचें प्रादेशिक परिमाण त्यांच्या वांशिक, धार्मिक नि सांस्कृतिक परिमाणाशीं पूर्णत्वानें अेकरूप झालेलें आहे. म्हणून समान हिंदी राष्ट्र व हिंदी राज्य या कल्पनांना विरोध न करतां सावरकर त्यांचें स्वागतच करतात. कर्णावति व नागपूर येथील हिंदुसभा अधिवेशनांत (१९३७–१९३८) सालीं सावरकरांनीं यासंबंधीं पुढील अुद्गार काढले होते—

" हिंदु राष्ट्र हें संयुक्त हिंदी राष्ट्राच्या शक्यतेचा मार्ग बंद करण्याचा विचार स्वतःच्या हिताकडे पाहूनच कधीं मनांत आणीत नाहीं; मात्र तें संयुक्त हिंदी राष्ट्र न्याय्यतेच्या आणि समानतेच्या पायांवरच उभारलें असलें पाहिजे. हिंदुस्थानांतील सर्व अल्पसंख्य समाजांना विधिमंडळें, नोकऱ्या, सामाजिक आणि राजकीय अधिकार अित्यादि संबंधांत लोकसंख्या आणि गुणानुसारी योग्यता यांच्या प्रमाणांत मताधिकार आणि प्रतिनिधित्व देण्यास हिंदु राष्ट्र केव्हांहि सिद्ध असेल. हिंदुसमाज देशांत प्रचंड प्रमाणांत बहुसंख्य असतांहि स्वतःसाठीं कोणतेहि विशेष अधिकार अथवा स्वतंत्र सवलत मागण्याचा आपला अधिकारहि सोडून देईल. अितर प्रत्येक राष्ट्रांत अशा बहुसंख्य समाजाला स्वतंत्र सवलती नि खास अधिकार असतात.

पण अल्पसंख्यांक समाजाची बहुसंख्य समाजाला नसलेल्या सवलतीची आणि भरताडाच्या मताधिकाराची वेडगळ आणि कोठेंहि अैकण्यांत न आलेली मागणी मात्र हिंदु समाज यापुढें सहन करणार नाहीं. संयुक्त हिंदी राष्ट्राच्या बनावाच्या सिद्धयर्थ धर्म, वंश आणि संस्कृति यांचा विचार न करतां ' माणसागणिक मत ' या राष्ट्रीय तत्त्वाचा अंगिकार करण्याअितका पुढें हिंदु समाज जाईल. पण ' अेक मुसलमानास तीन मतें ' आणि अुलट ' तीन हिंदु मिळून अेक मत ' अशा प्रकारचीराजकीय अधिकाराची मागणी,—

लूटमारी तो हाणूनच पाडील. कारण असली किंवा दुसरी कसलीहि संस्कृतिविषयक मागणी ही हिंदु संस्कृतीला अितिहास, भाषा, वंश नि धर्म या दृष्टींनीं विरोधक, अपमानकारक नि दडपून टाकणारीच असावयाची. अल्पसंख्यांकांना आपला धर्म पाळावयाचें, आपली भाषा बोलायचें, नि स्वतःपुरती आपली संस्कृति विकसित करण्याचें स्वातंत्र्य राहील. मात्र त्यामुळें दुसऱ्या समाजाच्या तशाच प्रकारच्या अधिकारांचें अतिक्रमण अथवा सार्वजनिक शांततेचा आणि नीतिमत्तेचा भंग होतां कामा नये. या न्याय्य अटीवर मुसलमान आम्हांला मिळत असतील, आणि हिंदी राष्ट्रावर अविभक्त निष्ठा ठेवावयास सिद्ध असतील तर अुत्तमच. तसें न झाल्यास आमचीं ब्रीदवाक्यें ठरलेलीं आहेत तीं अशीं—

" याल तर तुमच्यासह, तुम्ही न याल तर तुमच्यावांचून; पण जर तुम्ही विरोधाल तर तुम्हांलाहि विरोधून आम्हीं अेकटे हिंदु हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा यश येअीतों लढत राहूं. "

अल्पसंख्य समाजासंबंधानें आमची वृत्ति

प्रस्तुत परिस्थितीचा विचार करतां ती भिन्न भिन्न भावाची राहील. मुसलमान, ख्रिस्ती अथवा हिंदवासी युरोपियन लोक यांपैकीं आम्ही कोणाचाहि द्वेष करीत नाहीं असें निश्चित आश्वासन हिंदु त्यांना देतील; पण त्याबरोबरच या अल्पसंख्य समाजांत हिंदूंलाहि कोणी हीन लेखण्यास किंवा त्रास देण्यास धजत नाहीं ना हेंहि हिंदु समाज यापुढें चांगला जागरूक राहून पाहील.

पारशी लोक हे वंश, धर्म, भाषा, संस्कृति या दृष्टींनीं आम्हांला जवळचे आहेत. ते हिंदुस्थानशीं कृतज्ञतापूर्वक अेकनिष्ठ राहिले आहेत, नि हिंदुस्थान हेंच त्यांनीं आपलें अेकमेव घर म्हणून मानिलें आहे. दादाभाई नौरोजींसारखे सर्वश्रेष्ठ हिंदी देशभक्त, त्याचप्रमाणें कामाबाईंसारख्या क्रांतिवादीहि त्यांच्यांत निर्माण झाल्या आहेत.

त्यांना समाभिक हिंदी राष्ट्रामध्यें सामावून घ्यावें लागेल, आणि पूर्ण समान अधिकार देऊन तसें अवश्य समाविष्ट करून घेण्यांत येआंलहि.

खिस्ती अल्पसंख्य समाज शांतवृत्तीचा असून देशाबाहेरील लोकांशीं संबंध ठेवून हिंदुस्थानविरुद्ध राजकीय डाव तो खेळत नाहीं; भाषा नि संस्कृति या दृष्टींनीं तो हिंदुविरोधी नाहीं. यास्तव त्यालाहि आमच्यांत राजकीय दृष्ट्या समाविष्ट करून घ्यावें लागेल. त्यांचा—आमचा भेद धर्मांतच आहे, आणि त्यांचा धर्म इतर धर्मीयांना बाटविणारा आहे. तेव्हां धर्माच्या बाबतींत हिंदूंनीं सावध राहून त्यांच्या धर्मप्रचारकांना आपली चळवळ चालवावयास आंधळेपणें वाव देतां कामा नये; अर्थात् विचारपूर्वक होणाऱ्या धर्मान्तराचा प्रश्न स्वतंत्र आहे."

संयुक्त हिंदी राज्य आणि अल्पसंख्याकांची सहकारिता

" योग्य नि खऱ्या अर्थाचें स्वराज्य जर अभिप्रेत असेल तर हिंदी स्वातंत्र्याकरितां चळवळींत नि झगड्यांत, आणि एक संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या कार्यांत हिंदु सर्वांच्या पुढें आघाडीवरच राहात आले आहेत. संयुक्त हिंदी राज्याचें स्वप्न जर पहिल्यानें कोणाला पडलें असेल तर तें त्यांनाच होय. आपल्या त्यागांनीं नि झगड्यांनीं तें राज्य कोणी आजच्या व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेंत आणलें असेल तर तेंहि पुन्हां हिंदूंनींच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदु हे अेक समान नि संयुक्त हिंदी राज्य—स्थापण्याच्या हेतूनें चाललेल्या ह्या सार्वलौकिक झगड्यांत आपल्या अहिंदु वर्गांतील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हांहि अनुकूलच होते व आहेत. हिंदुस्थानांत आपली प्रचंड बहुसंख्या आहे, अहिंदु धर्म नि विशेषतः मुसलमान हे राष्ट्रीय झगडा चालू असतांना कोठेंच आढळत नाहींत, नि झगड्याचीं फळें तोडण्याच्या वेळीं मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात. आणि आपण अेकटेच आजवर सर्व लढा लढत नि त्यांतले आघात सोशीत आलों आहोंत. या

सर्व गोष्टींची जाणीव असूनसुद्धां—तें अेकीकडे ठेवून, हिंदु हे सर्वांचें संयुक्त हिंदी राष्ट्र बनाविण्यास समुत्सुक आहेत, आणि आपले कोणतेहि राखून ठेवलेले असे स्वतंत्र हक्क, वा सत्ता, वा अधिकार हिंदुस्थानांतील अहिंदुवर्गावर मुळींच लादूं अिच्छीत नाहींत.''

हिंदी राज्याचे नागरिक सर्वांआधीं आम्ही होऊं

'' पण तें हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असूं द्या. त्या राज्यानें मताधिकार, नोकऱ्या, अधिकारांचीं स्थानें, कर यांच्या संबंधांत धर्माच्या व जातीच्या तत्त्वावर कसल्याहि मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळींच थारा देऊं नये. कोणताहि मनुष्य हिंदु आहे कीं मुसलमान आहे, कीं खिस्ती आहे कीं ज्यू आहे अिकडे लक्षच दिलें जाऊं नये. त्या हिंदी राज्यांतील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येंतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेंकडेवारी विचारांत घेतली न जातां त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणानुसार वागविले जाऊं द्यात. अिंग्लंड किंवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यांसारख्या जगांतील अितर प्रत्येक राष्ट्रांत असल्याप्रमाणें देशांतील प्रचंड बहुसंख्य लोकांना समजत असेल तीच भाषा नि तीच लिपी होऊं द्या. त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नि राष्ट्रीय लिपी होऊं द्या. आणि कोणत्याहि लादलेल्या नि वेड्यावाकड्या संकरानें ती भाषा नि ती लिपी भ्रष्ट करण्याला कोणत्याहि धार्मिक कारणाला मोकळीक न मिळूं द्या. कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां 'अेक मनुष्य अेक मत' असा सर्व-सामान्य नियम होऊं द्या. अशा स्वरूपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढें धरावयाचें असेल तर हिंदुसंघटनवादी, स्वतः हिंदु-संघटनाच्याच हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्यानें आपली निष्ठा अर्पितील. मी स्वतः आणि मजप्रमाणेंच सहस्रों 'हिंदु महासभा'—वाले यांनीं आपल्या राजकीय चरिताच्या प्रारंभापासूनच अशा हिंदी राज्याचा आदर्श आमचे राजकीय साध्य म्हणून सतत

दृष्टीपुढें ठेविलेला आहे. आणि आमच्या जिविताच्या अंतापर्यंत त्याच्या परिपूर्तीकरितांच झगडण्याचें आम्ही चालूच ठेवणार. हिंदी राज्यासंबंधीं याहून अधिक राष्ट्रीय अशी कोणती कल्पना असूं शकेल ?"

कांहीं आक्षेप

सावरकरांच्या राष्ट्रवादाविषयींच्या विचारसरणीचें पृथक्करण आपण केलें. त्यांत आपल्याला असें आढळून आलें आहे कीं, सावरकर हिंदुत्व आणि हिंदु धर्म या वेगळ्या कल्पना मानून हिंदु समाज हें वांशिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक दृष्टीनें अेक राष्ट्र आहेत असें प्रतिपादितात. भारतांत ज्या अनेक जमाती आहेत त्यांपैकीं मुसलमान हे धर्मनिष्ठेवर आधारलेल्या राजकीय अलगपणाचे व प्रभुत्वाचे पुरस्कर्ते आहेत. हिंदी राष्ट्रवादाची पुरोगामी कल्पना मान्य करण्याअितके ते सुधारलेले नाहींत. त्यांना ब्रिटिशांचेंहि साहाय्य आहे. या कारणपरंपरेमुळें मुसलमानांविषयीं आपलें धोरण सावधगिरीचें व प्रतियोगी सहकारित्वाचें असलें पाहिजे. संयुक्त हिंदी राष्ट्र व हिंदी राज्य हें स्थापण्यासाठीं हिंदु सदैव सिद्ध आहेत, पण हिंदुत्वाचें बलिदान करून निर्माण झालेलें हिंदी राज्य मात्र ते कधींहि स्वीकारणार नाहींत. तसेंच ते स्वतःसाठीं जादा अधिकारहि मागणार नाहींत, तर लोकशाहीचे नियम पाळून समान हिंदी राष्ट्र व हिंदी राज्य यांत विलीन होतील.

सावरकरांच्या ज्या राष्ट्रत्वासंबंधींच्या विचारावर गेल्या १५ वर्षांत अनेक प्रकारचे आरोप केले गेले आहेत त्या सर्वांचा समग्र विचार येथें अशक्य आहे. पण सर्वसाधारणपणें सावरकरांच्या या विचारसरणीवर तीन गंभीर आरोप विचारवन्तांनीं केले आहेत. पहिला आक्षेप, सावरकरांचा राष्ट्रवाद जातीय व धर्मनिष्ठ आहे. त्यामुळें तो मध्ययुगीन आहे. दुसरा आक्षेप म्हणजे, सावरकरांनीं हिंदु व मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत असा सिद्धांत मांडून द्विराष्ट्रवादाचा पाया घातला. तिसरा आक्षेप म्हणजे, सावरकर हिंदु व मुसलमानांचें राष्ट्रदृष्ट्या वेगळेंपण मान्य करूनहि मुसलमानांना

'स्वदेश' (नॅशनल होम) देण्यास नकार देतात. त्यामुळें घटना तयार करण्याच्या दृष्टीनें त्यांची विचारसरणी निरुपयोगी वाटते.

जातीय नव्हे, राष्ट्रीय

पहिल्या जातीयवादाच्या आक्षेपासंबंधीं बरेंच सांगण्यासारखें आहे. पण या देशांत 'जातीय' हा शब्द अितक्या तर्कदुष्ट व शास्त्रदुष्ट रीतीनें वापरला गेला आहे कीं, ती राजकीय संज्ञा नसून शिवी झाली आहे. काँग्रेसनें स्वतःचें निधर्मी राष्ट्रवादाचें धोरण असूनहि मुस्लीम जातीयवादापुढें लोटांगण घातलें; अितकें कीं, सिमला परिषदेंत वॅव्हेलनें त्यांना सवर्ण हिंदूंचें प्रतिनिधित्व करावयास लावलें! सावरकरांना जातीय म्हणणारे स्वतःची ही विकृत जातीयता विसरले. जातीय शब्दाचा अेक अर्थ असा घेतां येईल कीं, स्वतःच्या जातीपुरतें बघणारा, किंवा अितरांच्या हितावर निखारे ठेवूनहि स्वतःच्या जातीचें हित साधूं पहाणारा. सावरकर हे या अर्थानें मुळींच जातीय नाहींत. कारण त्यांनीं अत्यंत स्पष्ट शब्दांत असें सांगितलें आहे कीं, हिंदूंना समान हिंदी राज्यांत जादा अधिकार नको आहेत. अितर देशांतील बहुसंख्य राष्ट्रीय जमातीला ते मिळतात. अर्थात् हिंदु हे बहुसंख्य आहेत. हें पाप वाटत नाहीं, आणि स्वतःला हिंदु म्हणवून घेणें हें राष्ट्रीयतेला बाध आणणारें आहे असें सावरकरांना वाटत नाहीं. म्हणून त्यांना जातीय म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणावें. पण निधर्मी राज्यांतहि सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य असतें, आणि स्वतःला 'मी त्या धर्माचा आहे' हें म्हणवून घेणें किंवा धर्म मानणाऱ्यानें स्वधर्माची सेवा दुसऱ्याच्या अधिकारावर आक्रमण न येअील अशा रीतीनें करणें हें कोणत्याहि आधुनिक राज्यशास्त्रीय तत्त्वांच्या दृष्टीनें जातीय ठरत नाहीं.

तें अनिर्णित द्वंद्व

दुसरा गंभीर आक्षेप द्विराष्ट्रवादाचा. याविषयीं जिना व सावरकर यांच्या दोन भिन्न भूमिका आहेत हें स्पष्ट केलें पाहिजे. त्या समजावून घेण्यापूर्वी कांहीं राजकीय संज्ञांचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. अेकराष्ट्रत्वाची

जाणीव ही राष्ट्रनिर्मितीस आवश्यक असते. ही जाणीव (national consciousness) कशी असते हें सांगतांना फ्रेडरिक हर्टझ् म्हणतो कीं, ऐकराष्ट्रत्वाच्या जाणीवेंत (सामाजिक, सांस्कृतिक) ऐक्य, स्वातंत्र्याची धडपड, स्वतःचें राष्ट्रीय व्यक्तिमत्व सिद्ध करण्याची आकांक्षा, व राष्ट्रीय सन्मान—या चार आकांक्षा प्रामुख्यानें असतात. (National consciousness consists in the combined striving for unity, liberty, individuality and prestige) ही ऐकराष्ट्रत्वाची जाणीव असलेला समाज स्वतःचें राष्ट्र स्थापन करण्यासाठीं धडपडत असतो. तें ऐकराष्ट्रत्व समान भूमि व समान राज्य यांविना साकार होत नसल्यामुळें या दोन गोष्टींसाठीं त्यांचा सतत लढा चालू असतो. ही जाणीव जितकी प्रखर असेल तितकें या लढ्यांत त्या जमातीला यश मिळण्याची शक्यता. अशा लढ्याचें उत्कृष्ट उदाहरण ज्यूंचें आहे. हजारों वर्षें ऐकराष्ट्रत्वाची जाणीव उराशीं बाळगून त्यांनीं आतां स्वतःच्या भूमीवर स्वतःचें राज्य स्थापून आपली राष्ट्रकल्पना समूर्त केली आहे.

या दृष्टिकोणांतूनच सावरकरांनीं सिंध प्रांत वेगळ्या करणाच्या वेळेपासूनच हिंदूंना असा अिषारा दिला होता कीं, मुसलमान हे स्वतःचा राजकीय अलगपणा कायम ठेवूं पहात आहेत. याच अर्थानें त्यांनीं सांगितलें होतें कीं, मुसलमानांच्यांत जी ऐकराष्ट्रत्वाची सुप्त जाणीव आहे तिचा व हिंदूंच्या राष्ट्रीयत्वाचा संघर्ष या देशांत चालू आहे. हिंदुस्थानांत मुस्लीम हे राष्ट्र आहेत असें सावरकरांनीं कधींच म्हटलें नाहीं. फक्त ते संयुक्त राष्ट्रवादांत सामील झालेले नसून स्वतःचें धर्माधिष्ठित राष्ट्रत्व (Theocratic nationality) या देशांत रुजवूं पाहात आहेत, असा तो अिषारा होता. वस्तुतः हें ऐक अितिहासांत सिद्ध झालेलें सत्य आहे. कारण ब्रिटिश येण्यापूर्वी या देशांत या दोन संस्कृतींचा संघर्ष चालूच होता. तो अनिर्णितच राहिला होता. ब्रिटिश आले तरी मुसलमानांचें हें सुप्त राजकीय मन अनेक कारणांमुळें मेलें नाहीं. हेंच सावरकरांनीं सांगितलेलें सत्य होतें. हिंदु व मुसलमान यांचा चालू असलेला संघर्ष संपला नसून तो अद्यापि अनिर्णितच आहे, हाच अिषारा सावरकरांनीं दिला. पण तरीहि

प्रत्येक वेळीं अेक माणूस अेक मत या तत्त्वानुसारच हिंदी राष्ट्रवाद्यांनीं आपलें राजकारण करावें असें सांगितलें. संयुक्त हिंदी राज्याचा पुरस्कार केला, फाळणीचा कधींहि पुरस्कार केला नाहीं हा द्विराष्ट्रवाद होता काय ?

अुलट जिनांनीं हिंदु व मुसलमान हे केवळ वेगळे धर्मच नसून त्या अगदीं भिन्न समाजपद्धति आहेत, व त्यांतून कधींहि समान राष्ट्रीयत्व निर्माण करणें शक्य नाहीं असें सांगितलें. जिनांनीं १९४० सालीं लाहोरच्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनांत केलेलें भाषण या दृष्टीनें वाचण्यासारखें आहे. जिना या राष्ट्रत्वासाठीं स्वतंत्र भूमि व स्वतंत्र राज्य मागत होते. त्यांना हिंदी राष्ट्रत्वाची कल्पनाच असह्य होअी. त्यानें या देशाचा नाश होअील असें वाटे. समान राज्य (Multi-national State) हेंहि त्यांना नको होतें. या विवेचनावरून सावरकर व जिना यांच्या तत्त्वांत महत्त्वाचा फरक कोणता होता हें दिसून येअील. सावरकरांनीं भारतांतील राष्ट्रत्वाच्या दृष्टीनें समाज-शास्त्रीय, औतिहासिक परिशीलन करून अेका अनिर्णित द्वंद्वाकडे बोट दाखविलें, आणि हा खडक टाळून हिंदीराष्ट्रवादाची नौका पुढें नेली पाहिजे असें प्रथम सांगितलें. पण हें जेव्हां घडेना, आणि मुस्लीम जमातवाद जेव्हां प्रभावी होत चालला तेव्हां ' राजकारणाचें हिंदूकरण करा ' असा स्पष्ट आदेश दिला.

संयुक्त राज्य शक्य; पण क्रांतीनें

तिसरा आक्षेप, डॉ. आंबेडकरांनीं आपल्या पाकिस्तानवरील ग्रंथांत घेतला आहे. आंबेडकरांच्या मनांत प्रादेशिक राष्ट्रवाद, हिंदु मुस्लीम अैक्य अित्यादि कल्पनांचा गोंधळ नसल्यामुळें त्यांचे आक्षेप वेगळ्या प्रकारचे आहेत;— मुख्यतः ते व्यावहारिक स्वरूपाचे आहेत. त्यांचें म्हणणें असें*— " सावरकर हे मुस्लीम राष्ट्र आहेत असें मान्य करून त्यांना राष्ट्रीय प्रदेश (नॅशनल होम) कसा नाकारूं शकतात ? बहुसंख्य राष्ट्र व अल्पसंख्य राष्ट्र यांचे प्रश्न सोडविण्याचे मार्ग दोन आहेत. पहिला,—अल्पसंख्यांकांनीं आपलें राष्ट्रत्व बहुसंख्य राष्ट्रांत विलीन करणें; दुसरा

* 'Thaughts on Pakistan,-- pages 132-135.

म्हणजे, दोघांनीं भूमीची फाळणी करून वेगळें राहणें. सावरकर स्वतंत्र राष्ट्रत्व असलेल्या मुसलमानांना स्वराष्ट्राच्या वर्चस्वाखालीं आणूं पहातात."

सावरकरांनीं हिंदु व मुस्लीम यांचें द्वंद्व चालू असलें तरी संयुक्त हिंदी राज्याच्या कल्पनेचा पुरस्कार केला होता.* संयुक्त राष्ट्र किंवा राज्य ही कल्पना विलक्षण नाहीं. गेल्या दोनशें वर्षांत युरोपमध्यें लॉर्ड ॲक्टनसारख्या राज्यशास्त्रज्ञांनीं तिचा पुरस्कार केला आहे. राज्यांतर्गत राज्य (State within a State) या कल्पनेस सावरकरांचा तीव्र विरोध होता. पण संयुक्त राष्ट्रीय राज्य (Multi-national State) हें त्यांना हवें होतें. ही कल्पना राज्यशास्त्रांत नवी समजली जाते. अिंग्लंड, अमेरिका, रशिया यांनीं स्वतःचें राष्ट्रत्व अशाच तऱ्हेनें निर्माण केलें आहे. ग्रेट ब्रिटनमधील स्कॉच किंवा वेल्श लोक हे स्वतःचें वेगळेपण कायम ठेवूं अिच्छित असले तरी त्यांना स्वतंत्र राज्य नको आहे. रशियांत तर १८५ बारीक बारीक वेगळे गट आहेत. त्यांची संस्कृति, भाषा,–सर्व कांहीं भिन्न आहे. पण त्यांनीं रशियन राष्ट्रीयत्व निर्माण करण्यांत यश मिळविलें आहे. याप्रमाणें भारतांतहि घडलें असतें; 'पण'– ! होय; या 'पण'नेंच फार मोठा घोंटाळा केला आहे. हिंदी राष्ट्रवादी पुढाऱ्यांनीं अितिहासाकडे दुर्लक्ष केलें, आणि ब्रिटिशांनीं त्या अितिहासांतील 'स्मृति' मुसलमानांत जागृत केली;– आणि त्याचा परिणाम त्यांचा जातिवाद झपाट्यानें वाढण्यांत झाला.

डॉ. आंबेडकरांच्या आक्षेपांत तथ्य आहे तें घटनात्मक दृष्टीनें. कारण मुसलमान स्वतःचें वेगळें राष्ट्रत्व प्रस्थापित करूं पहात असतांना, आणि

---

*"The combination of different nations in one State is as necessary a condition of civilized life as the combination of men in society. Inferior races are raised by living in political union with races intellectually superior. A State in course of time produces a nationality, but that a nationality should constitute a State is contrary to the nature of modern civilization."

—Lord Acton—History of Freedom and Other Essays—pp. 290-295.

त्यासाठीं त्यांनीं देशाच्या हिताचा बळी देण्याचेहि प्रयत्न चालविले असतांना घटनात्मक तडजोडीनें भारताचा राजकीय प्रश्न सोडविणाऱ्यांना पाकिस्तान मान्य करणें तर्कशुद्ध व व्यावहारिक वाटत असल्यास त्यांत कांहीं चूक नाहीं. राजाजींनीं या सनदशीर वृत्तीनेंच पाकिस्तानला मान्यता दिली होती. सावरकरांची राष्ट्रवादासंबंधींची भूमिका तडजोडीच्या राजकारणांत बसणारी नव्हती, आणि म्हणून सावरकरांचा राष्ट्रवाद हा अेखाद्या राज्यघटनेचा मूलाधार होअूं शकला नाहीं.

पण सावरकर हे तडजोडवादी नव्हते. त्यांची भूमिका क्रांतिवाद्याची होती. अखंड हिंदुस्थानसाठीं यादवी—व त्याच्या स्वातंत्र्यासाठीं सशस्त्र क्रांतियुद्ध या दोन्ही गोष्टी स्वीकारण्याची त्यांची सिद्धता होती. हिंदूंना या दोन्ही आघाड्यांवर लढावें लागेल हें अत्यंत स्पष्ट शब्दांत त्यांनीं कानपूरच्या हिंदुसभा अधिवेशनांत १९४२ सालीं बजावलें होतें; आणि ही भूमिकाहि घटनात्मक नसली तरी अितिहासाचा आधार त्याला होताच. आब्राहम लिंकनपुढें असेंच आव्हान होतें, त्या वेळीं त्यानें फाळणी न स्वीकारतां यादवी युद्ध पत्करलें. सामर्थ्याच्या जोरावर अेकजीव झालेलीं राष्ट्रें या जगांत अनेक आहेत. स्कॉटलंड व अिंग्लंड यांच्या अैक्याचे प्रयत्न क्रॉम्वेलपासून सुरू झाले होते. १७०७ मध्यें हे दोन देश अेक झाले, व त्यांला दोन्ही लोकसभांनीं मान्यता दिली. पण वस्तुतः तेथील लोकमत क्रुद्ध होतें. त्याविषयीं लिहितांना रॅम्से मूरनें* म्हटलें आहे कीं, त्या वेळीं जर सार्वमत घेण्यांत आलें असतें, तर या अेकत्रीकरणाला विरोधच झाला असता. या घटनेमुळें लोकसंख्येच्या प्रमाणांत स्कॉटलंडला ८५ जागा पार्लमेंटमध्यें मिळावयास हव्या होत्या. पण त्या मिळाल्या ४५ ! रशियाचेंहि अुदाहरण असेंच देतां येअील. यांत रशियन ४० टक्के आहेत, पण त्यांचेंच प्रभुत्व तेथें जास्त आहे. १९३८ सालीं रशियन भाषा सर्वांवर लादण्यांत आली. या सर्व दृष्टींनीं विचार केला तर हिंदी राष्ट्रीय राज्य निर्माण होण्याची

*Quoted by Fredrik Hertz in his 'Nationality in History and Politics' from "Short History of British Commonwealth", by Ramsay Muir—p. 585.

शक्यता होती, पण त्यासाठीं प्रथमपासूनच राजकारणाचा वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार व आचार करणें अवश्य होतें.

पराभव कोणाचा ?

आपण आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून अखंड हिंदी राष्ट्राची कल्पना मुस्लीम जमातवाद्यांनीं हाणून पाडली असा निष्कर्ष काढतां येअील. पण हिंदु राष्ट्रवाद अखंड भारतांत तरी विजयी होऊं शकला का ? सावरकरांनीं मांडलेल्या राष्ट्रवादी विचारसरणीचा विजय झाला का ? याचेंहि अुत्तर ' नाहीं ' असेंच आहे. असें कां झालें ? याला दोन कारणें आहेत. सावरकर अेकजीव हिंदुत्वाची कल्पना मांडून समाजाला संरक्षणाचें कवच देण्याचा प्रयत्न करीत होते. आणि त्याच वेळीं मुसलमानी समाजवाद हाणून पाडण्यासाठीं लढाअू हिंदुत्वाची गर्जना करीत होते. गेल्या हजार वर्षांत हिंदु समाज जातिभेदांनीं विच्छिन्न झाला आहे, आणि राजकीय व सामाजिक दृष्ट्याहि हिंदुत्वाच्या अेकात्म भूमिकेवर तो येअूं शकलेला नाहीं. त्यामुळें सावरकरांच्या विजिगीषु व लढाअू हिंदुत्वाला लागणारी अेकत्वाची पार्श्वभूमि मिळूं शकली नाहीं. सावरकरांनीं घेतलेली भूमिका व त्यांनीं पुरस्कारलेला लढाअू राष्ट्रवाद त्यामुळें भारत अखंड ठेवून त्याला स्वतंत्र करूं शकला नाहीं. म्हणजे हिंदी राष्ट्रवाद मुस्लीम जातीयतेमुळें राजकारणांत पराभूत झाला, आणि हिंदु राष्ट्रवाद हिंदूंच्या भ्रान्त धोरणामुळें व असंघटित अवस्थेमुळें असहाय्यपणें मागें फेंकला गेला.

हिंदी राष्ट्रवादी व हिंदु राष्ट्रवादी हे समान हिंदी राज्याच्या घटनेवर अेक झाले असते, आणि त्यांनीं मुस्लीम जमातवादाविरुद्ध लढा दिला असता तर कदाचित् भारत अखंड राहीला असता. पण तरीहि मुसलमानांच्या धर्माधिष्ठित राष्ट्रीयतेचें दुखणें अनिश्चित कालपर्यंत राहाण्याची शक्यताहि अधिक होती. पण आतां पाकिस्तानच्या निर्मितीमुळें या सर्वांचें स्वरूप पालटलें आहे. फाळणी झाल्यानंतर गांधींपासून अनेकजण भारत व पाकिस्तान हे पुन्हां अेक होतील अशी आशा बाळगीत होते. आजहि हिंदुत्वनिष्ठ पक्ष अखंड भारताची घोषणा करतांना आढळतात. पराभवानें दिङ्मूढ झालेल्या

अवस्थेंत असा अुत्तेजक ध्येयवाद बाळगणें कदाचित् योग्य असेल, पण अखंड भारताच्या चळवळीला आज तरी कांहीं अर्थ अुरलेला नाहीं. कारण जे हिंदु प्रतिकारक्षम झाले नाहींत ते आक्रमक होण्याची आशा बाळगून अखंड भारत स्थापण्याची घोषणा करणें—हें आजच्या परिस्थितींत तरी स्वप्नाळूपणाचें ठरणार आहे. अर्थात् स्वप्नरंजनाला तात्त्विक विरोध करतां येतच नाहीं; त्यामुळें अखंड भारताच्या कल्पनेलाहि विरोधण्याचें कारण नाहीं. पण सामर्थ्याच्या जोरावर ऐक्य घडविणें जवळपास अशक्य आहे असेंच आज म्हणणें भाग आहे.

कारण आक्रमक राष्ट्रवादाचें पर्यवसान काय होतें हें हिटलरच्या अधःपातानें जगापुढें आलें आहे. रशिया असेंच आक्रमक धोरण स्वीकारूं लागल्याबरोबर लगेच युगोस्लोव्हियासारख्या छोट्या राष्ट्रानेंहि आपला फणा अुगारला. अुद्यां चीनहि तेंच करील. अमेरिका हें धोरण कटाक्षानें टाळत आहे, यावरून त्यांनीं आक्रमक राष्ट्रवाद हा जगांतील सारीं राष्ट्रें जागृत झाल्यामुळें असफलच होअील हें ओळखलें असावें असें दिसतें. अशा या स्थितींत अगोदरच आक्रमक नसलेल्या हिंदूंना आक्रमक करणें, आणि मग अखंड भारताची घोषणा त्यांना देणें यांत दुहेरी स्वप्नरंजन आहे. राष्ट्रवाद हें मूल्यच संशयास्पद स्थितींत असतांना, आणि आक्रमक राष्ट्रवादाचा अंत होत असतांना असें धोरण पुरस्कारणेंहि आत्मघाताचें होअील. अखंड हिंदी राष्ट्र निर्माण होण्याचा अेकच मार्ग आहे,—आणि तो म्हणजे पाकिस्तानमध्यें ती अैक्याची भावना निर्माण होणें. तें अैक्यसुद्धां 'कॉन्फेडरेशन'च्या स्वरूपाचें असेल तरच तें टिकेल.

पण खंडित भारतांत यापुढें राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें काय केलें पाहिजे, त्यांत हिंदुत्वाला यापुढें कोणतें स्थान आहे याचा विचार पुढच्या प्रकरणांत हिंदुत्वाच्या गेल्या दहा-पंधरा वर्षांतील राजकारणाची मीमांसा केल्यावर मग करूं !

× × ×

५ :

हिंदुत्वाचें राजकारण

सावरकरांच्या जीवनांत १९३७ नंतर अेक नवा संग्राम सुरू झाला. रत्नागिरीच्या स्थलबद्धतेंतून सावरकर सुटले, आणि त्यांच्याविषयीं अनेक अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या. १९१० ते १९३७ अितका काळ राजकीय दृष्ट्या समाजापुढें सावरकर नव्हते. या काळांत भारतीय राजकारण पालटून गेलें होतें. गांधीजी हे या राजकारणाचे मुख्य सूत्रधार होते. दोन स्वातंत्र्यलढे होअून देशांत नवीन जागृति निर्माण झाली होती. ज्या स्वातंत्र्याच्या जयजयकारासाठीं क्रांतिकारकांना फांसावर चढावें लागलें त्याच स्वातंत्र्यभावनेचा पुरस्कार देशाच्या कानाकोपऱ्यांतून होत होता. गांधीजींनीं स्वतःचें असें अेक तत्त्वज्ञान, लढ्याचें अेक विशिष्ट तंत्र निर्माण केलें होतें. प्रत्येक भारतीय हा या लढ्यांतील सैनिक व्हावा अितका त्यांचा कार्यक्रम सर्वव्यापी होता. गांधी, नेहरू, सुभाष या तीन व्यक्तींची मोहिनी राष्ट्रावर पडलेली होती. काँग्रेसची संघटना मजबूत झाली होती. १९३५ च्या प्रांतिक स्वायत्ततेच्या सुधारणा घोषित झाल्यानंतर काँग्रेस सत्तास्वीकाराच्या तयारीसच लागली होती.

पण या स्वातंत्र्यलढ्याबरोबरच दुसरा अेक महत्त्वाचा प्रवाह भारतीय राजकारणांत शिरला होता, तो म्हणजे काँग्रेसनें स्वातंत्र्यलढ्यांत मुसलमानांचें सहकार्य मिळविण्यासाठीं चालविलेल्या अनुनयामुळें निर्माण झालेला

मुस्लीम जातीयवाद. लखनौ करारापासून जातीय मतदार संघापर्यंत त्यांच्या मागण्यांत झालेल्या विकासामुळें हिंदु–मुस्लीम ऐक्य हा अेक राजकीय तडजोडींतील विषय होऊन बसला होता. 'हिंदु–मुस्लीम अेकीविना स्वराज्य नाहीं' हा आद्य सिद्धांत असल्यामुळें हे अैक्याचे प्रयत्न कॉंग्रेसच्या राजकारणांत सुरू झाले होते. खिलाफतची चळवळ, कोरा चेक अित्यादि प्रकार होऊन गेले होते. मुसलमानांचें दहशतीचें तंत्र चालूच होतें. गांधीजींच्या अुदार धोरणामुळें कॉंग्रेसमधील कांहीं विचारवन्त बाहेर पडले. गांधींच्या सत्य, अहिंसा, असहकार आदि कल्पनांना ज्यांचा विरोध होता तेहि कॉंग्रेसमधून बाहेर पडले होते. १९३१ नंतर जी साम्यवादी विचारसरणी आली तिच्यामुळें प्रभावित झालेल्यांचेंहि गांधींच्या धोरणाशीं पटेना. गांधींचें राजकारण अधिकाधिक व्यक्तिनिष्ठ होत चालल्यामुळें वस्तुस्थितीचा विसर पडला. स्वतःच्या कल्पनांवर अवलेली श्रद्धा हीच राष्ट्रानें स्वीकारावी असा गांधींचा आग्रह असे. ते प्रत्यक्ष अगदीं याअुलट बोलत, पण घडे मात्र त्यांच्या मनासारखेंच. डॉ. आंबेडकरांनीं १९२०–१९३९ पर्यंतच्या मुस्लीम राजकारण, गांधींचें राजकारण अित्यादींचा अुहापोह आपल्या पाकिस्तानविषयक ग्रंथांत अुत्तम प्रकारें केला आहे. तो अितिहास सर्वांच्या परिचयाचा आहे. कॉंग्रेसची ब्रिटिशाविषयक नीति, मुसलमानांशीं वागण्याची त्यांची पद्धति या दोन्ही गोष्टींमुळें राजकारणांत सारखे पेंचप्रसंग निर्माण होत.

सावरकरांपुढील प्रश्न

अशा परिस्थितींत १९२७ सालीं सावरकरांनीं राजकारणांत पदार्पण केलें. सावरकरांपुढें चार प्रश्न प्रामुख्यानें अुभे होते. त्यांना हिंदु-मुस्लीम अैक्याचे प्रयत्न ज्या अध्याहृत राष्ट्रवादी तत्त्वज्ञानामुळें चालले होते त्या हिंदी राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकावयाचा होता. राजकारणाचें निधर्मी स्वरूप जाअून जातीय स्वरूप आल्यामुळें, व हिंदूंच्या न्याय्य अधिकारांचा बळी देअून तडजोडवादी स्वराज्याच्या चळवळीचे प्रयत्न चालू असल्यामुळें हिंदूंच्या राजकीय अधिकारांचें रक्षण करणें अवश्य होतें. भारतीय

राजकारणांत १८८५ पासून हिंदु देशभक्तांनीं 'जातीय' दृष्टि बाळगली नव्हती; अगदीं काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनापासून मुसलमान व अितर अल्पसंख्य यांनाच आपल्या चळवळींत आणण्याचे त्यांचे प्रयत्न असत. त्यामुळें हिंदूंच्या राजकीय स्वार्थाचा विचारहि कधीं त्या देशभक्तांना शिवला नाहीं. पण जातीय मतदारसंघ व जादा प्रतिनिधित्व यांसारख्या लोकशाही-द्रोही कल्पना राजकारणांत घुसल्या, आणि त्यामुळें स्वतःचे लोकशाहींतील न्याय्य अधिकार जतन करण्यासाठीं कोणी तरी आवाज अुठविणें अवश्य होतें. सावरकरांपुढें हा दुसरा प्रश्न होता; आणि हें करण्यासाठीं स्वतःचा पक्ष काढावयाचा कां काँग्रेसमध्यें जाअूनच त्यांच्या अैक्यलंपट धोरणावर आघात करावयाचे ?—हेंहि अेक प्रश्नचिन्ह होतें. चौथा आणि अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढा पुढें चालवावयाचा होता.

मूलभूत विरोध

हीं कामें करण्यासाठीं सावरकर काँग्रेसमध्येंच कां शिरले नाहींत असा अेक प्रश्न नेहमीं विचारला जातो. त्या वेळींहि त्यांच्या अेका सहकाऱ्यानें सावरकरांना सांगितलें कीं तुम्हीं अेकदां वर्ध्याला जाअून गांधींना भेटा, आणि मग काय करावयाचें तें करा. सुभाषबाबूंनींहि स्वतः सावरकरांना काँग्रेसमध्यें येण्याचा आग्रह केला. पण सावरकरांनीं यांपैकीं कोणाचेंहि न मानतां प्रतिरथी म्हणून पुढें अुभें राहण्याचा, सर्व परिस्थिति बदलवून टाकण्यासाठीं अेकाकी लढण्याचा त्यांच्या पराक्रमी मनाला साजेसा असा निर्धार त्यांनीं केला. सावरकरांची ही अेक विशिष्ट मनोवृत्ति आहे. अेखादें तत्त्व सारा समाज विरोधानें अुफाळून अुठला असतां शांतपणें—किंबहुना आवेशानेंहि प्रतिपादीत राहण्यांत जो हौतात्म्यसदृश आनंद आहे त्याचा अट्टाहास सावरकरांना आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचें तें अेक वैशिष्ट्य आहे. त्याना समाजाचें नेतृत्व करण्यापेक्षां, समाजाला तत्त्वदर्शन घडवून आणणाऱ्या तत्त्वदूताची भूमिकाच अधिक आवडते. त्यांच्या या मनःप्रवृत्तींतून स्वयंप्रभुत्वाची (Self-assertion) भावना त्यांच्या ठिकाणीं प्रबळ झाली आहे. त्यांतून त्याचा अदम्य आत्मविश्वास, अशरणवृत्ति, आणि स्वमताचा

अुग्र आग्रह निर्माण झाला आहे. या त्यांच्या मनःप्रवृत्तीमुळेंच काँग्रेसमध्यें जाणें त्यांना पटण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यांनीं स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करण्याचा निर्धार केला.

दुसरें असें कीं, काँग्रेसचा राष्ट्रवाद व त्यांचें ब्रिटिशांविषयींचें धोरण यांच्याशीं सावरकरांचा मूलभूत मतभेद होता. त्यांच्या स्वतःच्या अशा राष्ट्रवादाविषयीं कांहीं कल्पना होत्या, आणि त्या काँग्रेसच्या कल्पनांशीं पूर्णपणें जरी नाहीं तरी बऱ्याच अंशीं विरोधी होत्या. गांधींचे हिंदु–मुस्लीम अैक्याचे प्रयत्नच त्यांना पसंत नव्हते. गांधींचे अहिंसा–सत्य–सत्याग्रह अित्यादि धोरणाशीं सावरकरांचें जमत नव्हतें. तेव्हां अितके मूलभूत स्वरूपाचे मतभेद असतांना अेखाद्या चळवळींत ती केवळ लोकप्रिय आहे म्हणून जाणें हें सावरकरांच्या तत्त्वग्राही मनोवृत्तींत बसणारें नव्हतें. काँग्रेस हा अेक संप्रदाय बनत चालला होता, अेखाद्या पोलादी चौकटीसारखी तिची स्थिति झाली होती. काँग्रेसमध्यें असलेले सर्वच लोक अेकाच राजकीय, सामाजिक, आर्थिक मताचे नव्हते; तर स्वातंत्र्याच्या चळवळीचें काँग्रेस हें अेक साधन होतें. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसमधून असंख्य लोक बाहेर पडले, व काँग्रेस हा अेक संप्रदाय राहिला. तो बदलण्याचे प्रयत्न काँग्रेस समाजवादी पक्षानें केले, पण त्यांतहि त्यांना अपयश आलें असल्याचें आपणांला पुढें पहावें लागलें. गांधीजींचें धोरण मान्य नसणारे, पण केवळ सत्तेचें राजकारण चालू होणार असें पाहतांच काँग्रेसमध्यें चिकटून राहिलेले ढोंगी, अहंमन्य, तत्त्वशून्य असे असंख्य लहान–मोठे लोक तेथें होते. आणि म्हणूनच स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचा अधःपात वेगानें झाला. काँग्रेसच्या या अधःपाताचीं बीजें पूर्वीच पेरलीं गेलीं होतीं.

हिंदुत्ववादी राजकारणाची घोषणा

सावरकरांनीं काँग्रेसच्या या अेकपक्षीय प्रभुत्वाला भुलून न जातां आल्याबरोबर प्रथमच घोषणा केली कीं, राष्ट्रीय सभा ही बहुसंख्य लोकांची संस्था आहे–म्हणून तिच्याविरुद्ध ब्रह्मि काढणें किंवा तिच्या बाहेर राहून आपल्या मताप्रमाणें कार्य करणें म्हणजे पातक आहे; ही कल्पना समूळ चूक

आहे;—म्हणून ती सोडून द्या. सावरकरांनीं अशा रीतीनें हिंदुमहासभेंत प्रवेश करून अेक हिंदुत्ववादी आंदोलन सुरू केलें. सात वेळां हिंदुसभेचे ते अध्यक्ष झाले, आणि आपल्या सात वर्षांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत सावरकरांनीं हिंदुत्ववाद ही अेक राजकीय कल्पना करून टाकली. त्यांचें प्रत्येक अध्यक्षीय भाषण हा अेक तर्कशुद्ध विचारसरणीवर आधारलेला प्रबंध असे. प्रत्येक भाषणांत त्यांनीं नवा सिद्धांत प्रतिपादन केला आहे. हिंदुत्व, हिंदु राष्ट्रवाद, अहिंसा—हिंसा, सैनिकीकरण, हिंदूंचें आर्थिक धोरण, व पाकिस्तानी मुसलमान व अैक्यवेडे हिंदु यांचें राजकारण—अित्यादींचें निर्भीड समीक्षण केलेलें आढळेल. या भाषणांत स्वप्नरंजन फारसें आढळणार नाहीं; कठोर वास्तववाद व स्वतःच्या शक्तीची मर्यादा ओळखून समाजाला दिलेला कार्यक्रम, वेंचणारा युक्तिवाद या गोष्टी त्यांत आढळतील. आपल्या अध्यक्षीय काळांत सावरकरांनीं देशाच्या कानाकोपऱ्यांत दौरे काढून हिंदुत्वाचा संदेश जनतेला दिला. सावरकरांच्या वक्तृत्वपूर्ण युक्तिवादांनीं त्यांनीं अनेक बुद्धिमंतांना आपल्याभोंवतीं गोळा केलें. बुद्धि अस्वस्थ करणारे विचार व हृदय हालवून सोडणाऱ्या भावना हीं त्यांच्या वक्तृत्वाचीं वैशिष्ट्यें अुत्कटत्वानें या काळांत प्रतीत झालीं. स्वतःच्या तत्त्वज्ञानावर अदम्य श्रद्धा, भोंवतालच्या परिस्थितीचें वस्तुनिष्ठ समीक्षण, समृद्ध कल्पनाशक्ति, आणि या सर्वांवर ताण करणारी त्यांची तळमळ यामुळें सावरकरांनीं आपल्याभोंवतीं अितक्या विरोधी परिस्थितींत बरींच माणसें जमविलीं. हिंदुसभा हें हिंदुत्वाचें राजकीय व्यासपीठ बनविलें, आणि मुस्लीम लीग व कॉंग्रेस यांच्याप्रमाणेंच देशाच्या राजकारणांत स्वतंत्र स्थान निर्माण करून दिलें. ज्या वेळीं 'भोंसकले जा, पण किंचाळूं नका' अशा मनोवृत्तीचें सर्वत्र राज्य होतें; निधर्मी राष्ट्रवादाच्या विकृतीमुळें 'मी हिंदु आहे' असें म्हणवून घेणें पाप होतें; त्या वेळीं सावरकरांनीं स्पष्टपणें जनतेला "अिंद्रपद जरी माझ्याकडे येत असलें तरी पहिला अहिंदु म्हणून जगण्यापेक्षां शेवटचा हिंदु म्हणून मी मरण पत्करीन" अशी प्रतिज्ञा करण्यास सांगितलें. कॉंग्रेस आपल्या चुकांची संख्या वाढवीत होती,—तडजोडवादी वृत्तीमुळें अधिकाधिक 'जातीय' बनत होती. त्यामुळें कॉंग्रेसच्या या बेगडी राष्ट्रीयत्वावर प्रखर टीका करून त्याचे

वाभाडे काढले. त्या वेळीं काँग्रेसविरुद्ध बोलणें म्हणजे राष्ट्रद्रोह होता. आज काँग्रेसनें अेकपक्षीय हुकुमशाही या देशावर लादली आहे असें म्हणणारे पुरोगामी विचारवंतहि त्या वेळीं काँग्रेस विरोधकांवर आग पाखडीत. सावरकरांना फॅसिस्ट म्हणत असतांना काँग्रेसची अेकपक्षीय मनोवृत्ति ते पोशीत होते. पण सावरकरांनीं हें कवच फोडलें, आणि काँग्रेसला विरोध करणें राष्ट्रद्रोहीपणाचें नाहीं, काँग्रेसला ताळ्यावर आणण्यासाठीं हें करणें अवश्य आहे अशा लोकशाहीच्या आधुनिक कल्पनेशीं सुसंगत असा स्पष्ट विचार मांडला. काँग्रेसच्या विरुद्ध आज देशांत असंख्य पक्ष अहेत, पण काँग्रेसच्या अेकपक्षीय नेतृत्वाला जर कोणीं छातीठोकपणें व तत्त्वनिष्ठ स्वरूपाचा प्रथम विरोध केला असेल तर तो सावरकरांनीं ! हिंदुत्ववादी राजकारणाची तुतारी अशा रीतीनें सावरकरांनीं फुंकली, व देशापुढें येणाऱ्या आगामी संकटाची जाणीव करून दिली.

फाळणीविरुद्ध लढा

पण सावरकर केवळ हिंदुत्ववादी राजकारणाची घोषणा करून थांबले नाहींत. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय काळांत हिंदु महासभेच्या आधारें हिंदूंची संसदीय (पार्लमेंटरी) आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न केला. जातीय मतदारसंघांमुळें राजकारणाला जातीय स्वरूप प्राप्त झालें असल्यामुळें ही आघाडी अुघडणें अवश्य होतें. वस्तुतः सावरकर हे क्रांतिवादी मनोवृत्तीचे, त्यांनीं या भानगडींत पडणें त्यांच्या पूर्वीच्या भूमिकेशीं सुसंगत नव्हतें. पण यापुढें काँग्रेसच्या मुस्लीम-धार्जिण्या धोरणामुळें ही आघाडीहि लढविणें अवश्य आहे, असें वाटल्यामुळें त्यांनीं ही भूमिका घेतली.

अेखाद्या शिकारी कुत्र्याला जसा जनावराचा वेध लागतो तसें सावरकरांनीं या बाबतींत भावी संकट कोणतें होतें हें ओळखलें. १९२८ सालीं सिंध मुंबअी प्रांतापासून वेगळा करण्याची कल्पना निघाली त्या वेळीं सावरकरांनीं हिंदूंना अिषारा दिला*—

* श्रद्धानंद साप्ताहिकांत १९२८ मध्यें प्रसिद्ध झालेलें पत्रक.

"सिंधचा प्रांत निराळा करण्यांत आम्हांस मुसलमानी प्रांत अुत्पन्न करावयाचा आहे असें मुसलमान स्पष्ट सांगत आहेत. त्यांचा दुष्ट हेतु अितका प्रबळ झाला आहे कीं तो छपवून ठेवण्याची-देखील त्यांस आवश्यकता भासत नाहीं. अशा स्थितींत कोणत्याहि हाडाच्या हिंदूनें त्यास पाठिंबा देअूं नये. अरबस्तानपासून सिंधूपर्यंत मुसलमान जगताची सीमा झाली ती पुरे आहे. आतां राजपुतान्याचे दारापर्यंत ती आणून देअूं नका! आणि अेकीविषयीं विचाराल तर, असा अेक सिंध काय—असे दहा सिंध तुम्हीं त्यांच्या दुष्ट क्षुधेस बळी दिलेत तर ते अकरावा सिंध मागूं लागतील! अेकीसाठीं जों जों तुम्ही हांजी हांजी कराल तों तों हांजीसाहेब आणखीच बेकीच्या गोष्टी बोलूं लागतील. अेकी तुम्हांस हवी तर करा! अेकी होअील. तीपार्यीं सिंधचा बळी देण्याचें कारण नाहीं. त्याचा कांहींअेक अुपयोग नाहीं. त्यांत हिंदूंची भयंकर हानी आहे. आणि हिंदी राष्ट्राचेंहि लवलेश हित नाहीं.

अेतदर्थ, आमच्या हिंदुसभेस व सिंधच्या हिंदु बंधूंस अशी आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं या घातक ठरावाच्या निषेधच करीत राहावें. आपल्या धर्माच्या आणि जातीच्या सिंध प्रांतांतील पुरातन अस्तित्वाच्या मृत्यूच्या वॉरंटावर निदान आपण स्वतः तरी सही करूं नये. मग अपरिहार्यतेनें घडेल तें घडो!"

सिंधची मुंबअी प्रांतापासून फाळणी झाली, नि मुसलमान भारतीय अैक्याला सुरुंग लावण्यासाठीं मुस्लीम बहुसंख्य प्रांत तयार करण्याच्या मार्गास लागले होते. सीमा-प्रांत, पंजाब, बंगाल, आसाम, सिंध हीं त्यांचीं लक्ष्यें होतीं; आणि तेथें प्रांतिक स्वायत्ततेनुसार स्वतःचीं सरकारें स्थापून भारताच्या संयुक्त राज्यघटनेपासून फुटून निघावयाचें हे त्यांचे मनसुबे होते. स्वतंत्र प्रदेश मिळाला कीं स्वतंत्र राज्याची कल्पना मागोमाग येते. मुसलमान प्रांतांतील हिंदूंना ओलीस ठेवण्याची संधि मिळेल या हेतूनें ही सिंधची मागणी करण्यांत आली होती, अें त्या वेळीं डॉ. आंबेडकरांनाहि

स्पष्ट सांगितले होतें. सावरकरांनीं सिंध वेगळा करण्याच्या वेळीं दिलेल्या इषाऱ्याची प्रचीति लगेच १९३० सालीं मुस्लीम लीगच्या अधिवेशनांत सर महंमद अिक्बाल यांनीं केलेल्या त्या प्रसिद्ध भाषणांत आलीच. ते म्हणाले, "युरोपीय लोकशाहीचीं तत्त्वें भारतांत लावतां येणार नाहींत. येथील जातीय गट आपण लक्षांत घेतले पाहिजेत. म्हणून या दृष्टीनेंच भारतांतच 'मुस्लीम भारत' निर्माण करण्याची मुस्लीमांची मागणी न्याय्य आहे. पंजाब, वायव्य सीमा प्रांत, सिंध व बलुचिस्तान हे अेका राज्यांत आलेले पहाण्याची माझी अिच्छा आहे."

सावरकरांच्या भविष्याची प्रचीति अितक्या लवकर दुर्दैवानें येअील अशी त्यांनाहि कल्पना नसेल. म्हणून १९३७ सालीं राजकारणांत पडल्यापासून मुसलमानांच्या या संकट'वरच भर देअून हिंदूंना संघटित करण्याचा प्रयत्न केला. १९३७ सालीं नागपूर येथें अेका भाषणांत सांगितलें—

"तुर्कस्तान, अरबस्तान, अिजिप्त, अिराण, व अफगाणिस्तान या पांच मुसलमान राष्ट्रांनीं आपसांत तह केला असून अफगाणिस्तानच्या खालीं सरहद्द प्रांत, कश्मीर, पंजाब, व सिंध असे हिंदुस्थानातील प्रांत आपल्या ताब्यांत घेअून मुसलमानांचें अेक पाकिस्तान निर्माण करण्याचीं सुखस्वप्नें मुसलमानांना पडूं लागलीं आहेत. तेव्हां हिंदुस्थानांत स्वातंत्र्य मिळविण्याच्या बाबतींत मुसलमान समाज अंतःकरणपूर्वक झटेल हें मानणें भ्रामक आहे."

तीनच वर्षांनीं बरोबर मुस्लीम लीगनें लाहोरला पाकिस्तानची घोषणा केली, आणि त्यासाठीं सर्व दृष्टींनीं तयारी सुरू झाली. या वेळीं युद्ध सुरू झालें होतें. १९४२ सालीं काँग्रेसनें लढा पुकारला. त्या वेळींहि सावरकरांनीं हिंदूंना पुन्हां अिशारा दिला कीं—'चले जाव' चळवळीची अखेर फाळणीच्या राजकारणांत होणार आहे. पण काँग्रेसच्या ठरावाचें स्वागत करून सावरकरांनीं काँग्रेसला सुचविलें—

" काँग्रेसनें (Quit India) या घोषवाक्याला मर्यादा न घालतां त्याचा नेहेमींचा शब्दार्थ स्वीकारावा. या चळवळीनें आधीं जर चार अधिकार जास्त मिळाले, व हिंदु—मुस्लीम करार करण्याची वेळ आली, तर काँग्रेसनें पुढील स्पष्ट अभिवचनें घोषित करावींत. हिंदुस्थानचें ऐक्य व अखंडत्व हें त्रिकालाबाधित असून त्याच्या रक्षणासाठी आम्ही बांधले गेलों आहोंत ! असें काँग्रेसनें अभिवचन द्यावें. हिंदुस्थानांतील सर्व जातींना सारखींच संरक्षणें दिलीं जातील, राज्यघटनेंत संयुक्त मतदारसंघ अस्तित्वांत येतील, परंतु त्याअैवजीं विभक्त मतदारसंघ हवे असतीलच तर प्रत्येक जातीला लोकसंख्येच्या मानानेंच प्रतिनिधित्व मिळेल. सरकारी नोकरांची योग्यता फक्त गुणांवरच ठरविली जाअील. हें धोरण काँग्रेसनें निःसंदिग्धपणें जाहीर करावें. त्याचप्रमाणें ' हिंदुस्थानाबाहेर आम्हांला कमलीच महत्त्वाकांक्षा नसून आम्ही फक्त हिंदुस्थानशींच अेकनिष्ठ आहोंत ' अशी हमी काँग्रेसनें देशांतील सर्व जातींकडून घ्यावी."

१९४२ चा लढा सुरू होण्यापूर्वी केलेली अपेक्षा दुर्दैवानें खरी ठरली. १९४४ सालीं पुन्हां राजकीय पेंचप्रसंग सुरू झाला. जिना—गांधी यांचीं अैक्याचीं बोलणीं सुरू झालीं. जिनांनीं पाकिस्तानच्या तत्त्वाला अगोदर मान्यता द्या असा घोशा लावला. काँग्रेस नेते चडफडले. १९४५ सालीं मुंबअीत भरलेल्या अ. भा. काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनांत मुस्लीम लीगशीं लढण्याची, तरवारीला तरवार भिडण्याची भाषा सुरू झाली.

सावरकरांनीं या भाषेंतील अर्थ हिंदूंना पूर्वीच समजावून सांगितला होता. ते म्हणाले होते—

" हिंदुमहासभावाद्यांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी कीं, पाकिस्तानच्या सिद्धीसाठीं मुसलमान ज्या बंडाचा धाक घालीत त्या बंडाचा अर्थ कांहींहि असला तरी पाकिस्तानच्या प्रस्थापनेच्या कोणत्याहि प्रयत्नाला विरोधण्याचा नि प्रतिकाराचा सर्व भार आणि यशापयशाचें सर्व श्रेय हें त्यांना घ्यावें लागणार आहे.

काँग्रेसवाले—भ्रान्त राष्ट्रीयत्वाचे पाठीराखे हिंदु—हिंदु म्हणून मुसलमानांना शरण जातील, व नुसते तटस्थच राहणार नाहींत असें नाहीं; तर तुमच्याविरुद्ध झुंजतीलहि, हें तुम्ही विसरतां कामा नये. म्हणून हिंदुस्थानच्या अखंडत्वाची ही झुंज झुंजण्यासाठीं तुम्ही हिंदुत्वनिष्ठांनीं आपल्या सर्व सामर्थ्याचा संचय केला पाहिजे. तुम्ही आपल्यांतील ती निष्ठा यत्किंचित्हि कमी होऊं देतां उपयोगी नाहीं. हिंदुस्थानची फाळणी होऊन मिळणाऱ्या स्वराज्यांत कांहींच अर्थ नाहीं.

ब्रिटिशांचें राज्य ज्यापमाणें आपणांवर लादण्यांत आलेलें आहे त्याप्रमाणें हें फाळणीचें स्वराज्य कदाचित् आपणांवर लादण्यांत येईल. पण लादलेलें आहे म्हणून कांहीं इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणें आपणांस सोडावा लागला नाहीं, त्याचप्रमाणें आपण होऊन, जर अलीकडे पावसाळी छत्र्यांप्रमाणें उगवणाऱ्या विविध योजनांपैकीं एखाद्याच्या आहारीं गेलों नाहीं तर, पितृभूचें स्वातंत्र्य आणि अखंडत्व या दोन्ही मागण्यांसाठीं आपण झुंजूं. येवढेंच नाहीं तर स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर आपण त्या सिद्धहि करून घेऊ असा विश्वास ठेवा. ”

पण हिंदूंची सत्त्वपरीक्षा पहाण्यासाठींच जणुं कांहीं मुस्लीम लीगनें याच वेळीं आपलें सामुदायिक दंग्यांचें तंत्र सुरू केलें. गझनफर अल्लीखान-सारख्या नेत्यांनीं ‘ कांहीं लाख मुसलमान हिंदूंना भारी ठरतील ’ असें दटावण्यास सुरुवात केली. सावरकरांनींहि याच वेळीं मराठ्यांनीं मुस्लीम सत्तेची कशी धूळधाण उडविली होती याची आठवण मुसलमानांना करून दिली. १४ जानेवारी १९४६ ला अहमदाबाद येथें सरदार पटेलहि गरजले—

“ पाकिस्तान देणें हें ब्रिटिशांच्या हातीं नाहीं. पाकिस्तान मुसलमानांना हवेंच असेल तर तें हिंदु व मुस्लीम यांच्या युद्धांतूनच येऊंल. येथें यादवी युद्धच होऊंल. कांग्रेस आतां लीगच्या दरवाजे ठोठावणार नाहीं. काँग्रेसनें लीगशीं तडजोड करण्याचे प्रयत्न अनेक वेळां केले,—पण प्रत्येक वेळीं लीगनें लाथ मारली आहे ! ”

अशा घोषणा काँग्रेस नेत्यांनीं चालविल्या होत्या, पण कृति मात्र कच खाणारी होती. राजाजींच्या, भुलाभाईंच्या मुखानें पाकिस्तान स्वीकारण्याची भाषा चालू असे. काँग्रेस पाकिस्तान स्वीकारण्याच्या पंथाला येतच होती. कलकत्ता, नौखाली येथें १९४६ मध्यें भयानक हत्याकांड झालें. लीगवाल्यांशीं लढणारे लटपटूं लागले. मदन मोहन मालवीया-सारख्या शांतिब्रह्माचें हृदयहि क्रुद्ध झालें.—त्यांनीं मृत्यूपूर्वी अेक पत्रक काढून हिंदूंना संघटित होण्याचा आदेश दिला. काँग्रेस नेते शांत राहाण्याचा आदेश देत; त्यांतील नेहरूंसारख्यांनीं आपला तोल सोडला. अत्याचारांचा डोंब ज्या ठिकाणीं भुसळला होता त्या नौखालींत जे स्त्रियांची अब्रु रक्षण्या-साठीं धांवले नाहींत ते बिहारमध्यें बाँब फेंकण्यासाठीं धांवले! आणि हिंदु समाजाच्या त्या सुपुत्रांनीं तो पराक्रम केलाहि. बिहारमध्यें अेके ठिकाणीं अेकाच वेळीं १०० गोळ्या झाडून ३०० माणसांना 'शांति' दिली, ही स्वजनद्रोही असहाय्य दुर्बल वृत्ति पाकिस्तानचें संकट निवारूं शकत नव्हती!

शेवटीं व्हावयाचें तेंच झालें. दंग्यांचा हेतु साधला. सत्ता येत आहे हें काँग्रेसला दिसूं लागलें, आणि मग भाषा बदलली. 'देहाचें विच्छेदन होअील, पण भारताचें विच्छेदन होअूं देणार नाहीं' असें म्हणण्यामागचा पींळ लुळा पडला. तलवारी म्यानांतच राहिल्या. पुन्हां लीगचे दरवाजे ठोठावण्यांत आले. १४ अेप्रिल १९४७ला मुंबअीच्या अेका समेंत सरदार पटेल म्हणाले,—*
"भारताची फाळणी व्हावयाची असेलच तर ती आपापसांतील चर्चेनें व शांततामय मार्गांनीं!" नेहरू संयुक्त प्रांताच्या राजकीय परिषदेंत २९ अेप्रिल १९४७ ला म्हणाले—"मुस्लीम लीगला पाकिस्तान हवेंच असेल तर त्यांनीं तें घ्यावें!" गांधीनींहि विरोध केला नाहीं. जिनांच्या धूर्त हटवादाचा, ब्रिटिशांच्या राजकीय नीतीचा विजय होणार—आणि हिंदी राष्ट्रवाद्यांना जमातवादापुढें लोटांगण घालावें लागणार हें जवळजवळ निश्चित झालें!

या काळांत जें जें करण्यासारखें होतें तें सावरकरांनीं केलें. प्रकृतीची तमा न बाळगतां हिंदूंना या संकटापासून वांचविण्याचा प्रयत्न केला.

---

* What I saw in Bihar—Balshastri Hardas, page 108.

हिंदुत्वाला लढाऊ राजकारणांत आणलें; अेक पक्ष-संघटना उभारली. पण सावरकरांना अखेर अपयश येणार हें दिसूं लागलें. हिंदुसभेच्या विचारसरणीचा प्रभाव पडला नाहीं, हिंदु जागृत झाले नाहींत. ते काँग्रेसच्या मागेंच फरफटत गेले. सावरकरांचें तत्त्वज्ञान किंवा धोक्याचे अिषारे फुकट गेले. त्या काळचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेलनें सावरकरांजवळ बोलतांना अेकदां पुढील आशयाचे उद्गार काढले होते—

"तुमचें म्हणणें पूर्णपणें तर्कशुद्ध व खरें आहे. तुमचा दृष्टिकोणाहि बरोबर आहे. हिंदुमहासभा हीच हिंदूंचें प्रतिनिधित्व करूं शकेल हेंहि मला मान्य आहे. पण माझ्या म्हणण्याप्रमाणें काँग्रेस आतां सवर्ण हिंदूंचें प्रतिनिधित्व करण्यास सिद्ध आहे. जिनांनाहि तेंच हवें आहे. काँग्रेस हा मोठा राजकीय पक्ष आहे. तेव्हां माझी मुख्य अडचण दूर झाल्यामुळें मला तुमची भूमिका पटत असली तरी हिंदुमहासभा ही हिंदूंची प्रतिनिधि म्हणून ब्रिटिश सरकार मानूं शकेल असें वाटत नाहीं."

सावरकरांनीं केलेलीं राजकीय भविष्यें तंतोतंत खरीं ठरलीं, पण त्यांनीं समाजाकडून केलेली सामर्थ्याची अपेक्षा फोल ठरली. सावरकरांनीं अखंड भारतासाठीं केलेला हा संग्राम हें त्यांचें मुख्य राजकीय कार्य आहे. त्यांना अपयश आलें असलें तरी अेका व्यक्तीला जें जें करणें शक्य आहे तें तें त्यांनीं केलें. त्यांना आलेलें अपयश हें त्यांचें नसून सर्व हिंदु समाजाचें तें दारुण अपयश आहे. अेखाद्या हरत चाललेल्या युद्धांत आपल्या सैनिकांना पूर्व-पराक्रमाची आठवण देऊन युद्धास प्रोत्साहित करणाऱ्या व अपुऱ्या शक्तीनिशीं नवे डावपेंच खेळणाऱ्या सेनापतीचें कार्य सावरकरांना करावें लागलें! हें कार्य त्यांनीं केलें हेंच त्यांचें वैशिष्ट्य.

अहिंसेला तात्त्विक विरोध

सावरकरांनीं गांधीजींच्या हिंदु-मुस्लीमविषयक धोरणास विरोध कां केला, आणि त्या धोरणाचें पर्यवसान काय झालें हें आपण पाहिलें. गांधीजींच्या

जीवनांत प्राणभूत असें महत्त्व ज्याला आहे त्या अहिंसा तत्त्वालाहि सावरकरांनीं तात्त्विक विरोध केला. गांधीजींची अहिंसेवर अितकी श्रद्धा होती कीं, भारतानें अहिंसेचा मार्ग सोडला तर भारतावर माझें प्रेम राहणार नाहीं असें ते म्हणत. पण गांधीजींची सर्व विचारसरणी प्रा. गोवर्धन पारीख यांनीं आपल्या गांधीजींवरील पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें धार्मिकतेवर आधारलेली होती. सारी सजीव सृष्टि त्यांच्या विचारांच्या कक्षेंत येअी. म्हणूनच साप-रोगग्रस्त वासरूं मारावें कीं नाहीं अित्यादि प्रश्न तेथें अुद्भवत. गांधीवादाची बैठक केवळ मानव्य नाहीं, भूतदयावादी दृष्टि तेथें प्रधान आहे. त्यामुळें जीवनांतील प्रत्येक गोष्टीकडे त्यांनीं याच दृष्टीनें पाहिलें. त्यांचा अहिंसेचा आग्रह शास्त्रीय दृष्ट्या त्यांना मांडतां आला नाहीं याचें कारण त्याचा निकष बुद्धि नव्हता, भावना होता. ब्रिटिशांसारख्या शत्रूंशीं लढतांना त्यांनीं अेक अहिंसात्मक तंत्र शोधून काढलें, आणि त्याच्या जोरावर आपण अेक क्रांति घडवून आणली असें आजकाल काँग्रेस नेते सांगतात. पण ही स्वतःची फसवणूक आहे. अहिंसेनें शत्रूला जिंकता येतें हा जर सिद्धान्त असेल तर कश्मीरवर गांधीजींच्या हयातींतच कां सैन्य पाठवावें लागलें ? अहिंसेनें मुसलमानांच्या देशघातकी भावनांना कां आळा घालतां आला नाहीं ? मनानें, वाचेनें व कृतीनें अहिंसापालन हा गांधींचा आग्रह होता; पण हा नियम पाळला गेला का – आणि तो पाळणें तरी शक्य आहे काय ?

सावरकरांनीं याच पार्श्वभूमीवरून गांधीजींच्या अहिंसावादाला विरोध केला. सावरकरांच्या विचारसरणीचें अधिष्ठान अुपयुक्ततावादी व प्रत्यक्षनिष्ठ दृष्टिकोण हें आहे. गांधींच्या अहिंसेला यामुळेंच त्यांनीं विरोध केला. ती कशी अव्यवहार्य आहे, शास्त्रदुष्ट आहे हें सांगितलें. गांधीजींशीं मतभेद बाळगणारे त्या काळीं दोन प्रकारचे लोक होते. गांधी हे थोर आहेत, त्यांची अहिंसा आमच्यासारख्या लहान माणसांना मानवणारी नाहीं – असें मानणारे, आणि हिंसा हाच जीवनाचा नियम आहे, अहिंसा हें खूळ आहे असें म्हणणारे. सावरकर हे तिसऱ्याच प्रकारचे विरोधक आहेत. ते हिंसा हा नियम मानीत नाहींत, आत्यंतिक अहिंसा मात्र अव्यवहार्य आहे, किंबहुना

तें पाप आहे असें मानतात. सावरकरांनीं आपल्या या मताचें स्पष्टीकरण पुढील शब्दांत केलें आहे—

" आम्ही जेव्हां तुमच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा धिक्कार करतों, तेव्हां साधुत्वाच्या दृष्टीनें आम्ही कांहीं कमी आहोंत म्हणून नव्हे, तर तुमच्यापेक्षां आम्हांस अधिक अक्कल आहे म्हणून ! मर्यादित अहिंसावाद हें आमचें ध्येय आहे. आत्यंतिक अहिंसावाद मानणें व त्यासाठीं कोठल्याहि प्रकारच्या आक्रमणाच्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणें हें महात्मापदाचें लक्षण नसून तें मिथ्यावादाचें आणि मूर्खपणाचें लक्षण आहे. आपण जगाच्या तत्त्वज्ञानांत अेक नवें तत्त्वज्ञान प्रसृत करणार आहोंत असें म्हणणें भाकडपणा आहे. तुम्ही कदाचित् अितिहासांत नवीन भर घालूं शकाल, पण निसर्गाचा जो नियम आहे त्यांत कांडीमात्र फरक करूं शकणार नाहीं. "

गांधीजींच्या अहिंसेवरील सावरकरांनीं केलेली टीका ही हिंस्र वाटत असली तरी गांधीजींचा अहिंसावाद हा या देशांत त्यांच्या आयुष्यांत-देखील पराभूत झाला होता हें मान्य केलें पाहिजे. मर्यादित आणि स्वसंरक्षणार्थ हिंसा हा—मनुष्य नव्हे, तर प्राणीजीवनांतील नियम आहे. त्याचाच आधार घेतल्याविना मनुष्य जगणार नाहीं. म्हणून गांधींना भारत—पाकिस्तान यांचे संबंध १९४७ च्या अखेरीस बिघडत चालले तेव्हां हें स्पष्टपणें म्हणावें लागलें कीं*—" मी युद्धाला सतत विरोध करीत आलों आहे; पण पाकिस्तानला न्याय मिळविण्याचा दुसरा कोणताच मार्ग नसेल, आणि पाकिस्तान आपली सिद्ध झालेली चूक न सुधारतां तिला क्षुद्र स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत असेल तर भारतीय संघराज्याला त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारावें लागेल. युद्ध कोणालाच नको असतें. कारण त्यामुळें विनाश होतो. पण मी कोणालाहि अन्याय सहन करा असें सांगणार नाहीं. "

गांधींना हें अपयश कां आलें ? त्यांच्याच विचारांत ही विसंगति कां आली ? याचें कारण जें अशक्य, अप्राप्य होतें तें शक्य करण्याचा, मिळ-

---

* Delhi Diary—Page 40—Speech made on 26-9-47.

विण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. राजकारण व समाजाचे व्यवहार यांच्याकडे त्यांनीं भूतदयेवर आधारलेल्या धर्मनिष्ठ अहिंसेनें पाहिलें. आणि अेखादा गुणाकार न कळतां चुकल्यावर जसें साधें गणित हें न सुटणारें कोडें होऊन बसतें तसें झालें. पण हिंदुत्वनिष्ठ टीकाकारांनीं गांधींची ही भूमिका, राजकारण आणि मानवी व्यवहार शुद्ध करण्याची त्यांची तळमळ ओळखली नाहीं, हें मात्र येथेंच मान्य केलें पाहिजे. आज व्यक्तीचें स्वातंत्र्य टिकवून त्याला सुखी करणारी समाजरचना शोधण्याची धडपड जशी चालू आहे त्याचप्रमाणें गांधींनीं नैतिक भूमिकेवरून साध्य-साधनांचा प्रश्न हाताळला हें विसरतां कामा नये. हिंसेनें संरक्षण करतां येतें, हें न कळण्याअितके गांधीजी बुद्धिहीन खास नव्हते. पण बोलून चालून अेक नवा प्रयोग त्यांनीं केला. त्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें पाहिजे. त्याचें मूल्यमापनहि तसेंच झालें पाहिजे. राजकीय विचारवन्त म्हणून सावरकरांनीं पुरस्कारलेलीं अहिंसा-विषयक मतें बरोबर आहेत, हें मान्य करूनहि साध्य साधनांचा अेक मूलभूत प्रश्न जगापुढें अुपस्थित करणारे विचारवन्त म्हणून गांधींचें स्थानहि अनन्य-साधारण आहे. तथापि राजकारणी माणसाला आपल्या भोंवतालच्या परिस्थितीकडे वस्तुनिष्ठेनें पाहावें लागतें, आणि त्या दृष्टीनें सावरकरांनीं निर्भीडपणें आपलीं अहिंसाविरोधी मतें मांडलीं हेंसुद्धां महत्त्वाचें आहे.

सारांश, सावरकरांनीं आपल्या तर्कशुद्ध युक्तिवादानें काँग्रेसच्या राष्ट्रवादी विचारसरणीतील दोष स्पष्टपणें पुढें मांडले. राजकारण जातीयवादीच होत जाणार, व तेंसुद्धां घटनात्मक स्वरूपांतच होत राहणार, हें ओळखून हिंदुत्वाचा राजकीय दृष्टिकोण सांगून 'राजकारणाचें हिंदुकरण करा' असा संदेश दिला. मुसलमानांच्या जातीयवादाचीं स्वप्नें हाणून पाडण्यासाठीं हिंदूंनीं स्वतःचा राजकीय पक्ष काढणें अवश्य आहे असें ठरवून हिंदु-महासभेला या देशांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलें. हिंदूंची ही राजकीय आघाडी बळकट करण्याचे प्राणापलीकडे प्रयत्न केले. तात्त्विक दृष्ट्या हिंदुत्व, हिंदु राष्ट्र, व मर्यादित अहिंसावाद या कल्पना रूढ करून वैचारिक आंदोलन अुभारलें. सावरकरांच्या या राजकीय विचारप्रणालीचें व कार्याचें स्वरूप पाहिल्यावर ॲरिस्टॉटलसंबंधीं त्याच्या अेका चरित्रकारानें काढलेले

अुद्‌गार आठवतात. ॲरिस्टॉटलचें श्रेष्ठत्व सांगतांना त्यानें म्हटलें आहे कीं, ॲरिस्टॉटलचा मोठेपणा त्यानें जे प्रश्न निर्माण केले त्यांत आहे. सावरकरांच्या राजकीय कार्याचें कर्मीत कमी अेवढें महत्त्व तरी कोणत्याहि निःपक्षपाती टीकाकाराला 'मान्य करावेंच लागेल,—अितके मूलगामी प्रश्न त्यांनीं राजकारणांत अुपस्थित केले.

हिंदुत्ववादी राजकारणांतील दोष

अितके महत्त्वपूर्ण विचार मांडूनहि हिंदुत्वाची चळवळ ही अेकपक्षीय कां झाली आहे? तिचा प्रभाव समाजावर कां पडूं शकला नाहीं? हिंदुत्ववादी राजकारणाबद्दल घृणा कां निर्माण झाली? या सर्व प्रश्नांचीं अुत्तरें शोधल्याविना हिंदुत्ववादी राजकारणाचें मूल्यमापन पुरें होणार नाहीं. आज अशी समजूत प्रसृत झाली आहे कीं, हिंदी राष्ट्रवादाचा विजय झाला असून हिंदु राष्ट्रवाद गाडला गेला आहे. हें खरें आहे काय? वस्तुतः कोणाच्याच तत्त्वज्ञानाचा पराभव झालेला नाहीं. हीं दोन्ही ध्येयें परस्पर-विरोधी आहेत—असा जो आभास निर्माण करण्यांत आला आहे त्यामुळें ही समजूत पसरली आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदी राष्ट्रवादी भारत हें अेकजीव राष्ट्र आहे असें जे समजत, आणि त्यामुळें जें राजकारण करीत त्या राजकारणाचा पाकिस्तानच्या प्रस्थापनेनें संपूर्ण पराभव झाला आहे. हिंदी राष्ट्र हें अेक स्वप्न आहे, आणि तें अजूनहि डोळ्यांसमोर ध्येय म्हणून ठेवण्यास हरकत नाहीं. याअुलट हिंदु-राष्ट्रवादी लोक भारत हें संमिश्र व अेकजीव झालेलें हिंदु-मुस्लीमांचें राष्ट्र नाहीं हें सांगत; आणि त्यानुसार 'जशास तसें' धोरण मुसलमानांविषयीं ठेवा असा आग्रह धरीत. हें त्यांचें राजकीय विश्लेषण तंतोतंत खरें ठरलें आहे. पण त्यांचा पक्ष मात्र लोकप्रिय राहिलेला नाहीं; अुलट काँग्रेसला सत्ता मिळाल्यामुळें तिची लोकप्रियता बरीचशी टिकून आहे. यावरून हा पराभव तत्त्वज्ञानाचा नसून पक्षाचा आहे हें आपणांला दिसून येअील. हा पराभव होण्यास त्या पक्षाचे लोक कारणीभूत आहेत, तशी परिस्थिति व त्यांच्या हातीं असलेल्या साधनसंपत्तीचा अुपरेपणा हीं दोन्ही कारणें महत्त्वाचीं आहेत. हिंदुत्ववाद्यांना काँग्रेससारख्या

साठ वर्षांच्या लढाऊ परंपरा मागें असलेल्या देशव्यापी पक्षाशीं सामना द्यावयाचा होता ! कॉंग्रेसजवळ भांडवलदारांचा पैसा, पहिल्या दर्जाचे गांधींसारखे नेते, आणि स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमि—या तीन गोष्टी होत्या. त्यामुळें त्यांची पक्कड त्या वेळींहि ढिली होऊं शकली नाहीं, आजहि होत नाहीं. हा देश भक्तिमार्गी आहे, विभूतिपूजक आहे; आणि ती पूजा राजकारणांतहि शिरल्यामुळें जनतेला केवळ तर्कवादी राजकारणानें आपल्याकडे ओढणें त्या वेळीं हिंदु राष्ट्रवाद्यांना कठीण होतें. हिंदु राष्ट्रवाद्यांजवळ साधनसंपत्ति नव्हती; लोकप्रियतेअैवजीं लोकांचा क्रोधच त्यांच्या नशिबीं होता. त्यांच्या दुर्दैवानें १९३७ पासून १९४७ पर्यंत सर्व घटना अितक्या वेगानें घडत गेल्या कीं, जनमानसांत अढळ स्थान मिळविणें शक्य झालें नाहीं. ब्रिटिश व मुस्लीम जमातवाद या दोघांविरुद्ध त्यांना सामना द्यावयाचा होता, आणि कॉंग्रेसविरुद्धहि लोकमत अुठवावयाचें होतें. अशा तिहेरी कैचींत सांपडलेल्या हिंदुत्ववाद्यांना पराभव पत्करावा लागला असेल—तर तो सर्वथैव त्यांच्या पक्षाचा किंवा नेत्यांचा दोष आहे अॅसें म्हणणें अन्यायाचें ठरेल.

अकरणात्मक दृष्टि

सावरकरांना कॉंग्रेस राजकारणांतील दोष दाखवून हिंदूंना जागृत करावयाचें होतें हें खरें आहे. पण त्यांच्या मनांत असो वा नसो, हिंदुत्ववादी राजकारणाला अेवढेंच अेकांगी स्वरूप आलें. मुस्लीमविरोध व कॉंग्रेसविरोध हीं सर्व राजकारणाचीं सूत्रें झालीं. सावरकरांच्या भाषणांत जी टीका असे ती कटु असली तरी खरी असे. पण समाजाला अेखादी गोष्ट तर्कशुद्ध आहे म्हणून तो ती स्वीकारीत आहे,—किंवा तर्कदुष्ट आहे म्हणून ती टाकीत नाहीं. पण सावरकर व त्यांचे सहकारी यांनीं जें कॉंग्रेसविषयक धोरण पत्करलें होतें, तें सांप्रदायिक निष्ठेला धक्का देणारें होतें याबद्दल कोणी कांहीं म्हणणार नाहीं. त्यांत द्वेष, भावविवशता या गोष्टी मिसळल्या. त्यामुळें राजकारणांतील सर्वंकषता व समतोलपणा गेला. अल्पसंख्य विरोधकाला जर बहुसंख्या मिळवावयाची असेल तर केवळ तर्कशुद्ध युक्तिवाद मांडून चालत नाहीं,

त्या समाजाला वश करणाऱ्या चळवळी कराव्या लागतात. गांधीजींच्या लोकप्रियतेचें हें वैशिष्ट्य होतें. त्यांनीं संततिनियमनापासून तों औद्योगिक विकेंद्रीकरणापर्यंत अनेक नवे विचार मांडले, ते सर्व व्यवहारांत आणण्यासाठीं नव्या संस्था काढल्या. याखेरीज गांधीजी हे स्वातंत्र्य लढे करून नवें सामर्थ्य गोळा करीत, आणि त्यांतून काँग्रेसचें सामर्थ्य वाढत जाअी. अतीव काँग्रेस द्वेषामुळें व्यक्तिनिंदा आणि अकरणात्मक दृष्टिकोण हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणांत दिला. व्यक्तिनिंदा किती चालू असे हें पहावयाचें असल्यास त्या वेळचीं हिंदुत्वनिष्ठ वृत्तपत्रें पहावींत. त्यांत अशिष्टपणा व वाईट अभिरुची असे. 'नराधम' नेहरू यासारखीं शेलकीं विशेषणें वापरण्याचें धाडस त्या वेळीं त्यांनीं केलें. स्वतःच्या हेकट आणि द्वेषपूर्ण वर्तनानें समाजांत अनादर निर्माण करून घेतला.

हें अकरणात्मक धोरण शेवटपर्यंत टिकलें. शुद्धि, साक्षरता-प्रसार, अितर समाजसेवेचीं क्षेत्रें यांकडे दुर्लक्ष झालें, आणि सदैव राणा भीमदेवी थाटाचीं पूर्वजांचीं स्तुतिस्तोत्रें गाणारीं भाषणें, व काँग्रेसची निंदा हाच हिंदुत्ववाद्यांचा कार्यक्रम होऊन बसला. सावरकर हे बलवादी, लढाऊ राजकारणी आहेत. त्यांनीं ज्या काळांत राजकारण केलें तो भयग्रस्त अवस्थेचा होता. त्यामुळें समाजांतील सावरकरांचीं भाषणें मिटक्या मारीत अैकणें अेवढेंच प्रौढांचें काम झालें, आणि हिंदुसभा ही काँग्रेसनिंदकांचीच संस्थाच आहे असा समज सर्वत्र पसरला.

स्वातंत्र्याचें आंदोलन

या अकरणात्मक वृत्तीमुळें जनतेच्या स्वातंत्र्यलढ्यापासून हिंदुत्ववादी बाजूला पडले. गांधींचा सत्याग्रह व त्यांचें राजकारण अमान्य म्हणून त्यांच्याशीं सहकार्य नाहीं, आणि सशस्त्र बंड शक्य नाहीं म्हणून त्याकडेहि दुर्लक्ष. सावरकरांजवळ सैनिकी दृष्टि असल्यामुळें ते सामुदायिक आंदोलनाचे नेते होअूं शकले नाहींत. सेनापति जसा आपल्याजवळ असलेलें सामर्थ्य पाहून डावपेंच टाकतो त्याप्रमाणें सावरकर विचार करीत. १९४२ सालीं याच दृष्टीनें त्यांनीं विचार केला व ते स्वातंत्र्य-आंदोलना-

पासून दूर राहिले. त्यांना त्या वेळीं असें वाटत होतें कीं, अखेरचा लढा यादवीच्या स्वरूपाचा होणार असल्यानें तोंपर्यंत सामर्थ्यसंचय करावा. सुभाषबाबू हे बंगालपर्यंत आले म्हणजे आठावणी करतां येऊल अशीहि सावरकरांची अटकळ होती. पण ही सगळी विचारसरणी गुप्त क्रांतिवाद्यांची असल्यामुळें सामुदायिक असंतोषाचें नेतृत्व (mass agitator) सावरकर करूं शकले नाहींत. अशा गुप्त क्रांतिवादामुळें सर्व संस्थाच जनतेच्या स्वातंत्र्य आंदोलनापासून दूर राहिली. याऐवजीं जर १९४२ सालीं आपल्या कल्पनेप्रमाणें स्वातंत्र्याचें आंदोलन हिंदुत्ववाद्यांनीं केलें असतें तर कदाचित् ते जनतेपर्यंत जाऊन पोहोंचले असते. हें दृश्य जनतेला कधींच दिसलें नाहीं, त्यामुळें समाजांतील क्रियाशील भाग हिंदुत्ववाद्यांत मोठ्या प्रमाणावर आला नाहीं ! अनेक लहान चळवळींनीं अंतिम लढ्याचें सामर्थ्य येतें हें विसरल्यामुळें, हिंदुत्ववादी चळवळ लढ्याचें जुनें तंत्र, गुप्तता. यांच्यांत अडकून पडली. हिंदुत्वाचें रक्षण करूनहि आम्ही स्वातंत्र्य लढ्यांत भाग घेऊं ही भूमिका कधींच न दिसल्यामुळें जनतेला ही स्वत्वाचा जयजयकारच करणारी स्वप्नवादी चळवळ आहे असें वाटत राहिलें. '१९०८ चे सावरकर आम्हांस पाहिजेत ' असें सावरकरांना लोक सांगत. यामागें त्यांनीं स्वातंत्र्य-लढ्याचें नेतृत्व करावें हीच अपेक्षा होती. पण सावरकर आपल्या क्रांति-तंत्राच्या मर्यादा सोडूं शकले नाहींत, आणि हिंदुत्ववादी चळवळ जनतेच्या स्वातंत्र्यवादी आंदोलनापासून दूर राहिली. १९४५ सालच्या निवडणुकींत हिंदुसभेला जो पराभव पत्करावा लागला याचें मुख्य कारण हेंच होतें.

संघाची अलिप्तता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा १९२५ पासून हिंदुत्ववादी संघटनेचें कार्य करीत होता. त्याचे संस्थापक डॉ. हेडगेवार हे कट्टर हिंदुत्वनिष्ठ व स्वातंत्र्याची अपार तळमळ असलेले संघटनाकुशल नेते होते. ते जिवंत असतांनाच संघाचें कार्य देशव्यापी झालें होतें. १९४० नंतर सगळी परिस्थिति झपाट्यानें बदलत होती. पण संघाचे नेते मात्र जणुं कांहीं अलिप्त राहाणें हीच देशभक्ति आहे असें समजून स्वतःची संघटना

वाढवीत होते. सावरकरांनीं हिंदूंची राजकीय आघाडी प्रभावी करण्याचे प्रयत्न चालविले असतां रा. स्व. संघ मात्र त्यापासून अलिप्त होता. संघाची संघटनेची पद्धति अुत्कृष्ट असल्यामुळें हजारों तरुण तिकडे गेले. त्यामुळें सावरकरांच्या नेतृत्वाला चांगले व मोठ्या प्रमाणांत अनुयायी मिळाले नाहींत. म्हणजे संघ स्वतःहि अलिप्त राहिला आणि सावरकरांनाहि पाठिंबा मिळूं शकला नाहीं. त्यामुळें हिंदुत्ववादी चळवळीचें नुकसान झालें.

लोकसंघटकांची अुणीव

संघाच्या तरुणांना त्यांच्या नेत्यांनीं या संस्थानिष्ठ अलिप्ततावादाच्या बेड़ीनें अडकविल्यामुळें त्यांचें सहकार्य मोठ्या प्रमाणावर सावरकरांना लाभलें नाहीं. आणि समाजवाद, स्वातंत्र्यवादी चळवळ यामुळेंहि समाजांतील अितर कर्तृत्ववान् तरुण तिकडे गेले. सावरकरांचे सामाजिक विचार मूलतः अत्यंत पुरोगामी असले, तरी त्यांच्या राजकीय भाषणांतील पूर्वजांचा गौरव, नेपाळला वंदन, हिंदु अर्थशास्त्रासारख्या कल्पना, निझाम-पेशवाअीची भाषा—या सर्वांमुळें सावरकर हे प्रतिगामी वाटूं लागले. वृत्तपत्रांनीं सावरकरांच्या विचारसरणीचा असाच विकृत दृष्टीनें प्रचार केला, आणि त्यांच्या अनुयायांनीं त्याला थडपणें पण शास्त्रशुद्ध रीतीनें अुत्तर देण्याअैवजीं निंदाच सुरू ठेवली. गांधीजी 'हरिजन' मध्यें नियमितपणें लिहीत तसें सावरकरांनीं केलें असतें तर बौद्धिक क्षेत्रांत तरी बरेंचसें वातावरण निवळण्याचा संभव होता.

सावरकरांची प्रकृति या काळांत अितकी ढांसळलेली असे कीं त्यांची लंडन किंवा रत्नागिरीमध्यें दिसलेली मनमोकळी संघटनाकुशल वृत्ति या काळांत दिसूं शकली नाहीं. त्यांनीं प्रचारकी दौरे खूप काढले, पण पक्षसंघटनेसाठीं प्रत्यक्ष काम करणें त्यांना जमलेंच नाहीं. सावरकर आले त्या वेळीं तीन पिढ्यांचें अंतर तुटलेला जीर्णपुरुष यावा तसें झालें! त्यामुळें त्यांच्याशीं सर्वस्वी समरस झालेले सहकारी त्यांना मिळाले नाहींत. प्रभावी लोकसंघटकांची अुणीव पडली त्यामुळें संस्थेच्या यशाची शक्यता दुरावली.

कारण, संस्था तर्कशुद्ध विचारसरणीनें यशस्वी होत नाहींत, त्याला समाजांतून नवें सामर्थ्य निर्माण करणारे नेते हवे असतात.

या सर्व कारणामुळें हिंदुत्ववादी चळवळ समाजव्यापी झाली नाहीं. ती पूर्णपणें अयशस्वी झाली असल्याची भावना मात्र तिच्या पुरस्कर्त्यांत १९४७ च्या सुमारास पसरली. आपलें ध्येय गांठतां आलें नाहीं म्हणून निराशा पसरली, आणि त्याच निराशाग्रस्त मनोवृत्तीचें भयानक पर्यवसान महात्माजींच्या अमानुष, आततायी खुनांत झालें ! अेकांगी राजकारणाचें तें भयानक पर्यवसान होतें. द्वेषाच्या दुहेरी शस्त्रानें घेतलेला तो बळी होता! गांधीवधामुळें तर हिंदुत्ववाद्यांची सामाजिक पत गेलीच, पण त्यांची नैतिक शक्तीहि खच्ची झाली. हिंदुत्ववादी आंदोलनांत या सर्वांमुळें अेक नवा पेंचप्रसंग निर्माण झाला. भितकेंच नव्हे तर समाजजीवनांतून ते अुखडले गेले असें त्यामुळें वाटूं लागलें.

हिंदुत्ववादी राजकारणाचें भवितव्य

गांधीहत्येनंतर अेक प्रकारच्या पराभूत मनोव्यथेनें समंजस हिंदुत्ववादी कार्यकर्ते ग्रासलेले आहेत. या सर्वांच्या मनावर आलेली ही काजळी भीति-ग्रस्तपणाची नाहीं. वस्तुतः १९४७ मध्येंच हिंदुत्ववादी राजकारणाचें भवितव्य ठरविण्यासाठीं अधिक खोलवर विचार व्हावयास हवा होता. पण तें न होतां गांधीहत्या झाली नि त्यानंतर झालेल्या प्रक्षोभामुळें हिंदुत्ववादी अंतर्मुख झाले. १९४७ सालीं जें व्हावयास पाहिजे होतें तें अजूनहि झालेलें दिसत नाहीं.

परिस्थिति तर बदलली आहे, आणि जुन्या घोषणा तर सोडवत नाहींत,— अशी हिंदुत्ववाद्यांची आजची मनःस्थिति आहे. या गोंधळलेल्या अवस्थे-मुळेंच हिंदुसभेच्या संसदीय आघाडींत अहिंदूंना घेण्याचा ठराव संमत झाला. रा. स्व. संघाचाहि हाच गोंधळ अुडाला आहे. बंदी अुठेपर्यंत कधींहि अैकूं न आलेलें 'सांस्कृतिक कार्य' अेकदम संघाच्या घटनेंत अवतरलें. हिंदुस्थान हिंदूंचा, भगवा ध्वज, राष्ट्रध्वज—या कल्पना गडप झाल्या. ही गोंधळाची स्थिति फार दिवस टिकूं शकणार नाहीं. केवळ

आपण अेके काळीं अेक राजकीय पक्ष चालविला म्हणून तो पुढें चालू ठेवणें म्हणजे बदललेल्या परिस्थितीचें ज्ञान आपल्याला झालेलें नाहीं असें मान्य करण्यासारखें आहे.

सावरकरांनीं हिंदुत्ववादी राजकारण कां सुरू केलें हें ल्क्षांत आणल्यानंतर आजचा वैचारिक गोंधळ नाहींसा होअील. कॉंग्रेस ही मुस्लीमधार्जिणें राजकारण करूं लागली, आणि म्हणून हिंदुत्वाचें राजकारण सुरू झालें. "कॉंग्रेस १०० टक्के राष्ट्रीय होअूं द्या म्हणजे मी कॉंग्रेसचाच आहे," असें अनेक वेळां सावरकर म्हणत. १९४२ सालींहि सावरकरांनीं समान हिंदी राज्याचीच घोषणा केली. आतां आपल्या राज्यघटनेनें संयुक्त मतदार संघ व निधर्मी राज्य मान्य केल्यामुळें सावरकरांना मान्य असलेली राज्यकल्पना या देशांत प्रस्थापित झाली आहे. म्हणजे हिंदुत्ववादी राजकरण ज्याच्यांतून निर्माण झालें तें ध्येय साध्य झालें आहे; म्हणून हिंदुत्ववादी राजकारणाचें आसनच अुखडलें गेलें आहे. या देशांत हिंदूंचेच नव्हे तर सर्वांचेच राजकीय अधिकार मान्य केले आहेत; म्हणून तात्त्विक दृष्ट्या हिंदुत्ववादी राजकारण यापुढें असतां कामा नये.

फक्त आतां व्यवहारदृष्टीनें विचार केला, तर कॉंग्रेस कदाचित् आपलें मुस्लीमधार्जिणें धोरण या ना त्या प्रकारें चालू ठेवीलहि. मुसलमानांच्या मतांसाठीं त्यांचें लांगूलचालन चालेल. पण आतां कॉंग्रेसचें हें धोरण हाणून पाडण्यास हिंदुत्ववादी राजकारण करून चालणार नाहीं. तसें चालू राहिलें तर मुसलमान आपलें राजकारण चालूच ठेवतील. आतां आपणांला धर्मातीत लोकशाहीचा स्वीकार करून त्याच्या रक्षणासाठीं लढलें पाहिजे. या देशांत शक्य तितक्या लवकर अेकात्म समाज निर्माण करावयाचा असेल तर हाच मार्ग आहे. कॉंग्रेसनें मुस्लीमधार्जिणी वृत्ति चालू ठेवली तर तिला 'जातीय' ठरवून आपण सर्व जनतेला निधर्मी लोकशाहीचें महत्त्व पटवून दिलें पाहिजे. या दृष्टीनें मुस्लीमांना ताळ्यावर आणण्यासाठींहि धर्मातीत लोकशाहीचाच अवलंब केला पाहिजे. त्यांना हें स्पष्ट बजावलें पाहिजे कीं, भारतानें धर्मातीत लोकशाही स्वीकारली आहे, तेव्हां येथें धर्मीय

राजकारणाला थारा नाहीं. पण या बाबतींत पुढाकार हिंदूंना घ्यावा लागेल. आणि तो घ्यावयाचा असेल तर हिंदुत्ववादी राजकारण चालू ठेवणें विसंगत ठरेल.

सावरकरांनीं हिंदुत्वाचें राजकारण ऐतिहासिक अपरिहार्यतेनें सुरू केलें. मुस्लीम जमातवादापासून संरक्षण करण्याचा तांतडीचा उपाय म्हणून हिंदूंना त्यांनीं जागृत केलें. हिंदी राष्ट्र ही कल्पना या राष्ट्राचा मूलाधारच नष्ट करूं लागली, म्हणून सावरकरांनीं हिंदु राष्ट्राची जाणीव (Assertion) करून दिली. ध्येयवाद म्हणून हिंदी राष्ट्रवाद हें निश्चित व्यापक ध्येय आहे. हिंदूंना या देशांत कायमचें स्वास्थ्य नांदावें असें वाटत असेल तर पाकिस्तानसारख्या धर्मीय राष्ट्रवादाचा स्वीकार करतां कामा नये. त्याचबरोबर हिंदी राष्ट्रवादाच्या आड मुसलमान येत असतील तर त्यांचें लांगूलचालनहि करतां कामा नये. हिंदुत्ववादी राजकारणानें दोन सत्यें या देशांत प्रस्थापित केलीं. पहिलें म्हणजे—सांस्कृतिक दृष्ट्या हिंदुत्व हाच भारतीय राष्ट्रवादाचाहि मूलाधार असला पाहिजे; मुसलमान किंवा अितर कोणतेहि अहिंदु हे भारतीय राष्ट्राच्या ध्येयवादाशीं समरस झालेले नाहींत. त्यांना समरस करावयाचें असेल तर त्याचा मार्ग राजकीय लांचबाजी हा असूं शकत नाहीं. हा दुसरा सिद्धान्त हिंदुत्ववाद्यांनीं मांडला.

या दोन कल्पना जोंपर्यंत अेकात्म हिंदी राष्ट्र निर्माण होत नाहीं तोंपर्यंत प्रत्येक राजकीय पक्षानें ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. मात्र या दोन कल्पनांसाठीं हिंदुत्ववादी राजकारण चालू ठेवणें चुकीचें ठरेल; आणि चालू राहिलें तरी जनतेचे आजचे प्रश्न बदलले असल्यानें तें राजकारण अयशस्वीच होअील.

हिंदुत्वाची चळवळ आतां फक्त सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्याच चालविली पाहिजे. सामाजिक समता व ती प्रस्थापित करणारें सांस्कृतिक अैक्य हीं त्यांचीं दोन ध्येयें आहेत. हें कसें करावयाचें, जातिभेद वितळविणारी समाजरचना कशी आणावयाची याचा विचार तज्ज्ञांनीं करावा. सावरकरांचें सामाजिक तत्त्वज्ञान त्यासाठीं अुपयोगी पडेल. पण या सर्व

प्रश्नांचा विचार हिंदुत्ववाद्यांनीं करून आपलें ध्येय–धोरण ठरविलें पाहिजे. आपण चुकूं शकतों हें जर आपणाला पटलें असेल तरच आपणांला बदल करण्याची अिच्छा होते; नाहीं तर जुन्या घोषणांना चिकटून बसणें हेंच बरें असें वाटत राहतें!

सावरकरांचें अढळ स्थान

हिंदुत्ववादी राजकारणाचें कांहींहि होवो, सावरकरांना या देशाच्या राजकीय विचारवन्तांत अेक अढळ स्थान आहे यांत शंकाच नाहीं. समुद्रांत बर्फाचे डोंगर (आइसबर्गज्) असतात, त्यांचीं शिखरेंच तेवढीं वर दिसतात. तीं वरवर कमी अुंच वाटत असलीं तरी तो डोंगर मात्र दूरवर पसरलेला असतो. या देशांतील मुस्लीम जातीयवादाचें संकट असेंच होतें. पण तें हेरून सावरकरांनीं हिंदु समाजाला आपल्या संरक्षणासाठीं सिद्ध राहण्यास सांगितलें. हेंच त्यांचें राजकीय विचारवन्त म्हणून महत्त्वाचें कार्य. महापुरुषांचे अनेक प्रकार असतात. कांहीं अितिहासांत चमकून जातात, पण अितिहास घडवूं शकत नाहींत. कांहीं समाजाला प्रिय होतात, पण समाजाला मूलतः बदलण्याची कुवत त्यांच्यांत नसते. कांहीं समाजाला मार्गदर्शन करणारे मूलग्राही स्वरूपाचे विचार मांडतात, पण नेतृत्वाकडे त्यांचें दुर्लक्ष असतें. परिस्थिति त्यांच्याविरुद्ध काहूर अुठविते. त्यांच्या गुणांचें पूजन होतें, पण अनुकरण करणें शक्यच होत नाहीं. त्यांच्या दर्शनानें डोळे दिपतात, त्यांचें व्यक्तित्व मोहक वाटतें. पण त्यांचें आयुष्य नाट्यमय वाटत राहतें. त्याच्याशीं सामान्य मनुष्य समरस होअूं शकत नाहीं. आकाशांत दिसणाऱ्या तेजःपुंज शुक्राच्या ताऱ्यानें आनंद होतो. वाटतें, अेवढासा तारा पण किती प्रकाशमय आहे! पण त्यानें मार्ग दिसत नाहीं; त्यासाठीं मशाल पेटवावी लागतेच. सावरकर हे या श्रेणींतील पुरुष आहेत. निवडणुकींतील यशापयशानें किंवा शिष्यगणांच्या संख्येवरून त्यांचें श्रेष्ठत्व मोजावयाचें नसतें,–कारण तें स्वयंभू आहे! घबघब्याचें सौंदर्य तो किती अुंचावरून पडतो यांत आहे, तर नदीचें सौंदर्य तिच्या पात्राच्या विस्तारांत असतें!

× × ×

६ :

भाषिक आंदालन

सावरकरांचा स्वत्वाचा अभिमान सर्वस्पर्शी आहे. त्यांतूनच त्यांच्या अितर चळवळींप्रमाणें त्यांची मराठी भाषेच्या शुद्धीची चळवळ निघाली आहे. या चळवळीमुळें महाराष्ट्रांत अेके काळीं बरेंच वादळ उठलें होतें. प्रथम प्रथम बऱ्याच साहित्यिकांनीं तिची चेष्टा करूनच तिचें पहिलें स्वागत केलें. पण सावरकर हे हाडाचे प्रचारक असल्यामुळें आपलें म्हणणें कधींहि अर्धवट न सोडतां त्याचा ते पिच्छा पुरवतात. सावरकरांच्या हिंदुत्ववादी दृष्टिकोणामुळें त्यांची ही चळवळ धर्मद्वेषांतून निघालेली आहे असेहि त्यांच्यावर आक्षेप घेतले गेले. पण सावरकरांनीं त्या सर्वांना अत्यंत मार्मिक रीतीनें अुत्तरें दिलीं आहेत. अर्थात् अेखादें तत्त्व बहुजनसमाजाला पटून त्याचा आचार व्हावयास वेळ लागतो, तसा या भाषाशुद्धीलाहि लागला. पण आतां ती तंतोतंत जरी मान्य झाली नसली तरी भाषा शुद्ध वापरावी अशी दृष्टि निश्चितपणें आली आहे.

ही चळवळ कां निघाली हें पाहणें अवश्य आहे. कोणत्याहि परकीय भाषेशीं अेखाद्या भाषेचा संबंध आला कीं त्यांचे अेकमेकांवर संस्कार घडत राहतात. मराठी भाषेवर गेल्या ७०० वर्षांच्या काळांत अुर्दू व अिंग्रजी या दोन्ही परकीय भाषांचे प्रामुख्यानें संस्कार झालेले आहेत. मुसलमानी आक्रमणामुळें अुर्दूचा निकटचा परिचय झाला, व त्यांतील अनेक शब्द

मराठी भाषेंत घुसले. शिवाजी महाराजांनीं रघुनाथपंडितांकडून राज्यकोश रचवून भाषाशुद्धीचा प्रयत्न केला. पण हे प्रयत्न चालू असतांहि अनेक परकीय शब्द आंत आले. पुढें इंग्रजी राज्य आलें. त्यांनीं शिक्षणच इंग्रजींतून दिल्यामुळें इंग्रजी शब्दांचा वापर वाढत चालला. चिपळूणकरांनीं या प्रवृत्तीवर कडक टीका केली. इंग्रजीचा वापर आपण बोलण्यांत किती करतों याचा अनुभव प्रत्येकालाच आहे. 'शीक,' 'टाइम' सारखे शब्द आतां खेडोपाडीं रूढ झाले आहेत. या दोन्ही भाषांच्या आक्रमणकाडे सावरकरांनीं २५ वर्षांपूर्वी देशाचें लक्ष वेंधलें. सावरकरांनीं स्वतः हें मान्य केलें अहे कीं, अुर्दू ही राष्ट्रीय भाषा करण्याचें वेड मुसलमानांनीं डोक्यांत घेतलें त्याच वेळीं त्यांच्या मनांत अुर्दू शब्दांवरील बहिष्काराची कल्पना आली.

अुर्दूचें आक्रमण

अुर्दू भाषेमुळें आपल्या भाषेचें कांहीं नुकसान झालें आहे तरी काय, अशी शंका विचारणारे अनेक आहेत. किंवा हा कसला पोरकट आणि क्षुल्लक प्रश्न घेअून भांडत बसलांत ?—त्यापेक्षां मोठे प्रश्न जगापुढें आहेत, असेंहि म्हणणारे तत्त्वज्ञ आहेत. वस्तुतः हा युक्तिवाद हास्यापद आहे. हाच युक्तिवाद गृहीत धरावयाचा, मग शुद्धलेखनाचे नियम तरी कशाला पाळतां ? हल्लीं मुलें शुद्ध लिहीत नाहींत, अशी ओरड तरी कशाला केली जाते ! पण असें कोणी करीत नाहीं. अेकदां भाषेचा अुपयोग मानला कीं त्याचे नियम पाळले पाहिजेत. त्या भाषेच्या विकासाला जें जें हानिकारक होत असेल तें तें नाहींसें केलें पाहिजे. याच दृष्टीनें अुर्दू भाषेनें केलेल्या आक्रमणामुळें आपल्या भाषेंतील किती शब्द मारले आहेत, हें पाहाण्यासारखें आहे. जमीन—अस्मान, सलामी, दिल, वतन यांसारख्या शब्दांना आकाशपाताळ, अभिवादन, हृदय, कुळवाडी यांसारखे चांगले व सोपे शब्द असतांना ते कमी वापरले जातात. पोत, पैलू यांसारख्या अुर्दू शब्दांनीं वीण, कड अित्यादि मराठी शब्द मारून टाकले आहेत. यांसारख्या शब्दांना भाषेंतून बाहेर घालविल्यामुळें जुने खरे मराठी शब्द जाअून बेंगरूळ भाषा रूढ होत जाते. तसेंच शब्दासिद्धीचें सामर्थ्य कमी होतें.

स्वत्वाचा अभिमान असणें म्हणजे परकीयांविषयीं द्वेष बाळगणें नव्हे. त्यांत कांहीं गुन्हा नाहीं. पर भाषेंतील शब्द डोअीजड होअीपर्यंत त्यांचा सुळसुळाट चालू देणें हें चुकीचें आहे. या ठिकाणीं प्रेम–द्वेषाचा प्रश्नच येत नाहीं. अिंग्रजी भाषा फार आवडते म्हणून जर अेखादा अुगीचच अिंग्रजी शब्द वापरूं लागला तर तो मानवताप्रेमी आहे किंवा विशाल हृदयाचा आहे असें म्हणणें बाष्कळपणाचें ठरेल. असल्या खुळचट मानवतेच्या कल्पनेमुळें भाषाशुद्धि किंवा स्वभाषेचा विकास या गोष्टी संकुचित ठरत नाहींत. भाषाशुद्धीची प्रेरणा स्वत्वाचा अभिमान हीच असली तरी ती संकुचित म्हणतां येणार नाहीं.

तेव्हां अुर्दूसारखे जुने शब्द काढून टाकण्यास कोणतेंहि तत्त्व आड येत नसून संवयच टाकणें जड जातें, हेंच त्याचें खरें कारण आहे; मग त्याचें कोणी कितीहि समर्थन करो. अुर्दूवांचून आपलें नडतें असें वाटणाऱ्यांनीं ज्ञानेश्वरी किंवा तत्सम जुने ग्रंथ पहावेत. तेथेंहि शब्दसमृद्धि असल्याचें त्यांना आढळेल.

परिवर्तन हवें, पण—

भाषेचें परिवर्तन हवें म्हणून परकीय शब्द कां ठेवूं नयेत अेंसेहि विचारलें जातें. प्रत्येक जिवंत भाषेंत परकीय शब्द यावयाचेच. देशोदेशींचे भिन्न अर्थ दाखविणारे किंवा पदार्थबोधक शब्द येणारच. परंतु भाषा वाढवावयाची, तिचा विकास करावयाचा–म्हणजे हजारों परकीय शब्द भाषेंत घुसविणें नव्हे. याला परिवर्तन म्हणत नाहींत. अशानें मूळ भाषाच नाहींशी होअील; आणि–अुरेल त्याचें काय होअील हें सांगतां येणार नाहीं. मूळ भाषा नष्ट करणारी सुधारणा म्हणजे परिवर्तन नव्हे. म्हणून भाषेच्या विकासासाठींच त्यांत पर-शब्दांना लपवून ठेवतां कामा नये.

मुख्य सूत्रें

या सर्व परिस्थितीचा विचार करून सावरकरांनीं आपल्या भाषाशुद्धीचीं पुढील चार सूत्रें मांडलीं आहेत—

(१) गीर्वाण भाषेंतील साराचा सारा संस्कृत शब्दसंभार आणि संस्कृतनिष्ठ अशा तामील, तेलगु ते आसामी, काश्मिरी, गौंड, भिल्ल बोलीपर्यंत ज्या आमच्या प्रांतिक भाषाभगिनी आहेत, त्या सर्वांतील मूळचे प्रांतिक शब्द हे सर्व आमच्या राष्ट्रभाषेच्या शब्दकोषाचें मूलधन—स्वकीय शब्दांचें भांडवल होय.

(२) ह्या आपल्या राष्ट्रीय शब्दभांडारांत ज्या वस्तूंचे वा विचारांचे वाचक शब्द होंते, वा आहेत,—वा निर्मितां येतात—त्या अर्थांचे उर्दू, अिंग्रजी प्रभृति परकीय शब्द वापरूं नयेत. जर तसे परकीय शब्द आपल्या पूर्वीच्या ढिलाअीमुळें आपल्यांत घुसले असतील, तर त्यांना हुडकून काढून टाकावे. अद्यतन विज्ञानाची परिभाषा नवनवे संस्कृत प्राकृतोत्पन्न शब्द पाडून व्यक्तविली जावी.

(३) परंतु ज्या परदेशी वस्तु अित्यादि पूर्वी आपल्या अिकडे नव्हत्या, त्यामुळें ज्यांना आपले स्वकीय जुने शब्द सांपडत नाहींत, आणि ज्यांना त्यांच्या त्या परकीय शब्दांसारखे सुटसुटीत स्वकीय शब्द काढणें दुर्घट जातें, त्यांचे परकीय शब्द मात्र आपल्या भाषेंत जसेच्या तसे घेण्यास प्रत्यवाय नसावा. जसें बूट, कोट, जाकिट, गुलाब, जिलबी, बूमरंग, टेबल, टेनिस अित्यादि. तथापि अशा नव्या वस्तु आपल्याकडे येतांच जर कोणी त्यांनाहि स्वकीय नांवें देअून रुळवून दाखवील तर अुत्तमच.

(४) त्याचप्रमाणें जगांतील कोणत्याहि परकीय भाषेंत जर अेखादी शैली, वाक्प्रयोग, मोड—ही सरसहा चटकदार वाटली तर तीहि आत्मसात् करण्यास आडकाठी नसावी.

हीं सूत्रें वाचल्यानंतर बरेचसे आरोप गळून पडतात. भाषाशुद्धीची 'अग्नि-रथगमनागमननियंत्रणशुभ्रताम्रलोहपट्टिका' ही जी अतिरेकी चेष्टा केली जाते ती किती निराधार आहे हें सिद्ध होतें! भाषाशुद्धि ही भाषासंवर्धनाच्या आड येत नाहीं, विकृत भाषेच्या आड येत आहे हें

यावरून दिसून येअील. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं अशुद्ध शब्द भाषा-शुद्धि सुरू झाल्यामुळें निर्माण होत आहेत अशी तक्रार केली आहे. ती बरोबर धरली तरी तो दोष भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांवर येत नाहीं. नवीन शब्द काढतांना अधिक अवधान ठेवून काढला पाहिजे,—याविषयीं कोणाचाच मतभेद नाहीं.

अर्थात् भाषाशुद्धीची कल्पना ही आतां समाजांत स्थिर झाली आहे. मा. त्र्यं. पटवर्धन, न. चिं. केळकर यांच्यासारख्या मराठी साहित्यिकांना त्याचा पुरस्कार पूर्वीच केल्यामुळें तिला प्रतिष्ठाहि प्राप्त झाली आहे. अिंग्रजी शब्द काढून स्वभाषेंतील नवे शब्द रूढ करण्याची वृत्ति वाढत आहे. अुर्दू शब्द पूर्णपणें गेले नसले तरी 'दिनांक' यासारखे शब्द रूढ होत आहेत. जुन्या मराठी शब्दांकडेहि व ग्रामीण भाषेकडेहि आतां लक्ष जाअूं लागल्यामुळें अशिक्षित समाजाच्या तोंडचे अनेक शब्द पुन्हां रूढ होत आहेत. 'स्थगित' सारखे अनेक शब्द तर अितके रूढ झाले आहेत कीं, ते सावरकरांनीं प्रथम पुढें आणले आहेत तें कळतहि नाहीं. आतां डॉ. रघुवीरसारखे भाषाशास्त्रज्ञ त्यांत लक्ष घालीत असल्यामुळें व त्यांना सरकारी साहाय्य मिळत असल्यामुळें भाषाशुद्धीची चळवळ मराठीपुरती मर्यादित राहिलेली नसून ती हिंदीच्या क्षेत्रांतहि ज्ञात आहे. २६ वर्षांपूर्वी अुपहास, निंदा, चेष्टा, प्रत्यक्ष विरोध अित्यादि सहन करीत सावरकरांनीं जी चळवळ निष्ठेनें चालविली, व अेका अुपेक्षित प्रश्नाचा अगदीं धिटाअीनें जो पिच्छा पुरविला, त्याचें फळ त्यांना मिळत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. अर्थात् कोणत्याहि चळवळीचा हेतु कितीहि सर्वस्पर्शी असला तरी त्याचें यश मर्यादित असतेंच. पण त्या यशाला महत्त्व नसून जी दृष्टि त्या चळवळीनें येते, त्याला महत्त्व असतें. या चळवळीनें सर्व परकीय शब्द गेले नाहींत, तरी भाषाशुद्धि अवश्य आहे ही दृष्टि आतां आली आहे हें निश्चित.

लिपिशुद्धीचा प्रश्न

सावरकरांची सुधारणावादी दृष्टि शब्दांवरून अक्षरांकडे गेली; आणि त्यांनीं देवनागरी लिपीच्या सुधारणेची चळवळ काढली. त्या चळवळींतहि

त्यांनीं अत्यंत अभ्यासपूर्वक लक्ष घातलें, आणि आतां मुंबई सरकारनें नेमलेल्या 'लिपिसुधारणा समिती' नें त्यांच्या बऱ्याचशा सूचना मान्य केल्यामुळें ही चळवळहि अत्यंत यशस्वी होत आहे.

देवनागरी लिपि ही ब्राह्मी लिपीपासूनच आलेली आहे. ब्राह्मी लिपीचें अस्तित्व अितिहासकालापूर्वी होतें हें आतां सिद्धच झालें आहे. आज भारतांत ज्या संस्कृतनिष्ठ लिप्या आहेत त्या सर्व ब्राह्मी लिपीपासूनच आलेल्या आहेत. म्हणजे लिपि ही रूपान्तरित होत आलेली आहे. ती कांहीं स्वयंभू नव्हे. पूर्वी भूर्जपत्रावर लिखाण करावें लागे. त्यामुळें थोड्या जागेंत शक्य तितकें जास्त लिखाण मावणें अवश्य असे. म्हणून 'क्क, ल्ल, द्ध' अशीं जोडाक्षरें निघालीं असावीं असा निष्कर्ष सावरकरांनीं काढला आहे. म्हणजे त्या वेळच्या सुलभतेसाठीं तीं रूपें ठरविण्यांत आलीं. त्या वेळच्या लिपि-सुधारकांनीं जसे पालट केले तसे पालट आजहि परिस्थिति बदलल्यानें केले पाहिजेत,—असा सावरकरांचा आग्रह आहे. आज छपाअीची कला आली आहे. त्यामुळें मुद्रणदृष्ट्या आपली लिपि सोपी करणें हें आरलें पहिलें कर्तव्य आहे. त्या वेळच्या जोडाक्षरासारख्या सुधारणा आतां दुर्धारणा ठरतात. म्हणून आज सुधारणा केल्याच पाहिजेत. कारण लिपि ही सनातन नाहीं. पण हे सुधारणेचे प्रयत्न शास्त्रशुद्ध असले पाहिजेत; आणि त्या सुधारणा प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याच्या दृष्टीनें सोप्याच असल्या पाहिजेत. सारांश, मुद्रणसुलभता, शिक्षणसुलभता, आणि शास्त्रशुद्धता या तीन निकषां-वर योग्य ठरतील अशा सुधारणा लिपीमध्यें करण्यांत आल्या पाहिजेत असा सावरकरांचा आग्रह आहे. आज नागरी ही राष्ट्रलिपि झाल्यामुळें तिच्या सुधारणेची अधिक आवश्यकता निर्माण झाली आहे. नागरी लिपि ही जितकी यंत्रक्षम होअील तितकें आज हवं आहे. वृत्तपत्रांच्या किंवा वाङ्मयाच्या कोणत्याहि दृष्टींनीं आजची ही निकड आहे.

नागरी लिपींतील दोष

सावरकरांच्या मतें नागरी लिपींतले दोष दोनतीन प्रकारचे आहेत. आपली लेखनपद्धति सदोष आहे. अेकाच अक्षराचा अेकच अुच्चार,

आणि अेका अुच्चारास अेकच अक्षर—हें लिपिशुद्धीचें गमक आहे. परंतु नागरींत अेकेक व्यंजन जोडाक्षरादिक प्रसंगीं चार पांच प्रकारें लिहावें लागतें. अुदा. 'र' हें अक्षर ट्र, प्र, र्क या अक्षरांत तीन वेगवेगळ्या पद्धतीनें लिहावें लागतें. ही अशुद्धता आहे. तशी जोडाक्षरांतहि अशुद्धता आहे. अुदाहरणार्थ, 'कार्त्स्न्य' हा शब्द घ्या. आपण प्रत्यक्ष अुच्चारतानां 'र्' चा प्रथम अुच्चार करतों. पण लिहितों मात्र 'त्' प्रथम. किंवा 'अुद्धार' हा शब्द घ्या. त्यांत 'द' अर्धा असून 'ध' पूर्ण आहे; पण आपण लिहितों मात्र 'द' पूर्ण आणि 'ध' अर्धा. तेव्हां हे असे अशुद्ध प्रकार थांबविणें अवश्य आहे. त्यासाठीं सावरकरांनीं पुढील सुधारणा सुचविल्या आहेत—(१) 'अ' ची बाराखडी. आपण अितर व्यंजनांच्या बाराखड्या काढतों तशीच 'अ' ची काढावी. असें केल्यानें मुद्रणसुलभता येते आणि टंकहि वांचतात. (२) दुसरी सूचना म्हणजे क, फ, र, ल हीं अक्षरें लिहिण्याची पद्धत बदलावी. त्याचें कारण यांचीं जोडाक्षरें करतांना तें अक्षर व त्याचा अर्धा खिळा ठेवावा लागतो. म्हणून ती सध्यांसारखी न लिहितां 'क्ा, फ्ा, र्, ल्' अशीं लिहिणें. म्हणजे जोडाक्षर करतांना याचा काना काढून टाकला कीं काम भागेल. जसें—क्ष, फ्त, स्व्य, वेल्दे. यामुळें खूपच टंक वांचतील. (३) जोडाक्षरें फोडून लिहिणें ही महत्त्वाची सूचना आहे. त्यामुळें वर म्हटल्याप्रमाणें येणारी अशुद्धता नाहींशी होअील. अुदा. अुद्घाटनाअैवजीं अुद्घाटन असें लिहावयाचें. (४) या जोडाक्षरांतहि आणखी अेक फरक आहे. 'घट्ट' या शब्दांतील 'ट्ट' हें जोडाक्षर कसें लिहावयाचें हा प्रश्न येतो. तेव्हां तें ट्ट असें लिहावें. जसें—घट्ट, विठ्ठल. म्हणजे अर्धकानाक्षरांना (ट, ठ, ड, ढ, द, ळ, ह) आजच्या प्रघाताप्रमाणें 'अ' कार युक्त पूर्ण व्यंजनें मानलीं कीं हा प्रश्न सुटेल. या तडजोडीमुळें पांच—पन्नास जोडाक्षरें चुटकीसरशीं अुडतील.

सावरकरांनीं रत्नागिरीच्या स्थलबद्धतेंत या लिपिशुद्धीचा पाठपुरावा केला. कांहीं दिवस 'अ' ची बाराखडी वापरण्यास मुलांना बंदी असे. अितका विरोध पूर्वी झाला आहे. पण ही सुधारणा 'किर्लोस्कर'सारख्या

मासिकांनीं अुचलून धरली. ठिकठिकाणीं त्याचा प्रचार सुरू झाला. त्यामुळें जोडाक्षरें फोडून लिहिण्याची पद्धत व 'अ' ची बाराखडी या सुधारणा तर चळवळीच्या बळावरच रूढ होअून गेल्या आहेत.

सरकारी समितीचें प्रतिवृत्त

मुंबअी सरकारनें लिपिशुद्धीच्या प्रश्नाचें महत्त्व लक्षांत घेअून मराठी व गुजराथी या दोन लिप्यांत सुधारणा सुचविण्यासाठीं १९४९ मध्यें काका-साहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालीं अेक समिति नेमली होती. सावरकरांप्रमाणें अितर कांहीं लिपिसुधारकांनीं ज्या सुधारणा सुचविल्या होत्या त्यांचा विचार करून या समितीनें आपलें प्रतिवृत्त सादर केलें आहे. या समितीनें सावरकरांनीं पुरस्कारिलेल्या लिपिसुधारणेच्या सूचनांपैकीं तीन चतुर्थांश सुधारणा ग्राह्य धरल्या आहेत. या समितीनें 'अ' ची बाराखडी मान्य केली आहे; जोडाक्षरें अुच्चारानुक्रमें फोडून सलग लिहिणें स्वीकारलें आहे; बाराखड्यांतून स्वरचिन्हें आजच्यासारखींच पण अक्षराच्या अगदीं वरखालीं न लिहितां किंचित् पुढें घ्यावीं हें मान्य केलें आहे. तसेंच रेफ ओळींत अुच्चारानुक्रमें लिहावीं आणि 'ऱ्हास' शब्दांतल्या अर्ध्या 'र'-प्रमाणें तिचें रूप ठेवावें; अखंड खिळे पाडून जुळणीची, पूरणांची वा टेकांची (डिग्रीची) अडचण नि अडगळ काढून टाकावी. आजचा 'ल' कानायुक्त करून 'ल' असा लिहावा. या तिन्ही सूचना स्वीकारल्या आहेत.

या सर्व सुधारणा झाल्या तर त्या—मुद्रणक्षमतेंत रोमन लिपीच्या तोडीस तोड अशी आपली राष्ट्रलिपि होअील. त्यांत सुधारणा करण्याचा प्रश्न महाराष्ट्रानें प्रथम हातांत घेतला; आणि लिपिशुद्धीला चळवळीचें स्वरूप देअून त्यांत व्यवहार्य सुधारणा सुचविण्याचें महत्त्वाचें कार्य अत्यंत चिकाटीनें त्यानीं केलें, म्हणून सरकारी समितीनेंहि या सर्व प्रयत्नांचा गौरवपूर्वक अुल्लेख केला आहे.

सारांश, सावरकरांनीं भाषाशुद्धि व लिपिशुद्धि या दोन्ही चळवळींत आपली कल्पकता आणि स्वत्वाभिमान यांची अुत्कृष्ट प्रतीति आणून दिली आहे. अत्यंत साध्या कामांतहि जीव ओतून मग्न होअून जाणें हें

त्यांचें वैशिष्ट्यच आहे. म्हणूनच स्वभाषेच्या स्वाभाविक वाढीस घातुक ठरणाऱ्या परकीय शब्दांविरुद्ध युद्ध पुकारलें, आणि मराठी भाषा क्षीण होऊं नये म्हणून सातत्यानें प्रचार केला. आपली लिपि मुद्रणक्षम व्हावी म्हणून आजहि ते झटत आहेत. सावरकर हे कर्ते सुधारक आहेत हें या दोन्ही आंदोलनामुळें सिद्ध झालें ! त्या दोन्ही चळवळी यशाच्या मार्गावर आहेत यांतच त्यांना आनंद आहे !

× × ×

७ :

सावरकरांची साहित्यसृष्टि

सावरकरांनीं स्वतःच अेकदां सांगितलें होतें कीं, मी वृत्तीनें कवि व कलावन्त आहे; पण परिस्थितीनें मला राजकारणी पुरुष केलें आहे. सावरकरांचें अंतर्मन खरोखरच कवीचें आहे. त्यांचें सारें वाङ्मय तुम्ही वाचा, म्हणजे त्यावर तुम्हांला या काव्यमय वृत्तीची छाया पडलेली दिसेल. मग तें कोणत्याहि विषयावरचें पुस्तक असो. आकाशांतील तारकांपासून तों हातांतल्या बेडीपर्यंत सर्व ठिकाणीं त्यांनीं आपली काव्यदृष्टि लावून आपली काव्यात्मकता सिद्ध केली आहे. त्यांचें गद्य वाङ्मय तुम्ही वाचाल तर कांहीं ठिकाणीं तें गद्य कवितेपेक्षांहि भावोत्कट झालेलें तुम्हांला आढळेल ! सकाळीं डोंगराआड लपलेल्या सूर्याच्या किरणांचें ढगावरील नर्तन तुम्हीं पाहिलें आहे का ? सावरकरांचें सारें साहित्य त्यांच्या वाङ्मय-गुणांनीं असेंच वाङ्मयाआड असलेल्या व्यक्तित्वानें अुजळून निघालें आहे. आणि या साहित्यसृष्टीची ओळख करून घेतली नाहीं, सावरकरांच्या प्रतिभेचें स्वरूप पाहिलें नाहीं, तर सावरकर-दर्शन पूर्ण होणारच नाहीं ! कारण सावरकरांच्या वाङ्मयांत त्यांच्या अंतःकरणांतील अुत्कट भाव—भावना शब्दांच्या रूपानें ओसंडतात ! मनांतील अनुभूति शब्दरूपांत आपल्या-समोर अुभी राहते ! मनांतील विचार बुद्धीचे दरवाजे ठोठावीत अुभे आहेत असें वाटतें ! शब्दांत काय सामर्थ्य आहे हें कळतें; ते शब्द नव्हेत,— ते अग्निकण अुधळले आहेत असें वाटतें ! पण आश्चर्य हें आहे कीं, जी

सावरकरांची प्रतिभा आंशिकण अुघळते तीच काव्यपुष्पेंहि अुघळते ! म्हणून सावरकरांची साहित्य सृष्टि ही विविधतेनें नटलेली आहे !

वाङ्मयाची पार्श्वभूमि

सावरकरांच्या वाङ्मयाची पार्श्वभूमि सर्वसामान्य साहित्यिकाच्या वाङ्मयापेक्षां वेगळी आहे. त्याला कारण सावरकरांचा ध्येयवाद, आणि त्यांचें जीवन. सावरकरांनीं ध्येयवादासाठीं आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें. आपल्या वाणीचें आणि प्रतिभेचें वैभवहि त्यांनीं त्याच ध्येयवादासाठीं अुधळलें आहे. त्यामुळें कलेच्या धुंद नेत्रांनीं सावरकरांनीं जीवनाकडे पाहिलें नाहीं, तर कर्तव्याच्या तळमळीनें जीवनाचा विचार केला. भारत-मातेच्या गळ्यांतील पुष्पहार बनण्यापेक्षां तिच्यासाठीं सुरू केलेल्या यज्ञांत जळून जाणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्यांनीं मानलें. त्यामुळें सौंदर्याच्या मखरांत बसलेल्या सरस्वतीवर त्यांनीं स्तुतिसुमनें अुधळलीं नाहींत, तर 'भगवति स्वतंत्रते'चीं स्तोत्रें रचलीं ! आणि अशा त्या ध्येयवादी जीवनांत त्याग हाच भोग होता, आत्मार्पण हाच आनंद होता; हौतात्म्य हेंच जीवनसाफल्य होतें. त्या त्यागमय आत्मबलिदानास सिद्ध असणाऱ्या आणि हौतात्म्याची राख अंगास फांसलेल्या तरुण सावरकरांचें साहित्य हें कलेचें अिंद्रधनुष्य झालें नाहीं, तर स्वातंत्र्य-यज्ञांतील अेक धगधगीत ज्वाला झाली ! सावरकरांच्या साहित्यामागें ही असाधारण पार्श्वभूमि असल्यामुळें त्यांच्या साहित्याचा हेतु आनंद नव्हता,—क्षोभ होता.

सावरकरांच्या साहित्यनिर्मितीचा अितिहासहि त्यांच्या साहित्या-अितकाच वैचित्र्यपूर्ण व अलौकिक आहे. स्वातंत्र्याच्या युद्धांत अुडी घेण्यासाठीं अधीर झालेल्या तरुण सावरकरांनीं लिहिलेलें वाङ्मय हें समाजाच्या अंतःकरणांत कृतीची प्रेरणा निर्माण करण्यासाठीं जन्मलें आहे. त्या वाङ्मयमूर्तीचें सावरकरांनीं स्वतःच 'मूर्ति दुजी ती' कवितेंत अपूर्व वर्णन केलें आहे. त्या वाङ्मयांत सावरकरांची प्रतिभा चांदण्यांतहि वितळणाऱ्या कोमल भावनांना फुलवीत नाहीं, नंदकिशोराच्या मुरली-वादनाचे मंजुळ स्वर अैकवीत नाहीं,—तर ती रणवेताळाच्या कर्कश रणशृंगानें

त्रिभुवन कंपविणाऱ्या, समरभीषण चंडमूर्तींची पूजा बांधण्यास उत्सुक झालेली आपल्याला आढळते. तिला चांदण्यांत गोपींनीं चालविलेल्या रासक्रीडेचें आकर्षण नाहीं,—प्रमत्तनर्तिनी रणदेवीचें आकर्षण आहे. पण सावरकरांनीं जें वाङ्मय अंदमानांत लिहिलें, त्यांत मात्र अग्निधनुष्यांचीं पिलें दिसतात, मधुर भावनांचा काव्यात्म आविष्कार दिसतो, आल्हाद-दायक प्रेमाचें दर्शन घडतें. सावरकरांनीं विचारप्रतिपादनासाठीं जें वाङ्मय लिहिलें आहे, त्यांतील वाङ्मय गुण अगदीं वेगळे आहेत. तेथें युक्तिवादाचीं शस्त्रें घेऊन, सावरकर प्रतिपक्षीयांना विद्ध करण्यासाठीं उभे आहेत असें वाटतें. सावरकरांच्या वाङ्मयाचे हे भावदृष्ट्या तीन प्रकार असले तरी त्या सर्व ठिकाणीं त्यांचें बहुरंगी व्यक्तित्व दिसतेंच.

उच्च अनुभूति

सावरकरांच्या या असामान्य जीवनामुळें व त्यांच्या उत्कट ध्येयवादित्वा-मुळें त्यांच्या वाङ्मयांतील अनुभूति ही फार मोठी आहे. नेपोलियन कवि असता तर त्यानें काय लिहिलें असतें ? शिवाजी महाराजांनीं आपलें दिव्य जीवन कोणत्या शब्दांनीं वर्णिलें असतें ? भगतसिंगानें फांसाचें चुंबन घेण्यापूर्वी कविता केली असती तर ती किती भावोत्कट झाली असती ? या सर्वांची अनुभूति उच्च होती, पण ती साहित्यांत अवतरली नाहीं ! त्यांच्या मनांतील खळबळ ही शब्दांनीं व्यक्त होऊं शकली नाहीं. सावरकरांचें तसें झालेलें नाहीं. सावरकरांनीं ज्या ज्या वेळीं कृतीसाठीं पाऊल टाकलें, त्यांच्या बंडखोर मनांत ज्या संवेदना उमटल्या, त्यांच्या कविमनानें जें जें सौंदर्यग्रहण केलें—त्या सर्व गोष्टी त्यांच्या साहित्यांतून त्यांनीं जगापुढें मांडल्या. अभिजात प्रतिभेच्या साह्याने आपल्या अनुभूतीचा पुनःप्रत्यय ते लोकांना देऊं शकले. ही अनुभूति सामान्य माणसाची नाहीं, अेका वीर पुरुषाची आहे,—अेका थोर देशभक्ताची आहे ! त्यामुळें सावरकरांच्या साध्या वाक्याला विलक्षण सामर्थ्य प्राप्त होतें,—जणुं तेजाची ती ऋचाच होते. कारण तेथें केवळ शब्दांची गुंफण नाहीं, तें भावचित्रण आहे. हा त्यांच्या वाङ्मयाचा विशेष असल्यामुळें त्यांचें वाङ्मय हें तौलनिक दृष्ट्या मापतां ,

येत नाहीं; त्याची जात स्वतंत्रच आहे. ज्ञानेश्वरी वाचतांना तिच्यांतील साहित्यिक गुणांची जाणीव कोणाला होत नाहीं ? पण तेंच त्या ग्रंथाचें सौंदर्य नव्हे,—तसेंच सावरकरांच्या वाङ्मयाचें आहे.

व्यक्तिमत्वाचा ठसा

सावरकरांचें वाङ्मय वाचतांना सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा विसर पडूं शकत नाहीं, अितका त्याचा प्रभाव त्याच्यावर पडला आहे. हें त्याचें व्यक्तिमत्व अितकें आक्रमक आहे कीं, सावरकरांच्या नाटकांतील सारीं पात्रें पाहतांना सावरकरच त्या वेगवेगळ्या भूमिकांतून डोकावत आहेत असें वाटत राहतें. सावरकरांची कविता अितर कोणत्याहि मराठी कवीपेक्षां अधिक आत्मनिष्ठ व व्यक्तित्वांतून निर्माण झालेली आहे. जीवनाकडे गूढ तात्त्विकतेनें पहाण्याची वृत्ति, त्यांना आवडणारें ठराविक रस, हौतात्म्याचें व वीर वृत्तीचें विलक्षण आकर्षण, कर्तव्यनिष्ठ प्रवृत्ति—या साऱ्या गोष्टींचा त्यांच्या कवितेवर अतिशय परिणाम झाला आहे. त्यांनीं जीं आत्म-निवेदनपर 'माझी जन्मठेप' सारखीं पुस्तकें लिहिलीं आहेत, त्यांत तर सावरकरांचें. नवेंच दर्शन आपणांला घडल्यासारखें वाटतें. 'माझी जन्मठेप' या पुस्तकांत सावरकरांनीं अंदमानच्या नृशंसक गुहेंत झिजत पडलेल्या अवस्थेंतील मनाशीं केलेलें जे संवाद घातले आहेत ते वाचले म्हणजे तर वाटतें,—अेखादा स्थितप्रज्ञ ऋषि मृत्यूशींच संवाद घालीत आहे ! भावुकतेच्या रसांत बुडवून भारतीय तत्त्वज्ञानांतील 'अक्षर' कल्पनांची जुळणी जेव्हां सावरकरांची लेखणी करूं लागते, तेव्हां वाटतें,—मृत्यूच्या भेसुर सावलींत अुभा असलेला बेडर स्वातंत्र्यवीर मृत्यूकडे पाहून हंसत आहे ! हें जसें आत्मचरित्रात्मक लिखाणांत—तसें निबंधांतहि घडलें आहे. वाङ्मयाचा कुठलाहि प्रकार असो, त्याला सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा स्पर्श झालेलाच आहे ! आणि तें व्यक्तिमत्वच मनोहारी रंगांनीं विलसणारें असल्यामुळें त्यांचें वाङ्मयहि तसेंच झालें आहे ! आरशासमोर आरसा अुभा करून मध्यें आपण अुभें राहिलों कीं—कशीं अनेक प्रतिबिंबें दिसतात ? सावरकर-वाङ्मयांत घडणारें व्यक्तिदर्शन असेंच आहे !

सावरकरांच्या वाङ्मयाचें समग्र समीक्षण येथें शक्य नाहीं. पण त्यांच्या प्रत्येक वाङ्मयप्रकारांतील वाङ्मयीन गुणांचें स्वरूप निश्चित समजेल. त्यांच्या प्रतिभेचा विलास कसा विविधतेनें झाला आहे हें त्यावरून कळेल. सावरकरांच्या वाङ्मयाचे तीन प्रकार करतां येतील. निबंध, नाटकें आणि काव्य.

निबंधकार सावरकर

सावरकरांचें निबंधवाङ्मय हा मराठी भाषेचा अमोल ठेवा आहे. निबंधकार सावरकर हे तर्ककठोरे, घणाघाती, अभ्यासपूर्ण, पल्लेदार लेखन-शैलीनें मराठी वाङ्मयांत अमर होतील. लहानपणापासूनच सावरकरांचें वाचन दांडगें असल्यामुळें त्यांच्या विचारांचा विकास सतत होत गेला. विचारांची स्पष्टता हें सावरकरांचें वैशिष्ट्यच आहे. तेथें गूढवादाचें आवरण नाहीं, किंवा वैचारिक गोंधळ नाहीं. जे विचार मांडावयाचे असतील ते अगदीं पद्धतशीरपणें अितिहासाचा आधार घेअून, तर्काला सुसंगत असे ते मांडतात. लहानपणीं त्यांनीं लिहिलेला 'अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव कां करावेत ?' हा निबंध वाचला म्हणजे त्यांच्या अभिव्यक्तीच्या सामर्थ्याची (Power of expression) आपल्याला कल्पना येते.

सावरकरांचे सामाजिक निबंध

सावरकरांच्या निबंधांचे अैतिहासिक व सामाजिक असे दोन भाग केले तर त्या प्रत्येकाचीं वैशिष्ट्यें थोडीं वेगळीं असलेलीं आपल्याला आढळतील. सावरकरांचे सामाजिक निबंध म्हणजे रूढींवर युक्तिवादाच्या धारदार शस्त्रानें आक्रमण करण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्या आक्रमक व्यक्तित्वाचें येथेंहि आपणाला दर्शन घडतें. आगरकर आणि सावरकर यांच्या लेखनशैलींत या दृष्टीनें थोडें साम्य आहे. पण आगरकर हिंदु धर्मांतील भोंगळपणामुळें अुद्विग्न होतात, चिडतात, अस्वस्थ होतात. त्यांची ही समाजसुधारणेची तळमळ, आवेश त्यांच्या वाक्यावाक्यांतून प्रतीत होतो. 'महाराष्ट्रीयांनो ! विचारकल्हाला काय मितां ?' यासारखे त्यांचे लेख या आवेशपूर्ण शैलीचीं प्रतीकें म्हणून सांगतां येतील. सावरकर प्रतिपक्षीयांची बाजू आपल्या

निबंधांत मांडतात; पण त्यांतील अुपहास अितका भेदक असतो कीं जणुं ते त्यांतून वाचकाला त्या विचारांची हास्यास्पदता सुचवितात. गाईवरील त्यांचा निबंध पहा. त्यांत विरोधकांची त्यांनीं अुपहासानें, विदारक युक्तिवादानें भंबेरीच अुडविली आहे. कांहीं रोगांच्या वेळीं गाढवीचें दूधहि मुलांना अुपयोगी पडतें; मग गाढव-गीता रचून गाढव-पूजनाचा संप्रदाय कां घडला नाहीं-असें ते विचारतात. गोठ्यांत अुभी राहून अेकीकडे मलमूत्रोत्सर्ग करीत असतांना कडवा चघळणाऱ्या, आणि जिचें शेपूट त्याच मलमूत्राच्या घाणींत भिजलें आहे अशा गाअीचें शेंपूट स्पर्शणें, आणि तिचें मूत्र चांदीच्या पेल्यांतून पिणें—हें किती हास्यास्पद आहे हें ते पटवून देतात. गाईत ३३ कोटी देव आहेत—या कल्पनेची टर अुडविणारा पुढील परिच्छेद पहा—

"पंढरपूरच्या यात्रेच्या रामरगाड्यांच्या दिवसांत तिसऱ्या वर्गांतील आगगाडीच्या डब्यांत वारकरी जसा 'घर कीं कोंब' चालू होतें, तसें या गायीच्या शरीरांत देवांची रगडारगडी, कोंडमार झाली आहे. विष्णु, ब्रह्मा, चंद्र, सूर्य, यम,—कोणी कंठांत, कोणी दांतावर, कोणी नाकांत,—ज्याला जिथें साधेल तिथें तो लगटला ! पृष्ठवंशांत तर अितकी दाटी कीं, कुणी सनातनीहि रागानें जेव्हां अुनाड गाअीच्या पाठींत दोहतांना तिनें लाथ झाडतांच अेक काठी घालतो तेव्हां दहा—पांच देव तरी लंबे झाल्यावांचून राहूंच नयेत ! नाकातोंडांतील आस्वाद्य रसांत लडबडलेल्या देवांची तर करुणाजनक स्थिति आहेच; पण त्यांतल्या त्यांत शत्रूवरहि येअूं नये असा प्रसंग जर कोणावर आला असेल तर त्या बिचाऱ्या मरुत् नि वरुणावर ! जागा मिळण्याच्या रेटारेटींत शेवटीं 'अपाने तु मरुद्देव यो नौ च वरुणः स्थितः ॥' आणि मूत्रे गंगा ! ! हें काय चित्र कीं विचित्र ! !"

सावरकरांची ही अुपहासाची पद्धत त्यांच्या रूढिभंजक निबंधांतून वाक्यावाक्यांत दिसून येते. सावरकरांच्या या सामाजिक अुपरोधामुळें (Social satire) अेके काळीं खूप खळबळ माजली होती.

संवादप्रिय शैली

सावरकरांच्या निबंधशैलीचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील बोलकी भाषा. त्यांच्या निबंधांत भाषेची कृत्रिमता व गांभीर्याचा आव आणलेला नसतो. विचारांची दाहकता ही बोलक्या पद्धतीनें त्यांनीं प्रकट केली आहे. सावरकरांचे निबंध वाचतांना—अेकामागून अेक वाक्यें फेंकींत, युक्तिवाद व तर्कशुद्धता यांनीं प्रतिपक्षीयांचें मन वळवीत आवेशानें आपलीं मतें मांडणारी सावरकरांची मूर्ति वाचकाच्या डोळ्यांपुढें अुभी राहते. त्यांच्या वक्तृत्वांत जें ओज असतें, जी ध्वनिपूर्णता असते ती त्यांच्या भाषेंत अुतरते ! त्यांनीं स्मशानयात्रेचें केलेलें हें वर्णन पहा किती यथावत् आणि बोलकें आहे !

" पक्क्या बंद स्वच्छ पेटींत प्रेत झांकून नेणें सोयिस्कर असतें; तरी पण त्या ठेराविक वेदकालीन बांबूच्या टराविक चिपट्या, ठराविक गांटी मारून जी केली आहे,—जी लचकत करकचत कधीं मध्येंच मोडते आहे, त्या पांच हजार वर्षांपूर्वीच्या तिरडीवर आपलें विद्रूप तोंड अुघडें टाकून, 'नको—नको हे हाल—' म्हणत ज्याची मान लुटलुटत सारखी नन्ना करीत आहे,—त्या प्रेतास घरीं गवरीचें खांड पेटवून तोच अग्नि त्या मडक्यांत घालून, तें शिंकें हातीं धरीत, अुघड्या—बोडक्यांनें स्मशाना-पर्यंत जीस आतेष्ट नेत आहेत ती—ती प्रेतयात्रा कितीहि गैरसोयीची असली तरी पुण्य ! कारण ?—ती श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे ! "

या परिच्छदावरून सावरकरांची शब्दयोजना, त्यांची वाक्यरचना, त्यांची मांडणी किती ठांशीव असते हें सहज कळून येअील.

जिवंत वातावरण नि नाट्य

सावरकरांच्या अैतिहासिक निबंधलेखनांत आणखी अेक गुण आहे. तो म्हणजे नाट्यमयता. विशेषतः १८५७ च्या क्रांतियुद्धाच्या अितिहासांत सावरकरांची ही नाट्यमयता परमोच्च कोटीला पोहोंचलेली आढळेल. या बाबतींत शिवरामपंतांच्या शैलीचें प्रतिबिंब सावरकरांच्या निबंधलेखनांत

पडलेलें आढळतें. सावरकरांच्या या नाट्यमयतेमुळें व त्यांतील प्रभावी शब्द-योजनेमुळें '१८५७' व 'मॅझिनी' हीं पुस्तकें वाचलीं म्हणजे मेघगर्जनेच्या कडकडाटानंतर कोसळणाऱ्या विद्युल्लतेची शक्ति जणुं त्या शब्दाशब्दांतून प्रकट होत आहे असें वाटतें. अरण्यांतील झाडें अुपटीत सारें वातावरण भेदून टाकणारा झंझावात निर्माण झाला आहे असा भास होतो. त्यांच्या अंतःकरणांतील ज्वालामुखींतून असंतोषाचा लाव्हारस बाहेर पडत आहे असें वाटूं लागतें. सावरकरांच्या या नाट्यमयतेंत व भेदक शब्दयोजनेंत काय सामर्थ्य आहे तें '१८५७' वाचल्यानंतर कळतें ! तें अकाळविकाळ स्वरूप प्रलयंकर शंकराच्या डमरूचा निनाद कानांत घुमवीत जेव्हां प्रकट होतें त्या वेळीं सावरकरांच्या भावना तें पुस्तक लिहितांना किती पेटल्या असतील याची कल्पना येते. सावरकरांच्या गद्यशैलींतील या नाट्यमय, काव्यमय भावोत्कटतेमुळें त्यांतील विचारं हृदयाची पकड घेतात. आपण कांहीं तरी दिव्य ज्ञान संपादन केलें आहे असें वाटूं लागतें. अेका अुच्च वातावरणांत, रणधुमाळीच्या वातावरणांत आपण वावरत आहोंत असें वाटतें.—अितिहास जिवंत झाल्यासारखें भासतें.

प्रचाराचा आवेश – अतिशयोक्तीची आवड

सावरकरांच्या गद्यशैलींत प्रचारकाचा विलक्षण आवेश आहे. प्रचार म्हणजे पुनरुक्ति. तेच तेच विचार वेगवेगळ्या मार्गांनीं समाजापुढें मांडीत राहणें हें प्रचारकाचें कार्य. सावरकरांच्या शैलीवर त्यांच्या प्रचारकी थाटाचा परिणाम झाला आहे. सावरकर आपल्या निबंधांत टिळकांप्रमाणें तत्त्वमंथन करणार नाहींत, तर अेखादा मूलभूत विचार युक्तिवादाच्या, माहितीच्या आधारें मांडून पटवून देण्याचा प्रयत्न करतील. आपले विचार नुसते मांडणें हा त्यांत हेतु नाहीं. त्यांत कर्मवादाचें आवाहन आहे. समाजाला कार्य-प्रवृत्त करण्याची दृष्टि आहे. त्यामुळें सावरकरांची भाषाशैली आवेशपूर्ण झाली आहे. सावरकर अगोदर अेखाद्या विषयाचा विवेचक बुद्धीनें, शास्त्राधार घेअून अभ्यास करतात, आणि मग त्या प्रश्नांतील अुणीवा घेअून आपल्या सर्व शस्त्रांनिशीं प्रतिपक्षीयांवर तुटून पडतात ! त्यामुळें त्यांच्या

लेखनशैलींत अतिशयोक्ति रंगविण्याची हौस दिसून येते. 'गांधी-गाधळां'त त्यांनीं गांधीजींवर केलेली टीका मूलतः बरोबर असली, तरी त्यांत असलेल्या अतिशयोक्तीमुळें ती वाचकाला खालच्या दर्जाची वाटूं लागते.* 'संन्यस्त खड्गां'त अहिंसेवर जे विनोद आहेत ते असेच आहेत. सामाजिक निबंधांत 'क्ष-किरणें' म्हणून त्यांनीं जे निबंध लिहिले त्यांत—किंवा सावरकरांनीं लिहिलेल्या गोष्टींत ही अतिशयोक्तीची युक्ति अनेक वेळां वापरल्याचें आढळेल. आपल्याला न पटणाऱ्या विचारांची धिंड काढण्याची त्यांची हौस दांडगी आहे. 'पुण्यांतील तीन हजार मंबाजीबुवा' या त्यांच्या सनातन्यांवर लिहिलेल्या लेखांत पुण्याला महार—चांभारावर लाठी चालविणाऱ्या सनातन्यांची कानउघाडणी प्लँचेटची कल्पना रंगवून सावरकरांनीं केली आहे. त्यांत सावरकरांच्या साध्या घटनेंतून, अतिशयोक्तीचा रंग भरून प्रतिपक्षीयांचें हंसें करण्याची भाषाशैली चांगली दिसते. शब्दांची कसरत, शब्दांच्या कोट्या या अगदीं सहजपणें ते करतात. पुष्ट पशु कीं पिष्ट पशु, पर्वती संत, महात्मा भोळचंद, खिलाफतीची आफत, पोथीनिष्ठा, भोंगळसुती अहिंसा, वाग्विशूरतेचें सभापर्व, अहिंसात्मक भंडविधान—यांसारखे अुपहासयुक्त आणि अतिशयोक्ति करणारे शब्द पसरून ते फड जिंकण्याचा प्रयत्न करतात. प्रतिपक्षीयाला युक्तिवादाच्या माऱ्यानें गोंधळून टाकणें हें या लेखनशैलीचें वैशिष्ट्य. शिवरामपंतांच्या लेखनशैलींत अुपहास, अतिशयोक्ति हीं दोन्ही होतीं, पण त्यांत सूचकता होती. श्री. न. चिं. केळकरांनीं परांजपे व सावरकर यांच्या लेखनशैलीची तुलना करतांना म्हटलें होतें‡—"सावरकरांचें लिहिणें बोलणें अंगचोर पडदपोशीचें कधींहि नव्हतें. त्यांच्या कलेच्या रथावरील निशाणावर 'या आणि पहा' हीं अक्षरें नसून 'येतों आणि दाखवतोंच' अशीं अक्षरें असावयाचींच!"

शिवरामपंतांच्या अवगुंठित छद्मी व बाणेदार लेखन—वक्तृत्वानें किती तरी भोळ्या मनांची फसवणूक होअून त्यांच्या वाच्यार्थाच्या भुल-

---

* पहा 'गांधी गोंधळ' पृष्ठ ८३-८६.

‡ मुंबअी नभोवाणीवर केलेलें भाषण—दि. १०-१-३९.

भुलाऔंत तों कोलमडून जाऊन हास्यास्पद ठरलों असतील. पण सावरकरांचें लिहिणें—बोलणें भोळ्या—गोळ्याच्याहि मनांत आवेशाचा संचार करवून त्याला पक्केपणा आणणारें असे !

सावरकरांच्या वाङ्मयांत आडपडदा आढळावयाचाच नाहीं. परांजप्यांसारखा घातक नाजुकपणा किंवा रेशमी चिमटे तेथें नाहींत. तेथें गांवठी आडदांडपणा व निर्भयता आहे. सावरकरांच्या अतिशयोक्तीला त्यांचाच शब्द वापरावयाचा झाल्यास 'क्रकच तीक्ष्ण' दांत आहेत, आणि त्यांनीं प्रतिपक्षाला विव्हळ करण्याची शक्ति आहे. सर्वत्र स्पष्टोक्ति आहे, आघातप्रिय वृत्ति आहे. सावरकरांच्या वीर—व्यक्तित्वाचीं हीं चिन्हें त्यांच्या या निबंधशैलींत आढळलीं, तर त्यांत नवल कसलें ?

सावरकरांच्या या प्रचारकी, युक्तिवादप्रिय शैलीमुळें त्यांचे मौलिक विचार त्यांच्या वाङ्मयांतून शोधून काढावे लागतात. त्यांचे फारच थोडे लेख तत्त्वकथन करणारे आहेत; बरेचसे लेख कोणाला तरी उत्तर देण्यासाठीं लिहिलेले आहेत. सावरकरांना नुसती तात्त्विक चर्चा आवडत नाहीं, कित्येक वेळां ती अनवश्यक आहे असेंच त्यांना वाटतें. आपण विचार करून आपल्याबरोबर इतरांनीं कार्याची मुसंडी मारण्यास यावें असें त्यांना वाटतें. म्हणून प्रचारक सावरकरांनीं तत्त्वविवेचक सावरकरांवर विजय मिळविला आहे. त्यांच्या कर्मवादी मनानें तर्कानिष्ठेवर कधीं कधीं मात केली आहे. त्यांच्या बुद्धिवादी वृत्तीला मागें टाकून कधींकधीं भावनेची घोडदौड स्वैरपणें झाली आहे. हें सारे दोष त्यांना कांहीं तरी घडवून आणण्याचा जो ध्यास आहे, त्यांतून निर्माण होतात. पण त्यानें प्रमाण कमी आहे; मूळ विचार, मूळ गाभा अगदीं स्पष्ट आहे; तेथें गोंधळ नाहीं.

पण सर्वसाधारणपणें पाहिलें तर मात्र निश्चितपणें म्हणतां येऊील कीं, सावरकरांचा विचारप्रवाह तर्काच्या बांधीव किनाऱ्यांमधूनच वाहात असतो. निबंधांतील विचारांची मांडणी पद्धतशीर असते. त्यांत फापटपसारा नाहीं; असलाच तर तो कलापूर्ण आणि सहेतुक असतो. आपलें म्हणणें मांडतांना विषयाशीं ते अितके तल्लीन होतात कीं, त्यांच्यांत आवेश सचरूं लागतो;

हिरीरी निर्माण होते. आणि तो आवेश अेकदा संचरला, प्रतिपाद्य विषयाच्या घनुष्याला स्वतःच्या मताची दोरी लावली कीं, मग सावरकर आपल्या प्रतिभेच्या भात्यांतून अुपहास, अुपरोध, अतिशयोक्ति, संशोधनात्मक माहिती, भावनोत्कट आवाहन, संवादप्रिय सलगी अित्यादि बाण काढून प्रतिपक्षीयाला विद्ध करून टाकतात. आपले ठाम विचार, आपलें आवडतें तत्त्वज्ञान, आपले अभ्यासपूर्ण निष्कर्ष, आपल्या व्यक्तित्वाचीं वैशिष्ट्यें त्यांत मिसळून जनतेपुढें मांडणाऱ्या या कृतिशूर प्रचारकाचीं गद्यशैली मराठी सारस्वताच्या निबंध-वाङ्मयांत आपल्या असामान्यत्वानें श्रेष्ठपदावर तळपत राहील यांत शंकाच नाहीं !

सावरकरांचें नाट्यवाङ्मय*

सावरकरांच्या अितर सर्व वाङ्मयप्रकारांप्रमाणें त्यांचीं नाटकें हींसुद्धां मनोरंजनासाठीं किंवा रंगभूमि गाजविण्यासाठीं जन्मलेलीं नाहींत. 'अुत्तरक्रिया', 'संन्यस्त खड्ग', 'अुःशाप' हीं तीन नाटकें तीन हेतूंनीं त्यांनीं निर्माण केलीं. सावरकरांच्या मनांतील मराठ्यांच्या अितिहासाविषयींचा अभिमान आपल्या तात्त्विक निष्कर्षांसह त्यांनीं 'उत्तरक्रिया' या नाटकांत प्रकट केला आहे. हिंसा-अहिंसा, प्रवृत्ति-निवृत्ति अित्यादि विषयांवरील आपलीं मतें मांडण्यासाठीं गौतमबुद्धाच्या काळांतील अेक कथानक घेअून तें 'संन्यस्त खड्गां'त गुंफलें आहे. अस्पृश्यता, शुद्धि, स्त्रियांचें अपहरण, सनातन्यांचें ढोंगी वर्तन यांवरील आवेशपूर्ण टीका त्यांच्या 'अुःशाप' नाटकांत आपणांला सांपडेल.

सावरकरांच्या या नाट्यवाङ्मयाचें समीक्षण चेस्टर्टननें नाटकाच्या केलेल्या—'It must play and it must pay'—या व्याख्येप्रमाणें करावयाचें झालें तर या निकषास तें उतरणार नाहीं. सावरकरांनीं नाटकें रचतांना तीं

---

* सह्याद्रीच्या सावरकर अंकांतील (मे, १९४३) गोपीनाथ तळवलकरांच्या लेखांतील मुद्दे यांत आहेत.

रंगभूमीवर करावयाचीं असतात—याचा विचार केला होता कीं नाहीं याची शंका यावी अितके ठळक दोष त्यांच्या तंत्रांत आढळतात. पण तंत्राच्या दृष्टीनें सोपीं ठरणारीं किंवा रंगभूमीवर यशस्वी ठरलेलीं नाटकेंच अुत्कृष्ट असतात असें म्हणणें धाडसाचें ठरेल. कारण मराठी नाट्यवाङ्मयांत किती तरी नाटकें केवळ विशिष्ट नटांमुळें किंवा त्यांतील संगीतामुळें यशस्वी झालेलीं आहेत. आजकाल गेल्या पांचदहा वर्षांत तर अितकीं सामान्य नाटकें रंगभूमीवर आणलीं जात आहेत कीं, संवादरूपांत लिहिलेली अतिशय सामान्य गोष्ट असेंच त्यांना म्हणावें लागेल. तेव्हां सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाला लौकिकतेचा निकष लावणें त्यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीनें चुकीचें ठरेल. नाट्यगुण, रसनिर्मिति, व त्या सर्व नाटकाचो अेकूण अुठाव (Total effect) या तीन गुणांच्या दृष्टीनें सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाचें परीक्षण करणें अवश्य आहे.

अस्पष्ट व्यक्तिरेखा

सावरकरांच्या अितर वाङ्मयप्रकारांप्रमाणें त्यांचें व्यक्तित्वच या नाट्यवाङ्मयांतून दिसतें. स्वतः बाजूला राहून समाजांतील विविध व्यक्तींचें स्वभावचित्रण वा भावचित्रण करण्याची शक्ति असूनहि त्यांचें आक्रमक व्यक्तित्वच सर्वत्र प्रभाव गाजवतें. त्यांच्या व्यक्ति, त्यांचीं स्वभावचित्रें हीं त्यांच्या मतांचीं प्रतीकें असतात. सावरकरांना त्यांच्या सत्याची टिंगल करावयाची असेल तेव्हां ते अेखादा 'सत्यवान' आपल्या नाटकांत योजतील आणि मग त्याच्या तोंडीं "लपंडाव म्हणजे मूर्तिमंत असत्याचा अभ्यास! मुलांनो, या आश्रमांत लपंडाव, आंधळ्या कोशिंबिरी, आट्यापाट्या, अित्यादि असत्यमय खेळ खेळण्याची यापुढें सक्त बंदी करण्यांत आली आहे," यासारखीं सत्याचा अुपहास करणारीं वाक्यें ते घालतील. सनातनी भटजींचा ढोंगीपणा बाहेर आणण्यासाठीं अेखाद्या 'अुःशापां'तील नारंभटाची नियुक्ति ते करतील. उत्तरक्रिया, संन्यस्त खड्ग या ऐतिहासिक नाटकांतील काल्पनिक पात्रेंहि स्वतःला हास्यास्पद वाटणाऱ्या अेखाद्या मतासाठींच सावरकरांनीं निवडलीं आहेत. त्यामुळें

मानवी जीवनांतील संघर्षाचें दर्शन घडविण्यासाठीं पात्रांचें नियोजन केलेलें आढळत नाहीं. तर राजकीय, सामाजिक, तात्त्विक मतांच्या संघर्षांना रंगभूमीवर आणण्यासाठीं त्यांनीं आपलीं कथानकें, त्यांतील व्यक्ति पुढें आणलेल्या आहेत. त्यामुळें त्यांचें नाटक हें मानवी जीवनापेक्षां त्यांच्या मतांचें दर्शन घडवतें. त्यामुळें स्वाभाविकच व्यक्तिदर्शन, स्वभावचित्रण बाजूला पडतें, व वाचक सावरकरांच्या बुद्धिमत्तेच्या विलासांतच रममाण होतो. ती बुद्धीची आतषबाजी भुईनळ्याप्रमाणें वाढत वाढत जाते. आपल्या तत्त्वप्रतिपादनाच्या आवेशांत मग सावरकर सामान्य पात्रांच्या तोंडींहि तत्त्वज्ञान घालतात, विलक्षण बुद्धिनिष्ठ युक्तिवाद घालतात. 'अुःशाप' नाटकांतील शंकर व कमलिनी यांच्यांतील धर्मांतरावरील संवाद (पृष्ठ १२०—१२१) या दृष्टीनें वाचण्यासारखा आहे.

सावरकरांच्या या महत्त्वाच्या आग्रहामुळें ते आपल्या नाटकांतून अेखादी अुत्कृष्ट व्यक्तिरेखा निर्माण करूं शकलेले नाहींत.

संवाद-कौशल्य

सावरकरांची संवादरचना ही प्रामुख्यानें विचारांच्या देवाणघेवाणीवर आधारलेली आहे. त्यामुळें संवादांत टोंकदारपणा, साधेपणा नाहीं. बऱ्याच वेळां ते लांबलचक झालेले आहेत. पण ज्या संवादांत चटकदारपणा आहे ते संवाद मात्र चांगले वटले आहेत. प्रियकर—प्रेयसी यांचे नाटकांतील संवाद हे काव्यानें आकर्षक ठरले आहेत. ज्या ठिकाणीं वीररस निर्माण करण्याचा प्रयत्न आहे ते संवादहि सावरकर चांगले रंगवतात. सावरकरांनीं फारसा मोठा सामाजिक प्रश्न हातांत न घेतां मानवी जीवनांतील लहानशी घटना घेअून नाटक लिहिलें असतें तर तें अुत्कृष्ट नाटक केवळ संवादाच्या जोरावर ते यशस्वी करूं शकले असते. कारण संवादाला टीक बसणारी सोपी भाषाहि ते लिहूं शकतात. 'आंबराअी फुलून गेली असतां जसा दरवळ तींत मावत नाहीं, एखादी हरिणी व्याधाच्या वर्तुलांत कांपत अुभी राहते तशी-तूं कां तिथें अुभी आहेस, त्या दिवशीं माझ्या आयुष्याच्या आकाशांत नवीन अुगवलेली त्या प्रेमाच्या अुषेची छटा मी लज्जेनें आअीच्या दृष्टिसदेखील

पडूं दिली नाहीं.' यासारख्या काव्यकल्पना त्यांच्या संवादांत असतात. 'चितोडची चिता दुष्टाची निराशा करूं शकते, पण त्याचें निर्दालन करूं शकत नाहीं.' 'पण तें नांव, आणि तें हिंदुत्व—मी विषारी सापासारखं माझ्या कल्पनेच्या वारुळांतून बाहेर अुपसून, ठेंचून, दूर फेंकून देतांच, हा पहा महाराचा मनुष्य झालों आहे'!' यासारखीं आवेशपूर्ण व खटकेबाज वाक्यें हि त्या नाटकांत आढळतात.

संवादांतील भाषा सावरकरांच्या अितर भाषेप्रमाणें फारशी क्लिष्ट आणि संस्कृतजड नाहीं. गडकरी, शिरवाडकर यांचीं नाटकें जशीं मराठी रंगभूमीवर त्यांतील सामर्थ्यवान संवाद व वैशिष्ट्यपूर्ण भाषा यांनीं यशस्वी ठरलीं तशीं सावरकरांचींहि ठरलीं असतीं.

नाट्यनिर्मिति

कारण या संवादांतूनच नाट्यमयता येते. संन्यस्त खड्ग व अुत्तर-क्रिया हीं नाटकें त्या दृष्टीनें अुच्च दर्जाचीं आहेत. तीं रंगभूमीवर केलींहि जात असत. चिंतामणराव कोल्हटकरांनीं तीं नाटकें बसविलीं त्या वेळीं स्वतः सावरकर त्या नाटकांच्या तालमीला अुपस्थित असत. चिंतामणरावांनीं तर 'माझे आवडते नाटककार' या त्यांच्या लेखमालेंत असें म्हटलें आहे कीं, त्या वेळीं सावरकर संवाद म्हणूं लागले कीं तल्लीन होत, आणि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागत. प्रा. क्षीरसागरांनींहि 'कीचकवधा'वर बोलतांना असें म्हटलें होतें कीं, हें कथानक सावरकरांनीं हाताळलें असतें तर तें अधिक प्रभावी निश्चितच ठरलें असतें. कारण सावरकरांची भाषा धवधवीत व ओजस्वी आहे. 'संन्यस्त खड्गां'तील भाषा ही नाट्यनिर्मितीस पोषक ठरली आहे. त्यांत परकीयांचें आक्रमण होतें त्या वेळीं निर्माण झालेला प्रसंग, किंवा अुःशापमध्यें शेवटीं शंकराला धर्मांतराचा पश्चात्ताप होतो तो प्रसंग, व बंगप कमलिनीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो तो प्रसंग,—यांनीं रंगभूमीवर अवश्य असणारी भयानकता (Thrill) निर्माण होते.

विनोदाची पखरण

सावरकर हे गंभीर प्रकृतीचे असल्यामुळें ते विनोद निर्माण करूं शकणार नाहींत असें स्वाभाविकच वाटतें. पण कोल्हटकरांपेक्षां जास्त सूक्ष्म व बोंचक आणि गडकऱ्यांच्यापेक्षां जास्त खटयाळ असा विनोद बऱ्याच वेळां सावरकरांच्या या नाटकांत आपणांला दिसतो. 'संन्यस्त खड्गां'तील शाकंभट, किंवा 'अुःशाप'मधील नारंभट व सत्यवान हीं पात्रें मार्मिक व बोंचक विनोद करतात. अहिंसेची चेष्टा करतांना "थापसुद्धां मारूं नकोस हं!" अशा कोटया केल्या आहेत. सत्याच्या भोंगळ कल्पनेचा अुपहास करण्यासाठीं योजलेलें सत्यवानाचें पात्र 'बरं आहे आचार्य, मी येतों—' असें त्याच्या शिष्यानें म्हणतांच खवळून अुत्तर येतें—

> "काय? पुन्हां धडधडीत खोटं! अहो, तुम्हीं जायला निघालां आणि येतों म्हणतां? माझा सर्व अुपदेश व्यर्थ गेला! हाय! हाय! या जगाला असत्याच्या रोगापासून कसा मुक्त करूं?"

स्त्रीलंपट पात्रांच्या तोंडीं घातलेल्या 'नारंभटा'सारख्या पात्रांचे विनोद असेच मनोरंजक झाले आहेत. हीं पात्रें पाहिलीं कीं 'खडाष्टक'मधील अशुद्ध संस्कृत बोलणाऱ्या भटजींची आठवण होते. सावरकरांचा विनोद मात्र बराचसा शब्दनिष्ठच आहे; विनोदी प्रसंग त्यांत फारसे नाहींत.

नाटकांतील पदें हीं काव्यकल्पनांनीं भरलेलीं आहेत. 'शतजन्म शोधतांना शत आर्तीं व्यर्थ झाल्या' संन्यस्त खड्गांतील प्रेमकाव्य, 'सुकतातचि जगिं या' ही भैरवी लोकप्रिय होण्यासारखी असूनहि त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें ती मागें पडली आहे.

तंत्रदोष

सावरकरांच्या नाटकांचें हें वाङ्मयीन समीक्षण पाहिल्यानंतर त्यांच्या तंत्रांतील दोष पाहिले पाहिजेत. आधुनिक नाटयतंत्रांत संवादांतून व्यक्तीचें चित्र उमटत जातें. त्यानुसार प्रसंगहि असतात. त्यांत स्वगत भाषणें इत्यादींना कमी स्थान आहे. अर्थात् सावरकर हे जुन्या नाटककारांपैकींच

आहेत. त्यामुळें सूत्रधारादि जुनीं तंत्रें त्यांत आहेत. रंगभूमीच्या दृष्टीनें पहावयाचें झालें तर 'अुःशाप' सारख्या सामाजिक नाटकांत आणलेलीं भुतें, बागबगीचा हीं त्रास देतात. स्थलकालाची ओढाताण सावरकरांनीं उत्तरकिया, अुःशाप या दोन्ही नाटकांत केली आहे. दोन अंकांत ४० वर्षांचें अंतर असलेलें संन्यस्त खड्गांत आपणांस पहावयास मिळतें, तर 'अुत्तरक्रियें'त अेका प्रवेशांत पुण्याचें दृश्य आहे, तर दुसऱ्या प्रवेशांत अुत्तर हिंदुस्थानांतील प्रसंग आहे.

असे तंत्राचे दोष आहेत, तरीहि वाङ्मयीन व नाट्यगुणांच्या दृष्टीनें सावरकरांचीं नाटकें हीं त्यांच्या नाट्यनिर्मितीच्या शक्तीची चुणुक दाखविणारीं आहेत यांत शंकाच नाहीं. सावरकरांनीं प्रचाराचा आग्रह सोडून कलेच्या किंवा केवळ नाट्याच्या दृष्टीनें नाटकें लिहिलीं असतीं तर तीं रंगभूमीवर अजूनहि घुमत राहिलीं असतीं. पण कोणताहि वाङ्मयप्रकार हा व्यक्तिनिष्ठच असतो. जशी व्यक्ति तसें त्याचें वाङ्मय. त्यामुळें सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाचीं वैशिष्ट्यें स्वतंत्र आहेत. अुत्कटतेचें, काव्याचे, विनोदाचे, नाट्याचे, तेजस्वितेचे रंग अेकमेकांत लीलेनें मिसळून तयार केलेलें हें नाट्यवाङ्मय कलेचा आनंद देण्यासाठीं नसून, कांहीं मूलभूत प्रश्नांचा विचार करण्यासाठीं प्रवृत्त करणारें तें नाट्यमय आवाहन आहे असेंच म्हणावें लागेल. म्हणून दीप्ति, बुद्धि हालवून सोडणारे विचार, व त्यांत दिसणारी सावरकरांच्या बुद्धीची आतषबाजी—यांमुळेंच हीं नाटकें श्री. गोपीनाथ तळवलकरांनीं म्हटल्याप्रमाणेंच चढाअीखोर व्याधासारखीं वाटतील ! अर्थात् लोकप्रिय वाङ्मय म्हणजे मौलिक वाङ्मय असें ज्यांना वाटतें त्यांच्या दृष्टीनें सावरकरांच्या नाटकांत त्यांस कांहींच आढळणार नाहीं. पण खऱ्या टीकाकाराला मात्र त्याकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं !

सावरकरांच्या काव्याचें स्वरूप

सावरकरांतील काव्यगुण हा मातृवंश व पितृवंश या दोहोंकडील वारसा आहे. त्यांच्या मनावर लहानपणापासून जुन्या मराठी काव्याचा परिणाम झाला आहे. संस्कृत वाङ्मयाची गोडी पुराणांमुळें त्यांना लागली. त्यांचे

वडील अिंग्रजी कवितांचें वाचनहि त्यांना करून दाखवीत; निरनिराळ्या महाकाव्यांतील युद्धांची, पराक्रमी योद्धयांचीं वर्णनें त्यांच्या कानांवर घालीत. त्यामुळें अितिहास नि काव्य यांचें बाळकडूंच सावरकरांना मिळालें आहे. सावरकर मोठे झाले, तेव्हां त्यांचें विचार देशभक्तिपर होअूं लागले. चाफेकरांच्या बलिदानानें त्यांच्यांतील वीरवृत्ति, हौतात्म्याची ओढ जागी झाली. त्यांच्या बलिदानामुळें ते अश्रु ढाळीत. स्वातंत्र्याची भावना अुत्कट होत चालली. स्वतःचे स्वातंत्र्यवादी विचार व अुत्कट भावना यांच्या अभिव्यक्तेसाठीं ते धडपडूं लागले. अेखादें चुकलेलें मूल आपल्या आअीसाठीं ज्या आर्ततेनें हांका मारतें, त्या आर्ततेनें सावरकर अीश्वराला विचारूं लागले—

हे प्रभो हर्षविसी यासी । परि मज रडवत बसवीसी
मम माता कां लपवीसी । अजुनि रे !

अशा मनःस्थितींत त्यांच्या ज्ञानाचा विकास झाला. अिंग्रजी महाकाव्यें वाचलीं, तेव्हां आपणहि महाकवि व्हावें अशी आकांक्षा निर्माण झाली ! पण काव्याचे बुलबुल त्यांना रिझविनात, तारुण्याचा सौंदर्यान्वेषी अुन्माद त्यांना मोहवीनासा झाला. म्हणून स्फूर्तीसाठीं, प्रेरणेसाठीं ते अितिहासाकडे वळले. पुण्याला असतांना त्यांनीं बाजी प्रभू व सिंहगड असे दोन अमर पोवाडे रचले. परतंत्र्याची चीड निर्माण करून तरुणांना युद्धास प्रवृत्त करणें हा हेतु बनला. त्या हेतूनें गतेतिहासांतील कथा-काव्याची संजीवनी शिंपडून सावरकरांनीं तरुणांपुढें अुभ्या केल्या. हजारों तरुणांनीं स्वातंत्र्यभावनेनें रसरसलेलीं तीं कवनें मुखोद्गत केलीं ! पण हीं कवनें केवळ जुन्या शाहिरी पोवाड्यासारखीं नव्हतीं; त्यांत 'रात्रीलाही निद्रा लागे किर्र शब्द अुमटे' यासारख्या काव्यमय ओळी गुंफलेल्या असल्यामुळें सावरकरांचे पोवाडे म्हणजे वीरकाव्यें झालीं. ललित कल्पना, भावनोत्कटता, त्यांतील काव्य, सौंदर्य—हें तलवारीच्या म्यानाला असलेल्या मखमली अस्तरासारखें आहे. सावरकरांच्या काव्यनिर्मितींतील १९०६ पर्यंतचा हा खंड आहे.

सावरकरांची यानंतरची कविता विविध स्वरूपाची आहे. लंडनमध्यें असतांना वा जन्मठेपेवर जाण्यापूर्वीं केलेली कविता ही त्यांतील आर्तता,

प्रक्षोभकता यांनीं रसरसलेली आहे.'तारकांस पाहून, सागरास, मूर्ति दुजी ती, अित्यादि महत्त्वपूर्ण कविता त्यांनीं याच काळांत रचल्या. पण अंदमानांत सावरकर गेले, आणि जीवनाशेचे झरे आटविणाऱ्या त्या भयानक वाळवंटांतहि सावरकरांनीं काव्याचें सरोवर निर्माण केलें. त्यांत ' कमलें ' सारखींच पुष्पें अुमलर्ली, गोमंतकालाहि त्याच्या लाटांचा स्पर्श झाला; त्या सरोवरांत 'चांदोबा'चें प्रतिबिंबहि पडलें ! अंदमानांत ज्या पद्धतीनें सावरकरांनीं कविता रचली ती ' कांटेरी ' पद्धत वाङ्मयाच्या अितिहासांत खरोखर अमर ठरेल. अंदमानांतून सुटल्यानंतर सावरकरांनीं गोळा केलेलीं ' रानफुलें ' वाचकांच्यापुढें आणून ओतलीं. त्यानंतर सावरकरांनीं बहुतेक सर्व गद्यलेखनच केलें आहे. आणि जी थोडी कविता केली आहे ती प्रचारकी आहे. सावरकरांच्या कवितेच्या अेकूण अकरा हजार ओळी अुपलब्ध असून ' महासागर ' हें दीर्घकाव्य अद्यापि प्रसिद्ध झालेलें नाहीं.

काव्यगुण

सावरकरांच्या काव्याचे गुण कोणते, त्यांतील सौंदर्यस्थळें कोणतीं याचा विचार केला पाहिजे. सावरकरांच्या काव्यगुणांचें साधार समीक्षण करावयाचें म्हटलें तर तो अेक स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. पण ऋतु बदलला कीं पानांचे रंग बदलावेत तसें सावरकरांच्या काव्याचें झालें आहे. त्यांत वीररस, शृंगाररस, करुणरस यांसारखे रस विषयानुरुप हाताळले आहेत. मृत्यूच्या शय्येवर बसून केलेल्या कवितेंत त्यांच्या तत्त्वचिंतेक मनाचें जें प्रतिबिंब पडलें आहे तें पाहिलें म्हणजे सावरकरांनीं अेक नवा रसच निर्माण केला आहे असें वाटतें. अितकें त्याचें स्वरूप आगळें आहे. त्यांच्या कांहीं कविता साध्या, घरगुती झाल्या आहेत, कांहीं वर्णनांनीं बहरल्या आहेत, कांहीं ओजानें तळपत आहेत, कांहीं कल्पनेच्या भव्यतेनें नटल्या आहेत, कांहीं आत्मनिष्ठ वृत्तीनें अमर झाल्या आहेत. हीं सर्व सावरकरांचीं काव्य वैशिष्ट्यें आहेत. त्यांची निर्मिति त्यांची वैनतेयी प्रतिभा, त्यांचें समृद्ध व्यक्तिमत्व, अुच्च अनुभूति, आणि त्यांचा अुत्कट ध्येयवाद यांतून झाली आहे. सावरकरांच्या कांहीं कवितांचा परिचय करून घेतला म्हणजेच त्यांच्या या काव्यगुणांची प्रती घेण्यासारखी आहे.

भावोत्कट कविता

भावनोत्कटता हा कोणत्याहि काव्याचा विशेष. कवि आपल्या मनांतील भावना कल्पना, शब्द यांच्या सामर्थ्यानें अितरांपुढें काव्याच्या रूपानें सुपूर्त करतो. या दृष्टीनें सावरकरांच्या अग्रगण्य भावोत्कट कवितांत 'सागरास,' 'माझें मृत्युपत्र,' 'चांदोबा चांदोबा भागलास कां' 'मूर्ति दुजी ती' या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. 'सागरास' या कवितेचा अितिहास मोठा रोमांचकारी आहे ! (दुसऱ्या प्रकरणांत तो आलाच आहे.) मारतांत परत येतां येणार नाहीं, नि त्यामुळें आपल्या भारतमातेचें दर्शन आपणाला पुन्हां होणार नाहीं ह्या जाणीवेनें विव्हळ झालेल्या कवीनें डोळ्यांतून अश्रुधारा वाहात असतांना या कवितेंतील चरण ओटांत पुटपुटले ! त्यांत मातृभूमीशीं मातृवत् सलगी आहे, लहान मुलाचा हट्ट आहे. पाण्याबाहेर तडफडणाऱ्या माशाची तळमळ अंतःकरणांत असलेला हा कवि सागरावर रुष्ट होअून त्याला माझ्या मायभूमीच्या कुशींत जन्मलेला अगस्ति तुला पिअून टाकील अशी भीती घालीत आहे. पण समुद्र फेंसाच्या रूपानें हंसतो आहे असें त्याला वाटतें. केवढी रम्य कल्पना आहे ही ! कल्पनांचें सौंदर्य, अर्थगौरव—या सर्व वैशिष्ट्यापेक्षां त्यांतील भावोत्कटताच अधिक मनाला जाअून भिडते यांत शंकाच नाहीं.

'माझें मृत्युपत्र' व त्याच वेळीं आपल्या वहिनींस सावरकरांनीं लिहिलेलें 'सान्त्वन'पर पत्र हीं याच भावोत्कटतेमुळें रमणीय वाटतात. कवि स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेण्यासाठीं अेका अदम्य वृत्तीनें प्रवृत्त झाला आहे. त्याच्या हृदयांत त्यागाची ऊर्मि अुसळली आहे. कारुण्य लोपलें असून निर्धार प्रकट झाला आहे. अशरण वृत्ति अुफाळून वर आली आहे. आणि या अलौकिक भावनांनीं प्रेरित होअून कवि सांगतो—

अमर होय ती वंशलता । निर्वंश जिचा देवाकरितां
दिगंतीं पसरे सुगंधता । लोकहित परिमलाची !

कर्तव्याची पूजा बांधण्यासाठीं स्वतःचें जीवनपुष्प अुधळणाऱ्या कर्मवीराचा अुन्माद या वाक्यांतील शब्दांत ठांसून भरला आहे. 'माझें मृत्युपत्र'

लिहितांना कवीचें मन अशाच अुदात्त भावनांनीं सुगंधित झालें आहे. 'वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हांसे' अशी रम्य सुरुवात करून कवि आपल्या लहानपणींच्या गोड आठवणी सांगतो. आणि त्यांत गुंतून न पडतां क्षणांत सगळे मायेचे पाश तोडून आपला निर्धार प्रकट करतो—

'आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडितां हें
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुल सज्ज आहे
हे साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा
हा अीश्वरीं मिळविला अम्हि मान साचा'

सावरकरांना पकडून अिंग्लंडमध्यें तुरुंगांत ठेवलें असतांना अतिशय कडक थंडी पडली होती. तुरुंगांत शरीर गारठण्याची वेळ आली. अशा वेळीं आपल्या गारठत चाललेल्या मनाला वज्रमय करण्यासाठीं त्यांनीं 'मूर्ति उभी ती' ही कविता लिहिली. अितक्या विलक्षण प्रसंगीं केलेली ही कविताच त्यांच्या प्रतिभेच्या परमोच्च क्षणीं रचलेलें काव्य ठरेल अितकी ती प्रभावी आहे. कवितेचें सौम्य आणि रमणीय रूप कवीला नको आहे, रुंडधरा छिन्नमुंड अशा रक्ताची धार अुडविणाऱ्या रणदेवीसारखें रौद्र-रूपच मला आज हवें आहे असा कवीचा आग्रह आहे. कवि जें साहस करावयास निघाला तें सोपें जावें म्हणून या मूर्तीचें दर्शन कवीला हवें आहे. अशा कृतिशूर मनांतून ही कविता जन्मली आहे. त्यांत अुग्र व कोमल असे दोन्ही भाव आलटून पालटून वर्णन करून कवीनें आपलें विलक्षण शब्दप्रभुत्व सिद्ध केलें आहे. तीं दोन्हीहि वर्णनें पहा—

रम्य सरें तीं, नलिनें, नाल सुभग ते
ते सुगंध भृंगगुंज, त्या सुमंजुला
सारंग्या, गीतें तीं गोड गोड तीं,
दयित स्मृति आलिंगन जीस तृप्तवी
शेती ती हिरवी आल्हादिते मळे
सरिता पुलिनोत्थ थंड तीं कलिंगडें,
मुक्त नील आकाशश्री मनोहरा,
मुक्त नील सागरतल, मुक्त वायु ते

कवि पुढें सांगतो—" रास-लीलेमध्यें हास्य–लास्य करणारीं, किंवा कोंवळ्या नंदकिशोराच्या ओंठावरील बांसरीसारखी भासणारी कविता मला नको; तर—

अहा, त्याच कोमला
अधरावरि कर्कश रणशृंग होउनी
रणवेताळाच्या वेताळतांडवा
तालपिटी भारतीय त्या रणामध्यें
' अच्छेद्योऽयमदाह्योऽशोष्य अेवच
लोकक्षयकृत प्रवृद्ध काळ, काळ मी !
दंष्ट्रा विक्राळ, गर्ज भयद कोण तो
कविते, तव – जो सहस्र वत्सरांतुनी
घुमत येत आजहि, हें भुवन कंपवी
—त्या छंदीं, त्या वृत्तीं, समरभीषणा
प्रकटित तव चंडमूर्ति जी दुजी अहा
देवि, आज देवो मज तीच दर्शना !"

अशी भीषण रमणीय कविता कवीला हवी आहे. या दोन रमणीय व भीषण वर्णनांतील विरोध अितक्या परिणामकारक रीतीनें वर्णिला आहे कीं, कवीच्या परस्परविरोधी भावनांचें चित्रच डोळ्यांपुढें अुभें राहावें. कवितेच्या अर्ध्या चरणापासूनच कोमलतेचें वर्णन मागें टाकून कठोर आणि कर्कश अशा ध्वनींनीं त्या दुज्या मूर्तीचें वर्णन बहारदार रीतीनें केलें आहे. हा बदल अतिशय सहजतेनें गवअी वेगवेगळे स्वर लागोपाठ काढून दाखवतो तसा साधला आहे. ' कुरळीं जे खेळावे केश मृदुल ते ' ही ओळ लिहून लगेच " क्रोधानें राठ राठ अुठुनिया जवें, फुटलेल्या पेंवांतुनि सर्प कीं तसें ' या शब्दचित्र अुभ्या करणाऱ्या ओळी आल्या आहेत. या सर्व कवितेंत अर्थवाहित्व अितकें दांडगें आहे, अर्थसंवाही नादरचना (Sound echoing the sense) अितकी अनुरूप झाली आहे, रसनिर्मितीचा परमोत्कर्ष अितक्या सहजतेनें साधला आहे कीं, वाचक ही कविता

वाचतांना तिच्यांतील भावनांशीं, प्रतीकांशीं तन्मय होतो; आणि त्या कवितेमागें असलेली अुच्च अनुभूति स्वतःच अनुभवतो !

या सर्वांपेक्षां अत्यंत वेगळ्या भावना सावरकरांनीं ज्यांत प्रकट केल्या आहेत अशी त्यांची कविता म्हणजे अंदमानमध्यें असतांना 'चांदोबा' ला अुद्देशून केलेली कविता. त्या भयंकर कारागारांत अेकदां सावरकरांना चंद्राची कोर आपल्या खोलींत दिसली. त्या वेळीं त्यांच्या कविमनाला झालेला आनंद "चांदोबा चांदोबा भागलास कां ?" या कवितेंत त्यांनीं व्यक्त केला आहे. त्याचें वैशिष्ट्य असें कीं, त्यांत कवि अत्यंत घरगुतीपणानें आपल्या आठवणी सांगत आहे, आणि त्यासुद्धां अत्यंत सोप्या भाषेंत. त्या चंद्रकोरीनें कवीच्या आनंदसागराला भरती येते, आणि तो सांगतो—

'मम मस्तिष्कीं शतगाणीं । गुणगुणती मंजुळवाणी
शतसनयांतुनि परि त्याही । शकूं सामावत तें नाहीं !

कवीची स्मृति जागी होते. भूतकाळाचा पडदा फाडून कवीच्या जुन्या भाव-भावना थैमान घालतात, आणि आनंदातिशयानें तो ओरडतो — "स्मरले ! स्मरले ! लुटा सुखा चांदोबा चांदोबा....." स्वप्नांतील बुलबुल गीतें गाअूं लागले. चित्त हंसलें, स्मृतीचें हिम चंद्रकोरीच्या प्रकाशानें वितळलें, आणि स्मृतीची गंगा वाहूं लागली—

मनःपटीं त्या मधुयंत्रें । चमकत चलतीं स्मृतिचित्रें
होत तया आणि बघत तया । रंगुनिया आणि गुंगुनिया
पुनः पुन्हां मी लुटत सुखा । गाअि 'चांदोबा भागलास कां ?'

सावरकरांच्या या कवितेंत वर्णरचना, शब्दलालित्य, भावोत्कटता यांचा अुत्कर्षबिंदु साधल्यासारखें वाटतें. संस्कृतप्रचुर शब्दरचनेच्या दिवाणखान्यांतून घरगुती व स्नेहल भाषेच्या माजघरांत येअून कवि आपल्या आअीशीं सुखाच्या गोष्टी बोलत आहे, आजूबाजूला मुलें हंसत-खेळत आहेत—असें दृश्य अुभें राहातें. विलक्षण मार्दव व माधुर्य यांचा शिरकाव या कवितेवर केल्यासारखा वाटतो.

कल्पनावैभव

सावरकरांची कल्पनाशक्ति भव्य, तरल आणि अुद्दीपक आहे. त्यांची निरीक्षणाची शक्ति मर्मस्पर्शी आणि सूक्ष्म आहे. त्यांच्या काव्याचा गाभाच स्वप्नरंजन (Romanticism) असल्यामुळें, सामान्य वस्तूंवर किंवा घटनांवर कवीचा दृष्टिक्षेप पडतांच त्या चैतन्यानें थरथरूं लागतात. यांतूनच त्यांच्या भव्योदात्त व मार्मिक अुपमांचा जन्म झालेला आहे. कल्पना भव्य असण्यासाठीं संवेदना तीव्र व व्यापक हवी. सावरकरांना हें देणेंच आहे. त्यामुळें त्यांच्या कल्पना किंवा संज्ञा (Conception) व्यापक होतात. अशा प्रकारचीं भव्य कल्पनांनीं भरलेलीं काव्यें मराठींत थोडीं आहेत. सावरकरांच्या कल्पना-चमत्कृतीसाठीं त्यांच्या 'तारकांस पाहून', 'निद्रे' या स्फुट कविता, आणि 'कमला' हें दीर्घकाव्य हीं वाचण्यासारखीं आहेत.

'तारकांस पाहून' ही कविता सागरांत पडलेलीं आकाशांतील ताऱ्यांचीं प्रतिबिंबें पाहून कवीला सुचलेल्या रूपकांची माला आहे. विरल मेघांची दुलअी पांघरून निजलेल्या रजनीचें हें अनावृत मुख (म्हणजे चंद्र), सुरासुरांनीं केलेल्या सागरमंथनांतून मिळालेल्या अमृतकलशांतून गळलेले हे अमृतबिंदु म्हणजे तारे, श्रीहरि भेटावयास आल्यानंतर बेसावध अवस्थेंत असलेल्या गिरिजेचा वस्त्र सांवरतां सांवरतां गळ्यांतील हार तुटला—नि त्यांतील सैरावैरा पडलेले हे मोतीं म्हणजे या तारका,—अशा किती तरी रम्य आणि मार्मिक अुपमा—रूपकें कवीनें या कवितेंत गोंवलीं आहेत.

कल्पनेच्या चमत्कृतीचें दुसरें अुत्कृष्ट उदाहरण म्हणजे त्यांची 'निद्रे' ही स्फुट कविता. त्यांत निद्रेसंबंधीं सात कल्पना अेकामागून अेक फेंकल्या आहेत. निराशेंत, जर्जर अवस्थेंत अंदमानांत जगत असतांना झोंपेनें कशी सोबत केली—हा या कवितेचा विषय आहे. रात्रीं दमलेलें शरीर जमिनीवर पहुडलें कीं, दूरवर असलेल्या फुलबागेंतून येणाऱ्या सुवासाप्रमाणें निद्रेचें आगमन सुखद वाटतें; नव्हे—निद्रा हीहि अेका अर्थानें फुलबागच ! निद्रा म्हणजे कुशल शस्त्रवैद्यानें हुंगावयास दिलेली मोहकुपी (क्लोरोफॉर्म) आहे !

पण निद्रा म्हणजे केवळ फुलशेज नाहीं; ती आपल्या पंखावर त्या कारा-गृहांतहि सारें विश्व आणते. दिवसा अदृश्य असणारीं सारीं दृश्यें ती दाखविते ! त्या स्वप्नरथांतून ती सर्वत्र दौडते ! यांतहि शेवटीं कवि आपल्या तत्त्वज्ञ मनोवृत्तीचें दर्शन घडवितो. आत्म्यापासून देह भिन्न आहे हें निद्रेनेंच माणसाला शिकविलें असें कवि सांगतो !

'कमला' काव्यांत तर अुपमांची रेलचेल आहे. पुराणांतील अनेक घटना सावरकर काव्याच्या मखरांत बसवितात. त्यामुळें जलाशयांत वर दिसणारी कमलिनी म्हणजे यमुनेंत स्नान करणाऱ्या गोपी होत्या; कौमुदीच्या नौकेंत बसलेली मत्स्यगंधा म्हणजे ही फुलबाग, मखराच्या शोभिवंत चौकटींत बसलेली कमला म्हणजे कालिदासाच्या श्लोकांत बसविलेली अुपमाच, केळीच्या झाडाआड़ून डोकावणारी कमला म्हणजे ढगाआड़ून दिसणारा चंद्रच—अित्यादि रम्य कल्पना या काव्यांत विखुरल्या आहेत. सावरकरांच्या मार्मिक निरीक्षणशक्तीचीं कितीतरी अुदाहरणें यांत आहेत. फुलबागेचें वर्णन करतांना अनेक अुत्प्रेक्षा त्यांत गोंवल्या आहेत. सुवर्णचंपकाचीं फुलें हीं कशीं आलीं हें सांगतांना कवि म्हणतो—

ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनी तियें
मृदु चेतन सोन्याचीं, स्वर्णचंपक हीं फुलें !

हें सर्व फुलबागेचें वर्णनच कवीची प्रतिभा त्यांत किती रंगली होती हें सिद्ध करतें. आपल्या अत्तराच्या कुप्या कलिकांनीं अुघडल्या, वेलींनीं फुलांच्या अक्षता वाहिल्या, अित्यादि कल्पना त्यांतील नाविन्यानें अत्यंत रम्य वाटतात.

हें सर्वच काव्य अत्यंत रमणीय व भव्य कल्पनाविलासानें दरवळलेलें आहे. या सर्व कवितांप्रमाणें अितर सर्व काव्यांत सावरकरांच्या कल्पना-कुसुमांचा सडा पडलेला आहे. पण त्यांची 'जगन्नाथाचा रथोत्सव' ही कविता त्यांतील कल्पनेच्या भव्यतेसाठीं अमर होण्यासारखी आहे. विश्व-कर्त्या जगन्नाथाचा रथ म्हणजे या दाही दिशा. तो रथ कालपथाच्या अतूट अुतरणीवरून सुटला आहे, आणि त्यामुळें मागें युगानुयुगें नक्षत्रांचा धुरळा

अडून राहिला आहे. शेकडों सूर्यांच्या मशाली आकाशांत जळत आहेत, शतावधि चंद्रज्योति अुडत आहेत. आणि मधूनमधून धूमकेतूंचे बाण सरसरत आहेत. याहि कवितेचा समारोप अपरिहार्यपणें तात्त्विकतेंत झाला आहे. यच्चयावत् जड आणि चेतन वस्तूंत जी गति सूक्ष्मपणें सामावली आहे तीच या रथाला पुढें नेत आहे. या सर्व वर्णनाप्रमाणेंच 'समाधि' या काव्यांतहि कल्पनेची भव्यता आहे. खरोखर,—हें सावरकरांचें कल्पना-वैभव अितकें मोठें आहे कीं, हा अेकच विशेष ध्यानांत घेतला तरी त्यांना महाकवीची प्रतिभा आहे असें म्हणावें लागेल.

रसनिर्मिति आणि वर्णनशैली

सावरकरांच्या काव्यांतील रसनिर्मितीचें सामर्थ्य मोठें आहे. त्यांच्या आत्मनिष्ठ कवितेंत करुण, वीररस हे हौतात्म्याची भूमिका वठविण्यासाठीं त्यांनीं अत्यंत प्रभावी रीतीनें वापरले आहेत. 'मरणोन्मुख शय्येवर' ही त्यांची कविता या असामान्य रसमिश्रणाचें प्रतीक आहे. अंदमानांत दोनतीन वेळां मृत्यु त्यांच्या अगदीं नजीक येअून परतला. जीवनाचे धागे तुटण्याच्या बेतांत होते. अशा आयुष्याचा अंत करावयासाठीं कवि मृत्यूला बोलावीत आहे! त्यांत विकट हास्य करीत अुभ्या असलेल्या मृत्यूकडे पाहून सावरकरांनीं जें विमल हास्य केलें आहे त्याचें दर्शन आहे. 'मूर्ति दुजी ती' ही कविता करुण आणि रौद्र हे दोन्ही रस किती अुत्कटतेनें दाखविते हें आपण पाहिलेंच आहे. 'कमला काव्यांत तर शृंगार, वत्सल, वीर हे तीनहि रस निर्माण करण्यांत सावरकरांची प्रतिभा अत्यंत यशस्वी झाली आहे. त्यांतील घरगुतीपणा, कोमल भावना छेडणारे रम्य प्रसंग, बहारीचीं वर्णनें—हीं या रसनिर्मितीचीं साधनें आहेत. मंगळागौरीचें वर्णन, लग्न-सोहळ्याचें वर्णन, लग्नसोहळ्यांत नव्या दांपत्याच्या अेकमेकांना होणाऱ्या स्पर्शानें मनांत जे भाव अुमटतात त्याचें बहारीचें वर्णन, कमलेच्या मनांत 'पहिल्या रात्री' पूर्वी अुठलेल्या प्रणयभावनांचा कल्लोळ,—हीं सगळीं या काव्यांतील रसोत्कटतेचीं स्थळें आहेत. प्रणयाच्या रात्रीचें वर्णन करतांना कौमुदीच्या सरी पडत आहेत, मदनमंदिरांत कामव्याकुल कमल-मुकुंदाचे

प्रणयालाप चालू आहेत, अित्यादि सांगून लगेच त्या महालाच्या दारावर थाप पडल्याचें कवि सांगतो. रणावर जाण्याची आज्ञा मुकुंदाचे हातीं पडते. या ठिकाणीं शृंगाररसांतून करुणरसाकडे, करुणरसांतून वीररसाकडे कवितेचा ओघ अत्यंत सहजतेनें नेला आहे. मग तेथें फुलांची कोमलता, प्रणयाचा सुगंध—हें जाऊन तळपत्या तलवारी नाचूं लागतात. प्रीतीचे आलाप संपून कर्तव्याची रणभेरी अैकूं येते. आणि तो नायक कर्तव्याच्या रणांगणाकडे धांव घेतो.

सारांश, रसमय चित्रण, कल्पकतेची सुंदर बैठक, मधुमधुर भावनांचा शिडकाव, मनोवेधक जुळणी—या सगळ्यामुळें 'कमला' काव्य रसनिर्मितीच्या दृष्टीनें अुत्कृष्ट ठरलें आहे. सावरकरांनीं अगदीं पोवाड्यापासून तों बारीक-सारीक काव्यांत जी अुदात्तता ओतली आहे, त्यामुळें तो अेक शांतरसाचाच प्रकार वाटतो.

वर्णनशैलीच्या दृष्टीनें सावरकरांच्या अनेक कवितांचीं अुदाहरणें देतां येतील. पण त्यांची 'आकांक्षा' ही दीर्घ कविताहि या दृष्टीनें आदर्श आहे. कावळ्यांच्या समुदायांत वावरणाऱ्या अेका गरुड जोडप्याच्या कन्येला अेकदां अेका गरुड व सर्पाची झुंज दिसते. त्यां झुंजींत तो सर्प घायाळ होअून गरुड विजयी होतो. त्या गरुडाच्या प्राप्तीसाठीं ही गरुड-कन्या तळमळते! आअीबाप तिच्या विरुद्ध असतात, पण ती आपली मनीषा सोडीत नाहीं.—असें या कवितेचें कथानक आहे. यांत पहिल्या ९-१० श्लोकांत पौराणिक पद्धतीचें वातावरण सावरकरांनीं निर्माण केलें आहे. त्यांतील शब्दरचना अितकी मार्मिक आहे कीं त्यामुळेंच हें वर्णन बहारीचें झालें आहे—

सों सों फूं फूं करित सुटले दुर्विषाचे फवारे
सारें वातावरण भरितीं कालकूटांत सारे...
झुंडी जैशा सर्पण सुटल्या कृष्णपुच्छी शरांच्या...

हें वर्णन, किंवा—गरुड-सर्प यांच्यांतील युद्धाचें पुढील वर्णन अतिशय यथार्थ वाटतें—

दे घे, घे दे, लगडुनि खगा, घोर आघात कर्मा
हारे हा, तों अुपसुनि फणा मत्त आव्हान फूं फूं
दे, तो येतां दशन विळखे मारितो त्यास गुंफूं
.....भंगक्रोधें गरल वमला चाविल्या अुग्र दाढा
पुच्छाघातें अुडवित विजा हाणिली भूतडाडा

—या भीषण वर्णनांत सावरकरांनीं युद्धांतील हालचालींचा तपशील दिला—आहे तो किती आश्चर्यकारक रीतीनें सूक्ष्म आहे हें पहाण्यासारखें आहे. वातावरणाची निर्मिति सहज रीतीनें साधली आहे. त्यांतील शब्द आपणांला कवितेंतील वर्ण्य स्थळाकडे घेअून जात आहेत असें वाटावें अशी ही वर्णनशैली अचूक वाटते.

काव्यांतील भाषा

सावरकरांच्या काव्यगुणांचें समीक्षण केल्यानंतर त्यांच्या काव्यांतील भाषा-शैलीचा व वृत्तरचनेचा ओझरता परिचय करून दिला पाहिजे. सावरकरांच्या भाषेचा पहिला गुण म्हणजे ओज. सावरकरांच्या साध्या कवितेला त्यामुळें विलक्षण ओज चढतें.

'ध्वनिध्वनति' या ! असाल तिथुनि मराठे
धजा वीर धजावीर, वीर हो धजा !
दुमदुमुनी शवशत तो दुंदुभी अुठे !

अशांसारख्या काव्यपंक्ति सहजपणें ते कवितेंत ओततात. 'मूर्ति दुजी ती' या कवितेंत—

रुंडधरा छिन्न मुंड मूर्तिसी नमो
नमो नमः सहस्रधा प्रमत्त नर्तने !

यांसारख्या वातलेल्या ओळी हें ओज दाखवितात. क्रकच तीक्ष्ण, प्रलयोर्मि, चिकटाविकट,-असे शब्द वापरून, तर कधीं 'लोखंडी जबडा वासूनि आपला' यासारखीं रूपकें वापरून सावरकर हे ओज आणतात.

ओजाप्रमाणेंच अर्थगौरव हा त्यांच्या भाषेचा दुसरा गुण आहे. गोमंतक काव्यांत हा विशेषत्वानें साधला आहे. 'सान्त्वन' सारख्या लहान कवितांतहि साधे शब्द अत्यंत अर्थपूर्ण रीतीनें वापरले आहेत. सूर्याच्या मशाली जळत आहेत, ज्वालांच्या कल्लोळांत अुभा असूनहि त्या ज्वाला माझे पाय चाटतील,—यांसारख्या 'कल्पना साध्या शब्दांत त्यांनीं मांडल्या आहेत. पण जसा अर्थगौरव त्यांच्या काव्यांत आहे तसा क्लिष्टपणाहि त्यांत आहे. क्लिष्टतेचा खडक फोडून वाचक आंत गेला तर मात्र त्यांतून अमृतमय निर्झर बाहेर आलेला त्याला दिसेल. त्या कल्पनांच्या क्लिष्टतेमुळें सावरकरांचें काव्य अत्यंत कठीण झालें आहे. 'सप्तर्षि', 'मरणोन्मुख शय्येवर' हीं या क्लिष्टतेचीं अुदाहरणें म्हणून सांगतां येतील. काव्याची प्रासादिकता ही त्यांतून होणाऱ्या अर्थनिष्पत्तीवरून ठरते. कविता ही समजावयास गद्याअितकीच सोपी आणि गद्यप्राय नसेल तर ती अर्थनिष्पत्तींत यशस्वी ठरून गेयहि ठरते. ही कसोटी लावली तरीहि सावरकरांचें काव्य अनेक ठिकाणीं अुत्कृष्ट झालें आहे. अनेक ठिकाणीं क्लिष्टता, जडत्व, संस्कृतप्राचुर्य लुप्त होअून तें काव्य श्रवणीय, अर्थपूर्ण, व सुगम झालें आहे. 'कमला' काव्यांतील ओळीच्या ओळी अशा पाणीदार मोत्यांसारख्या शैलीनें लिहिल्या आहेत. भव्य वर्णनें सहजतेनें रेखाटलीं आहेत. सावरकरांनीं 'कमला' काव्यांत घातलेले संवाद हे त्यांच्या नवीन भाषाशैलीचें व मानवी भावनांचें पृथक्करण करणाऱ्या बुद्धीचें प्रतीक आहेत.

पण खंडकाव्य, स्फुटकाव्य यांत अनेक ठिकाणीं भारदस्त भाषा वापरल्यामुळें सामान्य रसिक त्यांच्या अलौकिक काव्याला मुकतो. अेक प्रकारचें बोजड गांभीर्य काव्यांत पसरतें. प्रासादिकता अभावानें भासते. संस्कृतची मापेवर पडलेली फार मोठी छाप हें याचें प्रमुख कारण आहे. खडबडीतपणा हें भाषेचें वैशिष्ट्य झालें आहे. अनेक ठिकाणीं 'प्रीत्युत्कटत्व, करकर्पण, तार्क्ष्य, क्लिन्नगंध, बुद्ध्यंधत्व—असे शब्द वापरल्यामुळें, किंवा अस्मत्प्राणहवी यासारखे संस्कृत शब्दप्रयोग, किंवा 'अच्छेद्योऽयमदाह्योऽयम्' अित्यादि संस्कृत सुभाषितें—यांसारख्या गोष्टी आल्यामुळें हें संस्कृतप्राचुर्य प्रासादिकतेची हानी करणारें ठरतें. संस्कृतप्राचुर्याबरोबरच शब्दांवरोवर बरीच

झटापटहि सावरकरांनीं केली आहे. कांहीं ठिकाणीं नयन–दिपविता, मलमल-मऊ, अंधेर-समय यांसारख्या शब्दांची जुळणी; कधीं–नवीं नयीं, कोकिली तान, तान, चुटचुटक्या मिटमिटक्या यांसारखीं शब्दांचीं विचित्र रूपें; 'जो–तो' शब्द वापरतांना झालेला दूरान्वय अित्यादींमुळें या क्लिष्टतेंत भर पडली आहे. 'ची' या पादपूरकांचे 'चीत्कार' तर काव्यांत अनेक वेळां अैकूं येतात. सारांश, 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावांचून, विरोधाल तर तुम्हांला विरोधूनहि' हा मुसलमानांविषयींचा राजकीय दंडक विचाऱ्या शब्दांनाहि सावरकरांनीं लाविल्यामुळें त्यांची दैना अुडाली आहे. पण अर्थात् हे दोष सोडले तर कवितेच्या आशयाप्रमाणें, रसाप्रमाणें बदलणारी शैली अनेक ठिकाणीं वापरून सावरकरांनीं आपलें शब्दप्रभुत्व सिद्ध केलें आहे यांत शंकाच नाहीं. म्हणूनच त्यांची भाषाशैली ही काव्य–कल्पनांना सचेतन करणारी संजीवनी आहे, संवेदना जागृत करणारी शक्ति आहे ! म्हणूनच या काव्याचे रसिक असेंच म्हणतात कीं—

शब्दमेघ ते पत्रिकेंतले
स्वातीचे अर्थबिंदु टपकतांच तो
हृदयाच्या शिंपल्यांत झेलुनी धरी

सावरकरांच्या काव्यांत वृत्तरचनेला गौणत्व आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठीं कविमन वृत्तांचे किनारे फोडून दूर जातें, म्हणूनच महाकाव्याला अुपयोगी असें 'निर्यमक,' 'वैनायक' वृत्त सावरकरांनीं तयार केलें. निर्यमकत्व, धांवतेपणा, व पठण–वाचन–प्रियता हेच या वृत्ताचे विशेष आहेत. रूढ चालीप्रमाणें तें न गातां वाचीत जावयाचें. सावरकरांच्या आवेशपूर्ण, वक्तृत्वपूर्ण शैलीला साजेसेंच हें वृत्त आहे. यावर मिल्टनच्या पद्धतीची छाया पडली आहे. अर्थात् या वृत्तावरहि कांहीं आक्षेप आहेतच. धांवत्या निर्यमक रचनेस लागणारा अखंडपणा या मात्रावलींत नाहीं असें अेक म्हणणें आहे.* पण सावरकरांची पद्यरचना साधारणपणें जुन्या थाटाची असली, तरी त्यांचें 'वैनायक' हें वृत्त अलीकडच्या मुक्तछंद काव्याचें मूळ आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

* सावरकर–काव्य–समालोचन, पृष्ठ १५७.

सुवर्णयुगाचे मानकरी

सावरकरांना महाकवि म्हणावें कीं नाहीं याविषयीं वाद चालू असतो. पण सावरकरांच्या या सर्व साहित्यसृष्टीचें विहंगमावलोकन केल्यावर अेक गोष्ट निश्चित पटते कीं, त्यांच्या प्रतिभेचा आटोप फार मोठा आहे. त्यांच्या कल्पनेचीं क्षितिजें अति दूरवर पसरलीं आहेत. त्यांची अनुभूति अद्‌भुत व अुच्च दर्जाची आहे. त्यांचें व्यक्तिमत्व असामान्यत्वानें साहित्यांत तळपत आहे. ध्येयवादित्वामुळें अेका अपूर्व अुदात्ततेचा स्पर्श त्यांच्या साहित्याला झाला आहे. त्यांतील तात्त्विकतेमुळें तिची वैचारिक बैठकच वेगळी झाली आहे. या सगळ्या वैशिष्ट्यामुळें सावरकरांचें साहित्य हें अगदीं वेगळें वाटतें. त्याची श्रेष्ठता कांहीं 'आगळीच' आहे असें भासतें. म्हणूनच त्यांचें साहित्यांतील स्थान हेंहि 'असाधारण' आहे.

दोन पिढ्यांपूर्वी हरिभाअू आपटे, खाडिलकर, टिळक, गडकरी, परांजपे, केशवसुत आदि साहित्यिकांनीं, कवींनीं, पत्रकारांनीं मराठी साहित्यांत अेक सुवर्णयुग निर्माण केलें होतें. त्या सुवर्णयुगाचे सावरकर हे शैलीच्या दृष्टीनें व विचारांच्या दृष्टीनेंहि शिवरामपंत परांजप्यांना जवळचे. शिवरामपंत हे तर सावरकरांचे राजकीय गुरूच ! सावरकरांप्रमाणेंच परांजप्यांच्या साहित्याचीं असीम स्वातंत्र्येच्छा आणि काव्यमयता हीं सूत्रें. परांजपे हे ब्रिटिश सत्तेच्या अुग्र द्वेषांमुळें अुपरोध, अुपहास यांनीं भरलेलें लिखाण करीत. मात्र त्यांची सौंदर्यासक्ति मोठी, त्यांची शैली रसरशीत पल्लेदार. भाषेचें लालित्य व मनोहारित्व पंतांच्याच भाषेंत अधिक. अुपहाससुद्धां कल्पनाविलासानें नटलेला. प्रखरतासुद्धां राखेआड दडलेल्या निखाऱ्यासारखी. युक्तिवादापेक्षां शैलीची, सौंदर्यपूर्ण लिखाण करण्याची अधिक आवड. बुद्धीच्या प्रखरतेपेक्षां भव्यतेनेंच डोळे अधिक दिपावयाचे ! सावरकरांचें असें नाहीं. आघातप्रियता, ओज, अुग्रता, यांचाच प्रभाव त्यांच्या साहित्यावर अधिक. शब्दांशब्दांतून तळमळ प्रतीत करणारी त्यांची शैली आहे. सौंदर्यापेक्षां प्रक्षोभावर, प्रखरतेवर अधिक भर ! म्हणूनच सावरकर अेकदां म्हणाले होते कीं, माझी लेखणी ही मी लाठीसारखी

चालविली आहे. या सावरकरांच्या वैशिष्ट्यांमुळें ते शिवरामपंत, चिपळूणकर, अच्युतराव कोल्हटकर—यांच्या आसपासचे वाटत असले, तरी ते वेगळेच आहेत. व्यक्तित्वाचें मूलद्रव्यच वेगळें असल्यामुळें, आणि सारें वाङ्मय व्यक्तित्वाच्या रसांतून बुडवून काढल्यासारखें वाटत असल्यामुळें सावरकरांचें स्थान मराठी साहित्यांत वैशिष्ट्यपूर्ण झालें आहे. अमृतासारखीं अक्षरें निर्माण करणारे ज्ञानेश्वर, भक्तिरसानें ओथंबलेले अभंग करणारे तुकाराम,—यांचीं स्थानें त्यांच्या व्यक्तिवैशिष्ट्यामुळें अतुलनीय वाटतात. तसेंच व्यक्तित्वांतून जन्मलेलें, व स्वातंत्र्यप्रेम, पराक्रम, देशभक्ति यांनीं रसरसलेलें सावरकरांचें साहित्य मराठी सारस्वताच्या अितिहासांत अपूर्वच वाटत राहील!

× × ×

८ :

व्यक्तिदर्शन *

३ जून १९४७. रात्रीची ८॥-९ ची वेळ. सगळा देश आपल्या नेत्यांचीं भाषणें आकाशवाणीच्या ध्वनिलहरींवरून ऐकत होता. सावरकरसदनांतहि तेंच औत्सुक्य वावरत होतें. आणि शेवटीं माउंटबॅटन, नेहरू आणि जिना या तिघांनींहि ती अभद्र घोषणा केली—भारताची फाळणी होणार! जिनांचें भाषण संपलें—पाकिस्तान झिंदाबाद! ही घोषणा अनेक देशभक्तांच्या हृदयांत पेटत्या बाणासारखी शिरली! नभोवाणी बंद झाली, आणि सावरकर अेकदम ओरडले—"याचसाठीं काय आम्ही क्रांतीचे प्रयत्न केले?—याचसाठीं का शेकडों लोक फांसावर चढले!" डोळ्यांतून क्रोध अुफाळून येत होता, पण अश्रूहि तरळत होते. सावरकर पांचसहा दिवस याच स्थितींत होते! जेवण गोड लागेना. हृदयाची तळमळ चालू होती! आनंद आणि दुःख, यातना आणि समाधान यांना समान लेखणाऱ्या सावरकरांच्या आयुष्यांत त्यांची ध्येयमूर्ति भग्न झाल्याचें भयाण दृश्य त्यांना पहावें लागलें!

मला जेव्हां ही घटना कळली, तेव्हां — " सेंट हेलिना बेटांत आपल्या किल्ल्याच्या तटावर अुभे राहून आजूबाजूला अुसळणाऱ्या सागरांच्या लाटांकडे पहात नेपोलियन अुभा आहे; त्याच्या पूर्वायुष्यांतील साऱ्या घटनांची स्मृति

---

* सावरकरांच्या व्यक्तित्वाचें मला घडलेलें दर्शन मी या प्रकरणांत स्पष्ट केलें आहे—**लेखक.**

त्याच्या डोक्यांत गर्दी करीत आहे; आपलें आयुष्य विफल झालें काय असे विचार त्याच्या मनाला भासत आहेत—" हें त्याच्या चरित्रकारानें त्याचें केलेलें वर्णन मला आठवलें. माझें मन नेपोलियन आणि सावरकर यांची तुलना करण्यांत गुंतून पडणार, अितक्यांत—कां कुणाला ठाअूक, असें वाटलें—" नाहीं,—ही तुलना चूक आहे." पण विचारचक्र चालूच होतें. सावरकरांच्या व्यक्तित्वाचा मी विचार करूं लागलों ! आणि मला स्टीव्हन-सनच्या अेका कवितेवरून अेक अुपमा सुचली. समुद्र खवळला आहे. लाटांचें प्रमत्त नर्तन चालू आहे. पाण्याचा रंग बदलून गेला आहे. दिशा धुकाटल्या आहेत. वादळाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं आहेत. आणि अशा वेळीं त्याच समुद्रांतील अेक अुघडा बोडका खडक वर दिसतो आहे. काळा भोर-अणकुचीदार. लाटा त्या खडकावर आदळतांत—फुटतात-आणि निराश होअून परततात ! लाटांच्या या संक्रुद्ध स्वरूपाकडे बेफिकीरपणें पहात-दूरवर येणाऱ्या जहाजाकडे दृष्टि फेंकीत अेक मनुष्य अुभा आहे. त्याच्याबरोबर कोणीहि नाहीं. अेकटा निर्भय निश्चल. आणि तें जहाज दृष्टिक्षेपांत येतांच आपला आवाज शक्य तेवढा मोठा करून दशदिशा भेदीत तो आरोळी ठोकीत आहे—" सावधान ! हा खडक विनाशकारी आहे !" बस् ! अेवढेंच—हेंच तें सावरकरांच्या ध्येयवादी जीवनाचें तें वर्णन !

सावरकरांच्या या विशिष्ट जीवनामुळें त्यांच्या व्यक्तित्वावर गूढतेची छाया पडली आहे ! आणि त्यांत त्यांचें सारें जीवन गुप्ततेच्या आवरणानें झांकलेलें राहिलें. त्यांचे विचार फक्त लोकांना कळले—पण सावरकरांचें व्यक्तिमत्व मात्र अंधारांत राहिलें ! आपण गांधी—नेहरू यांच्या वैयक्तिक जीवनाविषयीं किती तरी वाचतों, पण सावरकरांच्या व्यक्तिगत जीवनाची कल्पनाच आपल्याला येत नाहीं. त्यामुळें अधिकच औत्सुक्य वाटत रहातें. सावरकर हे चार पिढ्यांत वावरलेले पुढारी आहेत. त्यांच्या तारुण्यापासून आजपर्यंत सतत बरोबर असलेला त्यांचा अेकहि सहकारी नाहीं. त्यामुळें सावरकरांचें या सर्व काळांतील ' व्यक्तिदर्शन ' घडवणारा कोणीच नाहीं. त्यांचं जीवनहि अितक्या अनैसर्गिक अवस्थेंत गेलें आहे कीं, त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास कसा झाला याचा शोधहि घेणें कठीण आहे. पृथ्वीवर

अेकाच वेळीं कांहीं ठिकाणीं दिवस आणि अेकाच ठिकाणीं रात्र असते ना?— तसेंच सावरकरांच्या जीवनाचें झालें आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचें रसायन कोणतें आहे, हें पहिल्या प्रकरणांत आलेंच आहे! पण व्यक्तिचित्रण तेवढ्यानें पुरें होत नाहीं;—रंग नि रेषा दोन्हीहि लागतात. त्या रेषा मला जशा वाटतात तशा मीं या प्रकरणांत रेखाटल्या आहेत.

सावरकरांच्याकडे तुम्ही पहाल—तर त्यांच्या शरीरयष्टीमुळें तुमचें मन आकर्षिणार नाहीं. कारण ती भव्य नाहीं. तरीहि ती रेखीव आहे. ताप आणि सावरकर हे गेले कित्येक दिवसांचे सहचरी आहेत. त्यामुळें त्यांच्या गोऱ्या तोंडावळ्यावर फिकेपणा दिसेल. तारुण्यांत त्यांची कान्ति अुत्कृष्ट असेलच, पण आजच्या फिकेपणांतहि कान्ति आहे असें अनेक वेळां वाटतें. सावरकर—म्हातारे झाले आहेत, तरी ते तसे वाटत नाहींत याचें कारणहि हेंच. आतां वयाची सत्तरी आली तरी केंस बरेचसे काळेच राहिले आहेत. वार्धक्यालाहि त्यांच्यातलें तेज मालवतां न आल्यामुळें आणि त्यांचा आवाजहि तसाच असल्यानें ते ताजेतवाने वाटतात. सावरकरांच्या आकृतीकडें पाहिलें कीं, त्यांचे ते ' नेत्र ' आपलें लक्ष वेधून घेतात. त्यांच्या व्यक्तित्वाचें गूढत्व जणुं त्या नेत्रांतच दिसूं लागतें.

सावरकरांची राहाणी अगदीं साधी आहे. अगदीं मध्यमवर्गीयासारखी. फारसा अुंची पोशाख नाहीं; पांढरा स्वच्छ पोषाख—कधीं पँट, कधीं धोतर. खाण्यापिण्याची विशेष हौस नाहीं. ते कवि असल्यानें रसिक आहेत. त्यांच्या टेबलावर स्वतःच्या बागेंतल्या फुलांची रास तुम्हांला दिसेल. तुम्ही त्यांच्या घरीं जाल तर तुम्हांला श्रीमंती थाट फारसा दिसणार नाहीं. किंबहुना तशा राहाणीचा त्यांना तिरस्कार आहे. त्यांचें घर पाहिल्यावर अेकदां श्रीनिवासशास्त्री अुद्गारले,—" सावरकर, हेंच का तुमचें घर! " तेव्हां सावरकर लगेच म्हणाले,—" अंदमानच्या कोठडीपेक्षां अधिक चांगलें आहे कीं नाहीं? " सावरकरांच्या अैन तारुण्यांत त्यांच्यावर अनंत आपत्ति कोसळल्यामुळें ते स्थितप्रज्ञ वृत्तीचे झाले आहेत. त्यांना ' घर ', ' कुटुंब ' या ज्या सामान्य माणसाच्या भावना असतात त्या तितक्या अुत्कटतेनें नाहींत.

अेकदां ते सहज विनोदानें म्हणाले होते कीं, "मला तुरुंगांतलें अन्न हेंच घरचें अन्न झालें आहे, आणि घरचें अन्न हेंच तुरुंगांतलें अन्न झालें आहे!"

या तुरुंगवासाचा त्यांच्या स्वभावावरहि परिणाम झाला आहे. ते अेखाद्याशीं तास न् तास कदाचित् बोलत बसतील. अेखाद्या कार्यकर्त्यांच्या सभेंतहि हंसत खेळत प्रदीर्घ चर्चा करतील. पण लगेच तेथून अुठून कुठें तरी अेकान्तांत जाअून बसतील! ही त्यांची अेकान्तवासाची आवड परिस्थितींतून जन्मलेली आहे. सावरकर कश्मीरच्या दौऱ्यावर असतांना त्यांच्या निवासस्थानाभोंवतीं हजारों लोक होते. पण त्यांचें काम झाल्यावर आपल्या चिटणिसाला म्हणाले कीं, "मला कोठल्या तरी अेकान्त असलेल्या खोलींत घेअून चल!" मी तर हा अनुभव अनेक वेळां घेतला आहे. अेखादा प्रश्न विचारला कीं, त्याचें अुत्तर देण्यापूर्वी अेखादे वेळ टाळाटाळ करतील. पण लहर लागली तर त्याच प्रश्नावर तासभर बोलतील. मग त्यांत भरपूर माहिती, विनोद—सारें कांहीं असेल! त्यांच्या या कांहींशा लहरी वृत्तीमुळें ते अनेक लोकांना तुसडे वाटतात. सावरकरांच्याजवळ लोकसंग्रहाचे गुण आहेत.

त्यांच्या स्वभावांत अुग्रता नाहीं. कोणीहि लहान मोठा मनुष्य त्यांच्याकडे गेला तर ते सौजन्यानें व कळकळीनें विचारपूस करतात. अगदीं म्हातारा गृहस्थ गेला तर तुम्हांला मुलें किती? कांहीं पैसा अडका त्यांच्यासाठीं ठेवला आहे का? अेसेंहि खापुरलकीनें विचारतील. अेखादा तरुण गेला तर—शिकतोस काय, व्यायाम करतोस कीं नाहीं, कांहीं विधायक काम करतोस?—असे प्रश्न त्याला ते विचारतील. वादविवादांत ते अुग्र होतात, पण कधीं टाकून बोलणें तरी पाहिलेलें नाहीं.

पण हें जरी असलें तरी राजकारणाप्रमाणें ते व्यवहारांतहि हट्टी आहेत, चिकित्सक आहेत. मग अगदीं साध्या गोष्टींतहि ते हट्ट धरतील तो सोडणार नाहींत. त्याना जी गोष्ट हवी आहे ती ते अनेक प्रकारचे युक्तिवाद करून पटवून देतील. व्यवहारांतहि असेच. भारताचे अेक थोर पुढारी मुंबअीत वारले, त्या वेळीं अेक गृहस्थ त्यांच्याकडे गेले नि म्हणाले, "तुम्हीं त्यांच्या अंत्यदर्शनाला जावें असें मला वाटतें!" सावरकर लगेच म्हणाले—

" माझी त्यांची आयुष्यांत कधीं प्रत्यक्ष भेट झाली नाहीं. मग मी अंत्य-दर्शन घेण्याचें ढोंग कशाला करूं ? मला त्यांच्या मृत्यूबद्दल खरोखरच हळहळ वाटते, आणि ती मी पत्रकांत व्यक्त करणार आहे ! " ही त्यांची चिकित्सक व व्यवहारी वृत्ति फार वेळां हट्टाचें रूप धारण करते. आणि राजकीय पुढाऱ्याला तर असल्या कृत्रिम गोष्टी कराव्या लागतात; स्वतःच्या मनालाहि मुरड घालून लोकसंग्रह करावा लागतो. पण एखाद्यानें कितीहि आग्रह धरला तरी सावरकरांचा ' नाहीं ' म्हणजे अखेरचा ! अगदीं साध्या सभेच्या अध्यक्षस्थानापासून तों हिंदुसभेच्या अध्यक्षपदापर्यंत हा नियम लागू !

सावरकरांच्या या स्वभावामुळेंच ज्याला मृदु चालीरीति म्हणतात, त्या त्यांच्याजवळ नाहींत. कृत्रिमता नसल्यामुळें पुढाऱ्यांनीं चहाला जाणें, चहाला लोकांना घरीं बोलाविणें, किंवा सभा—संमेलनांतून भिसळणें हें त्यांना कधींच जमलें नाहीं. तेच ज्या ठिकाणीं व्याख्यानासाठीं वगैरे जातील तेथें ते मिसळतात. बाकी सर्व काळ स्वतःच्या घरींच राहून विचार—वाचन—चर्चा करतील. सावरकर कधीं आुठून फिरायला गेल्याचें तुम्हांला आढळणार नाहीं.

बागेंतल्या फुलांचें सौंदर्य चाखीत, अेखादी कविता गुणगुणत ते हिंडतील. किंवा बंगल्याच्या गच्चीवर आकाशांतील ताऱ्यांकडे पहात तासन् तास बसतील ! त्यांचें जीवन अितकें आत्मनिष्ठ झालें आहे हा त्याच्या तुरुंगवासाचा परिणाम आहे. जेथें राहिल्यावर अेखाद्या माणूस-वेड्या माणसाला वेडच लागावें तेथें सावरकरांनीं चित्तवृत्ति कायम ठेवली; त्यांच्या प्रतिभेचा विलास त्या अेकान्तांत दिसला. हा केवळ मानसिक नव्हे तर शारीरिक चमत्कार आहे !

तत्त्वचिंतन

या त्यांच्या अंतर्मुख व स्थितप्रज्ञ 'वृत्तीमुळें सावरकर तत्त्वचिंतक झाले आहेत. त्यांच्या वाङ्मयांत जी तत्त्ववृत्ति दिसते, ती आपण पाहिलीच आहे. कधीं मृत्यूच्या नजरेला नजर भिडवून आल्यामुळें, यातनांची पराकाष्ठा पाहिलेली असल्यामुळें त्यांना हा संसार प्राकृत वाटतो. त्यांचें मन त्यांत

रमत नाहीं. अनेक वेळां निराशेनें नव्हे तर समाधानानें त्यांच्या तोंडून मृत्यूची भाषा मीं ऐकली आहे. Life is a blessing to those who know what is death—असें म्हणतात ना ? तसेंच सावरकरांचें आहे !

त्यांची प्रकृति सारखी बिघडते, वारंवार ताप येतो. त्यामुळें पिचलेलें त्याचें शरीर पाहिलें, आणि त्या शरीरांत असलेल्या तेजस्वी वृत्ति पाहिल्या कीं मनुष्य आश्चर्यानें थक्क होतो. त्यांनाहि निराशा येते, पण ती कांहीं काळ ! गांधीवधानंतर त्यांच्यावर झालेला खटला हा त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत कसोटीचा काळ होता ! त्यांच्या चारित्र्यावर चिखलफेंक झाली होती. कीर्ति कलंकित झाली होती. अप्रियतेचा डोंब उसळला होता. जणुं मृत्यूच्या छायेखालीं या उतारवयांत त्यांना १॥ वर्ष काढावं लागलं ! दुष्कीर्तीची तलवार सतत टांगलेली ! ते त्यांतून निर्दोष सुटून आले, आणि मी आठच दिवसांनीं त्यांच्याकडे गेलों होतों ! मला आश्चर्य वाटलें त्यांच्या उत्साहाकडे पाहून ! त्यांच्या निकटवर्तीयांनींहि सांगितलें कीं, "कांहीं दिवस तात्या अस्वस्थ होते, पण आतां ठीक आहेत !" त्यानंतर सावरकर स्वस्थ बसले नाहींत ! आपल्या ध्येयवादाचा निर्भीड पुरस्कार त्यांनीं केला आणि पुन्हां एकदां आपल्या कर्मयोगी वृत्तीचा प्रत्यय आणून दिला !

मला त्यांच्या, तोंडून अनेक वेळां निराशेचे उद्‌गार ऐकूं आले हें मी सांगितलेंच. पण त्यांना पराभूत मनोवृत्ति शिवलेली नाहीं. अपजयांतील यश पाहाण्याचें, निराशेंत जणुं आशा शोधण्याचें त्यांचें कौशल्य मोठें आहे. मी एकदां सहज त्यांना विचारलें, "तात्या, कांहीं लोक म्हणतात कीं, तुमचें आयुष्य ही एक दुःखान्तिका आहे ! तुमचं काय मत आहे यांविषयीं ?" ते म्हणाले, "लोकांना असें वाटतें; मला मुळींच तसें वाटतें नाहीं. मी माझें कर्तव्य केल्याचें समाधान मला मिळालेलें आहे. स्पष्टपणें राष्ट्रहित सांगणारा तो पुढारी ! नाहीं तर तो कर्तव्यच्युत झालेला राष्ट्राचा शत्रु. माझ्या आयुष्यांत जणुं असा कांहीं नियमच आहे कीं, मी जें आज सांगतों तें दहा वर्षांनंतर लोकांना पटतें ! तेव्हां मला कीर्ति मिळालीं नाहीं, अधिकार मिळाला नाहीं,—याचें मला कांहीं वाओट वाटत नाहीं.

"माझ्या बऱ्याच चळवळी यशस्वी झाल्या आहेत. अुरलेल्या कांहीं वर्षांनीं होतील. खरें म्हणजे माझें मृत्युपत्र केव्हांच लिहिलें होतें ! केवळ अपघात म्हणून जगलों, आणि तोहि मृत्यूशीं झुंज देअून ! पूर्वी क्रांतीच्या काळांत कष्ट सोसले आणि मानसिक यातनाहि सोसल्या ! टिळकांना ते हाल कळले तेव्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रु अुभे राहिले. अेकदां तर ते वैतागानें म्हणाले—"अरे, त्यापेक्षां त्याला गोळ्या घालून ठार कां नाहीं मारलें ?"

"तेव्हां आतां मी स्वातंत्र्य पाहिलें. माझ्या नेत्रांचें पारणें फिटलें. प्रतिज्ञा पूर्ण झाली. मृत्यूपूर्वी अेकदां माझ्या क्रांतिवादी सहकाऱ्यांच्या ऋणाची फेड म्हणून माझं आत्मचरित्र लिहिलें कीं मोकळा होअीन ! बस्स् ! तेवढेंच राहिलें आहे—बाकी कांहींहि नको !"

मला वाटतें, सावरकरांना मृत्यु हा मित्रासारखा वाटतो. अमरत्वाचें, चिरशांतीचें तें जणुं साधन वाटतें. त्यांनीं बाबाराव सावरकरांना जें अखेरचें पत्र पाठविलें होतें त्यांतहि त्यांची हीच स्थितप्रज्ञता दिसली होती. भावनोत्कटतेनें आणि अुदात्त भावनेनें सावरकरांनीं लिहिलें होतें—"पूर्वी,—विशी, तिशी, चाळिशीमध्यें वारंवार मृत्यूची गांठ पडली होती. 'येतोस तर ये, कोण भितो तुला' असा ध्वनि त्यावेळच्या सिद्धतेचा होता. आतां मृत्यु आला नाहीं तर आपण होअून महाप्रस्थानाला निघायची घडी भरली. यास्तव समाधानानें, मित्राचा जसा हात धरावयाचा तसाच मृत्यूचा ! आव्हानानें नव्हे, तर आनंदानें ! ज्यांत मागें किंवा पुढें अुरलें नाहीं, तृषा तृप्त झाल्या, अेका झटक्यासरशीं जगाची वार्ता, लोभ, क्षोभ, संबंध नाहींसे होअून केवळ शांतता अुरली, 'मी' देखील नाहींसा झाला, त्या अनंतांत, हे कर्मवीरा, आतां पूर्ण समाधानानें विलीन व्हावें !"

हे विचार म्हणजे केवळ काव्य नव्हे, ती अनुभूति आहे. हे विचार म्हणजे सावरकरांच्या तत्त्वचिंतक मनाचें अुत्कृष्ट अुदाहरण आहे.

सावरकरांशीं अेखाद्या विषयावर चर्चा करणें ही मोठी मेजवानी असते. सावरकरांची बुद्धिमत्ता, त्यांच्याभोंवतीं असलेलें पांडित्याचें वलय, आणि

युक्तिवाद करण्याची शैली—हीं वैशिष्ट्यें त्यांच्या संवादांत तुम्हांला दिसून येतील. तुम्ही अेखादा बोंचक प्रश्न विचारा, तुम्हांला त्याहून बोंचक अुत्तर मिळेल. सावरकरांना अेकदां " तुम्हीं स्टॅलिन वाचला आहे काय ? " असा प्रश्न विचारला. ते ताडकन् म्हणाले—" स्टॅलिननें सावरकरांचें वाङ्मय वाचलें आहे ? " अेखाद्या छद्मी प्रश्न विचारणाऱ्या माणसाची ते भंबेरी अुडवतात. सावरकर हे अुत्कृष्ट नट आहेत, याची प्रचीति त्यांच्या वक्तृत्वाच्या संवादांतहि येते. अेखादा मुद्दा अुडवून लावायचा असला तर ते मोठ्या कौशल्यानें तो टाळतील. तुम्ही अेक प्रश्न विचारलात तर ते त्याच्यावरच बराच वेळ बोलत राहतील: मग त्या बोलण्यांत युक्तिवादाची फैर, अितिहासांतल्या गोष्टी, विनोदाचे तुषार—सगळें तुम्हांला आढळेल.

नौखालींतील अत्याचारासंबंधीं बोलतांना अेकदां ते सहज म्हणाले—" मराठे लोकांना बंगाली लोकांनीं आश्रय दिला असता तर ही वेळ येतीच ना ! " जगांत अल्पसंख्यांकांना कोणी किती छळलें, आणि आज जगांत कोणत्या राष्ट्रांत त्यांना किती अधिकार आहेत याची माहिती त्यांनीं अभ्यासपूर्वक मिळविली आहे. सावरकरांच्याजवळ 'गोलमाल' वृत्ति नाहीं. सर्व प्रकारचीं कात्रणें काढून ठेवण्याची संवय अनुकरणीय आहे.

चर्चा करतांना त्यांचा आवेश पहाण्यासारखा असतो. ती चर्चाहि अनेक वेळां वक्तृत्वशालीच होते. सारी शीर अन् शीर अुठून, अत्यंत तळमळीनें ते बोलतात. हैद्राबादचे अत्याचार चालू होते त्या वेळीं तेथील अेक सद्गृहस्थ त्यांच्याकडे व्याख्यानासाठीं निमंत्रण देण्यास आले. तेव्हां त्यांना ते थोडे चवताळून म्हणाले—" मला कृति हवी आहे, ती तुम्हीं करा नि मग मी येतों."

सावरकरांच्या या चर्चेंत ते स्वतःच बराच वेळ बोलत राहतील. तुमचा प्रश्न अैकून घेतील. युक्तिवादाला सडेतोड युक्तिवादानें अुत्तर देतील. लुअी फिशर हे अमेरिकन पत्रकार त्यांच्याकडे अेकदां आले होते. त्यांनीं गांधीजी व जिनांचीहि भेट घेतलीच होती. सावरकरांकडे ते आले तेव्हां त्यांच्या डोळ्यांत काय भरलें असेल तर तो त्यांचा साधेपणा !

लुई फिशरनीं सावरकरांना विचारलें कीं, "पाकिस्तानच्या मागणींत राष्ट्रद्रोहीपणाचें काय आहे?" सावरकर ताबडतोब म्हणाले—"महाशय, अमेरिकेंतील नीग्रोंनीं स्वतःसाठीं राज्य मागितलें तर तुम्ही त्यांना काय म्हणाल?" अर्थात् लुई फिशरजवळ याला कांहीं उत्तर नव्हतेंच. असाच अेक कम्युनिस्ट त्यांच्याकडे आला. आमचें तत्त्वज्ञान विशाल आहे, अशी बढाअी मारूं लागला. सावरकरांनीं त्याला शांतपणें विचारलें, "काय हो, तुम्हीं कम्युनिझम विशाल आहे म्हणतां! पण आमच्या 'भूतदया' या शब्दाला कोणत्याहि भाषेंत अेखादा योग्य प्रतिशब्द सांगाल कां?" तो म्हणाला—"humanity." सावरकर म्हणाले—"मानवता म्हणजे माणसानें माणसावर प्रेम करणें. त्यापेक्षांहि मोठी कल्पना भूतदयेंत आहे! जो जो प्राणिमात्र आहे त्याच्यावर दया दाखविणें. यापेक्षां कम्युनिझम विशाल आहे काय?"

सावरकरांच्या तर्कशुद्धतेची माहिती सर्वांनाच आहे. अेकदां मी त्यांच्याशीं त्यांच्या हिंदुत्वाच्या व्याख्येसंबंधीं बोलत होतों. मी त्यांना म्हटलें कीं, "तुमच्या हिंदुत्वाच्या व्याख्येंत हिंदु कसा असावा याचें कोठेंहि वर्णन नाहीं." सावरकरांचें तर्कशास्त्र सुरू झालें. ते म्हणाले—"व्याख्या नेहमीं काय असावें हें सांगत नाहीं, व्याख्येचें कार्य 'काय आहे' हें सांगणें. मग माझी व्याख्या तें सांगत नाहीं यांत चुकलें कुठें?"

सावरकर अेकदां बोलूं लागले कीं, त्यांच्या संभाषणांत अनेक वेळां काव्यमय वाक्यें, अुपमा, अुक्ति येतात. अेकदां अलीकडच्या राजकीय विभूतिपूजक वृत्तीचा अुल्लेख करून ते म्हणाले, "आम्ही राजकीय पुढारी किती खुजे आहोंत. हिमालयाच्या असंख्य शिखरांप्रमाणें या देशांत अेकापेक्षां अेक महापुरुष होअून गेले आहेत." त्यांचा अनुभव विशाल आहे, निरीक्षणशक्ति सूक्ष्म आहे. त्यामुळें गोष्टी, कांहीं जुन्या आठवणी वारंवार त्यांच्या बोलण्यांत येतात.

अेकदां 'अमेरिका साम्राज्यवादी आहे' असा डांगोरा आपापल्या परीनें पिटणाऱ्या राष्ट्रांविषयीं बोलत असतांना सावरकरांनीं अेक गमतीदार गोष्ट

सांगितली. ते म्हणाले-- " प्रत्येक चोरीकरतां अेक याप्रमाणें सातसात कडीं हातांत भूषविणाऱ्या **सज्जनां**च्या संगतींत मी अंदमानमध्यें राहात होतों. अेकदां त्यांतल्या अेकानें कुठून तरी सुईदोरा चोरून आणला. जेवणाच्या वेळीं तो सुईदोरा तिसऱ्याच एका सज्जनानें लांबविला: तेव्हां तो सज्जन माझ्याकडे आला नि म्हणाला, 'बालिस्टरसाहेब, ''माझा सुईदोरा यानें चोरला !' मी म्हणालों, ' सुईदोरा तो,— त्याचें काय अेवढें घेअून बसलास !' त्यावर तो म्हणाला, ' सुईदोऱ्याचं मला कांहीं दुःखं वाटत नाहीं. पण साब, चोरी किया, अुन्होनें चोरी किया !" चोरी दरोडेखोरीसाठीं सात सात सलकडीं भिरविणारा हा महासज्जन ' चोरी किया—चोरी किया ' म्हणून ओरडत होता,— तशींच आज युद्धयमान राष्ट्रें करीत आहेत."

या आणि अशा अनेक गोष्टींनीं, अुपमांनीं सावरकरांचें संभाषण वा भाषण नटलेलें असतें. त्यांचा विनोद बोचक असतो. त्यांना विरोधी मताचा प्रश्न विचारला कीं, त्यांच्या विवेचनाला तेज चढतें; युक्तिवादाचा आवेश चढतो. आणि मग आपलें विधेय सिद्ध करण्यासाठीं वक्तृत्वाचा प्रवाहच सुरू होतो. पण विरोधी प्रश्नांनीं सावरकर चिडत नाहींत, अुत्तर देण्यासाठीं अुफाळून निघतात.

सावरकांच्या मनांत कधीं नवीन कवितांच्या कल्पना घोळतात. कधीं नवीन कादंबरी लिहावीशी वाटते. मागें अेकदां सहज ते म्हणाले कीं— " अुमरखय्यामची जी रुबाया आहे किंवा शेलेची जी कविता आहे त्यांत अेक मनुष्य सुंदर स्त्री व दारूची सुरअी यांच्या संगतींत आयुष्य सुखानें काढण्याची कल्पना अुराशीं बाळगतो. मला या विषयावर अेक मनोविश्लेषणात्मक कादंबरी लिहायची आहे. त्यांत प्रथम त्या युगुलाची असलेली मनःस्थिति, नंतर त्या स्थितीला कंटाळलेलें त्याचें मन, आणि नंतर शेवटीं पुन्हां सुखदुःखाच्या छायाप्रकाशांत येअूं अिच्छिणारें मन यांचें चित्र रेखाटण्याची अिच्छा आहे !

कधीं सावरकरांची संशोधक बुद्धि जागृत होते. त्यांना महाभारताच्या राजनीतीवर अेक ग्रंथ लिहायची अिच्छा आहे. अशा अनेक कल्पना, अनेक

आकांक्षा त्यांच्या अिच्छेच्या फाटकापाशीं गुंतून पडल्या आहेत. पण कांहीं तरी करीत राहाणें हा त्यांचा स्वभाव आहे. वर्तमानपत्रांत कांहीं हिंदुहितविरोधी घटना घडल्याचें वाचलें कीं—ते कात्रणें कादून ठेवतील. तत्संबंधीं चाड बाळगणाऱ्या वृत्तपत्रांना पाठवतील, वृत्तपत्रांत कोणते फारशी वा अन्य परकीय शब्द वारंवार वापरले जातात याच्याकडे अगदीं डोळ्यांत तेल घालून पाहतील. ओळखीचा अेखादा भेटला कीं, त्याला तें सर्व सांगतील. सावरकरांच्याकडे जावयाचें असेल तर भाषाशुद्धीचें सोवळेंच नेसून जावें लागतें. अितका त्यांचा भाषाशुद्धीवर कटाक्ष असतो. अेखादें काम हातांत घेतलें कीं अगदीं मनापासून, त्यांत सर्व लक्ष ओतून करावयाचें. रत्नागिरींतील समाजसुधारणेचें कार्य, किंवा त्यानंतरची राजकीय चळवळ अगदीं जीव ओतून त्यांनीं चालविली. अलिकडे पुन्हां जुन्या सामाजिक कार्याकडे ते वळले. अस्पृश्यता व भोंगळ रूढि यांच्यावर चढाअी सुरू केली. पंचांगवाद सुरू केला. आपल्या भारताला अैहिक व्यवहारासाठीं अेक पंचांग पाहिजे; म्हणून त्याविषयींचा अभ्यास करून, अेक योजनाहि सुचविली. पूरक अन्न म्हणून मांसाशनाचा पुरस्कार केला. हें आणि असे लहानसहान अुद्योग चिकाटीनें, अुत्साहानें करण्याची सावरकरांची कर्मयोगी वृत्ति अनुकरणीय आहे,—नव्हे, तो त्यांचा स्वभावच होअून गेला आहे.

सावरकरांची वाचनाची पद्धत चांगली आहे. त्यांना लहानपणापासून टिपणें करण्याची संवय आहे. अेखादें नवें पुस्तक, नवा विचार ते आनंदानें वाचतील. अनेक ग्रंथांचीं पारायणें त्यांनीं केलीं आहेत. अितिहास हा त्यांचा आवडीचा विषय. अितिहास कसा वाचावा याच्यावर मागें त्यांनीं अेक लेखमालाहि लिहिली होती. जगांतील अनेक देशांत ज्या विविध क्रांत्या झाल्या, भारतांतहि जे क्रांतीचे प्रयत्न झाले त्यांची संपूर्ण माहिती त्यांनीं मिळविली आहे. त्यांच्या भाषणांतून, संवादांतून याचा उल्लेख वारंवार येतो. सुभाषबाबू सावरकरांना जेव्हां हा देश सोडण्यापूर्वीं भेटले होते तेव्हां दोघांच्यांत सैनिकी क्रांतीसंबंधीं चर्चा चालली होती. सुभाष म्हणूं लागले कीं, सैनिकी क्रांति आज अशक्य आहे. सावरकरांनीं ताबड-

तोच अितिहासांतील अनेक अुदाहरणें त्यांच्यासमोर ठेवलीं, आणि याच क्षणीं भारतानें क्रांतीचा प्रयत्न केला पाहिजे म्हणून सांगितलें. शीखांचा अितिहास, महाराष्ट्राचा अितिहास, आणि १८५७ चा अितिहास, यांच्या-विषयीं बोलतांना ते अितके समरस होतात, त्यांतील प्रसंग सांगतांना ते अितके तन्मय होतात कीं, त्यांची वाणी शब्दांच्या आधारें अेक दृश्यच आपल्यापुढें अुभें करीत आहे असें वाटतें. रत्नागिरी जिल्ह्यांत त्यांनीं अेकदां अफझुलखानाच्या वधावर शिवरामपंती थाटाचें संपूर्ण रूपकात्मक भाषण केलें होतें. त्यांत अुपरोध, व्याजोक्ति, होती, वीररस होता. सावरकरांनीं मनांत आणलें असतें तर अैतिहासिक कथानकांवर अुत्कृष्ट कादंबऱ्या त्यांना लिहितां आल्या असत्या—अितका अितिहासाचा सूक्ष्म अभ्यास त्यांनीं केला आहे.

त्यांचा आवडीचा दुसरा विषय म्हणजे तत्त्वज्ञान! अुपनिषदांपासून अद्ययावत् गीतारहस्यापर्यंत सर्व भारतीय तत्त्वदर्शनांचा त्यांनीं अभ्यास केला आहे. आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानांत त्यांना अुपयुक्ततावादी जवळचे वाटत असल्यामुळें त्यांच्या वाङ्मयाचा आणि आधुनिक मार्क्सवाद्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास त्यांनीं आवडीनें केला आहे. त्यांचें निरीश्वरवादी मन बौद्ध वाङ्मयांत रंगतें. कुराण, बायबल, गीता या तिन्ही धर्मग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास त्यांनीं केला आहे. 'मनुस्मृती'वर त्यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं भाषणें केलीं आहेत. कोणताहि विषय अभ्यास करून मग मांडण्याची संवय असल्यामुळें त्यांचे संदर्भ अचूक असतात.

सावरकरांचा हा बहुविध व्यासंग पाहिला कीं वाटतें, टिळक, गोखले आणि रानडे यांच्या वैशिष्ट्यांचें मीलन त्यांच्यामध्यें झालें आहे. सावर-करांना गोखले आणि त्यांचा संप्रदाय यांच्याविषयीं निरतिशय आदर आहे. मवाळ लोकांनीं राजकारणांत कोणत्याहि प्रश्नाचा अभ्यासपूर्ण रीतीनें विचार करण्याची जी प्रवृत्ति आणली त्याविषयीं सावरकरांना आदर वाटतो. सावरकर आपल्या सहकाऱ्यांना सांगतहि असत कीं, आपल्यामध्येंहि गोखल्यां-सारखे लोक हवेतच. सावरकरांच्या या वृत्तीमुळें त्यांना ज्ञानी, व्यासंगी माणसाविषयीं नेहमीं आदर वाटतो. बुद्धिवाद हा माणसाला निष्क्रिय

करतो, असें म्हणणारे लोक या देशांत कमी नाहींत. महाराष्ट्राला बुद्धिवादी म्हणून हिणविणारेहि अनेक लोक आहेत. पण सावरकरांचें जीवन हें त्याला मोठें उत्तर आहे. सावरकरांचें व्यक्तिमत्व हें ज्ञानतृष्णेनें, बुद्धिवादानें जसें रंगलेलें आहे, तसेंच सर्वश्रेष्ठ कर्मयोगी जीवन हेंहि त्यांच्या व्यक्तित्वांतूनच निर्माण झालें आहे—हें अंधश्रद्धावाद्यांनीं विसरूं नये. बुद्धिवाद हा सावरकरांच्या जीवनांतील केवळ बौद्धिक चर्चेचा विषय नव्हता, तर त्या बुद्धिवादानें व तर्कशुद्धतेनें त्यांनीं राजकरण केलें, आणि समाजकारणहि केलें, आणि या अंधश्रद्ध, भक्तिमार्गी, विभूतिपूजक देशांत त्यांना अप्रियता प्राप्त झाली! बुद्धिवादासाठीं केलेलें हें कार्य निष्क्रियतेंत लोटण्याची कोणाची छाती आहे!

सावरकरांच्या सहवासांत राहिलेले अनेक लोक असतील; पण त्यांच्या तारुण्यांतील जे सहकारी होते—वा आहेत, त्यांनाच सावरकरांच्या व्यक्तित्वाचें जवळून दर्शन झालें असेल तेवढेंच. मोठ्या लोकांना मित्र नसतात कीं काय कोणास ठाऊक! सावरकरांना तरी मित्र दिसत नाहींत. त्यांच्या सहकाऱ्यांशीं ते खेळीमेळीनें वागतील, कदाचित् कांहीं काळ त्यांच्या संगतींत राहातील, पण ते समरस होतील कीं नाहीं याची शंकाच आहे! सैनिकी वृत्तीच्या माणसाची जशी वागणूक असते तशी तुम्हांला तेथें दिसेल. सावरकर व्यवहारांत कधीं अति चिकित्सक तर कधीं अति ढिले असे आहेत. त्यांच्या मनाला कौटुंबिक प्रेमाचे नाजुक पाश बांधूं शकत नाहींत. प्राकृत संसारांत ते रममाण होऊं शकत नाहींत अितकें त्यांचें वागणें कधीं कधीं विरक्तीचें वाटतें. त्याचें कारण काय? सांगणें कटीण आहे. कदाचित् ते आपल्याच बौद्धिक विश्वांत वावरत असावेत. आजूबाजूला काय चाललें आहे याचा त्यांना पत्ताहि नसतो—अितके ते त्यांत तन्मय होतात. त्यांनीं संसाराला चार बोळकीं मांडण्याची आणि मुलांमुलींचा वीण वाढविण्याची जी उपमा दिली आहे, जें तें धिरोदात्त वाक्य जन्मठेपेवर जातांना त्यांनीं अुच्चारलें आहे तें त्यांच्या या कर्तव्यकठोर मनांतूनच बाहेर पडलें आहे. लहानपणचे व तारुण्यांतले सावरकर, किंवा आपल्या वहिनीला लिहिलेल्या पत्रांत दिसणारे कुटुंबवत्सल सावरकर आतां तुम्हांला तसे

वाटतीलच असें सांगतां येत नाहीं. त्यामुळें कौटुंबिक जीवनांत गृहस्थाश्रमी म्हणून ज्या चालीरीति वा शिष्टाचार असतात ते त्यांच्याकडून पाळले जातातच असें नाहीं ! तेथें त्यांचा लहरी स्वभावच दिसतो. सावरकरांचा गृहस्थाश्रम हा असा आहे. त्यांना कवीचें अंत:करण आहे, पित्याचें वात्सल्य आहे, म्हणून ते आपल्या नातवांशीं खेळतील. ते त्याच्याशीं समरस होतील. पण त्यांचें संसाराशीं असलेलें नातें हें कर्तव्याचें आहे, ते त्यांत गढून गेलेले आहेत असें बाहेरून पहाणाऱ्याला वाटत नाहीं. गृहस्थाश्रमी म्हटला कीं, कांहीं कृत्रिम कां होईना कर्तव्यें लादलीं जातात. निदान मध्यम वर्गीयांत तरी तो फार महत्त्वाचा भाग आहे. नातेवाइकांकडे तुम्ही गेलां नाहींत तर तुमच्यावर ते रागावतील; जास्त जाऊं लागलांत किंवा देण्याघेण्याचे व्यवहार करूं लागलांत तरीहि त्यांचें बिनसतें. कृत्रिम संबंध, जितक्यास तितकें प्रेम ठेवणें हा आमचा स्वभाव आहे. अशा स्वभावाच्या आपल्यासारख्या माणसांना सावरकरांच्या या कौटुंबिक जीवनाविषयीं कुतूहल वाटतें !

पण मला वाटतें, मोठ्या लोकांचें कौटुंबिक जीवन असेंच असतें. त्यांना पत्नीचें प्रेम हें विसाव्यांचें टिकाण वाटत नाहीं. मुलांचें हास्य हें चांदण्या-सारखें वाटत नाहीं. श्रीमंतीचा पोकळ डौल त्यांना भुलवीत नाहीं. त्यांची चैन ही त्यांच्या वैचारिक विश्रांतच असते.

सावरकरांची दिनचर्या ठराविक असते. त्यांच्याकडे रोज सकाळीं ११॥–१२ पर्यंत लोक येतात. नंतर सावकाश आंघोळ आणि जेवण. थंडगार अन्नच त्यांना अधिक आवडत असावें. संध्याकाळीं ध्यानस्थ बसणें, योगिक व्यायाम करणें मात्र कधीं चुकत नाहीं. त्यांच्या त्रिविध तापांतून तगून राहाण्याचें तें रहस्य आहे.

घरांत त्यांच्या स्वभावामुळें त्यांचें सारेजण भीत भीत असतात. ते रागावत नाहींत, पण त्यांचा हट्ट अधिक आग्रह असतो. बारीकसारीक गोष्टींत ते अगदी लक्ष घालतात. पत्रें कोणाचीं आलीं, पाठवायचीं कोणाला—याचें स्मरणपूर्वक काम चालू असतें. हिंदु सभेचे अध्यक्ष असतांना व नंतर त्यांना

खूप पत्रें येतात. त्याकडे ते लक्ष देतात. शब्द सुचवा, राजकीय विषयांत सल्ला द्या, व्याख्यानाला या,—अशा प्रकारचीं पत्रें असतातच. शिवाय ठिकठिकाणचीं वार्तापत्रेंहि असतात. सावरकर त्यांची जपणूक अतिशय काळजीपूर्वक करतात. माणसांचीं नांवें लक्षांत राहिलीं नाहींत तरी चेहेरे लक्षांत राहतात; त्यामुळें ओळख पटते.

अगोदर सांगितल्याविना त्यांना कोणी भेटायला गेलेलें आवडत नाहीं. यामुळें त्यांच्यावर खूप लोक चिडतात. मोठमोठे लोक त्यांच्या या हट्टामुळें रुष्ट झाले आहेत. त्यामुळें सावरकर तुसडे वाटतात. पुढारी हा गांठीभेटीबाबत थोडासा मऊ असावा लागतो. माणसें जोडणें हें त्याचें काम असतें. आणि कोणता माणूस कोणत्या कारणामुळें दूर जाऊील हें सांगणें शक्यच नाहीं. म्हणून पुढाऱ्यांना खूप त्रास होतो. सावरकर हे तसे नाहींत. त्यांचें व्याख्यान ठरविणें, मुलाखत घेणें हें तितकें सोपें नाहीं. तुम्ही एकदां त्यांत यशस्वी होण्याअितकी चिकाटी दाखविलीत कीं मग सरस्वतीच प्रसन्न झाल्याचा आनंद तुम्हांला होऊील. अेकदां बोलायला लागले कीं खूप बोलतील. व्याख्यानाला आले कीं अेक तास अगदीं रंगवून सोडतील.

सावरकरांचें वक्तृत्व

शिकार बुजूं नये म्हणून शिकारी आपलीं पावलें आवाज येणार नाहीं अशा पद्धतीनें टाकतो ना ! सावरकरांच्या व्याख्यानांची सुरुवात अशीच असते. त्यांचा आवाज ध्वनिक्षेपकाशीं अितका जुळतो कीं, त्यामुळें कोठेंहि कर्कशता येत नाहीं. व्याख्यानाचा विषय कोणताहि असो; सावरकरांनीं केलेलें व्याख्यान 'पडलें' आहे असें कधींच झालें नाहीं. अैन तारुण्यांत त्यांनीं केलेल्या व्याख्यानांनीं लाला हरदयाळ, ऋषीजी अय्यर, श्यामजी कृष्ण वर्मा, मदनलाल धिंग्रा यांसारखीं माणसें सावरकरांच्यावर मोहित होऊन त्यांच्या पंथांत सामील झालीं. सावरकरांच्या भाषणांत नुसता बुद्धिवाद नसतो, माहितीहि केवळ नसते, किंवा केवळ भावनेची अुत्कटताहि नसते. अेखाद्या कलाकृतीप्रमाणें सावरकर आपलें भाषण रंगवतात. ते अुत्कृष्ट नट आहेत; त्यामुळें त्यांचे हावभाव नाट्यमय असतात. आवाजाचा

चढअुतार योग्य ठिकाणीं केलेला असतो. मी सावरकरांचीं अनेक भाषणें अैकलीं आहेत. त्यांच्या भाषणाचा शेवट अेखाद्या अुत्कट भावनांनीं भरलेल्या विधेयापाशीं करण्याची त्यांची पद्धति मी अनेक वेळां अनुभवली आहे. सावरकर '१८५७' च्या युद्धावर किती वेळां तरी बोलले असतील ! पण दादरला १९५१ मध्यें त्यांनीं जें '१८५७ वर भाषण केलें त्या वेळीं त्यांनीं जो समारोप केला त्यानें अनेकांचे डोळे ओलावले असतील ! सावरकरांनीं तात्या टोपेचें वर्णन करतांना त्याचें शब्दचित्र उभें केलें, आणि शेवटीं ते म्हणाले—' आम्हां दुर्बल जीवांच्या अश्रूंसाठीं तूं आपल्या जीवाचा सौदा कां केलास ? सेनापति तात्या टोपे यांचेबद्दल हें शेवटचें वाक्य लिहितांना त्या वेळीं माझ्या डोळ्यांत अश्रू आले होते. आजहि माझे डोळे ओलावतात. पण हे अश्रु आनंदाचे आहेत, विजयाचे आहेत. १८५७ च्या वीर पुरुषांच्या आत्म्यांना आज मी आवाहन करतों—' या -तात्या टोपे, या ! राणी लक्ष्मीबाई, ये ! नानासाहेब पेशवे, या ! तुमच्या महान् स्वातंत्र्य-युद्धाला १०० वर्षें व्हावयाच्या आंत—१९५७ उजाडावयाच्या आंत या देशांतून अिंग्रज निघून गेलेला आम्हीं पाहिला; तें महनीय दृश्य पहाण्यासाठीं आज येथें या ! ' हें बोलत असतांनाच त्यांचा कंठ दाटून आला. डोळ्यांत अश्रु तरळले. १९४९ सालीं कलकत्त्याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिलेंच भाषण करतांना त्यांच्या डोळ्यांत असेच आनंदाश्रु आले होते.

सावरकरांचें हें संवेदनाशील, स्वप्नरंजक कविमन—हेंच त्यांच्या वक्तृत्वाला बहर आणतें. त्याच्यावर भावनेचा शिडकाव करून व्याख्यानांतील विचारांना श्रोत्यांच्या हृदयांत नेअून सोडतें. पण ही भावनेची झिलअी देण्यापूर्वी सावरकर आपल्या तर्ककर्कश युक्तिवादानें, अुपहासपूर्ण विनोदानें आपली बाजू श्रोत्यांपुढें मांडतात. शक्य ती सर्व माहिती गोळा करून आपलें विधेय स्पष्ट करणें हें त्यांचें धोरण. अुत्कट तळमळीनें जेव्हां आपला युक्तिवाद ते मांडतात, त्या वेळीं 'भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।' अशी स्थिति होते. आपल्या या युक्तिवादानें सावरकरांनीं आतांपर्यंत अनेक परिषदा नि सभा जिंकल्या आहेत.

'मलाहि अेक गाणें गाअूं द्या ! मलाहि अेक वल्गना करूं द्या ! माझें म्हणणें खरें ठरलें तर मी प्रॉफेट ठरेन, खोटें ठरलें तर वेडा ठरेन मी !' यासारखीं व्यक्तित्वाच्या स्पर्शानें अुत्कट झालेलीं वाक्यें व्याख्यानाच्या शेवटीं कानावर पडलीं कीं श्रोते अस्वस्थ होअूनच घरीं परतताततात ! म्हणूनच सावरकरांचीं भाषणें हा अेक अनुभूतीचा विषय ठरला आहे !

× × ×

९ :

मूल्यमापन

सावरकरांचें बहुरंगी व्यक्तित्व, त्यांचे विविध मूलगामी विचार, व त्यांचें जीवनकार्य—यांचें विवेचन आतांपर्यंत आपण केलें. त्यांच्या कार्यांत त्यांना आलेलें यशापयशहि पाहिलें. मग आतां सावरकरांचें स्थान कोणतें ? त्यांचें राष्ट्रीय दृष्ट्या मूल्यमापन करतां येअील का ? या दोन्ही प्रश्नांविषयीं मतभेद असतील; पण कोणत्याहि महापुरुषाचें मूल्यमापन करतांना त्याचें सामाजिक दृष्ट्या असणारें स्थान, व व्यक्ति म्हणून त्यानें प्रकट केलेली असाधारण महत्तमता या दोन गोष्टी अवश्य लक्षांत ठेवल्या पाहिजेत. त्यांतहि कांहींचें व्यक्तित्व बहुरंगी नसतें, पण त्यांनीं केलेलें कार्य मात्र अितिहास पालटविणारें असतें. म्हणून महापुरुषांचें नेमकें मूल्यमापन करणें हें अवघड काम आहे. पण तें अवघड असलें तरी अशक्य खास नाहीं.

सावरकरांचें स्थान समाजाच्या अितिहासाच्या दृष्टीनें ठरवावयाचें झाल्यास पक्षान्ध दृष्टि सोडून वस्तुनिष्ठ व अैतिहासिक दृष्टि स्वीकारली पाहिजे. तेथें दूषित पूर्वग्रहहि नकोत, नि अंधभक्तीहि नको. कोणत्याहि अैतिहासिक महत्त्वाच्या पुरुषाचें मूल्यमापन याच वृत्तीनें. झालें पाहिजे. असा विचार केल्यावर काय दिसतें ? सावरकरांच्या कार्यावरून काय निष्कर्ष निघतात ? सावरकरांनीं तारुण्यांत केलेलें कार्य प्रामुख्यानें वैचारिक प्रक्षोभ निर्माण करण्याचें होतें. प्रत्यक्ष कोणतेंहि कार्य करण्यापूर्वीच ते धरले गेल्यामुळें सावरकरांचें क्रांतिकार्य हें प्रामुख्यानें वैचारिक झालें आहे. त्यांनीं

केलेल्या सामाजिक कार्यांतहि हीच प्रक्षोभकारी शक्ति आहे. त्यांनीं सह-भोजनादि जीं आंदोलनें केलीं तींहि समाज ढवळून काढण्यासाठीं. त्यांनीं ने' सामाजिक विचार मांडले त्यांतहि हीच प्रकृति दिसून येते. सावरकरांनीं हिंदुत्वाचें राजकारण केलें त्या वेळींहि हिंदुत्वाचा सिद्धान्त दृढमूल करण्यावरच त्यांनीं प्रामुख्यानें भर दिला. तेव्हां या तीन्ही प्रकारच्या कार्याचां प्रमुख विशेष वैचारिक प्रक्षोभ निर्माण करून कांहीं मूलभूत स्वरूपाचे सिद्धान्त मांडणें हाच होता. त्यामुळें सावरकरांचें जीवनकार्य प्रामुख्यानें वैचारिक स्वरूपाचें झालें आहे. आणि हेंसुद्धां त्या त्या काळीं अवश्य असणारें कार्यच होतें. सावरकरांना सुभाषबाबूंसारखें क्रांतिकार्य करण्याची संधि मिळाली असती तर ते स्वातंत्र्ययुद्धाचे सेनापति झाले असते; महर्षि अण्णासाहेब कर्व्यांप्रमाणें सावरकरांची प्रेरणा केवळ सामाजिक असती तर ते श्रेष्ठ समाजसेवक झाले असते; सावरकरांमध्यें खंबीरपणें लोकसंग्रहबुद्धीनें पक्षसंघटना निर्माण करण्याची ईर्षा असती तर त्यांनीं गांधी–पटेलांप्रमाणें अेक प्रतिस्पर्धी प्रबल राजकीय पक्ष चिरंतन स्वरूपांत या देशांत निर्माण केला असता. पण त्यांचें व्यक्तित्व व त्यांचें कार्य पाहिल्यावर असेंच वाटतें कीं, सावरकर मूलतः वैचारिक प्रक्षोभ निर्माण करून समाजाला अुपयोगी अशी तात्त्विक दृष्टि देणारे श्रेष्ठ प्रतीचे विचारवन्त आहेत (Thought leader); ते लोकनेते (Mass leader) नाहींत. त्यांना समाजाविषयीं वाटणारें प्रेम पित्यासारखें आहे. ते कर्तव्याच्या हांकेनें सार्वजनिक जीवनांत अुतरले; दयाशील साधुत्व ही त्यांच्या समाजसेवेची प्रेरणा नव्हे. सावरकर स्वतःच्या मनोवेधक व्यक्तित्वाच्या व वक्तृत्वाच्या बळावर शेंकडों लोक आपल्याभोंवतीं गोळा करूं शकले—पण त्यांना पक्षबद्ध करून ठेवूं शकले नाहींत. स्वतःचा संप्रदाय त्यांना निर्माण करतां आला नाहीं यांचें कारणहि हेंच आहे. सारांश, वैचारिक प्रक्षोभ निर्माण करणारा श्रेष्ठ वैचारिक नेता–हीच सावरकरांची या राष्ट्रांतील भूमिका ठरली आहे.

पण मग असा प्रश्न येतो कीं, जर सावरकर केवळ विचारवन्त आहेत तर त्यांचे हजारों पूजक या देशांत कां निर्माण झाले? आगरकर, डॉ. केतकर किंवा रॉय यांच्या सारख्या विचारवन्तांना असे पूजक कां लाभले

नाहींत ? याचीं दोन कारणें आहेत. अेक, सावरकरांच्या विचारसरणींत मन भारून टाकणारी भावनात्मक व अुदात्त स्वप्नरंजकता (Romantic appeal) असते; आणि दुसरें म्हणजे, सावरकरांच्या व्यक्तित्वांत साहसी वृत्ति, हौतात्म्य या गोष्टी असल्यामुळें त्यांच्या विचारसरणींतहि अेक प्रकारचें हृदय अस्वस्थ करणारें आवाहन असतें. त्यांतहि सावरकरांचें जीवनहि रोमांचकारी झाल्यानें त्यांच्या विचारसरणीभोंवतीं तें वलय सदैव फिरत राहातें. या दोन कारणांमुळें त्यांच्या तारुण्यांत वीरेंद्र चट्टोपाध्याय, भाअी मानवेंद्रनाथ रॉय यांसारख्या शेंकडों देशभक्तांना त्यांनीं स्फूर्ति दिली, आणि १९३७ सालीं राजकारणांत पडल्यावरहि लढाअू व विजिगीषु हिंदुत्वाच्या घोषणेनें अेका पिढीवर फ़ार मोठ्या प्रमाणांत छाप पाडली ! या स्वप्नरंजक आकर्षकतेमुळें सावरकरांचे विचार केवळ बुद्धि हालवीत नाहींत, तर हृदयहि अस्वस्थ करून टाकतात ! म्हणूनच गेल्या पन्नास वर्षांत स्वतःच्या तपश्चर्येच्या विचारांच्या साहाय्यानें स्वातंत्र्यलक्ष्मीचा नि हिंदुत्वाचा जयजयकार सावरकरांनीं या देशांत घुमविला ! सावरकरांचीं मतें ज्याला मान्य नाहींत त्यालाहि हें त्यांचें कार्य मान्य करावेंच लागेल. अेखादी कल्पना राष्ट्रांत दृढमूल करणें हें कांहीं सोपें कार्य नाहीं ! त्या कल्पनेशीं त्या माणसाला तादात्म्य व्हावें लागतें—नव्हे सर्व आयुष्यच त्या तत्त्वाच्या वेदीवर वाहावें लागतें ! सावरकरांचें श्रेष्ठत्व यांतच आहे !

म्हणून आपण पाहिलें कीं, सावरकरांचें जीवितकार्यच वेगळ्या स्वरूपाचें आहे. अितिहासाच्या प्रवाहांत प्रत्येक महापुरुषाच्या अंगावर वेगळी जबाबदारी पडते. शिवाजी, राजाराम, आणि पहिला बाजीराव यांनीं अेकाच हिंदुपदपादशाहीसाठीं वेगवेगळ्या प्रकारचीं कार्यें केलीं ! पण शिवाजीअितकी लोकप्रियता राजाराम आणि पहिला बाजीराव यांच्या वांट्याला आलेली नाहीं ! पण त्या लोकप्रियतेवरून त्यांचें अैतिहासिक मूल्यमापन करणें जितकें चुकीचें आहे तितकेंच सावरकरांच्या लोकप्रियतेवरून त्यांचें स्थान ठरविणें चुकीचें आहे. राजारामाच्या काळांत मराठ्यांना जसा दक्षिणेंत लढा द्यावा लागला होता, तसाच लढा गेल्या पंधरा वर्षांत हिंदु समाजाला द्यावा लागला आहे ! मुस्लीम जातीयवादी व ब्रिटिश या दोन्ही आक्रमणांच्या कात्रींत हिंदु समाज सांपडला असतांना सावरकर राजकारणांत पडले, आणि

आत्मविश्वासशून्य राजकारणाचें पारडें हिंदुत्ववाद्यांच्या बाजूनें फिरविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. त्यांत त्यांना अपयश आलें, पण तें अपयश सावरकरांचें नसून हिंदु समाजाचें आहे ! केवळ या अपयशामुळें सावरकरांचें आयुष्य ही शोकान्तिका आहे असें म्हणणें पराभूत मनोवृत्तीचें लक्षण आहे !

स्वातंत्र्य हें त्यांचें लहानपणापासूनचें स्वप्न होतें; त्यांच्या क्रांतिकार्याची प्रेरणा त्या असीम स्वातंत्र्यप्रीतीतच आहे. तें त्यांचें परमवांछित ध्येय आतां साध्य झालें आहे ! हें राष्ट्र स्वतंत्र झालें आहे ! त्यामुळें सावरकरांच्या जीवनावरहि आतां स्वातंत्र्याच्या अुषःकालाची रमणीय प्रभा पसरलेली आहे ! त्यांना झालेला अत्यानंद १५ ऑगस्ट १९४७ ला तिरंगी राष्ट्रध्वज फडकवून त्यांनीं व्यक्त केलाच होता ! हिंदुत्वाच्या आधारावर ऐकरस झालेला बलशाली हिंदु समाज हें सावरकरांचें दुसरें स्वप्न आहे ! तें आज सिद्ध झालेलें नसलें तरी हिंदुत्व ही राष्ट्राची शुभशक्ति आहे, भारतीय राष्ट्रीयत्वाचाहि तो मूलाधार आहे,—हा सिद्धांत आतां रूढ होत आहे ! हिंदुत्वाची विधायक शक्तीच या समाजांतील असंख्य भेद वितळवून टाकण्यास अुपयोगी पडणार आहे, हें या समाजांतील विचारवन्तांना आज ना अुद्यां पटेल ! विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद यांचाहि स्वीकार करावा लागेल ! तेव्हां ही हिंदुत्वाची मूलभूत कल्पनाहि भविष्यकाळांत विजयी होणार हें निश्चित ! म्हणून सावरकरांचें तात्कालिक राजकारण अयशस्वी झालें असलें, राजकीय नेता म्हणून त्यांच्या पदरीं अपयश आलें असलें, तरी त्यांचे हे राजकीय सिद्धान्त अखेर या देशाच्या विचारवन्तांना स्वीकारावेच लागतील ! सावरकरांचें जीवनकार्य मूलतः वैचारिकच असल्यामुळें तें अयशस्वी झालेलें नसून यशाच्या मार्गावर आहे. अेक स्वप्न साकार झालें, दुसरेंहि होअील. मग त्याच्या श्रेयाची काळजी नको. प्रेम मिळालें, मग श्रेयाची काय चिंता ?

सारांश, सावरकरांच्या निःपक्षपाती टीकाकाराला, त्यांचें अैतिहासिक मूल्यमापन करणाऱ्याला, किंवा त्यांचीं कोणतींहि मतें मान्य नसणाऱ्यालाहि हें मान्यच करावें लागेल कीं, जेथें क्रान्तिकार्याचा ज्वालामुखी धडधडत आहे, बुद्धि नि भावना यांचा संयोग झाल्यामुळें तेजस्वी झालेले विचार

प्रकाश देत आहेत, अंधश्रद्धा—धर्मवेड यांना आघातणारा बुद्धिनिष्ठेचा घण घणघणत आहे, व्यक्तिगत लोकप्रितेची राख अंगाला फांसून तत्त्वनिष्ठेची पूजा चालू आहे, जीवन आणि मृत्यु यांच्यावर समान प्रेम आहे, सुख नि दुःख दोघेंहि हंसत आहेत, प्रतिभेच्या वेलीवर झुंमललेल्या टवटवीत साहित्यपुष्पांचा सुवास जेथें दरवळत आहे असेंच सावरकरांचें जीवनाविश्व आहे ! भविष्यकाळीं कदाचित् त्यांचे पुतळे वा मूर्ति रस्तोरस्तीं वा घरोघर पूजिल्या जाणार नाहींत; पण त्यांच्या जीवनकार्याचें व व्यक्तित्वाचें श्रेष्ठत्व आणि त्यांचें सौंदर्य अुघड्या—बोडक्या डोंगरांतील गुहेंत कोरलेल्या अजिंठ्याच्या लेण्यांसारखें आहे ! सौंदर्य नि कला मूर्तिमंत स्वरूपांत पहाण्याचा आनंद जसा तेथें मिळतो, तसाच आनंद प्रत्येक भारतीय देशभक्ताला सावरकरांचें भव्योदात्त जीवन, तेजस्वी विचार आणि समृद्ध व्यक्तित्व पाहून मिळेल ! अुदात्ततेचे अमिट संस्कार त्याच्या अंतःकरणावर होतील, आणि प्रसन्नतेच्या अुच्च क्षणांत तो सावरकरांच्या त्या मूर्तीपुढें नतमस्तक होअून अुभा राहील ! प्रकाशासाठीं तळमळणाऱ्या पुष्पाला त्याचें जीवन अुमलविणारा प्रकाश लाभला कीं आनंद होत असेल कां ? होत असेल तर सावरकर-दर्शनानें होणारा आनंदहि अगदीं असाच आहे हें त्याला पटेल, नि तो आनंदातिशयानें सांगत सुटेल—कीं, " झंझावातांत दिसणारें सृष्टीचें रूप तुम्हांला पहावयाचें असेल तर सावरकरांचें जीवन जवळून पहा ! तळमळणाऱ्या अंतःकरणाचा अुद्रेक पहावयाचा असेल तर त्यांचे विचार वाचा ! संमिश्र मानवी व्यक्तिमत्वाचा अभ्यास करावयाचा असेल तर सावरकरांचें व्यक्तित्व निःपक्षवृत्तीनें न्याहाळा !—तरच सावरकरांचें संपूर्ण दर्शन तुम्हांला घडेल ! "

× × ×

आमचें तेजस्वी मराठी प्रकाशन

स्वा. वि. दा. सावरकर

१८५७ चें स्वातंत्र्यसमर	१२॥
हिन्दुत्व	२॥
हिन्दुराष्ट्रदर्शन	६
हिन्दुत्वाचे पंचप्राण	३
हिन्दुपदपादशाही	५
सिंहगड	॥•
बाजी प्रभू	॥•
चाफेकर–रानडे	।=
रानफुलें	२
तेजस्वी तारे	२
नागरी लिपिशुद्धीचें आन्दोलन	२॥

शि. ल. करन्दीकर

सावरकरांचे सहकारी	१॥

डॉ. वि. म. भट

अभिनव भारत	४

ना. सी. फडके

अुजाडलं ! पण सूर्य कुठं आहे ?	५
प्रीतिपुष्प	२॥

आचार्य अत्रे

पत्रकार अत्रे	२॥
हंशा आणि टाळ्या	५

वि. वा. हडप

भारतमाते, अूठ	३
भारतमातेची हांक	३
भारतमातेचा शाप	३
भारतमाता वनवासी	३
भारतमातेचें दिव्य	३

आमचें तेजस्वी मराठी प्रकाशन

भारतमाता की जय ३
सिंहाचे छावे ३
वापलेक ३
काँग्रेसचा कल्पवृक्ष १॥

र. गो. सरदेसाई

आमचा संसार २॥

भा. वि. नाडकर्णी

राजाराणी २

पिरोज आनंदकर

बाल बहिर्जी २

बा. वा. फाटक

मुंबईचे मानकरी २

केशवराव भोळे

संगीताचे मानकरी २॥

प्रिं. मो. वा. दोंदे

वनविहार १।

संजीवनी मराठे

भावपुष्प १॥

सौ. अनसूया कामत

स्वयंपाकाचे कांहीं प्रकार २॥
आमची विलायतला प्रथम भेट ४

वि. वि. वोकील

गांठभेट २॥

ग. कृ. वोडस

भगवा झेंडा १॥
पूज्य गांधीजी १।
अटकेपार १॥
वासुदेव बळवन्त १॥
छत्रपतीचा छावा ·॥·
महावीर कर्ण ·॥·
राणा प्रताप ·॥·

कै. वि. ह. औंधकर

आग्ऱ्याहून सुटका २
बेबंदशाही २

स. अ. शुक्ल

लोक–सिंहासन १॥
वीर अभिमन्यु ·॥·
जयद्रथवध ·॥·

नानासाहेब गोखले

सेनापति तात्या टोपे ·॥·

वि. ना. कोठीवाले

जयमल्हार १॥

ग. पां. परचुरे

जातिवन्त जवान १।

ह. वि. देसाई

दोन लग्नें ·॥॥·

आमचें तेजस्वी मराठी प्रकाशन

मधुकर राव

लक्षाधीश १।

सौ. वेडेकर

पारध १।

कै. श्री. कृ. ओक

सिंहगर्जना १

वि. ग. धारप

पुढचें पाऊल १।

सरपोतदार

चंद्रराव मोरे १॥

के. पां. परांजपे

शेजारीपाजारी १॥

शां. गो. गुप्ते

झुंझार झांशीवाली ।।•

मामा दुगल

प्रेमगीतें ।≈

बा. अ. देसाई

झुंझार महाराष्ट्र ।।•

गो. वि. जोगळेकर

कबुतराची कथा ।≈

ह. रा. महाजनी

ईश्वराची आत्महत्या ३

वि. रा. हंबर्डे

सन १८५७ (नाटक) १॥

अनुभवी प्राध्यापक

प्राचीन मराठी वाङ्मय-साहाय्यक १।

ग. वा. ओक

कुंडली-रहस्य-दर्पण २

कामदेव

कामदेवाच्या कथा १

शालेय

महाराष्ट्राच्या गोंड गोष्टी ।।≈

वसुंधरा पटवर्धन

संसारशोभा २

भा. द. खेर

गुलाबाचं फूल २॥

सौ. मालती जोशी

सुशिक्षित सासुरवास ।।•

मामा वरेरकर

द्वारकेचा राजा १॥

भा. कृ. केळकर

सावरकर-दर्शन ६

नाना कोचरेकर

मानी मराठा १॥

केन्द्रीय पुस्तकालय
७७७६
REFBK-0007776